मा १३२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा ग्रंथालय)

मासिकाचे नांव — मुमुक्षु

संपादक — ल. रा. पांगारकर

मासिक क्रमांक —          सन — १

खंड ३

अंक —

(महिने) १ ते १२

ना.मा. १२५/१२

१५/५/३३

ग्रंथ

ता. १५/५/३३

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें। संसारीं होइजे निराळे।
मोक्ष पाविजे निश्चळें। स्वरूपाकारें॥ (श्रीरामदास)

जुनें वर्ष २६ ) मार्गशीर्ष शके १८५३ ( नवें वर्ष १२ वें
मास ५ ) जानेवारी इ. स. १९३२ ( अंक १
वार्षिक वर्गणी रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३८३

## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी, ए.

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.

मुद्रकः—विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६
लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | ... | १ |
| २ ज्ञानेश्वरदर्शन ( ग्रंथ ) | ... | २–३ |
| ३ मध्वमुनीश्वरांची कविता ( लेख ) | ... | ४–८ |
| ४ ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य ( अ० १३ व १४ ) | ... | ९–२१ |
| ५ श्रीकृष्णांचें चरित्रदर्शन ( प्र० १० ) | ... | २२–३५ |
| ६ महाराष्ट्राचा दुरभिमान ( उतारा ) | ... | ३६–३७ |
| ७ मुक्तिमार्गावरील कांहीं वाटमारे मांग | ... | ३८–३९ |
| ८ धनाचा सदुपयोग ( नाथांची वाणी ) | ... | ४० |

---

ग्राहकांसः—

## ज्ञानेश्वरनामदेवांचा काल

'मुमुक्षूच्या' मागील अंकांत आमच्या ह्या नव्या ग्रंथाची पुसट ओळख करून दिलीच आहे. सदर ग्रंथ मुंबईस 'मुंबई वैभव प्रेस' ह्या छापखान्यांत छापावयास दिला असून वीस दिवसांत त्याचीं शंभर पृष्ठें छापूनही झालीं आहेत! टाईप व छपाई उत्तम, कागद जाड व स्वच्छ. पृष्ठसंख्या सहाशेंवर जाईल, पुढील मजकूर तपासून पाठविणें व रोज प्रूफें पाहून पाठवणें हें काम नाशकास राहूनच चाललें आहे. वर्षप्रतिपदेच्या दिवशीं ग्रंथ छापून प्रसिद्ध होईल असा अंदाज आहे.

नाशीक, मुमुक्षु कचेरी, | लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

मुमुक्षु मासिक
वर्ष १२ वें

# मंगलाचरण

जानेवारी १९३२



## अभंग

१

सुखाचिये गोठी सुख आले भेटी । तया लाभासाठी जीव वेचिलागे
माय ॥१॥
तव अवचितें सगुण भरलेसें नयनीं । बोलतां अंगणीं म्यां देखियेले २
जीवाचा जीवु माझा भेटवा यादवराजा । उचलल्या चारी भुजा देईल
क्षेम । न करा उपचार न रंगे हें मन । दृष्टीपुढें ध्यान ठसावलें ३
आवडी गिळोनि येणें सुख विहरोनि ठेलें । चित्त माझे गोविले गोवळेनि ४
आतां भरोवरी उरविता नुरे उरी । आनंदें अंतरीं कान्हो संचरला ५
बाप रखुमादेवी वरु विठ्ठल निर्गुण । तो सुखाची सांठवण गिळोनि ठेला ६

२

जीवाचिया जीवा प्रेमभावाचिया भावा । तुजवांचूनि केशवा आनु नोवडे१
जीवें अनुसरलिये अर्जुनि कां नये । वेगीं आणा तो सये प्राण माझा २
सौभाग्यसुंदरु लावण्यसागरु । बापरखुमादेवीवरु श्रीविठ्ठलु ३

३

सांवळिये बुंधी सांवळिया रूपें । सावळिया स्वरूपें वेधियेले १
काय करूं गे माये सांवळें न सोडी । इंद्रियां इंद्रिय जोडी एकतत्वें २
कैसें याचें तेज सावळें अरुवार । कृष्णीं कृष्ण नीर सतेजपणें ३
ज्ञानदेव ह्मणे निवृत्तीचें खुणें । सांवळचि होणें यासी ध्यातां ४

४

कांहीं बोलिलों बोबडें । मायाबापा तुह्मांपुढे ।
सलगी लाडेकोडें । मज क्षमा करावी ॥ १ ॥
काय जाणावा महिमा । तुमचा म्यां पुरुषोत्तमा ।
आवडीनें सीमा । सांडविली मजहातीं ॥ २ ॥
घडे अवज्ञा सख्यत्वें । बाळें बापासी न भ्यावें ।
काय म्यां सांगावें । आहे ठावें तुह्मांसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा । प्रेमलोभ न संडावा ।
पाळिला पाळावा । ळळा पुढती आगळा ॥ ४ ॥

# श्रीज्ञानेश्वरदर्शन.

अखिल महाराष्ट्रभाषाभिमानी लोकांचें वार्षिक साहित्य–संमेलन बृहन्महाराष्ट्रांतील कोणत्यातरी प्रांतांतील मुख्य ठिकाणीं भरत असतेंच. परंतु प्रांतापेक्षांही लहान लहान विभागांनीं आपापल्या मर्यादित क्षेत्रांत वार्षिक संमेलनें भरवून साहित्याभिवृद्धीचें कार्य अधिक प्रसृत करणें इष्ट होईल या कल्पनेनें १९२८ सालापासून नगर–नाशिक या निकटवर्ती जिल्ह्यांनीं आळीपाळीनें संयुक्त संमेलन भरविण्याचा उपक्रम सुरू केला व तो यशस्वी झाल्याचें सर्वतोमुखीं मान्य झालें. या संयुक्त संमेलनाचें पांचवें वार्षिक अधिवेशन १९३३ सालचे जाने० महिन्यांत अगर त्या सुमारास **श्रीज्ञानेश्वर** महाराजांच्या **श्रीज्ञानेश्वरी** या महाराष्ट्र ग्रंथ–राजाच्यानिर्मितीनें चिरस्मरणीय व पावन झालेल्या अहमदनगर जिल्ह्यांतील श्री मोहनीराज क्षेत्र नेवासें तेथें भरविण्याचें योजिलें आहे.

**श्रीज्ञानेश्वरीच्या** जन्मस्थानीं भरणाऱ्या संमेलनप्रसंगाचें अपूर्वत्व लक्षांत घेऊन त्यास उचित असा "**श्रीज्ञानेश्वर–दर्शन**" या नांवाचा सर्वोपयुक्त एक स्मारक ग्रंथ तयार करण्याचें योजिलें आहे. या खालीं दिलेल्या निरनिराळ्या विषयांवर त्या त्या विषयांतील अधिकारी व नामांकित लेखकांच्या लेखांचा समावेश करण्यांत येणार आहे; ह्मणून सर्व वर्गाच्या महाराष्ट्र–वाङ्मयप्रेमी सद्गृहस्थांस अशी नम्र विनंति आहे कीं त्यांनीं हें महत्कार्य तडीस नेण्यासाठीं आह्मांस स्वतःच्या लेखांच्या दानानें अगर दुसऱ्याचे मिळवून देऊन व शक्य त्या इतर सर्व प्रकारचें मनोभावें सहाय्य करून महाराष्ट्र–वाङ्मयास ललामभूत अशा आद्य संत–विभूतिचें सर्वांगीण वाङ्मय स्मारक केल्याचें श्रेय संपादन करावें.

हें कार्य बृहन्महाराष्ट्राचें असून सर्व विद्वान् मंडळीच्या सहाय्यानेंच पार पडणारें आहे. स्वभाषेचा अभिमान असणाऱ्या पाश्चात्यांनीं त्यांस पूज्य असणारा शेक्सपिअर व त्याचे ग्रंथ यांविषयीं अशा तऱ्हेचे अनेक प्रयत्न केले आहेत. ज्या ज्ञानेश्वरीद्वारां स्वभाषोत्कर्षाचें व भक्तिमार्ग व भागवत धर्मप्रसाराचें अमूल्य कार्य झालें ती ज्ञानेश्वरी ज्या ठिकाणीं जन्मास आली त्या ठिकाणीं सदर "**श्रीज्ञानेश्वर-दर्शन**" ग्रंथ प्रसिद्ध करून श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या चरणीं अर्पण करावा अशी उमेद **अहमदनगर वाङ्मयोपासक मंडळानें** बांधिली आहे. मंडळानें या बाबतींत प्रो० श्री० रा० पारसनीस एम्. ए. प्रो० न. ग. जोशी एम्. ए. श्री० दादासाहेब धनेश्वर, श्री० नानासाहेब मिरीकर [ जहागिरदार ] वगैरे सद्गृह–

हस्थांची एक कमेटी नेमून योजिलेल्या ग्रंथांत समाविष्ट करण्याच्या विषयांची यादी तयार करविली आहे; व ती महाराष्ट्रांतील विद्वानांच्या विचारासाठीं आज आह्मी प्रसिद्ध करीत आहोंत.

या यादींतील विषयाखेरीज दुसरे कांहीं समर्पक विषय कोणास सुचत असल्यास त्यांनीं ते कळविण्याची तसदी घ्यावी अशी विनंति आहे. या विषयां-वर तज्ञ व अधिकारी मंडळींना मंडळ व्यक्तिशः विनंतिपत्रें पाठवीलच; परंतु तसें करतांना कांहीं नांवें चुकून राहण्याचा संभव; शिवाय योजिलेल्या ग्रंथांतील विषय ज्ञानेश्वरीचे अभ्यासकांस लेखनाचा पहिलाच प्रयत्नही करण्यास स्फूर्ती देतील असे आहेत. तरी सर्वांनीं या कार्याचें महत्व जाणून विनंति—पत्राची वाट न पाहतां हेंच जाहीर विनंतिपत्र त्यांस व्यक्तिशः उद्देशून लिहिलेलें आहे असें समजून त्या भावनेनें पुढें येऊन आपल्या सूचना व लेख पाठवावें अशी नम्र विनंति आहे.

विषयांची यादी,

व्यक्तिविषयक, पूर्वपीठिका, चरित्र, भावंडें, इतर संत,

ग्रंथविषयक, समग्रदृष्टी, पृथग्दृष्टि, संप्रदाय, भागवतसंप्रदाय, इ०

ज्ञानेश्वरी महाराष्ट्र भाषेंतील आद्य किंवा आद्यतुल्य ग्रंथ; ज्ञानेश्वरींतील प्रतिपाद्य विषय; ज्ञानेश्वरीची भाषा व्याकरण अलंकार व्युत्पत्ति; महानुभाव वाङ्मय व ज्ञानेश्वरी; यथार्थदीपिका व ज्ञाने०; गीतारहस्य व ज्ञाने०; पाश्चात्य तत्वज्ञान व ज्ञाने०; इतर दर्शनें व ज्ञाने०; ज्ञानेश्वरीचा इतिहास; ज्ञानेश्वरी व समाजस्थिति; 'ज्ञाने० व इतिहासउल्लेख; ज्ञानेश्वरीचे तत्कालीन महत्व; ज्ञानेश्वरीचे आजचें महत्व; ज्ञानेश्वरीचे चिरकालीन महत्व; ज्ञानेश्वर योगी, वेदांती, भक्त; ज्ञानेश्वरी काव्य; ज्ञानेश्वरी व रसिक; ज्ञाने० व भाविक; ज्ञाने० चिकित्सक; ज्ञानेश्वर साधु-कवि; भागवत सांप्रदायांत ज्ञानेश्वरीचें महत्व; ज्ञानेश्वर व योगशास्त्र; ज्ञानेश्वरीचें लोककार्य; ज्ञानेश्वरी व इतर भाषा; ज्ञानेश्वरी व अमृतानुभव; मूळ ज्ञानेश्वरीच्या उपलब्ध प्रती.

निदान १९३२ च्या जून अखेरं सदर लेख मंडळाकडे पाठविण्यांत यावेत.

या संबंधीं पत्रव्यवहार करणें तो जिल्हा **चिटणीस वाङ्मयोपासक मंडळ अहमदनगर** ( के. ल. टेंभुर्णीकर, संगमनेर ) यांजकडे करावा.

# " मध्वमुनीश्वरांची कविता "

[ ले. वामन त्र्यंबक भाटे एम्. ए. बेळगांव ]

१ मध्वमुनींचीं सुमारें ५०० पदें श्री. प्र. त्र्यं. गुब्बी यांनीं "मुमुक्षू"च्या १९२६,२७,२८ या सालाच्या अंकांतून प्रसिद्ध केलीं आहेत. त्यामध्यें नवनीतांतील ४ ही पदांचा समावेश आहे; "उद्धवा शान्तवन करा जा" "तूं माझा यजमान" 'आम्ही जाणों हरिचे पाय" "तो नर गति चुकला" ही तात्यांनीं नवनीतांत ग्रथित केलीं आहेत. मुमुक्षूच्या अंकांत "कधिं भेटेल मजला देव हरी" हें एक अत्यंत मधुर पद आम्हांस सांपडलें. सारस्वतकारांनीं " हरि तुझी मुरली ऐकुनि गोड" हें तसेंच मधुर असल्याचें लिहिलें आहे. मुनीश्वरांनीं कांहीं संस्कृत व हिंदी रचनाही केली आहे व श्लोकबद्ध रचना व आरत्याही केल्या आहेत.

२ श्री रामचंद्र व कृष्ण यांच्या चरित्रांतील प्रसंगांवर आख्यान रूपानेंपद्यें आहेत. गणेश, अंबा, सप्तशृंगी, राम, कृष्ण, नरसिंह, साधुसंत वगैरेवरही त्यांनीं पद्यरचना केली आहे. "प्रल्हादचरित्र"ही त्यांनीं श्लोकबद्ध लिहिलें आहे. सारस्वतकार "धनेश्वर आख्यान" त्यांनीं लिहिल्याचा उल्लेख करितात, परन्तु तें आम्हांस वाचावयास मिळालें नाहीं.

३ श्री. गुब्बी, आजगांवकर, व भावे यांच्या लिखाणांत मुनींचा जन्मशक आढळत नाहीं. समाधी शक १६५३ हा मात्र आढळतो, आजगांवकर हा शके १६५६ मानतात. त्यांच्या पद्यरचनेवरून, भाषाप्रभुत्वावरून, प्रेमळपणावरून ही पद्यरचना, त्यांनीं चांगल्यांच प्रौढ वयांत केली असावी असें अनुमान बांधण्यास हरकत नाहीं. मुमुक्षू-अंकांत गुब्बी यांनीं जें त्रोटक चरित्र दिलें आहे त्यावरूनही या आमच्या अनुमानास पुष्टी मिळते. ते लिहितात कीं ही पद्यरचना मुनीनीं गणेशाच्या अनुज्ञेनें त्याचा प्रसाद मिळाल्यावर केली. तोंवर त्यांनीं सप्तशृंगीचा प्रसाद घेतला होता. तत्पूर्वीं त्यांची मुंज होऊन गेली होती. देवीच्या सांगण्यावरून ते प्रदक्षिणेस गेले तों शुकाचार्य त्यांस व्याघ्ररूपानें भेटले. यावेळीं त्यांचे वय २२ एक वर्षें धरावें. मुंजीच्या वेळी ८।१० वर्षें वय असेल. पुढें सप्तशृंगीस देवीपाशीं अनुष्ठान १२ एकवर्षें, नंतर गुरुप्रसाद व मग गृहस्थाश्रमप्रवेश. मध्यंतरीं त्यांस मध्वाचार्य व शंकराचार्य यांजकडून मान्यता मिळाली व "मुनी" व "वरदपरात्पर" अशा संज्ञा प्राप्त झाल्या.पुढें त्यांस भगुरास गणेशाच्या अनुष्ठानास जावेंसें वाटलें व तेथून प्रसाद मिळवून व काव्य करण्याची अनुज्ञा घेऊन ते घरीं आले तों प्रपंच सोडून भिक्षावृत्तीनें रहावें अशी इच्छा त्यास उत्पन्न झाली व लागलीच त्यांनीं प्रपंचत्याग केला. या सुमारास त्यांस अपत्यें झाली होतीं.

विरक्ती उत्पन्न होवून त्यागाचें धैर्य व्हावयाचें म्हणजे त्यांचें वय सुमारें ४० एक वर्षें तरी असावें असा अंदाज बांधला तर जन्म शक १६०० चा सुमार धरावयास हरकत नाहीं; कारण यानंतर त्यांचें लोककार्य व शिष्यसमुदाय वगैरे झालें आहे. त्यांनीं अनेक ठिकाणांहून राममूर्ति, शिवाची पिंडी, वगैरे शोधून काढून देवालयें वगैरे बांधिलीं व अमृतरायासारखा शिष्यवर त्यास प्राप्त झाला. इतकें होईतों २० एक वर्षें तरी काळ लोटला असावा व नंतर समाधी, तो शक १६५३ असा बहुमतें ठरतो. तेव्हा जन्मशक स्थूलमानानें १६०० चा सुमार धरण्यास हरकत नाहीं. गणेशप्रसाद व काव्यरचना १६२५--४० नंतरची असावी.

४ यांनीं काव्यरचनेस आरंभ केला तत्पूर्वींच्या सर्व संतकवींस त्यांनीं वंदन केलें आहे. त्यांत समर्थरामदासांचें नांव आहे इतकेंच नव्हे तर भुजंगप्रयात वृत्तामध्यें "मनास बोध" ही त्यांनीं रामदासांप्रमाणेंच लिहिला आहे. तुकाराम, एकनाथ, ज्ञानदेव, मुक्ता, बहिरापिसा, चोखा, गोरा, राका, नामा, नरसी, वगैरे सर्व संतमंडळींस त्यांनीं नमन केलें आहे. या सर्वांची कीर्ति त्यांच्या कानांवर असून त्यांच्या कवनांची ही त्यांस बरीचशी माहिती असावी.

५ यांचें काव्य पाहिलें व यांच्या पूर्वींच्या कवींचें काव्य पाहिलें म्हणजे यांनीं विशिष्ट हेतु मनांत धरून नवीन संप्रदायानुरूप काव्यरचना केली असावी असें वाटतें. यांच्यापूर्वीं वामन पंडितांनीं आख्यानें रचिलीं, मुक्तेश्वरांनीं रचिलीं व यांनींही आख्यानें रचिलीं. मुक्तेश्वरांनीं ओंवीछंद घेतला व कथाभाग सुव्यवस्थित लिहिला. वामन पंडितांनीं तर आख्यानें फुटकळ रचिलीं, श्लोकबद्ध रचना केली, नादमाधुर्य उत्पन्न केलें व सुश्लोक वामनाचा व 'यमक्या वामन' अशी कीर्ति केली. यांच्या आख्यानांची गोडी मधुर चालींमुळें व रसोत्कर्षामुळें वाटतें. ओंवी, श्लोक यांत आख्यानें रचून झाल्यावर तुकोबानिळोबांनीं श्रीकृष्णाच्या बाललीलांचे अभंग रचले ताहेत. निळोबांनीं चांगदेव चरित्राचे अभंग लिहिले आहेत तर यांनीं रामकृष्ण चरित्र पर पदें केलीं आहेत. पदांतून साग्र रामकृष्णांची चरित्रें गातां यावीत हाच यांच्या रचनेचा मुख्यतः रोंख होता. परंतु रामकृष्णांच्या चरित्राच्या मध्यभागीं येऊन त्यांनीं रचना थांबविली असावी असें वाटतें. बाललीला रामवनवास, नन्दगृहीं वास व दुष्टदमनाची तयारी येथपर्यंत पद्यें रचून पुढें मात्र मुनीश्वर वेदान्त वा व्यवहारोपदेश वा नीतिकथन वा केवळ नामस्मरण यांत गुंगून गेले आहेत असें दिसतें. पदें चरित्रांवर करणें हा एक यांच्या संप्रदायाचा विशिष्टपणा होय.

६ तसेंच वेदान्तांतही यांनीं सांप्रदायभंग करून नूतन सांप्रदाय पाडला. यांनीं मध्वाचार्यांकडून व शंकराचार्यांकडून दोघांपासून ही पदव्या मिळविल्या

होत्या व द्वैताद्वैत व स्मार्तवैष्णव हा भेद स्वतःच्या मनांतून अजीबात काढून टाकिला होता हें त्यांच्या चरित्रावरून वाचकांस समजून येणारेंच आहे. तेंच त्यांच्या काव्यातही आढळतें.

"तैसी माझी द्वैतगंगा ।
जाऊनि अद्वैत्यासी सांगा ॥
मध्वनाथ मीनमार्गी । पोहतसे दोन्हीं मार्गीं ॥

द्वैत व अद्वैत हीं दोन्हीं यास पसंत होतीं व दोन्हीं ही त्यास नापसंत होतीं. ईश्वरी शक्ती या दोन्हीं मध्येंच कोठें तरी वास करीत आहे हें त्यांस जाणवलें असावें. कांहीं काळ आत्म्याच्या उन्नतीपावेतों द्वैत गृहीत धरावें लागतें, तर ज्ञान प्राप्तीनें अद्वैत पटतें; परन्तु जोंवर शरीरधर्मांनीं आत्मा बद्ध असतो तोंवर द्वैता-मध्येंच व्यवहार घडतो. मानसिकरीत्या अद्वैत कबूल झालें तरी आचरणांत द्वैतच राहतें, असा यांचा रोंख असावा. वामन पंडित व इतर अद्वैती सुद्धां ज्ञानोत्तर-भक्तीचा उपदेश करितात त्याचें बीज तरी काय ? हेंच असावें; दुसरें कोणतें असणार ?

७ भक्तिपूर्ण अन्तःकरणानें गोड गळयावर व सुंदर चालीवर रचलेली श्रीरामकृष्णचरित्रें साग्र गाणें व द्वैताद्वैत पंथांचा मेळ घालून हें तत्वज्ञान आच-रणांत आणणें हा यांच्या चरित्रकार्याचा व पद्यरचनेचा हेतु होता असें आम्हीं येथवर दाखवून दिलें आहे. आतां त्यांच्या खुद्द पद्यांकडे वळूं.

८ हीं पद्यें-पदें-केवळ कीर्तनांतून आख्यानरूपानें गाण्यासाठीं तयार केलीं असावीं असें वाटतें. तर पदांतून गद्याच्या अभावीं सुद्धां कथानक पुष्ट होत आहे हें पाहिलें म्हणजे केवळ पदरूपानेंच रामचरित्र गाण्याचा त्यांचा उद्देश असावा असेंही वाटतें. नेहेमीं बायकामुलींनीं, थोरामोठ्यांनीं, घरीं दारीं, मजलसींत, राम-कृष्णचरित्रेंच गावींत, तालतंबोऱ्याच्या साथींत हीं गावून सभा डोलवावी, भक्ति-भाव सभेंत भरून द्यावा, व ती डोलत ठेवावी, रम्य कथानक उभें करून नवर-सानें सभा उत्कंठित करावी, चरित्रनायकांवरून व्यवहारनीति वेदान्तोपदेश द्यावा, द्वैताद्वैतचर्चा करून दोन्हीं एकच असें सभेस पटवावें हाच या कवनाचा उद्देश दिसतो.

९ या दोन्ही कथा, तथापि, अपुऱ्या राहिल्या आहेत. महाकाव्याच्या पद्धतीप्रमाणें प्रथम गुरुदेवदेवतांस वंदन, वास्तव्य क्षेत्र-नाशिक याचें वर्णन, नंतर बाललीला, पाळणें, अंगाईगीतें वगैरे झाल्यावर नायकांच्या चरित्रास सुरु-वात झाली आहे. श्रीरामचरित्रांत रामास वनवासास धाडण्यापूर्वीं कैकेयी रागावून बसली आहे. दशरथ तिची समजूत पाडण्यास जातो; तेव्हां कवीस

त्याजवर "वृद्धाऽसि तरुणी जहर मरणी" अशी टीका केल्याखेरीज राहवत नाहीं· त्यांच्या वृद्धावस्थेवरून स्वतः संबंधीं ही कवीस या प्रसंगीं जाणीव झाली असावी असें पुढील ओळींवरून वाटतें.

"माझी वृद्धावस्था । कलेवराची व्यर्थची आस्था" ॥

जातां जातां इतरांवर टीका करून हलकेंच इतरांचे दोप दाखवून उपदेश करणें हा एक इंग्रजी काव्यांत काव्याचा निराळा व महत्वाचा प्रकार मानला आहे. त्यास Satire म्हणतात. असाच कांहींसा प्रकार आमच्या बहुतेक कवींनीं लिहिला आहे. मध्वमुनींनींही अशीं पद्यें केलीं आहेत. संसारांतील लहानथोर व्यक्ति, दुकानदार, काजी, फकीर, जंगम, वेदान्ती, पंडित, यांजवर टीका यांनीं केली आहे व जो काय त्या टीकेचा उपदेशरूपी परिणाम न सांगतां व्हायचा तो वाचकांच्या मनांवर आपोआप होऊन जातो.

" बम्हन पढता है बेदकू
समजा नही उसीके भेदकू ।
पूजे पत्थरके देवकू
पंडीत हुवा तो क्या हुवा

याच प्रकारें जंगम हुवा, काजी हुवा, 'भजनी हुवा तो क्या हुवा' असे प्रश्न विचारून त्यांनीं कोणता उपदेश सुचविला नाहीं बरें ? हें सर्व झालें तर काय मोक्ष मिळाला ? काय अहंता गेली ? लोकसेवा झाली ? काय साधलें यानें? आयुष्य फुकटच नाहीं कां गेले ? लोक सुधारले नाहींत तर पूजा केली, पंडित झाला, वेद पढले, भजनें केलीं, "किताब" खोलले तरी सर्व व्यर्थ !

१० स्पष्ट स्पष्ट उपदेशही त्यांनीं केला आहे. आचरणानें पूजाभजनमार्गही त्यांनीं दाखवून दिला आहे.

" जिंकी मन भंगू नेदी समाधान"

विद्यार्थ्यांस पुढें करून सर्वांस त्यांनीं पुढील प्रमाणें व्यवहारोपदेश दिला आहे.

" विद्यार्थि हो तुम्ही बहूतचि साबडे जी ।
मिष्टान्न ते निजमनांतुनि आवडे जी ॥
ते भोजनामधुनि टाकुनि द्या वेड जी " ॥

मिष्टान्न खाण्यापासून जेवढें नुकसान होतें त्यापेक्षां जास्त तेलकट तिखट खाण्यानें होतें.

" मागूनि घ्या तुम्ही अपेक्षित अन्नपात्रीं
सोडूं नका, स्मरत जा हरि भूनमात्रीं
कोपों नये द्विजवरीं अणि भाग्यवंतीं
मी प्रार्थितों वदत जा हरि भोजनांतीं ॥ "

निर्गुण व मुक्तलक्षणें ते पुढीलप्रमाणें करितात. "सुषुप्तिसमर्थी जीव हा निर्गुण।" "ज्यासि नाहीं आपपर तोचि जाणा परात्पर। ज्याचा गेला भेदाभेद त्यासि मानी नित्य वेद"

वरीलप्रमाणें उपरोधक, व शुद्ध साध्या व्यवहाराचा उपदेश करण्याचें कारण त्यांना तत्कालीन समजांत पुढील मोठा दोष दिसून वाईट वाटत असे हेंच होयः—

गीता भारत वेदशास्त्र न रुचे गेली जनाची चवी।
ऐसें देखुनि मध्वनाथ म्हणतो देवा मला वांचवी॥"

११ येथ पावेंतों त्यांच्या उपदेशपूर्ण काव्य भागाचें आलोचन केल्यावर, त्यांच्या कथानकांकडे वळूं.

रामकथेंत, रामजन्माच्या वेळीं रामाच्या स्नानाकरितां सर्व पवित्र व प्रसिद्ध नद्यांचे पाणी हवें होतें म्हणून सर्व पवित्र नद्या गंगा, यमुना, भागीरथी, गोदा, सिंधु, नर्मदा, कावेरी, वगैरे सर्व हेलकरणींच्या रूपानें निघाल्या व "घेउनी बुंथी चालती चमकत बाळा" असें वर्णन त्यांचें वाचलें म्हणजे काव्यकौशल्याचें, अलंकारसमर्पकतेचें कौतुक वाटतें. हें प्रत्यक्ष शब्दचित्र आहे असें वाटतें. पुढें बालक कौसल्या मातेच्या मांडीवर खेळत आहे व कौसल्या बालकास कुरवाळीत आहे. काय काय विचार त्यावेळीं मातेच्या हृदयांत असतील बरें. तिच्या पुढील कृतीवरून ओळखितां येतील काय?

करतळ कमळें कोमळ जावळ कुरवाळिसी।
अंजन घालुनि नीरांजना न्याहाळिसी।
जांभई देतां चुंबन चुटकें चाळविसी।
शिंकतां "शतंजीव" असें म्हणून आळविसी।

रामाला कोठें ठेवूं, किती पाहूं, कसें खेळवूं असेंच तिला होऊन गेलें असेल! वत्सलरस व अनुप्रास अतिरम्य आहेत.

पुढील प्रकार तर साधा मनोहर व रसपूर्ण आहे. हें अंगाईगीत आहे—

येगे येगे गाई।
येगे येगे बाई।
माझ्या रामाला दूध देई।

हें नित्याचें कवन आहे. यांत कसरत नाहीं, नाविन्य नाहीं, पण यांत "रोकडें शून्यत्व" आलेलें नाहीं. यांत सहज स्फूर्त प्रेमलपणा आहे, सहज साधलेलें यमक, व सुचेल ती चाल—वृत्त—आहे.

अपूर्ण

# ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य

## अध्याय तेरावा

## क्षेत्रक्षेत्रज्ञयोग.

तेरावा अध्याय 'क्षेत्रक्षेत्रज्ञयोग' या नांवाचा आहे. ह्यांत क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचा विचार सांगितला आहे. क्षेत्र ह्म० शरीर व याला जाणतो तो क्षेत्रज्ञ. पंचमहाभूतें, अहंकार, बुद्धि, अव्यक्त (प्रकृति,) दशेंद्रियें, मन, दशविषय, इच्छाद्वेष, सुखदुःख, संघात, चेतना व धृति मिळून छत्तीस तत्वांचा मेळावा ह्याला क्षेत्र ह्मणतात. हें सविकार आहे (याला सत्व, रज व तम हे तीन विकार आहेत. याचा विचार १४ व्या अध्यायांत होईल ) आतां छत्तीस तत्वांचा विचार पाहूं. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं **पंचभूतें**. 'या पांचाही गांठी पडे। जैं देहाकार उघडे। तै नाचवी चहूंकडे। तो **अहंकार** गा' ॥ ८१ ॥ सुखदुःख, उच्चनीच, सानेथोर, पापपुण्य इत्यादिकांचा निवाडा करणारी व ज्ञानेंद्रियाचें मूळ ती **बुद्धि**—"ते आत्मया जीवाची संधी। वसवित असे'—**अव्यक्त** ह्मणजे सांख्याची अपरा प्रकृति-ह्म० जीवदशा. **दहाइंद्रियें** ह्म० श्रवण, नयन, त्वचा, घ्राण व रसना हीं पचज्ञानेंद्रियें व कर, चरण, वाचा, पायु (गुदस्थान) व उपस्थ (जननेंद्रिय) हीं पंचकर्मेंद्रियें. इंद्रियें आणि बुद्धि यांच्या संधींत खेळतें तें **मन**. (बुद्धि सत्वगुण, मन रजोगुण व अहंकार तमोगुण) मन ह्म० कल्पना, मनाच्या संगानें आत्मा जीवदशेला येतो. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे ज्ञानेंद्रि-यांचे पांच विषयः ज्ञान या पांच द्वारांनीं बाहेर पडतें. तोंडानें स्वर, व्यंजनें व विसर्ग यांचा उच्चार करणें, हातानें स्वीकारत्याग करणें, पायानें चालणें, उपस्थानें मूत्राचा व गुदानें मळाचा त्याग करणें, हे पंच कर्मेंद्रियांचे पांच विषय मिळून **विषय दहा** आहेत. क्रियेचा व्यवहार यांच्या योगानें होतो. विषयेंद्रियांच्या भेटींत कामाचा हात धरून जी वृत्ति उठते ती **इच्छा**; इच्छित वस्तु न मिळा-ल्यानें जी वृत्ति उठते तो **द्वेष**, कायावाचामनाचे व्यापार बंद करून देहस्मृतिही विसरायला लावणारें, इंद्रियवृत्तींनां हृदयाच्या एकांतांत थोपटून निजवणारें व जीवाला आत्मसंगतींत नेणारें तें **सुख**.अशी स्थिति प्राप्त न होतां जगणें तें **दुःख**; असंग व साक्षीभूत अशा चैतन्याची जी जडदेहांतली सत्ता ती **चेतना**; 'जे नखौनि केशवरी। उभी जागे शरीरीं। जे तिहीं अवस्थांतरीं पालटेना' पंचभूतें परस्परवैर विसरून देहाच्या रूपानें एकोप्यानें राहतात व आपल्या गुणानें एकमे-कांस साह्य करितात ती **धृति** व या छत्तीसांचा मेळावा तो **संघातः** 'ऐसीं छत्तीसही इयें तत्वें। मिळती जेणें एकत्वें। तेणें समूहपरत्वें। क्षेत्र ह्मणिजे'

॥ १५५ ॥ ह्या शरीरांत पुण्यपाक पिकतें ह्मणूनही आह्मीं कौतुकानें याला क्षेत्र ह्मणतो. थोडक्यांत सांगायचें ह्मणजे परब्रह्माच्या अलीकडे स्थावरापर्यंत जें होतें जातें तें सर्व क्षेत्र होयः ' परतत्वाअलीतें । स्थावराआतौतें । जें कांहीं होतें जातें । ते क्षेत्रचि हे ' ॥ १५८ ॥ ह्या क्षेत्राचा क्षेत्रज्ञ तो परमेश्वर. आतां आधीं ज्ञान सांगून मग ज्ञेय सांगतों. ह्मणजे क्षेत्रज्ञाचें स्वरूप समजेल. ज्ञान किंवा ज्ञानाचें स्वरूप सांगणें ह्म० ज्ञान्याचीं लक्षणें सांगणें होय ह्मणून ज्ञान्याचीं लक्षणेंच सांगतों.

(ज्ञान व तद्विरोधी अज्ञान यांच्या लक्षणनिरूपणावर ज्ञानेश्वरांनीं ७०० ओव्या सांगितल्या आहेत, गीतेच्या ५ श्लोकांतील ह्या ७०० ओव्यांत ज्ञानाज्ञानाचीं संपूर्ण लक्षणें सांगितलीं आहेत. ज्ञानी ह्म० आत्मज्ञानी, ज्ञानविज्ञान झालेला, कृतकृत्यता पावलेला महात्मा. त्याचीं हीं लक्षणें आहेत. तीं मुमुक्षुसाधकांना कित्यादाखल आहेत. सिद्धाची लक्षणें ह्या. साधकाला गिरवण्याचे धडे होत. हीं लक्षणें जेथें दिसतात तेथें शुद्धज्ञान आहे असें समजावें. ह्या लक्षणांनीं युक्त असा ज्ञानी पाहिला कीं येथें ज्ञान आहे. अशी खूण गांठ बांधावी ) आतां प्रथम ज्ञान कशाला ह्मणतात तें पाहूं ' जय ज्ञानाची रिगवणी । अविद्ये उणी आणि । जीवाआत्मया बुझावणी ( ऐक्य ) मांडूनि दे '—अविद्या दूर करून जीवपरमात्म्याचें ऐक्य करितें तें ज्ञान-- ज्ञानांत द्वैताचा दुकाळ व साम्याचा सुकाळ! काम क्रोधादिकांचा तेथें पूर्ण अभाव! ' जयाचेनि उजाळें । उघडती बुद्धीचे डोळे । जीव दोंदावरी लोळे । आनंदाचिये । ऐसें जें ज्ञान । पवित्रैकनिधान । जेथ विटाळलें मन । चोख कीजे ' ॥ हें ज्ञान डोळ्यांनीं दिसण्यासारखें नसलें तरी पाहतांही येतें. ' दर्शनाचिये प्रशस्तीं । पुण्यपुरुष ' —ज्ञानी पुरुष पाहिला कीं हेंच मूर्तिमंत ज्ञान आहे असें पटतें ! ज्ञानाचा प्रभाव शरीरावर दिसतो तेव्हां तें ' इंद्रियांच्या व्यापारीं । डोळांही दिसे! ' वसंताचा प्रवेश झाला कीं वृक्षांवर टवटवी येते, मूळाला पाणी लागलें कीं शाखापल्लवांवर तें दिसतें, आचारगौरवांवरून मनुष्याच्या कुलीनत्वाची प्रतीति येते,—' भिंगारीं दीप ठेविला बाहेरि फांके '— त्याप्रमाणें ' हृदयींचेनि ज्ञानें । जियें देही उमटती चिन्हें ' तींच आतां सांगतों ह्मणजे ज्ञान काय तें समजेल. [ ज्ञानाचीं चिन्हें नीट उमजावींत ह्मणून तुलनेसाठीं उलट अज्ञानाचींही चिन्हें दाखवितों. ]

**ज्ञानी** १ **अमानित्वः**--' पूज्यतां डोळां न देखावी । स्वकीर्ति कानीं नायकावी ' अशी वांछा. आदरसत्कार नको--' मरणेसी साटी नमस्कारितां ' ' आथिलेचि गुण वानितां । मान्यपणें मानितां '--तें गजबजों लागे ! वाचस्पतीच्या बरो-

बरीची सर्वज्ञता असली तरी 'वेडिवेमाजि दडे । महिमेभेणें ' ' चातुर्यलपवी । महत्व हारवी ' इ० इ०

**अज्ञानी** १ **मानित्वः**--अज्ञानी मानाची वाट पाहतो व सत्कारानें संतुष्ट होतो. 'गर्वं पर्वताचीं शिखरें । तैसा महत्वावरूनि नुतरे'-- मोठेपणा विसरून खालीं येत नाहीं.

२ **अदंभित्वं**--' पडिलाही प्राणसंकटीं । सुकृत ना प्रगटी । ना आंगें बोले ' 'झांकी निपजलें दानपुण्य ' ' स्वधर्म वाग्ध्वजीं बांधो नेणे. ' ' परोपकार न बोले । न मिरवी अभ्यासिले. ' ' आत्मचर्चे चतुर । येरवीं वेडा ! '

२ **दंभित्वः**--सर्व सत्कर्म वेशीवर टांगायची इच्छा, 'घाली विद्येचा पसारा । सुवे सुकृताचा डांगोरा । करी तेतुलें मोहरा । स्फीतीचिया '--प्रतिष्ठेच्या मार्गावर सर्व सुकृत आणून ठेवतो. ' आंग वरिवरी चर्ची । जनातें अर्चितां वंची'-- बाहेर झगझगित पण जगाला फसवायचा धंदा !

३ **अहिंसा**--काया वाचा मन, हस्त, पाद, चक्षु इ० कोणत्याच इंद्रियानें ह्म० मुख्यतः मनानें दुसऱ्याला दुःख न देतां सुख देणें. ' परमाणु पा गुंतले । जाणूनि जीव सानुले । तेथ कारुण्यामाजि पाउलें । लपवूनि चाले ॥ ते वाट कृपेची करित । ते दिशाचि स्नेह भरित । जीवातळीं आंथरित । आपुला जीव ' असें पायाचें चालणें. ' पुढां स्नेह पाझरे । माघां चालती अक्षरें ' असें बोलणें. ' मुख मोहाचें माहेर ' बोल कोणाला खुपेल ह्मणून बोलणेंच नाहीं, व बोललाच तर ' साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ' असें बोलणें. चंद्रबिंबांतून अमृतधारा स्रवतात तसें सकरुण भूतमात्रीं पाहणें. कूर्मदृष्टिनें पाहणें. पशुपक्ष्यांना ही हस्तपादाच्या क्रियेनें त्रास न होईल असें वागणें. मनच इंद्रियद्वारां फांकतें ' ह्मणून दयालुत्व आपुलें । मनें हातापायां आणिलें । मग तेथ उपजविलें अहिंसेते ? ॥ ' प्रेमाचिया स्फूर्ती । वाहवला रसवृत्ती '--

३ **हिंसाः**--वणवा जसा स्थावरजंगमास जाळीत सुटतो ' तैसें जयाचेनि आचारें । जगा दुःख ' तोंडून शब्द निघतात ते शस्त्रापेक्षा दुसऱ्याच्या जिव्हारीं रुपणारे, मनाचे संकल्प प्राणघातक, विषापेक्षा मारक !

४ **क्षांतिः**--' आक्रोशेवीण ( मनाची तळमळ नसून ) क्षमा. ' जो मानापमानातें साये । सुखदुःख जेथ सामाये । निंदास्तुति नोहे । दुखंड जो ॥ ' समुद्रासारखा गंभीर--' जयाचिये ठायीं । न साहणें कांहींच नाहीं आणि साहतसे । ऐसेंही स्मरण नुरे' --त्रिविध ताप एकदम् कोसळले ' तरी नव्हे वांकडा जो. '

४ अक्षांतिः--' फुंकें भाता फुगे । रेचिलिया सवेंचि उफगे । तैसा संयोग-वियोगें । चढेवोहटे ' ॥ वाऱ्या बरोबर धूळ आकाशीं चढते तसा स्तुतीनें चढतो व ' निंदा मोटकी आइके । आणि कपाळ धरूनि ठाके । थेंबें विरे-वारेनि शोखे चिखल जैसा '--तात्पर्य कोणतीच उर्मी सहन होत नाहीं.

५ आर्जव ( ऋजुत्व, सरळपणा. ) सूर्य तोंड पाहून प्रकाश करीत नाहीं, सर्वांही सारखा--तसाच ज्ञानी. ' जगेसी जुनाट सोयरिक '--' वारियाची धांव । तैसे सरळ भाव । शंका आणि हांव । नाहीं जया दिठी नोहे मिणधी । बोलणें नाहीं संदिग्धी । कवणेसी हीनबुद्धी । राहाटों नेणे ॥ दाहाही इंद्रियें । निष्प्रपंचें निर्मळें । पांचही ( पंचप्राण ) पालव मोकळे । आठही पाहार '--' अमृताची धार । तेंसें उजू अंतर ! '--सरळ मन.

५ अनार्जवः--वरवर मोकळा पण ' मनीं गांठीं ' आंतल्या गांठीचा ! चांगल्यांचीं मनें विरुद्ध करितो. पाषाणावर मऊ शेवाळ उगवावी, किंवा पिकलेली विंनोळी, आंत कडु बाहेर स्वच्छ--तसा आंत वांकडा, बाहेर सरळ !

६ आचार्योपासनः--जीवाला ब्रह्मपद देणारी गुरुभक्ति. ' सबाह्य आपुलें । जेणें गुरुकुळीं वोपिलें ' नवविधा- भक्तीनें ' यथा गुरौ ' भजणें. ' गुरु क्षेत्र गुरु देवता । गुरु माता गुरु पिता । जो गुरुसेवेपरता । मार्ग नेणे ॥ जयाचे वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र । जो गुरुवाक्यावांचूनि शास्त्र । हातीं न शिवे '--असी निस्सीम गुरुभक्ति.

६ गुरुभक्तीच्या नांवानें शून्यः ' गुरुकुळीं लाजे । जो गुरुभक्ती उभजे ( त्रासतो ) । विद्या घेऊनि माजे । गुरूसीच जो '--त्या पाप्याचे नांवही घेणें वाईट !

७ शौच--शुचित्व ह्म० अंतर्बाह्य शुचि. ' आंग मन जैसें कापुराचें--' बाहेरीं कर्मे क्षाळिला । भीतरीं ज्ञानें उजळला. ' अंतरांत निरंतर सद्भाव जागृत--' ह्मणोनि सद्भाव जीवगत । बाहेरीं दिसती फांकत । स्फटिकगृहींचे डोलत । दीप जैसे ' ॥ संसारांत विषयांवर लोळत असला तरी ' विकाराचेनि विटाळें । लिंपिजेना. । चित्ताला विकल्पाचा वाराही नाहीं--' विकारजातें न लिंपिजे । मनोवृत्ति' तें शौच.

७ अशौचः--' आंगें कर्में डिला । जो मनें विकल्पें भरला. ' व्यभिचारादि पातकांनीं उन्मत्त, ' जैसें पोटालागीं सुणें । उगडें झांकलें न ह्मणे । तैसें आपुलें परावें नेणे । द्रव्यालागीं, सत्कर्म किंवा नित्यनैमित्तिक चुकलें तर त्याच्या मनाला खंत नाहीं. भ्रष्टाचरणाचा.

८ स्थैर्यः--बाह्य प्रपंचांत वावरत असतांही आत्मस्थिति न सुटणें याचें नांव स्थैर्यः--' देह तरी वरिचिलीकडे । आपुलियापरी हिंडे । परी बैसका न मोडे ।

मानसीची आतया अभ्रांसवें। जैसें आकाश न धांवे। भ्रमणचक्रीं न भ्रमे। ध्रुव जैसा ॥ दैन्यदुःखीं न तपे। भयशोकीं न कंपे। इ०

८ **अस्थैर्य**:—यत्किंचित् स्वार्थामुळें किंवा अल्पभयानें त्याचें धैर्य गळतें, पूरांतल्या भोपाळ्याप्रमाणें मनोरथांच्या धारेबरोबर वाहवतो. मर्कटाचें भावंडच तो!

९ **आत्मविनिग्रह**:—इंद्रियें स्वाधीन ठेवणें. अंतःकरण 'नेदी उभें ठाकों द्वारीं। इंद्रियांच्या' चित्तवृत्तिनिरोध.

९ **संयमाभाव**:--वसू (पोळ) जसा मोकाट किंवा वारा अफाट--'तैसें विषयीं सुटलें। चित्त जयाचें!

१० **विषयवैराग्य**:विषयवार्ताच आवडत नाहीं. पूयपंकीं लोळणें किंवा बाणांच्या आंथरुणावर निजण्यासारखे तो भवस्वर्गींचे विषयभोग समजतो. 'तें हें विषयवैराग्य। आत्मलाभाचें भाग्य। येणें ब्रह्मानंदायोग्य। होती जीव ॥

१० **वैराग्याभाव**:-' विषयांची गोडी। जीत मेला न संडी' विषयांसाठीं जळत्या आगींत उडी घालतो, त्रास झाला तरी अधिकच प्रेम धरितो.

११ **अनहंकार**: – सर्व धर्मकृत्यें यथास्थित करीत असतो 'परी केलेपण शरीरीं। वसो नेदी!' वर्णाश्रमपोषक नित्यनैमित्तिक कर्में करितो 'परी हें मियां केले, कीं माझेनि सिद्धी गेले। ऐसें नाहीं ठेविले। वासनेमाजी'

११ **अहंकार**: – देहालाच आत्मा मानून देहभोगासाठीं कर्में करितो, थोडी धनाची, विद्येची, बळाची जोड असली कीं देवही ओळखीत नाहीं; 'विद्यावयसा माजे। उताणा चाले.' सर्वसंपन्न काय तो मी एक आहे या गर्वानें फुगतो, व लाटणेंऐसा न लवे। पाथर तैंवि न द्रवे!

१२ **दोषानुदर्शन**:दोषदर्शन कोणाचें? 'जन्ममृत्यु जरा दुःखें। व्याधि वार्धक्य कलुषें। तिये आंगा न येतां देखे। दुरूनी जो! जन्ममृत्यु इ० दुःखें पूर्वीं जाणायचीं कशाला?–' नाइकणें पावे। तंव आइकोनि घालीं आघवें! 'दृष्टी जंव आहे। तंव पाहावें तेतुलें पाहे! इ० 'ऐसी दशा येईल पुढें। तैं मन होईल वेडें। तंव चिंतूनि ठेवीं चोखडें। आत्मज्ञान,

१२ **जन्मजरादिकांचें अभान**:-' बेडुक सापाचिये तोंडीं। जातसे सबुडबुडी। तो माक्षिकांचीये कोडी (आशेनें)। स्मरेना कांहीं' त्याप्रमाणें जराव्याधि मृत्यु इ०कांचा विचार पळभरहि न करितां प्रपंचांतच मग्न होऊन राहतो. 'स्त्रीपुत्रादिमेळें। संपत्ति जंव जंव फळे। तेणें रजे डोळे। जाती जयाचे ॥ न करावें तें करी न खावें तें खाये, न जावें तेथ जाये, नायकावें तें आयकें, न बोलावें तें

वके, --तात्पर्य ‘ आंगा मनासी रुचावें । येतुलेनि कृत्याकृत्य नाठवे। जो करणे-याचेनि नांवें । भलतेच करी ;’

१३ असक्तिः--देह बिऱ्हाड आहे असें समजून असंग होणें. ‘वृक्षाची साउली। वाटे जातां मीनली। घरावरी तेतुली। आस्था नाहीं ? स्त्री साउली मानतो व ‘स्त्रियेचें तैसें। लोलुप्य नाहीं’ संपत्तींत असतां साक्षी असतो. दारागृहपुत्रीं अनासक्त असतो.

१३ आसक्तिः--‘ साखरेचिया राशी। बैसली नुठी माशी। तैसेंनि स्त्रीचित्त आवेशी। जयाचें मन’ घरादारावर अत्यंत लोलुप ‘चित्त आराधी स्त्रियेचें आणि तियेचेनि छंदें नाचे। माकड गारुडियाचें। तैसें होय। हानीलज्जा न देखे। परापवाद नायके। जयाचीं इंद्रियें एकमुखें। स्त्रिया केलीं॥ ’

१४ समचित्तत्वः--इष्टानिष्टलाभहानि पावतां चित्त डोलत नाहीं. ‘तिन्ही काळ होतां। त्रिधा नव्हे सविता। तैसा सुखदुःखीं चित्ता। भेद नाहीं;’

१४ चित्तचांचल्यः--लाटांत हेलकावणाऱ्या नांवेसारखें चित्त सदाचंचल! ‘प्रियवस्तु पावे। आणि सुखें जो उंचावे। तैसाचि अप्रियासवें। तळवट घे;’

१५ अव्यभिचारी भक्तिः--कायावाचामन भगवंताच्या ठिकाणीं रतलेलें ह्मणून ‘एक मीवांचूनि वास। न पाहती आन’-‘मिळोनि मिळतचि असे। समुद्रीं गंगाजळ जैसें। मी होऊनि मज तैसे। सर्वस्वें भजती!’ सूर्याची प्रभा तसे हे अभेदभक्त मजसीं ज्ञानानें समरस होऊन पुन्हा माझी भक्ति करितात.

१५ व्यभिचारी भक्तीः--तो कांहीं मिळवण्यासाठीं माझ्या भक्तीचें सोंग उभें करितो, कार्य न साधल्यास भजन सोडून देतो. ज्या त्या पर्वाच्या दिवशीं त्या त्या देवतेचें पूजन करितो; व ‘माझी मूर्ति निफजवी। ते घराचे कोनीं बैसवी। आपण देवोदेवीं। यात्रे जाय’ प्राणिजातांसी निष्ठुर। स्थावरीं बहुभर.’

१६ एकांतवासः--‘ शैलकक्षांची कुहरें। जळाशयपरिसरें। अधिष्ठी जो आदरें। नगरा न ये.’ जनसंमर्दाचा कंटाळा, व एकांताची आवड.

१६ जनपदीं सुखः--‘एकांतें चोखटें। तपोवनें तीर्थें’ पाहून ज्याला कंटाळा येतो व ‘जया जनपदीं सुख। गजबजेचें कवतिक.’

१७ अध्यात्मज्ञाननित्यत्वः—‘तरी परमात्मा ऐसें। जें एक वस्तु असे। तें जया दिसे ज्ञानास्तव’॥ तें एकवांचूनि आनें। जियें भवस्वर्गादि ज्ञानें। तें अज्ञान ऐसा मनें। निश्चय केला ’॥ अध्यात्मज्ञानीं ध्रुवासारखें अढळ राहणें.

१७ अध्यात्मज्ञानशून्यताः--‘ आत्मा गोचर होये। ऐसी जी विद्या आहे’ तिचा तेवढा कंटाळा, बाकी सर्व विद्यांत राघु! ‘उपनिषदांकडे न वचे। योगशास्त्र

न रुचे। अध्यात्मज्ञानीं जयाचें। मनचि नाहीं ' कर्मकांड, ज्योतिष, वैद्यक, नीति-शास्त्र, शिल्प, सूपकर्म, काव्यनाटकें, पुराणें--सर्व कांहीं पाहिले ' परी एक आत्म--ज्ञानीं फुडा। जात्यंध तो '--तैसे शास्त्रजात जाण। आवघेचि अप्रमाण। पार्था अध्यात्मज्ञानेविण। एकलेनि. '

**१८ तत्वज्ञानार्थदर्शनः**--तत्वज्ञानाचें जें फळ ( अर्थ ) ह्म० ज्ञेय, पुरुषो-त्तम किंवा परमात्मा त्यावर दृष्टि निश्चल असणें. ' ह्मणोनि ज्ञान जेतुलें दावी। तेतुली वस्तूचि आघवी। तें देखे ऐसी व्हावी। बुद्धि चोख. '

**१८ तत्वज्ञानार्थाचें अदर्शनः**--जो अध्यात्मज्ञानच मानीत नाहीं ' तो ज्ञानार्थ न देखे काई। हें बोलावें असे? ' अलीकडच्या तीरापासून जो मागें पळाला त्यानें पैलतीर गांठलें नाहीं हें काय सांगायला पाहिजे?

शुद्ध ज्ञानानें ज्ञेय ह्म० परमात्मवस्तु भेटते ह्मणून तें ज्ञेय कोणतें हें आतां सांगतात. ज्ञेय जाणल्यानें अमृत ह्म० मोक्षसुख मिळतें-' जाणणेंचि तन्मयातें। आणी जयाचें ' तें ज्ञेय ह्म० अनादि परब्रह्म. त्याला सत् किंवा असत् कांहींच ह्मणतां येत नाहीं, ' जें नाहीं ह्मणों जाइजे। तंव विश्वाकारें देखिजे। आणि विश्वचि ऐसें मानिजे। तरी हे माया ॥ ८६९ ॥ रूपवर्ण व्यक्ति। नाहीं दृश्यद्रष्टा स्थिति। तरी कोण कैसें आथी। ह्मणावें पा ' ॥ ८७० ॥ नाहीं ह्मणावें तर महदादि कोणत्या अधारावर भासतात? ' ह्मणोनि आथी नाथी हे बोली। जें देखोनि मुकी जाहली। विचाराची मोडली वाट जेथें ' ॥ ८७२ ॥ ज्ञेय ह्मणजे ' सर्व होवोनियां सर्वां। असे जे वस्तु. ' स्थूळ सूक्ष्मांतल्या सर्व क्रिया ह्म० त्याचे हात; ' जे सर्वचि सर्वपणें। सर्वदा करी' ह्मणून त्याला ' विश्वबाहु. ' ह्मणतात. सूर्याप्रमाणें आंग व डोळे नसून तें ' विश्वतश्चक्षु ' आहे. सर्व भोक्तेपण त्याच्याकडे असल्यामुळें त्याला ' विश्वतोमुख ' ह्मणतात. आतां त्याचें तें एकीएक आहे ह्मणून त्याला व्याप्यव्यापक कसें ह्मणावें? अद्वैताला भाषाच नाहीं, पण शून्य दाखवायचें असलें ह्मणजे वाटोळा बिंदु दाखवितात, त्याप्रमाणें द्वैताच्या भाषेचा अंगीकार करुन अद्वैत बोलावें लागतें! असो आतां तें ज्ञेय कसें आहे तें ऐक. त्याला इंद्रियें नसून सर्वेंद्रियांवर तें सत्वादि गुणांचा आभास उत्पन्न करितें, तें अलिप्त असून सर्वांना धारण करितें, निर्गुण असून गुणांचा भोग घेतें. तें गुण व इंद्रियें याहून फार वेगळें आहे, ' नामरूप-संबंध। जातिक्रियाभेद। हा आकारासीच प्रवाद। वस्तूसि नाहीं ' ॥९०५॥ तें भूतांच्या आंतबाहेर आहे, चर आहे व अचरही आहे, दूर आहे व जवळ आहे,

सूक्ष्म आहे ह्मणून जाणायला कठिण आहे, 'तैसेंनि अविनाशभावें । जे सूक्ष्मदशे आघवें । व्यापूनि असें तें जाणावें । ज्ञेय येथ ॥९१४॥ जे एक आंतबाहेरी । जें एक जवळदुरी । जें एकवांचूनि परी । दुजी नाहीं' ॥९१५॥ सकल भूतांत अखंड एकाकार असून तें विभक्तसें भासतें. भूतांना धारण करणारें (विष्णु) उत्पन्न करणारें (ब्रह्मा) व ग्रसिष्णु ह्म० संहार करणारें (रुद्र) तेंच आहे. तें ज्योतींची ज्योति आहे, 'जें अग्नीचें दीपन । जें चंद्राचें जीवन । सूर्याचें नयन । देखती जेणें ॥९२७॥ ते तमाच्या पार आहे. ज्ञान तेच, ज्ञेय तेच, ज्ञानगम्य तेच. 'जे मनाचे मन । जे नेत्राचे नयन । कानाचे कान । वाचेची वाचा ॥ जे प्राणाचा प्राण । गतीचे चरण'—हे असो ते हृदयीं सर्वांच्या असे. भक्त हें जाणून ह्या माझ्या स्वरूपाप्रत पावतात. आतां क्षेत्रक्षेत्रज्ञांचाच विचार जरा वेगळ्या रूपानें सागतों:-

आतां कपिलांच्या सांख्य शास्त्रांतला प्रकृतिपुरुषविवेक सांगतों. क्षेत्र ह्म० प्रकृति व क्षेत्रज्ञ ह्म० पुरुष, 'तरी केवळ जे सत्ता । तो पुरुष गा पाडुसुता । प्रकृति ते समस्तां । क्रिया नाम' ॥९६६॥ बुद्धि, इंद्रियें, अंतःकरण, इ० सर्व विकार व त्रिगुण ही सारी प्रकृति. ही प्रकृति पुरुषाप्रमाणेंच अनादि आहे. कारण, कार्य व कर्तृत्व ह्या तिहींलाही मूळ हेतु प्रकृति; सुखदुःखांचा भोक्ता मात्र (त्याकडे कर्तृत्व नसून) पुरुष आहे. पुरुषाला प्रकृतीचा संग घडला कीं तो प्रकृतिगुणांचा उपभोग घेतो व हा संगच त्याला भल्याबुऱ्या योनींत जन्म घ्यायला लावतो. 'आंबुली जोडी । आंबुला खाय'—स्त्री मिळविते व पुरुष भोगतो! पुरुष हा केवळ उपद्रष्टा ह्म० जवळ उभा राहून पाहणारा, साक्षी आहे; अनुमंता ह्म० तिच्या कार्यास अनुमती देणारा आहे; भर्ता ह्म० सत्तामात्र आहे, व भोक्ता आहे, व महेश्वर आहे ह्म० देहांत असणारा परमात्मा आहे. 'प्रकृति होये जाये । हा तों असतचि आहे! ह्मणोनि आब्रह्माचे होये । शासन हा' जो याप्रमाणे असंग पुरुष व गुणमयी प्रकृति यांना जाणतो तो देहानें नानाकर्में करीत असला तरी जन्ममरणापासून मुक्त होतो.

प्रकृतिपुरुषांचे किंवा क्षेत्रक्षेत्रज्ञांचे ज्ञान सांगितलें, आतां ह्या ज्ञानाच्या प्राप्तीचे मार्ग सांगतातः ह्या परमात्म्याला कोणी ध्यानयोगानें आपल्याच ठिकाणीं पाहतात, कोणी सांख्ययोगानें पाहतात व कोणी कर्मयोगानें पाहतात. कोणी तर- यां पैकीं ज्यांना कांहींच कळत नाहीं असे--संतसद्गुरुंच्या मुखानें ऐकून त्याची उपासना करितात ह्म० नित्य श्रवणतत्पर असतात, 'तयाचेनि मुखे जें निघे । तेतुलें आदरें चांगें । ऐकोनियां आंगें । मनें होती'-तेही भवसागरांतून तरून जातात. आतां उपसंहाररूपानें सर्वार्थांचें मथित-'सिद्धांतनवनीत' तुझ्या हातीं देतों.

स्थावरजंगमात्मक जी जी वस्तु निर्माण होते ती ती क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगापासून निर्माण होते. तेज व उखर ( सूर्यकिरण व माळजमीन ) यांच्या भेटींत मृगजळ भासतेंच कीं नाहीं ? सर्व भूतांचे ठायीं समत्वानें राहणारा व भूतें आलीं आणि गेलीं तरी नाश न पावणारा ह्म० अविनाश असा जो परमात्मा त्याला जो पाहतो तो खरा डोळस होयः ‘ एवं जीवधर्महीन। जो जीवेसी अभिन्न। देखे तो सुनयन। ज्ञानिया माजी ’ ॥१०६८॥ परमात्मा सर्वत्र सारखा भरलेला आहे त्याला जो समत्वानें पाहतो व न पाहण्यापासून होणाऱ्या आत्मघातापासून बचावतो तो परमगतीला जातो. सर्व कर्मे केवळ प्रकृतीकडून केलीं जात असून आत्मा अकर्ता आहे हें पाहणारा डोळस होय. जो सर्वभूताकार एकाचेच आहेत हें पाहतो, एकत्वांत नानात्व व नानात्वांत एकत्व पाहतो, तो ब्रह्मसंपत्तीचा स्वामी होतो. अनादि व निर्गुण असल्यामुळें हा अव्यय परमात्मा शरीरांत असूनही कांहीं करीत नाहीं व ह्मणून कोणत्याही कर्माचा बंध त्याला लागत नाहीं. आत्मा देहाचें कांहीं लागत नाहीं ‘देह तंव पांचा भूतांचें झालें। हें कर्माचे गुणीं गुंथलें। भवतसे चाकीं सूदलें। जन्ममृत्यूंच्या ॥ हें काळानळाच्या तोंडीं। घातली लोणियाची उंडी। माशी पांख पाखडी। तंव हें सरे ॥११०५॥ आणि आत्मा कसा आहे? ‘शुद्धनित्य अपैसा। अनादिपणें. ’ तो सूक्ष्म ना स्थूळ, मूर्त ना अमूर्त, एक ना विविध, मुक्त ना बद्ध, साभास ना निराभास, त्याच्याविषयीं कांहींच सिद्धांत करितां येत नाहीं, पण तो आहे मात्र खरा. ‘सर्वत्र सर्व देहीं। आत्मा असतचि असे पाहीं। परी संगदोषें एकेंही। लिप्त नोहे’ ॥११२२॥ लोहचुंबकाच्या संसर्गानें लोह भ्रमण पावतें, पण तो चुंबक कांहीं लोह नव्हे ! दीपज्योतीमुळें घरांतले व्यवहार होतात, पण दीप कांहीं घर नाहीं ! गगन आणि मेघ, रवि आणि मृगजळ–तितकाच आत्मा व देह यांचा संबंध आहे. पण हें कळावें कोणाला ? ‘जे ज्ञानियांचें द्वार। आराधिती ’ त्या संतांच्या सेवकांना !

---

# निबंधमाला–तिचें स्वरूप आणि कार्य.

कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांची निबंधमाला सुप्रसिद्धच आहे. शास्त्रीबोवा मराठी भाषेचे गद्याचार्य आहेत. मालेचे मूळ ७२ अंक प्रयासानें मिळवून निबंधमालेवर ६४ पानांचा एक टीकापर निबंध शके १८२६ मध्यें ‘ सरस्वतीमंदिर’ मासिकांत रा० पांगारकर यांनीं लिहून प्रसिद्ध केला होता. तोच पुन्हां स्वतंत्र पुस्तकरूपानें छापला आहे. शास्त्रीबोवांचें संक्षिप्त चरित्र व नवीन अवतरणें जास्त दिलीं आहेत. निबंधमालेचा हेतु, मालेंतील मुख्य व अवांतर विषय, मालेचे गुणदोष यांचें सविस्तर विवेचन यांत निर्भीडपणानें केलें आहे. किं. ८।१० आणे.

# अध्याय चौदावा.

## त्रिगुणांचा खेळ

अर्जुना! तुला पुन्हां एकदा ज्ञानांतलें पर ह्या० उत्तम ज्ञान सांगतों, ह्या ज्ञानाच्या योगानें जीव मजशीं साधर्म्य पावून सर्गप्रलयापासून---जन्ममरणापासून मुक्त होतात. ह्याला श्रुतीनें 'पर' ह्मटलें आहे, पण तें आहे आपुलें जवळचेंच! भवस्वर्गाला जाणणारीं व भेदांत वाढलेलीं इतर ज्ञानें ह्या अद्वैतज्ञानाग्नीपुढें तृणासारखीं दग्ध होऊन जातात ह्मणून ह्या ज्ञानाला 'उत्तम ज्ञान' असें ह्मटलें आहे. 'तियें आधवीच ज्ञानें। केलीं येणें स्वप्नें। जैशा वातोर्मि गगनें। गिळिजती अंतीं'॥ सूर्य उगवला कीं चंद्रादि तेजें लोपतात त्याप्रमाणें ह्या ज्ञानाचा उदय होतांच ज्ञानजात लयाला जातें--ह्मणून याला उत्तम ह्मणतात. याचें श्रेष्ठत्व कशांत आहे? 'अनादि जे मुक्तता। आपली असे पांडुसुता। तो मोक्ष हाता येता। होय येणें' ॥४९॥ कित्येक विचारवीर आजपर्यंत माझ्याच पूर्णतेला पावलेले आहेत. 'ह्मणौनी जन्मक्षया-। अतीत धनंजया। मी जाले ज्ञाना इया। अनुसरोनी' ॥६०॥ मूळ माया ही माझी योनि असून मी तेथें गर्भ ठेवतों व ती प्रकृति व मीं पुरुष दोघे मिळून ही विविध सृष्टि निर्माण करितों असें भगवानांनीं येथें सांगितलें आहे. महद्ब्रह्म, मूळमाया, अव्यक्त, प्रकृति, अज्ञान हीं सारीं मायेचींच नांवें आहेत. मायेचें रूप काय? 'इये नाहीं हेंचि रूप' माया ही काहीं भावरूप नाहीं: 'आपला आपणपयां। विसर जो कां धनंजया। तेंचि रूप इया। अज्ञानासी' ॥७२॥ स्वस्वरूपाचा विसर याचें नांव माया.

दिवा आणल्यावर अंधार राहत नाहीं ह्मणून अंधार सत्य किंवा भावरूप आहे असें ह्मणतां येत नाहीं, त्याप्रमाणें विचाराच्या वेळीं माया टिकत नाहीं ह्मणून ती सत्य नाहीं, मिथ्या आहे असें ह्मणण्यांत येते. स्वप्नजागर नाहीं व स्वरूपस्थितिही' नाहीं, अशी जी घनसुषुप्ति तिला अज्ञान ह्मणतात. समोर कांहीं आभास दिसतो, खांब कां पुरुष हा निश्चय नाहीं; 'तैसी वस्तु जैसी असे। तैसी कीर न दिसे। परी कांहीं अनारिसें (वेगळें)। देखिजेना ॥७८॥ ना राती ना तेज। ते संधीं जेविं सांज। तेंवी ना विरुद्ध ना निज। ज्ञान आथी ॥७९॥ ऐसी कोण्हीएकी दशा। तिये वाद अज्ञान ऐसा' अज्ञान अन्यथाज्ञान नाहीं व निजज्ञान नाहीं--एक असून भलतेंच वाटणें याचें नांव अन्यथाज्ञान; तेंही नाहीं व शुद्ध आत्मस्वरूपाचेंही ज्ञान नाहीं-- याचें नांव अज्ञान व हीच माया. वस्तु आप-ल्याला अज्ञानासारखी पाहूं लागली, आपण अज्ञान अहों असें मानूं लागली, आपणच प्रकृति झाली, जीवदशेला आली. यालाच प्रकृतिपुरुषयोग ह्मणतात.

वस्तुतः प्रकृति कोणीकडे व पुरुष कोणीकडे? मध्यरात्रीचा अंधार व माध्यान्हीचा सूर्यप्रकाश यांच्या संबंधासारखाच प्रकृतिपुरुषांचा किंवा मायाब्रह्माचा योग आहे! 'लचकलिया दिठी। मग देखणें जें जें उठी। तया नाम सृष्टी। मीचि विंयें पै गा' ॥८५॥ सृष्टीचा व माझा (ब्रह्माचा) अर्थार्थी संबंध नाहीं, पण 'विश्व माया व्याली। तेथ साह्य झाली। माझी सत्ता!' माझ्या सत्तेचा आधार घेऊन प्रकृति सृष्टिरचनेचा कारभार करिते, पण मला सृष्टीची दादही नाहीं.

ही अनिर्वाच्य गुणांची माया माझी गृहिणी होय! मी निजलों कीं ही जागते व माझ्या सत्तासंभोगानें गुर्विणी ह्म० गरोदर होते. मायेच्या उदरांत प्रकृति अष्टविकारांनीं जगद्रूप गर्भाची वाढ करिते. आह्मां उभयतांच्या संगांत प्रथम बुद्धितत्व जन्मतें, तेंच रजोगुणांनीं युक्त झालें कीं त्याला मन ह्मणतात. मनाची तरुणश्री ममता ही अहंकार प्रसवते व त्या अहंकारापासून पंचभूतें होतात. भूतां-बरोबर विषय व इंद्रियें आकाराला येतात. अष्ट विकारांच्या क्षोभानें त्रिगुणांचा गर्भपिंड तयार होतो व त्यांच्या पाठोपाठ वासना व्यक्तीस येते. त्या गर्भगोळाला चार अवयव उमटतात. हे अवयव ह्मणजे जारज, स्वेदज, अंडज व उद्भिज. हे चार अवयव ज्याचे हातपाय, स्थूळ प्रकृति हें ज्याचे शिर, प्रवृत्ति हें ज्याचें पुढें आलेलें पोट व निवृत्ती ही ज्याची पाठ, अष्ट देवयोनि हा ज्याच्या कमरेवरचा भाग, आनंदरूप कंठ हा ज्याचा स्वर्ग, कंबर हा ज्याचा मृत्युलोक, पाताळ हा ज्याच्या कमरेमागचा पृष्ठभाग--असें हे जगडंबररूप बाळसेदार लेंकरूं या मायेच्या पोटीं जन्मलें! 'ऐसें लेंकरूं एक। सप्रवली हें देख। जयाचें तिन्ही लोक। बाळसें गा' ॥१०७॥ ह्या बाळकाच्या अंगावर नामांचे अलंकार घालून माया ही या बाळाला मोहदुग्ध पाजून वाढवीत असते! माझ्या सत्तेवर माया हें विश्वरचनेचें कार्य करिते, 'या कारणें मी पिता। महद्ब्रह्म हे माता। अपत्य पांडुसुता। जगडंबर' ॥११७॥ असो. चार कोटींचे अनतानंत प्राणी जन्मास आले असें वर सांगितलेंच आहे. ह्या प्राण्यांचे देह अनंत व अपार झाले तरी देही एकच आहे, एकपणाला खंड नाहीं, एकपणाला बाध न येतां अनेकत्व झालें आहे. 'हां गा एकचि देहीं। काय अनारिसे (भिन्नभिन्न) अवयव नाहीं?। तेवीं विचित्र विश्व पाहीं। एकचि हें' ॥११८॥ शरीरें बहुतें। देखोनि न भेद हो चित्तें। जे मनबुद्ध्यादि भूतें। एकेंचि येथें' ॥११९॥' एखाद्या वृक्षाला उंचनीच वेगवेगळया डाहळया आल्या तरी बीज एकचि असतें. सर्व चराचर सृष्टीचा व आमचा संबंध एकपणाचा आहे, मृत्तिका व घट यांच्यासारखें आमचें नातें आहे. 'मृत्तिकेत्येव सत्यम्'–किंवा मी (ब्रह्म,) माया व जग यांचा संबंध कापूस, तंतु व पट यांच्या सारखा पूर्णपणें एकत्वाचाच

आहे असें भगवान् सांगतात. 'नाना कल्लोळपरंपरा। संतती जैसी सागरा। आह्मां आणि चराचरा। संबंध तैसा' ॥१२२॥ तात्पर्यः 'वन्ही आणि ज्वाळ। दोन्ही वन्हीचि केवळ। तेवीं मी गा सकळ। संबंध वाव' ॥१२३॥ एक मी (परमात्मा) सर्वरूपानीं नटलों आहे; ब्रह्म, माया, सृष्टि सर्व कांहीं मीच आहे, एका परब्रह्मा-वांचून दुसरें कांहींच नाहीं हा सिद्धांत. ब्रह्म जगामागें लपलेलें गूढ असेल, जगाहून वेगळें असेल, अशी कोणी शंका घेईल तर सांगतात कीं माझेंच झालेलें जग मला झाकूं शकेल तर जगपणानें कोण फांकलें आहे? 'जालेनि जग मी झांके। तरी जगत्वें कोण फांके?। किळेवरी माणिकें। लोपिजे काई?' काय माणकावर झळकणारी प्रभा माणकाला झांकून टाकते? सोनें अलंकाराला आलें कीं काय त्याचें सोनेंपण जातें? कमळ उत्फुल्ल होते तेव्हां काय त्याचें कमलत्व लोपतें? अवयव हे अवयवीला झांकतात कीं ते अवयवीचेंच रूप होय? कणीसपणानें दृश्य झाल्यानें कणसाचा मूळ दाणा लोपला कीं अधिकपणानें प्रत्ययास आला? 'ह्मणौनि जग परौतें। सारूनि पाहिजे मातें। तैसा नोहे उखितें उपादानकारण आघवें मीचि'॥१२८॥)

[तात्पर्य हें कीं जगाचें उपादानकारण व निमित्तकारण ब्रह्माहून निराळें नाहीं. लाकूड हें रथाचें उपादानकारण असून त्या लांकडाचा रथ बनविणार सुतार हा त्याचे निमित्तकारण होय. येथें विश्वघटनेच्या विचारांत विश्वाचीं उभय कारणें ब्रह्मच आहे, किंबहुना कार्य-कारणभेदविरहित असें एकीएक ब्रह्म आहे, तद्व्यतिरिक्त दुसरें कांहीं नाहीं.]

मी शरीराहून वेगळा आहे हें दाखविलें आहेच, मी गुणांनीं बांधला आहे, मी एक असून नाना देहांत नानात्व पावतो) असें ज्या बंधामुळें दिसतें त्या बंधाचा विचार सांगतों. बंध तीन गुणांचा, सत्व रज व तम हे गुण देही जो आत्मा त्याला देहाशीं जखडून टाकतात. 'हें एकेचि वृत्तीच्या ठायीं। त्रिगुणत्व आवडे पाहीं। वयसात्रय देहीं। एकीं जेवीं' ॥१४१॥ सत्वगुण हा निर्मल असल्यामुळें प्रकाश देणारा व निर्दोष आहे व तो सुख आणि ज्ञान यांच्या योगानें जीवांस बांधतो; रज हा तृष्णेपासून उत्पन्न झालेला असल्यामुळें आसक्तिरूप आहेः 'हें रज याचि कारणें। जीवातें रंजऊं जाणे। हें अभिलाषाचें तरुणें। सदाचि गा'—ह्यांत वळवळ फार 'न ह्मणे व्यापारा। रात्रदिवस' तसाच अभिलाषानें हा भरलेला असतो ह्मणून व्रतादिधर्म-कृत्यांत गुंतला असला तरी'कामावांचूनि हातें। शिवणें नाहीं' हा याचा स्वभावच होय. आतां तम हा प्राण्यांवर आवरण घालीत असल्यामुळें प्रमाद आळस व निद्रा यांच्या योगानें हा बंधक होतो. ह्या तिहींपैकीं कोणताही एक गुण दुसऱ्या दोन गुणांस चेपून आपण प्रबळ होतो. आतां ह्या गुणांचें वृद्धिलक्षण सांगतों. सर्वें-द्रियांत शुद्धज्ञानाचा प्रकाश होतो तेव्हां सत्वगुण वाढला आहे असें समजावें;

लोभ, नवीनं नवीन कार्यें अंगावर घेऊन करण्याचा उत्साह, तळमळ, इच्छा इ० काम हे वाढलेले दिसले कीं हा रजोगुणाच्या प्राबल्याचा प्रताप आहे असें ओळखावें व अज्ञान, आळस, प्रमाद, मोह हे वाढलेले पाहतांच हें तमोगुणाची वृद्धि झाल्याचें फळ आहे असें समजावें. देहांतसमयीं सत्वगुण वाढला तर प्राणी उत्तम लोकांस ( ज्ञान्यांच्या घरीं जन्म घेऊन ) जातो, रज वाढला तर कर्मासक्त प्राण्यांत जन्म घेतो व तम वाढला तर (पशुपक्षीकृमिकीटकादि) मूढयोनींत जन्म पावतो. 'ऊर्ध्वं गच्छन्ति सत्वस्थाः '—सात्विक लोक ऊर्ध्वगतीला जातात, राजस हे मृत्युलोकीं 'पुनरपि जननं पुनरपि मरणं ' या न्यायानें फिरत राहतात व तामस हे नरकलोकादि अधोगतीला जातात. तात्पर्य हें आहे कीं हें सर्व गुणांचें कार्य असून मी गुणांचा द्रष्टा अर्थात् गुणातीत आहें असें ओळखून भगवत्स्वरूप पावावें, गुणातीत पुरुष जन्ममृत्युजरादुःखापासून ' विमुक्तोऽमृतमश्नुते '--मुक्त होऊन आत्मसुख भोगतो. ' तरलेनि लाघवें। नटु जैसा न झकवे। तैसे गुणजात देखावें। न होनियां ॥२९१॥ उत्तम नट आपुल्या चातुर्यानें नाना हावभाव करून श्रोत्यांना रंजवीत असला तरी स्वतः फसत नाहीं इ० आपण कोण हें विसरत नाहीं, त्याप्रमाणें त्रिविध गुण व त्यांची कार्यें साक्षित्वानें पहावींत पण आपण गुणतादात्म्य पावूं नये, तर गुणांत असून जें गुणांच्या पलीकडे आहे त्याच्याशीं 'सोहंभावें' तद्रूप व्हावें. मग तेथून पाहतां मी साक्षी अकर्ता आहे हें समजतें. जसा सूर्य 'तैसा अकर्ता मी देहीं। सत्तारूप' हें जाणावें. देहाभिमानाचा वारा वाजूं देऊं नये, म्हणजे अज्ञाननिद्रेंतून हा स्वरूपीं जागा होतो, जन्मजरामरणादि देहधर्मापासून मुक्त होतो. तो पुरुष गुणातीत होय. गुणातीत पुरुष गुण व गुणकार्यें यांची इच्छा करीत नाहीं. ' गुणा गुणेषु वर्तन्ते ' असें मानून तो गुणांनीं विचलित होत नाहीं, स्थिर असतो. सुखदुःख, मानापमान, प्रियाप्रिय, अरिमित्र या विषयीं तो समचित्त असतो. शेवटची गोष्ट सांगायची ती ही कीं जो मला अव्यभिचारी भक्तीनें इ० अभेदभक्तीनें भजतो तो गुणातीत होऊन ब्रह्मपदाला पोंहतो.

---


## ५ श्रीएकनाथ चरित्र. (आवृत्ति चवथी)

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचा जन्म व बाळपण. ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या. १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर. इतक्या प्रकरणांत नाथांचे पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून ' स्तुतिसुमनांजलि ' नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणें दिलीं आहेत. पृ. सं. २८८ किं. ८१२. पत्ताः – व्यवस्थापक ' मुमुक्षु ' नाशिक.

## श्रीकृष्णांचें चरित्रदर्शन

### प्रकरण १० वें

लेखक—ना. श्री. वाटवे.

# अक्रूर आला व श्रीकृष्णांना घेऊन गेला.

१ हा वेळपर्यंत श्रीकृष्ण हेंही वसुदेवाचेच पुत्र होत ही गोष्ट कंसाला माहीत नव्हती. परंतु एके दिवस सहज नारदांच्या तोंडून त्याला ती कळली. ते त्याला ह्मणाले "कंसा वेड्या! तुला ह्या धूर्त वसुदेवानें फसवले. अरे! त्यानें आपला आठवा मुलगा नेऊन गोकुळांत ठेवला व नंदाची मुलगी आणून तुला दाखविली; व तूंही खुळाच! तुलाही तें खरं वाटलं. तूं आजपर्यंत अगदी स्वस्थ राहिलास. आतां तरी ऊठ व कांहीं स्वसंरक्षणाची तयारी कर" हें त्यांचें भाषण ऐकतांच कंस अत्यंत क्रोधायमान झाला व एकदम तरवार उपसून म्हणाला "आत्तांच्या आत्तां वसुदेवाला ठार करतों. त्याला माझी बहीण देणाऱ्या उग्रसेनालाही ठार करतों व मगच त्या दोघां कारट्यांना होतें कीं नव्हतेसें करून टाकतों. तेव्हां नारद त्याला ह्मणाले. "अरे! असें अविचारानें कांहीं करूं नको. वसुदेवाला मारलेंस तर त्याचे ते मुलगे कदाचित् तुझ्या हातीं लागणारही पण नाहींत. तेव्हां आधीं मोठ्या युक्तीनें त्यांना ते लहान आहेत तोंपर्यंतच आणून मारून टाक. कंसा! मग काय वसुदेव व उग्रसेन हे तुझ्या हातांत आहेतच पण बहुधा तूं त्या मुलांना मारलेंस कीं ते दोघे शोकानेंच मरतील तुला त्यांना मारावेंच लागणार नाहीं." नारदांचा हा सल्ला त्याला पसंत पडला व त्यानें वसुदेवाला मारण्याचा आपला बेत रहित केला, परंतु त्यानें वसुदेवदेवकीला पुन्हा कैद करविले व केशीला तिकडे कृष्णवधासाठीं पाठवून दिलें परंतु त्यांचें काय झालें तें मागें दिलेंच आहे.

२ हा वेळपर्यंत कंसाला श्रीकृष्ण हेच ते आपले शत्रू होत हें बरोबरसें माहीत नव्हतें, परंतु त्यांच्या अघटित कृत्यांवरून तेच आपले आकाश वाणीनें ठरविलेले शत्रु असावेत असा त्याचा अंदाज मात्र झाला होता. परंतु नारदांनीं असा गौप्यस्फोट करितांच त्याची पक्की खातरी पटली व तो आतां रामकृष्णांच्या वधाची तयारी जारीनें करूं लागला. त्यानें आपल्या सर्व मल्लांना व प्रधानांना बोलावून आणलें व त्यांना हें गौप्य कथन करून, तो म्हणाला. "ते रामकृष्ण माझे मृत्यु खरे सर्वथा न हे भाचे। त्यांची बळवृद्धि न हित, ते कापावे जेविं रद महेभाचे" ॥ तेव्हां मी असा बेत केला आहे कीं आपण धनुर्यागाच्या निमित्तानें रामकृष्णांना बोलावून आणूं व तुम्हीं शेवटीं त्यांना कुस्तीला बोलावून, कुस्तींत त्यांना मारून टाका. बहुधा दारावरच त्यांचा निकाल होईल अशी व्यवस्थाही मी

करणार आहे: ती अशी: कुवलयापीड नांवाचा आपल्या पदरीं जो एक अत्यंत मस्त हत्ती आहे, त्याला रामकृष्ण दाराशीं येतांच त्यांच्या अंगावर घालविण्याची व्यवस्था मीं करणार आहे, तरी त्यांतूनही वांचून ते आंत शिरलेच तर तुम्हीं मल्ल आहांनच त्यांचा समाचार घ्यायला.! ह्यावर मल्लांनीं त्याला आश्वासन दिलें कीं आम्हीं खातरीपूर्वक तुझें काम करतों. राजा! तूं स्वस्थ रहा व गंमत पाहा.

३ या प्रमाणें प्रधानांशीं व मल्लांशीं संगनमत करून त्यानें अक्रूर नांवाच्या एका यादवाला जवळ बोलाविलें. तो त्याचा दानपती असून मोठ्या विश्वासांतला असें त्याला वाटत असे. तो येतांच कंसानें त्याला फारच गौरवून व स्वतांशीं समानदर्जा देऊन म्हटले 'हे पाहा अक्रूरजी! तुझ्या इतका या भोज व वृष्णिकुळांत दुसरा कोणी माझ्या हिताचा माणूस मला दिसत नाहीं. तेव्हां तुला मीं एक अगदीं नाजूक काम सांगणार आहे तूंच तें केलें पाहिजेस. तूं गोकुळांत जा व तेथें नंदाच्या घरीं राम व कृष्ण या नांवाचे वसुदेवाचे दोन मुलगे आहेत त्यांच्यासह नंदाला धनुर्यागाला म्हणून घेऊन ये. त्यांना आमचे कोणतेच बेत मात्र कळवूं नकोस. ते इथें आले कीं त्यांना मीं काळतुल्य हत्तीकडून मारवीन व त्याच्याहातून ते सुटलेच तर आमच्या पदरीं असलेल्या विद्युत्तुल्य मल्लाकडून मारवीन. त्यांना मारून टाकले कीं मग आपण वसुदेव उग्रसेन यांना मारून टाकूं व त्यांच्या सर्व-हितचिंतकांना चिरडून टाकूं. मग ह्या अवनितलावर आम्हांला शत्रु म्हणून कोणी राहणार नाहीं. जरासंध तर माझा सासराच आहे; द्विविद हा माझा प्रिय मित्र आहे; शंबरासुर, नरकासुर, बाणासुर हे मित्रच आहेत. तेव्हां त्यांची मदत मिळा-यला हरकतच नाहीं. तेव्हां आपण त्यांची मदत घेऊन सर्व देवपक्षीय राजांना मारून टाकून या भूमीचें एकछत्रीराज्य करूं. काय समजला? तर मग लवकर जाऊन रामकृष्णांना:—

यत्नें मंत्र नुघडितां धनुमुखकौतुकविलोकनव्याजें।
घेउनि ये हा रथ ने तेंहि करीं तुज सुचेल भव्या! जे ॥१॥
नगरीप्रति गोरस कर द्याया सह गोपनंद आणावा।
त्वद्वचनें तच्चितीं बहु मत्स्नेहप्रसाद बाणावा ॥२॥

असें म्हणून कंसानें अक्रूराला निरोप दिला. या ठिकाणीं कंसाच्या स्वभा-वाची व कृत्यांची थोडी तात्विक छाननी करणें अयोग्य होणार नाहीं. आकाशवाणीला भिऊन त्यानें बहिणीलाच ठार मारायला काढली यावरून जगांतील केवळ दृश्य-शक्तीप्रमाणेंच अदृश्यशक्तीही अस्तित्वांत असून तिचेही मनुष्याच्या जननमरणा-सारख्या अत्यंत महत्वाच्या बाबतींवरही परिणाम होतात असा त्याचा विश्वास असल्याचें दिसतें. परंतु त्याबरोबरच तसे परिणाम होणारे असले तरी मनुष्य-

कृतीनें ते फिरवितां येतील अशा मताचा तो होता. एथपर्यंत सर्व ठीक होतें. असे मानणें कांहीं गैर नाहीं. श्रीकृष्णही याच उद्देशानें गीतेंत म्हणतात ' उद्धरे-दात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्। आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः॥६।५' बाह्य परिस्थितीवर विजय मिळविणें आपणास शक्य असून आपण त्याप्रमाणें करून आपला स्वतांचा उद्धार करून घ्यावा, आपला नाश करून घेऊं नये आतां जगांतील बाह्यपरिस्थितीवर विजय मिळविण्याचे मार्ग दोन तऱ्हेचे असलेले आढळून येतातः एक प्रेमाचा व दुसरा द्वेषाचा अथवा जगांतील स्वताला प्रतिकूल असणाऱ्यांना चिरडून टाकून किंवा त्यांची हिंसा करून त्यांच्यावर विजय मिळविण्याचा. पहिल्याला दैवी मार्ग व दुसऱ्याला आसुरी मार्ग असें म्हणतात. पहिल्या अथवा दैवीमार्गाला अनुसरतात ते स्वताचे मित्र होत, कारण पहिल्या मार्गानें जाणारांचें कल्याण होतें. असें श्रीकृष्ण 'दैवीसंपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता' या श्लोकार्धांत सांगत आहेत. परंतु यावरून कोणी असें समजूं नये कीं पहिल्या मार्गानें जाणारांना कोणाचाही विरोध संपादन करावा लागत नाहीं, त्यांनाही वैर संपादन करावें लागतें, प्रसंगीं शत्रूंचा संहारही करावा लागतो; पण हें सर्व करीत असतां ते आत्मौपम्यबुद्धीनें वागत असतात. दुसऱ्या मार्गानें जाणारे लोक हे विभक्तांत अविभक्त किंवा नानात्वांत एकत्व ओळखणें हें जें ज्ञानाचें खरें लक्षण त्यानें युक्त नसल्यामुळें निव्वळ स्वार्थी बुद्धीनें वागत असतात. कंसानें दुसरा मार्ग स्वीकारला होता त्याला पहिला मार्गही स्वीकारितां आला असता व तोच परिणामीं त्याला अधिक श्रेयस्कर झाला असता. आकाशवाणी खरी व्हावयाची असती तरी जर कंस आपल्या बहिणीशीं व भाच्यांशीं पूर्ण प्रेमानें वागत राहिला असता तर श्रीकृष्णांना त्याला मारणें अशक्य झालें असतें, एवढेंच नव्हे तर त्यांनीं त्याला प्रत्यक्ष ठार न मारतां कोणत्या तरी अन्य रीतीनें (तशीच पाळी असती तर) त्याचें मन न दुखवितां त्याचा मोहनाश केला असता किंवा शिशुपाळाच्या आईनें प्रेमानें विनवणी केल्यावरून ज्याप्रमाणें त्यांनीं शिशुपाळाला त्याचे शंभर अपराध पोटांत घालीन तेव्हाच अगदीं नाइलाज झाला तर त्याला मारीन असें सांगितले त्याप्रमाणें कांहीं तरी केले असतें किंवा ज्याप्रमाणें अक्रूरानें स्यमतक मणी नेला असें त्यांना माहित असतांही त्यांनीं अक्रूरावरील प्रेमामुळें अक्रूरानें शतधन्व्याला सत्राजिताला मारण्यात मदत केली हें माहीत असतांही अक्रूराची उपेक्षा केली व पुढें मोठ्या युक्तीनें त्याच्याकडून मणी काढला, तसें कांहीं तरी केलें! असतें। भारतीययुद्धांत कर्ण व ह्याच्यापूर्वी कांहीं एका कारणानें अर्जुन धर्माला ठार मारायला उठला असतां 'न सेवितास्त्वया वृद्धा' म्हणजे तूं वृद्धांची सेवा केलेली

नाहींस व तुला धर्मरहस्य कळत नाहीं. तरी तुला तसें केलेसें करूनही धर्मराजाला जिवंत राखण्याची युक्ती सांगतों म्हणून सांगून श्रीकृष्णांनीं त्याला सांगिलें:

अपमानें गुरुचा वध होतो शस्त्राविणेंचि तूं कारें ।
हेंचि अथर्वांगिरसीं श्रुति सांगे 'मान्यघात हुंकारें ॥१॥

व अर्जुनाची समजूत करुन धर्माला वांचविलें. हें ज्या श्रीकृष्णांनीं दुसऱ्याच्या बाबतींतही करविले ते श्रीकृष्णनीं कंस त्यांच्याशीं प्रेमानें वागता तर त्याच्याशीही केलें असतें. परंतु असें कांहीं न करितां त्यानें सुरवातीपासूनच वैरसुरू केलें. देवकीचा मुलगा पुढें त्यालामारणार होता परंतु देवकी कांहीं त्याला मारणार नव्हती, तरीही त्यानें आपल्या तामसी बुद्धीच्या 'अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता सर्वार्थान् विपरीतांश्च बुद्धिःसा पार्थ तामसी' म्हणजे ज्या बुद्धीला अज्ञानामुळें, अधर्म तोच धर्म असें वाटतें व जिचे सर्वच बाबतींत विपरीत ग्रह होतात, ती बुद्धी तामसी होय या गीतेंतील लक्षणाप्रमाणें शाश्वतः अधर्मकार्याला तो प्रवृत्त सुद्धां झाला एवढेंच नव्हे तर वसुदेवानें जर तिचीं मुलें त्याच्या स्वाधीन करण्याचें कबूल केलें नसतें तर तो देवकीला मारल्याविना राहताना, हें त्यानें जीं तिचीं सहाही मुलें मारली त्यावरून कोणालाही कळून येईलच. 'दंभोदर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेवच । अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम्' ॥ १ ॥ म्हणजे खोटा डौल मारणें, सज्जनांचा, वडील माणसांचा अवमान करणें, आपणच तेवढे मोठें असें मानणें, दुसऱ्यावर अनर्थ कोसळविण्यास तयार होणें, नेहमीं निष्ठुर भाषण करणें, सदसद्विवेकरहित वर्तणूक ठेवणें, हीं जीं आसुरीमार्गानें जाणाराचीं प्रमुख लक्षणें तीं सर्व त्याच्या ठिकाणीं होतीं. त्याच्या स्वभावाचें वर्णन करावयाचे तर तें गीतेंतील पुढील श्लोकानेंच करितां येईल. तो श्लोक असा: प्रवृत्तिंच निवृत्तिंच जना न विदुरासुराः । न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥१६॥१ म्हणजे आसुरी स्वभावाच्या माणसांना शास्त्रपूत धर्म कोणता तें आधी कळत नाहीं व कळलें तरी त्यांना त्या मार्गानें जावेसें वाटत नाहीं, तसेंच त्यांना शास्त्रानें कोणत्या गोष्टी निषिद्ध मानल्या आहेत; तें आधीं समजून घेण्याची आवश्यकता वाटत नाहीं व कदाचित् कर्मधर्मसयोगान त्यांना त्या समजून आल्याच, तरी त्यांना त्याप्रमाणें वागावयाचे नसतें. अर्थात् कर्तव्याकर्तव्यशून्य असे हे लोक निषिद्ध गोष्टी खुशाल करीत असल्यामुळें त्यांच्याठिकाणीं बाह्याभ्यंतर शुद्धता, विहिताचारविचार, सत्यप्रीती वगैरे कांहींच आढळून येत नाहींत. अर्थातच मग अशा आसुरस्वभावाचे लोक जशा तऱ्हेचे सिद्धांत बांधतात त्याप्रमाणेंच त्यानेंही बांधलेले होते यांत आश्चर्य काय? तो म्हणत असे कीं: 'असत्यं अप्रतिष्ठं च जगदेतदनीश्वरम्' शास्त्रा

कोणीच या जगांत नसून जो तो जसें करील तसें होतें. परमेश्वर, परलोक वगैरे सर्व झूट असून शास्त्रानें प्रशस्त म्हणून सांगितलेल्या मार्गानें जाऊन मनुष्याचें कल्याण होईलच अशी निश्चित गॅरंटी द्यायला कोणीच तयार नसल्यामुळें शास्त्राची एवढी भीड तरी कशाला हवी? मनुष्याला जसें वागावेसें वाटेल व त्याला जसें वागून या जगांत चालेल तसें त्यानें वागावें व स्वतांला सुखप्राप्ती करून घ्यावी; या जगाची रीत पाहिली तर कामेच्छेनें प्रेरित होत्साते स्त्रीपुरुष एकत्र होतात व व प्राणिमात्र निर्माण होतात. झालें! तेथें कसलें पूर्वकर्म नी काय? जगताच्या उत्पत्तिस्थितीसंबंधानें मनुष्याचें जसें मत असतें तदनुरूप त्याचें या जगांतील वर्तन होत असतें ह्या सिद्धान्तानुरूप त्याच्या वरील ठाम समजुतीमुळें कसाचें जगांतील वर्तन गीतेंतील पुढील श्लोकांत दिल्याप्रमाणें असे. ते श्लोक असे

'एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः। प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतो हिताः ॥ १ इ० इ० ॥

म्हणजे 'प्रवृत्तिंच निवृत्तिं' व 'असत्यमप्रतिष्ठम्' या दोन श्लोकांत सांगितल्याप्रमाणें विचार करून विवेकहीन व म्हणूनच आत्मौपम्यबुद्धीला पारखे असलेले असे जे देहात्मवादी मूढबुद्धि लोक ते फक्त देहपोषण हेंच काय तें जीविताचें परमसाध्य असें मानून जगांत दुसऱ्यांची कायिक वाचिक व मानसिक हिंसा करीत सुटतात, व त्यामुळें त्यांना सर्व जगाशीं शत्रुत्व संपादन करून नित्य आत्मपरविनाशी कलह करीत राहावें लागतें व अशा कलहांत ते बहुधा स्वशरीरें किंवा युक्तिबलेंकरून यशस्वी होतातही. हे लोक असे विजयी होऊं लागले कीं त्यांना भयंकर काम-भोगेच्छा उत्पन्न होऊं लागते व ती त्यांची नेहमीं वाढतच जातें. तसेच त्यांना आपण बाहेरून मोठे धर्मनिष्ठ आहोंत असें दाखवून जगाला फसविण्याची इच्छा होते, स्वतांच्या मोठेपणाची अवास्तव कल्पना त्यांच्या मनांत कायमचें ठाणें देऊन बसल्यामुळें व अज्ञानजन्य मोहामुळें ते पापकारक कर्मे करणें हेच आपलें व्रत अशी समजूत करून घेऊन शास्त्रविरहित, लोकाचारविरहित, न्यायनीति सोडून व अनीश्वरत्वप्रवर्तकमतप्रसार करीत, जगांत आपली वागणूक ठेवतात. आतां अशा तऱ्हेच्या वागणुकीमुळें व कामोपभोग हेंच जीवित्वाचें ध्येय या मतामुळें त्यांना मरेपर्यंत अगणित चिंता वहावी लागतें; कारण त्यांच्या मागचे आशापाश इतके कांहीं विपुल असतात कीं त्यांना न्याय्यमार्गानें जाऊन मिळणाऱ्या संपत्ती--वर आपली चैन भागविणें कधींच शक्य नसतें! अर्थात्च त्यांना अन्यायानें वगैरे संपत्ति मिळविणें प्राप्त होतें व तसें करण्यास ते केव्हांच मागें पुढें पाहात नाहींत. असे लोक, श्रीकृष्ण म्हणतात, यज्ञयागादिकही करतात पण ते 'आत्म संभाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः। यजन्ते नामयज्ञैस्ते दंभेनाविधिपूर्वकम्

॥ १६।१७ ॥ उद्धट अहंमन्य असल्यामुळें केवळ आपली मानमान्यता व्हावी आपल्या द्रव्याचें प्रदर्शन व्हावें एवढ्याच हेतूनें यज्ञ करीत असल्यामुळें ते विधि-पूर्वक करण्याची काळजी न घेतां केवळ वरकरणी डामडौलपूर्वक करतात. केव्हां केव्हां यज्ञयागादिक करण्यांत यांचे आणखीही कांहीं उद्देश असतात त्यांपैकीं 'परोत्सादन' म्हणजे दुसऱ्याचा घात करणें हा प्रमुख होयः वर वर्णन केल्या-प्रमाणेंच कंसाची जगांतील वागणूक होती व त्यानें जो धनुर्याग मांडला होता तोही श्रीकृष्णांच्या उत्सादनानिमित्तच होता हें आतां आपणास कळून चुकलेंच आहे. कंस हा अशा तऱ्हेचा असल्यामुळें त्याच्या मनांत नेहमीं पुढील विचार घोळत असत. तो म्हणे 'ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान् सुखी । आढयोऽभिजनवानस्मि कोऽन्योस्ति सदृशो मया ॥ म्हणजे ईश्वर तो काय माझ्याहून निराळा आहे? मीं हें सर्व भोगीत आहेंच कीं नाहीं! माझ्या सर्व गोष्टी माझ्या मनाप्रमाणें घडत आहेतच कीं नाहींत! मीं बलवान् आहे, सुखी आहे, धनधान्यसंपन्न आहे, ह्या उच्च राजकुळांत माझा जन्म आहे, माझ्यासारखा कोण आहे?'

३ अक्रूर निघून गेल्यावर कंसानें वरीलप्रमाणें कितीतरी मनोरथ केले. रामकृष्णांना मारून व तत्पक्षीय असा आपला बाप उग्रसेन व कृष्णांचा बाप वसुदेव व तत्पक्षीय यादव यांना ठार मारून टाकून आपण जरासंधाच्या मदतीनें सार्वभौमत्व पावलों, असें त्यानें कितीदा तरी मनांत ठरवून टाकलें सुद्धा! परंतु तिकडे विधिघटना कांहीं निराळीच घटत होती.

४ अक्रूर हाही एक यादवच होता. त्याला एकंदर यादवकुळाचा नाश कर-ण्याचा कंसाचा बेत मनांतून कांहीं आवडला नाहीं. तो मनांत म्हणाला 'मी आज राजाचा आवडता आहे खरा पण उद्यां माझें सर्वकुळ मला क्षीण झालेलें पाहावें लागणार आहे ना! व त्याला एक तऱ्हेनें मीच कारणीभूत होणार आहे! काय करूं? राजशासन तर दुर्लंघ्य खरेंच, परंतु वसुदेव व नंद हे माझे ज्ञातिबांधव असून शिवाय मित्रही आहेत. तेव्हां 'कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकं। कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम्' कुलक्षय झाल्यापासून काय अनर्थ घडतात ते व मित्रद्रोह केल्यापासून काय पाप लागतें तें मला कळत असून मीं तें करण्यास कसा बरें पुढें होऊं? कारण

'कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नं अधर्मोऽभिभवत्युत ॥
उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।
नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥ १।४०।४४ ॥

अशा रीतीनें कुलक्षय झाला कीं परंपरागत कुलधर्म लुप्त होतात व कुलधर्मांचा लोप झाला कीं कुलांत सर्वत्र अधर्म माजून राहतो. कुलधर्मांचा उच्छेद झाला कीं त्या कुळांतील माणसांना शाश्वत नरकांत पडावें लागतें!'

५ असा तो खिन्न झाला असतां 'ददामि बुद्धियोगं तं येन मां उपयान्ति ते' म्हणजे माझ्या भक्तांना माझ्याप्रत प्राप्त होण्यासाठीं लागणारें बुद्धिवैभव मींच देतो, व मग ते अनायासें आपलें कार्य साधून घेतात म्हणून सांगणाऱ्या भगवंतांनीं अक्रूराच्या हृदयांत असें कुलधर्मलोपभयानें काहूर माजविलेलें पाहून त्याच्या 'आत्मभावस्थ' भगवंतांनीं पुढील अर्थाचें स्फुरण करविलें. तो अर्थ असा. सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहंत्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ १८।६६ ॥ कीं सर्व पापदायी धर्मांची काळजी करणें सोडून दे व मला शरण ये म्हणजे मनुष्याला पाप न लागतां त्याचें काम होईल तें मीं तुला सांगेन. भिऊं नको. ह्या अर्थाचें स्फुरण होतांच अक्रूरानें मनांत विचार केला कीं मीं व्यर्थ काळजी करून काय होणार आहे? ईश्वर सर्वांच्या हृदयांत राहून त्यांना राहाटाच्या मोघ्याप्रमाणें कर्मचक्रावर घालून भ्रमवीत आहे तोच सर्व करील असें म्हणून सकाळीं तों रथांत बसून निघाला. निघतांना त्यानें असा बेत केला कीं तेथें जाऊन आपण श्रीकृष्णांना हा गुप्त बेत विदित करून मोकळें व्हावें; मग ते काय तें करतीलच.

६ या ठिकाणीं एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तीं ही कीं कंस हा राजा असतांही एकदम मोठें सैन्य पाठवून त्यान रामकृष्णांना धरून आणविण्याचा बेत केला नाहीं. याला बहुधा दोन कारणें असावींत. त्यानें एकेकटे राक्षस पाठवून पाहिले होते, पण त्या सर्वांचा नाश झालेला होता. त्यामुळें पुष्कळ सैन्य गेलें व त्यानें कदाचित् दोनी मुलांस धरून आणलेंच तर तरी आपली सर्व लोकांत व ओळखीच्या राजांत नाचक्की होणार! काय म्हणे कंसाच्या सैन्यानें दोन पोरें धरून आणलीं! शिवाय श्रीकृष्णांनीं गोवर्धनपर्वत उचलून धरून गोकुळाचा अतिवृष्टींत नाश होऊं न दिल्यापासून त्यांची जिकडेतिकडे कीर्ति पसरली होती तेव्हां कदाचित् सारें सैन्य गारद झालें तर आपलीच अपकीर्ति व्हावयाची व शिवाय तसें झाल्यास श्रीकृष्णांना पुढें करून कंसाचे शत्रु उठणार होते ते वेगळेच; शिवाय स्वनगरींत आलेल्या दोन मुलांना आपण ह्या नाहीं तर त्या अशा कोणत्यातरी रीतीनें सहज मारूं शकूं असेंही त्याला वाटलें असावें. त्यानें रामकृष्णांना मारण्याचा आपला बेत शक्य तितका गुप्त ठेवला होता हें मात्र खरें. गिरिधारी परमेश्वराला आपण मस्त हस्ती व मल्ल यांकडून मारवूं असें ज्याला वाटलें व ज्यानें

आपले शत्रु लांब होते त्यांना जवळ आणविले, त्याच्या मूर्खपणाची कींव करावी तितकी थोडीच होणार आहे अथवा भगवान् म्हणतातच कीं 'न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः। माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः' ॥ ७।१५॥ आसुरी स्वभावाच्या दुराचरणी नराधमांचे ज्ञान ते मायिक विषयांच्या पलीकडचें कांहींच जाणत नसल्यामुळें त्यांना माझी म्हणजे भगवंतांची ओळख कोठली होणार? तेव्हां भगवंतांच्या दुर्निवार मायेनें भ्रान्तचित्त झालेल्या कंसाला कृत्या-कृत्यविचक्षणा राहिली नाहीं याचें आश्चर्य न मानतां 'भ्रमणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिज्ञानमिहोच्यते बुधैः' म्हणजे मायेनें मूढ होऊन भगवत्स्वरूप न ओळखणें हा मानवांचा स्वभावच असून तद्विपरीत होणें म्हणजे मायेच्या मोहक पडद्याच्या पलीकडचें भगवद्रूप ओळखणें म्हणजे ज्ञान होणें ही एक ह्या मायिक जगांतील विकृति अथवा अनैसर्गिक गोष्ट होय असें समजून स्वस्थ राहावें हेच बरें!

७ अक्रूर सकाळीं रथांत बसून निघाला तो संध्याकाळीं वृंदावनांतील गोकुळांत जाऊन पोंचला. वाटेनें जातांना श्रीकृष्णाला भेटण्याची त्याला जी उत्कंठा लागून राहिली होती व त्याला श्रीकृष्णासंबंधानें काय वाटत होतें तें त्याच्या तोंडीं खाली दिल्याप्रमाणें घातलेल्या त्याच्या स्वगतविचारांत स्पष्टपणें दिसून येईल. असे वाटण्याचें कारण असें कीं श्रीकृष्णांनीं केलेलीं अघटित कृत्यें त्या काळीं चारी बाजूच्या लोकांत पसरलीं होतीं, व असा अद्भूत कर्मे करणारा देवतुल्य वीरपुरुष आपल्या यादवकुळांतच जन्माला आलेला आहे असें कंसमु--खानें त्याला कळून येतांच त्यांला अत्यंत आनंद झाला होता. परंतु कदाचित् कंसाच्या हातून अल्पवयांतच तो मारला गेला तर आपल्या कुलाची अत्यंत हानी होणार आहे असें वाटून त्याला वाईट वाटलें, परंतु पुन्हा त्याच्या मनांत असा विचार आला कीं गोवर्धनोद्धार करून सात दिवस न दमतां अहोरात्र तो पर्वत हातावर घेऊन उभाच्या उभा राहिलेला तो मुलगा[कृष्ण नव्हे देवच तो कंसाच्या] हातून मारला जातो! तोच हवा तर कंसाला मारील! अक्रूर वाटेनें जातांना विचार करूं लागला. 'मीं काय पुण्य केलें होतें कोणास ठाउक! मला आज कृष्ण भेटणार आहे. तो मला हाताला धरून घरांत नेईल. मग मीं त्याच्याशीं किती तरी गोष्टी बोलेन. त्याला कंसाचे सर्व बेत सांगेन मग तो माझ्यावर प्रसन्न होईल. वगैरे गोकुळाच्या जवळ जातांच तो रथांतून खालीं उतरला व त्यानें रस्त्यावरची धूळ आपल्या मस्तकीं ठेवली व कृष्णचरणस्पर्शानें पवित्र झालेली ती धूळ आपण मस्तकीं धारण केल्यापासून आपल्या सर्व पापाचें क्षालन झालें असें त्याला वाटलें. प्रत्यक्ष श्रीकृष्णच त्याला भेटणार होते मग त्यानें धुळीला इतका मान कां दिला म्हणाल तर आपली इच्छा असूनहीं लोकव्यवहारज्ञ श्रीकृष्ण आपल्याला स्वताच्या

चरणीं मस्तक ठेवूं देणार नाहींत हें त्याला माहीत होतें !

८ अक्रूर गोकुळांत गेला तेव्हां श्रीकृष्ण गोठ्यांत होते, दूध काढण्याच्या वगैरे भानगडींत होते. परंतु मथुरेहून अक्रूर आला आहे असें समजतांच ते त्याला रामासह सामोरे गेले. श्रीकृष्णांना यथाश्रुत पाह तांच,

नयनयुगदान पतिचें द्याया करूणामृतार्णवांत बुडी ।
आधीं टाकी, मग भवदवहतवपु त्या रथावरून उडी ॥१॥
मोर तसा अक्रूर, श्रीपति घनसा, तया दयारसदा ।
धांवुनि वंदीं, यांचा प्रेमा त्यांचाहि परि असा न सदा ॥२॥
भरिला दासें देह प्रभुपदनीरजरजीं न कां घोळी ॥
यांहींच मळायास्तव केल्या तीर्थांत फार आंघोळी ॥ ३ ॥
गद्‌गदगल साश्रुनयन रोमांचित दास हरिहि या दासीं ।
वर्षे अश्रु, उठवितां वाटे भेटे सुधाब्धि यादासी ॥ ४ ॥
वळहि तशीच करि कृपा, पूजिति जनरीति धरुनि त्या आर्या ।

( मोरोपंत मंत्र भागवत ) नंदानें अक्रूराचा चांगलाच सत्कार केला. जेवण-खाण झाल्यावर अक्रूरानें नंदाला राजाज्ञा निवेदन केली, व आपण वसुदेवपुत्र रामाला यज्ञ पाहायला नेऊं इच्छितों म्हणून सांगितलें. श्रीकृष्णांनींही नंदाकडून यज्ञ पाहायला जाण्याची परवानगी मिळविली. त्या दोघांनाही मी आपल्याबरोबर रथांत बसवून नेणार आहें असें अक्रूरानें सांगितलें.

९ दुसऱ्या दिवशीं नंदानें राजाज्ञा सर्व गौळ्यांना कळविली व सकाळीं प्रत्येकानें आपापला गोरसरूपी कर घेऊन मथुरेला निघालें पाहिजे अशी आज्ञा केली व त्याप्रमाणें नंदासुद्धा सर्वजण दुसऱ्या दिवशीं सकाळीं निघाले. रामानें अक्रूराला एक दिवस ठेवून घेतलें. दुसऱ्या दिवशी आपण रथांत बसून जाऊं व सहज नंदाला गांठून घेऊ असें त्यांनीं ठरविलें. कारण अक्रूर त्यांना नेण्यासाठींच आला होता. बलराम व कृष्ण मथुरेला जाणार आहेत असें ऐकतांच सर्व गोप-स्त्रियांना पराकाष्ठेचें वाईट वाटलें. त्या म्हणूं लागल्या.

यमदूतशतक्रूर, स्वमुखें 'अक्रूर' म्हणवितों मेला, आला गांव वधाया
परि बाई हा न लेश कोमेला ॥ १ ॥
दुसऱ्या दिवशी रामकृष्णांनीं अक्रूराला "जेववुनि कुशल पुसतीः सांगे
तो पातला जया कार्यी '
ते 'प्रभु जाणति सर्वहिः परि सांगे अखिल वृत्त अक्रूर ॥ १ ॥
होय सकपटी सकपटा युक्त करी तो दयालु न क्रूर-
वार्ता श्रवणे हांसति होती उद्युक्त कंसघातातें ॥ २ ॥

असो दुसऱ्या दिवशीं अक्रूरासहित रामकृष्ण रथांत बसून निघालेसे पाहून सर्व गोपी श्रीकृष्णांचें दर्शन घेण्यासाठीं निघून आल्या व त्यांच्या रथाची धूळ दिसेपर्यंत त्या दिशेला पाहात तेथें उभ्या होत्या, व मग त्या विषण्ण मनानें परत निघून घरीं गेल्या. श्रीकृष्णांनीं ही त्यांना जातांना प्रेमानें निरोप दिला होता. त्यांतील वाक्यें पुनः पुन्हा मनांत घोळवीत त्या कशा तरी घरीं निघून गेल्या.

१० गोपी ह्या खरोखर त्याच्या कोणीच लागत नव्हत्या, परंतु त्यांचें आपणावरील निस्सीम, निष्कपट व अत्यंत जिव्हाळ्याचें बंधुप्रेम पाहून श्रीकृष्णांनीं पुढें गीतेंत असे सांगून ठेवले कीं:—

'मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम् ॥

पापपुण्याची बरोबर कल्पना नसलेल्या व त्यामुळें पापाचरणांत डुंबत असलेल्या अनेक पापयोनींतील स्त्रिया, वैश्य, शूद्र वगैरे लोक यांना शास्त्रज्ञान नसून आत्मज्ञान झालेलें नसलें तरी ते जर माझा श्रद्धायुक्त भक्तिद्वारां आश्रय करतील तर त्यांनाही मोक्ष मिळतो. शास्त्रज्ञानाला जरूर असणारी अत्यंत तीव्रबुद्धिमत्ता कोणापाशी नसली तरी त्यानें भिण्याचें कारण नाहीं,अशांना श्रीकृष्ण सांगतातः— 'मन्मना भव मद्भक्तो मद्याजीमां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायण': ॥ ९।३४॥ माझ्याच ठिकाणीं आपल्या सर्व मनोवृत्तींना केंद्रित करा, आपलीं सर्व नातीं माझ्या ठिकाणींच लागू करा, यज्ञयाग, दानधर्म वगैरे कांहीं करायचे असतील तर तें मन्निमित्तच करा, माझ्या ठिकाणीं लीनपणा धारण करा, एकंदरींत थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे माझ्याशिवाय दुसरें कांहींच आपल्याला आवडवूं देऊं नका म्हणजे ह्या योगेंकरून तुम्हीं मला येऊन पोंचाल. परंतु या वरून कोणी असें समजूं नये कीं त्यांना अशा रीतीनें मिळणारी गती मोक्षाहून यत्किंचितही भिन्न आहे ! कारण भगवान् म्हणतात 'मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्। नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥८।१५ म्हणजे जे महात्मे माझ्याप्रत प्राप्त होतात त्यांना अशाश्वत व दुःखमय असा पुनर्जन्म कधींच प्राप्त होत नाहीं, म्हणजे त्यांना अत्यंत मोठी सिद्धी जी मोक्ष ती प्राप्त होत असते.

११ एथून भगवच्चरित्रास निराळें वळण लागलें. तेव्हां त्याच्या एथवरच्या चरित्राचें थोडें सिंहालोकन करूं व त्याचा त्याचें पुढील चरित्र बनण्यास कसा काय उपयोग झाला तें पाहूं. रामकृष्ण जन्मतः एका जहागिरदाराचे पुत्र होते, परंतु ते वाढले एखाद्या अगदीं गरीब माणसाच्या मुलासारखे. तरीही त्यांचें

बालपण गरीबींत परंतु सुखांत गेलें. राजवैभव नसतें तरी नंद हा तेथील पाटील होता. सर्व गोप त्याचा शब्द शिरसा वंद्य मानीत होते. नंदालाही श्रीकृष्णाशिवाय आणखी संतान नसल्यामुळें श्रीकृष्णांचे लाड नंदानें चांगलेंच पुरविले. सामान्य मातापितरें सुद्धा आपल्या शेंबड्यालेंबड्या पोरांचे आपापल्या शक्तीनुसार लाड पुरवितात मग श्रीकृष्णांसारख्या भुवनैकसुंदर, निरोगी व बळवान् पुत्राचे लाड कोण पुरविणार नाहीं ? शिवाय ते अनेक संकटांतून वांचलेले ! श्रीकृष्णांना लहानपणीं अत्यंत शुद्ध व निरोगी हवेंत राहावयास मिळालें होतें. त्यांना दुधातुपासारखा अत्यंत सात्विक आहार सेवन करायला मिळून ते लहानाचे मोठे झाले होते. त्यामुळें अर्थात्च त्यांचा स्वभावही 'आहारशुध्दौ सत्वशुध्दिः' या न्यायानें अत्यंत सात्विक बनला होता. या ठिकाणीं सात्विक आहार तो कोणता व त्यामुळें वृध्दिंगत होणारा सात्विक स्वभाव तो कोणता याचें गीतेप्रमाणें वर्णन केल्यास अयोग्य होणार नाहीं असे वाटतें म्हणून पहिल्यानें तसें करूं. श्रीकृष्ण म्हणतातः-

आयुःसत्वबलारोग्य सुखप्रीतिविवर्धनाः ।
रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्विकप्रियाः ॥ १७।८

म्हणजे ज्यांचें सेवन केलें असतां मनुष्याला चिरजीवन प्राप्त होते; अंतःकरणांत, सत्स्फूर्ति होते; देहेंन्द्रियशक्तींची वाढ होते, रोग होत नाहींत, व मनाला समाधान राहून स्वभाव चिडखोर बनत नाहीं असे रसयुक्त, ताजे, पौष्टिक व नजरेला चांगले दिसणारे आहार हे सात्विक आहार होत; व ह्यांचें सेवन केलें असतां स्वभाव कसा बनतो म्हणाल तर तो पुढील श्लोकांत सांगितला आहेः-

अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानंदमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तपआर्जवम् ॥ १ ॥
अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ऱ्हीरचापलं ॥ २ ॥
तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।
भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ १६।३॥

म्हणजे दुसऱ्यानें आपल्याला भीति दाखवावी असें वर्तन करावयाचे नाहीं, व इतकेंही वरून कोणी आपणास व्यर्थ दरडावूं लागल्यास त्याचा योग्य तो प्रतिकार करावयाचा त्रिविध तापांची वगैरे जाचणी झाली असतां भ्यावयाचें नाहीं, तीं सर्व दुःखें निमुटपणें सोसायाचीं; राग, द्वेष, लोभ, मोह, असूया, मत्सर, अहंकार, इत्यादि दोषांचा आश्रय न करतां अंतःकरणांची शुद्धि राखायचीं; आपल्याकडे जास्त असलेल्या वस्तु गरजु पण योग्य माणसांना द्यायच्या; कर्मेन्द्रियें व मना-

सुद्धा ज्ञानेंद्रियें यांचा योग्य निग्रह करावयाचा; नित्य व नैमित्तिक कर्म योग्यरीतीनें करावयाची; स्वधर्माचा अभ्यास करीत राहून त्या बरहुकूम आचरण ठेवावयाचें; शरीराला वाणीला व मनाला शास्त्रानें घालून दिलेल्या मर्यादांच्या आंत वागण्याची कडक शिस्त लावावयाची; मनांत चांगलेच विचार आणावयाचें-तेंच वाणीनें बोलायचें व तशीच कृती करायची; जें केलें असतां किंवा जें करीन म्हटलें असतां लाज वाटेल किंवा अन्य रीतीनें अपायकारक होईल तें मनांतही आणावयाचें नाहीं; प्राणिमात्राशीं आत्मौपम्यबुद्धीनें वागावयाचें; मनानें वाणीनें व कृतीनें शक्य तितकें दुसऱ्यास--विशेषें करून सज्जनास- दुखवावयाचें नाहीं; (मग प्रत्यक्ष प्राणिवध तशाच कारणाशिवाय करायचा नाहीं हें काय सांगायला पाहिजे?) नेहमीं यथार्थ भाषण करावयाचें, तसेंच स्वताला, सत्पुरूषांना, दीन दुबळ्यांना कोणी कारणावांचून छळीत असेल वा अडचणींत धरीत असेल तर त्याचा योग्य प्रतीकार करावयाचा, दुसऱ्यावर सहसा रागवावयाचें नाहीं; आपण करीत असलेल्या सर्व कर्मांच्या वरील फळासक्तीचा ईश्वरार्पणबुद्धीनें त्याग करावयाचा व जगाला तसें करण्याचा धडा घालून देऊन लोकसंग्रह करावयाचा व करवावयाचा! सदोदित अंतःकरणांत समाधान वृत्ति राखणें, दुसऱ्याच्या न कळत म्हणजे पाठीमागें त्याचीं मर्में उघडीं न करणें; विषयांच्या सांनिध्यांतही इंद्रियांना चंचल होऊं न देणें, अंतःकरणांत कोमलवृत्ती जागृत ठेवणें कोणतेंही अकार्य करण्याला हात न वाहणें, इंद्रियांना व मनाला कडक शिस्त लाऊन ठेवणें, तेजस्वी बाण्यानें म्हणजे मानीपणानें वागणें, दुसऱ्यानें आपला कांहीं अपराध केला परंतु तो शरण आला असतां त्याला पात्रापात्रतेचा व योग्यायोग्यतेचा विचार करून जरुर तर क्षमा करणें, तसेंच क्षमेला योग्य अशा दुर्बलांच्या बाबतींत दुसऱ्यांकडून त्यांना क्षमा करविणें, संकटकालीं घाबरून न जातां समतोलपणा राखणें,शारीरिक बाह्य शुद्धी तर राखायचीच पण सदसद्विवेक विचारानें चित्तांत दुर्वासना मुळीं उत्पन्नच न होतील इतकी चित्ताची शुद्धता राखणें आपलें कोणी कांहीं वाईट केलें असतां त्याला मारून टाकावें अशा वासना मनांत येऊं न देणें. आपण फार वरिष्ठ दर्जाचा मनुष्य असून सर्वांनीं आपणाला मानलेंच पाहिजे अशा विचारांना मनांत थारा न देणें, म्हणजे लीनता धारण करणें इ० इ०

१२ श्रीकृष्णांच्या अंगीं वरील सर्व गुण होतेच परंतु त्यांच्या भरीला क्षात्रकर्माला योग्य असे जे खालील गुण तेही पण त्यांच्या अंगीं होते. ते गुण गीतेंत खालीं दिल्याप्रमाणें सांगितले आहेत:—

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ १ ॥

म्हणजे मोठमोठ्या बळवानांना सुद्धां भीति वाटावी अशा तऱ्हेची तेजस्विता, कितीही संकटें आलीं तरी चित्ताची स्थिरता डळमळूं नये अशा तऱ्हेची धीर गंभीरता, अत्यंत विपरीत स्थितींतही युक्तिप्रयुक्तीनें आपलें कार्य साधण्याची तयारी व तितकी कर्तबगारी, युद्ध करीत असतां जीवितसंकट प्राप्त झालें तरीही शत्रूला पाठ न दाखविणें, पात्रीं धनव्यय करणें, आपल्या पराक्रमाच्या जोरावर सर्वांना आपल्या ताब्यांत ठेवणें वगैरे वगैरे. श्रीकृष्ण हे लहानपणीं गरीबींत वाढलेले असल्यामुळें त्यांना गरीबांची दुःखसुखें चांगलीं कळत असत, त्याचप्रमाणें अगदी हलकीं कामेंही त्यांनीं केलेलीं असल्याम्रुळें त्यांना पुढेंही इतरांनीं हलकीं मानलेलीं कामें करण्याचें अंगावर घेतांना कांहींच वाटलें नाहीं त्यानीं तीं विनदिक्कत केलीं. ह्या शिवाय लहानपणीं त्यांच्यावर अनेक संकटें येऊन गेलेलीं असल्यामुळें व त्यांना त्यांतून शक्तीनें व युक्तीनें पार पडावें लागलेलें असल्यामुळें त्यांच्या अंगीं प्रसंगावधान, धाडस, तडफ, संकटाविषयींची बेदरकारी, स्वसामर्थ्याविषयीं पराकाष्टेचा विश्वास, दृढनिश्चय, चिकाटी, धूर्तता, स्वकार्य साधण्याविषयींची तत्परता, व्यवहारज्ञान, समयस्फूर्ति इत्यादि अनेक उत्तमोत्तम गुण त्यांच्या अंगीं आलेले होते. लहानपणीं त्यांना रानांवनांतून गुरामागें धांवावें लागलेलें असल्यामुळें त्यांचें शरीर व मन अत्यंत काटक व श्रमसहिष्णु बनलेलें होतें, व तसेंच गुरांढोरांचे निरनिराळ्या वेळचे चेहरे व तदनंतरची त्यांची वागणूक श्रीकृष्णांना पाहायाला मिळाल्यामुळें 'परेंगितज्ञानफलाहि बुद्धयः' हें त्यांच्या बाबतींत तरी चांगलेंच प्रत्ययाला येत असे, त्यांना माणसांच्या वगैरे अंतरंगाचे पटकर ज्ञान होत असे, व कोणास कोणत्या नादानें गुंगवावें हे त्यांना चांगले कळत असे.

१३ अन्यायाची चीड त्यांना फारच येत असे व त्यामुळेंच त्यांनीं कालिंदीच्या डोहांत उडी टाकून व स्वतांचा जीव धोक्यांत घालूनही कालियाचे पारिपत्य करण्याचे योजिले व तसेच धाडस करण्याचीही त्यांना अत्यंत आवड असे. त्या धाडसापासून दुसऱ्यांना सुखप्राप्ती होण्यासारखी असेल किंवा त्यांचे दुःख निवारण होत असेल तर धाडसाचें काम करण्यास ते सर्वांआधीं पुढे होत. गोकुळांत त्यांनीं अनेक भयंकर प्राण्यांशीं झुंज खेळून व त्यांना मारून गोकुळांतील लोकांचें दुःख निवारण केलें होतें. लहानपणीं सुद्धा श्रीकृष्णांची स्वार्थ निरपेक्षता मोठी वर्णनीय होती. त्यांनीं एकदा शंखचूड नांवाच दैत्य मारला होता व त्याच्या डोक्यांतील रत्न काढून घेतले होतें. परंतु त्यांनीं ते ताबडतोब बलरामाला देऊनही टाकले.

तसेच त्यांची लीनता तर फारच अवर्णनीय होती. त्यानीं गोवर्धन पर्वत उचलून धरून सर्व व्रजवासी स्त्री पुरुष व गुरें-ढोरें यांचा जीव बचावल्याचेळीं गोपवृद्धांनीं त्यांना तूं कोण म्हणून मोठ्या प्रश्रयपूर्वक पृच्छा केली असतां श्रीकृष्णांनीं स्वतां-कडे मुळींच मोटेपणा न घतां तो उलट त्यांनाच दिला! ह्या त्यांच्या मनाच्या थोर-पणाला काय म्हणावें तेंच समजत नाहीं.

अल्पवयांतही त्यांची प्रज्ञा व बिनचूक ग्रहणशक्ती कार्याकार्यनिर्णय व स्वकर्मैक-निष्ठा किती जाज्वल्य होती हें त्यांनीं गौळयांचा इंद्रयाग मोडून काढून त्याऐवजीं ब्राह्मणगोवधनयाग त्यांच्याकरवीं करवितेवेळीं त्यांना सांगितलेल्या कारण-मीमांसेंत उत्तम पाहावहास मिळतें. ती त्यांची तेरा श्लोकी छोटेखानी सारगीताच म्हटली पाहिजे. त्यांत आपणास कर्मयोगाचें निवळ व्यवहारिक व साधें म्हणजे ज्ञानविज्ञानरहित असें स्वरूप पाहावयास मिळतें.

श्रीकृष्ण हे जात्याच मोठे आनंदी स्वभावाचे होते. लहानपणींही मुरलीच्या गोड गोड ताना काढाव्यात, अंगावर मोराचीं पिसें वापरावींत, पोंवळ्यांचे दागिने घालावेत, नाच करावा, ह्या त्यांच्या बाललीला असत. एकदां तर त्यांनीं पुष्कळशीं माकडें गोळा केलीं व घरांतलें सर्व लोणी त्यांना वांटून खाऊं घातलें. थोर पुरुषांचा प्रमुख गुण जी लोक विलक्षण आकर्षकता ती तर त्यांच्यांत फारच दांडग्या प्रमाणांत वास करीत होती. ह्या शिवायही—अनेक दैवी गुण व षड्-गुणैश्वर्यता त्याच्या अंगीं होतीच हें स्पष्ट दिसतेच आहे.

त्यांचें विलक्षण शरीरसामर्थ्य व त्यांची अलौकीक बाहुयुद्धकुशलता त्यांना लव-कर जगापुढे येण्यास फारच उपयोगी पडली. हा वेळपर्यंत ते फक्त गवळी होते परंतु ह्यापुढे ते राजे झाले. त्यांच्या आयुष्याला ह्यापुढें फारच निराळे वळण लागलें. हा वेळपर्यंत बलरामालाही श्रीकृष्ण हे आपले बंधु आहेत हें माहित नव्हतें तें त्याला अक्रूराच्या मुखानें कळनांच फारच आनंद झाला व त्यानें श्रीकृ--ष्णासुद्धां यज्ञ पाहायला जाण्याचा आग्रह धरला. नंदानेंही भाढेवेढे न घेतां त्यांना तसें करण्याची परवानगी दिली, व आपण पुढें निघून गेला.

---


# १८ मारुतिउपासना

प्रथम मारुतिरायाचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी.
किं० ८४

# महाराष्ट्राचा दुरभिमान !

सर्व प्रकारचे सद्‌गुण आमच्यांत असून आम्ही महाराष्ट्रीय इतर कोणत्याहि प्रांतातील लोकांपेक्षा वरचढ आहोंत, हा अभिमान आम्ही सतत बाळगतों; इतकेंच नव्हे, तर परप्रांतीयांशीं वागण्याचा प्रसंग आला तर आढ्यतेनें आम्ही त्यांचा पाणउतारा करितों ! पण प्रत्यक्ष कर्तबगारीच्या आंकडेवारींत मात्र आमचा मागमूसहि लागूं नये, याचें कारण काय ?—हा प्रश्न खरोखरच विचारणीय आहे. आमच्यांतला दुरभिमान इतका जाज्वल्य आहे कीं, आम्हीं दुसऱ्यांचे दोष ज्या निष्ठुरतेनें दाखवितों त्याच्या शतांशानेंहि आम्ही आत्मनिरीक्षण करावयास तयार नाहीं.

स्वतःचें वैशिष्ट्य वाढावें, स्वतःला पुढें न्यावें, स्वजातींतल्याच लोकांना इतरांपेक्षां स्वतः शहाणे ठरविण्याची खटपट करावी, अशासारख्या धडपडींतच सर्व शक्ति खर्च व्हावयाची! भाऊबंदकी व मत्सर आमच्या सटवीला पूजले आहेत! आमच्या समाजाचा दृष्टिकोण अत्यंत आकुंचित आहे. संबंध हिंदुस्थान देश एक आहे ही बुद्धि आम्हांला केव्हां येईल देव जाणे ! पण आज अखिल महाराष्ट्र एक आहे हें तत्व सुद्धां आमच्यांत तितकेंसें रुजलेलें नाहीं. मूठभर महाराष्ट्राचे प्रांतवार अगर जिल्हानिहाय भाग कल्पून, इतकेंच नव्हे तर पोट जात्याभिमानाचे थेर माजवून, आम्ही स्वतःस छिन्नविच्छिन्न करून घेण्यास एका पायावर तयार आहोंत. राजकारणांत आज महाराष्ट्र कोठें आहे ?

आमच्यांतील दुरभिमान बिनतोड आहे. इतर प्रांतीयांसंबंधीं आम्हीं जेव्हां बोलतो, तेव्हां वाजवीपेक्षां जास्त कुत्सितपणानें बोलतों, यांत तिळमात्र शंका नाहीं. बंगाल्यांत आमचा दरारा आहे, पंजाबी फक्त महाराष्ट्रीयांसच वचकतो, गुजराथी तर आम्हांला सिंहाप्रमाणें भितो, मद्रासी अय्या आमचेपुढें काय मजल मारणार, अशा प्रकारचा दुरभिमान आमच्यांत कायमचा शिरला आहे ! पण, तिकडे बंगाली व मद्रासी नोबेल प्राइझ मिळवून मोकळे झाले, आंतरराष्ट्रीय महत्वाचा पहिला हिंदी राजकारणी पुरुष हा मान गुजराथी बळकावतोच आहे, राष्ट्रीय चळवळीच्या निरनिराळ्या खात्याची सूत्रें अलाहाबादच्या पंडितांनीं आपल्या मुठींत ठेवलीं आहेत, तरी आम्हीं आपल्या गोड स्वप्नांतून जागे व्हावयास तयार नाहीं. आमच्यांतल्यासारखे राजकारणी पुरुष, इतिहासकार, गणिती, शास्त्रज्ञ मागें झाले नाहींत, आज नाहींत व पुढें होणें नाहीं इतकी खूणगाठ एकदा बांधली कीं, ओंठावरचा जारहि न वाळलेल्या लहानग्या पोराला, तो निव्वळ महाराष्ट्रीय आहे इतक्या भरंवशावर, हिंदुस्थानांतील इतर सर्व प्रांतांकडे

नाक मुरडून पाहण्याचा अधिकार मिळाला, ही आमची दृढ समजूत! बंगाल्यांत कै. महामहोपाध्याय हरप्रसादशास्त्री जरी असले, तरी ते आमच्या कै. सर भांडारकरांच्या तोडीचे असूं शकतील ही कल्पनाच आम्हांला सहन होत नाहीं! " आपण हिंदुस्थानला परत जावें, आपणांस प्रोफेसर या नात्यानें गणित शिकविण्याइतकें भांडवल आतां आमचेजवळ नाहीं, आपण स्वतंत्र शोध लावा. " असे डॉ० गणेशप्रसाद यांना जर्मन गणितज्ञांनीं जरी म्हटलें असले व त्यांनीं ' Integral Calculus, Differential Calcnlbs ' वर उत्कृष्ट ग्रंथ लिहिले असले तरी आमच्या फक्त पदवी घेतलेल्या पण संशोधनकार्य न करितां राजकारणांत लुडबुडणाऱ्या रँगलरांच्या हे पासंगालाहि पुरणार नाहींत हा आमचा दुराग्रह कायमच! आमच्यात एखादा जगदीशचंद्र, मेघनाथ, सहा अगर रमणता अजून झाला नाहीं, म्हणून काय झालें? आमची श्रेष्ठत्वाची गुर्मी कायमच! आमच्यांत नेहरू, सप्रू, सेटलवाड, भुलाभाई किंवा सर शिवस्वामी यांच्यासारखा कायदेपंडित नसला म्हणून कांहीं चिंता नाहीं. आमच्यांत विश्वेश्वर अय्यांसारखा राज्यकारभारधुरंधर नाहीं, रवींद्रनाथांसारखा कवि नाहीं, चिंतामणीसारता संपादक नाहीं, विठ्ठलभाई पटेलांसारखा असेंब्लीच्या अध्यक्षपदावरूनहि सरकारला रडकुंडीला आणणारा लढवय्या नाहीं, वल्लभभाईसारखा 'बार्डोली लेनिन' नाहीं, विठ्ठलदास ठाकरसीसारखा दानशूर नाहीं, ना. शास्त्र्यासारखा वक्ता नाहीं. तरीहि आमचें नाक वरच! —महाराष्ट्र—

---

## ६ कवीवर्य मुक्तेश्वर (चरित्र आणि काव्यविवेचन.)

ह्या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातु मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरी भारतांतील विशेष गुणः—सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस, शृंगाररस इ० कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचित्रें, कुस्त्यांचीं वर्णनें, त्यांच्या वेळची पाकसिद्धी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. ' मुक्तेश्वर नीतिरत्नमाला ' ही शेवटीं जोडली आहे. पृ सं. १४४. किं. रु. १

# मुक्तिमार्गावरील कांहीं वाटमारें मांग !

लेखकः—श्रीराम गोसावी, नाशीक.

या द्वंद्वमय संसारांत कांहीं गोष्टी जशा मित्ररूपानें मदत करणाऱ्या असतात त्याप्रमाणें कांहीं शत्रुरूपानें घात करणाऱ्या असतात आणि व्यवहारांतील शत्रु आपणाव्यतिरिक्त असल्यामुळें त्यांच्याशीं निष्ठुर बनून त्यांचा संबंध सोडणें एक वेळ सोपें असतें पण परमार्थांत आपलेंच कांहीं गुण शत्रुरूपानें जेव्हां रोज आपला घात करीत असतात, तेव्हां त्यांच्याशीं झुंज घेणें फार कठीण होऊन बसतें. खालील कांहीं गोष्टी अशाच आहेत.

## १ बुद्धीचा अनिश्चितपणा.

आपल्या गंतव्याविषयीं ज्याच्या मनांत निश्चितपणा नाहीं, तो मुक्काम गांठील याविषयीं आशाच नको ! ज्याला सगळींच गांवें सारख्या महत्वाचीं व सर्वच रस्ते सारख्याच योग्यतेचे वाटतात त्याला कोणच्याच गावाला जावयाचें नाहीं हें निश्चित समजावें. अनिश्चित मनाचा थयथयाट हा लहानमुलाच्या बडबडी-प्रमाणें व्यर्थ होय. आधुनिक कवि हा जसा परब्रम्हापासून तों चहाच्या कपबशी-पर्यंत हव्या त्या विषयावर कविता लिहिण्यास सज्ज असतो, त्याप्रमाणें वाटेल त्या गोष्टीवर ज्याचे संकल्पविकल्पात्मक मनोरथ सारखे चालू असतात, त्याच्या हातून कांहीं होणें नाहीं. बेकार इसम जसा दिवसांतून दहा धंदे करतो आणि मिळवीत मात्र कांहीं नाहीं, त्याप्रमाणें नित्यनव्या हव्यासांत ज्याचें मन अडकून पडतें त्याला कांहीं लाभ होणें नाहीं. संसारांतल्या साध्यासुध्या गोष्टींत जर मती निश्चित ठेवावी लागते तर त्याच्यापेक्षां सहस्रपटीनें महात्त्वाच्या गोष्टी जबऱ्या निश्चयाशिवाय मिळतील असें मानणें मतिमंदपणाचें काम आहे. आपलें प्राप्तव्य, आपला मार्ग, आपल्या प्रयत्नांची पद्धत, या सर्व गोष्टी सरळ सूत्राप्रमाणें बुद्धीपुढें असल्या पाहिजेत. वाऱ्याच्या वाहुटळीनें रस्त्यांतली धूळ उडते त्याप्रमाणें एकाद्या शास्त्राचें प्रवचन किंवा वाचलेलें एकादे मतवादाचें पुस्तक यांनीं बुद्धींत चांचल्य उत्पन्न होत असेल तर आपला मार्ग ठरला नाहीं असें खुशाल समजावें.

## २ खोटी प्रतिष्ठा.

खोट्या प्रतिष्ठेंत पाडण्याचे मनाचे व्यवसाय हे फार विस्मयजनक आहेत. कॉलेजांत जाणाऱ्या अविवाहित युवतीला जसा आपल्या बसण्याच्या उठण्याच्या, चालण्याच्या, बोलण्याच्या पद्धतीचा एक सूक्ष्म-भावनामय अभिमान असतो त्याप्रमाणें परमार्थी म्हणविणारांतही प्रतिष्ठेचे निर-निराळे सूक्ष्म प्रकार आढळून येतात. स्वतां इतरांप्रमाणेंच संसारी पण केवळ

पारमार्थिक पुस्तकें वाचतो, पोथीपुराण ऐकतो, म्हणून कांहींना इतर केवळ संसाऱ्यांविषयीं तुच्छबुद्धि वाटते; कर्मठांना आपल्या स्नानसंध्येचीच मिजास चढते; तार्किक वाचाट ज्ञान्यांना भाविक भक्ताच्या भोळेपणाचें व अज्ञानाचें हंसू येते; संस्कृत पुस्तकें वाचणाराला तुकारामाचे अभंग वाचणाराची कींव येते! व्यासपीठावरून प्रवचन देणाऱ्या शास्त्र्याला डोंगरावरून पाहणाऱ्याप्रमाणें आपले श्रोते मुंग्यांप्रमाणे लहान दिसतात! माझे एक इंग्लंडमधून शिकून आलेले गुरुजी तत्वज्ञानाची इंग्रजी बुकें वाचूनच 'आपल्या आयुष्याचा प्रश्न सुटला' म्हणून आम्हांस सांगत! दुसरे एक शाब्दिक शास्त्र पटलेले शास्त्री आपणास वशिष्ठयाज्ञवल्क्यांचें ज्ञान झाल्याचें मानतात. तिसरे एक वेदांती वेदांताच्या गप्पागोष्टींवरच आपणास जीवन्मुक्त समजतात. चवथे एक आचार्य बायाबापड्यांना आंगारे धुपारे करतात म्हणून आपणांत योगसामर्थ्य असल्याचें सांगतात. अशा एक ना दोन गोष्टी! सारांश खोट्या प्रतिष्ठेनें आत्मवंचना फार लवकर होते; व प्रगतीला फार अडथळा येतो. ज्याला आपल्या प्रासव्यापेक्षां स्वतांचीच प्रतिष्ठा मोठी वाटते त्यानें प्रासव्य सोडलें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. देव सोडून स्वतांची देहपूजा त्यानें आरंभली असें लेखण्यास कांहीं एक प्रत्यवाय नाहीं. जो स्वतांपेक्षा इतर जीवांना तुच्छ लेखतो त्यानें सर्वांतर्यामीला पाहिलें नाहीं हें हमखास समजावें! या बाबतींत ज्ञानदेवांचें उदाहरण सतत डोळ्यापुढें ठेवण्यासारखें आहे. त्यांच्या अधिकाराविषयीं बोलण्याची जरूर नाहीं पण त्यांच्या मनाचे अपार तळवट (विनयशीलता) ज्ञानेश्वरीग्रंथांत जागजागीं पाहावयास सांपडतें; तें साधकानें नेहमी समोर ठेवावें.

## नित्यप्रयत्नाविषयीं आळस:

पैसे मिळवावयाला प्रयत्न लागावा व देव मिळवावयाला गप्पाशिवाय दुसरें कांहीं लागूं नये असें मानणें फार आश्चर्याचें आहे! साधी बी. ए. एम्. ए. ची परीक्षा पास होण्यास सतत अभ्यासाचीं बाराबारा वर्षे लागावी व अनेक जन्माच्या हृदयग्रंथी तोडण्यास प्रयत्नाचा कांहीं कालावधी मानला जाऊं नये हा दुर्विलास आहे. पैसे मिळवितांना भूकतहान, लाजलज्जा सोडून द्यावी, पण अविनाशी संपत्ती मिळविण्याच्या केवळ गोष्टी करून सर्व वैषयिक थाट कायम ठेवण्याची बुद्धि राखावी हें विपरीत वाटतें! संसाराचे भोग भोगतांना उसंत मानूं नये पण इकडे मात्र देवाच्या आरतीबरोबर आपल्या इच्छेचीही आरती करावी व देवाची शेजारती म्हणून आपण स्वतां झोपीं जावें हें फार विलक्षण आहे. प्रासव्य न मिळवितां प्रयत्न सोडणार खरोखरच अभागी म्हटला पाहिजे.


# धनाचा सदुपयोग.

धनालागीं घेती दान । धनालागीं होती सज्ञान ।
धनालागीं नीचसेवन । उपसर्पण हीनांचें ॥ १ ॥
दैवें जोडलियां धन । आचरावे पंच महायज्ञ ।
करावें भगवत्पूजन । उल्हासें जाण महोत्साहें ॥ २ ॥
पितरां गौरवूनि आपण । यथारुचि द्यावें अन्न ।
यथाशक्ति द्यावें धन । सेवेनें संपूर्ण सुखी करावीं ॥ ३ ॥
बंधु स्वगोत्र स्वजन । त्यांची दारिद्र पीडा दारुण ।
निरसावी देऊनि धन । हा मुख्य धर्म जाण श्रेष्ठत्वें ॥ ४ ॥
कुटुंबासी यथोचित । सुखी करूनि समस्त ।
याहूनि उरला जो अर्थ । तो श्रेयार्थ वेंचावा ॥ ५ ॥
सकळ दानांमाजी जाण । अतिश्रेष्ठ अन्नदान ।
दीनांस देऊनि सन्मान । द्यावे सदन्न अतिश्रद्धा ॥ ६ ॥
धनाचा सद्व्ययो खरा । द्यावें अनाथप्रेतसंस्कारा ।
अर्पावें दीनांच्या उद्धारा । धाडावें घरां अयाचितांच्या ॥ ७ ॥
अंध पंगु मुके दीन । यांसी संरक्षी जो आपण ।
त्याचेंचि सार्थक धन । शुद्ध पुण्य तयाचें ॥ ८ ॥
दुर्बळ जो कां भगवद्भक्त । त्यासी संरक्षी जो धनवंत ।
तेणें तुष्टला भगवंत । त्यातें उद्धरीत भक्ताआधी ॥ ९ ॥
जेणें वित्तें जीवितें साचार । भूतदया परोपकार ।
करूनियां विवेकी नर । भवाब्धिपर पार पावले ॥ १० ॥
धनाचियां पाठोवाठीं । परमधर्मासीं पडे गांठी ।
धर्म तेथ उठाउठीं । ज्ञानाची भेटी विज्ञानेसी ॥ ११ ॥
चंद्रास्तव वाढती कळा । जीवनास्तव जिव्हाळा ।
तेवीं धनास्तव सोष्वळा । धर्माचा सोहळा सात्विकां घरीं ॥ १ ॥
धर्म तेथ शुद्ध ज्ञान । ज्ञान तेथ विज्ञान ।
विज्ञान तेथ समाधान । शांति संपूर्ण नांदे तेथ ॥ १३ ॥

—श्रीएकनाथीभागवत.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २६ ) पौष शके १८५३ ( नवें वर्ष १२ वें

मास ६ ) फेब्रुवारी इ. स. १९३२ ( अंक २

वार्षिक वर्गणी रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३०३



लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.



मुद्रकः— विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६
लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | ... | १–२ |
| २ श्रीदत्तभक्तिरहस्य व भूषण ( अभिप्राय ) | ... | ३–४ |
| ३ श्रीगुरुकरुणामृत ( कविता ) | ... | ५–६ |
| ४ वीरशैवांचा (लिंगायतपंथ | ... | ७–८ |
| ५ ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य | ... | ९–१६ |
| ६ श्रीकृष्णांचें चरित्रदर्शन | ... | १७–३० |
| ७ प्रचलित गुरुशिष्यसंबंधी कांहीं विचार | ... | ३१–३५ |
| ८ उपनिषदांतील वेंचे | ... | ३६–३७ |
| ९ मध्वमुनीश्वरांची कविता | ... | ३८–३९ |
| १० कान्हू पाठक | ... | ४० |

---

## नवा ग्रंथ!!

### ज्ञानेश्वरनामदेवांचा काल.

हा ग्रंथ मुंबईस ' मुंबईवैभव प्रेस ' मध्यें छापावयास दिला आहे हें आमच्या वाचकांस कळविलेंच आहे. ' पूर्वार्ध ' छापून तयार झाला आहे, ह्मणजे निम्मा ग्रंथ सुमारे २८० पृष्ठें आज तयार आहेत. आह्मांला प्रुफें पाहणें, नवीन प्रकरणें तयार करून पाठविणें या कामांत रोज बारा तास घालवावे लागतात. ग्रंथाची अधीक माहिती पुढील अंकांत येईल, व एप्रिलच्या अंकांत त्याची संपूर्ण माहिती अनुक्रमणिकेच्या रूपानें येईल.

नाशिक, मुमुक्षु कचेरी ] लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

मुमुक्षु मासिक वर्ष १२ वें ॥ फेब्रुवारी १९३२ अंक २

# मंगलाचरण



## सवाया

१

नाम श्रीरामसुंदर । ध्याती उमामहेश्वर ।
सिंहासनीं रघुवीर । अंकीं सीता शोभवी ॥ १ ॥
लक्ष्मण महावीर । भरत शत्रुघ्न धीर ।
हनुमंत जोडी कर । देवऋषीं गायिला ॥ २ ॥
ज्याचे ध्यानीं रामदास । तेंचि ध्यान कल्याणास ।
बंधु दत्तात्रेयास । रामप्रेमा लाधला ॥ ३ ॥
वर्णू राघवाचें यश । श्रीगुरूचा नामघोष ।
पूर्व पुण्य हें विशेष । लक्ष पायीं ठेविला ॥ ४ ॥

२

नाम विठ्ठल सुंदर । ब्रह्मा विष्णु आणि हर ।
गुणातीत निर्विकार । शुकादिकीं गायिला ॥ १ ॥
चंद्रभागा रम्य तीर । तेथें उभा कटीं कर ।
दिंड्यापताका अपार । यात्राघोष जाहला ॥ २ ॥
तेथें येतां रामदास । दृढ श्रीरामीं विश्वास ।
रूप पालटोनी त्यास । रामरूपीं भेटला ॥ ३ ॥
पुन्हा विठ्ठलस्वरूप । रामविठ्ठल एकरूप ।
पूर्वपुण्य हें अमूप । लक्ष पायीं ठेविला ॥ ४ ॥

## अभंग

माझें मानस विटेवरी । विठ्ठलचरणीं निरंतरीं ॥ १ ॥
जें कां चैतन्य मुसावलें । विटेवरी विसावलें ॥ २ ॥
जो जो पंढरीस गेला । तेणें कळिकाळ जिंकिला ॥ ३ ॥
रामदास ह्मणे पंढरी । नाना साधनेविण तारी ॥ ४ ॥

## पदें

१

तुजविण गुरुराज आज । कोण प्रतीपाळी ।
मायबाप कामा नये । कोणि अंतकाळीं ॥ ध्रु० ॥
जळावीण तळमळत जसा । मीन शुष्कडोहीं ।
तुजविण मज वाटतसे । धांव लवलाहीं ॥ १ ॥
चकोरचंद्र न्याय जसा । गाय माय बाळा ।
पाडसासि हरिणि जसी । तेंवि तूं कृपाळा ॥ २ ॥
रामदास धरुनि आस । पाहे वास दिवसरात ।
खास करिल काळ ग्रास । ध्यास हा मनासी ॥ ३ ॥

२

गुरु दातारें दातारें । अभिनव कैसें केलें ॥ ध्रु० ॥
येकचि वचन न बोलत बोलुनि । मानस विलया नेलें ॥१॥
भूतसंगकृत नश्वर वोझें । निज वोधें उतरीलें ॥ २ ॥
दास ह्मणे मज मीपणविरहित । निजपदिं नांदविलें ॥३॥

## अभंग

संसार करावा सुखें यथासांग । परी संतसंग मनीं धरा ॥१॥
मनीं धरा संतसंगतीं विचरा । येणें पैलपार पाविजेतो ॥२॥
पाविजेतो याची प्रचीती पहावी । निरूपणीं व्हावी अतिप्रीती ॥३॥
अतिप्रीती तुह्मी निरूपणीं धरा । संसारीं उद्धरा असोनीयां ॥ ४ ॥
असोनीयां नाहीं माया सर्व कांहीं । विवंचूनि पाहीं दास ह्मणे ॥५॥

तपस्वी मनस्वी भले पार गेले । दुजी सृष्टिकर्ते असे थोर मेले ।
चिरंजीव कल्पायु गेले किती रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥

---

## मारुतिउपासना.

प्रथम मारुतिरायाचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी.
किं. ६४

# श्रीदत्त-भक्त-रहस्य.

पनवेलचे श्रीगुरुभक्त रा. रा. सदाशिव कृष्ण फडके, वकील, यांनीं आपला धंदा सोडून दिला असून चिकित्सक पद्धतीनें धार्मिक वाङ्मयाच्या सेवेला आपणास वाहून घेतलें आहे हें त्यांच्या नवयुगधर्म ह्या ग्रंथावरून सर्वांस कळून आलें आहेच. हा ग्रंथ अत्युत्कृष्ट असून व त्याचा बोलबालाही पुष्कळ झाला असून त्याकडे वाचकांचें लक्ष वेधावें तितकें वेधलें नाहीं असें प्रस्तुत ग्रंथाच्या प्रस्तावनेंतच रा. फडके यांनीं लिहिलें आहे. अशा प्रतिकूळ स्थितींतही रा. फडके यांनीं प्रस्तुत मोठा ग्रंथ किंवा तीन ग्रंथांचा समूह ह्मणा छापून लोकांपुढें ठेवण्याचें धाडस केलें याबद्दल ते स्तुतीस खरोखर पात्र आहेत. श्रीदत्तोपासना पृ० १२५, दत्तमुक्तामाला पृ० ४०० व दत्तपंचामृत व बोधसुधा पृ० १२५ असे तीन ग्रंथ एकत्र बांधलेलें व रु. ३ किंमतीस मिळणारें हें पुस्तक आह्मांकडे अभिप्रायार्थ आलें आहे. हीं तीन पुस्तकें त्यांनीं वेगळेगळीहीं बांधलीं आहेत. पहिल्या पुस्तकांत दत्तोपासनेचें रहस्य सांगितलें आहे, दुसऱ्यांत दत्तावतार व दत्तभक्त यांचीं चरित्रें सविस्तर दिलीं आहेत. तिसऱ्यांत नित्यपाठासाठीं व चिंतनासाठीं दत्तपूजाविधान, आरत्या, स्तोत्रें, अष्टकें, पदें अभंग वगैरे दत्तोपासकांच्या नित्योपयोगाचाच सर्व भाग आहे हीं तीनही पुस्तकें प्रत्येक दत्तभक्तानें तर अवश्य घेतलींच पाहिजेत, पण प्रत्येक पारमार्थिकानें त्यांचा संग्रह केला पाहिजे. तिसरें पुस्तक श्रीदत्तोपासकांना अवश्यच आहे, दुसऱ्यांतही त्रिमूर्ति तत्वज्ञानाचें प्रथम विवेचन असून श्रीदत्तगुरूच्या अवतारांचें वर्णन आहे व पुढें माणिकप्रभु, अक्कलकोटचे स्वामी महाराज, गोरखनाथ, जनार्दनस्वामी, एकनाथ, दासोपंत, नारायणबोवा जालवणकर, वासुदेवानंद सरस्वति, भैरव अवधूत, विष्णुकवि व नारायणबोवा केडगांवकर ह्या दत्तावतारांचीं किंवा दत्तभक्तांचीं चरित्रें चिकित्सकबुद्धीनें दिलीं आहेत. हीं सर्व वाचनीय आहेत. तिसऱ्या पुस्तकांत श्रीदत्तस्मरण, दत्तपूजन, दत्तजन्मकथा, दत्तध्यान व दत्तदर्शन हें असून त्यांत दत्ताच्या भूपाळ्या, आरत्या, पदें, स्तोत्रें वगैरे दत्तविषयक प्रकरणें आहेत. शेवटीं ईशावास्य, जाबाल, दत्तात्रेय, अवधूत अशीं चार उपनिषदें, अवधूत गीता व जन्माख्यान हीं प्रकरणें आहेत. हा सर्व संग्रह एकत्रित केल्यामुळें दत्तोपासकांना तो अत्यंत आदरणीय वाटेल. महाराष्ट्रांत दत्तसंप्रदाय जारी असून रा. फडके यांच्या तिन्ही पुस्तकांचा लोकांत आदर होईल अशी आह्मांस उमेद आहे, प्रत्येक दत्तभक्ताच्या घरीं हीं पुस्तकें पाहिजेत. रा. फडके यांनीं ह्या कामीं दीर्घ परिश्रम केले असून सर्वत्र त्यांचा भाविकपणा व चिकित्सकबुद्धि यांचें योग्य मिश्रण केलें असल्यामुळें त्यांचे हे ग्रंथ नव्याजुन्यांनींही अवश्य पाहिले पाहिजेत.

ह्या शिवाय रा. फडके यांचेकडून 'लाला लजपतराय' यांचें चरित्र किं. रु २ हें पुस्तकही आलें आहे. रा. केळकर यांनीं ग्रंथ परिचय करून देतांना ह्मटलें आहे कीं लालाजींच्या बुद्धींला व मनाला अनेक पैलू पडलेले होते व त्यामुळें राजकारण, धर्म ( आर्यसमाजीय, ), समाजसुधारणा, शिक्षण, वाङ्मय, परोपकार, इ० अनेक बाबतींत त्याजकडून राष्ट्राची महुमोल सेवा झाली आहे, महाराष्ट्राच्या टिळकांप्रमाणेंच पंजाबांतील लालाजी हे सर्व हिंदुस्थानाला प्रिय आणि पूज्य झाले आहेत व त्यांचें हें चरित्र फार व्यवस्थितपणें लिहिलें गेले आहे. रा. फडके यांना पारमार्थिक संतांप्रमाणें राजकीय पुढाऱ्यांचींही चरित्रें फार उत्तम लिहितां येतात ही मोठी नवलाची गोष्ट आहे. त्यांची भाषा साधी, प्रौढ, विवेचक पण सश्रद्ध अशी आहे.

## संपूर्ण भूषण

श्रीशिवाजी महाराजांच्या वेळीं त्यांचा प्रतापसूर्य भरतखंडाच्या मध्यान्हा-वर तळपत असतांना त्यांच्या गुणांनीं आकर्पिलेला भूपणनामक हिंदी कवि उत्तरे-कडून येऊन कांहीं काळ त्यांच्या आश्रयास येऊन राहिला होता. हा कवि विद्वान् व साहित्यशास्त्रांत निष्णात होता. यानें शिवचरित्रपर हिंदी भाषेंत सुंदर कविता केलेली उत्तर हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. मराठी भाषा जाणणारांसही त्या कवि-तेचा लाभ करून घ्यावा या हेतूनें भूपणची सर्व शिववर्णनपर कविता मराठी भाषांतरासह अवश्य त्या टीपा देऊन रा. रामचंद्र गोविंद काटे यांनीं तयार केली व ती प्रस्तुत पुण्याच्या भा. इ. सं. मंडळाच्या पुरस्कारानें प्रसिद्ध झाली आहे. मराठी वाचकांवर, काव्यरसिकांवर व विशेषतः मराठ्यांच्या इतिहासाची आस्था बाळगणाऱ्या सर्व लोकांवर रा. काटे यांनीं प्रस्तुत ग्रंथ काळजीपूर्वक छापावयास देऊन उपकार केले आहेत. भूपण कवि हा महाराजांचा समकालीन व त्यांच्या संगतींत काळ घालविणारा असल्यामुळें त्यांनीं गायिलेल्या शिवगुणवर्णनास ऐति-हासिक महत्वही फार आहे. प्रस्तुत ग्रंथांत भूपण कवीचें 'शिवराजभूपण' हें ३८२ पद्यांत वर्णिलेलें शिवगुणगौरव छापलें असून शिवाय त्याची 'शिवाबावनी' 'छत्रसाल दशक' व 'फुटकर कविता' ही सार्थ छापली आहे. शिवाबावनींतलें:-

> कासी हू की कला जाती मथुरा मसीत होती।
> सिवाजी न होतो तो सुनति होति सबकी ॥

ह्म० शिवाजी झाला नसता तर काशीक्षेत्राची कला जाती, मथुरेची मशीद झाली असती व सर्वांची सुन्ता झाली असती; हें पद्य प्रसिद्ध आहे. पुस्तक उत्तम आहे. किं. १।८

# श्रीगुरुकरुणामृत.

( ले० बाबासाहेब दातार, हैद्राबाद )

पुरी कामना एकही नाहिं झाली । हरीची कथा नाहिं कानासि आली ।
खरी संतप्रीती न कांहीं मिळाली । बुरीप्रीति देहा भिऊनी पळाली ॥१५॥
न माणूस तो शापिती लोक ज्याला । चिरी मान या भीतिनें मान झाला ।
दयेनें दिला ग्रास जो याचकाला । त्वरें कल्पवृक्षापरी दे फळाला ॥१६॥
अशा घोरलोकीं शहाणा कशाशी । धनादौलतीची मना देत फासी ।
निजे घेउनी जी तिजोरी उशासीं । तयाचीं हडें पुत्र फेकी विदेशीं ॥१७॥
असे मान्य प्रामाण्य हा वेद बोल । परी त्यांतही शोधिती सार फोल ।
गुरू शद्ब एकैक ऐसा अमोल । सदा सारअर्थें घनानंद खोल ॥ १८ ॥
फिरे मागुता ऐस तूं का कसाही । जरी पातकी घोर माघार घेई ।
कुणाही निराशा गुरूदारिं नाहीं । अनंतापराधी तरी लाग पायीं ॥१९॥
तुझा लाडका तो सदा मस्त राहो । पिसा तामसा लोकनिंदाहि साहो ।
हुशारींत चिंता नवा हो न वाहो । तुझे धुंदिमाझारिं होणार होवो ॥२०॥
बऱ्यावाइटाचा धनी राम प्यारा । कृपासाउली देत दासा सहारा ।
धरूं प्रेम ना जी विकूं कर्मभारा । नसेकाज पुण्यासवें त्या उदरा ॥२१॥
गुरूमाउले! एकदा देख दीना । हरी ताप या हीन संतप्त मीना ।
घनानंद तू अमृताचा खजीना । मला भेट कीं मी मरे तूज वीना ॥२२॥
वियोगें मला भग्निजे कीं समूळीं । सुयोगें पदीं ठेवि कीं पायधूळीं ।
कळेना विनंती तुला जे करावी । हितज्ञा तुला आवडे तेंवि ठेवी ॥२३॥
बहू चांगली ही मला वर्णव्यक्ती । सुवाचा स्मृती धारणा बुद्धि शक्ती ।
कळेना घटीं मृत्तिकेच्या कशाला । मला चित्रिता वेंचिले कौशलाला ॥२४॥
न जाई तिथें धूम केल्या तपाचा । नसे लाभही तेथ या संचिताचा ।
विकारी मला ठेविले नांव जेणें । मुळीं लेशही तो विकारासि नेणे ॥२५॥
गुरू ऊठ ये जीव ब्रह्मासि जोडी । स्वरूपीं तुझें चित्तग्रंथीसि सोडी ।
त्वरें पाजि माते घडा अमृताचा । घडा जों घडीजे न या मृत्तिकेचा ॥२६॥
शवा माझिये स्नापिजे पादगंगा । गुरूपादरेणूंत चर्चा मदंगा ।
मला भेटण्या जे तुम्ही इच्छितासा । गुरुद्वार धूळींत मातें तपासा ॥२७॥
तुझे संन्निधीं दुःखही सौख्य झालें । वियोगें सराटे मनीं पेरियेले ।
जगाचें कडू तें तुवा गोड केलें । तुझेवीण कैवल्य ही व्यर्थ झालें ॥२८॥

चुकेना कुणा हा कळीकाळ खाया । तनाची धनाची दुराशाचि वाया ।
उपायागुणें वाढवीसी अपाया । अपायाचि सोसी न धुंडी उपाया ॥२९॥
अतीनम्रते पाविजे भाविकाला । पदा सोवितां लाहिजे चित्सुखाला ।
तुकेना गयाकोटि एका मनाला । गया कासया तोषवी सज्जनाला ॥३०॥
घडीही तुझी रामनामासि प्यावें । गतायू मिळेना स्वरूपीं मिळावे ।
जगाची गतीं ही स्मशानांत जावे । अहोरात्र तूंही स्मशानीं रहावें ॥३१॥
तुझे प्रेम चित्तांत जेव्हा उफाळे । मदें जीव आनंददोंदांत लोळे ।
उभ्या रिद्धिसिद्धि क्षणाचेनि वेळें । तुझें रूप नेत्रांत साक्षात खेळे ॥३२॥
शिवा दे मला एवढ्या प्रेमरंगा । शवा जाळिता जे न सोडी मदंगा ।
चिताभस्म ते चर्चुनी तूं निजांगा । मदें नृत्यगीतें करावासी दंगा ॥३३॥
कितीदा तुला प्रार्थिले मुक्तराजा । निजा शोध तूं शोध घेऊनि माझा ।
अहोरात्र ही घोर निद्रेंत जाई । मला तूं तुला मी न स्वप्नींहि पाहीं ॥३४॥
बका बोलिला एक संतप्त मासा । फिरे जै नदी होय कीं सिंधु खासा ।
वदे येरु जै रांधिले जाऊ मी तूं । तरी विश्वसिंधू मृगांबूहि हो तू ॥३५॥
पुरे हा मला श्रीगुरुमायसंग । तनूभाव टाकूनी झाले निसंग ।
क्रिया सद्गुरूसागरीचे तरंग । गुरू मन्मनीं मी गुरू अंतरंग ॥३६॥
गुरूमाउलीवीण नेणोचि आन । तनुप्राण जीवोत प्रेमी गहाण ।
नसे भोगभोक्षादिकांची तहान । अह्मी मुक्त तेजापभूवायुहून ॥३७॥
तुझे पाय चुंबू सुखें सौख्यदीपा । न चुंबू मुखीं अप्सरांच्या कलापा ।
सदा कास तूझी धरीली करें पा । तुझे पाउलीं घालती पाय खेपा ॥३८॥
शिरा वाहिलें माउलीचे सुबोला । प्रसन्नामुखीं लोण केले जिवाला ।
स्वयें माउली चाखवी प्रेमप्याला । मला देखुनी दूभते कीं सुखाला ॥३९॥
श्रुतीशास्त्र माझे स्तुतीचा पुकारा । मला आण ही, सेविजे प्रेमसारा ।
जगीं जीव मी देव सर्वासि प्यारा । जगाकार हा देह माझाचि सारा ॥४०॥
अरे क्रूर काला विलाशासिमूला । मुळीचाचि निष्ठूर अन्यायशीला ।
अगे भूमिके तूं बहू नाश केला । धुळी तूं दिले संतरत्न अमोला ॥४१॥
दिनें एक दो जात आयुष्य वेंची । जसी जंगली वाहटूळी हवेची ।
करी मी न चिंता कधी दो दिसाची । दिना ना अल्याची दिना गेलियाची ॥४२॥

---

# वीरशैवांचा लिंगायतपंथ.

शैव आणि वैष्णव दोन्ही उपासनापंथ वेदकालापासून चालत आले आहेत. एखाद्या प्रांतांत वैष्णवांचें प्राबल्य असतें तर एखाद्यांत शैवांचें असतें, एकाच प्रांतांत एका वेळीं वैष्णवांचें तर दुसऱ्या वेळीं शैवांचें असतें, फार काय पण एकाच घराण्यांत एक भाऊ शिवाचा उपासक असतो तर एक विष्णूचा असतो. कर्नाटकांत वीरशैव लिंगायतांचा एक नवीन पंथ १२ व्या शतकाच्या अखेरीस उत्पन्न झाला. कल्याणीचा शेवटचा चालुक्य राजा तैलप (इ० स. ११५०–११८२) याचा सेनापति बिज्जल नांवाचा एक कलचूरी क्षत्रीय होता. त्यानें आपल्या स्वामीविरुद्ध बंड पुकारलें व अण्णेगिरी येथें एक छोटेसें संस्थान उभारलें. त्यानें इ० स. ११६५ मध्यें तैलपराजावर स्वारी करून कल्याण बळकावलें व तेथेंच स्वतंत्र राज्य स्थापिलें. तैलपाचा मुलगा सोमेश्वर यानें ५।७ वर्षें थोडी गडबड केली पण तें राज्य कायमचें बुडालें. बिज्जलाचा प्रधान बलदेव याचा भाचा बसव यानें लिंगायतपंथाची स्थापना केली. बिज्जलानें जैनपंथ स्वीकारल्यामुळें बसवास राग आला. जैन पंथाचा पाडाव करून शिवोपासना प्रचलित करण्याच्या हेतूनें बसवानें आपला पंथ काढला. बसवाचा भाचा चेन्नबसव यानें हा पंथ वाढविला. जैनांचे व जंगमांचे तंटे सुरू झाले व या तंटयांतच इ० स. ११६७ मध्यें बिज्जल मारला गेला. बिज्जलाच्या सोमेश्वरनामक मुलानें १० वर्षें व संकटनामक नातवानें ७ वर्षें राज्य केलें, आणि शेवटीं तेही बुडाले. कलचूरीचें राज्य ११६० ते ११८४ पर्यंत २४ वर्षें टिकलें. पण त्याचे राजवटींत लिंगायत–पंथाचा उद्गम झाल्यामुळें त्याला महत्व आलें आहे. तेव्हां वैश्यवर्ग जैनपंथानुयायी झाला होता पण लिंगायतपंथाच्या उदयामुळें तो लिंगायतमताचा झाला, नास्तिक पंथांतून सुटून तो आस्तिकमार्गांत आला. कारण वीरशैवपंथ वैदिक असून शिवाचा उपासक आहे. कलचूरी बंडामुळें जैनपंथ बळावला होता पण त्याला या लिंगाय–तपंथानें चांगलीच थप्पड दिली. शिवाचें स्वरूप रुद्र आणि मंगल आहे, शिव भोळा आणि वरदराज आहे, व शिवोपासना वैदिक आहे, तसेंच शिवाची उपासना मूर्तिध्यान व लिंगपूजा या उभय प्रकारानें होते. पुढें पुढें शिवोपासनेच्या मार्गांत अनेक आगम, मंत्रतंत्र वगैरे निर्माण होऊन एक पंथ केवळ शक्तीलाच भजणाऱ्या शाक्तांचा झाला. शिवोपासनेंत एकांत, वैराग्य व तपश्चर्या या तीन गोष्टींना अति–शय महत्व आहे. असो. लिंगायतपंथाचा संस्थापक ब्राह्मण होता, तरी वर्णाश्रमधर्माकडे त्यानें लक्ष दिलें नाहीं. किंबहुना जातिभेदाच्या तो विरुद्ध होता असेंच दिसतें. उद्योग करून प्रत्येकानें चरितार्थ चालवावा, भिक्षा मागूं नये, अहिंसा हा

परमधर्म मानावा, 'कायकानें' ह्म० कर्मानें कैलास ह्म० मोक्ष मिळेल यावर श्रद्धा ठेवावी, शिवाचें पवित्र लिंग प्रत्येकानें शरीरावर धारण करावें, असें अगदी साधे नियम त्यानें आपल्या अनुयायांस घालून दिले. संन्यास व भिक्षा या दोन्हीं गोष्टी त्यानें त्याज्य ठरविल्यामुळें शेतकरी व वैश्य लोकांत त्याच्या मताचा प्रसार विशेष झाला. जैन वादप्रिय असत, यानें वाद बंद करून टाकला. कानडी भाषेंत लोकांना सुलभवचनांनीं उपदेश केला. हे लिंगायतांचे आगम ग्रंथ मानतात. लिंगायत वेदप्रामाण्य मानतात, पण त्यांचे आगमग्रंथ त्यांना अधिक प्रिय आहेत. ते आचार्य व जंगम यांना ब्राह्मणांसारखे पूज्य मानतात. जंगम अविवाहित असतात. रजस्वला स्त्रियांचा ते विटाळ धरीत नाहींत, व त्यांनाही कौमारपणीं एक प्रकारचा उपनयन संस्कार करितात, या दोन गोष्टी त्यांच्यांत विशेष, आहेत. 'ॐ नमः शिवाय' हा त्यांचा महामंत्र आहे. वीरशैव ह्म० कट्टे शैव, शिवावांचून अन्य देव न मानणारे व शिवालिंग धारण करणारे. हे लिंग त्यांच्यांत पुरुषांप्रमाणें स्त्रियाही धारण करितात. लिंगायतांचे धर्मगुरु जंगम हे लिंग मस्तकावर बांधतात. ते प्रेतें जाळीत नाहींत, त्यांच्यांत जातिभेद नाहीं, विधवाविवाह त्यांना मान्य आहे, इत्यादि गोष्टी पाहिल्या ह्मणजे १२ व्या शतकांतला हा एक सुधारकी पंथ आहे असें वाटतें. त्यांच्या धर्मग्रंथांत २८ शैवागम आहेत. बसवानें पदस्थलवचन, बालज्ञानवचन, सच्चरित्रवचन, राजयोगवचन व मंत्रगोप्य असे पांच ग्रंथ कानडीभाषेंत लिहिले आहेत. लिंगायत हे तामीळांतील ६३ शैवसाधूंना मानतात, पण त्यांतही आठ जे कट्टर शैव आहेत त्यांना विशेष मानतात. लिंगायतांचे पांच मुख्य मठ असून एक बद्रिकेदार येथें व एक काशी येथें आहे आणि तीन दक्षिणेंत आहेत. हे वेद मानतात पण वेदाचें कर्मकांड मानीत नाहींत व यांच्यांत अग्नीची उपासना नाहीं. संस्कारांपैकीं दीक्षाग्रहण, विवाह व उत्तरक्रिया हे तीनच संस्कार मानतात, व यांचे संस्कारांचे मंत्र वैदिक नसून आगमोक्त असतात. चित्तशुध्दीनें सर्व पातकांचा नाश या जन्मींच करितां येतो, त्यासाठीं पुनर्जन्म घ्यावा लागत नाहीं असें यांचें मत आहे.

---

# सार्थ मनोबोध.

श्रीसमर्थांच्या मनाच्या श्लोकांची सर्वमान्यता प्रसिद्धच आहे. रा. पांगारकरांनीं यांत मनाचे श्लोक सार्थ दिलेच आहेत, पण प्रारंभीं मनालाच बोध करण्यांत मनाचें स्वरूप दर्शविलें आहे. सर्व श्लोकांची संगति लावून त्यांचें वर्गीकरण केलें असून श्लोकांचा अर्थ समर्थांच्या एकंदर ग्रंथांच्या दृष्टीनें चोख लावला आहे. किं. ७१२

# ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य.

## अध्याय पंधरावा.

पंधराव्या अध्यायांत अश्वत्थवृक्षाच्या रूपकानें संसाराची ह्म० सृष्टीची दृश्य-भासात्मक नश्वरता वर्णिली असून पुढें अविनाशी अशा उत्तम पुरुषाचा ह्म० परमात्म्याचा योग सांगितला आहे. आत्मज्ञानाच्या दृष्टीनें हा अध्याय अत्यंत महत्वाचा असून वैराग्याच्या भूमिकेवर येथें आत्मज्ञानाची दिव्य इमारत उभारली आहे. 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' ह्म० ज्ञानानें मोक्ष होतो हा सिद्धांत असून त्या ज्ञानाला वैराग्याची उशी देण्यासाठीं प्रथम अश्वत्थाचें (पिप्पल, पिंपळ) संसारावर रूपक केलें आहे. 'विरक्तीवांचूनि कहीं। ज्ञानासी तगणें नाहीं' आतां तें वैराग्य उत्पन्न व्हावें कसें? 'संसारा या समस्ता। जाणिजे जैं अनित्यता। तैं वैराग्य दवडितां। पाठीं लागे' ॥ ३९ ॥ संसार अनित्य, नाशवंत आहे हें चांगलें ओळखलें कीं वैराग्य सहज येतें, व वैराग्यानंतरच ज्ञानाची प्राप्ति होतें. स्वरूपस्थितीच्या आड हा विश्वाभास येतो. विश्वाभासाचें नश्वरत्व मनावर पुरें बिंबलें कीं जीव अविनाशी सुख शोधूं लागतो व शोधांतीं तें त्याला आपल्याजवळच मिळतें, आपणच तें आहोंत हें कळून येतें. संसार हा अश्वत्थ आहे,—'न श्वः तिष्ठति'--आज आहे उद्यां नाहीं--असा क्षणभंगुर आहे व त्याला अव्ययही ह्मटलें आहे. दिवसामागें दिवस, वर्षामागें वर्ष, एका मन्वंतरामागें दुसरें मन्वंतर, एक देह गेला दुसरा आला, एकवंश संपला दुसरा उद्भवला, 'हा संसारवृक्ष ऐसा। मोडत मांडत सहसा। न देखोनि लोक पिसा। अव्यय मानी' ॥ १३८ ॥ मेघाच्या तोंडानें समुद्र एका अंगानें उपसला जात असतो व दुसरीकडे नद्या जळाचे लोट घेऊन त्यांत पडतच असतात. या वृक्षाचें होणें जाणें अतिशय जलद चालतें ह्मणून त्याला भ्रमानें लोक अव्यय ह्मणतात! हा 'ऊर्ध्वमूल व अधःशाख' आहे असें ह्मटलें आहे. या वृक्षाचें ऊर्ध्व कोणतें? ज्याला अधऊर्ध्वमध्य कांहीं नाहीं, जें ज्ञातृज्ञेयविहीन ज्ञप्तिमात्र आहे, जें सूक्ष्मतम व सुखस्वरूप आहे, जें एकमेवाद्वितीय आहे, 'ऐसें वस्तु जें साचें। तें ऊर्ध्व गा यया तरूचें!' आतां या वृक्षाचें ऊर्ध्वमूळ कोणतें?

'स्वरूपीं जाली माया। आणि स्वरूप नेणणें जें धनंजया। तेंचि तरु यया। मूळ पहिलें' ॥ १८७ ॥ वस्तूला आपला जो अबोध, ज्याला अनादि माया ह्मणतात, तेंच या अश्वत्थवृक्षाचें मूळ आहे. आपला आपल्याला विसर (अज्ञान) तेंच भवद्रुमाचें बीज आहे. स्वस्वरूपाची विस्मृति हा बीजभाव, सुषुप्ति हा अंकुरभाव व जागृतिस्वप्न हा फळभाव--असा हा संसारवृक्ष आहे. आतां हा अधःशाख कसा? माया-महत्तत्व--त्रिगुणात्मक अहंकार--बुद्धि--मन-- श्रोत्रादि ज्ञानेंद्रिय--कर्मे-

द्रियें, पंचभूतें अशा क्रमानें तो खालीं खालीं वाढतच जातो. असो, अज्ञान ज्याचें मूळ असा हा संसार क्षणिक आहे हें जो यथार्थ जाणतो तोच ज्ञाता होय. या भववृक्षाचें छेदन करून महात्मे भवपार कसे जातात? वस्तुतः हा भववृक्ष उप-- टण्याचे श्रमच काय आहेत? बाळाचें बागुलाचें भय घालविण्यासाठी काय बागु-- लाला देशोधडी करावा लागतो? 'गंधर्वदुर्ग काय पाडावे। काय शशविषाण मोडावे? होआवे---मग तोडावें। खपुष्प कीं!' ॥ २१४ ॥ संसारवृक्ष हा मुळींच नाहीं मग त्याच्या उन्मूलनाची भीति कशाला? हा जर खरोखर असता तर कोण मायेचा पूत याला उन्मळूं शकतां? मग याची वाटत असलेली भीति जाईल केव्हां? ह्मणाल तेव्हां! जाग आल्यावर स्वप्न कुठें राहतें? 'तैसा जंव पार्था। विवेक नुगवी माथा। तंव अंत नाहीं अश्वत्था। भवरूपा यया!॥ २२६ ॥ मूळ बीज जें अज्ञान त्याला खाऊन टाकणारें ज्ञान प्रगट होतांच भववृक्षाचा अंत होतो. अज्ञान जायला एका ज्ञानावांचून दुसरा उपाय नाहीं, ह्मणून' मूळचि छेदी। सम्यक् ज्ञानें? अहंद्वंद्वरहित असें आपलें स्वरूप आपणच पाहिलें पाहिजे. 'ह्मणोनि स्वप्नीचिया घाया। औषध चेवोचि धनंजया। तेवीं अज्ञानमूळा यया। ज्ञानचि खड्ग' ॥ २५३ ॥ 'न रूपमस्येह' - असंगशस्त्रेण दृढेन छित्वा'--त्या भववृक्षाला रूप नाहीं, आदिमध्यअंत कांहीं नाहीं, त्याचें भयच नको, त्याचा आपला कांहीं संबंध नाहीं या निश्चयशास्त्रानें त्याचा छेद करून जेथें गेल्यावर पुन्हां मागें येणें नाहीं अशा शाश्वतपदाचा अंगीकार करावा. जेथून हा विश्वाभास उगवला त्या आद्य पुरुषाला–पुरुषोत्तमाला शरण रिघावें.

आद्य पुरुषाच्या स्वरूपीं समरस होणाऱ्या संतांच्या अंगीं 'निर्मानमोहाजित- संगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः' इ० गुण असावे लागतात --असतातच, तेव्हांच तें अव्यय (शाश्वत) पद मिळतें. त्या शाश्वतपदाचें थोडेसें स्वरूप दर्श-- वितात. "जयाच्या प्रकाशीं। जग हारपे चंद्रार्केसीं। सचंद्रनक्षत्रें जैसीं। दिनो-- दयीं' ॥ ३१४ ॥ लवणाची कुंजरी। सूदलिया लवणसागरीं। होयचि ना माघारीं। परती जैसी ॥ ३१८ ॥ तेवीं मजसीं एकवट। जे जाले ज्ञानें चोखट। तया पुनरा-- वृत्तीची वाट। मोडली गा ॥ ३१९ ॥" चंद्रसूर्य अग्नि त्याला प्रकाशित करूं शकत नाहींत, इतकेंच काय पण त्यांच्यासगट सारें विश्व त्याच्या प्रकाशांत लोपून जातें, लवणाची कुंजरी सागरांत सोडली तर मागें परत येत नाहीं त्याप्रमाणें त्याशीं शुद्ध ज्ञानानें एकरस झालेले जीव पुन्हां जन्ममरणाच्या फेऱ्यांत येत नाहींत. 'यद्गत्वा न निवर्तंते'–जेथें गेलें असतां परत फिरणें नाहीं असें परब्र-- ह्माचें शाश्वत स्थान--'परम धाम' सांगतांना एकदम् पुरुषोत्तमयोगच सांगाव--

याचा, पण मध्येंच जीवाची भासमान उत्क्रांति सांगून मग देव तिकडे वळणार आहेत. ज्ञानाच्या दृष्टीनें पाहतां संत 'मज अभिन्नचि ते किरीटी' आहेत, किंबहुना वस्तुविचारें पाहतां 'कैचें मज एकासी दुसरें'--परब्रह्मावांचून दुसरें कांहींच नाहीं. असें आहे 'तर जीवलोक 'ममैवांशो'--माझा अंश आहे असें कां ह्मटलें आहे? जीव मी देह आहे--'देहोहं'--असें अज्ञानास्तव ह्मणतो ह्मणून त्याला निजरूपाची ओळख देण्यासाठीं तूं देह नाहींस तर माझाच अंश आहेस असें मी ह्मणालों 'एऱ्हवीं कैचे अंश। अविक्रिया एका मज?'--मला अविक्रियाला अंश कसचे? मी अंशांशीभावरहित एकीएक आहें. 'उपजणें निमणें। हें साचचि जें कां मानणें। तो जीवलोक मी ह्मगे। संसार हन' ॥ ३४७ ॥ मी जन्मतों, मी मरतों, मी जन्ममृत्युवान् आहे अशी जी कल्पना तिलाच मी जीवलोक किंवा संसार ह्मणतों, कल्पना सोडून पाहिलें कीं मी एकमेवाद्वितीयच आहे. चंद्र आकाशांत निर्लेप असून उदकांत प्रतिबिंबित नाहीं कां होत? 'पै काश्मीराचा रवा। कुंकुमावरी पांडवा। आणिका गमे लोहिवा। तरी तो नव्हे' ॥ ३४९ ॥ स्फटि--काचा खडा कुंकवावर ठेवला तर तो तांबडा दिसतो पण तसा तो वास्तविक नसतो. 'तैसें अनादिपण न मोडे। माझें अक्रियत्व न खंडे। परी कर्ता भोक्ता ऐसा आवडे (वाटे)। ते जाण गा भ्रांति' ॥ ३५० ॥ जीव तत्वतः मत्स्वरूप असून 'मनेसीं साहीं इंद्रियें। श्रोत्रादि प्रकृतिकार्यें। तियें माझीं ह्मणौनि होये। व्यापारारूढ' ॥ ३५२ ॥--मन आणि पांच सूक्ष्म इंद्रियें हीं प्रकृतीचीं कार्यें असून तीं माझींच आहेत असें ह्मणून जीव व्यापार करितो (सूक्ष्म किंवा लिंगशरीर धारण करितो) व एखाद्या शरीरांत शिरून अहंकर्तृत्वानें विषयांच्या रानांत शिरून उगाच गोंधळ घालतो आणि त्या शरीरांतून निघून जातांना पुन्हां वरील षट्क (मन व पंचेंद्रियें) बरोबर घेऊन जातो, मग कान, डोळे, त्वचा, जीभ व नाक तसेंच मन यांच्या आश्रयानें विषयांचा उपभोग घेतो. हें सारें प्रकृतीचें कार्य जीव स्वतःवर व्यर्थ ओढून घेतो. जीव 'आला गेला' ही भाषा व्यर्थ आहे, तो येत नाहीं आणि जात नाहीं! पण हें ज्ञात्यांशिवाय कोणी ओळखीत नाहीं. देहाचे गांठोडें उभें असलें व त्यांत चेतना वळवळ करीत असली व त्यामुळें इंद्रियें आपापला विषयस्वार्थ पाहत असलीं ह्मणजे 'आला' ह्मणतात व 'चेतना' जाऊन कार्य थंड पडलें ह्मणजे गेला ह्मणतात (चेतना ह्मणजे चैतन्य किंवा आत्मा नव्हे. चेतना ह्म० जडदेहांतली प्राणांची चळवळ क्षेत्राच्या (३६ तत्वांतील हें एक तत्व आहे.) वृक्ष डोलत दिसला तर वारा आहे असें मानावें आणि वृक्षच नसला तर काय तो नाहीं असें ह्मणायचें? 'कां आरसा समोर ठेविजे। आणि आपणपें

तेथ देखिजे । तरी तेधवांचि काय जालें मानिजे । आधी नाहीं ? ॥ ३७७ ॥ कां परता केलिया आरसा । लोप जाला तया आभासा । तरी आपणपें नाहीं ऐसा । निश्चय करावा ? ॥ ३७८ ॥' देह आला गेला तरी आत्मसत्ता अविक्रिय आहे पण हें मोहामुळें अज्ञान्यांना कळत नाहीं. घटमठ घडले व मोडले तरी 'आकाश तें संचलें । असतचि असे.' विश्वात्मा सूर्यचंद्राग्नींना तेज पुरविणारा 'एक मी समस्तीं । व्यापक असे भूतजातीं' पण देहाभिमान सोडून व' दृश्यतादात्म्य सोडून पूर्ण वैराग्य लाभल्यावरच हें कळणार आहे. पृथ्वीच्या पोटांत शिरून सर्व भूतें धारण करणारा, चंद्रकिरणांच्या द्वारें 'सर्वौषधींचे आगर' भरून धान्यजाती पिकवणारा व प्राण्यांच्या पोटांत वैश्वानररूपानें चतुर्विध अन्न पचविणारा एक मीच आहे, अधिक काय सांगावें, 'येथ दुजें नाहींचि घेई । सर्वत्र मी गा' या विश्वांत माझ्यावांचून दुसरें कांहीं प्राणी सुखी व कांहीं दुःखी कां दिसतात' असी शंका कोणी काढील तर त्यास उत्तर असें आहे कीं प्राण्यांच्या बुद्धि शुद्ध किंवा मलिन असतात ह्मणून हा भेद दिसतो! आकाश एकच असून भिन्नभिन्न वाद्यांच्या ठीकाणीं विविध नाद उत्पन्न होतात; सूर्य एकच असून तो नाना लोकांच्या नाना चेष्टांच्या उपयोगी जातो, अगर एकच पाणी धर्मानुरूप अनंत वृक्षवेलींत विविध रसांच्या परिणामाला पावतें; त्याप्रमाणें माझें (परमात्म्याचें) स्वरूप एकच असून निरनिराळ्या प्राण्यांच्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारांनीं दिसतें. दोन पदरांचा नीलमण्यांचा हार अज्ञान्याला सर्प भासून भीति उत्पन्न करितो व ज्ञान्याला सुख देतो, 'हें असो स्वातीचें उदक । शुक्तीं मोतीं (व) व्याळीं विख । तैसा सज्ञानांसी मी सुख । दुःख तों अज्ञानासी' ॥ ४२० ॥--स्वातीचें पाणी शिंपींत पडलें तर मोती बनतें व सर्पांत विष होतें, तसा ज्ञान्याला परमात्मा सुखस्वरूप व अज्ञान्याला दुःखरूप आहे. सर्वांच्या हृदयांत स्फुरणारा मीच आहे. 'सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टः–' येऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं । मी अमुका आहे ऐसी । जे बुद्धि स्फुरे अहर्निशीं । ते वस्तु गा मी.' संतगुरुंच्या संगतीनें ज्यांचा 'अहं' आत्मरूपीं विश्राम पावतो ते ब्रह्मत्वानें सदा सुखी असतात, पण असा स्मरणदाताही मीच आहे आणि विस्मृति देणारा तरी मजवांचून दुसरा कोण आहे? विस्मृतिमुळे जे शरीरपर होतात, संसारगौरवांतच दंग राहतात, देहांत ज्यांचा 'अहं' बुडून जातो, ते दुःखी असतात. प्राण्यांच्या जागृतीला किंवा निद्रेला कारण जसा मूळचा जागेपणाच आहे त्याप्रमाणें जीवांच्या स्मृतिविस्मृतीला (ज्ञानाज्ञानाला) कारण मीच आहे 'अभ्रें दिवस हारपला तो दिवसेंचि जाणों आला.' मला जाणण्यांत ज्ञान व सुख, मला नेणण्यांत अज्ञान व दुःख - 'एवं निद्रा कां जागतिया । प्रबोधचि हेतु धनंजया । तेवीं ज्ञानां अज्ञानां जीवचिया । मीचि मूळ' ॥ ४३० ॥

ह्या पंधराव्या अध्यायाचें नांव '**पुरुषोत्तमयोग**' आहे यावरून यांत पुरुषोत्तमाचा विचार मुख्यतः सांगितला आहे हें उघड आहे. 'उत्तम पुरुष' हा शब्द पाहतांच दुसरे कोणी कनिष्ठ पुरुष आहेत कीं काय असा साक्षेपतेनें सहजच विचार मनांत येतो. आहेत, पण मग हे कनिष्ठ पुरुष कोण? 'द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एवच '-क्षर पुरुष आणि अक्षर पुरुष. हे कनिष्ठ आणि यांच्यांहून श्रेष्ठ तो उत्तम पुरुष किंवा पुरुषोत्तम. आतां हे क्षर आणि अक्षर पुरुष आधीं कळलें ह्म० यांचा निरास झाला कीं उरला तो उत्तम पुरुष! परतंत्र, उपाधींत सांपडलेला, आद्यंत असलेला तो कनिष्ठ व स्वयंभु, निरुपाधिक व अनाद्यनंत तो उत्तम–क्षर व अक्षर हे उपाधिगत आहेत व पुरुषोत्तम निरुपाधिक आहे. अर्जुनानें 'निरुपाधिक आपलें। रूप सांगा' असा प्रश्न केला असतांना भगवान् तें न सांगतां सोपाधिक अशा क्षराक्षरांचा विचार सांगण्यास प्रवृत्त कां झालें? अर्जुन विचारीत आहे निरुपाधिक रूप आणि देव सांगूं लागले सोपाधि क्षराक्षर! हा असंबद्धपणा आहे असें कोणास वाटेल ह्मणून ज्ञानेश्वर दृष्टांतमिषानें सांगतात कीं 'ताकाचे अंश फेडणें। तयाचि नांव लोणी काढणें '-ह्म० लोणी हवें तर दहीं घुसळून ताक वेगळें करावें लागतें तेव्हांच लोणीं हातीं येतें! शुद्ध सोनें पाहिजे तर हिणकस आधी जाळणें प्राप्त होतें, पाणी घेण्यासाठीं शेवाळ दूर करावें लागतें–पाणी सिद्धच आहे. ढग दूर केले कीं आकाश स्वयंभू आहेच, त्या प्रमाणें उपाधि दूर करणें ह्मणजेच निरुपाधिक पावणें आहे. 'जैसें न सांगणेवरी। बाळा पतीसी रूप करी। बोल निमालेपणें विवरी। अचर्च्यातें' ॥ ४६६ ॥–एखाद्या नवीन लग्न झालेल्या वधूला वेगवेगळ्या पुरुषांचीं नांवें घेऊन 'हा तुझा पति काय?' असें विचारलें कीं 'नाहीं नाहीं' ह्मणून ती सांगत असते, पण पतीच्या खऱ्या नामोच्चाराबरोबर लज्जेनें मान मुरकते व याप्रमाणें आपल्या पतीची ओळख करून देते, त्याप्रमाणें स्थूलसूक्ष्म प्रपंच यांतला कोणता परमात्मा आहे असें विचारतांच श्रुतिवधू 'तन्न तन्न' किंवा 'नेति नेति' असें निषेधमुखानें स्पष्ट सांगते, पण परमात्म्याच्या प्रत्यक्ष स्वरूपलक्षणप्रसंगीं मौन धरिते व मौनानेंच परमात्मस्वरूप सुचविते। [ह्याच अर्थानें अनेक स्थळीं 'वेद वानूनि तंवचि चांग। जंव न देखे तुझें अंग' (१४–११,) 'जो सर्व नेणिवां जाणिजे। मौनाचिया भिंठिया वानिजे (१६–१९,) 'मौन गा तुझें राशीनाव। आतां स्तोत्रीं के बांधूं हांव' (१७-१०) 'स्तुति कांहीं न बोलणें' (१८--२५) असें ज्ञानेश्वरांनीं ह्मटलें असून देव मौनावांचून कोणतेंच लेणें अंगावर घेत नाहीं असें त्या निरुपाधिक परब्रह्माबद्दल स्पष्ट सांगितलें आहे.] तात्पर्य उपाधिनिरासांतच निरुपाधिकाची ओळख पटते ह्मणून

क्षर व अक्षर या उपाधींच्या निरासानें उर्वरित वस्तु पुरुषोत्तम आहे असें सांगतात. कसें तें आतां पाहूं. ह्या विश्वप्रपंचरूप नगरांत क्षर आणि अक्षर ह्या दोन पुरुषांची वस्ती आहे. आणिक एक तिसरा पुरुष आहे पण ' तो या दोहींचें नांव न साहे '--तो उगवतांच या दोघांनांही खाऊन टाकतो! प्रथम पहिल्या दोघांचा विचार करूं--क्षराक्षर या दोघांनीं हा सारा संसार कोंदला आहे. महत्तत्वापासून तों तृणाग्रापर्यंत सारी नामरूपात्मक पांचभौतिक सृष्टि हें संपूर्ण साकार जग व त्याशीं भ्रमानें तादात्म्य पावणारें जीवचैतन्य ह्या उभयाला ( स्थूलसूक्ष्माला ) क्षर पुरुष असें ह्मणतात. [ ह्याचें वर्णन पूर्वीं ७ व्या अध्यायांत श्लोक ४ व ५ मध्यें केलें आहे. ' आप तेज गगन । मही मारुत मन । बुद्धि अहंकार भिन्न । आठै भाग' (७--१८ ) पृथ्वी, आप, तेज, वायु आकाश हीं पंचभूतें व मन ( रज, ) बुद्धि ( सत्व ) व अहंकार ( तम ) ही अष्टधा प्रकृति--हिला अपरा प्रकृति ह्मटलें असून तिला चेतविणारी ती जीवभूत परा प्रकृति असें ह्मटलें आहे. परा व अपरा मिळून स्थूलसूक्ष्मप्रकृति असें जिचें तेथें वर्णन केलें आहे तोच हा क्षर पुरुष. हेंच १३ व्या अध्यायांत श्लोक ५।६ मध्यें ३६ तत्वात्मक क्षेत्रक्षेत्रज्ञांच्या रूपानें सांगितलें आहे व प्रस्तुत अध्यायांत अश्वत्थाच्या रूपकानें तेंच सांगितलें आहे. ] असो क्षर पुरु--षाचें रूप सांगितलें, आतां अक्षराचें सांगतात.

सर्व स्थूल व सूक्ष्म सृष्टि क्षरांत आली. जागृति व स्वप्न या अवस्था क्षरांतल्या. तिसरी जी सुषुप्ति अवस्था आहे ती दुसऱ्या अक्षर पुरुषाची उपाधि आहे. तिला 'घन अज्ञान सुषुप्ति '–गाढ अंधकार, पूर्ण अज्ञान असें ह्मणतात. तिच्यांतून (गाढ निद्रेतून) जीव-चैतन्य स्थूलसूक्ष्मांत येऊन जागृतिस्वप्नादि व्यवहार करितें ह्मणून तिला बीजभाव ह्मणतात व जागृतिस्वप्नाला फळभाव ह्मणतात. जागृतींत स्थूल प्रपंचाची व स्वप्नांत सूक्ष्मप्रपंचाची प्रतीति असते ( स्वप्नांत स्थूल देह पडलेला असतो पण मनच सारा प्रपंच करितें. ) सुषुप्तींत स्थूलाची प्रतीति नाहीं व सूक्ष्माचीही नाहीं (कारण मनही तेथें लीन झालेलें असतें, ) ह्मणून तिला घन अज्ञान ह्मटलें आहे. तो जीवाचा कारणदेह. ( त्यांच्यांतून जागृतिस्वप्न या अवस्थांसह जीव उत्थान पावतो ह्मणून त्याला मृत्यु ह्मणतां येत नाहीं व ती मुक्तिही नव्हे. ) सुषुप्तींत यथार्थ ( आत्म ) ज्ञान नसतें व जागृतिस्वप्नाप्रमाणें विपरीत ज्ञानाचें द्वैतही नसतें. ' ना यथार्थ ज्ञानें एक होणें । ना अनेकत्वें दुजें घेणें । ऐसें निखळ जें नेणणें । तेंचि तें रूप ' ॥५०४॥ ना धड आत्मज्ञान ना विश्वाभास अशा या अज्ञानाला सुषुप्ति ह्मणतात व तेंच अक्षर पुरुषाचें रूप होय. जागृतिस्वप्नांतल्या जीवचैतन्याला अविद्यो-पाधि असते व सुषुप्तींत तें चैतन्य मायोपाधीनें युक्त असतें. ' ऐसें जीवकार्यकारण।

जया मायासंगुचि लक्षण । अक्षरपुरुष जाण । चैतन्य तें ' ॥ ५२५ ॥ आतां क्षराक्षरांना पुरुष कां ह्मटलें आहे हें पाहून •पुरुषोत्तमाचा शोध घेऊं. ' अर्जुना गा यापरी । साकार कल्पूनि पुरी । आत्मा विस्मृतिची करी । निद्रा तेथ ' ॥ ४८९ ॥– साकार देह ही आपली नगरी समजून जीव आपलें स्वरूप विसरून तेथें झोप घेतो ( पुरि शेते स पुरुषः ) ह्म० स्वस्वरूपाच्या विसरांत देहतादात्म्य पावतो व त्या भरांत मी सुखी मी दुःखी, ही माझी आई, हा बाप, ' पुत्र वित्त कांता । माझे हे ना ॥ ऐसिया वळघोनी स्वप्ना । धांवत भवस्वर्गाचिया राना । तया चैतन्या नाम अर्जुना । क्षर पुरुषगा ' ॥४९३॥ आणखी असें कीं ' जे तो वस्तुस्थितीपुरता । ह्मणोनि आली पुरुषता । वरी देहपुरी निदैजता । पुरुषनामें ॥४९६॥ तें क्षरचैतन्य वस्तुस्थितीनें (स्वस्वरूपानें पाहतां) पूर्ण पुरुषच आहे आणि शिवाय देहरूपी नगरांत तो निजणारा आहे ह्मणून त्याला पुरुष हें नांव दिलेलें योग्य आहे. जीव मूळचें केवल ब्रह्म असून देहतादात्म्यामुळें संसारांत पडतें. याला सिंहाचा दृष्टांत फार योग्य आहे. ' जैसा कुहां आपणचि बिंबे । सिंह प्रतिबिंब पाहतां क्षोभे । मग क्षोभला समारंभें । घाली तेथ ' ॥४८७॥ सिंह आडांत आपलें प्रतिबिंब पाहून सहजता विसरून खवळतो व त्या क्षोभाच्या भरांत आडांत उडी घालतो, त्याप्रमाणें जीव आपली ब्रह्मरूपता विसरून देहोपाधीच्या योगानें देहतादात्म पावतो व संसारांत पडतो–पडल्यासारखा दिसतो. त्यानें उपाधि ओळखली व उपाधीपासून दूर झाला कीं तो मुक्तच आहे! उपाधिनिरासांत ब्रह्मरूपता स्वतःसिद्ध आहे. तेंच पुरुषोत्तमाचें रूप होय.

" आतां अन्यथाज्ञानीं । या दोनी अवस्था जया जनीं । तया हरपती घनीं । अज्ञानत्वीं ॥५२६॥ तें अज्ञान ज्ञानीं बुडालियां । ज्ञानें कीर्तिमुखत्व केलियां । जैसा वन्ही काष्ट जाळूनियां । स्वयें जळे ॥५२७॥ लोकांत विपरीत ज्ञानाच्या ज्या दोन अवस्था ह्म० जागृति व स्वप्न आहेत त्या गाढ अज्ञानतत्वांत ह्म० सुषुप्तीमध्यें नाहींशा होतात व तें अज्ञान ( 'देह मी' ) ज्ञानांत (ब्रह्म मी ह्या वृत्तिज्ञानांत ) बुडून गेल्यावर व ज्ञानानें( वृत्तिज्ञानानें )ही कीर्तिमुखत्व केल्यावर ह्म० आत्मस्वरूपाला सन्मुख केल्यावर [ देवळाच्या गाभाऱ्याच्या उंबऱ्यावर सिंहाचें किंवा राक्षसाचें जें चित्र काढलें असतें त्याला कीर्तिमुख ह्मणतात. ] वन्ही जसा काष्ठ जाळून स्वतः नाहींसा होतो त्याप्रमाणें–ज्ञान ह्म० ब्रह्माहं हें वृत्तिज्ञानही नाहींसें होतें. या प्रमाणें अज्ञान ( देहाहं--ही वृत्ति ) ज्ञानें ( ब्रह्माहं ह्या वृत्तीनें ) नेलें व परमात्मवस्तु देऊन ह्म० आत्मसाक्षात्कार देऊन आपणही नाहींसें झालें, मग वृत्तिरहित ज्ञान, केवल ज्ञान, ज्ञप्तिमात्र, उरलें--तो उत्तम पुरुष किंवा पुरुषोत्तम

होय ! काष्ठांत असून काष्ठाग्नि जसा वेगळा असतो तसा हा पुरुषोत्तम क्षराक्षराहून वेगळा आहे. कल्पप्रळय जसा नदनद्यांना एकमय करितो किंवा प्रळयतेज रात्र–दिवसांचा ग्रास करिते त्याप्रमाणें उत्तम पुरुषाच्या ठिकाणीं क्षराक्षरांची ह्म० जागृति, स्वप्न, सुषुप्ति ह्या अवस्थांची मातही नाहीं. (याप्रमाणें तो देहत्रयातीत व अवस्थात्रयातीत आहे;) ‘मग एकपण ना दुजे। असे नाहीं हें नेणिजे। अनुभव निबुजे। बुडालां जेणे’ ॥ ५३५ ॥ तेथें एकपण नाहीं व तत्साक्षेप द्वैतही नाहीं, आहे नाहीं (हें आहे ह्मणावें कोणी?) व नाहींही नाहीं, अनुभव (हा त्रिपुटींतला असल्यामुळें) घाबरून नाहींसा होतो. असें जें कांहीं एक आहे त्याला पुरुषोत्तम ह्मणतात, परमात्मा तोच. त्याच्याशीं न मिसळतां त्याच्या गोष्टी सांगणें ह्म० न बुडतां बुडालेपणाच्या गोष्टी कांठावरूनच सांगणें होय ! विवेकाच्या कांठावर उभे राहून वेदानें त्या परावराच्या गोष्टी अशाच सांगितल्या आहेत. ‘अवर ह्म० अलीकडचे, क्षराक्षर व पर ह्म० पलीकडचे आत्मरूप) ‘एऱ्हवीं न बोलणेंनि बोलणें। जेथिचें सर्व नेणिवा जाणणें। कांहींच न होनि होणे। जे गा’वस्तु’ ॥ ५४१ ॥–मौन हेंच तेथलें बोलणें, कांहीं नेणणें हेंच तेथलें जाणणें, कांहींच न होणें हें वस्तु होणें आहे. ‘ब्रह्माहं’ येथें मावळतें, द्रष्ट्यासह दृश्य हार–पते. बिंब प्रतिबिंबांच्या मधलें तेज, प्राणाफुलांच्या मधली वृत्ती, ‘न दिसे तरी नाहीं। ऐसें बोलों नये’–दिसत नाहीं ह्मणून ती नाहीं असें ह्मणतां येत नाहीं; ‘तैसें दृश्य द्रष्टा जाये। मग कोण ह्मणे काय आहे। हेंचि अनुभवे तेंचि पाहे। रूप तया’ ॥५४५॥ पाहण्याचा विषय व पाहणारा गेल्यावर, कोणी ह्मणेल कीं तेथें काय उरतें? तर जें उरतें तेंच जो अनुभवतो तेंच त्याचें रूप होय ! तो प्रकाश्यावांचून प्रकाश, ईशितव्यावांचून ईश (नियंता) आहे. तो आनंद व विश्रांतीचा विश्राम आहे. ‘नाना अलंकारदशे। सोनें न लपत लपालें असे। विश्व न होनियां तैसें। विश्व जो धरी’ ॥ ५५२–अलंकारांत [नामरूपांत] सोनें न लपतां लपलेलें असतें, त्याप्रमाणे तो विश्व न होऊन विश्वाला धारण करितो, ‘सत्ता प्रकाश जगा। आपणचि जो! ‘अहो काय बहु बोलों जया नाहीं दुजें। तो गा मी निरुपाधिक’--अशा मला जो अनन्यत्वें जाणतो तोच भक्त. क्षीरसागराला क्षीरसागरपणेंच मेजवानी करावी किंवा अमृत होऊन अमृतांत मिसळावें--‘सांडे-पंधरा [उत्तम सोनें] मिसळावें। तें सांडेपधरेंचि होआवें। तेवीं मी जालिया संभवे। भक्ति माझी’ ॥५६७॥ हां गा सिंधूसि आनी होती। तरी गंगा कैसेनि मिळती?। ह्मणोनि मी न होतां भक्ती। अन्वय आहे?” ॥ ५६८ ॥--भगवत्स्वरूप झाल्याशिवाय भक्तीचा लाभ होत नाहीं. अभेदभक्तीचे किंवा ज्ञानभक्तीचे हें पूर्ण व्याख्यान झालें.

प्रकरण ११ वें

लेखकः—ना. श्री. वाटवे.

# श्रीकृष्णाचा मथुराप्रवेश व कंसधनुर्भंग

१ नंद गेला त्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं अक्रूर रामकृष्णासह रथांत बसून निघाला तो फक्त दुपारीं यमुनानदीवर स्नानासाठीं उतरला. रामकृष्ण रथांत बसून राहिले. अक्रूरानें पाण्यांत बुडी मारली तों तेथेंही रामकृष्ण त्याला दिसले. म्हणून पाण्यावर डोकें काढून पाहतों तों ते रथांतही आहेतच! तेव्हां तो मनांत समजला कीं स्थिरचर व्यापून असलेल्या परमात्म्यानेंच श्रीकृष्णरूपी अवतार धारण केला आहे. श्रीकृष्णांनीं अर्जुनाला पुढें जें सांगितलें कीः—

विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्।

म्हणजे माझ्या केवळ एका कलेनेंच मीं हें सारें जग व्यापून राहिलों आहें म्हणून व अर्जुनानेंही कबुली दिली कीं

द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः।

म्हणजे पृथ्वीपासून स्वर्गापर्यंतचे हे सारें अंतर चारी बाजूला तूं पुरें पुरें भरून टाकले आहेस म्हणून त्याचेंच हें प्रत्यंतर नाहीं काय?

२ संध्याकाळीं अक्रूराचा रथ नगराबाहेर गौळी उतरले होते तेथें येतांच रामकृष्ण तेथें उतरले. परंतु अक्रूर त्यांना आपल्या घरीं येण्याचा आग्रह करूं लागला. त्यावर ते त्याला म्हणाले कीं 'आम्हीं आज तसें करीत नाहीं. तरीपण मागाहून येऊं. अर्थात् अक्रूराचा नाइलाज होऊन तो एकटाच पुढें गेला व राजाला एकंदर वृत्त कळवून आपल्या घरीं गेला. 'आजच आपण परके झालों, त्याची परवा करीत नाहींसे झालों' असे नंदाला वाटूं नये म्हणून; रामकृष्ण तो उतरला होता तेथेंच उतरले व त्याच्या बरोबरच राहिले. "वृंदावनापासून मथुरेपर्यंत ज्या ज्या ठिकाणीं अक्रूराचा रथ उभा राहिला त्या त्या ठिकाणीं आसपासचे लोक श्रीकृष्णांना पाहण्यासाठीं त्यांच्या भोंवतीं जमा होत असत. रामकृष्ण मथुरेला येऊन पोंचले त्याच्या दुसऱ्या दिवशींचा सकाळचा वेळ इकडे तिकडे घालवून बलराम व इतर गोपमंडळीसहवर्तमान श्रीकृष्ण दुपारच्या वेळीं मथुरानगरी पाहण्यासाठीं निघाले, त्या दिवशींची मथुरानिवासी मंडळीची धांदल काय विचारावी! जो तो धनुर्यागासंबंधींच्या गोष्टी बोलण्यांत व राजवाड्याकडे जाण्या-येण्यांत गर्क झालेला. इकडेही बल्लवमंडळी आपल्या संघासह गांवांत शिरली त्याबरोबर शहरवासी मंडळींना कौतुक वाटून ते त्यांना पाहण्यासाठीं त्यांच्याभोंवतीं

जमा झाले. गोपांची ती धिप्पाड शरीरयष्टि व निर्भीड चेहरे पाहून नगरवासी लोकांना कौतुक वाटलें. सर्वांच्यापुढे श्रीकृष्ण होते; त्यांच्यामागे बलरामदादा होते. नगरवासी स्त्रीपुरुषांची दृष्टी श्रीकृष्णांवरून हालेना सुद्धा ! मोरोपंत आपल्या मंत्रभागवतांत म्हणतातः—

भव्यप्रभुमूर्तीतें प्राशिति नयनींच ते जन अधाशी ।

दृष्टि न सोडिति रूपा, जडति जशा मक्षिका नवमधासी ॥१॥

३ अशा रीतीनें पौरजानपदांची दृष्टी रमवीत रमवीत बालगोपाळासहित श्रीकृष्णप्रभूंची स्वारी चालली असतां समोरून एक भला मोठा गाडाभर उंची वस्त्रें घेऊन राजाचा परीट आपल्या अनुचरांसह राजवाड्याकडे चालला होता तो त्यांच्या दृष्टीस पडला. श्रीकृष्णांनीं याचेळीं असा विचार केला कीं आपणाला कसेंही करून कंसाशीं युद्ध करावयाचें आहेच. त्यानेही झाले तरी आम्हांस मारण्याच्या इच्छेनेंच एथें बोलावले आहे. तेव्हां आम्हीं एथें आल्याची दाद त्याला लागेल असें कांहीं तरी केलें पाहिजे तरी ही संधी बरी आहे. असा विचार करून त्यांनीं त्या राजरंगारी परटाजवळ वस्त्रें मागितलीं. ते म्हणाले.:——

देह्यावयोः समुचितान्यंग वासांसि चार्हतोः ।

भविष्यति परं श्रेयो दातुस्ते नाऽत्र संशयः ॥१॥ (भागवत)

म्हणजे 'हे रजका ! हीं उंची वस्त्रें धारण करण्यास आम्हीं योग्य आहोंत तरी आमच्या योग्य अशीं ह्यांतलीं वस्त्रें काढून आम्हांस दे बघूं ? असे केल्यानें तुझें कल्याणच होईल.' परंतु त्या उद्धट परटानें त्यांना दरडावून असें विचारलें कीं 'अशा तऱ्हेचीं उंची वस्त्रें तुमच्यासारखे रानटी लोक कधीं नेसत आले आहेत काय ? हीं राजभोग्य वस्त्ररत्नें तुम्हांला काय करायचीं ? कमी जास्त बोलाल तर खबरदार ! राजाशीं गांठ आहे, लक्षांत ठेवा !' हें त्याचें भाषण ऐकतांच श्रीकृष्णांना राग येऊन त्या परटाच्या श्रीमुखांत एक चांगली जोराची चपराक लगावून दिली त्यासरसा तो एकदम मरून पडला ! अर्थात् त्याचे अनुयायी नोकरचाकर वस्त्रें टाकून पळून गेले हें सांगायला नकोच ! मग तीं वस्त्रें त्या गवळ्यांनीं यथेच्छ लुटलीं, व बाकीचीं तशींच धुळींत फेकून दिलीं. हे गवळी तीं वस्त्रें नेसताहेत तों ती बातमी साऱ्या नगरांत वाऱ्यासारखी पसरली. प्रत्येक दुष्ट मनुष्य त्यांना थरथर कांपूं लागला. दुष्टांना वाटूं लागलें कीं प्रत्यक्ष काळच ह्या तरुण गवळ्याच्या रूपानें येऊनः--

'कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धो लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः ।

म्हणजे 'जगद्भक्षक काळ म्हणून जो कोणी म्हणतात तो मींच असून लोकक्षय

करण्यासाठींच एथें प्राप्त झालों आहे ' असें सांगत आहे कीं काय कोण जाणे ! अशा रीतीनें वस्त्राप्रावरणांनीं सज्ज झालेले ते गोपवीर पुढें जात असतां एका विणकराच्या कारखान्यापाशीं आले. तेथील कारखानदारानें त्यांना उपरणीं वगैरे वस्त्रें दिलीं. तीं घेऊन व त्याला त्याचें कल्याण करण्याचें आश्वासन देऊन रामकृष्ण पुढें चालले असतां एका हारविक्याच्या दुकानापाशीं आले. तेथेंही त्यांना सुंदर व सुगंधी हारांनीं मंडीत करण्यांत आलें. अशा रीतीनें रमत रमत ही गौळी मंडळी पुढें जाताहेत इतक्यांत समोरून एक तीन ठिकाणी वांकडी अशी दासी अंगास लावण्याचीं सुंदर व सुवासिक उटणीं घेऊन येत असलेली त्यांना दिसली तिच्यापाशींही श्रीकृष्णांनीं तीं उटणीं मागितलीं व तिनेंही तीं आनंदानें दिलीं. तीं लावल्यावर तर श्रीकृष्ण फारच शोभूं लागले. श्रीकृष्णांनींही तिच्यावर कृपा करण्याचें ठरविलें. त्यांनीं तिच्या पायांवर आपला पाय ठेविला एका हातानें तिचीं बोटें धरलीं व दुसऱ्या हातानें तिची हनुवटी धरून तिला वर खेंचून सरळ केलें ! त्याबरोबर ती लक्ष्मी प्रमणें शोभूं लागली.

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ॥

म्हणजे ' मला कोणी कांहीं दिलें कीं मींही त्याला तशाच तऱ्हेचें कांहींतरी (फारच मोठ्या प्रमाणांत) देत असतों ' असें जें श्रीकृष्णांनीं गीतेंत सांगितलें आहे त्याचेंच हें प्रत्यक्ष प्रत्यंतर नव्हे काय ? तिच्या उटण्यांनीं स्वशरीराला तात्पुरती कां होईना शोभा आणली असें पाहतांच श्रीकृष्णांनींही तिचें शरीर कायमचें सुंदर केलें !

मोरोपंत ह्या प्रसंगाला अनुलक्षून म्हणतात,

नरलोकीं सुरलोकीं अतुळ करि तिच्या त्रिवक्र देहातें।
मोडुनि पुत्रें घडली रुचिर रची दृष्टिनेंचि त्या तनुला ॥
जाणों श्रीपद लावी शुध्दयर्थेचि करहि सांत्वना हनुला ॥ १ ॥

आपल्या शरीरांत असा हा अचानकपणें फरक पडलेला पाहून कुब्जेला फारच आनंद झाला. तिनें ताबडतोब त्यांना आपल्या घरीं पाहुणचारास बोलाविलें. परंतु श्रीकृष्णांनीं तिच्या म्हणण्याला लागलाच रुकार न देतां मागाहून येऊं असें तिला सांगून तिची बोळवण केली. हा सर्व प्रकारही लोकांना फारच अजब वाटला, व तीही बातमी लोकांत ताबडतोब पसरली व सर्वांच्या तोंडीं होऊन राहिली.

३ ह्या प्रकारानंतर ती सर्व गवळीमंडळी मोठ्या उमेदीनें पुढे चालूं लागली. श्रीकृष्णांनीं आसपासच्या मंडळीला विचारीत विचारीत धनुर्यागभुवनाकडे चाल केली व आंत शिरून संरक्षक मंडळी ' नको नको ' म्हणत असतां त्यांनीं तें धनुष्य उचलून त्याला गुण चढविला व दोरी ओढून ते मोडून टाकिलें. त्याबरोबर एवढा

कांहीं प्रचंड आवाज झाला कीं त्या नादघोषानें सारें शहर दुमदुमून गेले. अशा रीतीनें तें यागधनुष्य मोडलेले पाहतांच तद्रक्षकांनीं एकच गिल्ला केला व ते रामकृष्णांच्या अंगावर धांवले. हे पाहून रामकृष्णांनीं त्या मोडलेल्या धनुष्याचे तुकडेच हातांत घेऊन त्या रक्षकांचा निकाल केला.परंतु इकडे ही मारामारी चालू आहे तों तिकडे कंसाला ही बातमी मिळून त्यानेंही रामकृष्णांच्या बंदोबस्तासाठीं सैन्य पाठवून दिले; परंतु रामकृष्णांनीं तेंही थोडक्याच वेळांत मारून व पळवून लाविले. एवढे होईपर्यंत दिवस मावळल्यामुळें व दुसऱ्या दिवशीं कुस्तींत रामकृष्णांना मारून टाकावयाचे ठरलेले असल्यामुळें कंसानेंही त्यावेळी त्यांची दादपूस केली नाहीं.

४ इकडे एवढे होईपर्यंत रात्र पडल्यामुळें जवळपास कोठेंतरी वस्तीपुरती जागा शोधावी म्हणून रामकृष्ण पुढे जाताहेत तों त्याना गाड्यांच्या तळावर एक धर्मशाळा आढळली तींतच ते सारे दूध वगैरे पिऊन झोंपी गेले. त्यांना निभ्रान्तपणें गाढ झोंप लागली, परंतु इकडे कंसाला मात्र कांहीं केल्या झोंप लागेना व जी थोडीशीं लागली तींतही त्याला स्ववधसूचक दुष्ट स्वप्नें पडलीं.

५ या ठिकाणीं श्रीकृष्णांनीं मथुरेंत आल्यापासून हा वेळपर्यंत केलेल्या कृत्यांचा थोडा विचार करूं. अक्रूर त्यांना आपल्या घरीं बोलवीत होता पण तो नंदासहित सगळयांना बोलवीत नसल्यामुळें श्रीकृष्णांनीं त्याचे अमंत्रण नाकारले. कारण ‘ देवद्विजगुरुप्राज्ञपूजनांचा ’ शारीरिक तपांत अंतर्भाव करणाऱ्या श्रीकृष्णांच्या बाबतींत तर तसें करणें अगदींच अयोग्य झालें असतें; कारण नंद हा त्यांचा गुरु म्हणजे पिताच होता. म्हणून ज्या श्रीकृष्णांनींही त्याचें पूजन म्हणजे ‘प्रमाणशुश्रूषान्नादिभिराराधनम् ’ म्हणजे त्याच्यापुढें लीनता धारण करणें, त्याची सेवा करणें व त्याच्या अन्नादिकांची तरतूज करणें इत्यादि गोष्टी त्यांच्या शारीरिकतपांत अंतर्भूत होत असल्यामुळें व ‘यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ’ यांत त्यांनींच सांगितल्याप्रमाणें केलेंच पाहिजे असें असल्यामुळें फक्त त्यांनींच नंद सामान्य स्थळीं राहून सामान्य अन्न खात असतां आपणच तेवढा जादा पाहुणचार स्वीकारणें त्यांना योग्य वाटलें नाहीं. कारण तसें झालें असतें तर त्यांच्याच

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः
सयत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ १ ॥

म्हणजे श्रेष्ठ पुरुषांच्या आचरणानुसारच इतर लोक आपला आचार ठेवीत असतात व तो जे शास्त्रनियम जशा रीतीनें पाळतो तेच इतर लोक तशाच रीतीनें

पाळीत असतात या न्यायानें लोकांनाही मग खुशाल आईबापांना कदान्न खात ठेवून आपण गोड गोड खाण्याला सवड झाली असती. आतां यावर अशी एक शंका येईल कीं तर मग नंद आदल्या दिवशीं पायींच आला असतां श्रीकृष्ण आपण स्वतां रथांत बसून आले कसे? तर याला उत्तर असें कीं स्वतां अक्रूरालाच नंदानें पुढें जावें असें वाटत होतें. कारण रामकृष्णांना सांगावयाच्या गुह्य गोष्टी त्याला दोघांना नंदाला कळूं देऊन सांगणें इष्ट वाटत नव्हतें; व म्हणूनच तो एक दिवस मागाहून निघाला होता. अर्थात्च रामकृष्णांनाही त्याच्याबरोबर याव-याचें असल्यामुळें त्याच्याच रथांतून येणें प्राप्त झालें होतें. परंतु म्हणूनच मथुरेच्या बाहेरच्या उपवनांत नंद उतरला होता तेथें येतांच रामकृष्ण रथांतून उतरले व नंदाबरोबर राहिले.

बरें, श्रीकृष्णांनीं नंदासहित आम्हांला नेणारच तर ने असें अक्रूराला म्हटलें असतें तर तें त्यानें मान्य केलेंही असतें. परंतु श्रीकृष्णांनीं तसेंही म्हटलें नाहीं याचें कारण असें दिसतें कीं रामकृष्ण जरी जन्मतः क्षत्रिय होते तरी वैश्यवृत्तीनें वागणाऱ्या नंदाच्या घरीं ते राहत असल्यामुळें त्याच्या आंगावर क्षत्रियाला योग्य असा पोषाख वगैरे नव्हता. तेव्हां

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः

म्हणजे थोर माणसांनीं घालून दिलेले आचारविचाराचे नियम पाहूनच बाकी-च्यांनीं आपली वर्तणूक तदनुरूप ठेवली पाहिजे असें स्वतांच सांगणाऱ्या श्रीकृ-ष्णांनीं स्वतांपाशीं क्षत्रियाला योग्य असा पोषाख नसल्यामुळें अक्रूराचें आमंत्रण ताबडतोब स्वीकारलें नाहीं, हें योग्यच झालें.

शहरांत येतांच त्यांच्या प्रथमच हें लक्षांत आलें कीं आपणास राजदरबारीं प्रतिष्ठितपणें जावयाचें असेल तर आपल्यापाशीं व्यवस्थित वस्त्रपात्र असलें पाहिजे. म्हणून पहिल्यानें ते त्या उद्योगाला लागले. ते मथुरेला येऊन पोंचले त्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळचा त्यांचा वेळ बहुधा आपलें ठाकठीक वस्त्रप्रावरणा-संबंधींचें म्हणणें नंदाला पटविण्यांतच गेला असला पाहिजे व श्रीकृष्णांनीं त्याच्या-कडून स्वतां दोघांसाठीं वस्त्रें घेण्यासाठीं म्हणून कांहीं रकम मिळविण्यासाठीं हट्ट घेतला असला पाहिजे, व शेवटीं आपलें म्हणणें त्याला पटवून त्याची मंजुरी मोठ्या मुष्किलीनें मिळविली असली पाहिजे व म्हणूनच नगर पाहण्यासाठीं बाहेर पडण्यास त्यांना अपराण्ह काल येऊन ठेपला असला पाहिजे.

त्या काळीं बहुधा परीटच उंची वस्त्रें विकण्याचा धंदा करीत असावेत. कारण हातमागावर काढलेलीं वस्त्रें धुतल्या वगैरे शिवाय वापरतां येत नाहींत; कारण त्यांना खळ वगैरे असते व ती काढली पाहिजे असते. परंतु श्रीकृष्णांना

दुसऱ्या कोणातरी परटाकडून हीं त्यांना हवीं असलेलीं वस्त्रें विकत घेतां आलीं असतीं. परंतु आपली राजापर्यंत वर्दी पोंचावी म्हणून त्यांनीं राजपरीट आयता भेटला त्याच्यापाशींच वस्त्रें मागितलीं. परंतु तीं त्यांनीं बळजबरीनें मागितलीं नसली पाहिजेत, याला पुढील दोन कारणवजा पुरावे देतां येतील. ते असे. त्यांना बळ-जबरीनेंच वस्त्रें मिळवायचीं असतीं तर मथुरेंतील कोणालाही लुबाडून त्यांना तीं मिळवितां आलीं असतीं. परंतु त्यांनीं तसें केलेलें नाहीं. तसेंच अशारीतीनें दर-वडेखोरी करणारांना ज्यांच्याकडून हिसकून म्हणा मागून म्हणा कांहीं घेतलेलें असतें त्यांच्यावर आपण कांहीं प्रत्युपकार केला पाहिजे अशी कल्पनाही नसते. परंतु श्रीकृष्णांना ज्यांनीं ज्यांनीं कांहीं दिलें त्यांना त्यांना श्रीकृष्णांनीं परत उप-कारं करण्याचें आश्वासन दिलेले आहे व कुब्जेला तर तावडतोब सरळ केलीही. तेव्हां ज्या श्रीकृष्णांनीं, 'थोर लोक वागतात तसें इतरांनीं वागावें म्हणून पर्या-यानें सांगून ठेवलें आहे व ज्यांचा अधर्म होऊं न देण्याविषयीं एवढा कटाक्ष आहे व ज्यांनीं पुढें कंसवधानंतर त्याचें राज्य उग्रसेन देत असतांही घेतलें नाहीं तेच श्रीकृष्ण एवढ्याशा वस्त्रांसाठीं परटाला ठार मारतील व त्याचीं वस्त्रें लुटतील हें संभवत नाहीं. श्रीकृष्णांनीं परटाला सांगितलें कीं,

'देह्यावयोः समुचितान्यंग वासांसि चार्हतोः' (भागवत पुराण)

यांतील शेवटचें पद 'अर्हतोः' हें 'अर्घतः' असें असलें पाहिजे. कारण त्यांनीं परटाला, 'देह्यावयोरुत्तमान्यङ्ग वासांसि चार्हतोः' असें न म्हणतां म्हणजे 'आम्हीं ह्या तुझ्या वस्त्रांतील सर्वोत्कृष्ट वस्त्रें वापरण्याच्या लायकीचे आहोंत तरी त्यांतील सर्वोत्तम वस्त्रें आम्हांला दे' असें न म्हणतां फक्त 'समुचितानि वासांसि' असें ज्या अर्थीं शेवटचें पद 'अर्घतः' म्हणजे किंमत घेऊन असेंच असलें पाहिजे असें आम्हांस वाटतें. परंतु ह्या साध्या वेषांतल्या मुलांना तो परीट तुच्छतापूर्वक लावून बोलल्यामुळें व त्याच्या नोकरांनीं बहुधा यांच्याशीं धक्काबुक्की सुरू केल्या-मुळें कुस्तीला सुरवात झाली असावी; व तो परीट श्रीकृष्णांच्या आंगावर धांवून आल्यामुळें त्यांनीं त्याच्या मुस्कटांत दिलेल्या चपराकेनेंच त्याचा प्राण गेला असावा. नाहींतर

'यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजतेच यः। सच मे प्रियः' ॥

गी० १२।१५

म्हणजे ज्याच्यापासून लोकांना त्रास पोंचत नाहीं व म्हणूनच ज्याला लोकही त्रास देत नाहींत असा मनुष्यच मला आवडतो असें सांगणारे श्रीकृष्ण बुद्ध्या असें कधींच न करते, व त्यांनीं पुढें तसें कधीं केलेलेंही नाहीं.

या प्रमाणें केलेलें हें विवेचन लोक व्यवहाराला धरून झालें परंतु श्रीकृष्ण हे परमेश्वर होते व त्यांची इच्छा मोडणाऱ्यांना काय फळ मिळतें याविषयीं त्यांनीं गीतेंत असें सांगितलें आहे कीं,

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥ ३।३० ॥
येत्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम् ॥
सर्वज्ञानविमूढास्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥

म्हणजे सर्वत्र एकच परमेश्वर आत्मस्वरूपानें भरलेला आहे हें जाणून आपल्या सर्व कर्मांचीं फळें मिळणें वा न मिळणें हें माझ्या मर्जीवर सोंपवून त्याविषयीं मनाला चंचळ होऊं न देता निरहंकार बुद्धीनें व सुखदुःखलाभालाभादि द्वंद्वें पूर्ण-पणें समचित्तानें सहन करीत प्रत्येक मनुष्यानें आपापले नियत कर्म करीत राहावें हें माझें मत, श्रीकृष्ण म्हणतात, जे अवहेलनापूर्वक मान्य करीत नाहींत व त्या प्रमाणें वागत नाहींत त्या सर्वाज्ञानविमोहित मनुष्यांचें मरण जवळ आलें आहे असें खुशाल समज. ह्या प्रमाणें पाहतां श्रीकृष्णांच्या योग्य शब्दाची अवहेलना करतांच त्याचें मरण ओढवलें हें रास्तच झालें असें म्हटलें पाहिजे. यावरही कोणी अशी शंका काढील कीं श्रीकृष्ण हे परमेश्वर आहेत हें कांहीं त्याला माहीत नव्हतें; म्हणून त्यानें तसें केलें; व अज्ञानानें झालेल्या गोष्टीला इतकी प्रखर शिक्षा योग्य नव्हे असें नाहींका म्हणतां येणार ? तर त्याला आमचें उत्तर असें कीं किंचित् राखेनें आच्छादित अशा निखाऱ्यावर नुसता सहज पाय पडला तरी पाय हा उघडा असेल तर भाजायचाच. त्याप्रमाणें भगवंताच्या हाताना दुष्टांचा व भगवदाज्ञाभंग करणाऱ्यांचा नाश करण्याची संवय लागून राहिलेली असल्यामुळें सहजच परंतु प्रतीकारार्थ म्हणून मारलेल्या चापटीनें, ज्या हातानें द्रोणागिरी उचलला होता त्या हाताच्या चापटीनें भगवद्द्रोहकारी परटाचा जीव गेला यांत आश्चर्य काय ? व त्यांनींच,

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ॥ १८।४७ ॥

म्हणजे मीं ह्या अमुक मनुष्याला मारीत आहें अशा भावनेचा लेप ज्याच्या बुद्धीला झालेला नसतो त्यानें दुसऱ्यांना ठार मारलें तरी त्याला त्याच्या त्या कृत्याबद्दल पाप लागत नाहीं असें सांगितलें आहे त्याप्रमाणें पाहातां केवळ प्रति-कारार्थ म्हणून मारलेल्या चापटीनें तो परीट मेला तरी त्याबद्दलचा दोष श्रीकृष्णांना लागत नाहीं.

आतां या परटाप्रमाणें कुब्जेनें उद्धटपणाचें उत्तर न देतां श्रीकृष्णांनीं माग-

तांच तिनें हातांतील अंगराग त्यांना समर्पण केल्यामुळें तिला तिच्या पूर्वकर्मा-नुसार प्राप्त झालेल्या त्रिवक्र देहाची व्यंगापासून मुक्तता करून श्रीकृष्णांनीं गीतें-तील आपलें पुढील वचन खरें केलें. तें वचन असें:

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवाः ।
श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते ते ऽ पि कर्मभिः ॥३।३१॥

म्हणजे 'मयि सर्वाणि कर्माणि०' (गी० ३।३०) या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें जे मनुष्य श्रद्धापूर्वक व मला असें सांगितल्याबद्दल दोष न लावता मीं सांगि-तल्याप्रमाणें आचरण ठेवितात त्यांची कर्मबंधनांतून मुक्तता होते. तसेंच भगवं-तांनीं तिला दिलेलें वचन न विसरतां कंसवधानंतर एक दिवस सवड काढून ते कुब्जेच्या घरीं गेले व त्यांनीं तिचा पाहुणचारही पण स्वीकारला.

आतां ज्या मालाकारानें व कोष्टयानें श्रीकृष्णांना त्यांची स्वतांची इच्छा नसतांही सजविलें होतें त्यांना त्यानीं त्याचें

नियतं संगरहितमरागद्वेषतः कृतम् ।
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्विकमुच्यते ॥ १८।२३ ॥

म्हणजे नियत म्हणजे 'यत्करोषि ——तत्कुरुष्वमदर्पणम्' म्हणजे जें जें कांहीं तूं करीत असशील तें तें मला अर्पण कर या भगवन्ताच्या आज्ञेप्रमाणें त्यानीं म्हणजे मालाकारानें माळा व कोष्टयानें वस्त्र हीं भगवच्चरणीं अर्पण केलींच पाहिजे होतीं व तीं त्यांनीं तशीं करतांच त्यांचें नियतकर्म त्यांनीं अनासक्तबुद्धीनें केवळ कर्तव्य म्हणून व फलाची इच्छा न धरतां केल्यामुळें तें सात्विक कर्मांत पडतें असें पाहून 'सत्वं सुखे संजयति' म्हणजे सात्विक कर्मांनीं सुख मिळतें या न्यायानें त्यांना या जगांत सुख देऊन शिवाय 'ऊर्ध्वं गच्छन्ति सत्वस्था' म्हणजे सत्ववृ-त्तीचे लोक स्वर्गाला जातात या न्यायानें त्यांना भगवंतांनीं अंतीं सद्गती दिल्याचें भागवतांत लिहिलें आहे.

असो. या सर्व गोष्टी घडल्या त्याच्या दुसऱ्या दिवशीं धनुर्याग व्हावयाचा होता. श्रीकृष्णांनाही तेथें जावयाचें असल्यामुळें ते तें धनुर्यागभवन पाहण्यानिमित्त निघाले होते. त्या ठिकाणीं एक मोठें इंद्रधनुष्यासारखें विचित्र धनुष्य ठेवलेलें होतें. त्याची रोज पूजा होत होती. त्याच्या रक्षणासाठीं तेथें सैन्यही पण ठेवलेलें होतें. तेथील सैन्यरक्षक त्या धनुष्याला 'भलत्यासि देति न शिवों' यावरून असें दिसतें कीं, राजांनीं ज्यांना परवानगी दिली आहे असे वीर पुरुष वगैरेंना त्या धनुष्याला गुण लाऊन पाहण्याची परवानगी होती व अशा ज्यांनीं गुण लाविला होता त्या सर्वांची मिळून एक कुस्तीची दंगल व्हावयाची होती. यालाच

दंगल म्हणण्याचें कारण हें एक 'स्वैर संयुग' होतें. म्हणजे वाटेल त्यानें वाटेल त्याशीं कुस्ती करावी, प्रतिपक्षी कबूल असो वा नसो! तसेंच जो हरेल त्याला विजयी वीरानें ठार मारावें असा तेथला पण होता. प्राचीन काळच्या रोमन् लोकांतील 'ग्लॅडिएटर' लोकांच्या युद्धासारखाच हा एक प्रकार होता. ह्या धनुर्यागांतला दुसरा असा एक नियम होता कीं एखाद्यानें त्या धनुष्याला शिवून गुण लावण्याचा प्रयत्न केला व गुण लावता आला नाहीं तर त्या मनुष्याला देहांत शिक्षा असे हें धनुष्यरक्षकांनी श्रीकृष्णाला 'शिउन कोंदडा मरण जरि हरि! तरि भिऊं नको दंडा.' असें दरडावून सांगितल्यावरून दिसतें. दुसरीकडे धनुर्मखाचा एक भाग म्हणून व बहुधा त्यांत घडणाऱ्या मल्लहत्याच्या दोष निवारणार्थ पशुपतीच्या नावें मांसाच्या आहुती दिल्या जात असून श्रीकृष्ण तें धनुष्य पाहायला आले त्या दिवशीं तें पशुपतीनिमित्त झालेले हवन पुरें झालेलं असावें. कारण दुसऱ्या दिवशीं मखसमाप्तिनिदर्शक अशी अनिर्बंध कुस्ती व्हावयाची होती.

अशा तऱ्हेचा हा यज्ञ म्हणजे कर्मकांडाचें पूर्ण हिंसात्मक स्वरूपच होतें म्हणाना! श्रीकृष्णांना अर्थातच ें पसंत नव्हतें. त्यांचें स्वतांचें मत त्यांनीं गीतेंत सांगितल्याप्रमाणें असें होतें व आहे कीं—

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञा ज्ज्ञानयज्ञः परंतप। गी. ४।३३

म्हणजे बाकीच्या सर्व द्रव्यमय यज्ञापेक्षां ज्ञानयज्ञ हा सर्वांत श्रेष्ठ होय. या ठिकाणीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं ज्याप्रमाणें द्रव्याचा उपयोग करून केलेला यज्ञ तो द्रव्ययज्ञ त्या प्रमाणेंच ज्ञानाचा उपयोग करून केलेला यज्ञ तो ज्ञानयज्ञ होय. परंतु हें कसें तें सांगण्यापूर्वीं ज्ञानयज्ञ म्हणजे काय तें गीतेंत दिल्याप्रमाणें पहिल्यानें सांगूं. श्रीकृष्ण म्हणतात.:—

सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।
आत्मसंयमयोगाग्नौ जुव्हति ज्ञानदीपिते॥ गी० ४।२७

म्हणजे ज्ञानेन्द्रियें व कर्मेन्द्रियें यांनीं करावयाचीं सर्व कर्मे यापासून तों थेट श्वासोच्छास अपानवायु उचकी, जांभयी व ढेंकर इत्यादि प्राणवायु वगैरेंचीं कर्मे यापर्यंतचीं सारीं कर्मे परमेश्वरज्ञानपूर्वक आत्मज्ञानी पुरुषाच्या हातून अनासक्त बुद्धीनें व निरहंकार वृत्तीनें होऊं लागलीं कीं खरा ज्ञानयज्ञ होतो व असा ज्ञानयज्ञ सर्व द्रव्यमय यज्ञांत श्रेष्ठ आहे असें भगवान् म्हणतात. आतां हा असा कां आहे तें सांगूं.

एकंदर किती तऱ्हेचे यज्ञ असतात हें सांगण्यासाठीं गीतेंत पुढील श्लोक दिला आहे. तो असा:

द्रव्ययज्ञाः स्तपोयज्ञाः योगयज्ञास्तथा परे ।
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥४।२८॥

म्हणजे अत्यंत कडक निष्ठा ठेवून व नियमपूर्वक यत्नशील धार्मिक पुरुष स्वस्व-निष्ठेप्रमाणें जे यज्ञ करीत असतात ते पुढील प्रमाणें होत.

(१) द्रव्ययज्ञः—ज्यांत विविध प्रकारचीं स्थूल द्रव्यें, प्राणिज किंवा वनस्पतिजन्य, वापरून देवतोद्देशानें अग्नींत मंत्रोच्चारपूर्वक आहुति देण्यांत येतात असे यज्ञ.

(२) तपोयज्ञः—कोणता तरी एखादा नियम बराच दीर्घकाळपर्यंत लावून घेणें; उदाहरणार्थ सतत परमेश्वरचिंतन करणें इ० करीत राहणें किंवा गीतेंतील अ० १७ श्लोक १४, १५, १६ यांत सांगितल्या प्रमाणें शारीरिक वाचिक, व मानसिक वागणूक ठेवणें.

(३) योगयज्ञः—पातजलसूत्रान्तर्गत मनोनिग्रहाच्या शास्त्राप्रमाणें वागून समाधिसिद्धि प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नांत असणें.

(४) स्वाध्याययज्ञः—वेदाध्ययन, शास्त्राध्ययन वगैरेंत निमग्न असणें.

(५) ज्ञानयज्ञः—आत्मज्ञानयुक्त होऊन परमेश्वरार्पणपूर्वक फलाविषयीं अनासक्तबुद्धीनें आमरण प्राप्तकर्में हौसेनें करीत राहणें.

या वरील पांचही प्रकारच्या यज्ञांचे मुख्य दोन विभाग पाडतां येतील. ते असे.

(I) द्रव्यमय पण कर्मप्रधान यज्ञ व

(II) निव्वळ कर्मप्रधान यज्ञ.

पहिल्या प्रकारांत फक्त वरील पांचांतील द्रव्ययज्ञ तेवढे येतात. व दुसऱ्या प्रकारांत बाकीचे चारही तऱ्हेचे यज्ञ येतात. परंतु या सर्वांत शेवटचा ज्ञानयज्ञ तेवढा सर्वांत श्रेष्ठ होय. कारण पहिल्या प्रकारांतील द्रव्ययज्ञ हे यथासांग घडले पाहिजेत तरच त्यांचें फळ येतें; पण ते तसे घडले नाहींत तर पुष्कळदां स्वतां कर्त्यालाच बाधक होतात. तसेंच हे सांग होणें न होणेंही स्वतांच्या स्वाधीन नाहीं. कारण यांना हवीं असलेलीं द्रव्यें यथाशास्त्र मिळणें दुर्घट असतें व मिळालीं तरी पुढील क्रम देवतार्चन वगैरे विधि बिनचुक झाले पाहिजेत. परंतु ते होणें न होणें योग्य ऋत्विज मिळण्यावर अवलंबून आहे. बरें इतकें स ळें झालें तरी यापासून मिळणारें फळ म्हणजे स्वर्गभोग; व ते तर अनित्य आहेत! तसेंच दुसऱ्या प्रकारांतील तपोयज्ञ, योगयज्ञ व स्वाध्याययज्ञ हे पहिल्या प्रकारांतील द्रव्यमय यज्ञांहून श्रेष्ठ खरे. कारण त्यांची सामुग्री मिळविणें तितकेंसें परस्वाधीन नाहीं. परंतु हे सांग घडले तरी त्यांचें फळ मात्र स्वर्गभोग किंवा योगयज्ञांच्या बाबतींत

सिद्धींच्या योगें करून मिळणारें इह लोकांतील भोग यावांचून दुसरें नाहीं. परंतु शेवटचा जो ज्ञानयज्ञ त्यानें मात्र पूर्ण भगवत्सायुज्यता प्राप्त होऊन प्राणी जन्म-मरणांतून सुटतो.

परंतु हें कसें तें सांगण्यापूर्वीं येणारी एक शंका देऊन तिचें निराकरण करूं. ती शंका अशी कीं योगशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें, पूर्णसमाधि प्राप्त झाली कीं जीव परब्रह्मस्वरूपांत निमग्न होतो. परंतु तो तसा फक्त समाधिकाळांत तेवढा असतो. म्हणून कदाचित् आकस्मिकरीत्या तो मरण पावल्यास त्याच्या मनांत मरणकाळीं असलेल्या विचारानुरूप त्याला जन्म येणें संभवनीय आहे. तसेंच आधीं पहिल्यानें ही स्थिति प्राप्त होण्यापूर्वींच अप्सरा वगैरे येऊन त्याला मोह पाडतात व ते भोग त्यानें त्यावेळीं तुच्छ मानून सोडून दिले तरी मरणकाळीं समाधिस्थितीचा भंग झाल्यास त्याला पुनर्जन्म होणें चुकत नाहीं. परंतु ज्ञान-ज्ञाचें तसें नाहीं. हा यज्ञ करणारे नेहमींच सहजसमाधींत असल्यामुळें त्यांना केव्हांच समाधिस्थितीचा वियोग होत नाहीं. श्रीकृष्ण गीतेंतील दुसऱ्या अध्या-यांत निष्काम कर्मयोगाचें महत्व अर्जुनाला कथन केल्यावर शेवटीं म्हणतात:—

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।
स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥ २।७२ ॥

म्हणजे ब्राम्ही स्थितीला पोंचलेला मनुष्य केव्हांच मोह पावत नाहीं एव-ढेंच नव्हे तर अंतकाळच्या प्राणान्तिक वेदनांच्या वेळींही ही स्थितिप्राप्त झालेला मनुष्य पूर्वींप्रमाणेंच त्यावेळींही शांतचित्त राहूं शकतो; व म्हणूनच ब्राह्मी स्थितींत अंतकाळींही राहतां आल्यामुळें 'अंते मतिः सा गतिः' या न्यायानें मोक्षाप्रतच निस्संशय जातो.

यावर कोणी असें विचारील कीं तपोयज्ञ व स्वाध्याययज्ञा याप्रमाणेंच ज्ञानय-ज्ञही कर्ममय अथवा कर्मजन्यच आहे; कारण गीतेंतच नाहीं का म्हटलेलें कीं

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान्——— । ४।३२

म्हणजे परम अक्षर अशा ब्रह्माच्या ठिकाणीं केलेले व म्हणूनच ज्यांचें फळ मिळाल्यावांचून राहत नाहीं असे अनेक तऱ्हेचे हे सर्व यज्ञ कर्मजन्यच होत म्हणून? तर मग ज्ञानयज्ञच तेवढा वेगळा श्रेष्ठ कसा? तोही कर्मजच असल्या-मुळें त्याचें ही फळ मिळणारच. तर ह्या दोन प्रश्नांवर आमची उत्तरें अशीं कीं तपोयज्ञ योगयज्ञ व स्वाध्याययज्ञ यांतहीं कर्में नियम लावून घेऊन करावयाचीं असल्यामुळें व तीं करण्यासाठीं उदरभरणासाठीं करावा लागणारा नित्याचा व्यव-

हार मनुष्याला बाजूला ठेवावा लागत असल्यामुळें त्यांचें जें नैसर्गिक फल तें मिळालेंच पाहिजे व मिळत नसेल तर कां मिळत नाहीं याची चौकशी केली पाहिजे अशी प्रवृत्ति होणें अपरिहार्य आहे; व त्यामुळें त्या कर्मांच्या फलांकडे आसक्तिपूर्वक दृष्टि लागणारच, व मग तें फळ भोगण्यासाठीं जन्ममरण हें ठेवलेलेंच. परंतु ज्ञानयज्ञांत सर्व नियतकर्में परमेश्वरार्पणपूर्वक व फलाविषयीं अनासक्त बुद्धीनें होत असल्यामुळें तीं कर्में–

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्न संशयम् ।
आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय ॥ ४।४१ ॥

म्हणजे ' सर्व कर्में पूर्ण निष्कामबुद्धीनें परमेश्वरार्पण करून वागलें असतां आपल्याला कर्मबंधनांतून मुक्तता करून घेतां येईल अशी खातरी करून देणारें ज्ञान आत्मज्ञानपूर्वक जे संपादन करतात त्यांची कर्मबंधनातून सुटका होते ' या गीतेंतील सिद्धान्ताप्रमाणें कर्त्याला बाधक होत नसल्यामुळें ज्ञानय हा सर्वयज्ञांत श्रेष्ठ समजला पाहिजे. परंतु हाही कर्मजन्य आहे व याचेंही फळ म्हणजे मोक्ष कर्त्याला मिळतोच परंतु तो मिळविण्यासाठींच तर सारी धडपड असल्यामुळें-- ही ज्ञानयज्ञ हाच सर्वयज्ञांत श्रेष्ठ आहे व याच अर्थानें,

' एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणोमखे ।
कर्मजान् विद्धि तान् सर्वान्——— ।

म्हणजे द्रव्ययज्ञांपासून ज्ञानयज्ञांपर्यंतचे सारे यज्ञ कसल्याना कसल्या तरी तऱ्हेचें कर्म केल्याशिवाय होऊं शकतच नाहींत ' असें सांगून झाल्यावर.

' एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे '

म्हणजे या गोष्टीची जाणीव तुला झाली कीं तुला मोक्ष मिळविणें जड जाणार नाहीं तूं तो सहज मिळविशील असें सांगितलें आहे. कारण मग तुला असें समजून येईल कीं–

' गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानवस्थितचेतसः '

अशानें, ' यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः ' म्हणून

' तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंगः समाचर '

या श्लोकांत श्रीकृष्णांनीं सांगितल्याप्रमाणें केलेल्या ' यज्ञाय ' ' आचरतः कर्म '

' ब्रह्मार्पणं ब्रह्महविः ब्रह्माग्नौ ब्रह्मणाहुतम् '

अशा तऱ्हेचे असल्यामुळें,

' ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्म समाधिना '

यांत सांगितल्याप्रमाणें, ' समग्रं प्रविलीयते ' ४।२३

म्हणजे जीं कर्में जीवाला बंधनकारक होत नाहींत त्यांनाच यज्ञ ही संज्ञा आहे म्हणून तूं अनासक्तबुद्धीनें सर्व कर्मे कर म्हणजे तीं सर्व मिळून एक मोठा यज्ञच होईल हें भगवंतांचें सांगणें लक्षांत घेऊन ब्रह्म म्हणजे परमअविनाशी तत्व व कर्म म्हणजे मायात्मक दृश्यजगताच्या उत्पत्तीला कारणीभूत होणारी शक्ती व तिचीं अनेक रूपान्तरें हीं दोन भिन्न नाहींत हें ओळखणाऱ्याला ब्रह्मप्राप्तीच होत असते हें तत्व अंतःकरणांत पुरें बिंबल्यामुळें ममत्वबुध्दी सोडून देऊन केवळ कर्तव्य म्हणून यज्ञार्थ आपलीं निसर्गतः प्राप्त किंवा प्रवाहपतित कर्में जे करीत असतात त्यांचीं कर्में त्यांच्या निरंतर ब्रह्मात्म्यैक्यभावनेमुळें 'ब्रह्मार्पणं ब्रह्म हविः ब्रह्माग्नौ ब्रह्मणाहुतं म्हणजे अर्पण करण्याची क्रियाही ब्रह्मच, जें हवन करावयाचें तो अग्नीही ब्रह्मच व हवन करणाराही ब्रह्मच' अशा रीतीनें सर्वच ब्रह्ममय असल्यामुळें त्यांना बंधनकारक न होतां उलट ब्रह्मस्वरूपीं स्वतां लीन होऊन पुन्हा कर्त्याला कर्मांच्या फेऱ्यांत कधींच न सांपडूं देतां त्यांतून कायमचे मुक्त होण्यास सर्वतोपरी मदत करतात. म्हणून अशा तऱ्हेचा हा जगांतील कर्मांचें स्वरूप ओळखून केलेला ज्ञानयज्ञ सर्वांत श्रेष्ठ आहे. म्हणूनच भगवान् म्हणतात कीं

सव कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।

म्हणजे सर्व कर्में करून शवटीं मिळवायचें काय असेल तर तें

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयं।
आत्मवंतं न कर्माणि निबधन्ति धनंजय॥ ४।४१

यांत सांगितल्याप्रमाणें कर्मबंधनांतून सुटण्याची युक्ती म्हणून आपण करीत असलेल्या सर्व कर्मांच्या फलाच्या ठिकाणची ममत्वरूप आसक्ति सोडून देऊन व अशा रीतीनें वागलों असता आपणांला मोक्ष मिळेल कीं नाहीं अशा बद्दलचा अंतःकरणांतील संशय पार घालवून देऊन आत्मज्ञानसंपन्न होत्साता खुद्द परमेश्वर करतो त्याप्रमाणें लोकसंग्रहार्थ आमरण सर्व व्यवहार हौसेनें करीत राहण्यास लागणारी समबुद्धिरूप ज्ञान मिळविणें हेंच होय. व हें ज्ञान ज्ञानयज्ञाशिवाय कशानेंही मिळत नाहीं असें

नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति' १८।४५

आणि संन्यास हा०

'काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासम्' गी० १८।२

म्हणजे सर्व काम्यकर्मांची वासना टाकून कर्मे केलीं कीं तीं करूनही न केल्यासारखीं होऊन सर्व खटाटोपाची परमसिद्धि जी मोक्ष तीं सहज प्राप्त होते. असें भगवंतांनींच स्वतां सांगून ठेवलें आहे.

असो. याप्रमाणें श्रीकृष्णांना कोणत्या तऱ्हेचे यज्ञ पसंत असून ते तसे कां हें सांगून झालें, आतां भगवंतांना हिंसात्मक यज्ञ अशाकरितां पसंत नाहींत कीं त्यांमुळें इहलोकींही समजून उमजून पाप करावें लागतें. मग परलोकीं ते यज्ञ कसलें पुण्य प्राप्त करून देणार तें दिसतेंच आहे ! श्रीकृष्ण म्हणतातः--

जघन्यगुणवृत्तिस्था अधोगच्छन्ति तामसाः । १४।१८

म्हणजे तमोगुणप्रधान हिंसेचा वगैरे विचार न करतां कर्म करणारे अशीही मंडळी फक्त पशुपक्ष्यांच्या जन्माला जाते, तसेच केवळ आपल्या धनमानादिकांचा डौल मिरविण्यासाठीं म्हणून केवळ नांवाचे यज्ञ करून जे दंभ माजवितात किंवा दुसऱ्याचें तळपट करण्याची इच्छा मनांत धरून जे यज्ञ करीत असतात त्यांना श्रीकृष्ण म्हणतात आपण--

क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेवयोनिषु ॥

म्हणजे त्या तशा पापी लोकांना पुनःपुन्हा आसुरीयोनींत ढकलीत असतों.

या प्रमाणें पाहतां श्रीकृष्णांना कंसाचा तो हिंसात्मक व अंतरांत कपट धरून दुसऱ्याचें तळपट करण्यासाठीं म्हणून उभारलेला यज्ञ पसंत नसल्यामुळें त्यांनीं तें धनुष्य मोडून टाकलें व क्षत्रियाचा जो धर्म कीं ' युध्देच्याप्यपलायनम् ' म्हणजे अंगावर कोणी शत्रु चालून आला असतां त्याला शूरपणानें टक्कर द्यावी त्याचें अवलंबन करून त्यांनीं धनुष्यरक्षकांना मारलें व कंसाच्या सैन्याला पिटाळून लावलें.

एवढें होईपर्यंत दिवस मावळला तेव्हां रामकृष्णांनीं एका धर्मशाळेंत ठाणें देऊन रात्र काढली वगैरे वृत्तान्त पूर्वींच सांगितला आहे.

---

# निबंधमाला—तिचें स्वरूप आणि कार्य.

कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांची निबंधमाला सुप्रसिद्धच आहे. शास्त्रीबोवा मराठी भाषेचे गद्याचार्य आहेत. मालेचे मूळ ७२ अंक प्रयासानें मिळवून निबंधमालेवर ६४ पानांचा एक टीकापर निबंध शके १८२६ मध्यें ' सरस्वतीमंदिर' मासिकांत रा० पांगारकर यांनीं लिहून प्रसिद्ध केला होता. तोच पुन्हां स्वतंत्र पुस्तकरूपानें छापला आहे. शास्त्रीबोवांचें संक्षिप्त चरित्र व नवीन अवतरणें जास्त दिलीं आहेत. निबंधमालेचा हेतु, मालेंतील मुख्य व अवांतर विषय, मालेचे गुणदोष यांचें सविस्तर विवेचन यांत निर्भीडपणानें केलें आहे. किं. ८।१० आणे.

# प्रचलित गुरुशिष्यसंबंधाविषयीं कांहीं विचार.

लेखक — रा. राम गोसावी, नाशीक.

मागें मुंबईच्या एका पत्रानें कोण्या एका महाराजांची अनुचित कृत्यें चव्हाट्यावर आणून अंधश्रद्धेवर चाललेली ही गुरुशिष्यसंस्था नष्ट होईल तर बरें, असें म्हटलें होतें. एकंदरींत पाहतां इंग्रजी-शिक्षितांत या संस्थेविषयीं फारशी आदर-बुध्दी नसून, असली तर उपहासबुध्दीच आहे. याचीं कारणें अनेक आहेत. सध्यांचा काल राजकीय क्रांतीचा असल्यानें राजकीय विषयानें लोकांचीं अंतः-करणें इतकीं व्याप्त झालीं आहेत कीं धर्म, परमार्थसंस्कार या गोष्टींचे सांधिक महत्व फार लोपून जाऊन कांहीं व्यक्तींच्या कानाकोपऱ्याचा आश्रय करूनच त्या तगल्या आहेत असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. राजकीय गोष्टींना पोटापाण्याचें महत्व असल्यानें आपल्या आजच्या दारिद्र्यकालांत त्यांना सर्वव्यापी महत्व यावें हें साहजिक आहे. जो धर्म, परमार्थ किंवा तत्वज्ञान चालू राजकीय चळवळींना उपयुक्त नाहीं त्याविषयीं त्याच्या अनवश्यकतेमुळें बेजबाबदार तुच्छता नवीन उथळ लोकांत उत्पन्न झाली आहे. या वृत्तीची झळ या प्राचीन गुरुशिष्य--संस्थेलाही बसावी हें अर्थात ओघानेंच आलें. दुसरें कारण लोकशाहीच्या तत्वाचें! इंग्रजी शिक्षणानें पहिला कोणचा जबरा संस्कार उत्पन्न होत असेल तर आपल्या जुन्या गोष्टी ओंगळ वाटावयाला लागून नवीन पाश्चात्य वस्तु, त्यांच्या पद्धती, त्यांचीं तत्वें याविषयीं साभिलाष आसक्ति उत्पन्न होतें. पाश्चात्य देशांत आज लोकशाहीविरुद्ध प्रत्याघात उत्पन्न झाला असला तरी आपल्या आजच्या सर्व सुशि-क्षितांपुढें लोकशाही हें ध्येय होऊन बसलें आहे. लोकशाहीविषयी पहिली उथळ वुद्धि म्हणजे समसमानतेची! कोणच्याही कारणानें तुम्ही मोठे व आम्ही लहान, हा विचार नवीन संस्कार झालेल्या माणसास खपत नाहीं! सर्व जातिमत्सराच्या भूतांचें मूळ हेंच होय! कारण कमेटीचा झाडूवाला व दहागावचा जहागिरदार खुर्चीस खुर्ची लावून जर कायदेमंडळांत समान अधिकारानें बसूं शकतो तर त्याच्याबाहेर आल्यावर ब्राम्हण जहागिरदाराच्या पाया पडावे हा विचार झाडू--वाल्यास कसा रुचणार! लोकशाहीच्या तत्वानें आलेले समसमानतेचे वारे इतकें पसरलें आहे कीं भटाचा मोठेपणा महारास खपूं नये, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. पण मुलास बापाचा, शाळेंतील विद्यार्थ्यांस शिक्षकाचा, व घरांत बायकोस नव-ऱ्याचाही वरचढपणा खपेनासा झाला आहे. अशा स्थितींत एका दोन हाताच्या दोन पायाच्या मनुष्यास प्रत्यक्ष देव कल्पून दुसऱ्या दोन हाताच्या दोन पायाच्या मनुष्यानें आपल्या सर्वस्वाच्या अर्पणबुद्धीनें त्या दुसऱ्याच्या चरणीं विनम्र व्हावे,

ही गोष्ट नवीन मनास दिवसें दिवस असह्य वाटू लागली आहे. तेव्हां असें जे कोणी लोक करतात किंवा करवून घेतात ते भोळे, भोंदू, अंधश्रद्ध असे नवीन लोकांस वाटावें यांत आश्चर्य नाहीं. तिसरें कारण खुद्द जुन्या लोकांकडूनच दिले गेले. तें हें कीं आंतील खरें सत्व जाऊन बाहेर पोकळ डौल मात्र बोलण्या चालण्यांत राहिला. वरून दिसायला सुंदर पण आंत मात्र शेण अशी मातीच्या चित्रासारखी बहुतांशी स्थिती झाली. आंतील प्राण जावा व बाहेरचा शृंगारसाज मात्र कायम राहावा अशाच पुष्कळशा गोष्टी झाल्या. धर्माचे मार्तंड खरे पण खग्रास ग्रहण लाभलेले, भूदेव खरे पण खेटराचीच पूजा बांधण्याच्या योग्यतेचे आणि वरून गुरुमहाराज खरे पण आंतील कृती एकाद्या महारापेक्षा सुद्धा दर्जानें लघु, असा पुष्कळसा खोटेपणा झाला. पण अशीं बाह्य कारणें अनेक झालीं म्हणून सर्व संस्थाच अनवश्यक ठरते कीं काय हा प्रश्न आहे!

## खऱ्या मार्गदर्शकाची आवश्यकता.

तेव्हां विचार करितां असें दिसतें कीं ज्याला ज्ञानाची गरज आहे त्याला ज्ञानदात्याचीही गरज लागणारच. असहाय्य लहान अर्भकाला आईशिवाय काय गति आहे? मग ती प्रत्यक्ष जन्म देणारी आई असो, कीं जन्म न देतां आपल्या स्तनचें दूध देणारी दाई असो किंवा बाटलींतून दूध पाजणारी हॉस्पिटलमधील नर्स असो! असाच प्रकार असहाय्य अज्ञान्यांविषयीं नाहीं काय?

सर्व बाजूनें बुद्धि गोंधळली आहे, खऱ्या खोट्याविषयीं अंतःकरण मूढ बनलें आहे, सर्व गोष्टी असार होऊन जीवित हें हताश झालें आहे, अशा मनुष्याला बुद्धीचें पटल दूर करणारा, खोटें बाजूला सारून खरें तळहातच्या आवळ्याप्रमाणें दृष्टीपुढें ठेवणारा व या सर्व असार विश्वाभासामागील सार दाखविणारा आवश्यक नाहीं काय? पुष्कळशा पदवीधर मित्रास हीं कामें पुस्तकानें होतील असें वाटतें! पण मग पुस्तकें कोणाची! ज्यांच्या पुस्तकानें अशीं कामें होतील असा त्यांना विश्वास वाटतो, त्यांच्याच योगतेचा एकादा ज्ञानदेव, एकादा एकनाथ, एकादा तुकाराम त्यांना मिळाला तर तो त्यांना नको वाटेल काय? गुरुशिष्यसंस्थेंतच मंबाजी असतात आणि दुसऱ्या कोठें ते नसतात असें थोडेंच आहे! मार्गांतून घरंगळणारें विश्वामित्र या बाजूलाच पाहावयास सांपडतात व दुसऱ्या सर्वबाजू शुक्राचार्यांनीं भरल्या आहेत असें थोडेंच आहे? गांव तेथें उकिरडा, गुलाब तेथें कांटे याप्रमाणें या गोष्टी चालावयाच्याच पण उकिरड्यासाठीं गांवच सोडावा किंवा कांट्यासाठीं गुलाब टाकावा ही बुद्धि शहाणपणाची नाहीं, दुसऱ्या लोकांस असें वाटतें कीं सर्व कांहीं आम्ही स्वप्रयत्नानें मिळवूं. बुद्धि कांहीं वाईट नाहीं. पण इतर बाबतींत आपण असेंच करतो काय याकडे एकदां जरूर बघावें. आईबा-

पाच्या पैशावर शिकावें, बायकोच्या यत्नाचा ताकभात खावा, देशभक्तीच्या गोष्टी करून परदेशी जिनसवर चैन मारावी, आणि ज्या गोष्टीचा ठावठिकाणाही माहीत नाहीं, बुद्धि जेथें जात नाहीं म्हणून म्हणतात, वेद जेथें थकले म्हणून बोलतात, वशिष्ठयाज्ञवल्क्यांच्या योगसामर्थ्यांच्या शिड्या जेथें कमी पडल्या अशी बातमी आहे. तेथें आपल्या स्वयंबुध्दीनें व केवळ स्वप्रयत्नाच्या बढाया माराव्या हे जरा बलिशपणाचें वाटतें! शरीर जेथें आपलें नाहीं व प्रत्यक्ष बढाया मारणारी बुध्दीच जेथें दुसऱ्यापासून आली आहे तेथें सारेंच स्वप्रयत्नानें मिळवूं हें म्हणणें खोटें आहे. याचा अर्थ कोणी गुरु शिष्यास स्वतांच्या प्रयत्नावांचून आपल्या झोळींतून देव काढून देतो असा नाहीं. पण व्यवहारांत बाप जसा आपल्या भांडवलानें मुलास संसारांत लावून देतो त्याप्रमाणें परमार्थांत गुरुही आपल्या मिळविलेल्या अनुभवानें एकाद्या आर्तजिज्ञासूस योग्य वाटेस लावूं शकतो. मार्गदर्शकाच्या अभावीं कालाचा व शक्तीचा अपव्यय होण्याचा फार संभव असतो. दुसरें असें कीं पोटाची विद्या शिकण्यास मास्तर लागावा अनुभवासाठीं कारखान्यांत अप्रेंटिस राहावें लागतें तरी तें कबूल करावें, स्वतांपेक्षा लहान मुलांस अक्कल शिकविण्यासाठीं फुरफुरावें व परमार्थांत गुरूची जरूर नाहीं म्हणून म्हणावें ! हें जरा अविचाराचें दिसतें. यावर आजच्या कालांत ज्ञानदेवतुकाराम कोठे आहेत म्हणून पुष्कळ नवीन लोक विचारतात.

## मार्गदर्शकाची योग्यता

या ठिकाणीं गुरुच्या योग्यतेविषयीं प्रश्न उत्पन्न होतो. येथें अडचण अशी उत्पन्न होतें कीं मोठ्यास त्याहून धाकट्याची परीक्षा करिता येतें, त्याप्रमाणें धाकट्यास मोठ्याची परीक्षा करिता येईलच याविषयीं निश्चिती नाहीं. यासाठींच खऱ्या मुमुक्षूस गुरु आपणहून भेटतो असें मानण्याची आपल्याकडे प्रथा आहे. लहानग्या मुलाची भूक आईस लागते असें म्हणतात, त्याप्रमाणें खऱ्या आर्तांची आर्ति हरण करण्याविषयी ज्याच्यांत तें सामर्थ्य असते तो समर्थ आपण होऊन त्या आर्ताकडे जातो. पण या प्रारब्धाच्या गोष्टी झाल्या. ज्यांचें असें संचित नाहीं पण आर्ति मात्र जबर आहे त्यांनीं काय करावें असा प्रश्न उत्पन्न होतो. या ठिकाणीं माझ्या एका मित्राचा अनुभव नमूद करण्यासारखा आहे. गोसावी बैरागी धुंडावे हा त्याचा जन्माचा नाद आहे. गाण्याचा शोकी जसा कोठून एकादी लकेर आली की तिकडे निघून जातो त्याप्रमाणें कोणा साधुसन्याशाची मनोवेधक गोष्ट त्यानें ऐकली कीं त्याच्यासाठीं तो सर्व उद्योग सोडून देतो. आज-पर्यंत त्यानें लहान मोठ्या प्रसिद्ध अप्रसिद्ध अशा ४० साधूसंतांच्या गांठीभेटी

घेतल्या, त्यांच्या संगतींत काळ कंठला, त्यांच्या हरएक प्रकारच्या सेवा केल्या पण त्याचें समाधान करणारा असा अद्याप त्यास लाभला नाहीं ! त्याच्या आर्तीविषयीं शंका नाहीं. कारण त्यागाची बुद्धी प्रखर आहे. फुकाफुकीं कोण आपला जीव दुःखांत घालून घ्यावयास तयार आहे ? आतां अशा मनुष्यानें काय करावें ? त्याच्या साधुसंतांच्या शोधांत पुष्कळसे त्यास वेदान्ताच्या मोडक्या तोडक्या परिभाषेवर परमार्थाच्या फुक्या लंब्याचवड्या गप्पा मारणारे भेटले, कोणी त्याच्या पासून पैसे मागितले, कोणी त्यास पांच सहा वर्षे एकनिष्ठ सेवा करा म्हणजे मग शिकविण्याच्या गोष्टी बोलूं, असें म्हणाले. एकानें त्यास फक्त भस्त्रिका शिकविली व पुढें ठणठणपाळ करावयास सांगितले. नाममंत्र किती सांगितले याची गणतीच नाहीं. आतां यांत सर्वच वाईट होते असें नाहीं. कांहीं चांगले होते. कुवतच तितकी होती. कांहींच्या प्राक्तनकर्मानें भक्तगणांचा मेळावा त्यांच्या भोंवती जमला होता. पण ‘ तांबेका देनेवालेको सोनेका मिलेगा ’ असा सोनेरी आर्शिवाद देणाऱ्या फकिरापेक्षा त्यांचा डामडौल जास्त नव्हता पण असे असूनही परमेश्वरावरही ताण करणाऱ्या एकांना हागण्यामुतण्याचा बिलकुल विधिनिषेध नव्हता व त्यांच्या नाकाचा वास मेला होता कीं कोण जाणें जेवण्याच्या ताटांत देवाच्या मूर्तीवर, व केव्हां तर भक्ताच्या मांडीवरच ते विधी करीत ! एकाच्याही खालील दुर्गंधी वर तोंडांत येऊन बसली होती. आईमाईच्या उद्धाराशिवाय बोलणे नव्हते व विषयेंद्रियांच्या नांवानें एकदा शंख केल्याशिवाय वाक्य बाहेर पडत नव्हतें. कोणचा परमार्थ त्या शद्वांत दडून बसला होता हे त्या परमात्म्यालाच माहीत! अशा संतांच्या भोंवती जमलेला शिष्यगणही माझ्या मित्रास निरनिराळ्या प्रकारचा दिसला. कोणी संसारचिंतेनें विसाव्यासाठीं आले होते. कांहीं विचारे खरे आर्त जिज्ञासु होते पण इतर पंढारी शिष्यांच्या मेळाव्यांत गुरु महाराजांना त्याची दादही नव्हती. गुरुशिष्यसंस्थेची विटबना होण्याला खरे कारण कोण असतील तर असे महाराज व असे त्यांचे शिष्यच होत. खरोखर ज्ञानदेवासारख्या अधिकारी पुरुषानेंहीं ‘ मी लेंकरूं, ‘ मी दीन ’ ‘ मी दास ’ असे म्हणावे तेथे इतर प्राकृत हेंदऱ्यांनी मी सर्वज्ञ ‘ मी ब्रह्मज्ञ ’ असा ताठा व डौल मिरवावा ही करणी खरोखर अधोगतीची आहे. जे खरोखर समर्थ आहेत, त्यांना मजसारख्या क्षुद्रानें कांहीं सांगण्याची जरूर नाहीं, व ते असे वागणार नाहींत अशी मला खात्री आहे, पण ज्या कोणा साधारण माणसाच्या कपाळी गुरु होणें आले असेल; योग्यता, ज्ञान अनुभव बेताचाच असून सभोंवती जिज्ञासू लोक जमले असतील; त्यानें एक प्रांजलपणा तरी राखावा. खऱ्या भाविकाला आडमार्गाला लावूं नये, आणि कोणीही मनुष्यानें किंवा स्त्रीनें पोरासाठीं किंवा पोटासाठीं

कोणास गुरु करून त्याला खाली ओढण्याचें पातक आपल्या माथ्यावर घेऊं नये. बाकी स्वार्थी शिष्याच्या फंदानें जो गुरु फसला, तो गुरु कसला किंवा शिष्याच्या पैशावर, बायकोवर ज्याचा डोळा आहे तो गुरु नसून गुरुरूप धारणकरणारा चोरच समजण्यास हरकत नाहीं. सारांश दोघांच्याही दृष्टींत जास्त सरळपणा व प्रांजलबुद्धि आली पाहिजे. अंतरांत स्वार्थ ठेवून बायाबापड्यांना भोंदावे त्यापेक्षां सरळ सरळ दरोडेखोरी पत्करावी किंवा अंतरात पोटाच्या आशा भरवून गुरु करावा त्यापेक्षां सरळ भिका मागाव्या, सिद्धसाधकपणा करून बायका आणि पैसा मिळविण्याचा परमार्थाच्या नांवावर धंदा करावा हे लाजिरवाणें आहे! गुरुमहाराजानें जशी खोटी सर्वज्ञपणाची व सर्वशक्तित्वाची घमेंड मारूं नये, त्याप्रमाणें शिष्यानेंही अशा भोंदू गुरूच्या केवळ आज्ञेसाठीं म्हणून आपले देह अकारणीं विकूं नये. पातिव्रत्याची जशी स्त्रियांत कल्पना आहे त्याप्रमाणें गुरुनिष्ठेविषयीं सुद्धा आपणां लोकांत फार श्रद्धा आहे. पण खरोखर हा संबंध अत्यंत अन्योन्य आहे. रामाची स्त्री सीता पतीव्रता होती असें सर्व लोक बोलतात पण रामही सीतेचा एकपत्निव्रती पती होता हे लोक तितक्या जोरानें बोलत नाहींत! शिष्याची परीक्षा गुरूनें जरूर घ्यावी पण मागून त्याची आर्तीही फेडण्याचें सामर्थ्य असल्यावरच करावी, या सर्व गोष्टी आपणां सर्वांच्या कानाला कडु लागतात व अप्रशस्त वाटतात पण जगांत असला अप्रशस्त प्रकार होतो हें सर्व कबूल करतील. समर्थ गुरूच्या बाबतींत या कोणच्याच गोष्टी बोलण्याचें कारण नाहीं. त्याला समज देण्याची जरूर नाहीं, मज क्षुद्रजंतूची तशी लायकी नाहीं आणि म्हणूनच, ज्याच्या जवळ खरी आर्ति आहे ज्याचा जीवात्मा ह्या असार व दुःखमय जगांतून उठून त्या सच्चिद्घन परमात्म्याविषयी तळमळत आहे त्याकडे तो सर्व सत्ताधीश योग्य अशा समर्थाची योजना करतो किंबहुना तोच प्रत्यक्ष कोणाच्या तरी रूपानें त्याच्याकडे येतो म्हणूनच सद्गुरुस प्रत्यक्ष परमेश्वर मानण्याची आपल्याकडे योग्य प्रथा आहे. व या साठींच आपले अंतःकरण अधिक शुद्ध, अधिक सत्यमय हरक्षणी सुचेल त्यामार्गानें खऱ्या मुमुक्षूनें करावे. आपल्या पूर्णपुण्याईची रेषा ज्या क्षणीं उघडणार असेल त्या क्षणीं तो करुणाघन कोणाच्या तरी रूपानें येईल, अशी त्यानें श्रद्धा बाळगावी. उगाच लगबगीनें धांडोळया घ्याव्या कोणाच्या तरी गळयांत माळ घालावी व मागून पस्तवावें, हें बुध्दीचें काम नाहीं. तेव्हां या सर्व गोष्टी ध्यानीं ठेवून त्याच्या कृपेची आस करावी हेंच बरे. आणि या मार्गांत तरी त्याच्या कृपेशिवाय दुसरा आसरा कोण कोणास देऊं शकणार?

# उपनिषदांतील कांहीं वेंचे.

अनुवादक— श्रीराम गोसावी, नाशीक.

१ ईशावास्य.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुंजीथा मा गृधः कस्यस्विद्धनम् ॥

अनुवाद '—या जगांत जें जें कांहीं आहे सर्व परमेश्वरानें वसलेलें आहे, तोच सर्वत्र व्यापला आहे, त्याचीच हीं सगळीं रूपें आहेत, अशी बुध्दी करावी या भावनेनें सर्वत्र पाहवें, म्हणजे व्यक्तिविषयक मर्यादित बुध्दीचा त्याग होतो आणि याच त्यागबुध्दीनें आपल्या अधिकारानुरूप मिळणाऱ्या सर्व भोगवस्तूंचा स्वीकार करावा, त्यांचा उपभोग घ्यावा. दुसऱ्याच्या धनावर दृष्टी ठेवूं नये.

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः ।
एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥

अनुवाद—वरील प्रकारची ईशावास्य बुद्धि ठेवूनच मनुष्यानें कर्में करावीं, आपल्या जन्मानें, कुलानें आपल्या भागीं आलेला आचार 'परमात्म्याची इच्छा' या बुध्दीनें करावा आणि आपली जी नियत शंभर वर्षांची जीवनमर्यादा तीपर्यंत याच बुध्दीनें जगण्याची इच्छा धरावी. कर्मचक्रांतून सुटण्याला इहलोकांत या परमात्मरूप बुध्दीशिवाय दुसरा मार्ग नाहीं. अशा बुध्दीनें वर्तलें असतां कर्मांचा लेप लागत नाहीं. त्याचीं पापपुण्यरूप फळें कर्त्याला बंधनकारक होत नाहींत.

असूर्या नाम ते लोका अन्धेन तमसा ऽऽवृताः ।
तांस्ते प्रेत्याभिगच्छन्ति ये के चात्महनो जनाः ॥

अनुवाद—परंतु अंधतमानें ज्यांची बुद्धि आवृत झाली आहे, हे सर्व चराचर परमात्म्यानें व्यापलें आहे हें ज्यांना दिसत नाहीं, आपल्या व्यक्तीचेंच अवडंबर माजविण्यांत जे गर्क झाले आहेत, ते लोक निसंःशय आसुरीच होत. हृदयस्थ परमात्म्याला जे देहबुध्दीनें लेखतात, व स्वतांच्या विषयसुखाच्या मापानें मोजतात ते आसुरीबुध्दीचे आत्महत्यारी लोक या देहाला सोडल्यानंतर खरोखरच राक्षस भूतपिशाचांच्याच योनीला जातात, ज्यांनीं देहबुध्दीनें त्या विभुपरमात्म्याला पाहिले त्यांना मेल्यानंतर झाडाचे दगडाचेच देह प्राप्त होतात.

यस्तु सर्वाणि भूतानि आत्मन्येवानुपश्यति ।
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ॥

अनुवाद—सर्व प्राणिमात्रांत जो स्वतांचींच रूपें पाहतो, सर्वांच्या गुणदोषांविषयीं, सुखदुःखांविषयीं ज्याच्या मनांत आत्मबुद्धि आहे; आपण तसे ते किंवा

ते तसे आपण किंबहुना ते आपण एकच हें ज्याला कळले तो कोणाची घृणा करणार ? तो कोणाची निंदा करणार ? त्याला कोणाचा द्वेष किंवा मत्सर वाटणार ?

यस्मिन्सर्वाणि भूतानि आत्मैवाभूद्विजानतः ।
तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ॥

**अनुवाद**—ज्या विद्वान् मनुष्याला सर्वभूतें हीं आत्मरूप झालीं, आपला परावा ज्याला उरला नाहीं, तुझें माझें जेथें राहिलें नाहीं, त्या सर्व पृथक् पृथक् भावांत एक परमात्मरूप पाहणाराला आतां शोक कसला, मोह कसला ? जेथें सगळींच एक झालीं तेथें कोण कोणाचा शोक करणार ? कोणाला कोणाचा मोह होणार ?

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखं ।
तत्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ॥

**अनुवाद**---हे पूषन् ! या तुझ्या अतीव तेजानें तुझें मुखमंडल मी पाहूं शकत नाहीं, तुझ्या परम तेजस्वितेनें तुझें सत्यरूप आच्छादित झालें आहे; सत्याची उपासना करणाऱ्या मला तुझ्या सत्य परमार्थरूपाची प्राप्ती व्हावी एव--ढ्यासाठीं हें तेजोवलय जरा दूर सार. तुझा सत्य अंतरात्मा मला पाहावयाला मिळावा यासाठीं, हे भगवन् सूर्यनारायण हें मुखावर ओढून घेतलेलें तेजाचें पात्र जरा बाजूला कर.

अग्ने नय सुपथा राये अस्मान् विश्वानि देव वयुनानि विद्वान् ।
युयोध्य स्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां ते नम उक्तिं विधेम ॥

**अनुवाद**— हे अग्ने ! इहलोकांतून नेतांना आम्हांला सुंदर मार्गानें ने ! हे अग्निदेवा ! आमचीं सर्व कर्मे व भाव तुला विदित आहेत. माझ्या पापपुण्याचा साक्षी तूं आहेस ! मला फसविणाऱ्या माझ्या पापांचा नाश कर ! आणि माझें कर्मफल भोगण्यासाठीं मला सुंदर मार्गानें ने ! पुनः पुनः माझे तुला नमस्कार असोत.

---


## श्रीएकनाथ चरित्र. (आवृत्ति चवथी)

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचा जन्म व बाळपण. ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या. १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर. इतक्या प्रकरणांत नाथांचे पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून 'स्तुतिसुमनांजलि' नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणें दिलीं आहेत. पृ. सं. २८८ किं. ८१२. पत्ताः - व्यवस्थापक 'मुमुक्षु' नाशिक.

# " मध्वमुनीश्वरांची कविता "

( मागील अंकावरून समाप्त )

[ ले० वामन त्र्यंबक भाटे एम्. ए. पेळगांव ]

१२ असाच साधेपणा व सुमनोहरपणा यांच्या काव्यांत ठायीं ठायीं दिसून येतो.

वनवास प्रसंगीं सीतामाई " येते मी समागमां "

एवढेंच म्हणते, लक्ष्मण " जाउं नको रामा, टाकुनि आम्हां " तर कौसल्यामाई "टाकुनि जाउं नको, शरयूतीरीं मठ बांधु निराहूं, काय जनाची लाज" असें म्हणतात. यांत प्रत्येकाचें स्वभाव दिग्दर्शित होत नाहीं काय? सीतेला विरह सोसवणार नाहीं म्हणून ती साध्या शद्वांत मोजक्या शद्वांत स्वतःस बरोबर नेण्यास विनविते—नव्हे निश्चयात्मक शद्बांनीं रामास ' मी येते' म्हणून सांगते. कौसल्येस तर राज्य नको वन नको, मठ बांधून कोठेंही रामासंगती रहावयाचें आहे! पति-प्रेम व मातृप्रेम हीं कवीनें कशीं सुंदररीतीनें थोडक्यांत व्यक्त केलीं आहेत!

१३ श्रीरामचंद्र हे महापुरुष खरे, परन्तु मानवस्वभावानुसार " एकोहि दोषो " असा प्रकार येथेंही आहे. इकडे कवीचा कानाडोळा झाला नाहीं. वाली-हनन प्रसंगीं कवि म्हणतातः—

" सुग्रीवाचा भाऊ मारियला बाणें, तुझें काय त्यानें केलें होतें?
येकाची वनिता वालिसी येकापुढें हेंही तुझें कुडें जाणतों मी
आपल्या कामासाठीं करिसी मनधरणी सत्वर तरुणी (सीतामाई) भेटवावीं
मध्वनाथ म्हणे दिससी परमार्थी आहेसी कार्यार्थी गोडबोल्या ॥ "

१४ श्रीकृष्णचरित्रांत असांच साधेपणा व रम्यपणा व रससमुत्पत्ति कवीस साधलीं आहेत,

त्यांत ग्राम्यपणा आला—म्हणजे प्रसंगानुसार मुद्दाम आणला आहे. दहीं-काला वगैरे केल्यावर सर्व गोपांस खाण्यास पाचारण केलें आहे. सर्व देव गोप-रूपानें गोकुलांत आले आहेत याची कवीस जाणीव आहे व म्हणून "येरे महाद्या जोगड्या। येरे बेट्या अन्त्या नाग्या " असें त्यांस पाचारण आहे. विरहिणीचीं पदें, कृष्णविरहाचीं पदें, हुतूतू, हुंवरी, चेंडू, गोट्या, वगैरेवर शृंगारिक व रूपकात्मक पदें आहेत, " कानडा कौसालि " असे बोबडे बोल आहेत. पुढें प्रौढ गोपींस कृष्णविरह सहन होत नाहीं त्यांचे सांत्वन करण्यास उद्धवास पाठविलें आहे व शेवटीं कृष्णजयजयकाराचें भूपरागांतील अष्टपदीवजा पदही आहे.

" कुंदरदस्मित सुदर तें मुख पाहुनि इंदु गळाला "

व " जयजय मंजुल मुरलीधारिन् । कंजदलेक्षण कुंजविहारिन् "

हे अनुप्रास सहज साधले असून अतिरम्य दिसतात हें काव्यकौशल्य, ही रसशैली, ही माधुरी, या गोड चाली ज्या कीर्तनांत मध्व मुनींनीं आणल्या असतील त्या कीर्तनाची बहारी केवळ कल्पनेस कशी जाणवेल? अशा कीर्तनास पहिल्याच पदापासून रंग चढेल हें सांगणें कशास पाहिजे? अनंतफंदींच्या तमाशास साध्वी अहिल्याबाई येताहेत हें समजतांच फंदीबुवांनीं पगडी फिरवून तमाशास कीर्तनाचा थाट तत्काल चढविला तो मध्वमुनींच्याच पदावर; व बाईंच्या बोलांतून, प्रत्यक्ष मृत्यूच्या हल्यांतून, फंदीबुवा वांचले ते या मुनींच्याच पदावर! त्या वेळीं त्यांनीं "हरि तुझी मुरली घरघेणी" हें पद म्हटलें अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे.

१५ मुनीश्वरांस रामकृष्णांसंबंधानें संशोधन करावयाचें नव्हतें. केवळ प्रेमानें रंगून जाऊन गावयाचें होतें; अन्तःकरणांत प्रेमरसाचा झरा असल्यामुळें वाणींतून सहज रीतीनें गोड शब्द निघाले. मानवी व ईश्वरी प्रसाद अशाच प्रेमल हृदयांतून व ईश्वरी भक्तीमुळेंच निघणें शक्य आहे. लोककल्याणास उदात्तपुरुषचरित्रांचें केवळ गायन पुरें होतें, तेंच अप्रत्यक्षरीत्या त्यांस बोध करूं शकतें. गोड गायनानें वृत्ति उच्च होतात, स्वतःच्या नीचतेचा विरस पडतो, व या वृत्ति नेहेमीं टिकल्या कीं मनुष्य पापविमुक्त होतो हेंच या मुनींच्या काव्यश्रवणाचें फल होय!

प्रेमानें अन्तःकरण प्रफुल्लित झालें व आपण कांहीं विशेष करीत आहों — केलें पाहिजे—अशी भावना नाहींशी झाली, नव्हे, आपण जें करीत आहों, जें गात आहों तें लोकांस आवश्यक आहे अशी दृढ विश्वासाची व आत्मश्रद्धेची भावना उत्पन्न झाली व नंतर नेहेमींचेच शब्द योजून जरी गायन केलें तरी तें गायन श्रोत्यांस मोहून सोडतें याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे श्रीमध्वमुनीश्वर या साधुपुरुषाची कविता हें होय.

—— x ——

---

# आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थांवर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृत्तांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्र-महोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. 'उपकृतिस्मरण' हें ७६ श्लोकांचें नवीन आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा, ग्रंथाचा व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं. ८१२

# कान्हू पाठक.

कान्हूपाठक हे शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण पुणें जिल्ह्यांत केंदुरपाबळचे वृत्तिवान् जोशी होते. हे ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रेमांतले होते. ज्ञानेश्वरांनीं समाधि घेतली त्यावेळीं आपली सारी चीजवस्त यांस दिली. ज्ञानेश्वरांचे समाधिनंतरचें कीर्तन यांनीं केलें व तो मान अजून त्यांचे घराण्याकडे चालत आहे. यांच्या गुरूचें नांव नागनाथ. यांचा 'गीतासार' ग्रंथ व एक काव्य उपलब्ध आहे. शिवाय कान्हो त्रिमल पाठक 'नामा पाठक' यांचे नांवावर अश्वमेधग्रंथ व नामरत्नमाला, भरत–भेट इ० प्रकरणें उपलब्ध आहेत. यांचा पुत्र हरि व नातु नामापाठक. नामापाठक शके १३०० च्या सुमारास झाला आहे. यांचा वंश केंदुर पाबळ येथें आहे.

कान्हो पाठकाचा गुरू कोण? 'तरी हृदयीं धरी नागेश। ह्मणे कान्हो पाठक अरे जना' असा स्वतः कान्हो पाठक यांनीं आपल्या एका अभंगांत नागेशाचा ऊल्लेख केला आहे. या नागेशाची माहिती मिळाली नाहीं.

पाठकाचें मूळनाव राजपाठक. हे चाकणच्या कोणा मांडलिकराजाचे जोतिषी.

वाद करितां नींदा। घडती दोश ॥ २ ॥
जरी तुज देवाचा छंद। तरी सांडी कामक्रोध ॥
तेणें परमानंद। होउनी ठासी ॥ ३ ॥
जरी तुज देवचि होवा। तरी मौन धरी पा जीव्हा ॥
तेणें तूं अनुभवा। पावसील ॥ ४ ॥
जरी तुज देवाचा सांगात। होवा अखंडीत ॥
तरी बैस पा नीवांत। साधुसंगीं ॥ ५ ॥
जरी तुज देवाचा विश्वास। तरी हृदयीं धरीं नागेश ॥
ह्मणे कान्हो पाठक। अरे जना ॥ ६ ॥

---


# मोरोपंत--चरित्र आणि काव्यविवेचन.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरथें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे. जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंग आहेत, यांत याची गणना इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षं पंतांच्या कवितेचा शीधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांची अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रती थोड्या आहेत. पृ. सं. ६२५ किं रु. २८८

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


| | | |
|---|---|---|
| जुनें वर्ष २६ | माघ शके १८५३ | नवें वर्ष १२ वें |
| मास ७ | मार्च इ. स. १९३२ | अंक ३ |

वार्षिक वर्गणी रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३०३

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी, ए.**

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.

मुद्रकः— विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६
लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | ... | १–२ |
| २ माधवाचार्य उर्फ विद्यारण्यस्वामी | .. | ३–४ |
| ३ हरिपाठाचे अभंग | ... | ४–८ |
| ४ ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य (अ. १६) | ... | ९–१६ |
| ५ श्रीकृष्णांचें चरित्रदर्शन (प्र. १२) | ... | १७–२६ |
| ६ अरिस्टॉटलचें ' मानवीव्यवहाराचें तत्वज्ञान ' | ... | २७–३२ |
| ७ उपनिषदांतील वेंचे ( मुंडक ) | ... | ३३–३६ |
| ८ श्रीज्ञानेश्वरांचें माहात्म्य ( कविता ) | ... | ३७–३८ |
| ९ घोंगडी व काऊ | ... | ३९–४० |


---

# महाराष्ट्र वाङ्मयाचा इतिहास—खंड पहिला.

## ज्ञानेश्वरनामदेवांचा काल.

प्रस्तुत ग्रंथ मुंबईस ' मुंबईवैभव ' छापखान्यांत छापत असून त्याची ता. १० मार्चपर्यंत ४८० पृष्ठें छापून झालीं आहेत. वर्ष प्रतिपदेच्या मंगल दिवशीं सदर ग्रंथ व्हावा अशा उमेदीनें जोरानें काम चालू आहे. कागद ग्लेज, जाड व देशी वापरला असुन टाईप उत्कृष्ट घेतला आहे. ग्रंथ ५०० पृष्ठांत आटपेलसे वाटलें होतें, पण आतां ग्रंथ ६४० पृष्ठांत आटपला तरी ठीक असें आहे; ग्रंथ आटोपशीर धरिला तरी वाढतच आहे. पूर्वार्धांत १ वेदविद्या २ उपनिषदांतील ब्रह्मविद्या ३ श्री भगवद्गीता ४ श्रीभागवत ५ भक्तिमार्गाचें अनादित्व व शिवविष्णूंची एकात्मता ६ मधल्या काळाचा थोडा इतिहास ७ तामिळांचे साम्राज्य तामीळसंत व तामीळ आचार्य हीं सात प्रकरणें असून उत्तरार्धांत ८ महाराष्ट्रदेश व मराठे लोक ९ महाराष्ट्री उर्फ मराठी भाषा १० आदिकवि मुकुंदराज ११ महानुभावपंथाचें मराठी वाङ्मय १२ गोरक्षनाथ व नाथपंथ १३ श्रीज्ञानेश्वरदर्शन १४ नामदेवचरित्र—पूर्वार्ध १५ मुक्ताबाई व जनाबाई १६ तत्कालीन इतर संत १७ ज्ञानेश्वरीचें परम-रहस्य १८ ज्ञानेश्वरी सृष्टि १९ अमृतानुभव व अभंग २० नामदेवचरित्र-उत्तरार्ध अशीं तेरा प्रकरणें आहेत. ग्रंथाची किंमत रु. ३ ठेवावी लागेलसें वाटतें.

नाशिक, मुमुक्षु कचेरी ] लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

मुमुक्षु मासिक
वर्ष १२ वें

# मंगलाचरण

मार्च १९३२
अंक ३



## अभंग

१

अनंताचे गुण अनंत अपार । न कळेचि पार श्रुतिशास्त्रा ॥१॥
तो हा महाराज विटेवरी उभा । लावण्याचा गाभा शोभतसे ॥२॥
कटीवरी कर ठेवी जगजेठी । पाहे कृपादृष्टी भक्तांकडे ॥३॥
पुंडलिकाचें तेजें जोडलासे ठेवा । एकाजनार्दनी सेवा देई देवा ॥४॥

२

मूर्ति चतुर्भुज वेल्हाळ । शंखचक्र गदा कमळ ॥१॥
मुकुट शिरीं कटीं मेखळा । कासे मिरवे सोनसळा ॥२॥
कौस्तुभ वैजयंती माळ । आकर्ण नयन विशाळ भाळ ॥३॥
ऐसा सुंदर सावळा । एका जनार्दनीं पाहे डोळां ॥४॥

३

आजी नवल जालें वो माये । पाहण्या पाहणें दृष्टी धाये ॥१॥
ऐसी लाघवी सुखकर मूर्ती । संतसंगें जाली मज विश्रांती ॥२॥
योगीश्वर जया चिंतिती । सनकादिक जया ध्याती ॥३॥
योगसाधनें नातुडे जो माये । एकाजनार्दनीं कीर्तनीं नाचताहे॥४॥

४

ॐकार स्वरूप सद्गुरू असंग । अक्षय अभंग पांडुरंग ॥१॥
नये जया ठायीं द्वैताद्वैतभाव । ब्रह्म स्वयमेव पांडुरंग ॥२॥
मस्तक हें माझें तयाचे चरणीं । असे जनीं वनीं पांडुरंग ॥३॥
परोपकारालागीं अवतार केला । आनंदाचा झेला पांडुरंग ॥४॥
नाम हें तयाचें जन्मपरण वारी । भक्ता साहकारी पांडुरंग ॥५॥
कायावाचामनें स्वरूपीं रहावें । नाम आठवावें पांडुरंग ॥६॥
प्रभा हे जयाची पसरली जनीं । चिद्रूपाची खाणी पांडुरंग ॥७॥
एका जनार्दनी देह हरपला । होऊनी राहिला पांडुरंग ॥८॥

# प्रेमानंदलहरी.

ॐनमो सच्चिदानंदघना । ॐनमो सकळसुखनिधाना ॥
ॐनमो परात्पर निर्गुणा । जगज्जीवना मूळबीजा ॥ १ ॥
तुझें रूप पाहतां दृष्टीं । निजानंद न समाये सृष्टीं ॥
तुटल्या जन्ममरणाच्या गांठीं । निर्भय पोटीं मी जालों ॥ २ ॥
आजी तुवा कृपावंतें । निरसिलें भ्रांतिकाळिमेतें ॥
निरसुनि ज्ञाना—अज्ञानातें । निजसुखातें मिळविलें ॥ ३ ॥
पूर्व कर्मांचिया नानापरी । गुरुभक्त ने घे आपणावरी ॥
राहोनि आनंदाभीतरी । साक्षित्वें व्यवहारीं वर्तत ॥ ४ ॥
शिव विरंची नारायण । आणी साधुसंत योगीजन ॥
हे स्वरूपीं असती निमग्न । यातें मायावदन दाऊं न सके॥ ५ ॥
जे जे कोणी अज्ञानी जन । तयासी दिसे पापपुण्य ॥
जे जीवन्मुक्त सज्ञान । त्यासी त्रिभुवन मुक्त दिसे ॥ ६ ॥
भर्तृहरीनें राज्य टाकिलें । तेणें श्रीगोक्षातें पुसिलें ॥
राज्य टाकूनि मुंडित झाले । कितेक गेले भूपती ॥ ७ ॥
जो सद्गुरूसी शरण जाये । तो काळाचाही काळ होये ॥
काळ तयासी शरण जाये । ऐसें बोलताहे वेदांत ॥ ८ ॥
स्वरूपीं अखंडदंडायमान । सर्वांठायीं परिपूर्ण ॥
येथें जीवासी कैचें जीवपण । समरसोनी एक जालें ॥ ९ ॥
याचि देहीं याचि डोळां । भोगिजे मुक्तीचा सोहळा ॥
ऐसा कोणी एक विरळा । तोचि जिव्हाळा स्वरूपाचा ॥ १० ॥
जो म्यां देखिला जनार्दन । देखतांच गेला भवभ्रम ॥
सुख जालें अनुपम्य घन । पावलों सदन मोक्षाचें ॥ ११ ॥
मन असतां आनंदाभीतरीं । उठती सुखाच्या लहरी ॥
ह्मणोनि वदली वैखरी । प्रेमसुखलहरी या नांव ॥ १२ ॥

श्रीएकनाथ.

१०३/२
१८-३-३

# माधवाचार्य उर्फ विद्यारण्यस्वामी

शृंगेरीचे पीठावर आद्य शंकराचार्यांनीं बसविलेले सुरेश्वराचार्य, दुसरे संक्षेपशारीरकाचे कर्ते नित्यबोधघनाचार्य, दहावे विद्यातीर्थ, अकरावें भारतीतीर्थ, बारावे विद्यारण्य, बत्तिसावे १९१२ त ब्रह्मीभूत झालेले नृसिंहभारती असे सहा पुरुष अत्यंत विद्वान् व थोर होऊन गेले. सांप्रतचे ३३ वे पुरुष चंद्रशेखरभारती हेही विद्वान् आहेत. ह्यापैकीं विद्यातीर्थ व विद्यारण्य हे अत्यंत प्रख्यात असून त्यांनीं पीठाला शोभण्यासारखी कामगिरीही केली आहे. विद्यातीर्थांचे गांव बिल्वारण्य असून त्यांचे पूर्वाश्रमीचें नांव सर्वज्ञविष्णु व गुरूचें नांव चंद्रशेखरमुनि असें होते. हे आचार्यपीठारूढ झाल्यावर यांनीं आपल्या निवडक सहा शिष्यांची सहा पीठांवर स्थापना केली. हे विद्यातीर्थ उर्फ विद्याशंकरभारती शके १२५८ मध्यें पीठारूढ होऊन शके १३०२ मध्यें ब्रह्मीभूत झाले. ह्मणजे हे ४४ वर्षे पीठावर होते. पहिले अनागोंदीचे हिंदुराज्य मोडून त्यांत अनवस्था माजली. अनागोंदी उर्फ किष्किंधा येथें नंदमहाराजांनीं शके ९२६ ते ९९८ पर्यंत राज्य केलें. त्यानंतर त्यांचा मुलगा विजयध्वज यानें तुंगभद्रेच्या दक्षिणतीरावर विजयनगर शहर वसविलें. नंदाच्या घराण्यांतील आठ पुरुषांनीं २०० वर्षे राज्य केल्यावर शके १२५६ मध्यें त्या राज्यांत बेबंदशाही झाली. यवनांच्या धाडी दक्षिणेंत येऊं लागल्या होत्या. त्यांनीं वेरंगळचें हिंदुराज्य घेतल्यावर त्या राजघराण्यांतील दोन बालकें जीवाच्या भयानें पळून विजयानगरच्या आसपास येऊन राहिली, व गवळ्याचा धंदा करूं लागलीं. त्यांना माधवाचार्यांनीं हातांशीं धरलें. माधवाचार्यांचा इतिहास मोठा मनोवेधक आहे. ४० वर्षे संसारांतील दारिद्र्यानें गांजून गेल्यामुळें त्यांनीं विरुपाक्ष येथील भुवनेश्वरीच्या मंदिरांत देवाची आराधना दोन वर्षे करून कठोर तप केलें. त्यावेळीं एक गवळ्याचा पोर नेमानें अभिषेकाकरितां दूध आणून देत असे. त्याची मुद्रा व चालरीत पाहून माधवाचार्यांनीं मनाशीं कांहीं कांहीं संकल्प केला. देवाची प्रसन्नता होऊन देवानें सुवर्णवृष्टि केली. त्या सुवर्णाच्या साह्यानें त्या वरवर दिसणाऱ्या गवळ्याच्या मुलास हातीं धरून माधवाचार्यांनीं गुरूच्या अनुज्ञेनें विजयानगर येथें नवीन राज्याची स्थापना केली ! तोच मुलगा हरिहर या नांवानें नव्या घराण्याचा संस्थापक झाला. माधवाचार्यांनीं हरिहर ( १२५८ तें १२६८ ) त्याचा भाऊ बुक्क (१२६८ते८८) व बुक्काचा मुलगा हरिहर ( १२८८ ते १३१२ ) ह्या तीन कारकीर्दी पाहिल्या, व वास्तविक पाहतां विजयानगरच्या राज्याचीं सर्वसूत्रें हालविलीं. विजयानगरचें साम्राज्य अफाट वाढलें व त्याची सत्ता अबाधित चालू झाली. माधवाचार्य दीर्घा–

युषी होते. कोणी त्यांचें आयुर्मान ९० वर्षांचें होतें ह्मणतात, कोणी तें ११९ वर्षांचें होतें ह्मणतात. माधवाचार्यांनीं हंपीविरूपाक्ष येथें स्थापन केलेला मठ प्रसिद्ध आहे. माधवाचार्य बौधायनसूत्री भारद्वाजगोत्री देशस्थ ब्राह्मण होते, त्यांच्या आईचें नांव श्रीमति व बापाचें मायण होतें. ही माहिती त्यांनीं स्वतःच पराशरमाधवीय ग्रंथांत दिली आहे. माधवाचार्य हेच सुप्रसिद्ध विद्यारण्यस्वामी होत. हे शृंगेरीच्या पीठावर शके १३०२ ते १३०८ पर्यंत होते. बुक्कराजाचा माधवमंत्री नामक शूरवीर सेनापति होता व त्यानें तुरुष्कांचा पराभव करून गोवा प्रांतांत शैवधर्म वाढविला. हा बहुधा सारस्वतब्राह्मण असावा. विद्यारण्यांचा भाऊ सायणाचार्य यांनाही माधव नांवाचा पुत्र होता, त्यानें सर्वदर्शन-संग्रह नांवाचा ग्रंथ केला आहे. ह्या पुढील दोन माधवांपेक्षा माधवाचार्य उर्फ विद्यारण्यस्वामी हे भिन्न होत.

# हरिपाठाचे अभंग

ज्ञानेश्वरांच्या ‘ हरिपाठाचा ’ विचार करूं. हे अभंग अवघे २७ आहेत. हे वारकऱ्यांच्या नित्यपाठांत असतात व यामुळेंच हरिपाठाला ‘ वारकऱ्यांची संध्या’ ह्मणतात. नामस्मरणानें हरि जोडतो हें हरिपाठाचें सार आहे. ‘ हरि मुखें ह्मणा हरि मुखें ह्मणा। पुण्याची गणना कोण करी’ हें पहिल्या अभंगाचें ध्रुवपद असून प्रत्येक अभंगाचे शेवटीं हें ध्रुवपद ह्मणण्याचा प्रघात आहे यावरूनही हरि मुखें ह्मणा हरि मुखें ह्मणा ’ हेंच सर्व अभंगाचें ध्रुवपद आहे, सार आहे, असीच लोकांची समजूत उघड दिसते व ती बरोबर आहे. हे अभंग सोपे आहेत कां कठिण आहेत हें सांगणें सोपें नाहीं--कठिण आहे! सामान्यतः ह्या अभंगांचा अर्थ ह्मणतां ह्मणतां कळण्याइतका सोपा आहे, पण खोल विचार करून पाहतां ज्ञानेश्वरांच्या सर्व वाङ्मयाचें हें मथित आहे असें दिसतें. ‘ देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी। तेणें मुक्ति चारी साधियेल्या’ हा हरिपाठाचा प्रथम चरणच पहा—हा ह्मटला तर सोपा आहे, ह्मटला तर कठिण आहे! ‘ देवाचिये द्वारीं उभा क्षणभरीं’—देव कळला पाहिजे व त्याचें द्वार कळलें पाहिजे; या विचारांत ‘क्षणभरी’ नाहीं ‘जन्म-वरी’ उभा राहण्याचा प्रसंग प्राप्त होतो! ‘ देवाच्या’ दारांत क्षणभर उभे राहण्यानें चारी मुक्ति मिळतात, ‘ देवळाच्या ’ दारांत घटकाभर नाहीं, वर्षभर अथवा जन्मभर उभे राहिल्यानेंही चार काय पण एका मुक्तीचा एक कोपराही मिळत नाहीं! पंढरीस नामदेवांनीं महाद्वारांत समाधि घेतली अशी प्रथा आहे पण तें महाद्वार कोणतें? महाद्वारांत एकट्या नामदेवांनींच समाधी घेतली

कां सर्व ज्ञातीभक्तांच्या समाधी घेण्याचें तें एकच स्थान आहे? समाधि म्हणजे तरी काय? यमनियमादि योगमार्गानें मिळणारी 'समाधि' ती ज्ञानीभक्तांच्या समाधीहून वेगळी आहे असें नाथांनीं भागवतांत प्रतिपादिलें आहे. ज्ञानेश्वर महाराज 'देव' कोणाला म्हणतात व त्या देवाचें द्वार 'महत्सेवां द्वारमाहुर्विमुक्तेः-' संतांची, सद्गुरुची सेवा हें मोक्षाचें द्वार आहे असें भागवत सांगतें. याप्रमाणें मोक्षाचें द्वार जर संतसेवा तर देवाचें द्वार कोणतें? मोक्ष, ज्ञान, देव या पदांचा अनुभविक अर्थ काय? तात्पर्य ज्ञानेश्वरमहाराजांचें ज्ञानेश्वरी व अमृतानुभव ह्या ग्रंथांत प्रगट झालेलें पण संतमुखानेंच उमगणारें व भगवत्प्रसादानें अनुभवास येणारें ह्रुद्गत अनुभविल्याशिवाय देव कोण व त्याचें द्वार कोणतें हें आकळावें कसें? मग 'देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी' हा अभंग सोपा आहे कां कठिण आहे? देवप्राप्तीसाठी 'हरिमुखें म्हणा हरि मुखें म्हणा' हें साधन सांगितलें आहे. हरि मुखें म्हणा याचा उघड अर्थ तोंडानें—वैखरीनें उच्चारा असा केला आहे व तो युक्तही आहे, पण हरिनाम 'ठक ठाकुर और चोर' उच्चारतात तथापि ज्या नामानें ध्रुवप्रल्हाद तरले 'वो नाम कुच और' असें संत सांगतात तर तें नाम कोणतें? 'ओठ कंठ हाले नही जिव्हा स्मरे न नाम। राम हमारा जप करे हम् बैठे आराम' असें कबीरसाहेब म्हणतात त्यांतला भाव काय? तात्पर्य देव, देवाचें द्वार, हरि, हरिनाम हें सर्व उच्चाराथला सोपें आहे पण—संतांचें वाङ्मय संतमुखानेंच ऐकायला पाहिजे. 'म्हणोनि असो हें आघवें। एथ न बोलणें काय बोलावें। तें खुणाचि पावेल स्वभावें। आत्माराम' (ज्ञाने० ५–१३६) आतां पुढें चलूं; चार वेद, सहा शास्त्रें व अठरा पुराणें हरीला गातात पण तूं मात्र 'मंथूनी नवनीता तैसें घे अनंता'—जीवशिवाला सम असा आत्मा तो हरि आहे, तो तूं घे. हा हरि घनदाट भरला आहे. हरि हा निर्गुण निराकार आहे, पण भावेंवीण भक्ती व भक्तीवीण मुक्ति बोलों नये. 'भावेवीण देव न कळे निःसंदेह। गुरुविण अनुभव कैसा कळे?' साधूचे संगतीं तरणोपाय आहेः—

साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला। ठायींच मुराला अनुभव॥
कापुराची वाती उजळली ज्योती। ठायींच समाप्ती झाली जैसी॥

संतसद्गुरूंनीं 'तत्त्वमसि' ह्या महावाक्याचा बोध केल्यावर मी देहेंद्रियातीत परब्रह्म आहे हा याला अनुभव येतो, व हा स्फुरणरूप अनुभवही ब्रह्मांत नाहींसा होऊन ह्म० न उरून केवल ब्रह्मस्थितीनें तो असतो. कापराला अग्निस्पर्श झाल्यावर कापुरही राहत नाहीं व अग्निही राहत नाहीं, त्याप्रमाणें ब्रह्मबुद्धीनें आधी देहबुद्धि नष्ट होते व मग भ्रांक्षेपतेमुळें उत्पन्न झालेली मी ब्रह्म ही कल्पनाही

नाहीशी होते व केवल ब्रह्मच उर्वरित राहते. ह्मणून ‘ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं। हरि दिसे जनीं वनीं आत्मतत्त्वीं—’ सत्संगतींत सर्व हरिमय आहे हा अनुभव येतो व ह्मणून मला सत्संग प्रिय आहे. हरि हा ‘सर्वांघरीं पूर्ण एक नांदे’ असा आहे. हरीची ज्याला भक्ति नाहीं तो दैवहत ह्म० अभागी होय. ‘संतांचे संगती मनोमार्गें गती—’ संतांच्या संगतींत मनाला हरीची ओढ लागतें, मन हरीकडे धांवतें, संतांच्या संगतींतच नामाची गोडी लागते व नामानें हरि वश होतो. ‘रामकृष्णवाचा भाव हा जीवाचा’- वाचेनें रामकृष्ण हरीचें भजन करावें हा जीवाचा धर्म आहे. रामनामाचा जप शिव सुद्धा करीत असतात. योग्यांना जीवनकलेचें समाधान असतें तर ‘नामामृत गोडी वैष्णवा लाधली’—भक्तांना नामामृताची गोडी लाभते. ‘ज्ञानदेव ह्मणे नाम हें सुलभ। सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे’—सर्व साधनांत नाम हें सुलभ आहे पण हें कोणी घेत नाहीं ह्मणून दुर्लभ झालें आहे! नामामृत सेवन करणारे प्रल्हादउद्धवादि जे विरळ भक्त आहेत त्यांच्यासारख्यांनाच नामाची माधुरी ठाऊक आहे. विष्णु—व्यापक—याच्या स्वरूपाची ओळख नाहीं व रामकृष्णीं मन नाहीं, त्याचें ज्ञान व्यर्थ होय, अद्वैत हरिस्वरूपाला न भजणारा करंटा होय. ‘अहमिदं’ हें द्वैत गुरु-मुखानें होणाऱ्या ज्ञानानें झडतें व गुरु तर नामभजन सांगतात. नामप्रेम हेंच सगुणध्यान आहे व नामप्रेमानें प्रापंचिक गोष्टींविषयीं सहजच मौन येते. प्रयागादि तीर्थक्षेत्रें केलीं तरी ‘चित्त नाहीं नामीं तरी तें व्यर्थ! नामानें कुळाचा व त्रैलोक्याचा उद्धार होतो असें वाल्मीक्यादिकांनीं सांगितलें आहे. नामस्मरणानें अनंत पापराशि लयाला जातात, ‘तृण अग्निमेळें समरस झालें। तैसें नामें केलें जपतां हरी!’ सद्भावपूर्वक नाम घ्यावें. तीर्थव्रतनेम या सर्वांचा भाव असेल तरच उपयोग आहे. देव भावाला वश आहे. ‘भावबळें आकळे येऱ्हवीं नाकळे’ आणि भाव असला तर ‘करतळीं आवळे तैसा हरि’—हरि सुलभ आहे. पाऱ्याचे कण भूमीवर पसरले कीं ते एकवटणें कठिण, तसा नामाव्यतिरिक्त अन्यसाधनांनीं हरि दुष्प्राप्य आहे. गुणातीत असा हरि निवृत्तीनें माझ्या हातीं दिला आहे व तो भावसहित नामाच्याच मार्गानें होय. तृणापासून शिवापर्यंत अखिल विश्व सम-सुखानें साम्यबुद्धीच्या परमसुखानें—पाहणें हीच समाधि होय, ही द्वैतभाव आहे तोंवर साधायची नाहीं. हरीला अशा यथार्थदृष्टीनें पाहणें यावांचून ‘बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें’—बुद्धीचें वैभव दुसरें नाहीं. रिद्धि ह्म० सकल ऐश्वर्य व सिद्धि ह्म० योगादि सामर्थ्य--ऐहिक संपत्ति व योगिक सामर्थ्य--ही ‘जंव त्या परमानंदीं मन नाहीं’--तोंवर उपाधिभूत ह्म० व्यर्थच होत. ज्ञानदेव ह्मणतात

'हरीचें चिंतन सर्वकाळ' आहे ह्मणून माझें समाधान अखंड आहे. हरिपाठ ह्म० हरिस्मरण ज्याला अखंड आहे त्याकडे कळिकाळ ढुंकून पाहत नाहीं. त्याच्या ह्या तपापुढें पापाचे कळप पळून जातात व त्याला निजस्थान ह्म० हरिचें उत्तम पद मिळतें. सकल सृष्टि हरिरूप पाहणाऱ्याला–'सर्वांघटीं राम देहादेहीं एक.' आत्मत्त्व अनुभवणाऱ्याला मुक्ति मिळते. मी स्वत. 'मागिलिया जन्मां मुक्त झालों'' आहे. 'रामकृष्णनामीं उन्मनी साधली'--नामानें मनोवाचातीत निर्विकल्पस्थितीचा आनंद भोगणारा विरळ आहे, त्याला सिद्धिबुद्धिधर्म सहज साधतात व अशा साधूंच्या संगतीनें प्रपंचीही आराम पावतात. नाम गायन करणाराचा देहही पवित्र होते', त्याचें सर्व कुळ उद्धरतें. हरिवंशपुराणाचें श्रवण, हरिनामसंकीर्तन, भूतमात्रीं सौजन्य हें ज्यापाशीं आहे त्याला परमात्मा जोडतो. मनामागें धांवणारा विषयी जीव ह्या सुखाला मुकतो– 'हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य'--हरिनाम--गायनीं स्थिर झाला तोच धन्य होय. 'जप तपकर्म हरिवीण धर्म। वाउगाचि श्रम व्यर्थ जाय.' मकरंद सेवनाच्या आनंदभरांत भ्रमर जसा सुमनकलिकेंत स्थिरावतो, तसा नामस्मरणांत रंगलेला पुरुष हरिस्वरूपीं निवांत होतो. ज्ञानदेव ह्मणतात कीं हरिनाम हा माझा मंत्र आहे व हेंच माझें शस्त्र आहे व त्याच्या भीतीनें यमराज आमच्या कुळगोत्रापासून दूर राहिले आहेत! 'नामसंकीर्तन व वैष्णवांची जोडी' ह्या दोन गोष्टी ज्याला लाभल्या त्याचीं अनंतकोटि पापें लयाला जातात. योगयागक्रिया सर्व कांहीं आह्मी केले पण आतां 'ज्ञानदेवीं यज्ञ याग क्रिया धर्म। हरीवीण नेम नाहीं दुजा'—

काळवेळ नाम उच्चारितां नाहीं। दोन्ही पक्ष पाहीं उद्धरती ॥१॥
रामकृष्ण नाम सर्वदोषां हरण। जडजीवां तारण हरि एक ॥२॥

दोन्ही पक्ष ह्म० आईचें कुळ व बापाचें कळ किंवा नाम गाणारा व तें ऐकणारा. हरिनाम हें सार आहे व ज्यानें आपली जिव्हा या नामाकडे योजिली त्याचें भाग्य निरुपम होय. नामस्मरणाला काळवेळ नाहीं ह्म० तें सर्वकाळ घ्यावें, किंवा निदान नित्यनेमाचा अभ्यास ठेवावा. नामाचा प्रताप व व्यापकता गगनापेक्षा थोर आहे. सृष्टि ज्या तत्वांची रचलीं आहे तीं तत्वें कोणी सात आहेत ह्मणतात, कोणी पांच आहेत असें सांगतात, कोणी तीन, दहा इ० निरनिराळ्या प्रकारें सांगतात पण हीं तत्वें एक तत्वात्मक हरीवर उभारलीं आहेत! अशा तत्व विचारा–

पेक्षा हरिनाम वरिष्ठ आहेत व शिवाय तें घ्यायला कांहीं कष्टही लागत नाहींत. कोणाच्या मनाचा निश्चय अजपाजप करण्यापेक्षा असतो. कसेंही करा, पण नामाविण गिणें व्यर्थ आहे हेंच सांगणें आहे.

जप तप कर्म क्रिया नेमधर्म । सर्वांघटीं राम भावशुद्ध ॥ १ ॥

जपतपादि सर्व साधनांचा निष्कर्ष सर्वाभूतीं अभेदभावानें एक हरिच ओतप्रोत भरला आहे या अनुभवांत आहे. हा भाव स्थिर करून 'रामकृष्णीं टाहो नित्य फोडी'—नामघोषांत रमून रहा 'जात वित्त गोत कुळशीळ मात'– या गोष्टींचा ऊहापोह करण्यांत आयुष्य दवडण्यापेक्षां—'भजें कां त्वरित भावनायुक्त'– विमलभावानें हरीला भजा. भगवंताच्या ठिकाणीं जाणीव नेणीव कांहीं नाहीं, म० नाम घेणारा ज्ञानी आहे का अज्ञानी आहे हें तो पाहत नाहीं. त्याचें यथार्थस्वरूप वेदालाही कळत नाहीं मग तें जीवांना कोठून कळणार? पण नामानें मृत्युलोकच वैकुंठ होतो हा माझा अनुभव आहे!

---

# आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृत्तांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्र महोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. 'उपकृतिस्मरण' हें ७६ श्लोकांचें नवीन आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा ग्रंथांचा व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं.८१२

# ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य.

पंधराव्यांत श्रीकृष्णानीं ' आघवा शास्त्रसिद्धांत ' सांगितला आहे. वृक्षरूपकाच्या परिभाषेनें प्रथम उपाधीचा निरास केला, नंतर मायोपाधि कूटस्थ जो अक्षर पुरुष त्याचें स्वरूप सांगितलें व त्याबरोबरच क्षराचें ह्म० जीवचैतन्याचेंही रूप दाखविलें आणि शेवटीं उत्तमपुरुष ह्या शद्बाच्या मिपानें आत्मतत्त्वाचें विशदस्वरूप सांगून आत्मप्राप्तीचें अंतरंग व श्रेष्ठ साधन ज्ञान होय असें देव बोलले. आतां यापुढें सांगण्यासारखें कांहींच राहिलें नाहीं. असंख्य ज्ञात्यांची समजूत येथेंच पटली (गीता येथेंच १५ व्या अध्यायांतच वस्तुतः संपली ) तथापि कांहीं मुमुक्षु व जिज्ञासु यांच्या मनांत अजून कांहीं दंश राहिलाच. पुरुषोत्तमाला जो ज्ञानानें भेटतो ( ऐक्य पावतो ) तोच खरा ज्ञानी व भक्तीची सीमाही तोच असें देव ह्मणाले व त्यांनीं ज्ञानाचा उत्कर्ष वानिला. ज्ञान हें संसाराचा घोट भरून द्रष्टा जो जीव त्याला स्वानंदसाम्राज्यपटावर बसवितें व ह्मणून ज्ञान हाच सर्व उपायांतला अत्यंत श्रेष्ठ उपाय ( साधन ) आहे असें श्रीकृष्ण ह्मणाले व त्याबरोबर आत्मजिज्ञासूंनीं संतोषानें व प्रेमानें त्या ज्ञानावरून आपला जीव ओवाळून टाकला व पुरुषोत्तमाशीं ते समरस झाले. येथवर सर्व योग्यच झाले, पण आत्मज्ञानाचा अनुभव आला नाहीं तोंपर्यंत हें ज्ञान प्राप्त कसें व्हावें व प्राप्त झाल्यावर कसें टिकावें अशाविषयीं कांहीं प्रेमळ मुमूक्षूंना शंका आली. हें सम्यक् ज्ञान स्वाधीन कसें होईल व स्वाधीन झाल्यावर तें वाढविण्याचा प्रयत्न कसा घडेल, तसेंच जो ज्ञान उत्पन्नच होऊं देत नाहीं किंवा उत्पन्न झाल्यास त्याला आडमार्गाला लावतो असा कांहीं प्रतिबंध आहे कीं काय याचा आधी उलगडा झाला पाहिजे. तो झाला ह्मणजे ज्ञानाला विरुद्ध असेल त्याला दूर सारतां येईल व अनुकूल असले त्याचा सर्वभावें विचार करितां येईल; अशा शंका ज्यांना आल्या किंवा येतात त्यांच्या समाधानार्थ दैवासुरसंपत्तीचा सोळावा अध्याय सांगण्यांत आला. ज्ञान उत्पन्न करून मोक्षापर्यंत तें वाढविणारी दैवीसंपत्ति, व अज्ञानाच्या भरानें रागद्वेषादि वाढविणारी ती आसुरी संपत्ति--यांचा उल्लेख मागें ९ व्या अध्यायांत ( श्लोक १२।१३ पहा ) केला होता तोच विषय येथें सविस्तर सांगितल्यानें वरील शंकांचें निरसन होईल असें भगवंतानीं जाणून १६ वा अध्याय सांगितला आहे. [ आत्मप्राप्ति हा जीविताचा परमलाभ व आत्मज्ञान हें त्याचें परमसाधन हें १५ व्यांत सांगितल्यानंतर त्या ज्ञानाला इष्ट-पोषक-अशी दैवीसंपत्ति व अनिष्ट-मारक अशी आसुरीसंपत्ति असे मानुषप्रवृत्तीचे जे दोन प्रवाह त्यांचें वर्णन १६ व्यांत केलें आहे. देवी संपत्ति ही

'मोक्षमार्गीची बोळावी'–मोक्षाला पोंचविणारी, 'मोहरात्रीची धर्मदिवी'--मोहांधकारांत धर्माचा मार्ग दाखविणारी दीपिका, 'सुखसंभवी'–सुख देणारी अशी आहे. 'अभयं सत्वसंशुद्धिः' इ० २६ गुणांची ही ब्रह्मसंपदा मोक्षचक्रवर्तीचें जणुं अग्रहार ( इनामजमीन ) आहे, अथवा ही गुणकुसुमांची माळा हातीं घेऊन मुक्तिबाळा विरक्त व निरपेक्ष अशा महापुरुषाच्या गळ्यांत घालीत आहे किंवा ह्या २६ गुणांच्या ज्योती पेटवून गीता ही निजपति जो आत्मा त्यावरून पंचारती ओवाळीत आहे असें ज्ञानेश्वर ह्मणतात. आतां ह्यापुढें विषवर्ग एकवटले कीं कालकूट तयार होतें त्याप्रमाणें 'दंभो दर्पोभिमानश्च' इ० दोषांची खाण अशी आसुरी संपत्ति 'त्याज्य त्यजावयालागीं। जाणावी जरी अनुपयोगी' ह्मणून सांगणें भाग आहे. दैवी संपत्तीचे गुण मोक्षाकडे नेतात व आसुरी संपत्ति बंधनांत पाडते, फार काय पण नरकांत नेऊन घालते. हा सर्व विषय १६ व्या अध्यायांत सांगितला आहे आतां दैवी व आसुरी संपत्तीचे गुणदोष कोणते आहेत तें पाहूं.

## दैवी संपत्ति

१ अभयः—-दैवगुणांत अग्रस्थान 'अभयाला' दिलें आहे. महापुरांत उडी घातली नाहीं तर बुडण्याचें भय नाहीं किंवा पथ्याच्या घरीं रोगाची वार्ता नाहीं, तसें कर्माकर्मांच्या मार्गाला नेणाऱ्या अहंकाराचा उठावच होऊं न देतां संसाराचें भय सांडणें तें अभय, 'अथवा ऐक्यभावाचेनि पैसें। दुजें मानूनि आत्मा ऐसें। भयवार्ता देशें। दवडणें जें'—ऐक्यभावाच्या किंवा अद्वैतानुभवाच्या विकासानें जें जें दुजें ह्मणून पुढें येईल तें तें आत्मा असें भावून निर्भय होणें तें अभय.

२ सत्वसंशुद्धिः—सत्वशुद्धि ह्मणजे संकल्पविकल्पाची ओढ नाहीं, रजतमाचे दोष झाडून गेले आहेत, इंद्रियांनीं विषय पुढें केले असतांही त्याकडे चित्त धांवत नाहीं अशी स्वस्वरूपाच्या आवडीनें बुद्धि आत्मरूपीं अनन्य असणें, 'सत्स्वरूप रुचलेपणें। बुद्धीचें जें अनन्य होणें' ती सत्वशुद्धि.

३ ज्ञानयोगव्यवस्थितिः—'लक्ष्मी स्थिरावली। मुकुंदीं जैसी' तैसी आत्मलाभासाठीं ज्ञान किंवा योग याच्या ठिकाणीं बुद्धि स्थिर होणें.

४ दानम्ः—'देहवाचाचित्तें। यथासंपन्नें वित्तें। वैरी जालियाही आर्तातें। न वंचणें जें॥ फुलीं फळीं छाया। मुळीं पत्रींही धनंजया। वाटेचा न चुके आलिया। वृक्ष जैसा॥ तैसें मनौनि धनवरी। विद्यमानें आलया अवसरीं। श्रांताचिया मनोहारी ( मनोदयागुरूप ) उपयोगा जाणें॥ ८७॥ तया नांव जाण दान। जें मोक्षनिधानाचें अंजन' अवंचकपणें आर्ताला सर्व प्रकारचें साह्य करणें याचें नांव दान

५ दमः—-'विषयजातांचा वारा। वाजों नेदिजे इंद्रियद्वारां' यासाठीं इंद्रियें नियमांच्या हातीं देणें हा दम.

६ यज्ञः–स्वधर्माप्रमाणें वागून देवताधर्म यथाशास्त्र पाळणें, फळाशा सोडून स्वधर्माचरण करणें तो यज्ञ.

७ स्वाध्यायः--वेदाध्ययन ( द्विजांसाठी ) व स्तोत्रपाठ आणि इतरांसाठीं स्वाध्याय ह्मणजे वेदाध्ययन+नामसंकीर्तन. ' प्रतिपाद्य जो ईश्वर । तो होवया--लागीं गोचर । श्रुतीचा निरंतर अभ्यास करणें ॥ तें द्विजांसीच ब्रह्मसूत्र । येरा स्तोत्र कां नाममंत्र '

८ तपः–आत्मप्राप्तीसाठीं प्राण, इंद्रियें व शरीर यांना झिजवणें याचें नांव तपः ' स्वरूपाचिया प्रसरा– । लागिं प्राणेंद्रियशरीरा । आटणी करणें जें वीरा तेंचि तप' ॥ १०८ ॥

९ आर्जवः–' प्राणिमात्रीं सौजन्य । आर्जव तें ! '

१० अहिंसाः– ' जगाचिया सुखोद्देशें । शरीरवाचामानसें । राहाटणें ते अहिंसे । रूप जाण ' ॥ ११४ ॥

११ सत्यः--बुबुळालाही खुपेल इतकें मऊ पाणी जसें खडक फोडून जातें तसें अत्यंत मधुर असून संदेहनिवारण्याचे कामीं तीक्ष्ण, गोड पण खुपणारें, असें जें भाषण तें सत्य होय.

१२ अक्रोधः -उपजवितांही क्रोधाची उर्मी न उठणें

१३ त्यागः--' त्यजूनि भिंतिमात्र । त्यजिजे आघवेंचि चित्र । कां निद्रा-त्यागें विचित्र । स्वप्नजाळ तें ॥ तेवीं बुद्धिमंतां देहीं । अहंता सांडूनि पाहीं सांडिजे अशेषही संसारजात ' ! अहंकाराचा त्याग तो त्याग.

१४ शांतिः--ज्ञेयाला गिळून ज्ञानही जिरून जाते ती शांति.

१५ अपैशुन्य ह्म० सौजन्यः - सद्वैद्य जसा रोग्याचा रोग दूर करून त्याची शक्ति वाढविण्याचा यत्न करितो, चिखलांत रुतलेली गाय धडभाकड न पाहतां तिच्या दुःखानें कासावीस होऊन दयाळु मनुष्य जसा तिला बाहेर काढतो किंवा कुलवती स्त्रीचें नेसतें वस्त्र पाण्यानें दूर केलें तर ' ती नेसविल्यावीण न वाहे । शिष्ट जैसा'–त्याप्रमाणें अज्ञान, प्रमाद, किंवा पापसंस्कार यामुळें हातून पाप घडलेल्या व लोकांत निंद्य झालेल्या स्त्रीपुरुषांवर आपल्या दयेचें पांघरूण घालून त्यांच्या मनांत सलणारें शल्य काढून टाकणें, त्यांचे दोष आपल्या औदा-र्यानें विसरून व विसरवून त्यांजकडे ममत्वानें पाहणें हें सौजन्य होय ! ' जैसा पूजूनि देव पाहिजे । पेरूनि शेता जाइजे । तोषौनि प्रसाद घेइजे । अतिथीचा ॥ तैसें आपुलेनि गुणें । पुढिलांचे उणें । फेडूनियां पाहणें । तयाकडे' ॥ १४९ ॥ हें सौजन्य. दोषाचा उच्चार न करणें, मर्मी घाव न घालणें, सदोष नामानें न

कारणें हें या सौजन्याचें लक्षण होय. 'पडिलें तें उभें होय' असें करणें हें सौज-न्याचें वर्म आहे. असें सौजन्य 'मोक्षमार्गींचें सुखासन मुख्य हें गा!'

१६ दया:– 'आतां दया ते ऐसी । पूर्णचंद्रिका जैसी । निववितां न कडसी (विचारीत नाहीं) । सानें थोर ॥' दुःखिताचा शीणभाग हरतांना उत्तम अधम हा विचार तेथें नसतो. पाणी स्वतः अंगानें नाश पावून तृणाचेंही रक्षण करितें, तसें कळवळून दुसऱ्यांस सर्वस्व देणें व तेंही कमी मानणें ही दया. 'पै कांटा नेहटे (बोंचतो) । तंव व्यथा जीवीं उमटे । तैसा पोळे संकटें । पुढिलां–चेनि ॥ का पावो (पाय) शीतळता लाहे । कीं तें डोळियांचिलागीं होये । तैसा परसुखें जाये । सुखावत जो' ॥ १६० ॥ पायाला कांटा टोंचला तर तो अंतःकर–णाला वेदना देतो किंवा पायाला शीतळता आली तर ती डोळ्यांना सुख देते, त्याप्रमाणें दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी व सुखानें सुखी होणें ही दया होय.थोडक्यांत 'दुःखिताचे सेलभागीं (अग्रभागीं, पुढें) असणें जयाचे' तोच दयावान् पढारी होय !

१७ अलोलुप्त्व:--विषयांचा अभिलाष नसणें, पृथ्वीवरचे वा स्वर्गींचे भोग पायाशीं आले तरी न रुचणें, 'ऐहिकींचे कां स्वर्गींचे । भोग पाइक जालिया इच्छेचे । परी भोगावे हे न रुचे । मनामांजीं' ।

१८ मार्दव:--माशांना जसें मोहळ, जळचरांना जसें जळ, बाळाला जसें मातेचें स्नेह 'कां डोळया प्रियांची भेटी । का पिलियां कूर्मीची दिठी । तैसी भूतमात्रीं राहाटी । मवाळ ते' ॥ १७० ॥ खरखरित कर्कश नव्हे !

१९ ऱ्ही (लज्जा):--क्षत्रियाला पलायन, रूपवंताला कुष्ट, संभाविताला वाईट गोष्टीचा आळ जसा लाजिरवाणा वाटतो 'तैसें औटहातपणें । जें शव होऊनि जिणें । उपजों उपजों मरणें । नांवानावा'--वारंवार जन्ममरण येणें, माता–पित्यांच्या गर्भातील मेदाच्या पुशींत रक्त व रेत यांच्या रसांचा पुतळा होऊन राहणें याची लज्जा !

२० अचापलम्:—मन व प्राण यांच्या नियमनानें दशेंद्रियें स्थिर होणें, मनोजयानें ज्ञानेंद्रियांचे व्यापार स्थिरावणें.

२१ तेज:--ईश्वरप्राप्तीसाठीं ज्ञानयोगी जें लोकोत्तर धैर्य दाखवितो तें 'ईश्वराकडे निज (मन) धांवे अपैसया सहज । तया नांव तेज । आध्यात्मिकतें

२२ क्षमा:--सर्व–सहन करीत असूनही त्याचा गर्व न वाटणें

२३ धृति:- इंद्रियांचे वेग, पूर्वकर्मानें खवळलेले रोग, प्रियाप्रियांचे योग–वियोग, हे सर्व--फार काय त्रिविधताप एकदम येऊन आदळले अशा चित्तक्षो–भाच्या वेळींही धैर्य धरून पराक्रम गाजवणें ती धृति.

२४ शौचः--सोन्याच्या तांब्यांत गंगेचें पाणी तसें अंतर्बाह्य शुचित्व. 'आंगीं निष्काम आचार! जीवीं विवेक साचार' तें शौच.

२५ अद्रोहः--'कां फेडीत पापताप। पोखीत तीरींचे पादप। समुद्रा जाय आप। गंगेचें जैसें॥ कां जगाचे आंध्य फेडित। श्रियेचीं राउळें (कमळें) उघडित। निघे जैसा भास्वत। प्रदक्षिणे॥ तैसीं बांधिलीं छोडित। बुडालीं काढित। सांकडी फेडित। आर्तांचिया॥२०२॥' गंगा किंवा सूर्य यांच्याप्रमाणें सर्वभूतहितरत राहून अहोरात्र दुसऱ्यांच्या सुखाची उन्नति करणें व हाच आपला स्वार्थ समजणें हें अद्रोहवंताचें लक्षण आहे.

२६ नातिमानिता (अमानित्व):--गंगा शंभूच्या माथां चढूनही जशी संकोचली 'तेवीं मान्यपणें सर्वथा। लाजणें जें'॥ २०५॥

## आसुरी संपत्ति

१ दंभः - दंभ हा सर्व दोषांचा राजा आहे. आपली आई तीर्थरूप खरी पण जनांत नग्न दाखविल्यास त्यांत आपलें पतन आहे, गुरू--पदिष्ट ब्रह्मविद्या कल्याणप्रद खरी पण चव्हाट्यावर मांडली असतां अनिष्टाला कारण होते, किंवा तारक नौका डोक्यावर घेतली असतां बुडविते अथवा जीवि--ताला कारण जें अन्न तें फार सेवन करतांना वानिलें तर दृष्ट लागून किंवा अजीर्ण होऊन मृत्यु आणतें--'तैसा दृष्टादृष्टांचा सखा। धर्म जो जाला तो फोकारिजे देखा। तरी तारिता तोचि दोखा।--लागीं होय'--इहपरलोकीं तारक जो धर्म त्याचा पुकार, केल असतां तोच पातकाला कारण होतो;' ह्मणौनि वाचेच्या चौबारा (चव्हाट्यावर) घातलिया धर्माचा पसारा। धर्मचि तो अधर्म होय वीरा। तो दंभ जाणे' ॥२२३॥

२ दर्पः --मूर्ख चार अक्षरें शिकला कीं तो जसा ज्ञात्यांच्या सभेतही अनावरपणें बडबडतो, किंवा 'कांटियेवरिल्यां सरडा। स्वर्गही नीच'--कांट्याच्या टोंकावर गेलेला सरडा स्वर्गही खुजा मानतो, 'तैसा माजे स्त्रियाधनें। विद्यास्तुती बहुतें मानें'। असें संपत्तीनें जें उतणें तो दर्प होय.

३ अभिमानः--जगाचा वेदावर विश्वास आहे व विश्वासाला पूज्य आहे, पण 'अभिमानाचेनि मोहें। जो ईश्वराचेंहीं नाम न साहे। बापातें ह्मणे मज हे। सवनी जाली' ऐसा मान्यतेचा पुष्टगंड--अभिमानी पुरुष ताठर होतो--'रौरवाचा रूढ। मार्गचि हा!'

४ क्रोधः--दुसऱ्याचें सुख पाहण्याचें निमित्त कीं क्रोधाचें विष याच्या अंगांत संचरतें, 'चंद्र देखोनि जळे पोटीं। कोल्हा जैसा' किंवा सूर्यदर्शनानें घुबडाचे डोळे फुटतात अगर जगाची सुखपाहट ती चोराला तापद होतें तसा

दुसऱ्याचें विनोद, विद्या, वैभव पाहतांच जेथें संताप होतो तो क्रोध उर्फ मत्सर होय.

५ पारुष्य ( कठोरपणा ):---' आणि मन सर्पाची कुटी। डोळे नाराचांची सुटी। बोलणें ते वृष्टि इंगळाची'---सापाच्या वारुळांत जसे विषाचे फूत्कार तसे ज्याच्या मनांत घातक संकल्प उठतात, ज्याच्या डोळ्यांत बाणांची व भाषणांत निखाऱ्याची वृष्टि असते--' येर जें क्रियाजात। तें तिखयाचें कर्वत। ऐसें सबाह्य खसखसित। जयाचें गा' ॥ २४४ ॥ तो कठोरपणाचा पुतळाच होय.

६ अज्ञानः—जात्यंधाला दिवस रात्र कळत नाहीं तैसें ' कृत्याकृत्यविवेकीं। अंधपण। जें ' तें अज्ञान—आग पेटली कीं ती जैसी खाद्याखाद्य न ह्मणे त्याप्रमाणें हा खाण्यापिण्याचें कामीं विवेकच ठेवीत नाहीं; ' हें चोख हें मैळ। ऐसें नेणोनियां बाळ। देखे तें केवळ। मुखींचि घाली'--त्याप्रमाणें पापपुण्याची खिचडी करून जो योग्यायोग्य पदार्थ चव किंवा परिणाम न पाहतां सेवन करितो तो अज्ञानाची मूर्ति आहे असें समज.

असुरांचे हे सहा गुण ( किंवा दोष ) सांगितले, आतां त्यांचे विचार व वर्तन कसें असतें ते ऐक.

## असुरांचें आचारविचार

' पुण्यालागीं प्रवृत्ति। कां पापालागीं। निवृत्ति' हा विचार आसुरी प्रकृतीच्या लोकांना माहीतच नसतो. शौच, आचार, सत्य कांहीं त्यांचे ठिकाणीं नसतें ' काळिमा सांडील कोळसा। वरी चोखी ( स्वच्छता ) होईल वायसा। राक्षसही मांसा विटों शके ॥ २८५ ॥ परी आसुरां प्राणिया। शौच नाहीं धनंजया। पवित्रत्व जेविं भांडयां। मद्याचिया ' ॥ २८६ ॥ ते विधिनिषेध किंवा वडिलांची चालरीत पाळीत नाहींत. शेळीच्या चरण्याप्रमाणें ते स्वैर वागतात. धुराड्यांतून धूरच बाहेर पडायचा त्याप्रमाणें त्यांचे विचारही त्यांच्या धर्मशून्य हृदयांतून निघून त्यांच्या मुखावाटे बाहेर पडतात! जग हें अनादि आहे, याचा नियंता ईश्वर आहे वन्यायान्यायाचा निवाडा करणारे वेद आहेत, ही विश्वव्यवस्थाच ते मिथ्या ठरवितात, धर्माला हे थोतांड ह्मणतात! ते ह्मणतात कीं याज्ञिक यज्ञानें, देवपिसे प्रतिमांनीं व संन्यासी आणि योगी समाधिभ्रमानें फसले आहेत! आपल्या बळानें मिळवावें आणि भोगावें या वेगळें पुण्यच कोठें आहे? भोग न भोगणें हेंच पाप! श्रीमंतांचे प्राण घेणें हें जर पाप तर त्यांचें सर्वस्व हातीं येतें हें पुण्यफळ कां मानूं नये? 'बळी अबळांतें खाय' हा जर न्याय नसता तर माशांचें निसंतान नसतें कां झालें? दोन्ही कुळांचा शोध करून शुभमुहूर्तावर लग्न करणें

हें जर विहित तर पशुपक्ष्यांच्या विवाहाचा विधि कोणचा? चोरीचें धन कोणाला विष झालें आहे काय? व्यभिचार करणारा कोण कुष्टी झाला आहे? ह्मणून परलोक व देव हें सर्व ढोंग आहे का कीं ते दिसत नाहींत! ह्मणून स्वर्गनरक पापपुण्यांनीं मिळतात हें सारें खोटें आहे.' स्त्रीपुरुषयुग्में मिळतात व त्यापासून जग होतें याप्रमाणें 'कामावांचूनि कांहीं। जगा मूळचि आन नाहीं' असा हे आसुर निष्कर्ष काढतात. ईश्वरच नाहीं असा मनांत निश्चय ठेवून हे नास्तिक देवाविषयीं वाटेल ते बकतात. मग केतूचे उगवणें विश्वाला अकल्याणकर तसें यांचें वर्तन जगाच्या क्षयाला कारण होतें. देहाच्या सुखाकरितां परस्परांशीं लढतात व जगांत दुःखच पेरतात. दुर्भर अशा कामाचा आश्रय करून दंभमानमदांनीं युक्त होत्साते हे असुर दुसऱ्याला ताप देऊन दुसऱ्याचे जीव रगडून उदरंभरी होतात. 'मग आपुलें केले फोकारिती। आणि जगातें धिक्कारिती। दाहीं दिशा पसरिती। स्पृहाजाळ' ॥ ३ ८॥ यासाठींच त्यांची कर्मप्रवृत्ति असते व याचीच ते अहोरात्र विवंचना करितात. भोगासाठी कर्म व भोगाचीं साधनें दोन—स्त्री व धन–ह्मणून ते स्त्रीलंपट व धनलोभी बनून वाटेल तीं पापें करितात. 'स्त्रिया गाइलें आइकावें। स्त्रीरूप डोळां देखावें। ही त्यांची मनीषा! 'एकातें साधूनि मारिती। एकाचीं सर्वस्वें हरितीं। एकालागीं उभारितीं। अपाययंत्रें' ॥ ३४०॥ या व्यवसायासाठीं अंगीं बळ असावें ह्मणून 'पोसावया पोट। मारिती प्राणियांचे संघाट! 'मिळविलेलें भोगीन आणखी मिळवीन—'लाभा घेईन उरलें। चराचर हे' ही महत्वाकांक्षा. हे आज मारलें, उद्यां ते मारीन 'मग नांदेन पवाडें। एकलाचि मी!' मी करीन तें होईल 'किंबहुना चराचरीं। ईश्वर तो मी!' अहंकार सारा देहाचा. 'माझिया कुळाचा उजाळु। कां जातिगोतांचा मेळु। पहातां ब्रह्माही हळु। उणाचि दिसे। मातें गाती वानिती। नटनाचें रिझविती। तयां देईन मागती। ते ते वस्तु' ॥ हे आशेच्या वावटळीबरोबर नाना मनोरथांच्या अंतराळीं फिरतात. महंतपणाचा गर्वही धरितात तेव्हां 'लवों नेणती कैसे। आटिवा लोहाचे स्तंभ जैसे.' नम्रता नाहींच 'देवां ब्राह्मणाचेनि नांवें'। आडवाराही येऊं देत नाहींत. याप्रमाणें अहंकारादि भरलेलेहे असुर संतसज्जनांचा द्रोह करितात. असल्या नराधमांना भगवान् ह्मणतात मी आसुरी योनींतच पुनः पुन्हा जन्मास घालतो व मला न पावतां ते शेवटीं अधमगतीला जातात. ह्यांच्या दोषांत काम क्रोध लोभ हे प्रधान आहेत. हीं नरकाची द्वारें आहेत.

तात्पर्य, कामक्रोधलोभादिकांपासून ज्याची सुटका झाली त्याला मोक्षमार्गी सज्जनांचा संग मिळतो, व सत्संगांत सच्छास्त्रांचें श्रवण होऊन मनुष्य जन्ममरणा-

पासून मुक्त होतो. आत्मानंदाचें केवळ घर अशा गुरुच्या कृपालाभाला तो पात्र होतो. ‘ तेथ प्रियाची परमसीमा । तो भेटे माउली आत्मा । तये खेवीं ( क्षणीं ) आटे डिंडिमा ( गलबला ) । सांसारिक हें ’ ॥ ४४३ ॥ या सर्व विवरणाचें सार हें आहे कीं, जो शास्त्रविधि सोडून स्वेच्छाचारानें वागतो त्याला सिद्धि मिळत नाहीं, सुख नाहीं व परागति तर नाहींच नाहीं; ‘ जो जगीं समान सकृप । हिताहित दाविता दीप । तो अमान्य केला बाप । वेद जेणें’—विधीची भीड न धरितां जो इंद्रियांचें कोड पुरवण्याचें मार्गे लागतो व कामक्रोधादिकांच्या कह्यांत जातो त्याला सुख तर नाहींच ‘ आणि परत्र तंव जाये । हें कीर तया आहे । परी ऐहिकही न लाहे । भोग भोगूं’ ॥ ४५० ॥ ह्मणून ‘ शास्त्र ह्मणेल जें सांडावें । तें राज्यही तृण मानावें । जें घेववी तें न ह्मणावें । विषही विरु ( विरुद्ध ) । ’ अशा वेदैकनिष्ठ पुरुषाला अनिष्ट कोठून भेटणार ? ‘ पै अहितापासूनि काढिती । हित देऊनि वाढविती । नाहीं श्रुतिपरौती । माउली जगा ’ ॥ ४६२ ॥ श्रुति ब्रह्मपदाला नेऊन मिळविते ह्मणून आत्मकल्याणेच्छु पुरुषानें श्रुतिशास्त्राच्या आज्ञेप्रमाणें वागावें. अर्जुना ! तुझ्याठायीं धर्माचें बळ आहे, तूं धर्मानुजही आहेस ह्मणून धर्मशास्त्र सोडून तुला तर वागतांच कामा नये. शिवाय अर्जुना ! तुझें पुढारीपण लोकांत मान्य असल्यामुळें आज तुझ्या हातांत विश्वप्रामाण्याची मुद्रा ( शिक्का ) आहे, तूं जें आचरण आज प्रमाण मानशील तेंच लोकांत मान्य होईल: ‘ जे विश्वप्रामाण्याची मुद्री । आजी तुझ्या हातीं असे सुबुद्धी । लोकसंग्रहासी त्रिशुद्धी । योग्य होसी ’ ॥ ४६८ ॥ ( ह्मणून वेदप्रणीत चातुर्वर्ण्याप्रमाणें वागून तूं क्षात्रधर्मोचित युद्ध करण्यास उभा रहा. )

---

# निबंधमाला—तिचें स्वरूप आणि कार्य.

कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांची निबंधमाला सुप्रसिद्धच आहे. शास्त्रीबोवा मराठी भाषेचे गद्याचार्य आहेत. मालेचे मूळ ७२ अंक प्रयासानें मिळवून निबंधमालेवर ६४ पानांचा एक टीकापर निबंध शके १८२६ मध्यें ‘ सरस्वतीमंदिर ’ मासिकांत रा० पांगारकर यांनीं लिहून प्रसिद्ध केला होता. तोच पुन्हां स्वतंत्र पुस्तकरूपानें छापला आहे. शास्त्रीबोवांचें संक्षिप्त चरित्र व नवीन अवतरणें जास्त दिलीं आहेत. निबंधमालेचा हेतु, मालेंतील मुख्य व अवांतर विषय, मालेचे गुण दोष यांचें सविस्तर विवेचन यांत निर्भीडपणानें केलें आहे. किं. ८१० आणे.

# श्रीकृष्णांचें चरित्रदर्शन.

## प्रकरण बारावें.

लेखकः—ना. श्री. बाटवे.

### कंसवध.

१ दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून रामकृष्ण शौचमुखमार्जन आटपतात तोंच मोठमोठाले नगारे वाजूं लागले. सर्व जणांची कुस्त्या पाहावयाला जाण्याची एकच धांदल उडून गेली. नंदादि सर्व मंडळी पुढें गेली व त्यांनीं राजापुढें नजराणा ठेवून ते आपापल्यासाठीं नेमलेल्या जागीं जाऊन बसले. थोड्याच वेळांत चाणूरादि मल्ल येऊन तयार झाले. इतक्यांत रामकृष्णही दारापाशीं आले पण ते दरवाजावर येतांच महातानें दारावरील हत्तीला पुढें करून दरवाजा आडवून धरला त्याबरोबर श्रीकृष्णांनीं महाताला वाट मोकळी करण्यास बजावलें, परंतु महातानें तें न ऐकतां श्रीकृष्णांच्या अंगावर हत्ती चालविला. तेव्हां श्रीकृष्णांनींही हें पाहून कंबर कसली, व बलरामास मागें सारून ते पुढें झाले. हत्तीही त्यांच्या आंगावर धांवला व त्यानें श्रीकृष्णांच्या शरीराला आपल्या सोंडेचा विळखा घातला. परंतु श्रीकृष्ण त्यांतून निसटले व त्यांनीं हत्तीला एक गुद्दा देऊन आपण त्याच्या पायांत दडले. अशा तऱ्हेच्या पुष्कळ हुलकावण्या दाखवून शेवटीं श्रीकृष्णांनीं त्या मस्त हत्तीला सोंड मुरगळून जेरीस आणलें व त्याचे दांत उपटून त्या दातांनींच त्याला यथेच्छ पिटलें व त्या दुष्ट महातालाही एका तडाक्यासरसें मारून टाकलें. त्यानंतर त्यांनीं एक दांत बलरामाच्या खांद्यावर दिला व दुसरा आपल्या खांद्यावर घेऊन ते आंत शिरले. श्रीकृष्णांचें सर्वांग रक्तानें भरलें होतें.

२ ही श्रीकृष्णांची व हत्तीची लढाई चालली असतां आंतील सर्व मंडळी अगदीं चित्रासारखी तटस्थ राहून काय होतें तें पाहात होती. सर्व पौरजानपद-मंडळींना फारच वाईट वाटलें. त्यांची उत्कंठा क्षणोक्षणीं वाढत होती. परंतु श्रीकृष्णांनीं त्यांना फार वेळ काळजींत ठेवलें नाहीं. श्रीकृष्णांनीं हत्तीची सोंड धरून जोरानें पिरगळलेली पाहतांच प्रेक्षकजनांना हायसें वाटलें, परंतु कंसाचें हृदय मात्र त्याबरोबरच पिरगळलें जात होतें; व तो हत्ती खरोखरच मरून पडतांच कंसाची हृदयक्रिया जवळजवळ बंद होण्याची वेळ आली ! त्याच्या सर्वांगास कंप सुटला, घामाच्या नद्या वाहूं लागल्या. तोंडांतून शब्द बाहेर पडेना. आपला मृत्यु त्याला समोर दिसूं लागला असें कितीसें वर्णन करावें ! त्याची स्थिति फारच अनुकंपनीय झाली; त्याला आपल्या जीविताची मुळींच आशा वाटेना ! तो सिंहासनावरून खालीं पडला नाहीं इतकेंच ! श्रीकृष्णांनीं हत्तीला मारीपर्यंत नंदाची जी

काय अवस्था झाली होती ती विचारूं नये ! तिचें वर्णन करतां येणार नाहीं व श्रीकृष्णांनीं हत्तीला मारल्यावर त्याला जो आनंद झाला तोही वर्णन करतां येणार नाहीं !

३ हे दोघे भाऊ आंत जातांच आंतील मंडळीला श्रीकृष्ण कसकसे दिसून आले तें खालील श्लोकांत उत्तम दिसून येत आहे. कवि म्हणतात श्रीकृष्णः--

‘ मल्ला वज्र गमे, नरां नृप गमे, काम स्वयें स्त्रीजनां ।
गोपां आप्त, खळां नृपां प्रभु, शिशू मातापित्यांच्या मना ॥
कंसा मृत्यु, अतुल्य पामरजनां, संतासि तत्वांबुधी ।
श्रीशेषासन यादवां, हरि दिसे रंगांत नानावधी ॥ १ ॥

असो अशा रीतीनें अतुलपराक्रम गाजवून व रिपुजनांच्या तोंडचें पाणी पार पळवून ते दोघे भाऊ आंत शिरतांचः---

‘ गडबडला कंस मनीं, मल्लगणहि पाहतांच भावातें ’ ।

परंतु बाकीची सर्व मंडळी कर्णोपकर्णीं ऐकलेले त्यांचे पराक्रम वर्णन करूं लागली; व म्हणूं लागलीः—

‘ वसुदेव पुत्र होते नंदगृहीं, जेष्ठ राम जो गौर ॥
श्यामल कामललिततनु कृष्ण ’ असें कथिति दाविती पौर ॥ २ ॥

४ बलरामासहित श्रीकृष्ण आंत येऊन उभे राहिले व बालसिंहाप्रमाणें इकडे तिकडे पाहूं लागले. तोंच चाणूर उठून बोलूं लागला. तो त्यांना हटकून म्हणाला, ‘ तुम्हीं दोघेजण मल्लयुद्धांत प्रवीण आहांत असें ऐकून राजानें तुम्हांला एथें बोलावून आणलें आहे व राजाज्ञा मान्य करणें हें प्रत्येक प्रजाजनाचें कर्तव्य आहे. तरी कृष्णा ! तूं माझ्याशीं भीड व बलराम ह्या मुष्टिकाशीं भिडूं दे ’ यावर श्रीकृष्ण म्हणाले. ‘ आम्हीं अजून बाळ आहोंत तरी आमच्या बरोबरीच्याशीं खेळूं. तुम्हीं दोघे वयांत आलेले मल्ल असल्यामुळें तुमच्याशीं आम्हांस कुस्ती करावयास कशी सांगता ? ’ यावर चाणूर पुन्हा म्हणालाः---‘ तूं आपला पराक्रम दाखविला आहेसः—

‘ बाळ न.तूं बळशाली, बळ हि; बरें; कर धरूनि पाहूं तें ॥
तूं मीं, बळ मुष्टिक, या खेळों; हूं, थोपटा स्वबाहूंतें ॥ २ ॥

यावर श्रीकृष्णांनींही आढेवेढे न घेतां एकदम मल्लयुद्धाला सुरवात केली व हां हां म्हणतां दोघांनीं दोघांही मल्लांना यमसदनाची वाट दाखविली ! त्याबरोबर जे पुढें आले त्यांना लाथाबुक्क्यानीं मारून टाकलें. पुष्कळसे मल्ल पळून गेले.

५ हा सर्व प्रकार पाहून कंस त्रासून गेला. त्यानें चिडून असा हुकूम सोडला कीं ‘ ह्या दोघां दुर्वृत्त पोरांना येथून बाहेर काढा. नंदाचें सर्वस्व हरण करा व

वसुदेवाला ठार मारा. तसाच शत्रुपक्षीय असा हा आमचा बाप उग्रसेन यालाही ठार मारा.'

परंतु स्वतांच्या गुरुजनांना अत्यंत घातक अशा तऱ्हेचा हा हुकूम ऐकतांच श्रीकृष्णांच्या पायांची तिडीक मस्तकाला जाऊन पोंचली. त्यांनीं तत्काल उडी टाकून कंसाला सिंहासनावरून खालीं खेंचलें व एका हिसक्यासरशीं त्याचा निकाल लावला! इकडे बलरामानेंही कंसाचे दुसरे जे आठ बंधु श्रीकृष्णांच्या अंगावर आले त्यांना ठार केलें. ह्या सर्व प्रकारानें राजवाड्यांत एकच हलकल्होळ माजला राजस्त्रियांनीं आकांत मांडला. त्या धाय मोकलून रडूं लागल्या. श्रीकृष्णांनाही वाईट वाटलें. त्यांनीं त्या स्त्रियांची समजूत केली व आपण स्वतां होऊन मृतांच्या पुढील व्यवस्थेची तजवीज करविली.

६ नंतर त्यांनीं आपल्या मातापितरांस व वृद्ध आजा जो उग्रसेन त्याला बंधमुक्त करविलें व त्यांच्या पायांवर डोकें ठेविलें. वसुदेवदेवकीला हे कोणी ईश्वरांश आहेत असें कळलेले असल्यामुळें त्यांना त्यांच्याकडून नमस्कार घ्यायला फारच संकोच वाटूं लागला. असें पाहून भगवंत स्वतांच मोठ्या काकुळतीस येऊन 'तुम्हांला व्यर्थ श्रम दिले. आमचा तुम्हांला कांहींच उपयोग झाला नाहीं. आमचें कौतुक तुम्हांला मुळींच करायला कीं पाहायला मिळालें नाहीं! आम्हांला तुमची कांहींच सेवा घडली नाहीं. तरी क्षमा करा.' असें ह्मणाले. अशा तऱ्हेचें हें भगवंतांच्या तोंडचें कळकळीचें भाषण ऐकून वसुदेवदेवकीच्या ठायीं प्रेमाचें भरतें आलें व त्यांनीं ह्या दोन्हीं मुलांना मांडीवर बसवून त्यांचे मुके घेतले, त्यांचें सर्वांग कुरवाळलें. तीं दोघेंही फारच गहिंवरलीं. इतक्यांत उग्रसेन बंधमुक्त होऊन तेथें आला त्याला पाहतांच रामकृष्णांनीं त्यांच्या पायांवर डोकें ठेविलें व ते त्याला म्हणाले कीं 'आम्हीं आपल्या मुलांना मारलें आहे, तरी ते दुर्वृत्त होते हें लक्षांत आणून आम्हांला कृतापराधांबद्दल क्षमा करा. आम्हीं असें केलें नसतें तर ह्यावेळीं आमच्या ह्या पूज्य मातापितरांना व त्यांचेही वडील अशा आपणालाही यमसदनाची वाट पाहावी लागली असती. आम्हीं आपले प्रजाजन असल्यामुळें आपल्या जिवावरचें संकट टाळण्याची जबाबदारी ओळखून त्याप्रमाणें वागावें हें आमचें कर्तव्यच आहे व तें आम्हीं केलें तर त्यांत आम्हीं कांहीं अधिक केलेसें होत नाहीं हें आम्हीं जाणून आहों. तरी आतां आपणच आम्हीं कसें वागावें तें सांगा म्हणजे आम्हीं तसे वागूं.'

यावर उग्रसेनानें श्रीकृष्णांना अशी विनंति केली कीं 'कंसाच्या प्रधानांकडून कंसाचें सर्वस्व तुझ्या चरणीं अर्पण करवितों; तूं त्याचा स्वीकार कर, व मला तपोवनांत जाण्यास परवानगी दे' परंतु श्रीकृष्ण त्याला म्हणाले:—

‘ राजा ! मज राज्य नको, त्वत्सुत वधिला न राज्यकामानें ; ।
ठावा तुज, हा दंडावांचुनि वळता कधीं न सामानें ॥ १ ॥
लोकहितार्थ, यशोर्थ, स्वकुळाचा काळ मारिला कंस ’ ।...
‘ चित्तीं व्यथा नसेल, प्रेमा मजवरि असेल जरि साचा ॥
राज्यपदा योग तुझा तरि हो, लोहा जसाचि परिसाचा ॥२॥
राज्य तुझें तूंचि करीं, न करावा त्वां नकार बा ज्ञात्या ॥
मान्या आम्हांसि तुझ्या, ज्या वेदाच्या, तशाच आज्ञा त्या ॥३॥
चित्तीं असेल करणें मत्प्रिय, तरि तूंचि पूज्य राज्य करीं ॥
द्यावें भव्यार्थ पद श्रेष्ठाच्या, वन्हिच्याचि आज्य, करीं ॥ ४ ॥

७ श्रीकृष्णांचें हें अशा तऱ्हेचें कुलीनाला शोभणारें नम्रपणाचें भाषण ऐकून उग्रसेन लाजेनें खालीं मान घालून स्तब्ध राहिला. याला आतां काय म्हणतील ह्याचीच त्याला खंती वाटूं लागली होती. बरें, इतक्या पराक्रमी व पुन्हा विनयशील नातवाच्या म्हणण्याला नकार देणेंही त्याला इष्ट वाटेना म्हणून तो कांहींच न बोलता उगी राहिला. हें पाहून व त्याच्या मनांतील आशय जाणून श्रीकृष्णांनींच उग्रसेनाचा राजा ह्या नात्यानें जयजयकार करविला. ह्या प्रसंगाला उद्देशून मोरोपंत म्हणतात.

दे राज्य उग्रसेना प्रति, अति सन्मान करुनि त्या वडिला ।
तो ही स्वीकार करी, प्रभुच्या पुरवावयासि आवडिला ॥ २ ॥

नंतर श्रीकृष्णांनीं पत्रें पाठवून ज्यांना ज्यांना कंसानें पदभ्रष्ट करून घालवून दिलें होतें त्यांना त्यांना परत बोलावून आणविलें व त्यांना ज्याच्या त्याच्या जागीं परत स्थापन करून

‘ मथुरेमाजि नुरविला कोठेंही ओखदासही कष्ट ’

नंदही इतके दिवस मथुरेंतच राहिला होता. तेव्हां अशीही सर्व व्यवस्था लाऊन झाल्यावरः—

यत्नस्तंभितबाष्प प्रभु दोघे जणहि नंदतातातें ।
वंदुनि म्हणती, “ ठेवा, माथां स्नेहें करूनि हातातें ॥ १ ॥
न धरावा भेद मनीं, आम्हीं बाळें खरे तुम्हीं पितर ।
हितरक्षण जें केलें, तें क्षणहि करील कोण हो इतर ॥ २ ॥
‘ मोघ श्रम ’ न म्हणावें येऊं, राहूं, कसें करूं, बोला ।
गाईला वत्सांला चारा चाराल कीं बरा ओला ॥ ३ ॥

याप्रमाणें श्रीकृष्णांनीं प्रश्न टाकतांच नंदानें सहजच त्यांना तेथेंच राहण्याविषयीं अनुमोदन दिलें व मोठ्या कष्टानें त्यांचा निरोप घेऊन तो निघाला. परंतु परत

जातांना व घरीं गेल्यावरही त्याला कसेंसेंच वाटूं लागलें! किती तरी दिवस त्याला चैन म्हणून कसें तें पडेना! त्याला आणखी मूलबाळ नव्हतें, त्यामुळें त्याला आपलें घर अगदींच शून्य वाटूं लागलें. परंतु शोक काय नी आनंद काय केव्हांही कायम टिकत नसतो! तो आपले नित्याचे व्यवहार सुरळीतपणें करूं लागला.

८ श्रीकृष्णांची मल्लयुद्धादिवसच्या सकाळपासून तों नंदाला निरोप देई-पर्यंतची वागणूक पाहातां असें आढळून येईल कीं आपणाला हत्तीशीं झुंज खेळावी लागणार हें माहीत असल्यामुळें ते मुद्दाम जरा उशीर करूनच रंगद्वारीं आले होते; व त्यांनीं महातानें हत्ती आपल्या अंगावर घातलेला पाहून क्षत्रि-याला साजेशा शूरपणानें त्याला तोंड दिलें व आपला बचाव केला. त्या हत्तीशी केलेल्या झुंजींत व पुढें मल्लांशीं केलेल्या कुस्तींत भगवंतांनीं:—

'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्'

म्हणजे दुसरे माझ्याशीं ज्या भावनेनें वागतात त्याचप्रमाणें मीं त्यांच्याशीं वागतों, या न्यायानें हत्ती व मल्ल आपले हरण करूं पाहतात असें पाहून त्यांना ठार मारून टाकलें.

कंसानें एवढ्यावरच हुशार होऊन त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे होतें. व व वसुदेवाला व उग्रसेनाला बंधमुक्त करवून आपण त्यांची क्षमा मागून त्यांच्या-करवीं रामकृष्णांचीं समजूत करविली पाहिजे होती. परंतु त्यानें तसें व करतां उलट तो कारणाशिवाय अन्यायाचे हुकूम सोडूं लागला म्हणजे अधर्म करूं लागला असें पाहून 'परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्' म्हणजे निरपरा-ध्यांचा कैवार घेऊन उच्छृंखलांचा बंदोबस्त करण्यासाठींच ज्याचा अवतार अशा श्रीकृष्णांनीं तावडतोब त्याला यथायोग्य शिक्षा केली. परंतु त्याच्या बायकांचा शोक ऐकून विव्हळ झालेल्या श्रीकृष्णांनीं लागलाच 'समोऽहं सर्व भूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः' म्हणजे मीं प्राणिमात्राशीं निःपक्षपातबुद्धीनें वागत असतों; कारण माझा खरोखर कोणाशींच द्वेष नाहीं किंवा स्नेहही नाहीं; या आपल्या वचनाची आठवण ठेवून शत्रूंच्या सुद्धा बायकांची समजूत केली; व जशी एखाद्या खऱ्या खुऱ्या प्रेमाच्या भाच्यानें आपल्या मृत मामाच्या प्रेताची व्यवस्था करावी तशीच त्यानें कंसाची सारी मरणोत्तरची व्यवस्था करविली!

९ कंस हा श्रीकृष्णांचा मामा; परंतु त्यानें श्रीकृष्णांशीं ते जन्माला येण्या-पूर्वींपासूनच निष्कारण द्वेष मांडला. त्याचा शेवट असा झाला कीं भगवंतांना त्याला तो आपला मामा असतांही मारावें लागलें. त्यानें आसुरीस्वभावाचा आश्रय करून परमेश्वराशीं द्वेष मांडल्यामुळें त्याचा असा अकालीं नाश झाला.

कंस आपल्या स्वताच्या पापानेंच मेला. दुसऱ्या कशानेंही नव्हे. श्रीकृष्ण म्हणतातः—

नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ।
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ॥ ५।१५

म्हणजे ‘ परमेश्वर कोणाच्याही पापपुण्याची जबाबदारी स्वीकारीत नाहीं. मनुष्यें अज्ञानानें हवीं तशीं वागतात व मग परमेश्वराला त्यांच्या पापपुण्यानुरूप त्यांना निग्रहानुग्रहरूपी फळ देणें प्राप्त होतें. ’ या त्यांच्या म्हणण्याप्रमाणें कंसानें अज्ञानानें मोहित होऊन.

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः

म्हणजे ‘ जो शास्त्राच्या आज्ञा धाब्यावर बसवून केवळ स्वतांच्या मनास येईल त्याप्रमाणें वागूं लागतो ’ यांत सांगितल्याप्रमाणें पापपुण्याचा विचार न करतां श्रीकृष्णांच्या सहाही भावंडाना विनाकारण मारलें त्यामुळेंच त्याला :—

न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम्

म्हणजे ‘ त्याची मनकामना पूर्ण होत नाहीं, त्याला इहलोकीं सुख लागत नाहीं, व अंतीं सद्‌गती मिळत नाहीं ’ यांत सांगितल्याप्रमाणें कंसाला स्वताचें मनःसंकल्प पूर्ण झाल्यामुळें प्राप्त होणारें उच्चतम सुख मिळालें नाहीं; त्याला कधींही निश्चितपणें सुखांत राहतां आलें नाहीं; व शेवटीं एखाद्या बोकडाप्रमाणें गुद्दे ठोंसे खाऊन मरण आल्यामुळें वः—

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः ।
माययापहृतज्ञाना आसुरं भाव माश्रिताः ॥ ७।१५

म्हणजे ‘ आसुरी बाण्यानें वागणारे व नाना तऱ्हेच्या भलत्याच पापी व वाईट कल्पनांना डोक्यांत थारा देणारे मूढबुद्धी नराधम आपल्या दुष्कृत्यांचा परिपाक म्हणून कधींच सद्‌गती पावत नाहींत ’ ह्या श्रीकृष्णांच्या मताप्रमाणेंही त्याला सद्‌गती मिळाली नसली पाहिजे. अशा रीतीनें भगवद्द्वेषामुळें कंस इहलोक व परलोक या दोहोंनाही मुकला म्हणून प्रत्येकानें

अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्

म्हणजे ‘ क्षणभंगुर व दुःखमय अशा ह्या मृत्युलोकीं आलास कीं माझी भक्ती कर ’ या भगवदाज्ञेप्रमाणें वागून आपलें कल्याण करून घ्यावें.

१० या ठिकाणीं एक गोष्ट वाचकांच्या नजरेस आणावीशी वाटते, ती अशी कीं भागवतादि ग्रंथांतून असें प्रतिपादन केलेलें आढळून येतें कीं भगवंतांचा विरोध करणारे दुष्ट पुरुषही भगवद्‌भक्तांना मिळणारी उत्तम गती मिळवि-

तात. उदाहरणार्थ भागवत दशम् स्कंध पूर्वार्ध अध्याय ४४ श्लोक ३९ यांत असें लिहिलें आहे कीं, कंसाला 'तदेव रूपं दुरवापमाप' म्हणजे तेंच भगवंतांचे अत्यंत दुर्लभ असें सारूप्य प्राप्त झालें परंतु भगवद्गीतेंत असें होतें असें कोठेंच म्हटलेलें नाहीं. उलट तेथें भगवान् स्पष्ट सांगतात कीं—

न मां दुष्कृतिनो मूढा प्रपद्यन्ते नराधमाः।
माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥ ७।१५ ॥

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधंच संश्रिताः।
मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः ॥ १६।१८॥
तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान्।
क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥ १९ ॥
आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि।
मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम् ॥ २० ॥

मायेनें भ्रान्तचित्त झालेले आसुरी स्वभावाचे लोक हे अत्यंत हीन असून आपल्या दुष्टकृत्यांमुळें ते मला कधींच येऊन मिळत नाहींत. आतां यावर कोणी असें म्हणेल कीं, 'सामान्य रीत्या दुष्कृत्यें करणारी मनुष्यें परमेश्वराला पोंचत नसतील परंतु प्रत्यक्ष विरोधभक्ति म्हणजे शत्रुत्व करणारे मनुष्य परमेश्वराला पोंचत नसतील कशावरून ?'

परंतु या ठिकाणीं पृच्छक एक गोष्ट सपशेल विसरतात; ती ही कीं परमेश्वराचें शत्रुत्व करणाऱ्यांना असे लोक परमेश्वराची विरोधभक्ति करतात हें म्हणणेंच मुळीं शोभतें कीं काय ? गीतेंत चार तऱ्हेचे भक्त दिले आहेत व ते

'आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानीच'

म्हणजे संकटनिरसनार्थ माझी भक्ती करणारा, माझ्या स्वरूपाचें ज्ञान व्हावें म्हणून माझी भक्ती करणारा, कोणत्या तरी लाभाच्या इच्छेनें माझी भक्ती करणारा व पूर्ण कृतकृत्य झाल्यानंतरही केवळ देहस्वभाव म्हणून माझी भक्ती करणारा, असे ते चार प्रकार होत. यांहून निराळा असा विरोधभक्तांचा म्हणून आणखी एखादा प्रकार गीतेस मान्य असलेला दिसत नाहीं. तसेंच भक्त म्हणविणाऱ्या कोणीही परमेश्वराशीं विरोध केलेला दिसत नाहीं, व विरोध करणाऱ्या हिरण्यकशिपु, रावण, कंस यासारख्या कोणीही स्वताला भक्त म्हणविलेलें नाहीं. मग या विरोधकांच्या मना व मताविरुद्ध त्यांना भगवद्भक्तांच्या मालिकेंत गोवण्याचा इतरांना अधिकार तरी कसा पोचतो हेंच आम्हांस कळत नाहीं.

११ आतां हे भगवंतांचा विरोध करतात म्हणजे करतात तरी काय काय तें पाहूं:—

'परमेश्वर म्हणून कोणी नाहीं' म्हणून स्वच्छ सांगणारे ह्या जगांत पुष्कळ आहेत. परंतु त्यांना शिक्षा करण्यासाठीं भगवंतानीं कधीं खटाटोप केलेला दृष्टीस पडत नाहीं. 'राजा, मला मान्य नाहीं' असें नुसतें तोंडानें म्हणणाराला राजा विशेषसें कांहींच करीत नाहीं, कारण राजाला पक्कें माहीत असतें कीं आपण याला केव्हांही आपली सत्ता मान्य करायला लावूं व योग्य प्रसंगीं राजा तसें करण्यास चुकतही पण नाहीं. परंतु तोच जर 'राजा मला मान्य आहे' असें तोंडानें कबूल करीत असतांही कृतीनें आपणाला राजा मान्य नसल्याचें दाखवीत असेल म्हणजे राजाचे कायदे धाब्यावर बसवीत असेल तर राजा त्याची ताबडतोब दाद घेतो; म्हणजे त्याला पकडवून, शिक्षा सुनावून कैदेंत टाकतो, परंतु अशा गुन्हेगाराला कोणी कधींच राजभक्त किंवा राजनिष्ठ म्हणत नाहीं. राजाला नुसतें तोंडानें न मानणें म्हणजे कांहीं खास राजविरोध नव्हे, राजाचे कायदे न मानणें हाच खरा राजविरोध होय व असा राजविरोधी मनुष्य जसा त्याच वेळीं कधींच राजभक्त होऊं शकत नाहीं तशीच कांहींशी गोष्ट भगवंतांच्या विरोधकांची ही पण आहे. जे नुसते तोंडानें देवाचें अस्तित्व मानीत नाहींत ते देवाचे खरे विरोधी नसून जे कृतीनें देवाचें अस्तित्व, सर्व शक्तिमत्व, सर्व नियंतृत्व, सर्वज्ञत्व वगैरेंच्या विरुद्ध बंड करतात म्हणजे परमेश्वरी कायदे धाब्यावर बसवितात अथवा एका शद्बांत सांगावयाचें तर अधर्म माजवितात तेच परमेश्वराचे खरे विरोधक होत; आणि अशा विरोधकांना भक्त म्हणवायचें तर अस्सल दरवडेखोरांना त्यांच्या राजनिष्टेबद्दल पहिल्या प्रतीचा मान दिला पाहिजे. पण कोणीच असें करतांना दिसत नाहीं. जो तो अशा दरवडेखोरांकडे तुच्छतेच्या नजरेनेंच पाहतो. मग भगवंताच्याच तेवढ्या विरोधकांना त्यांच्या भगवच्छत्रुत्वाबद्दल भक्तिमत्त्वाचा श्रेष्ठ बिल्ला कसा देतां येईल!

स्वतां भगवन्तही अशा विरोधकांना भक्त म्हणत नाहींत व त्यांना 'न मे भक्तः प्रणश्यति' म्हणजे माझे भक्त केव्हांच नाश पावत नाहींत ह्या ब्रीदवाक्यानुसार त्यांच्या संकटकालीं धांवून जात नाहींत, व त्यांना भक्तांना सोडवितात तसे संकटांतून सोडवीत नाहींत; उलट स्वतांच त्यांना संकटांत पाडतात व त्यांची बाजू घेणाऱ्यांना सुद्धा शिक्षा करतात. म्हणजे ते अशा विरोधकांना आपले भक्त समजत नाहींत. त्यांच्या हृदयस्थ राहून त्यांची बुद्धी सुप्रेरणायुक्त करीत नाहींत, किंवा त्यांच्या निमित्त हरएक काम करीत नाहींत; अर्थात् असे भगवद्विरोधी लोक केव्हांच भगवद्भक्त म्हणविण्यास लायक नाहींत व भगवंत त्यांना तसे समजतही पण नाहींत, असें माझें स्पष्ट मत आहे.

भगवान् म्हणतात, ‘ अहंकार, शरीरसामर्थ्याबद्दलची व्यर्थ घमेंड, उद्धट-पणा, अती काम, क्रोध लोभ इत्यादि मनोविकारांनीं संयुक्तचित्त होत्साते जे स्वतांच्या देहसौख्यापलीकडे दुसऱ्या कशालाही किंमत न देतां सर्व जगदंतर्यामी असा जो मी त्या माझी अवहेलना करतात म्हणजे ‘ आत्मवत् सर्वभूतानि ’ या तत्त्वाच्या व्यवहार्यत्वासाठीं मीं जे धर्मनियम घालून दिलेले आहेत त्यांना गुंडाळून ठेवतात, अशांना ते संसारांत अतिशय नीचपणानें व अधर्मानें वागतात म्हणून व माझ्या भक्तांचा व धर्मनियमांचा द्वेष करतात म्हणून मीं पुनः पुनः आसुरीयोनींत ढकलून देतों व अशा रीतीनें प्रत्येक जन्मांत अधिकाधिक नीच स्थितीला जाऊन शेवटीं ते माझ्याप्रत येण्याऐवजीं वृक्षपाषाणादिरूप अधम योनींत जाऊन पडतात.

यावरून भगवद्विरोधकांना गीतेच्या मताप्रमाणें तरी कोणती गती प्राप्त होते तें उघड होतें.

परिसा सारखा जड पदार्थही जर सरसकट कोणत्याही हीन धातूला सुवर्ण बनवीत नाहीं तर सर्व ज्ञाननिधि असा जो परमेश्वर तो केवळ एखादा पुढें आला एवढ्यासाठींच जर त्याला मुक्ति देऊं लागेल तर तो मोठाच अन्यायी आहे म्हणावयाचा ! परंतु छे ! छे ! तसें नव्हे. परमेश्वर केव्हांही अन्याय करीत नाहीं. तो

नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः

म्हणजे तो परमेश्वर सर्वांचा विभु म्हणजे शास्ता असल्यामुळें कोणाचें ही पाप आपल्या माथीं मारून घेत नाहीं किंवा पुण्य गिळंकृत करीत नाहीं. ज्याचें त्याला यथा योग्य फळ देतो. परंतु यावर कोणी असे म्हणेल कीं तर मग

‘ अपिचेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्यः ’ या भगवद्वचनाची वाट काय ?

तर त्याचें उत्तर असें कीं सुदुराचार म्हणजे आजपर्यंत लोक समजत आले त्याप्रमाणें अत्यंत घाणेरड्या पापी वागणुकीचा मनुष्य असा नसून ‘ सु ’ व ‘ दु ’ यांनीं मिश्र अशा आचाराचा म्हणजे ह्या जगांतील अनेक बरींवाईट कर्में नाइलाज असल्यामुळें ज्याला केल्याशिवाय चालत नाहीं असा सांसारिक मनुष्य असा आहे, व असा मनुष्य जर अनन्य भावानें भगवद्भजन करीत असेल तर तो साधुतुल्य समजण्यास हरकत नाहीं. कारण भारतकारही म्हणतात.

‘ जन्मान्तरसहस्रेषु तपोध्यानसमाधिभिः ।
नराणां क्षीणपापानां कृष्णे भक्तिः प्रजायते. ॥

म्हणजे हजारों जन्मपर्यंत कोणती तरी तपश्चर्या, किंवा भगवद्ध्यान किंवा मनोनिग्रह

यांचा अभ्यास चालू असेल तेव्हांच श्रीकृष्णांच्या ठिकाणीं मनुष्याची भक्ती जडेल एरवीं जडणार नाहीं. अर्थात्च असा मनुष्य केव्हांच पापाचरणाला प्रवृत्त होणार नाहीं. अर्थात् अशा हरिभक्तिप्रवण पुण्यपुरुषाला मुक्तीही मिळायचीच, परंतु त्यामुळें भगवंतांच्या शत्रूंनाही मुक्ती मिळालीच पाहिजे असें मुळींच ठरत नाहीं.

एकंदरींत काय तर गीता व भागवत यांचा या बाबतींत विरोध आहे. भागवत म्हणतें भगवंत शत्रूंना सुद्धा मुक्ती अथवा सद्गती देतात व गीता म्हणते भगवंत शत्रूंना दुर्गतीच देतात. व आम्हांस तरी गीतेचेंच मत ग्राह्य आहे.

× × × ×

शेवटीं रा. वाटवे यांनीं ‘ गीता विरुद्ध भागवत ’ अशा अर्थाचा जो निवाडा दिला आहे तो आह्मांस मान्य नाहीं, हें येथें सांगणें जरूर वाटतें. रा. वाटवे यांची ही श्रीकृष्णचरित्रदर्शनाची लेखमाला एकंदरीत फार चांगली आहे व सामान्य वाचकांना व विशेषतः चिकित्सक बुद्धीच्या वाचकांना मनोरंजक व बोध-प्रद वाटेल अशा समजुतीनें आह्मी मुमुक्षूत क्रमशः देत आहोंत. तथापि क्वचित् त्यांचा आमचा मतभेद होतो. त्या मतभेदापैकीं हें एक महत्वाचें स्थळ आहे. हिरण्यकशिपु, रावण, कंस, पूतना इत्यादि खळांचा वध करूनच भगवंतानें त्यांना सद्गति दिली असेंच भागवताप्रमाणें आपले सर्व संत सांगत आले आहेत. ‘ कृष्ण कोपोनि ज्यासि मारी । तो पावे परब्रह्मसाक्षात्कारीं । मा कृपेनें उपदेशु करी । तो कैशापरी न पवेल ? ’ असें ज्ञानेश्वरमहाराजांनींही ह्मटलें आहे ( ज्ञाने० ८-९ ) मोरोपंती भागवताचे आधार रा. वाटवे हे आपल्या लेखमालेंत हमेष घेत आहेत, पण मोरोपंतही या बाबतींत काय ह्मणतात तें पाहण्यासारखें आहे. पंत केकावलींत ह्मणतातः—

असंख्य खळ संगरीं निजकरीं तुवां मारिले
न निष्ठुरपणें–कृपा करुनि ते भवीं तारिले ।—९०

केकावलींत ह्याविषयीं फारच सरसपणें भगवंताच्या सुष्टदुष्टांवरील दयेचें वर्णन केलें आहे, पण ऊहापोह करण्यास सध्या तरी आह्मांस सवड नाहीं. भागवता–प्रमाणेंच ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंत सर्व सत्कवींचा एकरूप अभिप्राय आहे व त्याशीं गीतेचा अभिप्राय विरुद्ध आहे असें आह्मांस वाटत नाहीं. ह्या संबंधी कोणा अधिकारी पुरुषाचा विवेकपूर्ण लेख आह्मांकडे आला तरी आह्मी त्यास ‘ मुमुक्षूंत ’ अवश्य स्थळ देऊं. उगाच कोणी कांहीं तरी लिहूं नये, वादबुद्धीनें लिहूं नये, सात्विकपणें चर्चा करावी, चिकित्सकांसही पटेल असें लिहावें. भाविकांचा तर निश्चय कशानेंही ढळत नसतोच. (संपादक मुमुक्षु)

# अरिस्टॉटलचें
# " मानवीव्यवहाराचें तत्त्वज्ञान "

अनुवादक—श्रीराम गोसावी, नाशीक.

अरिस्टॉटल हा महापंडित आणि तत्त्वज्ञानी इसवी सनापूर्वी ग्रीस देशांत होऊन गेला. इतिहासप्रसिद्ध अलेक्झांडर बादशहाचा हा गुरु होता. निरनिराळ्या विषयांवर यानें सुमारें दीडशे शास्त्रीय पुस्तकें लिहिलीं; त्यापैकीं जवळ जवळ पन्नास ग्रंथ आज उपलब्ध आहेत. सर्व प्रकारच्या पाश्चात्य शास्त्रज्ञांस याच्या पुस्तकाचा अद्यापही आधार घ्यावा लागतो म्हणून डॅन्टेनें ' सर्व ज्ञान्यांचा राजा ' ( Master of Those That Know) असें उचितपणें त्यांस संबोधिलें आहे. याशिवाय तत्त्वज्ञानाच्या प्रांतांत Head Of the Philosophic Family असा त्याचा गौरवानें उल्लेख केला जातो. ग्रीस देशाचा व्यास किंवा विद्यारण्य अरिस्टॉटल यांस म्हणण्यास हरकत नाहीं.

## प्रकरण पहिलें.

### १ जीवनकार्यांतील भिन्नभिन्न प्रयोजनें

प्रत्येक कला, प्रत्येक शास्त्र किंबहुना मनुष्याची प्रत्येक कृती कांहींतरी चांगल्या गोष्टीवर लक्ष ठेवूनच प्रवृत्त होत असते; यावरून सर्वजण जिची इच्छा करितात ती सर्वोत्तम गोष्ट असें म्हटलें तर उत्कृष्टाचें तें अनुचित वर्णन होईल, असें दिसत नाहीं.

आतां प्रत्येक कलेचें, शास्त्राचें व कृतीचें प्रयोजन व साध्य यांत भिन्नता येणार हें उघडच आहे. कांहींचें साध्य हें केवळ कार्यापेक्षा कर्तृत्वाच्या आनंदाकरितां असेल व कांहीं त्या कर्तृत्वाच्या आनंदापेक्षा कार्याची फलनिष्पत्ती मनांत ठेवीत असतील. दुसरें असें कीं कला आणि शास्त्रें अनेक असल्यानें त्यांचीं साध्येंही साहजिक अनेक असणार. वैद्यशास्त्राचें आरोग्य हें साध्य असलें तर लष्करी कलेचें साध्य विजय हें असेल. अशा प्रकारें निरनिराळ्या कलांची व शास्त्रांचीं साध्यें भिन्नभिन्न असूं शकतील.

आतां या भिन्नभिन्न शास्त्रांचीं व कलांचीं साध्यें ही अंतिम स्वरुपाचीं व त्या साध्याकरितांच प्राप्त करुन घ्यावयाच्या प्रकारचींच असतील असें नाहीं. याचा अर्थ असा कीं एका मोठ्या शास्त्राचें दुसरें एकादें शास्त्र हें शाखारूपाचें असेल.

एका विद्येंत दुसऱ्या अनेक कला अंतर्भूत होऊं शकतील. याला उदाहरण द्याव-याचें झालें तर एका अश्वविद्येत घोड्याला अवश्य असणाऱ्या निरनिराळ्या वस्तु करण्याच्या निरनिराळ्या कलांचें देतां येईल. घोड्याचें खोगीर व लगाम कर-ण्याची कला व घोड्याची गाडी करण्याची कला खास एक असूं शकणार नाहीं. पण त्या दोहोंचा एक अश्वविद्येत समावेश होऊं शकेल. त्याचप्रमाणें एका युद्ध-कलेनें अनेक शास्त्र व कला निर्माण केल्या आहेत परंतु त्यांचीं व्यक्तिविषयक मर्यादित साध्येंहीं युद्धकलेचीं जोपासना करणारींच आहेत. अशा उपशाखासम असणाऱ्या शास्त्रकलेच्या मर्यादित साध्यापेक्षा त्याच्या प्रभवास कारण होणाऱ्या मोठ्या शास्त्राचें साध्य हें अर्थात् अधिक महत्वाचें व इच्छिण्यास अधिक योग्य असें असणार, कारण खोगीर हें खोगिरासाठीं केलें नसून घोड्यासाठीं केलें आहे व घोड्याचें खोगीर हे घोड्यासाठीं केलें नसून बसणारासाठीं ठेवलें आहे. सर्व उपशाखारूप शास्त्रकला हीं एका महाशास्त्राच्या महत्साध्यासाठीं प्रवृत्त झालेलीं असतात,

## २ जीविताचें महासाध्य

जीविताचें हें महासाध्य मात्र त्या साध्याकरिताच इच्छिलेलें असलें पाहिजे; सर्व जीवनप्रवृत्तीचा नैसर्गिक शेवट त्यांत प्राप्त झाला पाहिजे. कारण त्या महा-साध्यासही साधनरूपता आल्यास अनवस्थाप्रसंग प्राप्त होईल. कारण त्या महा-साध्याचें महासाध्य आणि पुनः त्याचें महासाध्य हा प्रकार चक्रावरील भ्रमणा-सारखारखा होईल व जीवित हें नित्याचेंच अतृप्त राहील; व सर्व गोष्टीस निरर्थ-कता येईल. तेव्हां असें न करितां एका महासाध्यावरच बुद्धीनें स्थिर राहिलें पाहिजे. हें महासाध्य अर्थात् जीविताला सर्व प्रकारें समाधान देणारें असलें पाहिजे. आयुष्याचें उच्चतम कल्याण त्यांत घडून आलें पाहिजे. अशा सर्वोत्कृष्ट महासाध्याचें ज्ञान आपल्या प्रत्यक्ष व रोजच्या जीवनांतही अधिक महत्वाचें मानलें पाहिजे. कारण त्यावर लक्ष्य ठेवूनच सत्यासत्य पापपुण्य, सत्कृत्य दुष्कृत्य, यांचा निवाडा आपणास लवकर लागण्याचा संभव आहे. यासाठीं अशा महा-साध्याचें निश्चित स्वरूप काय असलें पाहिजे, तें प्राप्त करून घेण्याचा नक्की साधनमार्ग कोणता इ० गोष्टीचा आपणास आतां विचार केला पाहिजे. अनेक शास्त्रांतील बरोबर कोणत्या शास्त्राच्या प्रांतांत त्याचा विचार केला जाणें शक्य आहे याकडे आपण वळलें पाहिजे.

### ३ समाज-जीवनाचें नीतिशास्त्र

मानवी जीवनाचा साकल्यानें विचार करणाऱ्या शास्त्राच्या प्रांतांतच आपल्या आयुष्याच्या या महासाध्याचा आपणास तपास लागेल. कारण आपण व्यक्ति समाजाच्या घटकाचेच रूपाचे असल्यामुळें सर्व व्यक्तींना अवयवाप्रमाणें धारण करणाऱ्या समाजाच्या शास्त्रांतच आपल्या जीविताचें ध्येय आपणास सांपडूं शकेल. इतर सर्व शास्त्रें समाजधारणेसाठींच असल्यानें त्यांचे मर्यादित साध्य आपलें महासाध्य असूं शकणार नाहीं, आणि ज्याअर्थीं वरील प्रकारच्या समाज-शास्त्रासच अमूक व्यक्तीनें किंवा अमूक व्यक्तिसमूहानें काय करावें हें सांगण्याचा हक्क आहे, त्याअर्थीं सर्व व्यक्तींचीं साध्यें या शास्त्राच्या साध्यांतच अंतर्भूत असलीं पाहिजेत, आणि स्वभावतःच तें साध्य प्रत्येक व्यक्तीचें कल्याण करणारें असलें पाहिजे. यापुढें विचार करितां आपणास असें दिसून येईल कीं व्यक्ति आणि व्यक्तिसमूह यांच्या साध्यांत जर विरोध येईल तरीही त्या महासाध्यास तो कमीपणाच येईल. यासाठीं व्यक्तीचें कल्याण आणि समाजाचें कल्याण हीं एका स्वरूपाचीं असलीं पाहिजेत. आतां या दोघांत समाजाचे कल्याण हें अधिक महत्वाचें व त्याचें ज्ञानही अधिक योग्यतेचें सहज ठरेल कारण एका व्यक्तीच्या समाधानापेक्षां अनेक व्यक्तिसमूहाचें समाधान हें खात्रीनें अधिक महत्वाचें आहे. आणि समाजाच्या समाधानांत व्यक्तीचेंही समाधान येत असल्यामुळें त्यासाठीं यत्न करणें हे उदात्तपणाचें व दैवीपणाचें अधिक ठरेल.

### ४ आपली विवेचनपद्धति

आपण कोणच्या गोष्टींचा विचार करावयाचा हे अशा प्रकारें ठरल्यानंतर आपणास समाधानकारकरीतीनें त्यांचे निश्चित स्वरुप व त्यांच्या प्राप्तीचा साधन-मार्ग या गोष्टीकडे वळलें पाहिजे. आतां दोन आणि दोन चार या स्वरूपाचा गणिती निश्चितपणा आपणास या प्रांतांत अपेक्षिता येणार नाहीं. कारण सद्‌गुण, न्याय, उदात्तपणा, पाप, पुण्य या गोष्टी इतक्या व्यापक स्वरूपाच्या आहेत कीं त्या रुढीनें केवळ मानलेल्या गोष्टी आहेत, इतर दृश्य गोष्टींप्रमाणें त्यांच्यांत प्रत्यक्ष वस्तुता नाहीं असें म्हणण्यापर्यंत कांहीं पंडितांची मजल गेलेली आपण नेहमीं ऐकतो. तेव्हां त्यांचा हा व्यापकपणा लक्षांत घेऊनच आपणास आपला विचार व विधानें केलीं पाहिजेत, अर्थात् शौर्य आणि पैसा हीं चांगलीं आहेत असें नुसतें ठरवूनच आपणास भागणार नाहीं तर तीं कोणच्या रीतीनें उपयोगिलीं असतां नाशकारक आहेत याचा आपण सामान्यपणें विचार केला पाहिजे. कारण चांगल्या म्हटल्या जाणाऱ्या शौर्यापासूनही एकादे वेळीं सर्वस्वाचा नाश होतो हें आपण व्यवहारांत बघूं शकतो. आपल्या विमत विषयाकडे सामान्यपणें पाहूनच सर्व साधारण सिद्धांत स्थूलमानानें आपणास काढलें पाहिजेत.

कारण प्रत्येक व्यक्तीची दृष्टी व परिस्थिती लक्षांत घेऊन विचार करणें हें आपणास काय किंवा इतर कोणास काय अशक्य आहे. पण वर दर्शित केल्याप्रमाणें कांहीं ठोकताळ्यानें आपण बोलूं शकूं व हे विचार ऐकणाऱ्या जिज्ञासूनेंहीं ही गोष्ट–ध्यानीं ठेवूनच या शास्त्राच्या अभ्यासास लागावें. दोन आणि दोन चार होतात ही गोष्ट सांगण्यासाठी लोकांच्या प्रार्थना व मनधरणी करणें हें गणिताच्या बाबतींत जितकें हास्यास्पद ठरेल तितकेंच 'प्रत्येकाचें कल्याण काय' ह्या प्रश्नाच्या उत्तरा–साठीं एकादे त्रैराशिक वा पंचराशिकाचें उदाहरण नीतीशास्त्रज्ञानें सांगणें उपहा–सास्पद होईल.

### ५ या शास्त्राच्या विद्यार्थ्यांची योग्यता.

आतां ज्या मनुष्याला ज्याचें विशेष परिज्ञान असते तोच मनुष्य त्याबाब–तींत निश्चय करूं शकतो. आयुष्याच्या योग्य मार्गक्रमणाचें हें शास्त्र असल्यानें ज्याला जगाचा व जीविताचा विशेष अनुभव नाहीं अशा तरुण मनुष्य या जीवित---तत्वज्ञानाचा विद्यार्थी होऊं शकणार नाहीं. असा अननुभवी तरुण मनुष्य हा विचारापेक्षा विकाराचाच दास असल्यानें चांगले विचार ऐकूनही ते न ऐकल्यासारखेंच त्याच्याकडून होतील. कारण केवळ बुद्धिगम्य ज्ञानापेक्षा योग्य आचार हेंच आपले ध्येय आहे. तेव्हां ऐकलेले विचार आचारांत आणण्याची पात्रता असणारा व इतकी मनाची उन्नती झालेली असणारा मनुष्यच या शास्त्राचा योग्य विद्यार्थी होऊं शकेल. आतां जे वयानें म्हातारे आहेत पण वृत्तीनें व आचारानें पोरापेक्षांही पोर आहेत ते सुद्धां या शास्त्राच्या अभ्यास नालायकच ठरतील. कारण वय किंवा वर्षे हा महत्वाचा मुद्दा नसून मनाचा लहानपणा किंवा थोरपणा हेंच योग्यतेविषयीं महत्वाचे गमक आहे. वयानें लहान असला पण आंतील मन जर सशक्त व स्थिरनिश्चयी असेल तर वय मोठें पण लक्षण खोटें अशा म्हाताऱ्यापेक्षा त्याची योग्यता अधिक समजली पाहिजे. ज्ञानाचा लाभ त्यालाच अधिक करून घेतां येईल.

अशा प्रकारें आपल्या विचाराचा विषय, त्याची विवेचनपद्धति व त्याच्या विद्यार्थ्यांच्या योग्यतेविषयीं आपण विचार केला. आपल्या विषयाची ही एक छोटीशी प्रस्तावनाच झाली.

### ६ सुख हें अंतिम साध्य

सर्व ज्ञान व सत्कृति ही कांहीं तरी चांगल्याची अपेक्षा ठेवूनच प्रवृत्त होतें. तेव्हां असें सर्वांत चांगलें काय आहे या प्रश्नानें आपण आपल्या मूळ विषयाकडे वळूं या. जोपर्यंत शब्दानें बोलूनच दाखविण्याचा प्रश्न आहे तोंपर्यंत शहाणे काय, मूर्ख काय, सर्व जण आपल्या सर्व कृतींचें साध्य 'सुख' हेंच आहे, असें चटकन् सांगतील. 'सर्वांना सुख पाहिजे' 'सुखासाठी ही सर्व धडपड आहे' इ० व्यव–हारांत जीं बोलणी आपणाला ऐकूं येतात ती या गोष्टीचींच दर्शक होत, पण 'या

सुखाचें स्वरूप काय? ' ' काय केलें असतां आपणास बरोबर सुख मिळेल? ' असा आपणापुढें प्रश्न टाकला कीं हें एकमत संपलें. मूर्ख मनुष्य ज्या गोष्टीला ' सुख ' म्हणेल तें सुख म्हणून शहाण्याला क्वचित्च कबूल होईल आणि शहाणा जें सुखाचें रूप सांगेल ती मूर्खाला सुखाची एक कल्पित कादंबरीच वाटेल. किंबहुना दोन पंडितांचें तरी सुखाच्या रूपाबाबत चटकन एकमत होईल कीं नाहीं याची शंकाच आहे. एकाला पैशानें सर्व सुखें मिळतील असे वाटेल तर दुसऱ्याला ' मान ' हेच सर्व सुखाचें रूप वाटेल. तिसरा तिसरेंच कांहीं सांगेल. बरें एकवेळा त्यानें केलेले सुखाचें रूप करूनच तो थांबेल असें नाहीं. केव्हां केव्हां तर असें होतें कीं एकच मनुष्य निरनिराळ्या परिस्थितींत सखाचें निरनिराळें वर्णन करतो. आजारी असतां आरोग्यावांचून दुसरा सुखाचा पदार्थ त्यास दिसत नाहीं. तोच पुनः दरिद्री असला व त्यानें जांचला असला म्हणजे संपत्ति हेंच सर्वसुखाचें मूळ तो मानू लागतो. कोणाला अज्ञानपणामुळें जो कोणी चांगले बोलतो तोच सुखाच्या ठिकाणीं होऊन बसतो. कोणी सुखाच्या साधनालाच सुख घेऊन बसतो. सारांश सुखाच्या खऱ्या रूपाविषयीं प्रश्न आला म्हणजे एकाचे तोंड एकीकडे तर दुसऱ्याचे तिसरीचकडे असा प्रकार दिसून येतो.

आतां या सर्वेचें मतांचें परीक्षण करणें दुरापास्त आहे. किंबहुना सर्वांचें परीक्षण करणें जरूरीचें सुद्धा नाहीं. ज्यांत कांही विशेष अर्थ आहे व बऱ्याच लोकांना ज्यांत खरेपणा वाटतो अशींच मतें निरोपिलीं म्हणजे पुरें आहे. आतां हें मतांचें परीक्षण कांहीं एक तत्व शोधून काढण्यासाठीं करावयाचें कीं कांहीं तत्वें मनांत ठेवून करावयाचें हा प्रश्न आहे. कांहीं असलें तरी ज्या गोष्टी आपणास माहीत आहेत त्यापासूनच आपणास सुरवात केली पाहिजे. म्हणूनच या शास्त्राचा विद्यार्थी सत्प्रवृत्तीचा चांगल्या आचारविचाराचा व बरीच मानसिक उन्नति झालेला असा असला पाहिजे असें मी सुरवातीला म्हटलें. कारण तत्व झालें तरी त्याला जुळणारी प्रत्यक्ष वस्तुता ही असतेच आणि त्या वस्तुतेशीं ज्याचा परिचय आहे त्याला तिचें तत्व कळणें फारसें कठीण नाहीं. कारण सन्मार्गानें ज्याच्या मनाची बरोबर उन्नति झालीं आहे त्याजवळच त्याचीं तत्वें अगोदरच आहेत किंवा त्यास तीं फारच लवकर कळतील. परंतु ज्याची अशी मानसिक प्रगल्भता नाहीं व करून घेण्याची इच्छाही नाहीं त्यानें एका कवीचे वाक्य जरूर ध्यानांत ठेवावे. तो म्हणतो. " ज्याच्या बुद्धीला सर्व गोष्टी आपणहूनच कळतात तो उत्तम मनुष्य होय. परंतु दुसऱ्यानें सांगितलेली चांगली तत्वें जो ग्रहण करतो तोही बरा मनुष्य म्हटला पाहिजे. पण ज्याला स्वतां कळण्याची अक्कल नाहीं व दुसऱ्यापासून कळून घेण्याची इच्छा नाहीं तो मनुष्य वाईट व फुकटच समजला पाहिजे.

पण आपण आपल्या विषयाकडे वळू या.

### ७ जीविताचे तीन पंथ.

सर्व आयुष्याचे अंतिम साध्य सुख जरी असलें तरी त्याकडे बघण्याचे निरनिराळे प्रकार मनुष्य ज्या प्रकाराचे आयुष्य घालवितो त्यावरून होतात हे आपण पाहिलें. आयुष्याचा मार्गक्रमण्याचे एकंदर तीन मुख्य प्रकार दृष्टोत्पत्तीस येतात. त्यांतील पहिला प्रकार म्हणजे स्वार्थसुखवाद्यांचा होय. अनुदार मनोवृत्तीचे व असंस्कृत मनाचे लोक वैषयिक सुखाच्या कल्पनेपलीकडे जाऊं शकत नाहींत. जें त्यांच्या इंद्रियांना सुख देईल तेंच त्यांना सुखाचें वाटते. पशु जसे आपल्या वासनाचे गुलाम असतात त्याचप्रमाणें हे मनुष्य असूनही पशुप्रमाणेंच आपल्या इंद्रियवृत्तीचें दास बनतात. अशा लोकांचीं संख्या समाजांत कांहीं कमी नसते म्हणून त्यांना विचारांत घेणें जरूर आहे.

दुसरा पंथ म्हणजे कीर्तीच्या मागे लागलेल्यांचा. ज्यांचें मन सुसंस्कृत झालेले असतें आणि उदात्त कर्तृत्वानें जे प्रवृत्त झालेलें असतात त्यांना समाजांत लौकिक मिळविणें ही गोष्ट फारच सुखाची वाटते किंबहुना सामाजिक जीवनांत हेंच एक मोठें कार्याचें प्रयोजन होऊन बनतें. परंतु आपल्या महासाध्याचें रूप लौकिक किंवा मानसन्मान यांत सांपडेल कीं नाहीं याविषयी शंका आहे. कारण एक तर सन्मान ही गोष्ट घेणारापेक्षां देणाराकडेच विशेष जाते. आपल्या महा-साध्याचें रूप असें परापेक्ष व परतंत्र असूं शकणार नाहीं. जे आपणापासून दुसरे सहज काढून घेऊ शकतात ते आपल्या जीविताचे ध्येय क्वचितच होऊं शकेल. दुसरें असे कीं लौकिक हें ध्येय समजणारांनाही वाईट लोकांनीं दिलेला मानसन्मान फारसा किंमतीचा वाटत नाहीं. समाजांतील प्रतिष्ठित शहाण्या लोकांनी मान द्यावा असे त्यांना वाटते. म्हणजे मानसन्मानाच्या मागें स्वतांत कांहीं चांगुलपणा असावा व तो लोकांनीं कबूल करावा असे त्यांना वाटते. यावरून मानसन्मानापेक्षा सद्गुणाची किंमत ज्यास्त ठरते. किंबहुना कांहींच्या मतें सद्गुणसंपादन हे सामाजिक जीवनाचे ध्येय असे म्हटलें जातें. परंतु सद्गुणांत तरी आपल्या महाध्येयाचे निश्चित स्वरूप आहे असें आपणास एकदम ठासून सांगता येणार नाहीं. कारण एकादा सद्गुणी मनुष्य आयुष्यांत फारसे कांहीं एक न करितां राहू शकेल. दुसरें असें कीं सद्गुणी मनुष्यावर अनेक दुर्दैवें ओढवून तो सर्व आयुष्यभर दुःखीच असू शकेल तेव्हा आपल्या ध्येयाचे रूप निश्चित करतांना सद्गुण हा शेवटला शब्द म्हणून आपणास समजता येणार नाहीं.

आयुष्यांतील तिसरा पंथ म्हणजे तत्त्वचिंतनांत काळ कंठण्याऱ्या तत्वज्ञान्यांचा यांचें वर्णन करणास आपणास पुष्कळ बोलावें लागेल तेव्हां तें आपण स्वतंत्रच बोलू.

# उपनिषदांतील वेंचे.

अनुवादः— श्रीराम गोसावी, नाशीक.

## मुंडकोपनिषत्

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥
ॐ शांतिः । शांति. । शांति; ॥

अनुवाद—अहो देवांनो, आम्ही आमच्या कानांनीं हितप्रद असें मंगल-वचनच ऐकावें, आणि आपले पूजन करणाऱ्या अशा आम्ही आमच्या नेत्रांनीं कल्याणकारी मंगलाचेंच दर्शन घ्यावें. आपल्याच कृपेनें प्राप्त झालेल्या आमच्या पुष्ट शरीरांनीं आपली सेवा करून आपणास आम्ही तुष्टवावें; आणि आपल्याच दयेनें मिळालेल्या आयुष्याचा आपणासाठीं विनियोग करून आम्ही त्याचा उप-भोग घ्यावा. आमच्या त्रिविध तापाची शांती होवो.

शौनको ह वै महाशालो ऽङ्गिरसं विधिवदुपसन्नः पप्रच्छ
कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवतीति ॥

अनुवाद—हातांत समिधा घेऊन श्रोत्रिय आणि ब्रम्हनिष्ठ अशा अंगिरसा-पाशी महागृहस्थ शौनक गेला व विचारता झाला की ' हें भगवन् काय जाणलें असतां मला सर्व गोष्टींचा उलगडा होईल ? काय मिळालें असतां मला सर्व प्राप्त झाल्यासारखें वाटेल ?

तस्मै स होवाच । द्वे विद्ये वेदितव्ये इति ह स्म
यद्ब्रम्हविदो वदंति—परा चैवापराच ।

अनुवाद—अंगिरस शौनकाला म्हणालाः—" शौनका ! ब्रम्हवेत्याच्या मतें दोन प्रकारच्या विद्या आहेत. एक परा व दुसरी अपरा.

अथ परा यया तदक्षर अधिगम्यते.

अनुवाद—जिच्या योगानें त्या अक्षर परब्रम्हाचें ज्ञान होतें तीच परा विद्या होय. त्या अक्षर परब्रम्हाच्या ज्ञानानेंच हें सर्व जाणल्यासारखें होतें, सर्व प्राप्त झाल्यासारखें होते. म्हणूनच असें ज्ञान करून देणाऱ्या या विद्येस परा म्हणजे श्रेष्ठ विद्या म्हटलें आहे.

यथोर्णनाभिः सृजते गृण्हतेच यथा पृथिव्यामोषधयः संभवन्ति
यथा सतः पुरुषात् केशलोमानि तथाऽक्षरात्संभवतीह विश्वम् ॥

अनुवाद—ज्या प्रमाणें कोळी आपल्यापासून तंतू उत्पन्न करतो, तंतूचे जाळें पसरतो व स्वतांच ते तंतू आवरून घेतो; त्याप्रमाणें या अक्षर परब्रम्हापा—

सून विश्व उत्पन्न होते व त्याच्यांतच ते प्रलयकालीं लीन पावते. ज्याप्रमाणें या पृथिवीमध्ये निरनिराळया वनस्पति उत्पन्न होतात त्याप्रमाणें या अक्षर परब्रम्हांतच चराचर जगताची संभूती होते, किंवा ज्याप्रमाणें जिवंत पुरुषाच्या देहापासून केसाची निर्मिति होते त्याप्रमाणें या अक्षरापासून समस्त विश्वाची उत्पत्ति होते. तेव्हां ज्यापासून हे विस्तृत संसारमंडल उत्पन्न होतें त्याचें ज्ञान झालें असतां सर्वांचें ज्ञान झाल्यासारखें व एक तें प्राप्त करून घेतलें असतां सर्व प्राप्त झाल्याचें सुख होतें.

तदेतत्सत्यं मंत्रेषु कर्माणि कवयो यान्यपश्यंस्तानि
त्रेतायां बहुधा संततानि । तान्याचरथ नियतं
सत्यकामा एष वः पंथाः सुकृतस्य लोके ॥

अनुवाद – ऋग्वेदादि मंत्रांत वसिष्ठादि महामुनींनीं ज्या गोष्टी पाहिल्या, त्या दिव्य मंत्रानीं जीं सत्कर्में प्रकाशिलीं तींच खरोखर सत्य होत. त्यांचें अनुवर्तन करण्यांतच खरोखर आपलें कल्याण आहे. त्रेतायुगांत याच सत्कर्मांचा प्रसार झाला म्हणून त्यांचें कल्याण झालें. सत्याची इच्छा करणाऱ्या मनुष्यांनीं याच वेदविहित कर्मांचें नित्य अनुष्ठान करावें. त्यांनीं गायिलेल्या सत्याचेंच संकीर्तन करावें या लोकांत सुकृताचा हाच एक राजमार्ग आहे. आपलें मंगल व्हावें असें इच्छिणाऱ्या सत्यकाम पुरुषांना परधामाला नेणारा हाच एक कल्याणपथ आहे.

अविद्यायामंतरे वर्तमानाः स्वयं धीरा पंडितमान्यमानाः ।
जङ्घन्यमानाः परियन्ति मूढा अंधेनैव नीयमाना यथाऽन्धाः ॥

अनुवाद – परंतु जे कोणी मूढ या वेदविहित सत्य कर्मांचें ज्ञान करून घेत नाहींत व अज्ञानांत राहून असत्कर्मांचें अनुष्ठान करतात. वसिष्ठादि महामुनींच्या वचनांना व मार्गांना तिरस्कृत करून स्वतांच महापंडित समजतात व अहंकारानें अंध झालेल्या स्वयंप्रज्ञेचें कोडकौतुक पुरवितात ते सर्व पंडितमन्य आपल्याच कर्मानें दुःखदशेला जातात. एका आंधळयानें दुसऱ्या आंधळयास जसे अनेक गोते देऊन स्वतास व त्या दुसऱ्यास शेवटीं खड्डयांत घालून घ्यावें त्याप्रमाणें हे पंडितमन्य व स्वयंधीर स्वतांस व दुसऱ्यास अधोगतीस नेतात; व जोंपर्यंत ही त्यांची अहंकाराविष्ठ बुद्धि त्यास सोडीत नाहीं तोंपर्यंत ते या अज्ञानतमांत अनंत यातनेला कारण होणारी अशी भ्रमंति करतात.

अविद्यायां बहुधा वर्तमाना वयं कृतार्था इत्यभिमन्यंति बालाः ।
यत्कर्मिणो न प्रवेदयंति रागात्तेनाऽतुराः क्षीणलोकाश्चवंते ॥

अनुवाद—वरील प्रकारचे पंडितमन्य व स्वयंधीर बाष्कळ प्रलापांत व निष्फळ प्रयत्नांतच कृतकृत्यता मानतात. आपल्या क्षुद्रबुद्धीचा अभिमान धरून

यःकश्चित् कर्मानेंच ते बालिश लोक चढून स्वतांस धन्य धन्य लेखतात. सर्व सुबुद्ध लोकांच्या सद्भावाचा धिःकार करून आपल्याच कोटश्च कीटाय बुद्धीचा व पुरुषार्थाचा वडेजाव गातात अशा प्रकारें आपल्या बालिश बुद्धीनें शेफारलेले व कर्माची फरारी चढलेले ते लोक खरें तत्व जाणत नाहींत. त्यामुळें त्यांचे असलेले पुण्यफलही क्षीण होत जाऊन दुःखार्त झालेले ते आपल्या उच्चपदावरून खाली येतात. पूर्व पुण्याईनें मिळालेले उच्चस्थानही बालिशपणामुळें त्यास न राखतां आल्यामुळें त्यांची तेथून हकालपट्टी होते. आपल्याच क्षुद्रगर्वांत निमग्न झालेल्या त्या नालायक उन्मत्तांना कर्माचे कायदे स्वर्गांतून खालीं ढकलून देतात.

इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं नान्यच्छ्रेयो वेदयंते प्रमूढाः ।
नाकस्य पृष्ठे ते सुकृतेऽनुभूत्वेमं लोकं हीनतरं वा विशंति ॥

अनुवाद— स्वतांच्या कामना पूर्ण करणाऱ्या कामनिक कर्मांपुढें त्या मूढाना कांहींच श्रेष्ठ वाटत नाहीं. स्वतांचीं वडेजावीं वाढविणाऱ्या लोकोपकाराच्या कृत्यापुढें त्यांच्या बुद्धीचीं गती जाऊ शकत नाहीं. स्वतांच्या किंवा फार झाले तर जवळपासच्या चार लोकांच्या क्षणभंगुर कामना पुरविण्यांतच त्यांना मोठेपणा वाटतो. या अशाश्वतांत गुरफटलेल्या त्यांच्या बुद्धीला शाश्वताचा रस्ता दिसत नाहीं. त्यामुळें स्वर्गांतील फलभोग क्षणविध्वंसी दिव्य शरीरानें भोगून ते मूढ या मृत्यूलोकांत किंवा याहूनही निकृष्ट लोकांत जातात.

तपःश्रद्धे ये ह्युपवसंत्यरण्ये शांता विद्वांसो भैक्ष्यचर्यां चरन्तः ।
सूर्यद्वारेण ते विरजाः प्रयांति यत्रामृतः स पुरुषो ह्यव्ययात्मा ॥

अनुवाद –परंतु जे विद्वान् आणि शांत विचारी लोक असतात, या संसाराविषयीं ज्यांच्या मनांत विराग उत्पन्न झालेला असतो, घरदार सोडून जे एकान्तासाठी वनवास स्वीकारतात, सर्वसंग्रहाची बुद्धि सुटल्यामुळें भिक्षेवर जे आपलें उपजीवन करतात, एका परमात्म्याशिवाय या जगांत दुसरा कांहीं एक लाभ नाहीं अशी ज्यांची अढळ श्रद्धा असते व त्याच्या प्राप्तीसाठीं ज्यांच्या अविरत उद्योग चालू असतो ते ज्ञानी पुरुष ज्ञानमार्गानें त्या अव्यय परमात्म्याच्या पदाप्रत जातात. ज्या ठिकाणीं तो विभु चिरंतन देव राहतो त्या ठिकाणीं आपल्या तपाच्या व उपासनेच्या जोरावर आपला इंद्रियसंघ उपरत करून ते विद्वान् उत्तरायणमार्गानें प्राप्त होतात. त्या अमृतपदाची त्यांना एकदा प्राप्ति झाल्यावर या हीन लोकांत त्यांना यावें लागत नाहीं. तपानें शुद्ध व निर्वासन झालेला त्यांचा जीवात्मा त्या सच्चिद्घन परमात्म्यांत विलीन होतो.

परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राम्हणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन।
तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रम्हनिष्ठम् ॥

अनुवाद—या साठीं जो कोणी खरा मुमुक्षु असेल त्यानें स्वयंधीर आणि पंडितमन्य बनूं नये. अविद्येंतच राहून स्वतांस कृतार्थ समजूं नये. क्षणभंगुर कामनिक कर्मांनाच वरिष्ठ लेखून आपली अधोगति करून घेऊं नये. या कर्मकृत लोकांचीं नीट परीक्षा करावी. अज्ञानकर्मांनें प्राप्त होणारी ही संसारगति मृग-जलाप्रमाणें असार, गंधर्वनगराप्रमाणें पोकळ, स्वप्नाप्रमाणें अनित्य आणि पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें क्षणभंगुर आहे या गोष्टीचा त्यानें नित्य विचार करून या अनित्य कर्मफलरूप इहलोकच्या सुखापासून निवृत्त व्हावें. "या जगांत नित्य असें काय आहे? आई बाप सगेसोयरे, प्रिय कांतापुत्र, धनकनक इ० सर्व निघून जाणारीं नाहींत काय?" असा विचार करून खऱ्या मुमुक्षूनें या संसारापासून विरत व्हावे. "ज्यांची फलें निघून जाणारीं आहेत अशीं कर्मे करून मला काय करावयाचें आहे" असें म्हणून त्यानें या कर्मचक्रांतून सुटका करून घ्यावी व जें कधीहीं नाश पावत नाहीं, जें मिळालें असतां दुसरें मिळविण्याची इच्छा राहत नाहीं असें तें शाश्वत परम सत्य जाणण्यासाठीं विद्वान् ब्रम्हनिष्ठ आणि तपोनिष्ठ गुरुकडे हातांत समिधा घेऊन मुमुक्षूनें जावें.

तस्मै स विद्वानुपसन्नाय सम्यक् प्रशांतचित्ताय शमान्विताय।
येनाक्षरं पुरुषं वेद सत्यं प्रोवाच तां तत्त्वतो ब्रम्हविद्याम् ॥

अनुवाद—ब्रम्हनिष्ठ व तपोनिष्ठ गुरुनेंही त्या यथाशास्त्र समीप आलेल्या मुमुक्षूला ब्रम्हविद्येचा उपदेश करावा. अनित्य संसाराच्या विरतीनें ज्याच्या चित्ताचे विकार उपराम पावले आहेत, इंद्रियग्रामाचे दर्प निघून गेल्यामुळें जो शांतचित्त झाला आहे व या दीर्घ संसारआर्तीपासून सुटण्याचा ज्यानें ध्यास घेतला आहे अशा त्या जिज्ञासूला ब्रम्हनिष्ठ श्रोत्रिय ब्राम्हणानें त्या परमपदाचा रस्ता दाखवून द्यावा; ज्यायोगानें त्या अक्षरपुरुषाची त्याला प्राप्ती होईल अशी ती श्रेष्ठविद्या योग्य प्रकारें त्यानें त्या मुमुक्षूला सांगावीं; व त्याच्या जन्मजन्मांचें कल्याण करावें.

---


# मारुतिउपासना.

प्रथम मारुतिरायाचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी. किं ८४

# श्रीज्ञानेश्वरी माहात्म्य.

( लेखक—रामचंद्र बळवंत खाडिलकर, वकील नाशीक )

वृत्त—इंद्रवज्रा

ज्ञानेश्वरा साधुवरा उदारा । कारुण्यसिंधो निजबोधसारा ॥
भावार्थदीपाप्रति लावुनीया । आभारिलें त्वां अखिला जगा या ॥१॥
भाषा मुळीं संस्कृत ऊमजेना । वेदांत सामान्यजनां कळेना ॥
जाणोनियां हेंचि मराठि ग्रंथ । निर्माण केलासि तुवां यथार्थ ॥२॥
अज्ञानयोगें जन जे जगांत । नानापथें हिंडुनि होति श्रांत ॥
दावावया मार्ग खरा तयांला । ज्ञानेश्वरीदीप प्रकाशियेला ॥३॥
ज्ञानेश्वरी उज्वल ग्रंथ झाला । ज्ञानाब्धि कीं हा जणुं निर्मियेला ॥
यामाजि रत्नें बहुमोल नाना । मेवाच कीं हा रसिकां जनांना ॥४॥
दृष्टांतसाहित्य जयांत पूर्ण । नाहीं मुळीं लेशहि ज्यांत न्यून ॥
सर्वांग जो सुंदर ग्रंथराज । दावी पुराणश्रुतिशास्त्रबीज ॥५॥
ज्यासी तुला नाहिंच वाङ्मयांत । केला असा ग्रंथ तुवां जगांत ॥
'गीतारहस्या'प्रति जो यथार्थ । दावीत लोकांसि खरा सुपंथ ॥६॥
ज्ञानेश्वरी सर्वहि साधकांची । आहे जगीं माउलि हीच साची ॥
नाना रसा पाजुनि तृप्ति देई । प्रेमें लळे पाळित सर्व कांहीं ॥७॥
ज्ञानेश्वरीची म्हणतांच ओवी । दाटूनि ये प्रेम बहूत जीवीं ॥
ऐकोनि प्रासादिक ती सुवाणी । चित्तीं तुरे संसृतिची कहाणी ॥८॥
ज्ञानेश्वरी ही जणु प्रेमगंगा । कीं प्राप्त झाली अवनीं असे गा ॥
जो सेवि त्या पूर्ण करी पुनीत । हृत्ताप हा घालवि ही प्रचीत ॥९॥
या प्रेमगंगेमधिं भक्तमीन । खेळोनि मोदें वसती सुलीन ॥
ही सेवणें हीच खरी समाधी । जाणोनि हें राहति या सुखाब्धीं ॥१०
ग्रंथांत हा ग्रंथ असे वरिष्ठ । या मानिती सर्वहि साधु श्रेष्ठ ॥
ज्याचा असे हो महिमा अगाध । भावें भजे त्यासिच जो सुबोध ॥११॥
आश्चर्यवत् पाहति यासि कोणी । आश्चर्यवत् ऐकति कोणि कानीं ॥
ऐकोनि हा बोलति कीं 'अहाहा!' । ये पूर प्रेमाश्रुजलप्रवाहा ॥१२॥
ज्ञानेश्वरीची रचनाच गोड । सेवी तयाचें पुरवीत कोड ॥
जें पाहिजे तेथ मिळे उदंड । ठेवावि वाटे मनिं ती अखंड ॥१३॥

ज्ञानेश्वरी दावि असार--सार। प्रेमी जना ने भवपैलपार ॥
आहे खरी चिन्मयरूपखाणी। सेवील जो तारि तया निदानीं ॥१४॥
भावें भजा ग्रंथवरा तुम्ही या। कां शीणतां साधनिं अन्य वाया ॥
ज्ञानेश्वरी ग्रंथ अनन्यभावें। आवर्तिल्या ज्ञान मिळे स्वभावें ॥१५॥
सामान्य हा ग्रंथ नव्हेच खास। वाचा सदा भक्तिमनें तयास ॥
अभ्यासुनी पाहिल पूर्ण अर्थ। होईल तो या भुवनीं कृतार्थ ॥१६॥
ज्ञानेश्वरीग्रंथ सदाचि वाचा। तेणें तुम्हा येइल प्राज्ञवाचा ॥
ज्ञानेश्वरी ज्ञान जगासि देई। चितांत शंका न च ठेवि कांहिं ॥१७॥
ज्ञानेश्वरीग्रंथ असे अमोल। हो तेथिचा अर्थ परी सखोल ॥
जाणावेया वर्म खरें तयाचें। सेवा पदें श्रीगुरुज्ञानयाचें ॥१८॥
ज्ञानेश्वरा! माउलि तूंच माझी। प्रेमें मला घे पदरांत आजी ॥
आहे बहु मी मतिमंद मूढ। दे अंतरीं भक्ति तुझीच गाढ ॥१९॥
ज्ञानेश्वरा! अंतरिं त्वां वसावें। ज्ञानेश्वरीचें गुज जाणवावें ॥
ज्ञानामृता देवुनि ज्ञानदेवें। रामा भवाब्धींतुनि पार न्यावें ॥२०॥

---


# मोरोपंत--चरित्र आणि काव्यविवेचन.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे. "जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत, यांत याची गणना" इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षे पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांची अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रती थोड्या आहेत. पृ. सं. ६२५ किं. रु. २॥८

# श्रीएकनाथ चरित्र. (आवृत्ति चवथी)

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचा जन्म व बाळपण. ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या. १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर. इतक्या प्रकरणांत नाथांचे पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून 'स्तुतिसुमनांजलि' नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणें दिलीं आहेत. पृ. सं. २८८ किं. ८१२. पत्ताः –व्यवस्थापक 'मुमुक्षु' नाशिक.

# २ घोंगडी

कान्हा ! तुझी घोंगडी चांगली । आह्मांसि कां दिलि वांगली रे ॥ ध्रु० ॥

स्वगत सच्चिदानंदें मिळोनी शुद्धसत्वगुणें विणली रे ।
षड्गुणगोंडे रत्नजडित तुज श्यामसुंदरा शोभली रे ॥ १ ॥
कामकर्म अविद्या त्रिगुणपंचभुतांनीं विणली रे ।
रक्तरेतदुर्गंधी जंतुनरकमुतानें भरली रे ॥ २ ॥
षड्विकार षड् वैरि मिळोनी तापत्रयानें विणली रे ।
नवा ठायीं फाटुनि नी त्वां आह्मांसि कां हे दिधली रे ॥ ३ ॥
ऋषिमुनि ध्यातां मुखिं नाम गातां संदेहवृत्ती विरली रे ।
बापरखुमादेविवर विठ्ठले ! स्वरूपीं वृत्ती मुरली रे ॥ ४ ॥

घोंगडी ह्म० तनु, देह. हे कृष्णा ! तुझी घोंगडी किती चांगली आणि आमची घोंगडी किती वाईट ! आह्मांला ही वाईट घोंगडी तूं कां दिलीस ? तुझा देह कसा आणि आमचा देह कसा ! तुझी घोंगडी आत्मस्वरूपाकार व सत् चित् आनंद यांनीं युक्त असून ती शुद्धसत्वगुणानें विणलेली आहे, तिला षड्गुणाचे गोंडे लावले असून ती रत्नजडित आहे व हे श्याम सुंदरा ! तुझ्या अंगावर ती किती शोभत आहे बरें ! [ तूं घोंगडीहून वेगळाच आहेस ह्मणूनच सत् चित् आनंद या तीन पदांचा शुद्धस्वरूपीं लाग नाहीं असें अमृतानुभवाच्या ५ व्या प्रकरणांत दाखविलें आहे. षड्गुणाचे गोंडे-' आइका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ' हे साही गुणवर्य । असती जेथ ॥ ३७ ॥ ह्मणोनि तो भगवंत । जो निःसंगाचा सांगात ' ( ज्ञाने० अ० ६ ) भगवान् षड्गुणैश्वर्य संपन्न आहेत. ] आतां आमची घोंगडी कसली अमंगळ आहे पहा बरें ! काम, कर्म, अविद्या, त्रिगुण, पंचभूतें यांनीं विणलेली व रक्त, रेत, दुर्गंधी, नरक, मूत यांनीं भरलेली आमची घोंगडी किती ओंगळ ही ! अस्ति, भाति, वर्धते, विपरिणमते, क्षीयते, व नश्यन्ति हे सहा विकार, कामक्रोधलोभमोहमदमत्सर हे सहा रिपु व आध्यात्मिक आधिभौतिक व आधिदैविक हे त्रिविध ताप यांचा या आमच्या घोंगडींत सारा बुजबुजाट असून ती पुन्हां नऊ ठिकाणीं फाटलेली आहे ! ' नवद्वारे पुरे देही '-दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, तोंड, गुद व उपस्थ हीं ह्या देहाची नऊ दारें आहेत; यालाच ' नवां ठायीं फाटलेली घोंगडी ' असें ह्मटलें आहे. देवा ! अशी ही अमंगळ घोंगडी तूं आह्मांला कां दिलीस बरें ! असो ! ही घोंगडी टाकून देऊन तुझीच घोंगडी अंगावर घ्यायचा उपायही आह्मांला सांपडला आहे. तुझ्या रूपाचें ध्यान व गुणाचें गान करितां करितां अनेक ऋषि, मुनि व संत निःसंदेह होऊन स्वरूपीं विरून गेले आहेत ! ध्यानानें देह बदलतो. ज्याचें

ध्यान करावें तदाकार मन होतें. [ब्रह्मरूप काया होतसे कीर्तनीं–असा तुकोबांनीं स्वानुभव सांगितला आहे.] ज्ञानेश्वर महाराज ह्मणतात कीं ह्याच ध्यानाच्या व नामसंकीर्तनाच्या मार्गानें जाऊन माझीही वृत्ति तत्पदीं मुरली आहे.

घोंगडीवर ज्ञानेश्वराचे सोळा अभंगही आहेत. पहिलें रकटें मीं आतां 'श्रीपंढरी–नाथाजवळीं सांडिलें' आहे, आतां मला 'संतचरणीं रुळलेलें व श्रीरंगीं रंगलेलें श्रीविठ्ठलाअंगीचें घोंगडें' मिळालें आहे, हें घोंगडें फाटणारें नाहीं, अद्वैतपेठेंत हें आह्मांस मिळालें आहे, असें त्यांनीं त्यांत ह्मटलें आहे! 'तूं माझा स्वामी मी तुझा रंक। पाहतां न दिसे वेगळिक' ॥ असें अद्वैतभक्तीच्या आनंदांत असतां ते ह्मणतात 'मीतूंपण जाऊं दे दुरी। एकचि घोंगडें पांघरूं हरी!' अनंत जन्माच्या बाजारांत हिंडतां हिंडतां हें दिव्य 'सुरंग घोंगडें हाता आलें' आहे तें आतां मी सोडणार नाहीं!

## २ काऊं


देवाच्या भेटीसाठीं उतावीळ झालेल्या मनाला जड व अजड सृष्टि आपली साह्यकर्ती आहे असें भावत असतें, हें कावळ्याच्या दृष्टांतानें सांगतातः—

पैल तो काऊ कोकताहे। शकुन गे माये सांगताहे ॥ ध्रु० ॥
उडरे उडरे काऊ। तुझे सोन्यानें मढीन पाऊ।
पाहुणे पंढरीराऊ घरा कै येती ॥ १ ॥
दहीभाताची उंडी। लावीन तुझ्या तोंडीं।
जीवा पढियें त्याची गोठी सांग वेगीं ॥ २ ॥
दुधें भरूनि वाटी लावीन तुज वोठीं।
सत्य सांगें गोठी विठो येईल कायी? ॥ ३ ॥
ज्ञानदेव ह्मणे जाणिजे ये खुणें।
भेटती पंढरीराणे शकुन सांगें! ॥ ४ ॥

कावळा झाडावरून उडाला कीं पाहुणा निश्चित येणार अशी एक पुरातन समजूत आहे. याच अर्थाची 'काव काव सोन्याचे पाव। पाहुणा येत असला तर उडून जाव' अशी जुनी ह्मणही जुन्या लोकांत प्रसिद्ध आहे. कावळ्याला दहि–भाताची उंडी किंवा दुधाची वाटी देण्याची लालूच एवढ्याचसाठीं द्यायची कीं जीवाला प्रिय असलेल्या पंढरिरायाच्या आगमनाची त्यानें उडून जाऊन सूचना द्यावी! कालिदासानें मेघाला वार्ताहर बनविला, येथें ज्ञानेश्वरांनीं कावळ्याशीं अशीच कानगोष्ट केली आहे. प्रियवस्तूच्या भेटीची अतीव उत्कंठा लागली कीं चेतन व अचेतन असा उत्कंठित पुरुषाच्या ठिकाणीं भेदभाव उरत नाहीं हें याचें वर्म आहे; त्याच्या तादात्म्याची ती खूण आहे.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २६ मास ८ ) चैत्र शके १८५४ एप्रील इ. स. १९३२ ( नवें वर्ष १२ वें अंक ४

वार्षिक वर्गणी रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३।८



## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी, ए.

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.



मुद्रकः— विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६ लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | ... | १ |
| २ आमचा नवा ग्रंथ | ... | २ |
| ३ ज्ञानेश्वरींत श्रीकृष्ण | ... | ३--४ |
| ४ ज्ञानेश्वर नामदेवाचा काल (अनुक्रमणिका) | ... | ५--७ |
| ५ जगदंबेस | ... | ८ |
| ६ ज्ञानेश्वरी ग्रंथ तात्पर्य | ... | ९--१५ |
| ७ सत्संगांतील आनंद | ... | १६--२० |
| ८ अरिस्टॉटलचे 'मानवी व्यवहाराचें तत्वज्ञान' | ... | २१--२८ |
| ९ रा. वाटव्यांचा प्रश्न आणि ज्ञानेश्वराचें उत्तर | ... | २९--३४ |
| १० श्रीकृष्णाचें चरित्र--दर्शन | ... | ३५--४० |

मुमुक्षु मासिक वर्ष १२ वें

# मंगलाचरण

एप्रिल १९३२ अंक ४



## श्लोक

त्वमेव सर्वलोकानां निवासस्थानमुत्तमम् ।
तवापि सर्वभूतानि निवाससदनानि हि ॥ १ ॥
एवं साधारणं स्थानमुक्तं ते रघुनंदन ।
सीतया सहितस्येति विशेषं पृच्छतस्तव ॥ २ ॥
तद्वक्ष्यामि रघुश्रेष्ठ ! यत्ते नियतमंदिरम् ।
शान्तानां समदृष्टीनामद्वेष्टॄणां च जंतुषु ।
त्वामेव भजतां नित्यं हृदयं तेऽधिमंदिरम् ॥ ३ ॥
धर्माधर्मान्परित्यज्य त्वामेव भजतोऽनिशम् ।
सीतया सह ते राम ! तस्य हृत्सुखमंदिरम् ॥ ४ ॥
त्वन्मंत्रजापको यस्तु त्वामेव शरणं गतः ।
निर्द्वंद्वो निःस्पृहस्तस्य हृदयं ते सुमंदिरम् ॥ ५ ॥
निरहंकारिणः शांता ये रागद्वेषवर्जिताः ।
समलोष्टाश्मकनकास्तेषां ते हृदयं गृहम् ॥ ६ ॥
त्वयि दत्तमनोबुद्धिर्यः संतुष्टः सदा भवेत् ।
त्वयि संसक्तकर्मा यस्तन्मनस्ते शुभं गृहम् ॥ ७ ॥
यो न द्वेष्ट्यप्रियं प्राप्य प्रियं प्राप्य न हृष्यति ।
सर्वं मायेति निश्चित्य त्वां भजेत्तन्मनो गृहम् ॥ ८ ॥
षड्भावाविकारान्यो देहे पश्यति नात्मनि ।
क्षुतृट् सुखं भयं दुःखं प्राणबुद्ध्योर्निरीक्षते ॥ ९ ॥
संसारधर्मैर्निर्मुक्तस्तस्य ते मानसं गृहम् ॥ १० ॥
पश्यंति ये सर्वगुहाशयस्थं त्वां चिद्घनं सत्यमनंतमेकम् ।
अलेपकं सर्वगतं वरेण्यं तेषां हृदब्जे सह सीतयावस ॥ ११ ॥

अध्यात्मरामायण कां. २ अ. ७

# आमचा नवा ग्रंथ

मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा पहिला खंड ह्म० ज्ञानेश्वरनामदेव कालीन वाङ्मयाचा परामर्ष हा ग्रंथ मुंबईस मुंबईवैभव प्रेस मध्यें आज चार महिने छापावयास दिला असून त्याची मार्च अखेर ६०० पृष्ठें छापून तयार झालीं आहेत. ग्रंथ वर्षप्रतिपदेच्या सुसमयीं प्रगट व्हावा अशा हेतूनें आह्मीं मुंबईस जाऊन राहिलों व आठ दिवस कामही चांगलें झालें, पण ता. १ एप्रिल— पासून प्रेसमधील सर्व कामगारांनीं संप केल्यामुळें छापण्याचें पुढील काम सर्व थबकलें आहे! आतां ग्रंथ श्रीहनुमज्जयन्तीपर्यंत आमचे हातीं आला ह्मणजे मिळविली अशी स्थिति आज आहे! या संपामुळें ग्रंथ प्रकट होण्यास दोन तीन आठवड्यांचा विलंब होत आहे एवढेंच. ग्रंथ पुरा करून श्रीरामजन्मोत्सवासाठीं नाशकास परत जावें असा आमचा बेत होता, पण श्रीरामाच्या मनांत जन्मोत्सव मुंबईस व्हावा असें आलें, तेव्हां 'तथास्तु' ह्मणून स्वस्थ आहोंत. काम लौकरच चालू होऊन ग्रंथ पुरा होईल.

ग्रंथ ५०० पृष्ठांचा होईल असा आमचा अंदाज होता, पण वाढत वाढत तो ८०० पृष्ठापर्यंत वाढला आहे! ६०० पृष्ठांची विषयानुक्रमणिका अन्यत्र दिली आहे तीवरून ग्रंथाचें कांहींसें स्वरूप वाचकांच्या लक्ष्यांत येईलच. पुढील अंक निघण्यापूर्वीं ग्रंथ प्रगट होईलच.

मुमुक्षूच्या ज्या वर्गणीदारांस तीन महिन्यांचे अंक मिळाले नाहींत, त्यांना सवलत ठेवली आहे. ग्रंथाची किंमत रु. ३ ८ ठेवण्यांत येणार असून वरील ग्राहकांस सदर ग्रंथ रु. २।८।१२ स मिळेल. व्ही. पी. टपालखर्च अर्थात् निराळा पडेल. तो ८ १२ पडेल असें वाटते. टाईप, छपाई, कागद, मजकूर सर्वच बाबतींत वाचकांस पूर्ण समाधान वाटेल अशी आह्मांस उमेद आहे. मुंबईच्या ग्राहकांस ग्रंथ मुंबईतच मिळेल अशी योजना पुढील अंकीं जाहीर करूं. ग्रंथाची किंमत चार रुपये हिशेबानें ठेवावयास पाहिजे, पण आह्मी लोकांच्या सोयीसाठीं रु. ३।८ च ठेवणार आहोत. ग्रंथांत श्री विठ्ठलाचा अस्सल फोटो व श्री ज्ञानेश्वराचा फोटो असें दोन फोटो दिले आहेत.

आमच्या ग्राहकांनीं कृपा करून एका कार्डानें ग्रंथ व्ही. पीनें पाठविण्यास कळवावे अगर र. बु. पो. सगट ग्रंथ पाठवावा असें लिहून रु. ३।८ मनी ऑर्डरनें पाठवावें. पत्र आल्यावरच ग्रंथ पाठविला जाईल.

संपूर्ण जाहिरांत पुढील अंकीं येईल. मॅनेजर 'मुमुक्षु' नाशीक सिटी, या पत्यावर पत्र अगर म. ऑ. पाठवावी.

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

17 2
21-3-31

# ज्ञानेश्वरींत श्रीकृष्ण.

ज्ञानेश्वरांचें उपास्यदैवत श्रीकृष्ण. प्रस्तुत ग्रंथांत त्यांचें श्रीकृष्णप्रेम जागोजाग वोसंडलें आहे. श्रीकृष्ण 'गीताशास्त्र निर्मिता। सकळ लोकैकशास्त' आहे (अ. १८-१४९८) चराचरैकभाग्य, सकळकळानिवास, परमानंद पुतळा, विश्वाच्या जीवीचा जिव्हाळा, सर्वज्ञतेचा ओलावा, यादवकुळींचा कुळदिवा—'तो श्रीकृष्णजी पांडवा-। प्रती बोलिला' (अ० ८ ओवी २६८--२७०) 'एसें सावळेनि परब्रह्में। तेणें भक्तकाम कल्पद्रुमें' आत्मारामें ह्म० श्रीकृष्णानें पार्थास सांगितलें (अ० ९-५२१) श्रीकृष्ण 'चराचरपरम गुरु' आहे (१०-४७) बाराव्या अध्यायाच्या शेवटच्या पांच सात ओव्या तर फार गोड आहेत. निजजनानंद जगदादिकंद, निर्मळ, निष्कळंक, लोक कृपाळ, सुरसहायशीळ, लोकलालनलीळ, धर्मकीर्तिधवळ, भक्तजनवत्सल, प्रेमळजनप्रांजळ इ० विशेषणें भगवंतास लावलीं असून 'तो श्रीकृष्ण वैकुंठीचा। चक्रवर्ती निजांचा। सांगे-येरु दैवाचा। आइकत असे' असें ह्मटलें आहे. वैकुंठाधिपति श्रीकृष्ण भक्तांचा सम्राट् बोलत आहे व भाग्यवंत अर्जुन ऐकत आहे. गीता सांगणारा कृष्ण वेगळा व देवकीसुत गोकुळ वृंदावनांतला कृष्ण वेगळा असें एक मत अलीकडे कांहीं विद्वानांनीं काढलें आहे, पण ज्ञानेश्वरांना हें मत मान्य नाहीं. हरिवंशपुराण व भागवत यांत श्रीकृष्णलीला वर्णिल्या आहेत त्यांचे संदर्भ ज्ञानेश्वरींत बऱ्याच ठिकाणीं आले आहेत. कृष्ण दोन तीन नसून एकच आहे. ज्यानें मथुरा गोकुळ वृंदावनांत बाललीलांनीं गोपगोपीना अतुल भक्तितत्व शिकविले तोच श्रीकृष्ण गीतावक्ता आहे.

कृष्ण चरित्रांतील अनेक प्रसंगाचे ज्ञानेश्वरींत उल्लेख आहेत. 'वृष्णीनां वासुदेवोऽस्मि' (गीता १०-३७) यावरची टीका पहाः—

जो देवकीवसुदेवास्तव जाहला। कुमारीसाठीं गोकुळीं गेला।
तो मी प्राणस कट पियाला। पूतनेतें ॥ २८८ ॥
नुघडतां बाळपणाची फुली। जेणें मियां अदानवी सृष्टि केली।
करीं गिरि धरूनि उमाणिली। महेंद्रमहिमा ॥ २८९ ॥
कालिंदींचे हृदयशल्य फेडिलें। मियां जळत गोकुळ राखिलें।
वासरुवांसाठीं लाविलें। विरंचीस पिसें ॥ २९० ॥
प्रथम दशेचिये पांहटें। माजीं कंसा ऐसीं आचाटें।
महाधेंडीं अवचिटें। लीलाचि नासिलीं ॥ २९१ ॥
हें काय कितीएक सांगावें। तुवांही देखिलें ऐकिलें आघवें।
तरी यादवां माजीं जाणावें। हेंचि स्वरूप माझें ॥ २९२ ॥

देवकी वसुदेवापासून, यशोदेची कन्या योगमाया हिच्या बदली गोकुळास जाणें, पूतना राक्षसीचें प्राणांसगट शोषण, बाळपणाची दशा संपण्यापूर्वी सृष्टी-तल्या दानवांचा संहार, करांगुलीवर गोवर्धन पर्वत धरून इंद्राचें थोरपण मोडणें, ( गर्वपरिहार, ) यमुनेच्या डोहांतला कालिया याचा नाश; दावाग्नीपासून गोकु-ळाचें रक्षण, ब्रह्मदेवानें गाईवांसरें हरण केलीं असतांना तीं रूपें आपणच घेऊन ब्रह्मदेवास भ्रांतींत पाडणें, बाळपणाच्या प्रथमावस्थेंतच कंसासारखीं धेंडें लीळेनें मारणें—अशीं माझीं अनेक चरित्रें—भगवान् पार्थास सांगतात—तूं ऐकिलीं व पाहिलीं आहेस.

पिता वसुदेव, माता देवकी व बंधु बळिभद्र यांचा उल्लेख असाच आलेला आहे ( अ० ४ ओवी ८ ) 'मृत गुरुपुत्र आणिला तो तुवां पवाडा देखिला' ( अ० ३ —१६३ ) येथें सांदीपनी गुरूच्या आश्रमांत विद्याभ्यासार्थ राहिलेल्या कथेचा उल्लेख आहे. 'देवकिया उदरीं वाहिला। यशोदा सायासें पाळिला' ( ६—१३७ येथें उभय मातांची कार्यें सांगितलीं आहेत. 'गोकुळींचिया प्रेम-ळांचे' स्मरण ( अ० ११–३४ ) अर्जुनानें दिलें आहे, तेथेंच जरा पुढें (ओवी ६०) 'जळत काढिलें जोहरीं' ह्म० लाक्षागृहांतून पांडवास वांचविलेल्या कृष्णकथेचाही उल्लेख आला आहे. तसेंच

बाळपणीं येणें श्रीपती। जैं एकवेळ खादली होती माती।
तैं कोपोनियां हातीं। यशोदां धरिला ॥ १८२ ॥
मग भेणें भेणें जैसें। मुखीं झाडा द्यावयाचेनि मिसें।
चवदाही भुवनें सावकाशें। दाविलीं तियें ॥ १८३ ॥

सुभद्राहरणाची गोष्ट 'संन्यासी तुवा होवोनि जनीं। चोरूनी नेली माझी भगिनी' ( अ० १०—२९४ ) येथें देवांच्या मुखांतून आली आहे. 'मी सुदाम याचिया सोडीं गांठी। पव्हयासाठीं' ( अ० ९–३९४ ) येथें सुदाम चरित्राचा संदर्भ उघड दिसतो.

# मराठी वाङ्मयाचा इतिहास—खंड पहिला
## ज्ञानेश्वर नामदेवांचा काल.
## पूर्वार्ध

प्रास्ताविकः—वेदधर्मीयांची एकरूपता पृ. १ परंपरेच्या ज्ञानाची अवश्यकता ३

१ वेदविद्याः—विषय प्रवेश ९ ऋग्वेद ११ वैदिक देवतांच्या प्रार्थना १३ ऋग्वेदांतील अध्यात्मविद्या १९ यजुर्वेद २६ सामवेद २८ अथर्ववेद २९ वेदांगें ३३ वेदोपांगें ३५ उपवेद ३८ सांख्यशास्त्र ३९ पातंजल योग ४४

२ उपनिषदांतील ब्रह्मविद्याः—दशोपनिषदें ४७ आत्मविद्या व आत्मविद् ४८ शांडिल्य ५६ आरुणि ५७ दध्यंङ् आथर्वण ५९ याज्ञवल्क्य ६१ कठोपषद्—नचिकेत व यम यांचा संवाद ६४ सृष्टयुत्पत्तीची काहणी ७४ नीतीचा व साधनमार्गाचा उपदेश ७७ ब्रह्मविद्येचा आनंद ८० उपनिषदांतील कांहीं सूत्रें ८४

३ भगवद्गीताः—स्वधर्मकर्म ८७मोह निरास हा गीताशास्त्राचा हेतु ८८ ज्ञानोत्तरभक्ति हें गीतेचें रहस्य ९१ गीता आणि उपनिषदें १०५ गीताभागवतांतील नवविधाभक्ति १०८

४ श्रीमद्भागवतः—गीता आणि भागवत १११ भागवत पुराण ११२ भागवताचा काल ११३ अभेदाची बैठक ११६ भागवतांतील मुख्य विषय ११८ श्रीकृष्णाचा संसार १२३ भक्तीचें स्वरूप १३१ उत्तम भक्त १३४ भगवंताच्या रूपाचें ध्यान १३६ गुणानुवाद व नामसंकीर्तन १४१ संत व सत्संगाची महती १४६ भागवतधर्माची मुख्य तत्वें १४९ गोपींचें भक्तिप्रेम १५५

५ भक्तिमार्गाचें अनादित्व व शिवविष्णुसंप्रदायः—भक्तिमार्गाचें औदार्य १६५ भक्तिमार्ग वेदांत आहे १६६ पंचरात्रमत व भागवतधर्म १६९ शिवविष्णु ह्या देवता वैदिक आहेत १७१ शिवविष्णूंची एकात्मता १७७

६ मधल्या काळाचा थोडा इतिहासः—ब्राह्मण व क्षत्रिय वैदिक १८१ अवनतीस आरंभ १८४ गौतमबुद्ध व महावीर १८५ वैदिक धर्माचे सिद्धांत १८७ बौद्ध व जैन पंथ १९० मौर्य चंद्रगुप्त १९१ अशोक १९३ अशोकाचे आदेश १९५ पुष्पमित्र व विक्रमादित्य १९९ समुद्रगुप्त, चंद्रगुप्त व गुप्तसाम्राज्य २०१ हूणांच्या टोळधाडी २०५ सम्राट हर्षवर्धन २०६ सातव्या शतकांतल्या हिंदुसमाजाची स्थिति २०९ काश्मीर, कनोज, धार इ० हिंदु राज्यें २१५ टोळधाडी व त्यांचा प्रतीकार २२० बुद्धपंथाचे परदेशीं प्रयाण २२३

**७ तामीळांचें साम्राज्य, तामीळ संत व तामीळ आचार्यः—**
तामीळांची श्रेष्ठ कामगिरी २२७ करिकेल चोल २२९ चोल राजे २३० चोलांची राज्यव्यवस्था २३४ पांड्य, चेर व पल्लव २३६ तामीळांचीं अजस्त्र शिल्प-कामें २३८ तामील वाङ्मय २३९ बारा अळवार ऊर्फ वैष्णव २४२ नम्माळवार २४६ तिरुज्ञान संबंदर २५० अप्पर २५४ संबंदर व अप्पर २५६ सुंदरमूर्ति २५८ माणिक्कवासहर २५९ तिरुमुलर २६४ प्रेममूर्ति नंद २६५ कुमारील भट्ट २७४ शंकराचार्य २७६ शंकराचार्यांची कामगिरी २७९ आचार्यांची ग्रंथ संपत्ति २८२ रामानुजपंथाचे आचार्य २८६ शंकराचार्य व रामानुजाचार्य यांचीं मतें २९१ मध्वाचार्य २९५ तीनही आचार्यांचें मतैक्य २९८

---

## उत्तरार्ध

**८ महाराष्ट्र देश व मराठे लोकः**—दण्डकारण्य ३०१ महाराष्ट्राच्या चतुःसीमा ३०५ राष्ट्रकूट व शालिवाहन ३०८ पुलकेशी चालुक्य ३१४ पुन्हां राष्ट्रकूट ३१६ उत्तर चालुक्य ३१९ ठाण्याचे शिलाहार उर्फ शेलार ३२१ छोटीं मराठी संस्थानें ३२३ देवगिरीचे यादव ३२५ भिल्लम व सिंघण ३२६ विद्या व कला यांना प्रोत्साहन ३२७ कृष्णदेव, महादेव व रामदेवराव ३२९ हेमाद्री व बोपदेव ३३१ पंढरपूरचा कृष्ण भक्ति संप्रदाय ३३५ ज्ञानेश्वरांनीं केलेलें रामदेव-रावांचें गौरव ३३७ स्वराज्याचें सुख ३३८

**९ महाराष्ट्री उर्फ मराठी भाषाः**—देशी भाषांचा उगम ३४३ वर-रुचीचें व्याकरण ३४६ हालाची सप्तशती ३४८ कर्पूर मंजरी ३५२ मराठी भाषा बनत होती. ३५४ मुकुंदराज व मराठी भाषा ३६० महानुभाव व मराठी भाषा ३६३ ज्ञानेश्वरांची मऱ्हाठी—साहित्य आणि शांति ३६७ संस्कृतच्या बरोबरीची मऱ्हाठी ३७० मऱ्हाठी शांतरसाचें घर ३७२ मऱ्हाठी वाङ्मय हें आनंदाचें आवार आहे. ३७५ ग्रंथरचनेचा हेतु व सविनय समाधान ३७७ जुन्या काव्यांच्या प्रती ३८०

**१० आदिकवि मुकुंदराजः**—कालगणना ३८९ गुरुपरंपरा ३९२ ग्रंथर-चना ३९५ विवेकसिंधु ३९६ परमामृत ४०१ वेदांत व राजयोग ४०६ सगुणो-पासना ४१०

**११ महानुभावपंथाचे मराठी वाङ्मयः**— पंथाचे संस्थापक व

प्रचारक ४१३ महानुभाव पंथाचे आचार विचार ४१६ पंथाविषयीं लोकांत अप्रि-- यता कां ४२४ सात प्रमुख ग्रंथ ४२६ कवीश्वर भास्कराचा ' शिशुपालवध ' ४२७ भास्कराचा एकादशस्कंध ४४० भास्कर कवीचें श्रीकृष्णचरित्रपर गद्यपद्यादि ग्रंथ ४४३ महदंबेचे धवळे ४४६ चक्रधराची दिनचर्या ४५२ केशवराज सूरि ४५५ दामोदर पंडिताचे ' वत्सहरण ' ४५६ नरेंद्राचें रुक्मिणीस्वयंवर ४५५ ज्ञान प्रबोध ४६६ ऋद्धिपूरवर्णन ४७१ महानुभावपंथ व वारकरीपंथ ४७४

१२ नाथ परंपराः— नाथ परंपरा ४८१ गोरक्षनाथ ४८२ नाथपंथाचीं मतें ४८४ नाथपंथाचा महाराष्ट्राशीं संबंध ४८५ गोरक्षनाथांचें कवित्व ४८८ गहिनीनाथांचा बोध ४९२ निवृत्तिनाथांचा गुरु परंपरेचा अभंग ४९३ गुरुपरंपरे-- विषयीं ज्ञानेश्वरांच्या ओव्या ४९४

१३ श्रीज्ञानेश्वर दर्शनः— कालानुक्रम ४९८ ज्ञानेश्वरांचीं दोन जुनीं चरित्रें ४९९ नामदेवानीं वर्णिलेलें चरित्र ५०१ सत्यामळनाथलिखित ज्ञानेश्वर-- चरित्र ५०६ ज्ञानेश्वरांचें आत्मचरित्र ५११ पूर्वील ग्रंथांचे संस्कार ५१८ कृष्णार्जुन-- प्रेमप्रसंग ५३६ समकालीन संतांची ज्ञानेश्वर निष्ठा ५४२ भक्तीचा जिव्हाळा व हृदयाची प्रेमलता ५४५

१४ भक्त नामदेव ( पूर्वार्ध ) :---नामदेवांच्या अभंगांची गाथा ५५३ नामदेव ५५५ पंढरीक्षेत्र व विठ्ठलभक्ति ५५८ प्रेमाचा रुसवा ५६५ भक्तीचें प्रेम— सुख ५६७ खऱ्याखोट्याची निवड ५६९ नामदेवांच्या वाणीची गोडी ५७२ पहिला शिष्य परिसाभागवत ५७३ ज्ञानेश्वर नामदेवांच्या तीर्थयात्रा ५७७ गोरा कुंभार ५८२ कच्चा घट ५८४ गुरु विसोबाखेचर ५८५ नामदेवांच्या घरची मंडळी ५२९

१५ संतमेळा व त्यांचें अभंगवाङ्मयः—प्रास्ताविक ५९५ ओवी व अभंग ५९६ ज्ञानेश्वरीकारांचेच अभंग आहेत. ' बाप रखुमादेवीवर ६०१ ज्ञाने— श्वरांची अभंगवाणी ६०२ ' गोपाळेविण तुद्धरिजे ' ६०८

( पुढील प्रकरणाचे विषय पुढील अंकीं )

# 'जगदंबेस'

[ लेखकः--रामचंद्र बळवंत खाडिलकर वकील नाशीक. ]

चालः-- 'जमुनातट रामखेले होरी'

करुणाघन जय जगदंबे । करुणाघन ॥ ध्रु० ॥
तूचि आम्हासी जननी जगतीं ।
संकटिं तारिसि हेरंबे ॥ १ ॥ जगदंबे ॥
निरुपम प्रेमाची तूं मूर्ती ।
पाहुनि अंतर हे रंगे ॥ २ ॥ जगदंबे ॥
कैवारी तूं दीनजनांचीं ।
गाति मुनी तुज आनंदे ॥ ३ ॥ जगदंबे ॥
कृपा कटाक्षें तुझिया माये ।
दुर्धर बंधनही भंगे ॥ ४ ॥ जगदंबे ॥
तव प्रेमा मज देइ दयाळे ।
राम पदा विनयें वंदे ॥ ५ ॥ जगदंबे ॥

# ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य

## अध्याय सतरावा

[ आतां १६ व्या अध्यायाशीं १७ व्याची संगति कशी लावली आहे तें पाहूं. १६ व्या अध्यायाच्या शेवटीं ' कृत्याकृत्य व्यवस्था । अनुष्ठावया पार्था । शास्त्राचि एक सर्वथा । प्रमाण तुज ' असा देवांनीं निर्णय दिला. तो ऐकून अर्जुन मनाशीं ह्मणाला: ' शास्त्राज्ञेप्रमाणेंच कर्म करावयाचें हें देवाचें सांगणें आहे पण हें फार कठिण आहे. नागाच्या फडांतला मणि काढून तो सिंहाच्या नाकांतील केसांत ओवायचा आणि मग तो अलंकार गळयांत घालायचा आणि तो न मिळाला तर गळा काय रिकामा ठेवायचा ? तसें आधी शास्त्रें अनेक, त्यांच्यात मतैक्य सांपडणें कठिण; बरें शास्त्रांची एकवाक्यता झाली तरी शास्त्रें पाहून त्याप्रमाणें वागायला वेळ कोणाला आहे आणि एवढें सगळें साधायला आयुष्य किती दीर्घ पाहिजे? हें सारें कोणाला तरी साधणें शक्य आहे कां? तात्पर्य, शास्त्राचें ज्ञान, द्रव्याची अनुकूलता, योग्य स्थळ व काळ या चारी साधनांची अनुकूलता होऊन कर्म यथासांग पार पाडणें अत्यंत कठिण; असा योग सर्वांना कोठून येणार ?

' शास्त्रें अर्थें देशें काळें । या चहूंही जें एक फळे । तो उपावो कें मिळे । आघवे यासी ' ॥ २८ ॥

ह्मणून शास्त्रानें सांगितल्याप्रमाणें सर्व घडून येणें दुरापास्तच होय ? असें ज आहे तर अज्ञानी मुमुक्षु जीवांना तरणोपाय कोणता ? त्यांनीं कोणत्या मार्गानीं जावें? ' असे विचार अर्जुनाच्या मनांत घोळत राहिले. अर्जुन ह्मणजे सामान्य पुरुष नव्हे ! तो ' प्रज्ञेचा प्रियोत्तम' व ' ब्रह्मविद्येचा विश्राम ' देवाचा ' मूर्त मनोधर्मच' तो ! आतां आपल्या मनांतला अभिप्राय विचारण्यासाठीं अर्जुन प्रस्ताव करितो. अर्जुनाने देवास उघड विचारिले ' देवा ! आमच्या इंद्रियांना तूं ब्रह्मरूप आहेस हा अनुभव आला व तुझ्या वचनावर विश्वास ठेवावा हें आमचें उचित खरें; तथापि शंका आली ती तुझ्यापुढें ठेवतों. शास्त्रावांचून प्राण्याला मोक्ष नाहीं असें तूं ह्मणालास तें शास्त्राच्या पक्षपातानें ह्मणालास काय ? अरे! शास्त्रोक्त कर्म करायला अनुकूल देश किंवा काळ मिळाला नाहीं, शास्त्राभ्यास करविणारा गुरुही भेटला नाहीं, आणि अभ्यासाला जी जी सामुग्री लागते ती ती अनुकूल असावी लागते ती कांहींच नाहीं. पूर्वकर्म धड नाहीं, प्रज्ञा साह्य देत नाहीं, यामुळें शास्त्राध्ययन मुळींच झालें नाहीं, फार काय पण शास्त्राबद्दल टेकायला कांहींच आधार न मिळाल्यामुळें ज्यांनीं शास्त्राविषयीं विचार करायचेंच

सोडून दिलें आहे ] शास्त्रनिर्णय करून त्याच्या अर्थाप्रमाणें सदाचारानें वागत असून ज्यांचें सर्व वर्तन परमार्थपर आहे त्यांच्या सारखे आपण व्हावें अशी आस्था धरून जे त्यांच्या किर्याप्रमाणें चालतात, तात्पर्य 'सर्व शास्त्रनिपुण। तयांचें जें आचरण। तेचि करिती प्रमाण। आपुलिये श्रद्धे'—अशा केवळ श्रद्धावतांना कांहीं गति आहे कीं नाहीं? शास्त्रार्थ माहित नाहीं पण श्रद्धापूर्वक शिवादि देवांचीं पूजनें, भूम्यादिकदानें, अग्निहोत्रादि यजनें इ० कर्म मार्गानें जे जातात त्यांत कोणी सात्विक कोणी राजस, कोणी तामस असे त्रिविध प्रकारचे जन असतात त्यांना कोणती गति मिळणार आहे?' या अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी १७ वा अध्याय भगवंतांनीं सांगितला आहे. देव ह्मणाले 'अर्जुना! तुला शास्त्राभ्यासाची अडचण वाटत आहे, पण लक्षांत ठेव कीं नुस्ती श्रद्धा ह्मणून कांहीं कार्यभाग होत नाहीं. श्रद्धा ही कांहीं सोपी नाहीं. श्रद्धेचें स्वरूप स्वभावतः शुद्ध आहे पण त्रिगुणात्मक प्राण्यांच्या ठिकाणीं गुणसंगतीनें श्रद्धाही तीन प्रकारची होते. अनादिमाया प्रभावानें सात्विक, राजस व तामस अशा तीन स्वभावांच्या प्राण्यांमध्यें सात्विक, राजस, तामस अशी श्रद्धा त्रिविध असते. 'जैसें जीवनचि उदक। परी विषीं होय मारक। कां मिरयामाजीं तिख। उंसीं गोड'—उदक हें जीवन ह्म० जगवणारें खरें, पण तें विषांत मारक, मिऱ्यांत तिखट व उसांत गोड होतें, तशी श्रद्धा ही सात्विक प्रकृतीच्या लोकांत तारक व राजस तामस प्रकृतीच्या लोकांत मारक होते; ह्मणून 'हे सात्विक श्रद्धा। जतन करावी प्रबुद्धा। येरी दोनी विरुद्धा। सांडाविया' [ केवळ श्रद्धावंत जे आहेत त्यांना गति आहे काय ह्या अर्जुनाच्या प्रश्नाला येथें उत्तर मिळालें तें हें:—नुस्ती श्रद्धा असून भागत नाहीं तर **श्रद्धा सात्विक असली पाहिजे.** सात्विक श्रद्धेनें जे संतसज्जनांच्या मार्गानें चालतात त्यांना अवश्य मोक्ष मिळेल. ] देव सांगतातः—

हे सात्विकमति जया। निर्वाहती ( संरक्षक ) होय धनंजया।
बागूल नोहे तया। कैवल्य तें ॥ ८४ ॥
तो न पढो कां ब्रह्मसूत्र। न लोढो ( पढो सर्व शास्त्र।
सिद्धांत न होत स्वतंत्र। तयाच्या हातीं ॥ ८५ ॥
परि श्रुतिस्मृतींचे अर्थ। जे आपण होऊनि मूर्त।
अनुष्ठानें गाजत। वडिल जे हे ॥ ८६ ॥
तयांचीं आचरतीं पाउलें। पाऊनि सात्विकी श्रद्धा चाले।
तो तेचि फळ ठेविलें। ऐसें लाहे ॥ ८७ ॥

सात्विक बुद्धि ज्यानें संभाळली त्याला मोक्षाचा कांहींच बाऊ नाहीं. तो ब्रह्मसूत्र न पढो, सर्व शास्त्रांचें आलोडन न करो, स्वबुद्धीनें निर्णीत केलेले स्वतंत्र सिद्धांत

१२ २
२ — ३२१

त्याचे हातीं नसोत, तथापि श्रुतिस्मृतींचे ह्म० शास्त्रांचें रहस्य समजून ते अर्थरूप होऊन राहिले आहेत, त्याप्रमाणें ज्यांचें आचरण निर्मळ आहे अशा 'संतसज्जनांच्या आचरणाचीं पाउलें पाहून त्यांच्या मार्गानें जो सात्विक श्रद्धेनें चालतो त्यालाही तेंच मोक्षरूप फळ अगदीं ठेवल्यासारखें प्राप्त होतें. शास्त्राध्ययनाची अडचण येथें दूर झाली. ज्याला अनुकूल असेल त्यानें तें अवश्य करावें पण ज्यांना शास्त्राध्यनाची सोय नसेल त्यांनाही मोक्षाचा मार्ग मोकळा आहे; मात्र त्यांनीं सात्विक श्रध्देनें शास्त्रप्रमाणें वागणाऱ्या संताचें अनुसरण केलें पाहिजे. 'सदाचार' संतांचा आचार हाच सामान्य जीवांचा धर्म आहे.

आतां १७व्या अध्यायांत यापुढें आहार सात्विक असल्यावांचून स्वभाव सात्विक बनतनाहीं ह्मणून आहार त्रिविध कसा असतो व त्यापैकीं ज्याला मोक्ष प्राप्तीसाठी सात्विक श्रद्धा जतन करायला पाहिजे त्यानें आहारही सात्विकच ठेवला पाहिजे. आहार तीन प्रकारचा आहे. सात्विक, राजस व तामस, त्यापैकीं सात्विक आहारानें बुद्धिवैभव वाढतें, ज्ञानाचा लाभ होतो व मनुष्याचें इहपर लोकीं कल्याण होतें. 'स्वभाव वृद्धीच्या ठायीं । आहारावांचूनि पाहीं' दुसरा बळवान् हेतु कोणताच नाहीं. प्रत्यक्षच पहा ! जो सावधपणीं मदिरा पान करितो तो अल्पकाळांतच बेसावध, बेभान व उन्मत्त होतो ! जो साव्याचें अन्न खातो तो वातश्लेष्मानें व्यापतो. अमृत पोटांत गेलें कीं मरण दुरावतें व विषानें तात्काळ मृत्यु येतो. ह्मणून जसा आहार घ्यावा तसा धातु संचय होतो, व धातुप्रमाणें अंतर्भाव पोसतात. भांडें तापलें कीं आंतलें उदकही तापतें त्याप्रमाणें आहारानें जशी धातु उत्पन्न होते त्या धातुप्रमाणें चित्तवृत्ति बनतात.

मधुर रसाची आवड उत्पन्न होणें हें सत्वगुणाचें लक्षण आहे. फलादिक किंवा दुग्धादिक जे पदार्थ आंगचेच मधुर आहेत ते सात्विक होत. आकारानें मोठे नसावेत (फणसादिक, ते पचायला जड) स्पर्शाला मृदु व जिभेला स्नेहाळ व स्वादिष्ट असावेत. रसानें भरपूर व सालीला मृदु व थोडीशीं अग्नीनें भाजलेलीं फळें भाज्या वगैरे. 'आंगें सानें परिणामें थोर । जैसें गुरुमुखीचें अक्षर । अल्पीं जिहीं अपार । तृप्ति राहे'–हें सात्विक आहाराचें लक्षण; सात्विक रसानें आयुष्य वाढतें, शारीरिक व मानसिक बळाची वृद्धि होते, या आहाराला रोगाचें भयच नाहीं ! आरोग्य उत्तम राहतें, आनंद व सुख जोडतें, आंत आरोग्य बाहेर कांति असा हा सात्विक आहार आहे.

**राजस आहार** हा राजसांना आवडतो व याच्या सेवनानें रजोगुण वाढतो. कडु, आंबट, तिखट, खारट, रुक्ष, भडका करणारे सारे पदार्थ राजस होत ! आणि इतकें कढत कीं 'उन्हाचेनि मिषें तोंडें । आगीचि गिळी' (चहा वगैरे)–

वाफेचिया सिगे। बातीही लाविल्या लागे'—इतक्या वाफा कीं त्यावर खुशाल कांहीं पेढवावें! 'राखेहूनि कोरडें (थालपिटें, चिवडा) जिव्हादंश'—चटण्या, तिखटें, रायतीं वगैरे. 'परस्परें दांता। आदळ होय खातां--कुडबुडीं, 'आधीच द्रव्यें चुरमुरीं। वरी परवडिजती मोहरीं'—(चिवड्याच्या खालचा भुगा) 'जियें घेतां धुंवारीं। नाकातोंडा!' जिभेनें वेडा केलेला हा राजस प्राणी 'अन्न–मिषें अग्नि भडभडां। पोटीं भरी' इतकें रूक्ष अन्न पोटांत गेल्यावर 'पाणियाचें न सुटे। तोंडोनि पात्र' हें उघडच आहे. असलें हें राजस अन्न खाऊन सडकून पाणी पिऊन मग गडबडा लोळतो!–'भुईंना सेजे सांटे' 'हे आहार नव्हत तर मनु–ष्याच्या देहांत सुप्त असलेले व्याधिव्याळ–रोगरूप सर्प, त्यांना जागे करण्याक–रितां दिलेला कैफ होय. तात्पर्य राजस आहारांपासून रोग उत्पन्न होतात, बीज–रूपानें असलेले रोग प्रगट होऊन शरीर व्यापतात व मग वैद्याच घर पाहावें लागतें!

**तामस** आहाराचें वर्णन ऐकूनही चिळस येईल. अर्धकच्चें, शिळें, उष्टें, दुर्गंधियुक्त, शुष्क, सडलेलें,—जाऊं द्या, नकोच त्याचें वर्णन! 'अपेयांच्या पानीं। अखाद्यांच्या भोजनीं। वाढविजे उतान्ही। तामसें येणें'–हा तामस मनुष्य मद्यमांसाहाराची आवड धरितो व वाढवितो!

[शुद्ध सात्विक अन्न, सात्विकांनीं तयार केलेलें, सात्विक स्थळीं सात्वि-कांनीं वाढलेलें, सात्विक भावनेनें देवाब्राह्मणांना, ज्ञातिबांधवांना, गरीब अन्ना-र्थियांना, व पशुपक्ष्यांना यथाधिकार व यथाशक्त्या देऊन अवशिष्ट राहिलेलें देवाचा प्रसाद म्हणून भक्षण केल्यानें सत्वगुणाची वृद्धि होऊन आरोग्य व आयुष्य वाढतें. गुरुगोत्र अग्नि पितर व देव यांना सत्कार श्रद्धा पूर्वक अर्पण करून उरेल 'तें सुखें आपुलें घरीं। कुटुंबेसी भोजन करी'–'उरे तें भोगिजे। संतोषेंसी' देवाधर्माला विसरून 'इंद्रियरुचीसारिखें। करविती पाक निके। ते पापिये पातकें। सेविती जाण' असें पूर्वी ३ ऱ्या अध्यायांत सांगितलेंच आहे.]

**त्रिविधयज्ञ**:—फळाशा न ठेवतां व कर्तृत्वाहंकार न बाळगतां कर्तव्य म्हणून पण यथाशास्त्र व सांग यज्ञ करणें तो **सात्विक** यज्ञ होय. 'मनें देहीं। यजननिश्चयाच्या ठायीं। हारपोनि जे कांहीं। वांछितीना' असे पुरुष 'नुरविनीच अहंकृति। फळालागीं' सकळावयवीं उचित लेणीं लेंकराच्या अंगावर आई घालते, त्याप्रमाणें 'कुंडें मंडप वेदी। आणिकही संभारसमृद्धि' यांत तो कोठें न्यून पडूंदेत नाहीं. आतां स्वर्ग जोडले व मी 'दीक्षित होईन मान्य लोकां अशा प्रकारें केलेला यज्ञ **राजस** होय. ज्यांत शास्त्रविधि नाहीं, मंत्रशुद्धि नाहीं, ब्राह्मण दक्षिणा नाहीं व श्रद्धाही नाहीं असा यज्ञ **तामस** होय.

त्रिविधतपः--देव, ब्राह्मण, गुरु व ज्ञाते पुरुष यांचें पूजन, शुचिता,सरलता, ब्रह्मचर्य व अहिंसा ह्यांत शरीर संतोषानें झिजवणें हें कायिक तप. अनुद्वेगकरं वाक्यं--' न दुखवितां सहज । जावळिया सुख निपजे । ऐसें साधुत्व कां देखिजे । बोलणां जिये' सत्य, प्रिय व हितकर भाषण--' जोडे अमृताची सुरसरी । तें प्राणांतें अमर करी । स्नानें पापताप वारी । गोडी ही दे ॥ तैसा अविवेकही फिटे। आपुलें अनादित्व भेटे । आइकतां रुचि न विटे । पीयूषीं जैसी' ॥ २२० ॥ असें बोलणें आणि तेंही कोणी विचारल्यास किंवा वेदाध्ययन व नाम यात वाणी वेंचणें तें वाचिक तप ज्यांत विकल्पजाळ नाहीं व स्वरूपचिंतन आहे असी मनाची प्रसन्नता, सौम्यत्व, आत्मानंदानुभवामुळें मौन, इंद्रियजय, भावसंशुद्धि हें मानसिक तप देहवाचाचित्ताचें ' हें सामान्य तप सांगितलें. हेंच आतां गुणसं--गानें त्रिविध कसें होतें तें ऐक हें तीनही प्रकारचें तप फळाशा सोडून श्रद्धापूर्वक केलें कीं सात्विक होते, सत्कार मानपूजार्थ दंभानें केलें कीं राजस होतें व स्वतःच्या देहाला कष्ट देऊन दुसऱ्याच्या घातपातासाठी केलें कीं तामस होतें.

त्रिविधदानः – ' तरी स्वधर्माआंतौतें । जें जें मिळेल आपणयातें । तें तें दीजे बहुतें । सन्मानयोगें ' आणि तेंही देश काल पात्र पवित्र पाहून हें सात्विक दान. प्रत्युपकाराच्या बुद्धीनें पण क्लेश देऊन दिलेलें तें राजस व देश काल व पात्र न पाहतां किंबहुना अदेशे, अकाले व अपात्रे दिलेलें व तें सुद्धा अपमान व हेळणा करून दिलेलें तें तामसदान होय.

[ भवबंधमोचक एक सात्विक कर्म होय एवढेंच सांगायचें असतांना विरुद्ध अशीं जीं राजस तामस तीं कां सांगितलीं अशी शंका कोणी घेईल, त्यास उत्तर देतात कीं पिशाचाला दूर केल्याशिवाय विधि हातीं येत नाहीं किंवा धूर सोस--ल्याशिवाय दिवा लागत नाहीं, ' तैसें शुद्धसत्वाआड । आहे रजतमाचें कवाड' । तो रजतमाचा पडदा दूर केल्यावांचून शुद्ध सत्व हातीं येत नाहीं, श्रद्धेपासून आरंभ करून आहार, यज्ञ, तप, दान ह्या ज्या क्रिया सांगितल्या त्या सर्व तिन्हीं गुणांनीं व्याप्त आहेत म्हणून ' सत्व दावाया दोनी । बोलिलों येरें' रजतम दोन्ही सांडतांच तिसरें दिसतें. तथापि या क्रिया नुसत्या सात्विक असूनही भागत नाहीं. सात्विककर्मांत शक्ति आहे हें खरें, पण तीं कर्में मोक्षपर करण्याचें आणखी एक वर्म आहे. उदक स्वच्छ, सुगंध, शीतळ असलें तर चांगलेंच आहे पण त्यांत पवित्रपण तीर्थाच्या संगतीनें येतें, शंभरनंबरी सोन्यावर राजाज्ञेचीं अक्षरें पडल्यानें तें सर्वत्र चालू होतें, किंवा नदी केवढीही मोठी असली तरी तिचा गंगेनें स्वीकार केला कीं ती सागराला मिळून पावन होते, त्याप्रमाणें सात्विक कर्मालाही मोक्षाच्या गावीं येतांना निर्विघ्नपणा आणणारें एक वर्म आहे तें लक्ष्यांत ठेव.]

'ॐ तत्' सत् हें परब्रह्माचें नाम आहे, ह्या त्रिविध निर्देशानें पूर्वी ब्रह्मदेवानें ब्राह्मण, वेद व यज्ञ निर्माण केलें. ब्रह्म हें नामजाति विरहित आहे पण ओळखीसाठीं श्रुतीनें त्याला हें नांव दिलें. ब्रह्मदेवानें ह्या तीन वर्णांचा जप व विचार केला तेव्हां त्याला सृष्टि उत्पन्न करण्याची योग्यता आली. त्यानें ब्राह्मण उत्पन्न केले, त्यांना (शासन व आचार या साठीं) वेद दिले व (निर्वाहासाठीं) यज्ञ दिले. सर्व मंत्रांचा राजा ॐ हें ब्रह्मदेवानें जपलेल्या नावांतलें पहिलें अक्षर, तत् हें दुसरें व सत् हें तिसरें. 'ॐ तत्' हें ब्रह्माचें नांव झालें. यज्ञदानतपादि सात्विककर्मे सात्विकबुद्धीनें करावें व 'ॐ तत् सत्' या नामासह–त्या नांवाचा विनियोग जाणून 'ब्रह्मार्पण' करावें ह्मणजे तें कर्म मोक्षदायक होते' 'ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु' 'यस्य स्मृत्याच नामोक्त्या' याप्रमाणें श्रुतिस्मृतींनीं कर्म ब्रह्मार्पण करण्यास सांगितलें आहे. 'तोंडीं ब्रह्म नाम। हातीं सात्विककर्म' असलें तरी विनियोगावीण तें विफळ होय. संत आपण होऊन घरीं आले तरी त्यांचा सत्कार करण्याचें ठाऊक नसेल तर पुण्यक्षय होतो. अन्न आहे, भूक आहे, पण बाळाला जेवायचें माहीत नसेल तर त्याला लघंन घडेल; 'स्नेहसूत्र वैश्वानर'—तेल वात व अग्निज्योति एकत्र असली तरी दिवा लावण्याची हातवटी ठाऊक नसल्यास प्रकाशाचा लाभ होणार नाहीं, त्याप्रमाणें सत्कर्म आदरिलें आहे, ब्रह्मनाम माहीत आहे, पण विनीयोग माहीत असला तरच ब्रह्मनामस्मरणपूर्वक केलेलें सत्कर्म मोक्षफल देणारें होईल. आतां प्रस्तुत **विनियोग** कसा असावा तें पाहूं. कर्मारंभीं 'ॐ' असा प्रणवाचा उच्चार करावा. यज्ञदानतपादि कर्में प्रणवोच्चारासह केलीं असतां मोक्षपर होतात, एऱ्हवीं तींहीं बंधनकारक होत! नौका जमीनीवर ठेवली असतां जड असते, पण तीच पाण्यावर सोडली असतां तरंगते व तारून नेत्ये! आतां 'तत् पदाचा विनियोग ऐका. यज्ञदानतपादि कर्में जेव्हां फळामध्यें अल्पसा प्रवेश करूं पाहतात ह्म० फलापेक्षा उत्पन्न करितात तेव्हां कर्म फलाचे ठिकाणीं 'तत्' ह्या पदाचा विनियोग करावा। ह्म० तत्पदानें व्यक्त होणारें जें ब्रह्म त्याला फळासह कर्म समर्पावें. 'तत्' ह्मणजे काय?

तदात्मक ब्रह्माचे ठायीं कर्में अर्पण करून ('न मम' ह्मणावें) आपला व कर्मफलाचा संबंध तोडावा. हा 'तत्' पदाचा विनियोग. 'आतां ॐकारें आदरिलें। तत्कारें समर्पिलें पण एवढ्यानें सुटका नाहीं, सत्पदाचा विनियोग अजून कळायचा आहे. ब्रह्मरूप झालेलें कर्म व त्याचा कर्ता यांत अजून भेद आहे, कर्ता आपणास ब्रह्माहून वेगळा समजतो – तो भेद जाण्यासाठीं 'सत्' पदाचा विनियोग पाहिजे. पर, वेगळें, दुसरें, असें जें ब्रह्म होतें तें आत्मत्वें अनुभवाला यावें यासाठीं 'सत'

पदाचा विनियोग सांगितला आहे. सद्भाव, साधुभाव व प्रशस्तकर्म याठिकाणीं 'सत्' पदाचा विनियोग करावा. सत् पदानें असत् पदार्थ मात्राचा निरास करून सत् ब्रह्माचें निर्दोषत्व दाखविलें जातें. जें असतें, दिसतें व भासतें हें सर्व सत्स्वरूप आहे 'सत्' पदाचा आणखी एक अर्थ ध्यानीं आणावा. सात्विक कर्माचे वेळीं कांहीं उणें पुरें होतच असतें. सत्कर्मांत कांहीं न्यून पडतें, किंवा प्रमादानें मर्यादा सुटून क्वचित् निषिद्धपणा येतो. कांहीं न्यूनता, दोष, व्यंग कर्मांत आलें व सद्बुद्धीनें केलेलें सत्कर्मही 'असत्' या दुर्नामाला प्राप्त होतेसें दिसलें कीं तेथें 'सत्' पदाचा विनियोग केल्यानें 'असत्पण' जाऊन सर्व कर्म सद्रुपच होतें.

'ॐ तत् सत्' ह्या नामानें कर्माचें व्यंगाव्यंगपणा न उरतां सर्व कर्म ब्रह्मरूप होतें, मात्र सात्विककर्म सात्विक श्रद्धेनेंच केलें पाहिजे. अश्रद्धेनें केलेलीं यज्ञदानतपादि सर्व कर्में 'असत्'-व्यर्थ आहेत. तात्पर्य 'ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु' अशा निर्मळ श्रद्धेनें केलेलीं सर्व कर्में मोक्षाला नेणारीं आहेत.

---

# आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्र संत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृत्तांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्र महोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. 'उपकृतिस्मरण' हें ७६ श्लोकांचें नवीन आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा ग्रंथांचा व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं.८११

# मारुतिउपासना.

प्रथम मारुतिरायाचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी, किं ८४

# सत्संगांतील आनंद

( लेखकः— अंबादास माणिकराव अनसिंगकर, दिग्रस )

आमचे परमस्नेही व गुरुबंधु ह. भ. प. नरहरशास्त्री खरशीकर यांचा मुक्काम गेले दोन अडीच महिने वऱ्हाड मध्यप्रांत व मोगलाईंत होता. त्यांचे कडून झालेल्या कार्यांचा संक्षिप्त वृत्तांत पाठवीत आहे, इच्छेनुरूप आपल्या मुमुक्षूंत छापल्यास आनंद होईल.

दिग्रस, जि. यवतमाळ येथें श्रीब्रह्मानंदस्वामी यांचा उत्सव पांच दिवस फार थाटाचा होतो. यंदां वऱ्हाडांतील नापिकीमुळें पैसा बिलकूल दिसत नाहीं यामुळें उत्सवासही खर्च कमी लागावा अशा इच्छेमुळें कांहीं प्रसिद्ध हरिदासांस निमंत्रणें केलीं, परंतु हरिदासांचीं उत्तरें 'भरपूर बिदागी व प्रवासखर्च दिल्यास येऊं' अशीं गेल्यावर व्यवस्थापकांस चिंता पडली व ह. भ. प. खरशीकरशास्त्री यांच्या बिदागीची चौकशी केली पण 'कीर्तन करणें हा त्यांचा धर्म आहे बिदागीबद्दल बोलण्याचें काम नाहीं कोणी कांहीं समर्पण केल्यास ठीक, न केल्यासही आनंदच आहे' असें समजतांच या उत्सवांत नरहरशास्त्री खरशीकर यांचीं कीर्तनें करण्याचें ठरलें पहिले दिवशीं त्यांचें कीर्तन नाममहात्म्यावर अतीशय सुंदर झालें. महत्पापी जीवही कसें उत्तम सुधारून सन्मार्गास लागतात 'तुका म्हणे महापातकी पतीत होती जिवन्मुक्त हेळामात्रे' या संतवचनाधारें मिराबाईनीं एका भंग्याच्या मुलाला कृतार्थ केल्याचें आख्यान सांगितलें. कीर्तन फारच उत्तम झालें. परमात्मा जगत्‌रूपानें कसा नटला आहे; संसार अगर विश्व ही त्याची प्रतीती कशी आहे, नामाचे सत्याग्रहानें अनेक संकटें दुःखें कशी लय पावतात इ० विवेचन उत्कृष्ट केलें पण कीर्तनांत नकला, संगीतगाणें व राष्ट्रीय चळवळ नाहीं म्हणून श्रोत्यांचीं मनें खिन्न झालीं व दुसरें दिवशीचें कीर्तनांत या गोष्टी आल्या नाहींत तर कीर्तनास श्रोतृसमुदाय येणारही नाहीं अशी कुरबूर होऊं लागली. दुसरे दिवशीचें कीर्तनांत 'क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु' यावर निरुपण फार बहारीचें केलें. समाजास रुचेल तसें कीर्तन आपणाकडून होणार नाहीं, कीर्तनही भक्ति असून कीर्तन हें लोक शिक्षणासाठीं आहे; तसेंच हल्लीं राष्ट्रांतील महालक्ष्मी सातासमुद्रापलीकडे गेली आहे व सरस्वतीनेंही परराष्ट्रांत गमन केलें आहे. लक्ष्मी परत मिळविणें असेल तर तिचा पती महाविष्णु याची उपासना केली पाहिजे महाविष्णु प्रसन्न होतांच त्यांचे बरोबर त्यांची पतिव्रता लक्ष्मी प्रसन्न होऊन ईप्सीत अर्थ पुरतील तेव्हां आतां उपासना वाढवून लक्ष्मी नारायणाची प्राप्ति करून घेण्याचें करावें कां नकला,

संगीत सांगून जनमन रिझाविण्याचें कार्य कीर्तनानें करावें असा रोकडा प्रश्न श्रोत्यांस विचारला. त्यांचें वक्तृत्वाची छाप म्हणा अगर सद्‌गुरुकृपा म्हणा पण श्रोत्यांवर उत्तम परिणाम होऊन अधले दिवसाचे विरोधक अनुयायी बनले. मग पुढचे तीन दिवसांत सर्व श्रोतृवृंद भक्तिप्रेमांत पोहत होता व कीर्तनास अफाट जनसमुदाय जमत असे. त्या उत्सवांतच गीताजयन्ति निमित्त त्यांचें प्रवचन झालें. त्यावेळीं कांहीं श्रोते देहभान विसरून श्रीकृष्ण कथेशी समरस झाले होते. प्रवचन व कीर्तनांत जो जो विषय प्रतिपादन करीत त्या त्या विषयाशी श्रोते तद्रूप होऊन जात असत व श्रवण सुखांतच मोक्ष आहे हे ज्ञानेश्वर महारांचे बोल अनुभवितां येत असत; चरित्र सांगत त्यावेळीं आपण प्रत्यक्ष त्या प्रसंगांतच आहोत असें श्रोतृवृंदास वाटून आनंदाचे डोल येत असत.

या नंतर त्यांनीं बराच प्रवास केला. त्या प्रवासांत कोसरसारचे भक्त बाळकृष्ण व अशी येथील उद्धव ही मंडळी १०।१२ दिवस त्यांचे बरोबर होती रोज कोठेंतरी उत्कृष्ट प्रवचन होत असें. एके ठिकाणीं रात्रीं 'मन्मनाभव मद्भक्तो' यावर ं उद्बोधक प्रवजन झालें त्यावेळीं तेथील एक साधुबोवा आले होते. हे साधु वृद्ध आहेत व त्यांची शिष्यशाखाही आहे. दुसरे दिवशीं हे साधुबोव. खरशीकरांना भेटण्यास आले त्या वेळचा गोड संवाद देत आहे:—

साधुबोवा:- महाराज! रात्रीं आपलें प्रवचन ऐकून मला झोंप आली नाहीं आतां आपले चरणाजवळ आलों आहे, मला रात्री ऐकल्यापासून मी नरकांत जाणार असे वाटू लागले आहे तरी माझा उद्धार होईल कां नरकवास मिळणार?

खरशीकर–माझ्या रात्रीच्या प्रवचनाचें नर्कवास हें फळ तुह्मांस येणार असेल तर माझ्या प्रवचनाच्या चुका मला अगोदर पाहाव्या लागतील.

साधु०–नाहीं महाराज! आपण तर सर्व जीवांना सहज कृतार्थतेचा मार्ग दाखविला आहे पण माझे आजवर सात गुरु होऊनही तळमळ गेली नाहीं ती आपण शमवाल अशी आशा धरून आपण आठवे गुरु समजून आठव्याचा. आठव करून आलों आहे तरी मी बुडणार कां तरणार हे सांगा.

खरशीकर–सद्‌गुरुचे कृपादृष्टीनें कोणीही बुडत नाहींत तसेच तुह्मीही बुडणार नाहीं पण सात गुरु जसे फुकट झाले तसेच आठवेही गुरुच ( जनावर ) होईल मग कसे? आपला साधनाभ्यास काय चालू आहे?

साधु०—मी सोहंचा जप व ध्यान करतो २४।२५ वर्षें अभ्यास करीत आहे पण अद्याप जम बसत नाहीं.

मग खरशीकर यांनीं सोहंवर पुष्कळ वेळ भाषण केलें व त्यापेक्षां श्रीगुरुकृपा-कटाक्षे करून सहज आनंद कसा प्रगट होतो हें विशद केले. साधुबोवास समाधान

झाले व वारंवार या आठव्या गुरुमहाराजांस नमस्कार करुन निघून गेले. ठिकठि-काणीं परमार्थ प्रेमी पण कोणीकडे तरी वाहवलेले अनेक जीव दिसतात कोणी ब्रह्म दाखविणारे भेटले व त्यांच्या भजनी लागून रस्ता चुकलेले जीव भेटले त्यांनाही ब्रह्म पाहण्याच्या नादांतून सरळ भक्तिप्रेम व नामाच्या मार्गावर वळविले.

नंतर आह्मी श्रीक्षेत्र माहूर येथें गेलों. तेथें श्री. प. प. विष्णुदास कवि महाराज यांचे पुण्यतिथीचा उत्सव फारच उत्तम रीतीनें पार पडला. यंदा इक-डील भागांत लोकांची फार हलाखी आहे. अशा काळांत हा उत्सव मात्र दरसाल-पेक्षां चांगला झाला. स्वामींचा आश्रम अरण्यांत आहे. आश्रमांत हल्लीं दोनवर्षें श्री. कृष्णमूर्ति अय्यर हे ईश्वरप्राप्तिसाठीं तपानुष्ठान करीत आहेत. ते सुशिक्षित असून इंजिनीअर आहेत. ते आपल्या कौटुंबीय सर्व मंडळीसह राहिले आहेत त्यांना ईश्वरी कृपेचे अनुभव चांगले आले आहेत. ते ज्योतिष शास्त्रांत निष्णात आहेत. सारांश या आश्रमांत लहानापासून थोरापर्यंत लोक येतात व सर्वांना येथें येतांच प्रसन्नता प्राप्त होते तेथील प्रस्तुतचे स्वामी भार्गवानंद सरस्वति हे फारच सन्माननीय असून भूतमात्रीं त्यांची समदृष्टि आहे. या उत्सवांत श्री: नरहरशास्त्री यांची गुरुप्रेमानें ओथंबलेलीं कीर्तनें झालीं त्यावेळीं श्रोते वक्ते देहभाव विसरून गुरुभक्तींत समरस होत असत. प्रत्यक्ष श्रीसद्‌गुरुमहाराजांचें दर्शनच कीर्तनांत होत आहे अशी सर्वांची उच्च भूमिका तयार होत होती. नंतर या मठांतच श्रीगुरुदास मामा महाराज यांचे पुण्यतिथीचा उत्सव झाल्यावर आसपासच्या लोकांच्या प्रेमाग्रहावरून आह्मी थोडे दिवस फिरून आलों. प्रत्येक ठिकाणीं खरशीकरांची कीर्तनें प्रवचनें ऐकून सर्वत्र आनंद व्यक्त होत असे. खरशीकर यांचे गुरु श्रीविष्णुकवि होते व त्यांच्या आश्रमाचे ते जबाबदार घटक आहेत. हल्लीचे स्वामीमहाराज फार क्षीण झाले आहेत. यामुळें या आश्रमाची व्यवस्था पुढें कशी चालवावी याबद्दल मोठा विचार पडला व त्या कामीं श्री. खरशीकर यांना अति-शय श्रम करावें लागले. आतां त्यांनीं चांगली योजना तयार केली आहे. शिवाय विष्णुकवीची अप्रकाशित उत्कृष्ठ कविता आहे ती जमविण्यांत त्यांचा पुष्कळच काळ खर्च झाला. त्यासाठीं त्यांना प्रवासही बराच करावा लागला. आतां लवकरच त्यांचेकडून कविता प्रसिद्ध होऊन मराठी वाचकांस सुंदर मेजवानी मिळणार आहे.

हल्लीं राजकीय चळवळीमुळें व दुर्भिक्षामुळें लोकांचीं मनें अस्वस्थ असून तूर्त एका ध्येयाकडे गुंतलीं आहेत. अशा वेळीं धार्मिक व भक्ति ज्ञान प्रेम याकडे लोकांचें लक्ष जाणें कठीण आहे. तथापि याही काळांत उपासना वाढवून परमा-

त्यास शरण जाणें आद्य कर्तव्य आहे ' पडता जडभारी दासे आठवावा हरि ॥ मग तो होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन ॥ या संतोक्ती प्रमाणें नामाकडे व ईश्वराकडे चित्त वळण्याची जरूरी आहे. ह्मणून खरशीकर यांचीं कीर्तन प्रवचनें शहरांतूनही सुशिक्षित समाजांत झालीं; विशेषतः उमरावती, मोर्शी, दारव्हा, द्रिग्रस मेहकर इ० ठिकाणीं नवशिक्षितांनाही प्रस्तुतचे धकाधकीच काळांत त्यांचे विचार पटले आहेत. यांचें, त्यांना जास्त राहण्याबद्दल ठिकठिकाणीं आग्रह होत असे, हें गमक आहे. कीर्तन प्रवचनावर पैसा मिळविणें हें त्यांचें ध्येय नसल्यामुळें कीर्तनें परिणामकारक होतात. कोणी अत्यंत प्रेमानें त्यांना कांहीं अर्पण केल्यास ते घेतात पण त्यांचें निष्कामव्रत प्रशंसनीय आहे.

## वऱ्हाडांतील यज्ञ समारंभ

महाशिवरात्री निमित्त दिग्रस जि. यवतमाळ येथें श्री. अंबय्या महाराज निर्मलकर यांनीं रुद्रस्वाहाकार, कैलासपूजा लक्षलिंगार्चन, महारुद्र इ० प्रकारानें ५।६ दिवस हजारों लोकांचें लक्ष वेधून टाकलें होतें. विद्वान् वैदिक शास्त्री यांनीं कुंडमंडप सशास्त्र तयार केला होता. कैलासाची रचना चक्रव्यूहानें करून मध्यें उंच ठिकाणीं रात्रीं १२ वाजतां श्रीशंकाराची पूजा व दर्शनाचा अपूर्व समारंभ शिवरात्रीचे दिवशीं झाला त्यावेळीं अफाट जनसमुदाय जमला होता, अन्नदानही फार मोठ्या प्रमाणावर होऊन यज्ञ समारंभ फार उत्कृष्टरीतीनें पार पडला.

गांवातील स्काउटस् कडून मर्दानी खेळही या ठिकाणीं उत्तम झाले. या यज्ञसमारंभात ज्ञानचर्चा होणें जितकी अवश्य होते तितकी झाली नाहीं तथापि कांहीं कार्य झालें आहे तें मात्र उत्तम झालें आहे. या समारंभास ठिकठिकणांहून कोमटी (वैश्य) समाज अफाट जमला होता. वैश्य हे त्रैवर्णिक द्विज आहेत असें ठरलें आहे त्याप्रमाणें या उत्सव प्रसंगीं वैश्यांचीं ५० उपनयनें झालीं हें कार्य फार उत्तम झालें आहे. आतां या समाजांत या पुढें सर्रास मौंजीबंधनें होतील यांत शंका नाहीं. दोन शास्त्र्यांचीं गीतेवर प्रवचनें झालीं माघ व० १४ रोजीं ह. भ. प. नरहरशास्त्री खरशीकर यांनीं ' क्षत्रिय वैश्यांचे संस्कार वैदिक पद्धतीनें व्हावेत अशाबद्दल उपक्रम केला त्यावर वे. शा. सं. सरबाजी शास्त्री रिसोडकर या जुन्या पंडिताचें चातुर्वर्ण्यावर उत्कृष्ट प्रवचन झालें व कोमटी हे वैश्य आहेत त्यांचे संस्कार वैदिक पद्धतीनें होण्यास प्रत्यवाय नाहीं तसेंच क्षत्रियांचें बद्दलही सांगितलें जुन्यामताच्या पंडिताचें हें मत ऐकून समाज आनंदित झाला. त्यावर वे. शा. सं. दाघभटजी अयाचित यांनीं त्यांचाच अनुवाद करून पुष्टि दिली व खरशीकरांनीं उत्तम समारोप केला. त्याच दिवशी रात्रौ नरहरशास्त्री खरशीकर यांचे

अध्यक्षतेखालीं वैश्य समाजाची फार मोठी सभा भरली. अध्यक्षांनीं वैश्य समाजाचे गैरसमज दूर करून ते त्रैवर्णिक द्विज आहेत, त्यांनीं आपले संस्कार वैदिक पद्धतीनें करून संस्कृतिक दृष्ट्या व धर्मदृष्ट्या आपली व समाजाची उन्नति करून घेऊन जागतिक व्यापार धंद्यांतही नांव कमवावें व अत्यंत सचोटीनें, सत्यानें, धर्मनीतीनें राहून आपल्या समाजाचा उत्कर्ष करून घ्यावा व मोठमोठे धंदे आपलेसें करून एकमेकांत आदरभाव उत्पन्न व्हावा अशाबद्दल सुंदर बोधप्रद उपदेश केला, तो ऐकून वैश्य समाजास फार आनंद झाला या सभेंत कांहीं वैश्य मंडळींनीं पुनर्विवाहाचा प्रश्न उपस्थित केला होता पण अध्यक्षांचे युक्तिवादामुळें या प्रश्नास प्रचंड बहुमताचा विरोध होऊन या प्रश्नाची जरूरी तूर्त तरी वैश्य समाजास नाहीं असें ठरलें.

यज्ञ प्रसंगीं श्री. खरशीकर शास्त्री यांचीं फारच उद्बोधक, रसाळ भक्तिप्रेमानें रसरसलेलीं, उपदेशपर अशीं कीर्तनें झालीं. त्यांच्या कीर्तनाचा परिणाम फार उत्तम झाला आहे. त्यांच्या सारखे निष्काम व निस्पृह उपदेशक जास्त निर्माण होऊन धर्म व संस्कृति उत्कर्षाप्रत पोंचो अशी श्री नारायणाकडे प्रार्थना आहे. यानंतर खरशीकर हे नाशिककडून ते आपले घरीं रवाना झाले. ॐ तत्सत्

---


## मोरोपंत-चरित्र आणि काव्यविवेचन.

मोरोपंतांच्या चरित्रावर व काव्यविवेचनावर यांत २१ प्रकरणें असून हा ग्रंथ विद्वन्मान्य आहे. "जगाच्या वाङ्मयांत पहिल्या दुसऱ्या प्रतीचे जे विरल ग्रंथ आहेत, यांत याची गणना " इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केली आहे. आठ वर्षे पंतांच्या कवितेचा शोधपूर्वक अभ्यास करून व पंतांची हस्तलिखित कविता पाहून व त्यांची अस्सल पत्रें मिळवून हा ग्रंथ तयार केला आहे. प्रती थोड्या आहेत. पृ. सं. ६२५ किं. रु. २॥८

## श्रीएकनाथ चरित्र. (आवृत्ति चवथी)

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचा जन्म व बाळपण. ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या. १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर. इतक्या प्रकरणांत नाथांचे पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून 'स्तुतिसुमनांजलि' नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणें दिलीं आहेत. पृ. सं. २८८ किं. ८१२. पत्ताः व्यवस्थापक 'मुमुक्षु' नाशिक

# अरिस्टॉटल्चें
# ‘ मानवी-व्यवहाराचें तत्त्व-ज्ञान ’

लेखक—श्रीराम गोसावी, नाशिक.

### मागचा सारांश—

आपण आपल्या आयुष्यांत वेळोवेळीं जरी निरनिराळीं कार्यें भिन्न भिन्न हेतूनीं सकृद्दर्शनीं करीत असलों तरी आपल्या सर्व जीवनाचें कांहीं तरी एक कार्य आणि साध्य असतें. या जीविताच्या महासाध्यास जर ‘ सुख ’ असें आपण सर्व साधारण नांव दिलें तरी त्याच्या रुपाविषयीं एकदम आपणास निश्चिती करतां येत नाहीं. सुखप्राप्तीच्या नांवानेंच व्यवहारांत आपणास आयुष्याचें तीन पंथ दिसतात. पहिला स्वार्थसुखवाल्याचा, दुसरा कीर्तीच्या मागें लागलेल्यांचा व तिसरा तत्त्वज्ञान्यांचा

### संपत्तिवाल्यांचा पंथ

संपत्तीच्या मागें लागलेल्यांचा एक चवथा पंथ आपणांस आपल्या व्यवहारांत दिसतो. परंतु या पंथाला स्वतंत्र अस्तित्व देणें योग्य होणार नाहीं, हें आपण कबूल कराल. चकाकणारी सोन्याचीं नाणीं गोळा करून त्याकडे पाहण्यांत सुख मानणें ही कृपणाची विकृत मनोवृत्ति सोडून दिली तर सर्व साधारणतः संपत्तीचें अर्जन हें आयुष्यांतील दुसरीं सुखें मिळविण्यासाठीं असतें, असें आपणास दिसून येईल. इंद्रियसुखें, कीर्ति आणि तत्वचिंतन हीं सुखें ज्या अर्थी आहेत त्या अर्थीनें संपत्ति हें सुख नाहीं, किंबहुना असेंही दाखविता येईल कीं इंद्रियसुखें, कीर्ति इ० मिळविण्यासाठीं संपत्तीचें अर्जन मनुष्याकडून होतें. आतां दुसऱ्या वस्तूंच्या प्राप्तीचें साधन म्हणून जी वस्तु आपण स्वीकारतो तिची किंमत साध्य वस्तूहून अर्थातच कमी लेखणें अत्यावश्यक आहे.

### सुखाला साधनता नाहीं

पण हीच विचाराची दृष्टी आपण सुखाला लावली तर आपणांस असें दिसून येईल कीं इतर हरएक कार्यांचें व वस्तूंचें साध्य सुख होऊं शकेल पण सुखाचें साध्य काय म्हटलें तरं सुख हेंच त्याचे उत्तर द्यावें लागेल. मान, बुद्धिमत्ता, प्रभुत्व इ० गोष्टी पासून आपणास बाह्य लभ्यांश फारसा झाला नाहीं व त्यांच्यासाठींच जरी आपण त्या स्वीकारल्या तरी त्यांच्यापासून आपणास सुख होते म्हणून त्या आपणास हव्याशा वाटतात, असें त्यांच्या आवडीचें स्पष्टीकरण करतां येईल पण सुख कशासाठीं म्हणून विचारलें तर त्याला आपणास उत्तर देता

येणार नाहीं. याचा सारांश असा कीं इतर सर्व वस्तु व कार्यें यांना सुखाचीं साधनें म्हणून म्हणतां येईल पण अशी साधनरूपता सुखाला आपणास देतां येणार नाहीं.

### आत्मतृप्ती

सुखाप्रमाणेंच कोणी कोणी अंतीम साध्याच्या स्वरूपाचें दिग्दर्शन 'आत्म-तृप्ति' या शब्दानें करु इच्छितात. आतां आत्मतृप्ती या शब्दानें एकाद्या एकल कोंड्या मनुष्याच्या मनाचें समाधान येवढाच अर्थ आपणास समजतां येणार नाहीं. मनुष्याचें जीवन हें समाजजीवनाशीं अत्यंत निगडित असल्यानें मनुष्य जितक्या वस्तुंना आत्मवत् मानीत असेल त्या सर्वांचें समाधान 'आत्मतृप्ती' या शब्दानें आपणास अभिप्रेत समजले पाहिजे. एकाद्या कुटुंबवत्सल मनुष्याला आपल्या प्रिय मातापित्याला आणि कांता पुत्रांना जर समाधान देतां आलें नाहीं तर त्याला स्वतांचीं अशीं कांहीं दुःखें नसलीं तरी तें त्यास बरें वाटत नाहीं. स्वतां श्रीमंत व सर्व सुखसाधनांनीं समृद्ध असा मनुष्य असला पण तो जर अंतःकरणाचा देशभक्त असेल तर त्याला आपल्या देशाची विपन्नावस्था पाहवत नाहीं. पण आत्म्याची व्याप्ती अशा प्रकारें जर आपण अनियमित वाढविली तर त्याची तृप्ति ही आकाशांतील चांदोबाप्रमाणें आपणापासून नेहमीं शेकडों योजनें दूरच राहील. आत्म्याच्या व्याप्तीचा सविस्तर विचार आपण पुढें केव्हां तरी करूं, पण सध्या 'आत्मतृप्ती' या शब्दाला कांही तरी सार्थता यावी यासाठीं आपण त्याची तात्पुरती अशी व्याख्या करु या कीं, जिच्या योगानें जीवित हें आपणास श्लाघ्य वाटेल व मनाला कांहीं कमतरता वाटणार नाहीं ती आत्मतृप्ती समजावी. आता ही जर व्याख्या आपण आपल्या समोर ठेवली व सुखाचें रुप ती समोर ठेवलें तर त्या दोघांत फारशी भिन्नता आपणास आढळून येणार नाहीं. तेव्हां आत्मतृप्ती हा शब्द मात्र आपण निराळा योजला पण सुखानें दर्शित होणारी वस्तूच आपल्या डोळ्यापुढें होती हें आपणास कबूल करावें लागेल. तेव्हां इतर शब्दांच्या वावटळींत न सांपडतां 'सुख हेंच आपलें अंतिम साध्य आहे' हें मुकाट्यानें आपण धरून चालू या.

### सुखाचें स्वरूप शोधण्याचें साधन

आतां 'सुख हें आपलें अंतिम साध्य आहे' ही गोष्ट इतकी उघड व स्पष्ट आहे कीं त्या संबंधीं वाद माजविणें हें केवळ खोट्या पांडित्याचें प्रदर्शन करण्या-सारखें होईल. यापुढें जर कोणच्या एका गोष्टीचा विचार होणें अत्यावश्यक असेल तर 'सुखाचें निश्चित स्वरूप कोणतें' या मुद्यासंबंधी होय. या विश्वांत मनुष्याचें खरें कार्य कोणतें या प्रश्नाला जर आपणास व्यवस्थित उत्तर मिळवितां आलें तर

मला वाटतें त्याच्या सुखाच्या रूपाचाही तपास आपणास लवकर लागेल. कारण ज्याचें जें कार्य असतें त्यांतील प्राविण्य हा त्याचा उत्तम गुण असतो. त्याप्रमाणें मनुष्याचें कार्य जर आपणास सांपडलें तर त्या कार्यांतील तज्ज्ञता व प्रभुत्व हीं मनुष्याच्या सुखाचें रूप ठरेल. सुतार म्हटला कीं त्याच्या धंद्याची व त्यांतील कसबाची आपणापुढें कल्पना उभी राहतें, त्याप्रमाणे मनुष्य म्हटला तर माणुस--कीच्या दृष्टीनें आपणापुढें त्याचे कोणचें वैशिष्ट्य उभे राहतें हा प्रश्न मानवी सुखाचे स्वरूप ठरवितांना विचार करण्यासारखा आहे. इतके लांब कशाला, नेत्र म्हटलें कीं त्याचें दर्शनाचें कार्य, कान म्हटला कीं त्याचें श्रवण, हीं जशीं आपल्या मन–श्चक्षूपुढें उभीं राहतात त्याप्रमाणें माणुस म्हटला कीं त्याच्याकडे कोणतें कार्य नियतीनें दिलें आहे, याचा विचार आपणाला मनुष्य सुखाचे रूप ठरविण्यांत मदत करील असें मला वाटतें.

## मनुष्याचें मानव्य कशांत आहे?

आपल्यापुढे थोडक्यांत विचाराचा प्रश्न असा आहे कीं मनुष्याचे मानव्य कशांत आहे? नुसत्या जीवंतपणांत तें खास नाहीं. पशुपक्षी, कीटक जंतु, कींबहुना वनस्पती सुद्धां जीवंत असतात. मनुष्याचें वैशिष्ट्य केवल जीवनांत आपणास लेखतां येत नाहीं. तेव्हां पशुपक्षीवनस्पतींना समान असणारें शरीराचें भरण पोषण आपण सध्यां बाजूला ठेवू या, आहार मैथुनादि इंद्रियस्पर्श हेही आपणास त्याच कारणासाठीं विचाराबाहेर ठेवणें जरूर आहे. आतां राहता राहिले बुद्धीचें कार्य हें आपणा मनुष्यांत दोन प्रकारें चाललेलें दिसतें. एक विचार करून आज्ञा करण्याचे व दुसरें त्या आज्ञा शिरसावंद्य करून अमलात आणण्याचे. या दोहों पैकीं व्यावहारिक उपयुक्ततेच्या दृष्टीनें दुसरें कार्य अधिक महत्वाचे आहे. तें मनुष्याचे वैशिष्ट्य किंवा मानव्य हें बुद्धियुक्त आचारांत आहे असें आपण आतां म्हटले तर त्यात फारशी चूक होईल असें मला वाटत नाहीं. आतां वाजं--त्र्याचें काम वाजंत्री वाजविणें असें म्हटले तर चांगल्या वाजंत्र्याचें काम चांगली वाजत्री वाजविणे असे जसे होतें, त्याप्रमाणे बुद्धियुक्त आचार हें जर आपण मनुष्याचें वैशिष्ट्य ठरविले तर चांगल्या मनुष्याचें कार्य सद्बुद्धियुक्त सदाचार. आहे, हें आपोंआपच आले.

## सद्बुद्धियुक्त आचार हें मानव–कार्य

मानवाचें मानव्य त्याच्या बुद्धींत, उत्कृष्ट मनुष्याचें मनुष्यपण त्याच्या सद्-बुध्दींत तर सद्बुद्धीचे रुपांतर सदाचार या, परंपरेनें आपण विचार केला तर मनु-ष्याच्या आत्म्याचे कल्याण व त्याचें जीवित कार्य सद्बुद्धि प्रेरित सदाचारांत आहे, असें आपण पाहिलें. आपण मानवी जीवनाचा साकल्यानें विचार करण्यासाठीं

बसलो असल्यानें सद्‌बुद्धीच्या एका फेकीनें किंवा क्षणिक सत्कार्यानें मनुष्याच्या सर्व जन्माचें कल्याण होईल, अशी कल्पना करणें फारच मतिमंदपणाचें काम होईल. वायुच्या एका सुमंद लहरीनें वा एका आम्रवृक्षावरील डवरलेल्या मोहरानें वसंत ऋतु तयार होत नाहीं. मनुष्याचें सर्व जीवित सुखमय व प्रसाद पूर्ण करावयाचें झालें तर सद्‌बुद्धीचें कार्यही अखंडपणें आयुष्यभर चाललें पाहिजें. सद्‌बुद्धि जितकी स्थिर व तिचे कार्य जितकें पूर्ण त्याप्रमाणाने जीवित हें पूर्ण व सुखमय होईल.

## मानव ध्येय--कार्याचे परीक्षण

अशा प्रकारें आपल्या परमध्येयाची रुपरेषा आहे. ही रुपरेषा जेथें कमी असेल तेथें ती पुरी करण्याचा अधिकार प्रत्येकाचा आहे. आंतील रंग भरण्याचे काम हें तर ज्याच्या त्याच्या बुद्धीच्या कुवतीवर व अंतःकरणाच्या प्रगल्भतेवर अवलंबून असल्याने शास्त्रीय शोधाप्रमाणें या चित्रांत सौंदर्य ओतण्याचे काम सर्व भविष्यकालाचे आहे, आणि मागे सांगितल्याप्रमाणे गणिती काटेकोरपणा या बाबतींत करुन चालणार नाहीं, ही गोष्ट या शास्त्राच्या प्रत्येक विद्यार्थ्यांने नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे. सुताराला–ही सरळ रेषेच्या ज्ञानाची आवश्यकता असतें पण, त्यानें जर भूमितिशास्त्रज्ञा प्रमाणें सरळ रेषेविषयीं घासा घीस घातली तर लाकडावर रंधा फिरवून इमारती उभारण्याचें काम त्याचें हातून होणार नाहीं. त्याप्रमाणें आपलें चारित्र्य सुधारण्याचें प्रांतात प्रत्येक सत्कार्याविषयीं जर आपण शाब्दिक वाद माजवीत बसलों तर सद्‌बुद्धीचा विचार करतां करतां करताच कुबुद्धीचीं फळें आपणास चाखावी लागतील व त्यासारखें हास्यास्पद दुसरें कांहीं एक होणार नाहीं. विचार करतांना आपल्या बुद्धीचें समाधान खास झालें पाहिजे. पण प्रत्यक बाबतींत कार्य कारणभाव एकच प्रकारचा असतो असा दुराग्रह आपण धरून चालू नये. जेथें प्रत्यक्ष वस्तुस्थिती आपल्या डोळ्यापुढें दिसत असेल तेथें तिचें दिग्दर्शन झालें म्हणजे आपण पुरें समजले पाहिजे. जेथें शितावरून भाताची परीक्षा होण्यासारखी असेल तेथें सर्व साधारण सामान्य सिद्धांत करून आपण पुढें चाललें पाहिजे. त्याप्रमाणें पोकळ अनुमानाचे डोलारे उभारण्यांतही अर्थ नाहीं. एक अनुमान केले तर त्याचें प्रत्यंतर मिळाल्यास त्यावरील अनुमानाकडे आपण दृष्टी वळविली पाहिजे. कोठें आपणास सिद्धांतावरून वस्तुस्थितीचीं प्रत्यंतरें मिळनील तर, कोठें वस्तुस्थितीवरून सिद्धांताची कल्पना आपणास बांधावी लागेल व इतकेही करून त्याचा अनुभव येण्यास प्रत्यक्ष आचारांचेंच आपणास अवलंबन करावें लागेल. सारांश शास्त्रविचार झाला म्हणून सारासार–विवेक टाकून मुद्दाम आडरानांत शिरणें इष्ट व शहाणपणाचें होणार नाहीं. आता

आपण मानव सुखाचा जो आराखडा काढला. त्यांतील कांहीं कांहीं मुद्याचे परीक्षण करू या

## आत्मिक सुखाची श्रेष्ठता.

या जगांत आपणास सुख देणाऱ्या वस्तूकडे आपण पाहिले तर त्यांचे निरनिराळें प्रकार आपणास दिसतात, कांहीं सुखवस्तु अगदीं बाह्य स्वरुपाच्या असतात, कांहीं आपल्या शरीराला आनंद देतात, कांहीं मनाला रंजवितात, पण या सर्वांत आत्म्याला सुख देणाऱ्या गोष्टी फारच उदात्त रुपाच्या असतात. आपण मागें मनुष्याचें मानव्य जें बुद्धींत ठरविलें त्याच्याच शुद्ध स्वरूपाला या ठिकाणीं मी आत्मा म्हणत आहे, हें आपल्या ध्यानीं आलें असेल. शुद्ध आत्म्याचें कार्य व क्रिया हीं आपणास उदात्त प्रकारचें म्हणजें मनुष्याला शोभेल असें सुख देतील किंबहुना मानवी सुखाचा उगम त्याच्या आत्म्याच्या व शुद्धबुद्धीच्या ठायींच आपणास दिसेल असें मला वाटतें आणि या माझ्या विचाराला मागील अनेक तत्वज्ञान्याचा पाठिंबा आहे; असें आपल्यापैकीं ज्या कोणीं त्यांचे विचार वाचले असतील, त्यांना अवगत आहे. बुद्धीच्या सुविचाराशीं इंद्रियांनींहीं अर्थात् मुकाबला राखला पाहिजे व तो जितका जितका जास्त राखला जाईल तितकें तितकें आत्मिक सुख हें अधिक योग्यतेचें समजलें जाईल हें मागें मी म्हटलेंच आहे. आतां हे आत्मिक सुख प्राप्त करून घेण्यास निरनिराळ्या गोष्टींची आवश्यकता आहे हें या विषयावरील मतभेदावरून आपणास तावडतोब कळून येईल. कोणाच्या मते सद्गुण संपादनानें हें सुख प्राप्त होईल, असें आहे, तर व्यावहारिक शहाणपणा किंवा चातुर्य अंगी आल्यास तें मिळू शकेल, असें कित्येकांस वाटतें. कांहींस या विश्वाचे व अंतरात्म्याचे योग्य ज्ञान झाल्याशिवाय असें सुख मिळणार नाहीं असें वाटतें, तर या सर्व गोष्टी असल्याशिवाय आत्मिक सुख मिळणार नाहीं, असें कांहींचे ठाम मत आहे, व कांहींनीं तर बाह्य समृद्धीची सुद्धा आत्मिक सुखाला जरुरी आहे, असें म्हटलें आहे. आतां हे सर्वच मुद्दे एकदम चुकीचे कींवा एकदम पूर्णपणें बरोबर आहेत असें आपणास खास वाटणार नाहीं. प्रत्येकांत उघड उघड सत्याचा अंश आहे व जेथें जेथें एकएकट्यावर दुराग्रह आहे. तेथें तेथें असत्याचाही भाग आहे, असें आपणास विचारांतीं दिसून येईल.

## सद्गुणाचें रूप व योग्यता

सुखाची प्राप्ती ही सद्गुण संपादनांत आहे, असें म्हणणारांचा आपण आता विचार करूं या. सद्गुण म्हणजें एक प्रकारचा उत्कृष्टपणा अर्थांत तो ज्याच्या ठिकाणीं नियतपणें दिसतो त्यालाच त्याचें साद्गुण्य दिलें पाहिजें, बाचा

अर्थ सद्‌गुणानें दर्शित होणारी सत्कृति त्याच्या हातून नेहमी घडली पाहिजे. मनुष्य म्हणे फार प्रामाणिक आहे पण सारा दिवस झोंपून काढतो. आता हा प्रामाणिकपणा असून नपून सारखाच आहे. सद्‌गुण हा कृतींत उतरला तरच त्याची किंमत आहे. एकादे सद्‌गृहस्थ मोठे पेहेलवान व दणकट असलें पण कधींच आखाड्यांत उतरणारे नसले तर कुस्तीचें बक्षीस त्यांच्याकडे कसें जाईल? हीच गोष्ट इकडेही लागू आहे. सुखाचें पारितोषिक पाहिजे असेल तर हातून कृतीही योग्य व उत्तम पद्धतीनें झाली पाहिजे; व ती तशी होत गेली तर जीवित कसें सुखदायी होईल तें पहा. सुखाची भावना ही एक हृद्य संवेदना आहे. आणि प्रीतीच्या वस्तुलाभानें ती उद्‌भूत होते. ज्याला निसर्गाच्या देखाव्याची आवड आहे त्याला ते पाहतांना गोड संवेदना होऊं लागतात; त्याप्रमाणें जो न्यायप्रिय मनुष्य आहे तो न्याय्यपणें वागला म्हणजे त्याला आपोंआप सुख होतें. आतां सर्व साधारण लोक मिथ्यावस्तू विषयीं सुखभाव ठेवतात म्हणून प्रकृतीचा व त्यांचा फटका उडून त्यास सुखलाभ होत नाहीं. पण सद्‌गुणाची गोष्ट अशी नाहीं प्रत्येक उदात्त सद्‌गुणाचा निसर्ग नियमाशीं सहकार असल्यानें सद्‌गुणी मनुष्यास त्याचें सद्वर्तन सुखदायी होते. आणि हें सुख मेणाच्या नाकाप्रमाणें बाहेरून चिकटविलेलें व दर्शनी स्वरूपाचें नसते तर सद्‌गुणाच्या वस्तुस्वभावानें प्राप्त होणारें व अकृत्रिम असतें.

### दुःखी गुण हा सद्‌गुण नव्हे

सद्‌गुणी म्हणविणाऱ्या मनुष्याला सदाचारांत जर सुख वाटत नसेल तर तें वगुण्यच म्हटले पाहिजे. ज्या मनुष्याला चांगुलपणांत सुख नाहीं तो मनुष्य चांगला आहे असें आपणास म्हणता येणार नाहीं. न्यायानें वागताना ज्याला त्रास भासतो त्याला अन्याय सुखाचा वाटेल, म्हणजे तो न्यायी होऊ शकणार नाहीं. दान देतांना ज्याला दुःख होते तो उदार होऊ शकणार नाहीं. जरुर म्हणून व दुःखानें जो परमार्थ करतो तो खरा परमार्थी म्हणता येणार नाहीं. हीच गोष्ट इतर सर्व सद्‌गुणांना लागू आहे. सद्‌गुणांत आनंद वाटला पाहिजे तरच तो सद्‌गुण. जुलुम जबरस्तीच्या कृत्याला वा वृत्तिला सद्‌गुण म्हणणें शोभणार नाहीं.

### बाह्य समृध्दीचे सुखदायित्व

सुखाला सद्‌गुणानें उदात्तपणा येतो. परंतु यामुळें केवळ आंतरिक गुणावरच अशाप्रकारचें उदात्त सुख उपलब्ध होईल, असें आपल्याला मानता येणार नाहीं. उदात्त सत्कार्ये करण्यास बाह्य परिस्थिती जितकी समृद्धीची असेल तितकी ती सुखसंपादनाला साधनीभूत होईल, आणि म्हणून सुखप्राप्तीला बाह्य वैभवा–

चीही आवश्यकता आहे. संपत्ती, चांगल्या अंतःकरणाचें सहकारी, राजकीय व सामाजिक दर्जा ह्या गोष्टी चांगलीं कार्यें करण्यास पुष्कळ वेळा जरुर असतात, जरूर नसल्या तरी त्या मदत करितात ही गोष्ट पुष्कळास कबूल होईल किंबहुना असेहीं दाखवितां येईल कीं कोठें कोठें त्या नसल्या तर चांगल्या प्रकारचें सुखसंपादनाचें कार्य फार कठीण होऊन बसते. शूद्र योनीच्या मनुष्यास एकदम उच्चदर्जाच्या समाजांत शिरकाव मिळत नाहीं. अत्यंत विद्रूप मनुष्याला जीवंत सौंदर्याच्या सहवासाचा आनंद मिळविण्यास फार प्रयास पडतात, निर्धनाला बाह्य स्वास्थ्य ठेवतां ठेवता नाकीनऊ येतात. यावरून सद्‌गुणाचा जसा सुखाशीं संबंध आहे, त्याप्रमाणें बाह्य समृध्दीशीही आहे, असें आपणास दिसून येईल.

## सुख – संपादन ही कला आहे काय ?

येथें कोणीं कोणी असा प्रश्न उपस्थित करतात कीं सुखसंपादन ही एकादी कला आहे काय ? सुखसंपादनाची अशी जर एकादी कला किंवा विद्या असेल तर तिच्या अभ्यासानें व ज्ञानानें सुख प्राप्त होईल काय ? चांगल्या प्रकारच्या संवयी व शिस्ती जर पाळल्या तर सुख प्राप्तीची हमी आपण देऊ शकाल काय ? आणि तसें नसेल तर सुख ही एक परमेश्वराची देणगीच म्हणावी लागेल किंवा एकादी योगायोगाची गोष्ट मानावी लागेल ! या मतापैकीं दुसऱ्या भागाविषयीं बोलावयाचें झाल्यास, ज्या अर्थानें हें सर्व देवाचें कार्य आहे त्या अर्थीं सुखप्राप्ती ही सुद्धा त्याचीच करणी आहे असें म्हणता येईल. पण या दृष्टीनें विचार करण्यास आपण येथें बसलो नाहीं. आपली सुखलालसा आणि सुखप्राप्ती यांचा नियत कार्य कारण भाव आपल्या बुद्धीस अवगत झाला तर तो आपणास हवा आहे, आणि ही दृष्टी आसुरी आहे असें कोणीं म्हणणार नाहीं. कारण सद्‌गुण आणि सद्‌गुणाचे कार्य हे दैवी व उदात्त भावाचें आहे असा आपला विश्वास आहे. तेव्हां इतके दैवी प्रसादाविषयीं बोलून सुख प्राप्ती ही एक कला आहे या प्रश्नाकडे आपण वळूं या. कला ही एक ज्ञानाचा प्रकार आहे. किंबहुना नुसत्या बौद्धिक ज्ञानापेक्षा कलात्मक ज्ञान हें अधिक योग्यतेचें आहे कारण तेथें सर्व शक्तींचें सहकार्यानें होणारें संगीत निर्माण होतें; आणि अशा प्रकारचें सुंदर संगीत सुख नाहीं असें कोण म्हणेल ? आणि आपण आपल्या सुखाचें रूप ठरवितांना 'सद्‌बुद्धीचा सदाचार' असेंच शब्द वापरले आहेत. तेव्हां शरीर-मनबुद्धीचें वरील प्रकारचें संगीत आपणास पूर्वीच अभिप्रेत होते. तेव्हा सुख संपादन ही एक कला आहे, नियतीच्या ज्ञानानें, अभ्यासानें व योग्य संवयी लावल्यास सुखप्राप्ती होणें शक्य आहे, असे कोणी म्हटल्यास त्यांत पुष्कळ सत्य आहे, असें आपण कबूल

करणें जरूर आहे. आणि सर्व समाजाच्या सुखाकडे आपण बघितलें तर या कलेचें ज्ञान व शिक्षण समाजास व व्यक्तीस जितकें अधिक तितका सुखाच्या जवळ तो अधिक जाईल असें आपण विधान केलें तर तें फारसें धाडसाचें होणार नाहीं.

**ज्ञान, सद्गुण, कला, समृद्धि आणि सदाचार**

या वरून सुख संपादनाच्या बाबतीत नियतीच्या निर्बंधाचें ज्ञान व त्यांशीं योग्यपणें मुकाबला ठेवणारे जबाबदार गुण, त्या सद्गुणाचें सदाचारांत रूपांतर होण्यास लागणारी बाह्य समृद्धि व वागण्याची कला या सर्वांचा अति निकट संबंध आहे, असें आपण पाहिलें. कुत्र्या मांजरांना अशा प्रकारचें सुख प्राप्त करून घेणें शक्य नाहीं, त्याचप्रमाणे मूर्ख, पोरकट बुद्धि, व रंक यांना ही या आपल्या ध्येय सुखाचा आस्वाद मिळणार नाहीं.

---

## निबंधमाला-तिचें स्वरूप आणि कार्य

कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांची निबंधमाला सुप्रसिद्धच आहे. शास्त्रीबोवा मराठी भाषेचे गद्याचार्य आहेत. मालेचे मूळ ७२ अंक प्रयासानें मिळवून निबंध-मालेवर ६४ पानांचा एक टीकापर निबंध शके १८२६ मध्यें 'सरस्वतीमंदिर मासिकांत रा० पांगारकर यांनीं लिहून प्रसिद्ध केला होता. तोच पुन्हा स्वतंत्र पुस्तकरूपानें छापला आहे. शास्त्रीबोवांचें संक्षिप्त चरित्र व नवीन अवतरणें जास्त दिलीं आहेत. निबंधमालेचा हेतु, मालेंतील मुख्य व अवांतर विषय, मालेचे गुण-दोष यांचें सविस्तर विवेचन यांत निर्भीडपणानें केलें आहे, किं. ८१० आणे.

## ६ कवीवर्य मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन )

ह्या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजाचे नातु मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरी भारतांतील विशेष गुणः सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस, शृंगाररस इ० कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचित्रें कुस्त्यांचीं वर्णनें, त्यांच्या वेळची पाकसिद्धी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. 'मुक्तेश्वर नीतिरत्नमाला' ही शेवटी जोडली आहे. पृ. सं १४४ किं. रु. १

---

# रा. वाटव्यांचा प्रश्न आणि ज्ञानेश्वरांचें उत्तर

लेखकः श्रीराम गोसावी, नाशीक.

—×—

मुमुक्षूच्या मार्चच्या अंकांत रा. वाटवे यांनीं आपल्या 'श्रीकृष्णाचें चरित्र दर्शन' या लेखांत एक विचार करण्यासारखा प्रश्न उपस्थित केला आहे; व त्या प्रश्नासंबंधीं रा. वाटवे यांनीं जो आपला म्हणून निवाडा दिला आहे, त्याविरुद्ध मुमुक्षूचे संपादक रा. पांगारकर यांनीं आपली एक छोटीशी टीप दिली आहे. पण रा. वाटवे यांच्या प्रश्नाला उत्तर म्हणून ती अपुरी वाटल्यावरून व ती पुरी करण्यास सध्या त्यांना सवड नसल्यामुळें, दुसऱ्या कोणी या प्रश्नाचा विचार केल्यास त्यांना तो हवा आहे असें रा. पांगारकर यांनीं आपल्या टीपेच्या शेवटीं म्हटले आहे.

### रा. वाटवे यांचा प्रश्न

रा. वाटवे यांचा प्रश्न भागवतांतील कंसाच्या मुक्तीविषयी आहे. श्रीकृष्णानीं त्यास ठार मारल्यावर 'तदेव रूपं दुरवावापमाप' म्हणजे तेंच भगवंताचें दुर्लभ असें सारूप्य त्यास प्राप्त झालें, हें भागवतकारांचे म्हणणें रा. वाटवे यांना कबूल नाहीं. रा. वाटवे यांचे म्हणणें असें कीं कंस हा जर दुष्ट, दुष्कृती, नीच असा होता, अहंकार बलदर्प क्रोध यांनीं युक्त असा एक अधम राक्षस होता, तर त्याला वशिष्ट याज्ञवल्क्याचे, पराशर पुंडरीकाचे स्थान मृत्यूनंतर मिळावें यांत जरा परमेश्वराच्या बाजूनें अन्याय दिसतो. सुष्टाला जी गती तीच जर दुष्टाला मिळू लागली तर पापपुण्याला कांहीं अर्थ उरला नाहीं, असेच होईल. जर दुष्कृती मूढ नराधम, तपस्वी ज्ञानी भगवद्भक्तांच्या पंक्तीला येऊन वसू लागले तर तप, ज्ञान, भजन हें निरर्थकच समजले पाहिजे.

### रा. वाटवे यांचा पुरावा.

तेव्हां सुष्टाला आणि दुष्टाला एक गति हें इष्ट व न्याय्य नसल्यामुळें 'तदेव रूपं दुरवापमाप' हें भागवतकारांचें म्हणणें खरें मानणें योग्य नाहीं, असा रा. वाटवे यांच्या म्हणण्याचा आशय आहे व त्यासाठीं प्रत्यक्ष श्रीकृष्णाची गीतेंतील वचनें त्यांनीं पुराव्यादाखल दिलीं आहेत. तीं अशीं:—

न मां दुष्कृतिनो मूढा प्रपद्यंते नराधमाः
माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः
अहंकार बलं दर्पं कामं क्रोधंच संश्रिताः
मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तो ऽभ्यसूयकाः

तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान्
क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु
आसुरीं योनिमापन्ना मूढ जन्मनि जन्मनि
मामप्राप्यैव कौंतेय ततो यान्त्यधमां गतिम्
अध्याय १६

वरील गीताश्लोकांत वर्णन केल्याप्रमाणेंच कंस हा एक नराधम मनुष्य होता तेव्हां भगवंतानीं स्वतांच म्हटल्याप्रमाणे अशुभ अशा आसुरी योनीमध्येंच त्याला देवांनी टाकला असला पाहिजे, भगवंताच्या रूपाची त्याला प्राप्ती न होता अधम अशा योनीमध्येंच कंसाचा जीवात्मा खितपत पडला असला पाहिजे, असा रा. वाटवे यांच्या म्हणण्याचा निष्कर्श आहे.

## विरोध भक्तीचे थोतांड

याबर कंसानें भगवंतावर शत्रुत्वानें प्रेमच केले तो एक देवाचा विरोधी भक्त होता! असें जे कोठें म्हटलें जातें, तेही रा. वाटवे याना कबूल नाहीं. इतकें परस्पर विरोधी बोलणें उचित नाहीं. काळ्यारंगाच्या रूपानें मी पांढरा रंग देत आहे; पापाच्या रुपानें मी पुण्य करीत आहे, मूर्खाच्या रूपानें मी शहाणा आहे, हें म्हणणें जितके शोभेल तितकेंच शत्रुत्वानें कंसानें देवावर प्रेम केलें हें म्हणणें शोभेल, असा रा. वाटवे यांच्या म्हणण्याचा आशय आहे.

## रा. वाटवे विरुद्ध शुकाचार्य, द्रोणाचार्य ज्ञानेश्वर. इ.

येथपर्यंत मी रा. वाटवे यांच्या म्हणण्याचा आशय दिला. कंसाच्या मुक्ती-बाबत त्यांनीं फक्त बुद्धिवाद केला आहे. श्रीकृष्णाच्या तोंडचा एक सामान्य सिद्धान्त सांगून त्याशीं कंसाची केस जुळतें असें फक्त त्यांनीं दुरुन दर्शविलें आहे. त्या सिद्धांताप्रमाणें कंसाची गति झाली असली पाहिजे असें त्यांचें अनुमान आहे. वस्तुस्थितीचा पुरावा त्यांचेपाशीं नाहीं. गीतेच्या सोळाव्या अध्यायाचे जे चार श्लोक त्यांनी उध्दृत केले आहेत त्याच्या पुढें “ अर्जुना, कंस असाच दुष्कृती मढ नराधम पुरुष होता आणि त्याला मी अशुभ अशा आसुरी योनींत टाकले ” अशा अर्थाचा जर एक श्लोक रा. वाटवे हें गीतेंतून काढून दाखवू शकते, तर त्यांची बाजू फारच बिनतोड झाली असती. किंवा कुठल्या तरी अशुभ योनींत खितपत पडणाऱ्या कंसाच्या जीवात्म्यास ते पकडून देते तरी रा. वाटव्यांनीं सर्वांना निरुत्तर केलें असते. पण असे जो पर्यंत रा. वाटवे करूं शकत नाहींत तो पर्यंत या बाबतींत अधिकृत लेखकांच्या म्हणण्यावरच विश्वास ठेवणें इष्ट आहे. आणि दुर्दैवानें असे सर्व अधिकारी लोक रा. वाटवे यांच्या विरुद्ध आहेत. कंसाच्या मृत्यूनंतरच्या गती संबंधानें या विषयांत तज्ज्ञ असणाऱ्या लोकांचीं मते अशीं आहेत!

१ कृष्ण चरित्रकार शुकाचार्य म्हणतात;

तदेवरूपं दुरवापमाप

२ कृष्णाचें समकालीन व अर्जुनाचे धनुर्विद्या गुरु द्रोणाचार्य या बाबतींत म्हणतात.

ये ये हताश्वक्रधरेण राजन्
त्रैलोक्यनाथेन जनार्दनेन
ते ते गता विष्णुपुरीं प्रयाता
क्रोधोऽपि देवस्य वरेण तुल्यः

३ गीतेचे पहिल्या प्रतीचे टीकाकार श्री ज्ञानेश्वर यांचे या-बाबतींत असें म्हणणें आहे.

हेंचि कवणे एकें मिसें । चित्त माझे ठायीं प्रवेशे
येतुले हो मग आपैसे । मीचि होणें असे
अगा वरी फोडावयालागी । लोहो मिळो कां परिसाचे आंगीं
कां जे मिळतीया प्रसंगीं । सोनेंचि होईल
पाहे पा वल्लभाचेनि व्याजें । तिया व्रजांगनांची निजें
मज मीनलीया काय माझें । स्वरुप नव्हती
ना तरी भयाचेनि मिसे । माते न पविजेचि काय कंसे
कीं अखंड वैरवशे । चैद्यादिकीं
अगा सोयरेपणेंचि पांडवा । माझें सायुज्य यादवा
मी ममत्वें वसुदेवा । दिकां सकळा
नारदा ध्रुवा अक्रूरा । शुका हन सनत्कुमारा
इयां भक्ति मी धनुर्धरा । प्राप्य जैसा
तैसाचि गोपिकांसि कामें । तया कंसाभय संभ्रमें
येरा घातकां मनोधर्में । शिशुपालादिकां

४ भगवद्भक्त तुकाराम महाराज या बाबतींत असें म्हणतात.

मुक्त केला मामा कंस महादोषी । बाळहत्या राशी पातकांच्या
पाप कोठे राहे हरी आठवीता । भक्तिद्वेषें चिंता जैसा तैसा

× × ×

उच्चारितां नाम कंस वैरभावें । हरोनिया जीवें कृष्ण केला
कृष्णरूप त्यासी दिसे अवघे जन । पाहे तो आपण कृष्ण झाला

× × ×

द्वेषाचिया ध्यानें हरिरुप झालें । भावहरपले देहादिक
जीवभाव त्याचा गेला अभिमान । म्हणवूनी जन हासे कंसा
सावध करितां नये देहावरी । देखोनिया दूरी पळे जन
जनवन हरी झालासे आपण । मग हे लोचन झांकियेले
बोलायासी दुजे नाहीं हें उरलें । जनकृष्ण झालें स्वयें रुप
रूप पालटले गुण नामयाती । तुका म्हणे मूर्ती देव झाला

५ मोरोपंत कवि या बाबतींत असें म्हणतात.

असंख्य खळसंगरी निजकरीं तुवां मारिलें ।
न निष्ठुरपणें, कृपा करुनि ते भवीं तारिलें ।

## रा. वाटवे यांची चूक

कंसाच्या मुक्ती संबंधानें इतक्या अधिकारी लोकांनीं ठामपणें मत दिलें असता ती गोष्ट खरी मानणें किंवा खरी धरून चालणें आस्तिक्याच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे. वर दिलेल्या वचनात ओढून ताणून, अनुमानानें वा कल्पना म्हणून कंसाची मुक्ति खास सांगितली नाहीं, हें रा. वाटवे हेही स्वतां कबूल करतील अशी मला आशा आहे. असें असतां ' कंसाला सद्गति मिळाली नसली पाहिजे. भगवद्वेषामुळें कंस इहलोक व परलोक या दोहोंनाहीं मुकला ' अशा अनुमानाच्या गोष्टी रा. वाटवे यांनीं काढल्या व नुसत्या श्रीकृष्णाच्या एका सामान्य सिद्धांतावरून कंसाच्या मुक्तीची विशिष्ट गोष्ट खोटी असली पाहिजे, अशी कल्पना लढविली ही माझ्या मतें रा. वाटवे यांनीं चूक केली. आधीं एक सामान्य सिद्धान्त खरा धरून चालावयाचा व त्याशीं एक वस्तुस्थिती जुळत नाहीं म्हणून ती वस्तुस्थिती व खोटी ठरवावयाची हा तर्कशुद्धपणा नव्हे. इंग्रज माणसें गोरी असतात, हेन्री हा गोरा नाहीं, म्हणून तो इंग्रज नाहीं; हिंदुस्थानची माणसें सामान्यतः पन्नास वर्षेपर्यंत जगतात, टिळक हे पासष्ठवर्षे पर्यंत जगलें म्हणून ते हिंदुस्थानातलें नव्हते किंवा ते पन्नासाव्यावर्षीच मेले असले पाहिजेत या अनुमानपद्धतींत जी चूक आहे तशाच प्रकारची चूक रा. वाटवे यांची झाली आहे. अशा बाबतींत खऱ्या विचाराची दिशा ही नेहमीं वस्तुस्थितीवरून सिध्दांताकडे असली पाहिजे, सिद्धांतावरून वस्तुस्थिती ठरविण्यांत चूकीचा संभव फार असतो. रा. वाटवे यांनीं कंसाची मुक्ती ही ऐतिहासिक वस्तुस्थिती धरून श्रीकृष्णानीं सोळाव्या अध्यायांत केलेल्या सामान्य सिद्धांताशीं ती विरोधी आहे असें म्हटलें असतें तर त्यांची अशी व इतकी चूक झाली नसती.

**ज्ञानेश्वरांच्या मताचा विस्तार.**

कंसाची मुक्ति गीतेतील सोळाव्या अध्यायांत श्रीकृष्णानीं केलेल्या सामान्य सिद्धांताशी जुळत नाहीं हे उघड उघड स्पष्ट आहे. आणि ज्ञानदेवांनींही आपल्या गीतेच्या टीकेत कंसाची मुक्ती सांगितली आहे, ती सोळाव्या अध्यायांत नसून नवव्या आध्यायांत आहे. ज्या गीताश्लोकावर कंसाची मुक्ति ज्ञानदेवांनीं उदाहरणादाखल वर्णिली आहे, तो गीता श्लोक असा आहे.

> मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः
> स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्

पापयोनि स्त्रिया वैश्य शूद्र हे सुद्धां परा गतीला जातात असे श्रीकृष्ण देवांनीं या श्लोकांत सांगितलें असून त्याला हेतु स्वतांचा आश्रय दिला आहे. आतां हा आश्रय अमूक एक प्रकारचाच असला पाहिजे असें 'आश्रया'चें विशिष्टीकरण देवांनीं या ठिकाणीं केलें नाहीं हें लक्षांत घेण्यासारखे आहे म्हणून ज्ञानेश्वरांनीं या आश्रयाचें प्रथम उदात्तरुप निष्काम भक्ति हें सांगितल्या-वर पुढें लिहिलें आहे.

> म्हणोनि कुळ जातिवर्ण । हे आघवेचि गा अकारण
> एथ अर्जुना माझेपण । सार्थक असे
> तेंचि भलतेणें भावे । मन मज आंत येतु होवावें
> आले तरी आघवें । मागील वावो
> जैसें तंवचि वहाळ वोहळ । जंव न पवती गंगाजळ
> मग होऊनी ठाकिती केवळ । गंगारूप
> कां खैर चंदन काष्ठे । हे विवंचना तंवचि घटे
> जंव न घापती एकवटे । अग्नीमाजी
> तंववरी नदनदीची नावें । तंवचि पूर्वपश्चिमेचे गावे
> जंव न येति आघवे । समुद्रामाजी
> हेंचि कवणें एकें मिसें । चित्त माझेठायीं प्रवेशे
> येतुले हो मग आपैसे । मी चि होणें असें
> अगा वरी फोडावयालागीं । लोहो मिळो कां परिसाचे आंगीं
> कां जें मिळतिया प्रसगीं । सोनेचि होईल
> पाहे पां वल्लभाचेनि व्याजें । तिया व्रजांगनांचीं निजें
> मज मीनलीया काय माझें । स्वरूप नव्हती
> नातरी भयाचेनि मिसें । मातें न पविजेचि काय कंसें
> कीं अखंड वैर वशें । चैद्यादिकीं

अगा सोयरेपणेचि पांडवा । माझें सायुज्य यादवा
कीं ममत्वें वसुदेवा । दिकां सकळां
नारदा ध्रुवा अक्रूरा । शुका हन सनत्कुमारा
इयां भक्ति मी धनुर्धरा । प्राप्य जैसा
तैसाचि गोपिकासी कामें । तया कंसा भयसंभ्रमें
येरां घातकां मनोधर्मे ।शिशुपालादिकां
अगा मी एकलाणीचें खागें । मज येवो ये भलतेनि मार्गें
भक्ति कां विषयविरागें । अथवा वैरें
म्हणोनि पार्था पाहीं । प्रवेशावया माझ्या ठायीं
उपायांचीं नाहीं । वाणी येथ
आणि भलतिया जाति जन्मावें । मग भजिजे कां विरोधावें
परि भक्ता कां वैरिया व्हावें । माझियाचीं
अगा कवणें एकें बोलें । माझेपण जरी झालें
तरी मी होणें आलें । हातां निरुतें

ज्ञानेश्वरांचे हें लिहिणें इतकें सरळ स्वच्छ व समर्पक आहे कीं त्यावर मी भाष्य करण्याची जरूर नाहीं. रा. वाटवे यांनीं काढलेल्या मुद्याला वरील ओव्यांत जर ते समाधानकारक उत्तर पाहूं शकत नसतील तर त्यांना दुराग्रही म्हणावे लागेल. श्रीमद् शंकराचार्यांनींसुद्धां या श्लोकावर टीका करतांना ' मां व्यपाश्रित्य' याचा अर्थ नुसता ' मां आश्रयत्वेन गृहीत्वा ' असाच केला आहे. भक्तियुक्त आश्रयत्व किंवा ज्ञानयुक्त आश्रयत्व असा विशेष जोडून त्याचा व्यापक-पणा कमी केला नाहीं. आश्रयत्वाची बहुतेक सर्व रूपें वर ज्ञानेश्वरांच्या ओव्यांत आलींच आहेत.

## विरोध भक्तीच्या गूढाचा उलगडा

त्याच प्रमाणें विरोधभक्तीविरुद्ध जें रा. वाटवे यांनीं लिहिलें आहे तशा अर्थानें ' विरोधभक्ती' ज्ञानेश्वर तुकाराम घेत नाहींत हें रा. वाटवे यांस वरील श्लोकावरून व ओव्यावरून दिसून येईल. लाकूड बाभळीचें कीं चंदनाचे हें न बघता, ' आश्रय ' झाला कीं अग्नीरूप करणें हे जसें अग्नीचें वस्तुसामर्थ्य आहे त्या प्रमाणें कंसाच्या द्वेषाचा ' आश्रय' श्रीहरी होता या एका कारणानेंच तो मृत्यूनंतर हरीरूप झाला हें श्रीहरीच्या आश्रयाचें वस्तुसामर्थ्य आहे. तुमच्या आमच्या आश्रयाचे असें सामर्थ्य नाहीं म्हणून तसें देवाचेंहीं नाहीं असे वाटणें हा आपल्या मानवीबुद्धीचा कोतेपणा आहे. आपल्या बुद्धिच्या टप्यांत न येणाऱ्या पुष्कळ गोष्टी या विश्वांत आहेत.

# श्रीकृष्णाचें चारित्र दर्शन.

लेखकः—ना. श्री. वाटवे D. C. T. C. D. F. C. ( London )

## प्रकारण १३ वें

### श्रीकृष्ण अप्तांची तरतूज करतात.

श्रीकृष्णांना दिरंगाईची वर्तणूक खपत नसे व ते स्वतां तर कोणत्याही कामांत केव्हांच दिरंगाई करीत नसत. ह्या त्यांच्या संवयीनुरूप त्यांनीं कंसाला तडकाफडकीं मारून टाकला. परंतु त्यांनीं कंसाला मारला तो स्वतांच्या सुखा-साठीं मारला नव्हता त्यांनींच सांगितल्याप्रमाणें कंसाला भगवंतांनीं 'वधिला न राज्य कामानें' तर मग त्याला मारला तरी कशाला? तर ते सांगतात, 'लोकहि-तार्थ यशोर्थ स्वकुळाचा काळ मारिला कंस' म्हणजे त्यांनीं कंसाला 'यज्ञार्थ' म्हणजे परोपकारासाठीं मारला व 'यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः' म्हणजे अशा रितीनें निव्वळ परोपकारासाठीं केलेलीं हिंस्र कर्म सुद्धा कर्त्याला बंधक होत नाहींत या त्यांच्या वचनानुरूप श्रीकृष्णांना कंसासारख्या अगदीं जवळच्या आप्ताला मारल्यानें सुद्धां दोष लागत नाहीं. कारण स्वतांच आप्तपणा सोडून देऊन जो प्राणघातक शत्रू बनला त्याला

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्'

म्हणजे शत्रूशीं शत्रूसारखेंच वागलें पाहिजे या न्यायानें श्रीकृष्णांनीं आप्त म्हण-ण्याचें कांहींच कारण नव्हतें.

श्रीकृष्णांनीं हें कृत्य खरोखरच यज्ञार्थ केलें होतें कीं नाहीं याचें ही प्रत्यंतर त्यांनीं तावडतोब आणून दिलें. तें असें कीं उग्रसेन आग्रहानें कंसाचें राज्य स्वीकारण्याची श्रीकृष्णांना विनंती करीत असतांहीं त्यांनीं तें परत उग्रसेनाचें उग्रसेनालाच देऊन टाकलें. व

नमे पार्थाऽस्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यम् ॥ ३।२९ ॥

म्हणजे ह्या स्वर्गमृत्युपाताळरूपी तीन्हीं लोकांत मला स्वतांसाठीं असें कांहींच करावयाचें नाहीं किंवा कांहीं मिळावावयाचें शिल्लक नाहीं कीं ज्या साठीं मीं एवढा तीन्ही लोक चालविण्याचा खटाटोप करावा; हें आपलें वचन खरें केलें. तसेंच उग्रसेनालाही पर्यायानें असें दर्शविलें कीं कंसाला वगैरे मारण्यानिमित्त केलेलीं 'न मां लिंपन्ति कर्माणि' म्हणजे कर्में मला बंधन कारक होत नाहींत. कारण 'न मे कर्म फले स्पृहा' म्हणजे त्या कर्मांचें फळ मला नको आहे.

व आपल्या

विहाय कामान् यः सर्वान्पुमांश्चरति निस्पृहः ॥
निर्ममोनिरहंकारः स शान्तिमधिगच्छति ॥ २।७१ ॥

म्हणजे जो मनामध्यें विषयोपभोगेच्छांचा उदय होऊं न देतां निरिच्छपणानें वागून ते भोग जवळ करीत नाहीं व निरहंकार वृत्तीनें वागतो त्यालाच मनः शांतीचा लाभ होतो ' या वचनाचा प्रत्यय त्यांनीं जगालाही आणून दिला. तो कसा तो पाहा श्रीकृष्णांनीं तें राज्य स्वीकारलें असतें कीं लोक म्हणणार होते कीं यांनीं राज्य लोभानें मामाला नाहक मारला व आपण राज्य बळकावलें, कदाचित् बलराम व श्रीकृष्ण यांच्यांत आपसांत द्वेषही पण उत्पन्न झाला असता आतां हा द्वेष वसुदेवाला राजा करून उत्पन्नच मुळीं न होऊं देतां आला असता. परंतु याच्या संबंधींचा राज्य लोभानें राजहत्या केल्याचा जनापवाद तसाच कायम राहणार होता. शिवाय राज्य रक्षणाची व व्यवस्थितपणें चालविण्याची जबाबदारी पण त्यांच्यावरच येऊन पडणार होती. हें सर्व म्हणजे ते योग्य रितीनें करते नसते, असें नव्हे, परंतु त्यांना स्वस्थता लाभली नसती. तसेंच कंसाच्या वडिलांचा मान करून त्यानाच राज्य अर्पण केल्यामुळें सर्व प्रजाजनांची श्रीकृष्णांवर जशी भक्ती बसली व प्रेम जडलें तसें त्यांनीं राज्याचा स्वीकार केला असता तर झालें नसतें. परंतु हें सर्व ते निरिच्छ होते म्हणून घडलें हें विसरतां कामा नये ! त्यांची निरहंकार वृत्तीही त्यांच्या अभिवृद्धीला फारच उपयोगीं पडली. त्यांचें माता पितरांशीं उग्रसेनाशीं व शेवटीं नंदाला निरोप देतांना त्याच्याशीं झालेलें भाषण अत्यंत निगर्वीपणाचें नव्हतें असें कोण म्हणेल? गुरुजनांचा मान तर त्यांनींच करावा ! एवढ्या लहानपणीं व पूर्ण विजय मिळाला असतांही त्यांच्या मतीला विकार झाला नाहीं म्हणूनच अर्जुनाला त्यांचा निष्काम कर्म योगाचा उपदेश निमूटपणें ऐकावा लागला. त्यांच्या शद्बाला कृतीचें भरभक्कम पाठबळ होतें.

त्यांची ऋजुता, त्यांची अनुद्वेगकर सत्य, प्रिय, व हितकर भाषण करण्याची शैली, त्यांच्या मनाची प्रसन्नता, त्यांचें सौम्यत्व त्यांचा मनोनिग्रह त्यांचा शुद्ध व सरळ स्वभाव हे कोणाला बरें मोह पाडणार नाहींत ! सर्व लहान सहान व थोर मंडळी त्यांच्या ह्या अलौकिक नैसर्गिक गुणांमुळें त्यांच्यावर नेहमीं खुष राहत असे, व त्यांचें वचन शिरसा वंद्य करीत असे. ह्या त्यांच्या गुणामुळें थोडक्याच काळांत मथुरेच्या सर्व प्रजाजनांचे ते जीव कीं प्राण होऊन राहिले. व त्यांनीं श्रीकृष्णांना पुढें जरासंधाशीं लढण्याच्या कामीं चांगलीच मदत केली. श्रीकृष्णांनींही त्यांचे हे उपकार स्मरून, व

' गतिर्भर्ता प्रभुःसाक्षी निवासः शरणं सुहृत् '

इत्यादि त्यांचीं सर्व नातीं स्वतांकडे लागू करून घेऊन त्यांचें यथायोग्य रक्षण केलें; व पुढें द्वारका निर्माण करून त्या सर्वांना तेथें नेलें.

उग्रसेन राज्यकारभार पाहूं लागून हळुहळू सर्वत्र स्थिरस्थावर झालेंसें, पाहून वसुदेवानें रामकृष्णांचा व्रतबंध करवून त्यांना सांदीपनी नांवाच्या एका विद्वान् शिक्षकाच्या हवालीं केलें. तेही गुरुजींची मर्जी सांभाळून विद्याभ्यास करूं लागले. अवघ्या चौसष्ट दिवसांत ते वेद. उपनिषदे, सरहस्य धनुर्वेद, धर्मशास्त्र, न्यायशास्त्र, तर्कशास्त्र व राजनीति हीं सर्व शिकून पार झाले. त्यांची अशी लोक विलक्षण बुद्धिमत्ता पाहून गुरुजी अगदीं खूष व थक्क होऊन गेले. गुरुजींनीं ताडलें कीं हे परमेश्वर आहेत; इतर कोणी नव्हत. म्हणून गुरुजी ह्यांना आपली यत्किंचित्ही सेवा अगदींच सांगत नसत. परंतु भगवंतांना हें न आवडून शिष्यांनीं गुरुगृहीं पडेल तें काम विनूतक्रार केलेंच पाहिजे या प्रकारची रीत पाडून लोकसंग्रह करण्याची भगवान् संधी पाहात होते. परंतु गुरुजी अशी संधी त्यांना मिळं देईनात. शेवटीं एकदांची त्यांना ती मिळाली. एक दिवशीं घरांत लाकडें नसल्यामुळें गुरुपत्नीनें शिष्यांना लाकडें आणण्यास सांगितली. सुदामा नांवाचा एक ब्राह्मणाचा मुलगाही गुरुगृहीं पूर्वींपासूनच होता. त्याच्याशीं त्याच्या पूर्वपुण्याईनें रामकृष्णांची मैत्री जडली होती. ह्या सुदाम्याला बरोबर घेऊन रामकृष्ण रानांत लांकडें आणण्यासाठीं गेले. गुरुजी त्या वेळीं घरीं नव्हते.

हें शिष्यत्रय रानांत जायला आणि पाऊस पडायला सुरवात झाली. हळुहळू मेघांनीं चारी दिशागच्च केल्या व मुसळधार पाऊस पडूं लागला. इतक्यांत सूर्यही मावळून रात्र पडली. मग काय विचारता? पाऊस तर मीं म्हणतो. रात्र तर डोळयांत बोटी घातली तरी दिसूं नये अशा प्रकारची काळोखी पडलेली, मेघगर्जनेचे घडघडाट व विजांचे कडकडाट चालूच असलेले अशा वेळी आमची ही शिष्य त्रयांची जोडी डोक्यावर लांकडांचे भारे घेऊन व एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून चालली होती मधुन मधून लकलके, तेवढ्या प्रकाशावर आपलें काम भागवीत. हें शिष्य मंडळ आपला मार्ग काढीत काढीत चाललें होतें. इतक्यांत त्यांना गुरुजींची आरोळी ऐकूं आली. शिष्यानीं प्रत्युत्तर दिलें. थोड्याच वेळांत गुरुशिष्य भेटले गुरुजींना शिष्याना अशा तऱ्हेचा क्लेश सहन करावा लागलेला पाहून फारच कळवळा आला.

ते त्यांना म्हणाले,

दमलां किती, अहो! हे पुत्रकहो! अस्मदर्थ या गहनीं।
दहनीं मृग-शावकसे, श्रमला दुःसहमहा विपत्सहनीं ॥१॥
प्राण्यास प्रिय परम स्ववपु; तुम्हीं तेंहि मानिलें तुच्छ।

मत्त्र काष्ठभारहि पुर सुमनाचेचि भाविले गुच्छ ॥ २ ॥
तुमचें मन गुरु भजनीं निपटचि लंपट तुम्हींच गुरुलुटिला ।
उठिला अंतःकरणादर्शी, भला लाभ हा नसे कुटिला ॥ ३ ॥
धर्माद्यखिलपुंमर्थ प्राप्तीचें मुख्य मूळ हें देह ।
स्नेह त्यागुनि गुरुच्या पपापद्मीं अर्पिलें असंदेह ॥ ४ ॥
हाचि प्रत्युपकार प्रेमें करिती असाच सच्छात्र ।
पात्र ज्ञाना होती, तेचि गुरु, द्वैत धरि मृषा गात्र ॥ ५ ॥
मीं सुप्रसन्न झालों, द्विजवर हो! जीं तुम्हां दिलीं छंदें ।
ती अप्रनष्ट सारें इहपरलोकीं स्फुरोत ह्र्छंदें ॥ ६ ॥
कर्मीं वसा, नसो पर मर्मीं लोचन, असा दया धर्मीं ।
नर्मीं ही मृषोक्ति न यो, शर्मीं नांदा, शिराक्षमा वर्मीं ॥ ७ ॥
मीं बहुन प्रगट जगीं, व्हाल तुम्हीं सर्ववंद्य, न ख्यात ।
तात क्षीरधि, परि हर चूडारूढ प्रसिद्ध तज्जात ॥ ८ ॥

गुरु असें बोलत बोलत पुढें चालूं लागले व शिष्य त्यांच्या मागोमाग जाऊं लागले. शेवटीं एकदांचे सुखरूपपणें ते घरीं आले.

घरीं येतांच गुरूंनीं शिष्यांना अंग वगैरे चांगलें पुसून माळशेणींची राख आपापल्या आंगास खूब चोळावयास सांगितली.

एकदां झालें तें झालें; पुन्हा यांच्या कडून अशी सेवा घ्यावी लागूं नये म्हणून गुरुजींनीं त्यांना घरीं जाण्यास परवानगी देण्याचा आपला विचार प्रगट केला. हें पाहून रामकृष्णांनीं गुरुजींना विनंती केली कीं आपण कांहीं तरी गुरु दक्षिणा घ्यावीच. हा त्यांचा आग्रह पाहून गुरुजींनीं पत्नीच्या संमतीनें त्यांना असें सांगितलें कीं प्रभास क्षेत्रीं आमचा मुलगा पाण्यांत बुडाला आहे, तरी तो तेवढा आणून द्यावा. तुम्हीं परमेश्वर आहांत तेव्हां तुम्हांला हें अशक्य नाहीं!

गुरुजींची ही मागणी रामकृष्णांनीं ताबडतोब कबूल केली; व थोड्याच काळांत त्या मुलाला गुरुजीं पुढें आणून ठेवलें व त्यांचे शुभाशीर्वाद घेऊन ते घरीं आले. ते घरीं आले त्यावेळीं पावसाळा सुरू झाला होता.

खरें पाहिलें असता,

हे त्रिजगद्गुरु, ह्यांचा कल्याणाधार वेदमय काय ।
जन संग्रहाविना ह्यां गुरुच्या सेवेंत अभ्युदय काय ॥

असेंही पण कोणाला म्हणतां येईल व ते खरेंही पण आहे. श्रीकृष्ण गीतेंत म्हणतात,

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरोजनः ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ ३।२१

म्हणजे श्रेष्ठ पुरुष जें प्रमाण समजून त्या प्रमाणें वागतात तसेच इतरही तेंच प्रमाण म्हणून चालतात ह्यामुळें त्यांनीं जर गुरुगृहीं जाऊन तेथें पडेल तें काम करण्याचें मनावर घेतलें नसतें तर इतरांनीं ही तसेंच करूं लागून गुरुजींची प्रतिष्ठा मुळींच ठेवली नसती. हें लक्षांत घेऊनच श्रीकृष्णांनीं अर्जुनाला सांगितलें कीं ज्ञान पाहिजे असेल तर

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ॥ ४।३४ ॥

म्हणजे तुला तें मिळविण्यासाठीं तत्वदर्शी अशा ज्ञानी गुरुना वंदनपूर्वक त्यांची सेवा करून त्याना खूप करशील तेव्हांच तुला ते त्यांच्या कडून मिळूं शकेल, एरवीं नाहीं !

तसेंच भगवंतांनीं असेंही पण सांगितलें आहे कीं,

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागशः

म्हणजे सत्वादिगुण व शमादि कर्में यांच्या फारफेरानें मीं ब्राह्मणादि चार वर्ण उत्पन्न केले आहेत. व त्या

ब्राह्मण क्षत्रिय विशां शूद्राणांच परंतप ।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभाव प्रभवैर्गुणैः ॥ १८।४१ ॥

म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्या स्वभावांतील फरकांनुरूप मीं त्यांचीं कर्मेंही ठरविलीं आहेत. याप्रमाणें पाहातां ज्ञानविज्ञानाचा अधिकार ब्राह्मणांनांच भगवंतांनीं सांगितलेला असल्यामुळें त्यांनीं स्वतांही ब्राह्मणापाशीं जाऊनच विद्या ग्रहण केली व शेवटीं गुरु दक्षिणा म्हणून गुरुजींचा मृत पुत्र परत आणून देऊन आपण स्वताच क्षत्रियाच्या म्हणून सांगितलेल्या ' दान व ईश्वरभावः ' या दोहों-चेंही आपल्या ठिकाणचें अस्तित्व जगाच्या प्रत्ययास आणून दिलें.

घरीं येतांच श्रीकृष्णांना गोकुळाची आठवण झाली. परंतु त्यांना स्वताला फावत नसल्यामुळें त्यांनीं उद्धव नांवाच्या आपल्या एका यादवाला गोकुळांत जाऊन तेथें नंदयशोदेला व सर्व गोपगोपींना भेटून त्यांना आपलें कुशल वर्तमान व निरोप कळविण्यासाठीं पाठवून दिलें. ते उद्धवाला म्हणाले, मींच तिकडे गेलों असतों; परंतु मला तेथून परत येवणार नाहीं व इकडे तर अनेक कामें वाट पाहत आहेत, तूं तेथें जाऊन त्यांची समजुत कर, त्यांना ज्ञानाच्या चार गोष्टी सांग व म्हण कीं शोक करूं नका. मीं नित्य तुमच्या जवळच आहें असें समजा. तसेंच तीं काय सांगतील तें ऐकून घेऊन मला येऊन सांग. हें सांगत असतां श्रीकृष्णांचा गळा भरून आला. त्यांच्यानें पुढें बोलवेना त्यांनीं उद्धवाला हातानेंच निरोप दिला.

हा शोकावेग थोडा कमी झाल्यावर ते अक्रूराच्या घरीं गेले. तेथें अक्रूरानें त्यांचा अत्यंत आदरसत्कार करून त्यांची परमेश्वर भावानें अत्यंत स्तुती केली. तेव्हां श्रीकृष्ण उलट स्वतांच आपल्याकडे कमीपणा घेऊन त्याला म्हणाले, अहो काका !

साधु तुम्हीं विश्वाचे तारक बहुमानितां मला तोका ॥
यष्टि जशी अंधाला, जीवाला साधु साधुगति हेतु ।
आश्रय इतर प्लव भवजलधींत, तुम्हींच संत दृढसेतु ॥ १ ॥
नर्म नव्हे हें, सत्यचि; काकाजी ! निजमनीं विचाराहो ।
मोजा स्वापत्यांतचि, आम्हांला रीति नीति शिकवाहो ॥
तसेंच, त्या आत्या बाईचे प्राणहि देऊनि धीर टिकवा हो ।
कारण तिचा, भर्ता मेला, बाळहि लघु, राजा अंध, दुष्ट तत्तनय ॥
पुत्र स्नेहहि मोहक; तेथ असावाचि सर्वथा अनय ।

म्हणून म्हणतो

गज साव्हयासि जाउनि शोध करा त्या नृपास जें विहित ।
तें सांगा त्याचेंहि करा, करित असा आमुचेंहि जेविं हित ॥
वसुदेव तसेच तुम्ही भगिनीचा घ्या स्वयें समाचार ।
एथें तसेच तेथें दिवस स्वसुहृज्जनीं क्रमा चार ॥

या प्रमाणें अत्यंत गौरवपूर्वक मोठेपणा देऊन श्रीकृष्ण भगवानांनीं त्याला हास्तिनापूरला पाठवून दिले.

या ठिकाणीं विचार करतां असें आढळून येईल कीं श्रीकृष्णांनीं गीतेंत जें सांगितलें आहे कीं

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।
तस्याहं सुलभः पार्थ नित्य युक्तस्य योगिनः ॥ ८।१४ ॥


म्हणजे मदेकचित्तहोऊन जो माझी नित्य आठवण ठेवतो त्याला मीं कधींच परका मानीत नाहीं ह्मणून त्याचेंच प्रत्यंतर म्हणून श्रीकृष्णांनीं उद्धवाला गोकुळांत पाठविलें व आपण वैभवाच्या भरांत त्यांना विसरलेला नाहीं हें सिद्ध केलें. तसेंच,

पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः ' व
गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ॥ ९।१७।१८

अपूर्ण

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २६ मास ९ ) वैशाख शके १८५४ मे इ. स. १९३२ ( नवें वर्ष १२ वें अंक ५

वार्षिक वर्गणी रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३॥३



## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी, ए.

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.



मुद्रकः—विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६ लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | ... | १ |
| २ श्रीरामनाम | ... | २ |
| ३ मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ ला (जाहिरात) | .. | ३--४ |
| ४ सदर ग्रंथाची अनुक्रमणिका | ... | ५--८ |
| ५ज्ञानेश्वरी ग्रंथ तात्पर्य (अ० १८) | ... | ९--१६ |
| ६ श्रीकृष्णाचें चरित्र--दर्शन | ... | १७--२३ |
| ७ कांहीं स्फुट लेख व उतारे | ... | २३--२८ |
| ८ उपनिषदांतील वेंचे | ... | २९--३४ |
| ९ विष्णुकवीची कविता | ... | ३५--३८ |
| १० साभार स्वीकार | ... | ३९--४० |


## वर्गणीदारांस विनंति:—

१ आमचा नवा ग्रंथ आठशे पृष्ठांवर वाढल्यामुळें त्याची किंमत रुपये चार ठेवावी लागली आहे. जाहिरात व अनुक्रमणिका ह्या अंकांत पुढें दिली आहे त्यावरून ग्रंथाची कल्पना येईल. १९३१ चे मार्च एप्रिल मे हे तीन अंक ज्यास मिळाले नाहींत त्यांना व्ही० पी अगर रजि० सह रुपये चार पडतील, इतरांस रु. ४।१२ पडतील.

२ मुंबईच्या वर्गणीदारांनीं रु. ३।८ रा. पागनीस, पटकर आणि मंडळी (गिरगावांत प्रार्थनासमाजासमोर) यांजकडे भरून ग्रंथ घेऊन जावा. त्याजपाशीं यादी ठेवली आहे; पुण्याच्या वर्गणीदारांस तो लक्ष्मण यशवंत अयाचित, जोगेश्वरीजवळ अयाचित यांचे घरीं मिळेल.

३ जूनमध्यें ज्यांचे मुमुक्षूचें वर्ष सुरू होते त्यांनीं हा अंक पाहतांच रुपये सात पाटवावेत म्ह० त्यांस रजि० नें ग्रंथ मिळेल व मुमुक्षूची वर्गणी ही जमा होईल.

पत्ता:—व्यवस्थापक 'मुमुक्षु' नासीक सिटी.

मुमुक्षु मासिक
वर्ष १२ वें

# मंगलाचरण

मे १९३२
अंक ५



## अभंग

१

रुक्माबाई आईचें आहे ऐसें भाग्य । असावें आरोग्य चिरकाळ १
सख्या पुंडलीका आवडतें स्थळ । असावें चिरकाळ स्वस्तिक्षेम २
अहो संतजन ! या आवडतें धन । असावें कल्याण चिरकाळ ३
जन्मोजन्मीं हेंचि मागे गोविंदासी । ह्मणे जनी दासी नामयाची ४

२

देव भक्तांचा अंकित । कामें त्यांचीं सदा करित १
त्यांचें पडों नेदी उणें । होय रक्षिता आपण २
जनी ह्मणे भक्तिभाव । देव-दास ऐक्य जीव ३

३

सख्या घेतली पदरीं । आतां न टाकावें दुरी १
थोरांचीं उचितें । हेंचि काय सांगों तूतें २
ब्रह्मयाच्या ताता । सजणा लक्ष्मीच्या कांता ३
आपली ह्मणवुनी । आपंगावी दासी जनी ४

४

योग न्यावा सिद्धी । सकळ गुणांचिया निधी १
अरूपाच्या रूपा । सांब राजाचिया बापा २
ब्रह्मयाच्या ताता । ह्मणे जनी पंढरिनाथा ३

५

द्वारकेच्या राया । बुद्धि दे गा नाम गाया १
मतिमंद तुझी दासी । ठाव देईं पायांपासी २
तुझे पदरीं पडले खरी । आंता सांभाळावी हरी ३
न कळे हरीची करणी । ह्मणे नामयाची जनी ५

# श्रीरामनाम

नित्य स्मरतां रामनाम । सकळ पातकां करी भस्म ।
चहूं पुरुषार्थांचें काम । होय सुगम हरिनामें ॥ १ ॥
करितां रामनामस्मरण । जन्ममरणासी ये मरण
समूळ विरे मींतूपण । भवबंधन बाधेना ॥ २ ॥
बाधेना मायामोहन । बाधेना कर्मबंधन ।
बाधेना त्रिविधविंदान । रामस्मरण करितांची ॥ ३ ॥
असेना देहीं अहंभाव । असेना जीवीं जीवभाव ।
मीतूंपणा नाहीं ठाव । नामनिर्वाह श्रीरामें ॥ ४ ॥
रामनामाच्या गदारोळें । स्मरत्या शरण रिघिजे काळें ।
भवभय समूळ पळे । सुखसोहळे श्रीरामें ॥ ५ ॥
श्रीरामनामगजरें । ब्रह्म स्वानंदें हुंबरे ।
जेवीं धेनु वत्सा अनुसरे । तेवीं नामोच्चारें श्रीराम ॥६॥
श्रीरामनामाक्षर । क्षराक्षरातीत पर ।
नाम परब्रह्म परात्पर । नाममंत्र शिवसेव्य ॥ ७ ॥
नामें भुक्ती नाम मुक्ती । नामापाशीं ब्रह्मप्राप्ती ।
राममाम जे जपती । वंद्य त्रिजगतीं तेचि पैं ॥ ८ ॥
रामनाम परमजप । रामनाम परम तप ।
रामनाम निरसी पुण्यपाप । नाम निर्विकल्प समाधी ॥९॥
नामापाशीं सद्यःमुक्ती । पंडित बोलती पुराणोक्ती ।
मी बोले ते माझी प्रतीती । नाम निश्चिती तारक ॥१०॥
नामीं नाहीं अनध्याय । नामीं सर्वदा स्वाध्याय ।
नाम प्रत्यक्ष परब्रह्म पाहे । अभाग्या भाव उपजेना ॥११॥

श्रीएकनाथ.

---

# मराठी वाङ्मयाचा इतिहास--खंड पहिला.

## पृ० सं० ८३२ ज्ञानेश्वरनामदेवांचा काल. किं. रुपये चार

### ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, नाशीक सिटी.

मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा हा पहिला खंड आहे. याच्या पूर्वार्धांत ७ व उत्तरार्धांत ११ प्रकरणें आहेत. पूर्वार्धांत देशी वाङ्मयाला आधारभूत असलेल्या वेदशास्त्रपुराणांची पूर्वपीठिका ह्मणजे विचारप्रवाहांची पूर्वपरंपरा दिली आहे. बाराव्यातेराव्या शतकांत जें मराठी वाङ्मय निर्माण झालें त्याला पूर्वपरं--परा आहे व ती वेदापासून आहे, वेदांतील देवतांच्या प्रार्थनांत भक्तिमार्गाचें व आध्यात्मिक सूक्तांत ज्ञानमार्गाचें बीज कसें आहे, उपनिषदांतून अध्यात्मविद्या कशी स्पष्ट व सुलभ केली आहे, गीताभागवतांनीं ज्ञानाला भक्तीची जोड देऊन परमार्थ सर्वजनसेव्य कसा केला आहे, भक्तिमार्ग अनादि वेदापासून चालत आला असून शिवविष्णूंच्या उपासनांत एकात्मता कशी आहे हा सर्व वैदिक धर्माचा इतिहास विपुल अवतरणांसह व्यवस्थितपणें सर्वांस समजेल अशा सुलभ-रीतीनें पहिल्या पांच प्रकरणांत सांगितला आहे. पुढील दोन प्रकरणें ऐतिहासिक आहेत.बौद्ध व जैन हे वेदविरोधी पंथ उत्पन्न झाले,अशोक व त्याचे आदेश यामुळें बौद्धपंथ सर्वत्र पसरला, दोन्ही पंथाचे विशेष व वैदिकधर्माचे सिद्धांत, पुष्यमित्र, विक्रमादित्य, समुद्रगुप्त, हर्षवर्धन, ललितादित्य, भोज इ० हिंदुसम्राटांच्या राजवटींत या पंथांशीं वैदिकधर्माच्या झटापटी होऊन त्याचें पुनरुज्जीवन झालें हा इतिहास ६ व्या प्रकरणांत दिला असून ७ व्यांत द्रविडांचें व विशेषतः तामीळांचें साम्राज्यवैभव, त्यांचे प्रतापी सम्राट्, त्यांचीं अजस्र शिल्पकामें, देशीभाषांतली पहिली तामीळ भाषा व तिचें वाङ्मय, त्यांचे नम्माळवार आदि बारा आळ-वार ऊर्फ वैष्णव, तिरुज्ञानसंबंदर, अप्पर, माणिक्कवासहर, नंद इत्यादि ६३ शैव, त्यांचें वाङ्मय व त्यांचे बौद्धजैनांशीं झालेले यशस्वी झगडे, कुमारीलभट्ट व मध्वाचार्य [ तैलंग ] व शंकराचार्य व रामानुजाचार्य [ तामीळ, ] आचार्यांची काम-गिरी, त्यांचें वाङ्मय, त्यांची धर्ममतें हा सर्व महत्वाचा विषय ७ व्या प्रकरणांत दिला आहे.

'महाराष्ट्र देश व मराठे लोक' हें आठवें व 'महाराष्ट्री ऊर्फ मराठी भाषा' हें नववें हीं प्रकरणेंही महत्वाचीं आहेत. दण्डकारण्य, महाराष्ट्राच्या चतुःसीमा, मऱ्हाटे लोक, राष्ट्रकूट, शालिवाहन, चालुक्य, जाधव, हेमाद्री व वोपदेव, देशी भाषांचा उदय, वररुची, हालाची सप्तशती, महाराष्ट्रीची मराठी बनत बनत चालली, मुकुंदराज, महानुभाव कवि व मुख्यतः ज्ञानेश्वर यांनीं मराठीचें धोरण व हेतु, मराठीची योग्यता, साहित्य आणि शांति, शांतरसाचें घट व आनंदाचे आवार

याविषयीं काढलेले उद्गार, मराठी काव्यांच्या जुन्या प्रती व राजवाडे हे विषय ह्या दोन प्रकरणांत आले आहेत. १० वें प्रकरण आदिकवि मुकुंदराज' यांना व १२ वें 'नाथपरंपरेला' दिलें आहे. ११ वें प्रकरण महानुभाव पंथ व त्याचें गद्यपद्यात्मक प्राचीन वाङ्मय याला दिलें असून त्यांत पंथाचे संस्थापक, पंथाचे आचारविचार, पंथीयांची कृष्णभक्ति, वारकरीपंथाशी त्याचें साम्य व वैषम्य या मुद्यांचा सहानु-भूतिपूर्वक ऊहापोह करून कवीश्वर भास्कर व त्याचा शिशुपाल वध, महदंबेचे धवळे, दामोदरपंडिताचें वत्सहरण, एकादश, रुक्मिणीस्वयंवर, ज्ञानप्रबोध, ऋद्धिपूरवर्णन, दिनचर्या इ० गद्यपद्यग्रंथांचें विवेचन अवतरणें देऊन सविस्तर केलें आहे. १३ वें प्रकरण श्रीज्ञानेश्वरदर्शन, १४ वें नामदेवराय व पंढरपूर आणि विठ्ठल या विषयीं अलोट प्रेम व महाराष्ट्रांतील कामगिरी, १५ वें समकालीन संत व त्यांचें अभंग वाङ्मय, १६ वें ज्ञानेश्वरांचें अंतरंग, १७ वें ज्ञानेश्वरी सृष्टि व १८ वें नामदेवांची पंजाबांतील कामगिरी; हीं सर्वच प्रकरणें मूळांतून साग्र वाच-ल्यावर त्यांत सांगायचें कांहीं राहिलें नाहीं असें वाचकांस वाटेल असा भरवसा वाटतो. ज्ञानेश्वरांचीं दोन जुनी ( एक अप्रकाशित ) चरित्रें, त्यांच्या ग्रंथांतून प्रगट झालेलें त्यांचें आत्मचरित्र, ज्ञानेश्वरीवर पूर्वील ग्रंथांचे संस्कार, निवृत्तिनाथ, कृष्णार्जुनप्रेमप्रसंग, संतांची ज्ञानेश्वरभक्ति, ज्ञानेश्वरांच्या हृदयीचा जिव्हाळा ( प्र० १३ ); नामदेव, विठ्ठलभक्ति, त्यांच्या अभंगांची गोडी, गुरु विसोबाखेचर, शिष्य परिसा भागवत, [प्र० १४]; ओवी व अभंग, अभंग ज्ञानेश्वरीकारांचेच, ज्ञाने-श्वरांची अभंगवाणी, चांगदेव, मुक्ताबाई व जनाबाई, गोरा कुंभार, सेना न्हावी. नरहरि सोनार, सावतामाळी, जोगा परमानंद, चोखामेळा इ० भक्त व त्यांची कविता, वैष्णवांचा मेळा व दहीकाल्याचा प्रसाद [ प्र० १५ ]; उपमारूपकादि-कांची गर्दी, गीतेची थोरवी, अठरा अध्यायांतील विषय, ज्ञानेश्वरीचा मुख्य विषय अध्यात्मयोग उर्फ ज्ञानभक्तियोग, कर्म, ज्ञान, भक्ति, ज्ञानाज्ञानाचीं लक्षणें, अद्वैतभक्तीची पराकाष्ठा, परमरहस्य, अमृतानुभव [ प्र० १६ ]; आध्यात्मिक दृष्टि व आधिभौतिक सृष्टि, ज्ञानेश्वरींत प्रतिबिंबिलेली लोकस्थितिः राजकीय, उद्योग व व्यापार धंदे, शेती व बागाईत, रोग व रोगनिवारण, लौकिक समजुती, शास्त्रीय कल्पना, प्रपंचाची ब्रह्मरूपता, पतिपत्नी, भोजनाचे पदार्थ, लग्न व पाहुणे, अपत्यप्रेम, वृक्षवेली, पशुपक्षी व कृमिकीटक, सिंह आणि गाय, पारधी व पोपट, चकोर व चातक, भ्रमर, चक्रवाक, कासवी, राजहंस, बक इ० इ० [ प्र. १७ ]; कीर्तनाचा सुख-सोहळा, नामदेवांची पंजाबांतील कामगिरी, शीखांच्या ग्रंथसाहे-बांतील नामदेवांचीं पद्यें [ अर्थासह, ] नामदेव व नरसी मेहता, [ प्र. १८ ]

शंभर किंवा अधिक प्रती घेणारांस कमीशन २५ टक्के मिळेल. कागद व छपाई उत्कृष्ट. **पत्ताः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, नाशीक सिटी.**

१२ ८/२
८/६/३२

# मराठी वाङ्मयाचा इतिहास--खंड पहिला

**पृ० सं० ८३२ ] ज्ञानेश्वरनामदेवांचा काळ. [ किंमत रुपये चार**

## पूर्वार्ध

**प्रास्ताविकः**—वेदधर्मीयांची एकरूपता पृ. १ परंपरेच्या ज्ञानाची अवश्यकता ३

**१ वेदविद्याः**—विषयप्रवेश पृ. ९ ऋग्वेद ११ वैदिकदेवतांच्या प्रार्थना १३ ऋग्वेदांतील अध्यात्मविद्या १९ यजुर्वेद २६ सामवेद २८ अथर्ववेद २९ वेदांगें ३३ वेदोपांगें ३५ उपवेद ३८ सांख्यशास्त्र ३९ पातंजलयोग ४४

**२ उपनिषदांतील ब्रह्मविद्याः**—दशोपनिषदें पृ. ४७ आत्मविद्या व आत्मविद् ४८ शांडिल्य ५६ आरुणि ५७ दध्यङ् आथवर्ण ५९ याज्ञवल्क्य ६१ कठोलिपद्–नचिकेत व यम यांचा संवाद ६४ सृष्टयुत्पत्तीची काहणी ७४ नीतीचा व साधनमार्गाचा उद्देश ७७ ब्रह्मविद्येचा आनंद ८० उपनिषदांतील कांहीं सूत्रें ८४

**३ भगवद्गीताः**-स्वधर्मकर्म ९७ मोहनिरास हा गीताशास्त्राचा हेतु ८८ ज्ञानोत्तरभक्ति हें गीतेचें रहस्य ९१ गीता आणि उपनिषदें १०५ गीताभगवतांतील नवविधाभक्ति १०८

**४ श्रीमद्भागवतः**—गीता आणि भागवत १११ भागवतपुराण ११२ भागवताचा काल ११३ अभेदाची बैठक ११६ भागवतांतील मुख्यविषय ११८ श्रीकृष्णाचा संसार १२३ भक्तीचें स्वरूप १३१ उत्तम भक्त १३४ भगवंताच्या रूपाचें ध्यान १३६ गुणानुवाद व नामसंकीर्तन १४१ संत व सत्संगाची महती १४६ भागवतधर्माची मुख्य तत्वें १४९ गोपींचें भक्तिप्रेम १५५

**५ भक्तिमार्गाचें अनादित्व व शिवविष्णुसंप्रदायः**–भक्तिमार्गाचें औदार्य १६५ भक्तिमार्ग वेदांत आहे १६६ पंचरात्रमत व भागवतधर्म १६९ शिवविष्णु ह्या देवता वैदिक आहेत १७१ शिवविष्णूंची एकात्मता १७७

**६ मधल्या काळाचा थोडा इतिहासः**—ब्राह्मण व क्षत्रिय १८१ अवनतीस आरंभ १८४ गौतमबुद्ध व महावीर १८५ वैदिक धर्माचे सिद्धांत १८७ बौद्ध व जैन पंथ १९० मौर्य चंद्रगुप्त १९१ अशोक १९३ अशोकाचे आदेश १९५ पुष्पमित्र व विक्रमादित्य ९९ समुद्रगुप्त, चंद्रगुप्त व गुप्तसाम्राज्य २०१ हूणाच्या टोळधाडी २०५ सम्राट् हर्षवर्धन २०६ सातव्या शतकांतल्या हिंदुसमाजाची स्थिति २०९ काश्मीर, कनोज, धार इ० हिंदु राज्यें २१५ टोळधाडी व त्यांचा प्रतीकार २१ बुद्धपंथाचें परदेशीं प्रयाण २२३

**७ तामीळांचें साम्राज्य, तामीळ संत व तामीळ आचार्यः—**
तामीळांची श्रेष्ठ कामगिरी २२७ करिकेल चोल २२९ चोल राजे २३० चोलांची राज्यव्यवस्था २३४ पांड्य, चेर व पल्लव २३६ तामीळांचीं अजस्र शिल्पकामें २३८ तामील वाङ्मय २३९ बारा अळवार उर्फ वैष्णव २४२ नम्माळवार २४७ तिरुज्ञानसंबंदर २५० अप्पर २५४ संबंदर व अप्पर २५६ संदरमूर्ति २५८ माणिक्कवासहर २५९ तिरुमुल्लर २६४ प्रेममूर्ति नंद २६५ कुमारीलभट्ट २७४ शंकराचार्य २७६ शंकराचार्यांची कामगिरी २७९ आचार्यांची ग्रंथसंपत्ति २८२ रामानुजपंथाचे आचार्य २८६ शंकराचार्य व रामानुजाचार्य यांचीं मतें २९१ मध्वाचार्य २९५ तीनही आचार्यांचें मतैक्य २९८

## उत्तरार्ध

**८ महाराष्ट्रदेश व मराठेः—**दण्डकारण्य ३०१ महाराष्ट्राच्या चतुःसीमा ३०५ राष्ट्रकूट व शालिवाहन ३०८ पुलकेशी चालुक्य ३१४ पुन्हा राष्ट्रकूट ३१६ उत्तर चालुक्य ३१९ ठाण्याचे शिलाहार उर्फ शेलार ३२१ छोटीं मराठीं संस्थानें ३२३ देवगिरीचे यादव ३२५ भिल्लम व सिंघण ३२६ विद्या व कला यांना प्रोत्साहन ३२७ कृष्णदेव, महादेव व रामदेवराव ३२९ हेमाद्री व बोपदेव ३३१ पंढरपूरचा कृष्णभक्तिसंप्रदाय ३३५ ज्ञानेश्वरांनीं केलेले रामदेवरावांचे गौरव ३३७ स्वराज्याचें सुख ३३८

**९ महाराष्ट्री उर्फ मराठी भाषाः—**देशी भाषांचा उगम ३४३ वररुचीचे व्याकरण ३४६ हालाची सप्तशती ३४८ कर्पूरमंजरी ३५२ मराठी भाषा बनत होती, ३५४ मुकुंदराज व मराठी भाषा ३६० महानुभाव व मराठी भाषा ३६३ ज्ञानेश्वरांची मऱ्हाठी—साहित्य आणि शांति ३६७ संस्कृतच्या बरोबरीची मऱ्हाठी ३७० मऱ्हाठी शांतरसाचें घर ३७२ मऱ्हाठीं वाङ्मय हें आनंदाचें आवार आहें. ३७५ ग्रंथरचनेचा हेतु व सविनय समाधान ३७७ जुन्या काव्यांच्या प्रती ३८०

**१० आदिकवि मुकुंदराजः—**कालगणना ३८९ गुरुपरंपरा ३९२ ग्रंथरचना ३९५ विवेकसिंधु ३९६ परमामृत ४०१ वेदांत व राजयोग ४०६ सगुणोपासना ४१०

**११ महानुभावपंथाचें मराठी वाङ्मयः—**पंथाचे संस्थापक व प्रचारक ४१३ महानुभावपंथाचे आचारविचार ४१६ पंथाविषयीं लोकांत अप्रियता कां ४२४ सात प्रमुख ग्रंथ ४२६ कवीश्वर भास्कराचा 'शिशुपालवध' ४२७ भास्कराचा एकादशस्कंध ४४० भास्करकवीचें कृष्णचरित्रपर गद्यपद्यादि ग्रंथ ४४३ महदंबेचे धवळे ४४६ चक्रधराची दिनचर्या ४५२ केशवराज सूरि ४५५ दामोदर–

पंडिताचें 'वत्सहरण' ४५६ नरेंद्राचें रुक्मिणीस्वयंवर ४६५ ज्ञानप्रबोध ४६६ ऋद्धिपूरवर्णन ४७१ महानुभावपंथ व वारकरीपंथ ४७४

१२ नाथपरंपराः—नाथपरंपरा ४८१ गोरक्षनाथ ४८२ नाथपंथाचीं मतें ४८४ नाथपंथाचा महाराष्ट्राशीं संबंध ४८५ गोरक्षनाथांचें कवित्व ४८८ गहिनी-नाथांचा बोध ४९२ निवृत्तिनाथांचा गुरुपरंपरेचा अभंग ४९३ गुरुपरंपरेविषयीं ज्ञानेश्वरांच्या ओंव्या ४९४

१३ श्रीज्ञानेश्वरदर्शनः—कालानुक्रम ४९७ ज्ञानेश्वरांचीं दोन जुनीं चरित्रें ४९९ नामदेवानीं वर्णिलेलें चरित्र ५०१ सत्यामळनाथलिखित ज्ञानेश्वर-चरित्र ५०६ ज्ञानेश्वरांचें आत्मचरित्र ५११ पूर्वील ग्रंथांचे संस्कार ५१७ श्रीगुरु-निवृत्तिनाथ ५२३ ज्ञानेश्वरांची गुरुभक्ति ५२९ कृष्णार्जुनप्रेमप्रसंग ५३६ समका-लीन संतांची ज्ञानेश्वरनिष्ठा ५४२ भक्तीचा जिव्हाळा व हृदयाची प्रेमलता ५४५

१४ भक्त नामदेव (पूर्वार्ध):—नामदेवच्या अभंगांची गाथा ५५३ नामदेव ५५५ पंढरीक्षेत्र व विठ्ठलभक्ति ५५८ प्रेमाचा रुसवा ५६५ भक्तीचें प्रेम-सुख ५६७ खऱ्याखोट्याची निवड ५६९ नामदेवांच्या वाणीची गोडी ५७२ पहिला शिष्य परिसाभागवत ५७३ ज्ञानेश्वरनामदेवांच्या तीर्थयात्रा ५७७ गोरा कुंभार ५८२ कच्चा घट ५८४ गुरु विसोबाखेचर ५८५ नामदेवांच्या घरची मंडळी ५८९

१५ संतमेळा व त्याचें अभंगवाङ्मयः—प्रास्ताविक ५९५ ओवी व अभंग ५९६ ज्ञानेश्वरीकारांचेच अभंग आहेत. 'बाप रखुमादेवीवर ६०१ ज्ञाने-श्वरांची अभंगवाणी ६०२ 'गोपाळेंविण नुद्धरिजे' ६०८ 'आवडे तें करिसी देवा' ६१२ आंधळा, पांगडी, काऊ ६१३ हरिपाठाचे अभंग ६१७ मुक्ताबाई ६२० ताटीचे अभंग ६२२ मुक्ताबाई व चांगदेव ६२३ जनाबाई ६२६ जनाबाईची प्रेमळवाणी ६३१ मुक्ताबाई व जनाबाई ६३४ सोपानदेव ६३७ सच्चिदानंद कान्हू पाठक ६३९ सेना न्हावी ६४० नरहरि सोनार ६४३ सावता माळी ६४५ जगमित्र नागा ६४६ जोगा परमानंद ६४८ चोखामेळा ६५१ वैष्णवांचा मेळा ६५७ दही-काल्याचा बाबा ६३८

१६ ज्ञानेश्वरीचें अंतरंगः—साहित्याची शोभा ६६१ उपमारूपकादि अलंकारांची गर्दी ६६२ गीतेची थोरवी ६७२ अठरा अध्यायांतील विषय ६७४ ज्ञानेश्वरींत मुख्य पातंजलयोग नाहीं, अध्यात्मयोग आहे. ६७६ जितेंद्रियता ६८० कर्मयोग ६८३ ज्ञानयोग ६८७ ज्ञानाची किंवा दैवीसंपत्तीचीं लक्षणें ६९१ अज्ञा-नाचीं किंवा आसुरीसंपत्तीचीं लक्षणें ६९५ धर्मनष्टांचे आचारविचार ६९७ भक्ति-योग ६९९ अद्वैतभक्तीचें स्वरूप ७०६ परमात्म्याची व्यापकता ७०७ पुरुषोत्तमाची

भक्ति ७१० कर्माची हातवटी ७१० ज्ञानभक्तीची पराकाष्ठा ७१४ खरी शरणागति ७१७ परमरहस्य ७१९ अमृतानुभव ७२४

१७ ज्ञानेश्वरी सृष्टिः—आध्यात्मिक दृष्टि व आधिभौतिक सृष्टि ७३९ राजकीय परिस्थिति ७४० व्यापार व उद्योगधंदे–मोती चौक ७४३ व्यापार व उद्योगधंदे बाजार पेठा ७४६ शेती व बागाईत ७५० रोग, रोगनिवारण व वैद्य ७५३ नानाप्रकारचे लोक ७५५ लौकिक समजुती ७५८ शास्त्रीय कल्पना ५७९ प्रपंच ब्रह्मरूप आहे ७५१ पतिपत्नींची एकरूपता ७६२ लग्न व पाहुणे ७६६ भोजनाचे पदार्थ ७६८ पतिव्रता स्त्री ७६९ अपत्यप्रेम ७७० गुरुभक्ति ७७४ तरुणांचे खेळ ७७४ वृक्षवेली ७७५ पशुपक्षी व कृमिकीटक ७७८ सिंह आणि गाय ७८१ शिकार व पारधी व पोपट ७८५ चकोर व चातक ७८७ भ्रमर, चक्रवाक्,कासवी, राजहंस व बक ७९० इतर कांहीं प्राणी ७९२

१८ भक्त नामदेव ( उत्तरार्ध ):—कीर्तनाचा सुख सोहळा ७९७ पंजाबांतील कामगिरी ७९८ ग्रंथसाहेबांतलीं नामदेवांची पद्यें ८०० मेलेली गाय उठवली या बद्दल नामदेवांचें पद्य ८०५ नामदेव व नरसी मेहता ८०९

---

## ६ कवीवर्य मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन )

ह्या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातू मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरी भारतांतील विशेष गुणः – सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस, शृंगाररस इ० कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचित्रें कुत्स्यांचीं वर्णनें, त्यांच्या वेळची पाकसिध्दी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. ‘ मुक्तेश्वर नीतिरत्नमाला ’ ही शेवटी जोडली आहे. पृ. सं १४४ किं. रु. १

---

# ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य

## अध्याय अठरावा.

आतां १७ वा व १८ वा अध्याय यांचा संबंध पाहतांना १८ व्या अध्यायाचा संपूर्ण गीतेशीं काय संबंध आहे तो प्रथम पाहूं १८ वा अध्याय हा गीतारत्नप्रासादाचा कळस आहे. लोकांत अशी एक समजूत प्रचलित आहे कीं दुरून कळस दिसला कीं मंदिरांतील देवाचें दर्शन झाल्याचेंच फळ मिळतें, तसाच प्रकार येथें आहे. एक अठरावा अध्याय पाहिल्यानें सर्व गीताशास्त्र पाहिल्यासारखें होतें, ह्मणूनच याला गीताप्रासादाचा कळस ह्मटलें आहे व्यास हे बडे सूत्रकार ह्म० कारागीर होत.

त्यांनीं वेदरत्नपर्वताच्या उपनिषद्रूप पठारावर खणायला प्रारंभ केला. धर्मार्थकामरूप त्रिविधपुरुषार्थांचा जो असार चाराचुरा निघाला त्यानेंच गीतामं-गीतामंदिराभोंवतीं महाभारतरूप कोट बांधिला. वर सांगितलेल्या खाणींत आत्मज्ञानरूपी जीवात्मैक्याचा अखंड घनवट एक दगड निघाला, तो चांगला स्वच्छ करून त्याचा कृष्णार्जुनसंवादरूप चिरा त्यांनीं तयार केला. निवृत्तिरूपी ओळंबा लावून व सर्व शास्त्रतात्पर्यांची भर घालून व्यासांनीं त्या चिऱ्याच्या मांडणीला मोक्षरूपाचा आकार आणला. अशा तऱ्हेनें जमीन शुद्ध करण्यापासून तों पंधराव्या अध्यायाच्या अखेरपर्यंत त्यांनीं गीताप्रासादाची उभारणी केली. सोळावा अध्याय हा गळयावरील डेऱ्याचा आकार तयार झाला. सतरावा अध्याय हा कळसाच्या बैठकीचा ओटा होय. त्यावर अठरावा अध्याय हा सहजच कळसासारखा शोभूं लागला, व सर्वांवर व्यासांचा कीर्तिध्वज फडकूं लागला. मंदिराचें काम अपुरें न राहतां पूर्ण झालें असें कळसाच्या योगानें समजून येतें. असो. व्यासांनीं गीतामंदिर निर्माण करून मानवांचें नाना प्रकारांनीं रक्षण केलें आहे. कोणी याला आवर्तनरूप प्रदक्षिणा बाहेरून करितात; गीतेचे नुस्ते पाठ करितात, कोणी श्रवणमिषानें याच्या सावलीचा आश्रय करितात; कोणी अवधानरूप विडा-पैसा घेऊन याच्या अर्थज्ञानरूप गाभाऱ्यांत प्रवेश करितात व निजरूप श्रीहरीला कडकडून भेटतात! तथापि या सर्वांना मोक्षरूप प्रसाद सारखाच मिळतो. खऱ्या श्रीमंताच्या पंक्तीला खालच्यावरच्या सर्वांना पंक्तिप्रपंच न करितां सारखें अन्न वाढतात, 'तेविं श्रवणें अर्थें पठणें मोक्षचि लाभे.' असा हा गीतेचा वैष्णवप्रासाद आहे १८ व्या कलशाध्यायाचें ' अष्टादश विवरी साद्यंत गीता ' हे एकाध्यायी गीताचि आहे' या प्रमाणें गौरव करून १७ व्या व १८ व्या अध्यायांचा संबंध सांगतात.

गंगायमुनांचे ओघ वेगळे दिसले पण पाणी एकच, किंवा स्त्रीपुरुष हे

आकार दोन दिसत असले तरी अर्धनारीनटेश्वरांचें शरीर एकच; तसा १७ वा व १८ अध्याय हे दोन्ही मिळून एकच अध्याय असल्यासारखा आहे. संन्यास व त्याग यांतलें तत्व सांगण्याच्या निमित्तानें १८ व्याचा आरंभ झाला असला तरी ' यज्ञदानतपादि कर्में केलींच पाहिजेत कां कीं तीं पावन करणारीं आहेत' हें ५ व्या श्लोकांत सांगितल्यावर सात्विक, राजस व तामस त्याग, तीन प्रकारचे त्यागी, तसेंच त्रिविध ज्ञान, त्रिविध कर्म, त्रिविध कर्ता, त्रिविध बुद्धि, त्रिविध धृति, त्रिविध सुख, ब्राह्मणक्षत्रियवैश्यादि त्रिविध जन इ० त्रैविध्य १८ व्या अध्यायांत जें सांगितलें आहे तो १७ व्या अध्यायांत सुरू केलेल्या त्रैविध्याचाच विस्तार आहे हें लक्ष्यांत आणलें ह्मणजे वरील दृष्टांतांची समर्पकता समजून येते. १७ व्या श्लोकाच्या शेवटीं ' अर्जुना! ब्रह्मनामाच्या विखीं । बुद्धि सांडूनि आस्तिकी । कर्में किजती तितुकीं । असंतें होतीं – ब्रह्मनामाविषयीं श्रद्धा सोडून केलेलीं सर्व कर्में व्यर्थ होतात, असें भगवंतांनीं सांगितलें. तें एकून कर्मनिष्ठेवर देवांनीं दोष ठेवला असें अर्जुनास वाटून तो मनांत ह्मणाला " अज्ञानांध अशा कर्मयोग्याला देव, त्याचें नांव, त्यावरील श्रद्धा वगैरे जें देवांनीं सांगितलें तें सारें कळावें कसें! चित्तांतलें रजतम गेले नाहींत तर श्रद्धा सात्त्विक होऊन ब्रह्मनामाच्या ठिकाणीं जडावी कशी ? शिवाय ब्रह्मनामाशिवाय कर्में घातक आहेत, तीं पुनर्जन्म देतात. हे सारे कुयोग कर्मांत आहेत, मग कर्मयोगी मोक्षाकडे जाणार कसा? त्यापेक्षां जेथें कर्मांची भानगड नाहीं अशा संन्यास-त्यागाचा देवाकडून उलगडा करून घ्यावा हें बरें" अर्जुन ह्मणतो " देवा ! संन्यास आणि त्याग यांचें मर्म मला सांगा; भगवान् सांगतात " अर्जुना ! त्याग आणि संन्यास एक नाहींत, भिन्न आहेत. ' निपटूनि कर्म सांडिजे । तें सांडणें संन्यास ह्मणिजे । फळ मात्र कां त्यजिजे । तो त्याग गा' ॥ ९ ॥

'एका फळत्याग न ठके । ते कर्मातें ह्मणती बंधकें'— ज्याना फळत्यागपूर्वक कर्म करितां येत नाहीं ते कर्मच बंधकारक आहे ह्मणतात, ह्मणजे निष्काम कर्म बंधकारक नाहीं. ' एक ह्मणती यागादिक । करावेंचि आवश्यक' — यज्ञयागादि कर्में अवश्य केलीं पाहिजेत असें ह्मणणारांचा दुसरा पक्ष आहे. त्यांच्यामतें सोनें शुद्ध करायचें तर अग्नीला कंटाळून चालत नाहीं, किंवा वस्त्रें स्वच्छ करायचीं तर संवदाणीला ह्म० वस्त्रें धुण्याच्या दगडीपात्राला (कुंडीला, डोणीला) त्रासून भागत नाहीं त्याप्रमाणें चित्तशुद्धि करायची तर कर्माला कंटाळून चालायचें नाहीं अर्थात् कर्मांचा त्याग उचित नाहीं. तात्पर्य कर्म बंधकर आहे असें ह्मणणारा एक पक्ष व कर्म चित्तशुद्धिकर आहे असें ह्मणणारा दुसरा पक्ष असे दोन विसंवादी पक्ष

आहेत. भगवान् ह्मणतात कीं या वादाचा निर्णय त्याग व त्यागी यांचे त्रिविध प्रकारचे भेद सांगून मी देणार आहे. इतर लौकिक कर्मांविषयीं मी बोलत नाहीं, पण यज्ञदानतपादि कर्मे माणसानें सोडूं नयेत; कांकीं खरोखरच तीं चित्तशुद्धिकर आहेत. हरवलेली वस्तु सांपडेतों माग सोडतां येत नाहीं, कां 'नाव थडी न पवतां। न सांडिजे केळी न फळतां। कां ठेविलें न दिसतां। दीप जैसा' ॥ ५१॥ तंव आत्मज्ञानविखीं। जंव निश्चिती नाहीं निकी। तंव नोहावे यागादिकीं। उदासीन' ॥१५२॥--आत्मज्ञानाविषयीं निश्चय होईपर्यंत यज्ञादिकर्मांविषयीं उदासीन होऊं नये, इतकेंच काय पण स्वाधिकारानुरूप यज्ञदानतपें अधिक साक्षेपानेंच करावीत कां कीं 'चालणें वेगावत जाय। तो वेग बैसावयाचि होय। तैसा कर्मातिशय आहे। नैष्कर्म्यालागीं' ॥ ५४ ॥ रोगी औषध घेण्याची कंबर बांधील तर लौकर व्याधिमुक्त होईल, निष्ठेनें कर्म केल्यानें बुद्धीवरचे मलिन संस्कार जाऊन सत्वशुद्धि होते. 'तीर्थें बाह्यमळ क्षाळे। कर्में अभ्यंतर उजळे'। कर्मानेंच कर्मबंधापासून सुटका होते. 'कर्में कर्मबद्धता। मुमुक्षु सोडविले पंडुसुता। जैसा रसरीती मारतां। राखिला विषें'॥१६३॥ --विष मारक खरें पण तेंच रसायनक्रियेनें उत्तम औषध बनवून दिलें तर मरत असलेल्या मनुष्याचे प्राण वांचवितें, त्याप्रमाणें कर्म बंधकर खरें पण विशेष हातोटीनें केलें तर कर्म बंधापासून सोडवायला कारण होतें. ती हातोटी ह्म० संग ह्म० कर्तृत्वाहंकार व फलाशा सोडून कर्में करावींत ही होय, 'ह्मणोनि फळीं लाग। सांडोनि देहसंग। कर्में करावीं हा चांग। निरोप माझा' ॥ १७६ ॥ कर्मद्वेषानें कर्मत्याग करणें हा तामस त्याग आहे, अर्धशिशीनें डोकें दुखतें ह्मणून डोकेंच कापून टाकण्यासारखें तें वेडेपणाचें आहे. 'स्वभावें आलें भागा। तें कर्मचि वोसंडी पैं गा' तो तामस प्रकार होय. आपलें विहित कर्म कोणतें व आपला अधिकार कोणता हें जाणून जो तें कर्म कष्टदायक आहे ह्मणून कायक्लेशभयानें करीत नाहीं तो राजसत्याग होय. देहाच्या लोभानें कर्म सोडणें हा कांहीं त्याग होत नाहीं. आतां खरा सात्विकत्याग कोणता तें सांगतात. 'तरी स्वाधिकाराचेनि नांवें। जें वांटिया आलें स्वभावें। तें आचरे विधिगौरवें। शृंगारोनी' ॥२००॥ ---वर्णाश्रमधर्मानुरूप आपल्या भागाला आलेलें कर्म विधीगौरवानें शृंगारून ह्म० शास्त्राज्ञेप्रमाणें आदरपूर्वक आचरणें व त्यांत कर्तृत्वाहंकार व फलाशा बिलकूल न ठेवणें हा सात्त्विक त्याग होय. आठोळी आणि साल टाकून फळाचा रस तेवढा घ्यावा! 'कर्तृत्वाचा मद। आणि कर्मफळाचा आस्वाद। या दोहींचें नांव बंध। कर्माचा कीं' ॥ २०५ ॥ संग व फलाशा यामुळेंच कर्म बंधकर होतें, हे दोन्ही सोडले कीं तेंच कर्म मोक्षभुवनांत नेऊन

सोडतें. पूर्वसंचितानुरूप जीं बरींवाईट कर्मे करणें प्राप्त झालें आहे त्याविषयीं सुखदुःख न मानतां ह्म० त्यांचेविषयीं द्वेष किंवा अत्यासक्ति न ठेवतां विहित-कर्मे करितो तो सात्विक त्यागी होय. कर्मांचा सर्वथैव त्याग करणें देहवंताला शक्य नाहीं ह्मणून कर्मफलत्याग करणाराच खरी त्यागी होय. 'आणि हां गा सव्यसाची। मूर्ति लाहोनि देहाची। खंती करिती कर्मांची। ते गावंढे गा' ॥ २१८ ॥ देह कर्मांचाच वळलेला असल्यामुळें कर्मांला सोडून कोठें जाणार? घटानें मृत्तिकेचा वीट घेऊन कसें चालेल? 'हिंग त्रासला घाणी। तरी कैंचे सुगं-धत्व आणी?' शरीराच्या आभासानें नांदत आहे तोंवर कर्मत्यागाचें पिसें काय कामाचें? असो कर्मांचा त्याग ह्म० कर्मफळाचा त्याग एवढाच अर्थ आहे. 'कर्मफळ ईश्वरीं अर्पे। तत्प्रसादें बोध उद्दीपे। तेथ रज्जुज्ञानें लोपे। व्याळशंका॥ ?८८॥ तेणें आत्मबोधें तैसें। अविद्येसी कर्म नासे। पार्था त्यजिलें जें ऐसें। तें त्याजिलें होय'॥२२५॥ कर्मफळ ईश्वराला अर्पण झालें असतां त्याच्या प्रसादानें आत्मज्ञान होतें व रज्जूच्या यथार्थज्ञानानें सर्पभ्रम नाहींसा होतो त्याप्रमाणें आत्मज्ञानानें अविद्येबरोबरच कर्मांचा नाश होतो. अशा हातोटीनें कर्मांचा त्याग होतो तेव्हाच त्याला त्याग ह्मणतात; व अशा प्रकारें जो कर्मत्याग करितो ह्म० कर्मच नैष्कर्मस्थितीस नेतो त्यालाच आह्मी त्यागी ह्मणतों (अ० १८ ओवी १३५ ते २३२)

४ ज्यांना त्यागाचें हें मर्म ठाऊक नाहीं त्यांना मरणोत्तर इष्ट (स्वर्गादि,) अनिष्ट (नरकादि) व मिश्र ह्म० इष्टानिष्ट (मनुष्यलोकादि) असें कर्मांचें फळ तीन प्रकारांनीं मिळतें, पण जे आत्मज्ञानी आहेत त्यांना कर्मफळ कधींच बाधत नाहीं, कां कीं त्यांची अविद्या (अज्ञान) नाहींशी झाल्यावर मग तिचें कार्य जें कर्मफळ तें घेणार कोण व सोडणार कोण? आत्मा आणि कर्म यांच्यांत पूर्वपश्चिमे-इतकें अंतर आहे. आत्मज्ञान्यांच्या हातून कर्म घडलें तरी त्यांना कर्मफळ भोगावें लागत नाहीं. नदींतल्या खडकावरून पाणी वाहून गेलें तरी त्याला त्याचें काय? दिव्याला वरील काजळीचा संपर्क कोठचा? असें असून आत्म्याच्या ठिकाणीं क्रिया भासतात त्याची कारणें आहेत. सांख्यसिद्धांतांत तीं पांच प्रकारचीं सांगितलीं आहेत:—

(१) अधिष्ठान ह्म० देह. ह्या देहांत सुखदुःखादि भोगांसह भोक्ता जो जीव तो राहतो व दशेंद्रियांच्या दहा हातांनीं रात्रंदिवस श्रम करून प्रकृतीकडून सुखदुःखें मिळवितो! तीं भोगायला देहाशिवाय दुसरें साधन नाहीं ह्मणून देहाला अधिष्ठान ह्मटलें आहे. (२) कर्मांचें दुसरें कारण कर्ता ह्म० जीव 'आपुलेनि विसरें। चैतन्यचि देहाकारें। आभासोनि आविष्करे। देहपणें जें' ॥ ३२४ ॥

आपलें परमात्मस्वरूप विसरून जें देहाकारानें भासतें व देहच मी मानतें तें चैतन्याचें प्रतिबिंब उर्फ जीव. 'प्रकृति करी कर्में । तीं ग्यां केलीं ह्मणे भ्रमें । येथ कर्ता येणें नामें । बोलिजे जीव' ॥३२६॥ ( ३ ) इंद्रियें:—घरांतील एकाच दिव्याचा प्रकाश अनेक खिडक्यांतून बाहेर पडतो त्याप्रमाणें बुद्धीचें एकच ज्ञान ज्या श्रोत्रादिकांच्या द्वारें बाहेर पडतें तीं इंद्रियें कर्माचे तिसरें कारण होय. ( ४ ) विविध चेष्टा किंवा व्यापार प्राणवायूंतली क्रिया निरनिराळ्या ठिकाणीं विभागली जाऊन अनेक नावें घेते, वाचेंत येऊन बोलणें करिते, व हातांत येऊन देणेघेणें करिते, पायाच्या ठिकाणीं गति देते व दोन्ही अधोद्वारीं मलमूत्रविसर्जन करिते. पंचकर्मेंद्रियांप्रमाणें पंचप्राणांतही तीच व्यापार करिते. प्राण-नाभीपासून हृदयापर्यंत, उदान-हृदयावरच्या येण्याजाण्याचा व्यापार, अपान— खालच्या द्वारांकडून वाहणारा वायु, व्यान—व्यापकपणानें वावरणारा, समान—सर्व सांध्यांत भरणारा याप्रमाणें पंचप्राणरूपानें विविध चेष्टा करणारी क्रियाशक्ति हें चौथें कारण आहे. ( ५ ) दैव ह्म० चक्षुरादि इंद्रियांच्या ठिकाणचा देवतागण. कर्म ह्मणून जेवढें आहे ते उत्पन्न होण्याचीं हीं पांच कारणें आहेत. शरीर, वाचा व मन यांनीं होणारीं न्याय्य ह्म० शास्त्रपूत व अन्याय्य ह्म० शास्त्राची कास सोडून केलेलीं सर्व कर्में याच पांच कारणांपासून होतात, त्यांचा आत्म्याशीं कांहीं एक संबंध नाहीं. असें असून जे असंस्कृत बुध्दीचे लोक कर्माचे कर्तृत्व आत्म्याला देतात ते आंधळे आहेत असें ह्मटलें पाहिजे.

५ त्रिविध त्यागः—नियत कर्माचा मोहानें त्याग करणें तो तामस, कायक्लेशभयानें त्याग करणें तो राजस आणि संग व फलाशा सोडून कर्तव्य बुद्धीनें तें [ नियत कर्म ] करणें हा सात्विक त्याग. अंधाराच्या रागावर आपल्याच डोळ्यांत बोटें खुपसणें किंवा अर्धशिशीच्या रागावर डोके कापणें तसा तामसाचा त्याग होय! मार्ग बिकट असला तर चालून जायचें काम पाय पाहून घेतील, कां मार्ग बिकट ह्मणून पाय तोडायचे? ' स्वभावें आलें विभागा' तें कर्म सांडतांच येत नाहीं. विहितकर्म माहित आहे, हें आपल्याला करायला हवें हेंही ओळखतो, पण कर्म करणें कष्टाचें आहे, त्यांत शरीर क्लेश आहेत, ह्मणून भयानें, आळसानें तें टाकणें हा राजसत्याग कसा आहे तर प्रवासांत जातांना शिदोरी जड वाटते ह्मणून ती टाकणें किंवा धेनूला वांकडी शिंगें आहेत ह्मणून तीं टाकणें त्यासारखें वेडेपणाचें आहे! येथें कर्माचा त्याग आहे पण त्यागाचें फळ मात्र मिळायचें नाहीं! उतून गेलेलें दूध होमासाठीं खर्चलें, बुडून मेला तर जळसमाधि घेतली, असें ह्मणण्यासारखें तें आत्मवंचन होय! सात्विकत्याग मात्र खरा त्याग होय. ह्म०

'मी हें करित असे । ऐसा आठव त्यजी मानसें । तैसेंच पाणी दे.आशे । फळा-चिये' अशा तऱ्हेनें 'स्वाधिकाराचेनि नांवें । जें वांटिया आलें स्वभावें । तें आचरे विधिगौरवें । शृंगारोनी'—हा खरा सात्विक त्याग होय. संग आणि फल ह्म० 'कर्तत्वाचा मद । आणि कर्मफळाचा आस्वाद' हाच कर्मबंध आहे व त्याचा त्याग ह्मणजेच खरा त्याग आहे, मोहानें किंवा कायक्लेशभयानें विहितकर्मच सोडून देणें हा त्याग नाहीं. सात्विक त्यागानें आत्मबुद्धीचे डोळे उघडतात, व सात्विक त्यागी आवडतें किंवा शुभकर्म हर्षानें करावें व नावडतें किंवा अशुभ-कर्म द्वेषानें टाकावें हें दोन्ही भाव धरीत नाहीं ह्मणून कर्म आणि कर्ता हा द्वैतभाव त्याच्या ठायीं उरत नाहीं. 'शरीराचेनि आभासें । नांदत जंव असे । तंव कर्म-त्यागाचें पिसें । काइसें तरी' हें जाणून तो कर्मत्याग न करितां फक्त कर्मफल त्याग करितो. 'कर्मफळ ईश्वरीं अर्पे । तत्प्रसादें बोध उद्दीपे । तेथ रज्जुज्ञानें लोपे । व्याळशंका ॥ २२८ ॥ तेणें आत्मबोधें तैसें । अविद्येसी कर्म नासे । पार्था त्यजिलें । जें ऐसें । तें त्यजिलें होय' ॥ २२९ ॥

६ कर्माचें फळ त्रिविध आहे इष्ट, इष्टानिष्ट (मिश्र) व अनिष्ट अथवा स्वर्ग, मृत्युलोक व नरक ह्म० देवयोनि, मनुष्ययोनि व कृमिकीटलोष्ठ किंवा स्थावर योनि; 'देव मनुष्य स्थावर । यया नांव जगडंबर । आणि हे तंव तिन्ही प्रकार । कर्मफळाचें' ॥ २३९ ॥ जो अत्यागी आहे त्याला मेल्यावर हें फळ भोगावें लागतें, 'नतु संन्यासिनां क्वचित्'—पण जे त्यागी उर्फ संन्यासी उर्फ ज्ञानी आहेत त्यांना या कर्मफळाची भीति नाहीं कां कीं फळत्यागासवेंच त्यांचा कर्म-त्याग झालेला असतो—'फळत्यागें कर्माचें । सारिलें काम'. कर्म आणि आत्मा यांचा संबंध ह्मणजे पूर्वपश्चिमेसारखा आहे! हा ज्ञानप्रधान संन्यास किंवा त्याग होय. 'फिटलिया निद्रेचा ठाव । कैंचा स्वप्नासी प्रस्ताव । मग सत्य कीं तें वाव । कोण ह्मणे ॥ २६५ ॥ तैसें गा संन्यासें येणें । अविद्येसीच नाहीं जिणें । मा तियेचें कार्य कोणें । घेपे दीजे?' ॥ २६६ ॥ जगदाभासमिपानें स्फुरणारें हें त्रिविध फळच जेथें उरत नाहीं तेथें भोग्यभोक्ता हा अपापच संपलें. आत्म्याचा कर्माशीं कांहीं संबंध नाहीं. आत्म्याच्या ठिकाणीं दिसणाऱ्या क्रिया दुसऱ्याच कारणांकडून होत असतात, तीं कारणें तुला सांगतों. 'सांख्ये कृतांते प्रोक्तानि' ह्म० सांख्य व वेदांत शास्त्रांत कर्माचीं जीं पांच कारणें सांगितलीं आहेत तीं ऐक. हें कारणपंचक सकलकर्माचें बीज आहे, येथें आत्म्याचा कांहीं संबंध नाहीं. 'आत्म-तत्व उदासीन । तें ना हेतु ना उपादान । ना तें आंगें करी संवाहन (साहाय्य) कर्मसिद्धीचें' ॥ ४०६ ॥ तीं कारणें ह्म० अधिष्ठान [देह,] कर्ता [जीव,] पृथ-

ग्विध करणें [ पंच ज्ञानेंद्रियें, ] पृथग्विध विविध चेष्टा [ पंच कर्मेंद्रियें व पंच-प्राण यांचे व्यापार] व दैव (इंद्रिय दैवतांचा समुदाय) हीं होत. देहाला अधिष्ठान ह्मणायचें कारण 'स्वभोग्यैंसीं वसे भोक्ता येथ' हें होय. इंद्रियांना राबवून प्रकृति जीं सुखदुःखें पैदा करिते तीं भोगायला पुरुषाला देहावांचून दुसरा आश्रय नाहीं ह्मणून ह्या चोवीसतत्वांच्या देहाला अधिष्ठान ह्मटलें आहे. येथें देहपणें कर्ता ह्मः जीव- 'आपुलेनि विसरें। चैतन्यचि देहाकारें। आभासोनि आविष्करे।देहपणें जें'तें चैतन्याचें प्रतिबिंब. असो. कायेनें, वाचेनें व मनानें मनुष्य जीं जीं(स्थूलसूक्ष्म) कार्यें करीत असतो. मग तीं न्याय्य (शास्त्राला धरून) असोत वा अन्याय (शास्त्राच्या साहाय्यावांचून घडणारीं) असोत-त्यांचीं कारणें हीं पांचच आहेत. असा प्रकार असू-नही जो देहात्मवादी कर्मांचें कर्तृत्व आत्म्याकडे लावतो तो केवळ अंध होय- 'देहाहं-मानभुली। जयाची बुद्धि देहींच आतली। तया आत्मविषयीं जाली। मध्यरात्री गा ॥ ३८१ ॥ जेणें चैतन्या ईश्वरा ब्रह्मा। देहचि केलें परमसीमा। तया कर्ता हे प्रमा [ निश्चय ] अलोट उपजे ॥ ३८२ ॥ आत्माचि कर्मकर्ता। हाही निश्चय नाहीं तत्वता। देहचि मी कर्मकर्ता। मानितो साच ॥ ३८३ ॥ जे आत्मा मी कर्मातीत। सर्व कर्मसाक्षीभूत। हे आपुली कहीं मात। नायकेचि कानीं' ॥ ३८४ ॥ आणि हें साहजिकच आहे. घुबड दिवसाला रात्र मानीत नाहीं काय? ज्यानें आकाशीचा सत्य सूर्य कधीं पाहिला नाहीं त्यानें थिल्लरोदकांतल्या प्रतिबिंबालाच सूर्य मानलें तर यांत नवल तें काय? त्याप्रमाणें 'शास्त्रगुरूचेनि नांवें। जो वाराही टेंकों नेदी शिवे' त्यानें देहालाच आत्मा ह्मणावें व कर्मातीत आपल्या आत्मभावाला ओळखूं नये हें त्याच्या अंधत्वाला साजेसेंच आहे! 'पाहे पा बंधभावना फुडा। नळियेवरी तो बापुडा [ पोपट ]। काय मोकळेयाही चवडा। न ठकेचि पुंसा?' ह्मणून तो प्रकृतीचें कार्य निर्मळ आत्मस्वरूपावर आरोपित करितो. असो त्या अज्ञान्याची गोष्ट, आपण आतां ज्ञान्याकडे पाहूं. तो 'कर्मामाजी असे। परी तयातें कर्म न स्पर्शे' वेगळेपणानें कर्मांत असणारा तो कवणें ओळखावा? 'जे मुक्तातें निर्धारितां। लाभे आपलीच मुक्तता। जैसी दीपें दीसे पाहतां। आपली वस्तु'॥ ३९७ दर्पण स्वच्छ केला कीं आपलेंच तोंड त्यांत दिसतें, 'तैसें हारपले आपणपें पावे। तैं संतांतें पाहतां गिवसावें। ह्मणोनि वानावे ऐकावे। तेचि सदा' ॥ ४०० ॥ चामड्याच्या डोळ्यांत निर्मळ दृष्टि असून ती जसी चामड्यानें लिप्त होत नाहीं तसा 'कर्मीं असोनि कर्में। तो नागवे समविषमें'— आत्मज्ञानी कर्मांत असून शुभाशुभकर्मांनें लिप्त होत नाहीं. 'यस्य नाहंकृतो भावो'— अविद्येच्या निद्रेत विश्वस्वप्नाचा जो अनुभव घेत होता त्यास महावाक्याच्या उपदेशानें गुरूनें थापटून जागे केले, त्याबरोबर-'तसा

विश्वस्वप्नेंसी माया । नीन्द सांडूनि धनंजया । सहजेंचि चेइला । अद्वयानंदपणें जो ॥ ४०५ ॥ चंद्रकिरण फांकतांच मृगजळ नाहींसे होतें किंवा बाळपण संपतांच बागुलाची भीति नष्ट होते त्याप्रमाणें अद्वयानंदाचा अनुभव होतांच अहंममता डोकेंच वर काढीत नाहीं. सूर्य कोठेंही— भूयारांतही–शिरला तरी त्याच्यापुढें अंधार उभा राहत नाहीं. "तैसा आत्मत्वें वेष्टिला होये। तो जया जया दृश्यातें पाहे। तें दृश्य द्रष्टेपणेसी होत जाये । तयाचेंचि रूप' ॥४१०॥ आत्मभावानें व्यापलेला तो ज्या ज्या दृश्याकडे पाहतो तें तें दृश्य द्रष्टेपणासगट त्याचेंच रूप होतें. मग 'मीच सर्व आहे' ही त्याची व्यापक अहंता-मी देह आहे मी जीव आहे अशा क्षुद्र देहभावादिकांनीं काय मर्यादित होईल? जगत्प्रकाशक सूर्य काय बिंबाएवढा लहान होईल? 'पै मथुनि लोणी घेपे । तें मागुती ताकीं घापे । तरी तें लिप्त–पणें सिंपे । तेणेसी काई?' मंथून काढलेलें लोणी पुन्हां ताकांत घातलें तर तें काय ताकांत मिसळेल? घर्षणानें काष्ठांतून अग्नि वेगळा केल्यावर काय तो लांक--डाच्या पेटींत राहील? 'तैसें जें तेणें करावें। तो तेंचि आहे स्वभावें। मा कोणे कर्मीं वेष्टावें । वेगळेपणें?' ॥४२०॥ याप्रमाणें बोधानें ज्याचा अहंकर्तृत्वभाव नाहींसा झाला तरी देह आहे तोंवर कर्में आहेतच. (पंचकारणांकडून प्रकृति कार्य करवी-तच राहते.) वारा वाहून थांबला तरी वृक्षाचा डोल राहतोच, गायनसमारंभ आटपल्यावरही गायनांत वाहवून गेल्याचा क्षोभ राहतोच, सूर्यास्तानंतरही संध्या-प्रकाश कांहीं काळ उरतोच, लक्ष्य भेदल्यावरही बाणांतला पूर्वीचा वेग शिल्लक राहतोच, अथवा चाकावर मडकें तयार करून तें कुंभारानें बाजूला काढलें तरी चक्राची मागील गति शिल्लक राहतेच, 'तैसा देहाभिमान गेलियां। देहें जेणें स्वभावें धनंजया। जालें—तें अपैसया। चेष्टवीच' ॥ ४२८ ॥ प्राचीन संस्कारव--शानें पांचही कारणें कर्म करवितात तरी तो त्या कर्मांत सांपडत नाहीं, इंद्रियग्राम काय राहटतो हेंही तो पाहत नाहीं, 'तया कर्मामार्जी मग। संहरो आघवें जग। कां नवें चांग। अनुकरो (रचो),त्याच्या देहादि चेष्टांत 'घडतां मोडतां हे सृष्टि' तो त्यांत कर्तृत्वानें नाहीं. 'मुक्ताचें देह तैसें। हाले चाले संस्कारवशें। तें देखोनि लोक पिसे। तो कर्ता ह्मणती' ॥ ४४७ ॥ ह्मणोनि कार्य कर्ता क्रिया। हे स्वरूपचि जाहलें जया। नाहीं शरीरादिकीं तया। कर्मबंध ॥ ४५३ ॥ जो केवळ आत्मरूप झाला त्याला कर्माची बंदिशाळ नाहीं. तात्पर्य आत्मवान् पुरुषाच्या हातून सर्व–भूतांचा क्षय झाला तरीही तो कोणाला मारीत नाहीं व त्या कर्माचा बंध (दोष, लेप) त्याला नाहीं. आतां अज्ञानाच्या कर्माची त्रिपुटी कोणती हें तुला सांगतों.

# श्रीकृष्णाचें चरित्रदर्शन.

लेखकः—ना. श्री. वाटवे D. C. T. C. D. F. C. ( London )

## श्रीकृष्ण आप्तांची तरतूज करतात.

### प्रकरण १३ वें

( मागील अंकावरून पुढे चालू )

म्हणजे मीं ह्या जगांतील दुःखी सज्जनांचा मातापिता, पाठिराखा, प्रतिपालक, पोशिंदा, धनी, न्यायदाता, तिऱ्हाईत, आधारस्थान, व हिताचे चार शद्ब सांगणारा मित्र अशा सर्व नात्यांनीं युक्त आहे—म्हणून सांगणाऱ्या श्रीकृष्णांनीं स्वकुटुंबाच्या बाहेर नजर देऊन पाहूं लागतांच त्यांना अत्यंत दुःखानें गांजलेल्या व विपत्तींत सांपडलेल्या आपल्या आतेची म्हणजे कुंतीची आठवण झाली; व त्यांनीं राजदरबारीं काम केलेला असा आपला चुलता जो अक्रूर त्याला हस्तिनापुरीं पाठवून दिलें; व तिची चौकशी करवून हस्तिनापूरच्या दरबाराला असें जाणवून ठेवलें कीं कुंतीचा कोणीतरी विचारता सवरता आहे, ती अगदींच निराधार नाहीं. तसेंच ह्या त्यांच्या कृत्यानें तिलाही धीर आला व वाटूं लागलें कीं आपली काळजी घेणारा म्हणून कोणीतरी आहे, आपल्या अल्पवयी निराधार मुलांना एका पराक्रमी मामेभावाचें पाठबळ आहे.

याप्रमाणें सुरवात करून श्रीकृष्णांनीं एकदां जी पांडवांची काळजी करायला सुरवात केली ती अगदीं शेवटपर्यंत चालू ठेवली होती. एकदां ज्याला आपला म्हटला अशा मैत्रीनें वागणाऱ्याला श्रीकृष्णांनीं कधींच सोडला नाहीं, एवढेंच नव्हे तर एकदां ज्याला आपला म्हटला असा पुढें शत्रुत्व करूं लागला तरीही त्याला होतां होईतों पर्यंत दुखविलें नाहीं. आपले आतेभाऊ शिशुपाळ, विंदानुविंद ह्यांना, रुक्मिणीचा बंधू रुक्मी याला, व स्यमंतक मणी दडवून ठेवणाऱ्या अक्रूराला, त्यांनीं ह्याप्रमाणें वागविलेलें दिसून येत आहे. अगदींच नाइलाज झाला तेव्हां त्यांनीं शिशुपाळाला मारलें, विंदानुविंद यानीं स्वतां श्रीकृष्णावरच शस्त्र प्रेरल्यामुळें शस्त्रानें उलट खाऊन त्यांतील एकाला ठार मारलें व दुसऱ्याला अर्जुनानें मारलें. अक्रूराला तर त्यांनीं क्षमा करून वरतीं त्याला तोच मणी बक्षीसही दिला. गुरुजींनीं त्यांना जो ' असा दया धर्मों ' व ' शिरा क्षमावर्मो ' असा उपदेश केला होता तो त्यांनीं अगदींच नाइलाज होईपर्यंत सोडला नाहीं.

पांडवानिसबत त्यांना पडलेल्या व त्यांनीं सोसलेल्या कष्टांना तर सीमाच नाहीं! हनुमंतानें रामावतारीं सेवक या नात्यानें त्यांची जशी निस्सीम सेवा केली

तशीच कृष्णावतारीं त्यांनीं पाठिराखा आहे या नात्यानें पांडवांची काळजी घेतली. भगवंतांच्या प्रेमाला व कृपेला तोड नाहीं! आईची ममता व लोभही त्यापुढें फिका पडतो! म्हणूनच समर्थ म्हणतातः—

पाहतां देवाच्या कृपेसी। मातेची कृपा कायसी?॥
माता वधी बाळकासी। विपत्तिकाळीं॥ १॥ (परंतु)
देवें भक्त कोण वधिला। कधीं देखिला ना ऐकिला॥
(उलट) 'शरणागतास देव झाला। वज्रपंजरू॥ २॥

व म्हणूनच ते म्हणतात,

'देव (च) प्रीति राखों जाणें।' व म्हणूनच
'देवास (च) करावें साजणें'॥
बाकीचीं 'जिवलगें' तीं त्यांच्या मतें तरी 'अवघीं
पिसुणें (प्राण घेणी)। ऐशीं वाटती'॥ असो.

याप्रमाणें दोघांना दोन ठिकाणीं पाठविल्यावर कुब्जेला दिलेल्या वचनाची पूर्तता करण्यासाठीं भगवान् तिच्या घरीं गेले, व त्यांनीं तिचा आदरसत्कार स्वीकारला.

थोड्याच दिवसांत उद्धव गोकुळाहून परत आला, व त्यानें यशोदेनें तूप-साखरेनें भरून दिलेल्या वाट्या रामकृष्णांपुढें ठेवून त्यांना नमस्कार केला, व म्हणाला, नंद म्हणतो. 'डोळ्यांपुढें दिससि परि, कां गा! विरहाग्नि भाजितो आंगा? तसेच यशोदेचा व बाकी सर्वांचे निरोप कथन करून उद्धव आपल्या घरीं गेला.

आणखी थोड्याच दिवसांत अक्रूरही हस्तिनापुराहून परत आला व त्यानें घडलेली व पाहिलेली सर्व हकिगत जशीच्या तशीच श्रीकृष्णांना येऊन विदित केली. तो म्हणाला, मीं पहिल्यानें गेल्याबरोबर धृतराष्ट्राला भेटलों, मग भीष्म, विदुर, द्रोण, कृप, व कुंती यांनाही भेटलों. धृतराष्ट्रपुत्रांची व तुझे आतेभाऊ जे पांडव त्यांचीही ओळख करून घेतली. सर्वांनीं माझा सत्कार केला. राजा धृतराष्ट्र याच्या स्वभावासंबंधींची वगैरे माहिती मिळावी म्हणून आणखी थोडे दिवस हस्तिनापुरींच राहिलों होतों. मला असें कळून आलें आहे कीं आपल्या दुष्ट मुलांच्या दुष्ट चेतांना वश होऊन धृतराष्ट्रानें भीष्मादि कुरुवृद्धांना मोठी काळजी उपस्थित केली आहे. पांडव सुरक्षित कसे राहतील याची त्यांना मोठी फिकीर वाटत आहे. पांडवांच्या गुणांमुळें सर्वांच्या मनाचा ओढा त्यांच्याकडे आहे असें पाहून धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाला फारच वाईट वाटत असून त्याच्या विषयींच्या

मत्सरानें तो नेहमीं जळत असतो. धृतराष्ट्र तोंडानें मात्र गोडगोड बोलतो पण त्याचें अंतःकरण अतिशय कपटी व निष्ठुर आहे. आपण वडील, आपले शंभर मुलगे, आपल्या हातीं राज्य आहे, अशा तऱ्हेचा त्याला मोठा गर्व आहे. विदुर मला म्हणाला,:—

साधो ! काय करावें या पुत्रस्नेहमद्यरसमत्ता ? ।
मोठा द्वेष सुयोधन करितो; भीमासि मारिलें होतें ॥
विष चारून बुडविलें. मरण मुकुंदेंचि वारिलें हो ! तें '
भगिनी पृथा ह्मणे ' या विटल्यें दुर्जीवितास दादा ! मीं ।
दैवें अहर्निश मला चिंतेच्या बांधिलें सदा दामीं! ॥ १ ॥
गर्हित वैधव्य, मुलें लघु, चिंतिति नित्य पाप दायाद, ।
गेहांत भोगितें मन, जैसें जाळांत आपदा याद ॥ २ ॥
वद वारावे कैसे वृक, हरिणीनें स्वपाडसा डसते ? ।
जे वन्हितप्त, पावति दायादांचा न पाड सांडस ते ॥ ३ ॥
ते माद्री धन्या; मीं न तशी, म्हणवूनि भोगित्यें कष्ट; ।
विधिनें उपेक्षितां मज, बंधुजनेंही उपेक्षिलें स्पष्ट' ॥ ४ ॥

तसेंच ती मला म्हणाली, 'वारील काय माझें दुःख श्रीकृष्ण, जेविं बापाचें ? ।
त्या कंसाचें तैसें भस्म करिल काय याहि पापांचें ? ॥ ५ ॥
सुचलें बरें तुम्हांला, भेटावेंसें कसें मनीं आलें ? ।
देईल कृष्ण कर मज, बुडतां व्यसनार्णवीं ? सदा दात्या ।
जलदासि चातकीसी ध्यातें दीनाश्रयास दादा ! त्या ॥ ६ ॥

असें म्हणून तोंडावर पदर धरून ती रडूं लागली. तेव्हां मीं व विदुर तिला म्हणालों, ' भिऊं नको; श्रीकृष्ण तुला सर्व संकटांतून मुक्त करील. तुझे मुलगेही देवतांचे अंशभूत आहेत. तेही मोठे होऊन पुढे पराक्रम करतील.

याप्रमाणें सांगून मीं तिचे डोळे पुसले व तिचें कसेंबसें समाधान करून धृतराष्ट्राला पुन्हा जाऊन भेटतों व असें न करण्याविषयीं त्याला बजावून सांगतों, अशी तिची समजूत करून तिच्या संमतीनेंच मीं परत जाऊन धृतराष्ट्राला भेटलों व त्याला म्हणालों:–

' मोठ्या वंशांत नृपा! जन्म तुझें तूंचि तुज असा मान्य ।
आहेत नृपति पुष्कळ; परि ते सामान्य, तूं न सामान्य ॥ १ ॥
भरतकुळीं अनुज तुझा पांडु गुण श्रेष्ठ करुनि हें राज्य ।
गेला परलोकातें; जोडुनि यश तूंहि मेळवीं प्राज्य ॥ २ ॥

उत्तम गति होय असें वर्तावें, धर्मनीति रक्षावी ।
चित्तांत पूर्वजांची नित्य स्थिति, रीति, शांति लक्षावी ॥ ३ ॥
वर्तावें सम; जैसे शत तैसे पांच पांडुचे मानीं ।
होईल विषमभावें कुळशिवसत्कीर्तिसत्क्रियाहानी ॥ ४ ॥
ते पांडव काय उणे? हे तुजला अधिक काय? जो रानीं ।
लुटिला कुटिलांनीं तूं दुर्बळ होऊनि पुत्रचोरांनीं ॥ ५ ॥
वाटेंत कुटुंब पथिक भेटि न बहुकाळ गांठि बा ! यासीं ।
देहहि जायाचें, ज्या रक्षाया पडति जीव आयासीं' ॥ ६ ॥

(मोरोपंत)

हें माझें बोलणें शांतपणें ऐकून घेऊन धृतराष्ट्र मला म्हणाला कीं" तूं बोलतोस तें खरें आहे. अंतःकरणांतला अज्ञानजन्य मोह निवारण व्हायला असलेंच ज्ञानज्ञ–णीत अंजन पाहिजे. तूं जें बोललास हें मला समजतें. परंतु माझ्या ह्या हृदयाची स्थिती एखाद्या बिन् भाजलेल्या मातीच्या घागरीसारखी आहे. ह्यांत कितीही उपदेशामृत ओतलें तरी तें हळुहळू झिरपून जाऊन तो आपला पुन्हा कोरा ठणठ-णीत होतो. तुझ्या सारख्या साधूनें सांगितलेलें मला पटतें. नाहीं असें नाहीं. परंतु काय करूं? माझे मुलगे येऊन मला काय काय सांगूं लागले कीं मला तें अत्यंत हितकारक वाटूं लागतें. तरी मीं एवढेंच म्हणतों कीं,

'ईश्वर करो विहित जें आम्हां जीवांसि, तोचि परमहित ।'

अशा तऱ्हेचें त्याचें हें नक्राश्रुयुक्त भाषण श्रवण करून मीं म्हटलें 'ठीक आहे. ईश्वराला जें कांहीं करावयाचें आहे तें तो करीतच आहे व करीलही;' व तेथून त्याचा निरोप घेऊन निघालों तो पुन्हा येऊन कुंतीचा व विदुराचा निरोप घेऊन इकडे आलों व आपणास हें इत्थंभूत वर्तमान कळविलें आहे. आता आपली मर्जी असेल तसें करावें:--

हें सर्व ऐकून श्रीकृष्णांनीं एक दीर्घ सुसकारा टाकला, व अक्रूराला निरोप दिला.

ह्या प्रसंगाचें इतकें विस्तृत विवेचन करण्याचें कारण इतकेंच कीं ही अक्रूर-शिष्टाई म्हणजे श्रीकृष्णांनीं पुढें पांडवांना हाताशीं धरून जें सार्वत्रिक सार्वजनिक सार्वराष्ट्रीय, व सर्व प्रकारचें बहुजनसमाजाच्या हितासाठीं, अधर्माचा पाडाव होऊन धर्माची स्थिरस्थापना होण्यासाठीं, समाजकंटक, राष्ट्रकंटक व व्यक्तिकंटक शोधनाचें महत्कार्य घडवून आणलें त्याच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभच होय असें म्हटलें पाहिजे.

आतां या ठिकाणीं कोणी असा प्रश्न उपस्थित करील कीं, श्रीकृष्णांना हें विकत श्राद्ध घेऊन एवढें सव्यापसव्य करण्याचें कारण तरी काय होतें? तर त्याला आमचें उत्तर असें कीं तें त्यांचें अवतारकार्यच होतें! श्रीकृष्णांनीं स्वतांच सांगितल्याप्रमाणें त्या काळीं धर्माला ग्लानी येऊन अधर्माचें प्राबल्य माजलें होतें; त्यामुळें भगवंतांना 'साधूंच्या रक्षणासाठीं दुष्टांच्या पारिपत्यार्थ व धर्माची घडी पुनरपि नीट बसवावी म्हणून' श्रीकृष्णांच्या रूपानें अवतार धरावा लागला होता. असो.

अधर्माचें प्राबल्य व्हायला दोन तऱ्हेच्या लोकांच्या प्रवृत्ती कारणीभूत होत असतात. ते दोन प्रकार असे:—

(१) स्वतांच्या शरीरबलाच्या द्रव्यबलाच्या, मनुष्यबलाच्या सत्ताबलाच्या वगैरे जोरावर बेधडक अधर्म माजवून देऊन सज्जनांना छळण्याचें व्रत नित्य घेत राहण्यासाठीं दंड थोपटून नेहमीं सज्ज असलेले उद्दाम पुरुष—राजे वगैरे अथवा गीता अ० १६ श्लोक ७, ८, व ९ यांत वर्णन केलेल्या गुणांचे लोक, व

(२) तितकी धमक स्वतांच्या आंगीं नसल्यामुळें दुसऱ्याच्या आश्रयानें व केव्हां केव्हां आपल्या कृत्यांवर धार्मिकपणाचा व न्यायीपणाचा सफेदा फांसून त्यांच्या आड राहून अशीं कृत्यें करणारे शेंदाड, निर्लज्ज व मेकट वृत्तीचे पुरुष अथवा गीता अ० १६ श्लोक १७ व १८ यांत वर्णन केलेल्या गुणांचे लोक, अशा दोन्ही तऱ्हेचे अधर्मी पुरुष श्रीकृष्णांच्या काळीं होते; व त्यांनीं हें अधर्माच्या सक्रिय प्रसाराचें व धर्माला ग्लानी आणण्याचें काम चालू ठेवलें होतें. तें कसें तें आतां पाहूं.

त्या काळीं सर्व दांडग्या व दुष्ट राजांनीं मिळून एक मोठा कट करून न्यायनीति वगैरेंचीं सारीं बंधनें तोडून टाकून स्वैर वागावें, धर्मशास्त्र वगैरे मुळींच मानूं नये, वडिलांचा व श्रेष्ठांचा अवमान करावा, त्यांच्याशीं बरोबरी करावी. सर्वांना तुच्छ मानावें, सर्व तऱ्हेच्या निषिद्ध हत्या कराव्यात, परस्त्री व परद्रव्य हरण करावें अशीं एक का दोन सारीं पापकर्में करावींत, असा बेत केला होतासा दिसतो.

कंसानें अक्रूराला सांगितलें कीं रामकृष्णांना मारल्यावर

'ततश्चैषा महीमित्र भवित्री नष्टकंटका ॥
जरासंधो मम गुरुर्द्विविदो दयितः सखा ॥ १ ॥
शंबरो नरको बाणो मय्येव कृतसौहृदाः ॥

तैरहं सुरपक्षीयान्हत्वा भोक्ष्ये महीं नृपान्' ॥ २ ॥

म्हणजे नंतर ही पृथ्वी निष्कंटक होणार आहे. कारण जरासंघ तर माझ्या मताबाहेर जाणार नाहीं कारण तो माझा सासराच आहे. द्विविद हा माझा प्रिय मित्र आहे. शंबरासुर, नरकासूर, बाणासूर, हे सर्व माझे दोस्त बनलेले आहेत. व मीं मग ह्या सर्वांच्या मदतीनें सर्व देवपक्षीय म्हणजे धर्मनिष्ठ राजांना मारून ह्या सर्वपृथ्वीचें राज्य एकछत्री करून माझ्या सत्तेखालीं आणणार आहे.'

ही वरील मंडळी म्हणजे पहिल्या प्रतीची मंडळी होत, व कौरव वगैरे ही दुसऱ्या प्रकारची मंडळी समजावी. ह्या मंडळींपैकीं जरासंधाचे कित्येक साथीदार व मांडलिक राजे शिशुपाल, कालयवन, व रुक्मी इत्यादि मंडळीं, शाल्व, हंस, डिंभक, शृगाल, पौंड्रक वासुदेव, व त्याचे स्नेही, द्विविद, कंस, शंबर नरक, बाण आदि करून मंडळी ह्यांना स्वतां श्रीकृष्णांनीं मारलें व खुद्द जरासंध, कौरव, व तत्पक्षीय दुष्ट राजे ह्यांना त्यांनीं पांडवाकरवीं मारविलें. कारण स्वतां श्रीकृष्णांनीं त्यांना, एका जरासंधाच्या बाबतीखेरींज, मारावें असें कांहींच कारण घडून येण्यासारखें नव्हतें, व शेवटपर्यंत आलेंही नाहीं. परंतु त्यांच्या दुष्ट गुणांमुळें व कृत्यांमुळें त्यांचा संहार करणें तर अत्यंत अवश्य होतें. म्हणून श्रीकृष्णांनीं पांडवांचा न्यायी पक्ष घेऊन त्यांचा संहार करण्याचें काम उरकून घेतलें.

ह्या सर्व मंडळीचीं कृत्यें जगजाहीरच असल्यामुळें तीं एथें सांगत बसत नाहीं. या ठिकाणीं एवढेंच सांगून ठेवतों कीं ते सर्व आपापल्या परी धर्मसेतूचें उल्लंघन करण्यांत गुंतलेले होते. कंसाच्या कृत्यांचा उल्लेख मागेंच झालेला असून ही सर्व मंडळी कमीअधिक प्रमाणांत त्याचे साथीदार होत, एवढें सांगितलें कीं त्यांच्या वर्तणुकीचा अंदाज कोणालाही बांधतां येईल.

वरील पहिल्या प्रतीच्या दुर्वृत्त माणसांचें वर्तन व्यक्तिगत व व्यक्तींपुरतेंच असल्यामुळें त्यांचा बंदोबस्त करणें श्रीकृष्णांना सोपें गेलें. कारण ह्या मंडळींना मारून टाकतांच त्यांच्याबरोबर त्यांचें दुर्वतन ही लयास गेलें. परंतु दुसऱ्या तऱ्हेच्या प्रच्छन्न धर्मविध्वंसकांचा बंदोबस्त करणें श्रीकृष्णांना तितकें सोपें गेलें नाहीं; कारण ते लोक धार्मिकपणाचा व न्यायीपणाचा आव आणून अधर्म करीत असत म्हणून त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं श्रीकृष्णांना बरेच प्रयास पडले. व त्या कामांत त्यांच्या अंगचे सर्व गुण चांगलेच कसोटीला लागले. ते कसे तें पुढें दिसून येणारच आहे. असो.

ह्या सर्व खटाटोपांत साधूंचें परित्राण व प्राधान्येंकरून दुष्टांचा विनाश तर ठरलेलाच होता परंतु धर्माची स्थापना करण्यानिमित्त करावयाचीं कामें त्यांत

होणें दुर्घट होतें. परंतु तेंही काम भगवंतांनीं अर्जुनाचा विषाद घालविण्याच्या निमित्तानें अत्यंत उत्तम रीतीनें उरकून घेतलें व आपलें अवतारकार्य तडीस नेलें.

आम्हीं पण ह्या ठिकाणीं श्रीकृष्णाच्या पुढील चरित्राचा थोडक्यांत आढावा काढला आहे असें म्हणतां येईल.

ह्या ठिकाणीं कृष्ण चरित्राचा पूर्वभाग पुरा झाला. एथपर्यंतचें कृष्णचरित्र म्हणजे त्यांच्या चरित्रगंगेचें गंगोत्रीपासून ब्रह्मावर्तापर्यंतचें प्रयाण समजतां येईल. एथून पुढें ही गंगा राजमैदानांत आल्यामुळें फारच संथ, रुंद, व खोल पात्रांतून जात जात शेवटीं अवतारसमाप्तीरूपी सागराला मिळून धन्य होते.

---

# ज्ञानेश्वरींत वीररस !

वीररसाचें उत्कृष्ट उदाहरण पहिल्याच अध्यायांत आहे. कौरवपांडवांचें सैन्य, उभयपक्षांचे समोरासमोर संग्रामार्थ ठाकलेले वीर, त्यांनीं आस्फुरलेले शंख व त्या महाघोषनिर्घातानें शत्रुपक्षीय सैनिकांचीं उडालेली गाळण, ह्या सर्व प्रसंगाचें वर्णन वीररसोत्पादक आहे. नाना व्यूहांनीं सिद्ध झालेलें पांडवदळ रणोत्सुक झालें. तें 'जैसें महाप्रळयीं पसरलें । कृतांतमुख' किंवा 'उसळलें कालकूट' अथवा 'प्रळयवातानें भडकलेला व सागर शोषून आकाशापर्यंत उधवलेला वडवानळ' तसें खवळलें, तथापि वीरवर अशा दुर्योधनानें 'जैसें न गणिजे पंचाननें । गजघटांतें' हत्तींच्या कळपांकडे सिंहानें तुच्छतेनें पाहावें त्याप्रमाणें तुच्छतेनें त्या सैन्याकडे पाहिलें व तो द्रोणाचार्यास ह्मणालाः "गिरिदुर्ग जैसे चालते । तैसें विविध व्यूह भवंतें' पाहिलेंत ना ! तुह्मी ज्याला कृतविद्य केलेंत त्या तुमच्या शिष्यानें त्या द्रुपदकुमार धृष्टद्युम्नानें हा सैन्यसिंधु पोखरिला—पसरिला आहे ! 'शस्त्रास्त्रीं प्रवीण । क्षात्रधर्मीं निपुण' असे बळानें, प्रौढीनें व पौरुषानें भीमार्जुनासारिखे आणखीही अनेक वीर पांडवांकडे उभे आहेत ! हा विराट, हा महारथी द्रुपद, हा धृष्टकेतु, हा शैब्य, हा युधामन्यु, हा सुभद्रानंदन दुसरा अर्जुनच असा अभिमन्यु, असे हे अनेक महारथी पांडवाच्या बाजूनें युद्धास उभे आहेत. आमच्या दळींही तुमच्या बरोबरीनें 'हा भीष्म गंगानंदनु । जो प्रताप तेजस्वी भानु । रिपुगजपंचाननु । कर्णवीर'—असे एकेकाच्या मनोव्यापारानें विश्व संहरेल असे हे महारथी आहेत. हा कृपाचार्य एकटाच पुरे. 'ज्याचा अडदर (धाक) सदा वाहे । कृतांत मनीं' असा हा अश्वत्थामा असे हे अनेक 'शस्त्रविद्यापारंगत ।

मंत्रावतार मूर्त । ' अप्रतिमल्ल वीर आमच्या बाजूनें रणांगणीं ठाकले आहेत, आणि हे आमच्या कार्यापुढें स्वतःचें जीवित्वही तुच्छ गणाणारे उत्कट स्वामिभक्त आहेत शिवाय येथें ' क्षत्रियामाजीं श्रेष्ठ । जो जगजेठी जगीं सुभट ' अशा भीष्माला आह्मी ' दळवैपणाचा पाट'—सेनापतित्वाचा अधिकार दिला आहे. समुद्राला वडवानळाचें किंवा प्रळयवन्हीला महावाताचे, तसे आमच्या ह्या बलाढ्य महावीरांना भीष्माचें प्रोत्साहन आहे. आमचें सैन्हही पांडवसैन्याच्या दीढीनें आहे. " इतके द्रोणासी बोलून दुर्योधनानें आपले दळभार सज्ज' केले. भीष्मानें सिंहासारखी गर्जना केली व आपला दिव्य शंख आस्फुरिला. त्या प्रचंड नादानें ' त्रैलोक्य बधिरीभूत जाहलें । जैसें आकाश कां पडिलें । तुटोनियां ॥ घडघडीत अंबर । उचंबळत सागर । क्षोभलें चराचर । कांपत असे ॥ तेणें महाघोषगजरें । दुमदुमिताति गिरिकंदरें '— इतक्यांत नाना तऱ्हेचीं रणवाद्यें वाजूं लागलीं, व वीरांचें भयानक रणकोल्हाळ सुरू झाले. कित्येक ' आवेशें भुजा त्राहाटती'—दंड थोपटून आहेत, कित्येक ' विसणेले ( क्षोभलेले ) हांका देती.' महामद भद्रजाती ( हत्ती ) अनावर झाले. भेड इ० कच्चे होते ते पाचोळ्यासारखे उडाले, कोणांचे उभ्याउभ्याच प्राण गेले, कोणाची दांतखिळ बसली ' ऐसा अद्‌भुत तूरबंबाळ । ऐकोनि ब्रह्मा व्याकुळ ! ' इकडे पांडवसैन्यांत श्रीकृष्णानें लीलेनें पांचजन्य आस्फुरिला, तेव्हां त्या गंभीर महाघोषानें कौरवदळीचे तूरबंबाळ कोठच्या कोठें हरपून गेले. त्या घोषांत धनुर्धर पार्थाच्या देवदत्तशंखाचा घोष मिसळला व खवळलेल्या महाकाळतुल्य अशा भीमसेनाच्या महाप्रळयजलधर अशा शंखाच्या निनादाची भर पडली! " तेणें महाघोष निर्घातें । शेष कूर्म अवचितें । गजबजोनि भूभारातें । सांडूं पाहती ॥ तेथ तिन्ही लोक डळमळित । मेरुमांदार आंदोळित । समुद्रजळ उसळत । कैलासवरी ॥ पृथ्वीतळ उलथों पाहत । आकाश असे आसुडत । तेथ सडा होत नक्षत्रांचा ॥ " ( अ० १ ओवी १०३ ते १५६ )

---


# मारुतिउपासना.

प्रथम मारुतिरायाचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी किं ८४ पत्ता:—मुमुक्षु कचेरी, नाशीक सिटी.

# ताकाचे उपयोग

ताक हें सहजरीत्या इंद्रियांचे सूक्ष्म तंतूमध्यें मिसळलें जातें, त्यामुळें रोगोत्पादक जंतूंची व त्याची भेट, लौकर होते. ताकामध्यें बॅसिलस बल्गेरिकस नांवाचे जंतू असतात. ते ताकाचा आत्मा होत. हे जंतू शरीराला त्रास देणाऱ्या जंतूंशीं युद्ध करितात. ते वात [ मेद ] उत्पन्न करणाऱ्या जंतूंवर हल्ला करून त्यांचें उच्चाटन करितात. ताकांत असलेल्या प्रोटीन भागाचे अत्यंत सूक्ष्म परमाणू बनत असल्यानें इतर पदार्थांप्रमाणें तें पचनास जड जात नाहीं. तें फार लवकर पचतें व दुसऱ्यासही पचवितें. घट्ट व पातळ वगैरे पदार्थांचें मिश्रण खाण्यांत आल्यामुळें अन्न पचनास जड होतें; परंतु त्या पदार्थांबरोबर ताक खाल्ल्यानें अन्नाचें लवकर पचन होतें.

ताकांत कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम, सोडियम, फॉस्फरस, क्लोराईन, व सल्फर हीं द्रव्यें थोडथोड्या प्रमाणांत असल्यानें हाडें व रक्त यांचें पोषण होण्यास ताकानें मदत होते. ताकांतील फॉस्फरस क्षार मेंदूचे वाढीस फार उपयोगी पडतो. मनुष्य सारखे अनेक पदार्थ खात असतो व ते पूर्णपणें पचत नाहींत. त्यांतील कांहीं भाग आंतड्यांत राहतो व तो तेथें कुजावयास लागतो. पण अशा वेळीं ताक हें उत्तम प्रकारें काम करूं शकतें. आपल्या आंतड्यांत कुजणारी घाण ताकानें नाश पावते व आंतडें स्वच्छ होतें. ताकाचा उपयोग केल्यानें रुधिराभिसरण चागलें होतें. त्यामुळें ताक खाणाराच्या सांध्याभोंवतीं अशुद्ध द्रव्यें सांचत नाहींत. ताकामुळें पचनशक्ति वाढते. पचनेंद्रिय मजबूत करणें इत्यादि कामें ताक फार उत्तम रीतीनें पार पाडितें म्हणून आपलें शरीर सशक्त दिसण्यास ताकाचा उपयोग करणें अवश्य आहे.

ताकापासून कांहीं रोग नाहींसे होतात. नेहमीं ताकाचा उपयोग करणारा रोगाला आधार देत नाहीं. अग्निमांद्य, मूळव्याध, मूत्रपिंडाचे विकार, वात (मेद) वगैरे रोग ताकाच्या दररोजच्या सेवनानें नाहींसे होतात. लहान मुलें माती खातात त्यावेळीं त्याला ताक द्यावें.

—शिक्षक मासिक.

# टागोरांचें ओजस्वी तत्त्वज्ञान

रवींद्रबाबूंचें तत्त्वज्ञान मानवी जीवनांतील सत्य, सौंदर्य व प्रगतिप्रियता यांच्यावर मुख्यतः अधिष्ठित आहे. केवळ भौतिक सुधारणांची व मानवी गरजांची चक्रवाढीनें वाढ करीत राहिल्यानें खरी मानसिक, नैतिक व आत्मिक शक्ति लाभत नाहीं. तर "हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते" या श्लोकार्धात म्हट-ल्याप्रमाणें, अशा आधिभौतिक सुधारणांच्या एकांगीपणामुळें जगांत जिकडे तिकडे अशांतता, निराशा व दुःख यांचीच चलती झाली आहे असें त्यांचें मत आहे. खरी सांस्कृतिक सुधारणा व्हावयाची असेल तर ती सत्य, विश्वबंधुत्व व विश्वप्रेम या त्रयीमुळेंच होईल. नुसतें जड शरीर किंवा चंचल मन म्हणजेच कांहीं मान-वांची निजस्वरूपें नव्हत कीं, ज्यांच्या लालनपोषणापासून त्यांस अखंड समाधान व शांति हीं लाभतील !

आत्म्याची प्रचंड शक्ति एकदां ओळखली म्हणजे मग माणूस आपला आपणच उत्कर्ष साधण्यास कसा समर्थ होतो याची शिकवणूक रवींद्रबाबूंनीं आपल्या अनेक ग्रंथांतून दिलेली आहे. प्रत्येकास त्याचा आत्मा व त्याचीं आध्या-त्मिक शक्ति यांची पुरेपूर जाणीव व्हावी आणि ती तशी होतांच त्यानें लगेच आळस सोडून व अज्ञान झाडून आपल्या समाजाच्या, आपल्या देशाच्या आणि अखिल मानवजातीच्या सर्वांगीण उन्नत्यर्थ अहर्निश झटावें अशी त्यांची उद्बो-धक शिकवणूक आहे आणि ती आर्यांच्या प्राचीन उपनिषदांतील उच्च तत्त्वज्ञा-नाला साजेशीच आहे.

कवींद्र रवींद्रबाबूंच्या मतें, पाश्चात्य तत्त्वज्ञान प्राधान्येंकरून बुद्धि, तर्क आणि जास्तींत जास्त लोकांचें हित यांच्यावर उभारलें आहे; तर पौर्वात्य तत्त्वज्ञा-नाची भूमिका केवळ आध्यात्मिक शांति व ऐक्य यांच्या पायावर अधिष्ठित झालेली आहे. जगांत आधिभौतिक सुधारणांचा अतिरेक होऊन सुखविलासाची यांत्रिक साधनें मुबलक मिळालीं तरी तीं उपभोगणाऱ्यांच्या हृदयाचें बिलकुल समाधान होत नाहीं, हें दृश्य जिकडे तिकडे पाहण्यास सांपडतें. रवींद्रबाबूंच्या अनेक लघुकथा, कादंबऱ्या, नाटकें, काव्यें, टीकालेख, संदेश वगैरे या आध्या-त्मिक शांतितृप्तीच्या तत्त्वज्ञानानें पानोपानीं भरलेले आहेत.

रवींद्रनाथबाबूंचें ओजस्वी तत्त्वज्ञान कंठरवानें सांगत आहे कीं, लेखकांनो, विचारवंतांनो, समाजसुधारकांनो व व्याख्यात्यांनो ! आधीं आपआपलें आत्मिक व नैष्ठिक सौंदर्य शोधून हस्तगत करा आणि नंतर दुसऱ्यास उपदेश करून त्यांची सुधारणा करण्याचें कंकण हातीं बांधा !

— केसरी.

# श्रीज्ञानेश्वरनमनाष्टक

( लेखक: –रामचंद्र बळवंत खाडिलकर, वकील, नाशिक. )

वृत्त:—भुजंगप्रयात

गुरुश्रेष्ठ जो वंद्य निवृत्ति–दास ।
अलंकापुरीं नित्य ज्याचा निवास ॥
जया दर्शनें शांति येई मनासी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥ १ ॥
असें सत्य संपूर्ण आनंद–मूर्ती ।
जयाची विगर्जे त्रिलोकीं सुकीर्ती ॥
जयाचें सदा नाम घेती मुखेंसी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥ २ ॥
स्वयंसिद्ध साक्षात जो विष्णुरूप ।
प्रकाशीयला पूर्ण भावार्थ–दीप ॥
जगा दर्शवी जो स्वयें सत्पथासी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥ ३ ॥
असें गूढ जें सर्व–ठायीं ठिकाणीं ।
जया वाचिलें वेदशास्त्रादिकांनीं ॥
तया दाविलें स्पष्ट जेणें जनांसी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥ ४ ॥
यथायोग्य जो ज्ञान देई जगाला ।
असा ग्रंथ ‘ ज्ञानेश्वरी ’ निर्मियेला ॥
‘ सुधा स्वानुभूतीच ’ पाजी जनासी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥५॥
करीं प्राप्त नाना कला सिद्धि ज्याच्या ।
परी तो पदीं नम्र झाला जयाच्या ॥
कृपें बोधिली ‘चांग पासष्टि’ त्यासी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥६॥
सबाह्यांतरीं शुद्धबुद्ध स्वरूप ।
गुणैश्वर्यसंपन्न जो सर्वरूप ।
महासिद्धि ही लोळताती पदासी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥ ७ ॥

स्वसामर्थ्ययोगें जडा चालवीलें ।
पशूच्या मुखें वेदही बोलवीलें ॥
असे पूज्य जो सर्वही योगियांसी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥ ८ ॥
दयावंत जो ज्ञान--विज्ञान--ठेव ।
म्हणोनी जया बोलती ज्ञान–देव ॥
बहू सूख दे नाम ज्याचें जिवासी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥ ९ ॥
जयाच्या गुणा पाहुनी ईश डोले ।
म्हणे धन्य मातें ययानेंच केलें ॥
मुखें वानिजे काय कैसें तयासी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥ १० ॥
जयानें दिली सन्मती अष्टका या ।
तयाच्या पदीं ठेवितों अष्ट–काया ॥
सदा जागवी रक्षि या बालकासी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥ ११ ॥
जय श्रीगुरुराज माये दयाळे ।
तुझ्या पाउलीं बाल हा राम लोळे ॥
घडो भक्ति सेवा तुझी लेंकुरासी ।
नमो त्या जगन्मान्य ज्ञानेश्वरासी ॥ १२ ॥

---


# आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्रसंत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृत्तांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्र महोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. ‘ उपकृतिस्मरण ’ हें ७६ श्लोकांचें नवीन आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा ग्रंथांचा व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं. ८१२

# उपनिषदांतील वेंचे

अनुवादकः--श्रीराम गोसावी, नाशीक.

## मुंडकोपनिषत्

## द्वितीय मुंडक

तदेतत्सत्यं यथा सुदीप्तात्पावका द्वि स्फुलिंगाः सहस्रशः प्रभवंते सरूपाः ।

तथाक्षराद्विविधा सोम्य भावाः प्रजायंते तत्र चैवापि यांति ॥

अनुवादः--ज्याप्रमाणें प्रदीप्त अग्नीपासून त्याच्याच रूपाचे सहस्रावधि विस्फुलिंग उत्पन्न होतात त्याच प्रमाणें, हे प्रिया! या अक्षर परब्रम्हापासून नानाविध भाव उत्पन्न होतात व त्यांतच पुनः प्रलीन पावतात; हे सुजना! हा सर्व नामरूपाचा संसार त्या परमात्म्यापासूनच प्रादुर्भूत झाला आहे व त्याच्याच ठायीं तो विलीन होणार आहे. उष्ण आणि प्रकाशी अग्नीचे विस्फुलिंग जसे अग्नीसार--खेच उष्ण आणि प्रकाशमान असतात, त्याप्रमाणें तुझा जीवात्माही त्या चिद्घन परमात्म्याच्याच रूपाचा आहे. परंतु जसे, घटादींच्या उत्पत्तीमुळें तदवच्छिन्न आकाशाला उत्पत्ति व घटभंगामुळें नाश ही प्राप्त होतात, त्याप्रमाणें देहोपाधी--मुळें आत्म्यावर उत्पत्ति-प्रणाश आरोपित होतात. घटावच्छिन्न आकाश आणि मठाकाश हीं जशीं तत्त्वतः एकरूप आहेत, त्याप्रमाणें हे शांता! हे सर्व भाव त्याच्याच रुपाचे आहेत; व उपाधिनाशानंतर ते सर्व त्याच्याच सारुप्यांत मिळून जाणार आहेत, हें सत्य तूं ध्यानांत ठेव.

दिव्यो ह्यमूर्तः पुरुषः स बाह्याभ्यतरो ह्यजः ।
अप्राणो ह्यमनाः शुभ्रो ह्यक्षरात्परतः परः ॥
एतस्माज्जायते प्राणो मनः सर्वेंद्रियाणि च ।
खं वायुर्ज्योतिरापः पृथिवी विश्वस्य धारिणी ॥

अतः समुद्रा गिरयश्च सर्वेऽस्मात्स्यंदन्ते सिंधवः सर्वरूपाः ।
अतश्च सर्वा ओषधयो रसश्च येनैष भूतैस्तिष्ठते ह्यन्तरात्मा ॥
पुरुष एवेदं विश्वं कर्म तपो ब्रम्ह परामृतम् ।
एतद्यो वेद निहितं गुहायां सोऽविद्याग्रंथिं विकिरतीह सोम्य ॥

अनुवाद--हे प्रिया, ज्याच्यापासून हें सर्व प्रादुर्भूत झालें आहे, तो पुरुष अलौकिक आहे. तो स्वयं ज्योतिस्वरूप आहे. सर्व आकाराच्या तो पलीकडे आहे. विश्वाच्या आंत आणि बाहेर तोच पसरला आहे. तो सर्वांचा आत्मा असल्यामुळें त्याला जन्म नाहीं. कोणतेही जन्मनिमित्त त्याचे ठिकाणी संभवत नाहीं.

जन्मानें प्राप्त होणारे अस्तित्व, वृद्धि, विपरिणाम, अपक्षय व नाश हीं अर्थात् त्याला लागू होत नाहीं त उपाधीचा लेप त्याला नाहीं, म्हणून तो शुद्ध आहे. प्राणस्पंदावर त्याचें असणें अवलंबून नाहीं, म्हणून त्यास अप्राण म्हणतात. संकल्प--विकल्पात्मक मनही त्याच्या ठिकाणीं नाहीं. क्षरत्वानें येणाऱ्या अक्षराच्याही तो पलीकडे आहे. परंतु ह्याच्यापासूनच प्राण, मन, सर्व इंद्रियें, आकाश, वायु, तेज, आप, आणि चराचराला धारण करणारी ही पृथिवी उत्पन्न झाली आहे. ह्याच्यापासूनच समुद्र आणि पर्वत उत्पन्न होतात. ह्याच्यापासूनच सहस्रावधी नद्या उत्पन्न होऊन वाहतात. सर्व वनस्पति व सर्व रस ह्यापासूनच निघतात, व रसवनस्पतींच्या योगानेंच पंचभूतांनीं परिवेष्टित होत्साता हा देहांत अंतरात्मा होऊन राहतो. सारांश सर्व क्रियाकलाप, सर्व विश्वाचा पसारा हाच आहे. सर्व श्रेष्ठ अमृत हाच आहे. हाच तें परब्रह्म आहे. हे शांता; सर्व भूतांच्या हृदयांत हाच आहे, असें ज्याला ज्ञान होतें त्याची या संसारबंधापासून सुटका होते. अविद्यामूलक सर्व गाठी त्याच्या तुटून तो त्याच्या रूपाचा होतो.

तदेतज्जानथ सदसद्वरेण्यं
परं विज्ञानाद्यद्वरिष्ठं प्रजानाम्
तदेतत्सत्यं तदमृतं । तद्वेद्धव्यं सोम्य विद्धि ॥

अनुवाद—हे सुजना त्या सदसद्रूप परब्रम्हाला जाणावें, अभिलाष करण्यासारखें तेंच काय तें आहे. तेंच एक खरोखर या चराचरांत प्रार्थनीय आहे. सर्व लौकिक ज्ञानापेक्षा त्याचें ज्ञान सर्व श्रेष्ठ आहे. सर्व लौकिक लाभापेक्षां त्याचा लाभ हाच खरोखर उत्तम आहे. तेंच सत्य आणि अमृत असून, वेध कोणाचा करावयाचा झाला तर, हे प्रिया! त्याचाच वेध करावा. त्यालाच प्राप्त करून घ्यावें.

धनुर्गृहीत्वौपनिषदं महास्त्रं शरं ह्युपासा निशितं संधयीत ।
आयम्य तद्भावगतेन चेतसा लक्ष्यं तदेवाक्षरं सोम्य विद्धि ॥

अनुवाद—उपनिषदांतील ज्ञानरूप महास्त्र असें धनुष्य घ्यावें, व त्यावर स्वतांच्या उपासनेनें तीक्ष्ण केलेल्या शराचें, हे प्रियोत्तमा! संधान करावें. सर्व अंतःशक्ति विषयापासून परतवून घेण्याच्या रूपानें या अद्भुत धनुष्याची प्रत्यंचा ओढावी, आणि सर्व भावना त्या लक्ष्यभूत अक्षर परब्रम्हाकडे लावून, हे शिष्या, त्याचा वेध करावा.

प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ।
अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत् ॥

अनुवादः—ॐ कार हें एक धनुष्य आहे. त्यावर जीवात्म्याचा बाण

जोडावा. आणि लक्ष्यपरब्रम्हाचा सावधानमनानें वेध करावा आणि बाण जसा लक्ष्यांत घुसून तेथें राहतो त्याप्रमाणें त्या परमात्म्याच्या ठिकाणीं नितश्या आवेशानें प्रवेश करून आपण तद्रूप व्हावे.

यस्मिन्द्यौः पृथिवी चांतरिक्षमोतं मनःसह प्राणैश्च सर्वैः ।
तमेवैकं जानथ आत्मानमन्या वाचो विमुंचथ ।
अमृतस्यैष सेतुः ॥

**अनुवादः**—ज्याच्यामध्यें स्वर्ग, पृथिवी आणि हें अंतरिक्ष भरलें आहे, आणि सर्व इंद्रियांसह मन ओवलें आहे, त्या एका अद्वितीय आत्म्याला जाणा, त्या सर्वाधार परमात्माचें ज्ञान करून घ्या. इतर सर्व गप्पागोष्टींचा त्याग करा. या संसारसिंधूंतून पलीकडे निघून जाण्यास त्याचें ज्ञान हाच एक सेतु आहे, हाच एक पूल आहे. या मरणार्णवांतून अमृताच्या तीराला जाण्यास हाच एक मार्ग आहे. परमात्म्याला जाऊन पोंचण्यास या शिवाय दुसरा राजरस्ता नाहीं.

ओमित्येवं ध्यायथ आत्मानं
स्वस्ति वः पराय तमसः परस्तात् ।

**अनुवादः**—ॐ या ब्रम्हनामानें त्या आत्म्याचें ध्यान करा. या दुःखालय अशा मायारात्रींतून निघून जातांना तुमचेवर विघ्नें न येवोत. या अविद्यातमाच्या परतीराला जाण्याची इच्छा करणाऱ्या तुमचें कल्याण असो. तो तुमचें परमात्मा मंगल करो.

यः सर्वज्ञः सर्वविद्यस्यैष महिमा भुवि दिव्ये ब्रम्हपुरे
ह्येष व्योम्न्यात्मा प्रतिष्ठितः । मनोमयः प्राणशरीर नेता
प्रतिष्ठितोऽन्ने हृदयं संनिधाय । तद्विज्ञानेन परिपश्यंति
धीरः कः आनंदरूपममृतं यद्विभाति ॥

**अनुवादः**—अविद्यातमाच्या पलीकडे असणाऱ्या त्या परमात्म्याचें रूप असें आहे. तो सर्वज्ञ आहे. भूत भविष्य आणि वर्तमान हें सर्व त्याला कळतें. सर्व सामान्यांचें व विशेषांचें ज्ञान त्याला आहे. द्युलोक भूलोकांनीं त्यांच्या आज्ञेंत वतार्वे, सूर्यचंद्रांनीं त्याच्या शासनांत भ्रमण करावें, पर्वतांनीं उभे राहावे, व समुद्रांनीं आपली मर्यादा सोडूं नये, नद्यांनीं वहावे व वायूनें फिरावे, हा त्याचा महिमा आहे. चैतन्यानें नित्य अभिव्यक्त होत असल्यानें हृदयकमल हेंच त्या परब्रम्हाचें नगर आहे. त्या हृदयकमलस्थ आकाशांत तो परमात्मा स्थित आहे. मनोवृत्तीच्या योगानें अनुभवास येतो म्हणून त्यास मनोमय म्हणतात व प्राण आणि शरीर ही त्याच्यायोगानें चालतात म्हणून त्यास 'प्राणशरीरनेता' अशी संज्ञा आहे. भक्षण केलेल्या जाणाऱ्या अन्नाच्या परिणामांत बुद्धीची संस्थापना

करून तोच राहिला आहे अशा या परमात्मतत्त्वाच्या लाभासाठीं सर्वस्वाचा त्याग करणारे, हवीं तीं दुःखें सहन करणारे धीर लोक ज्ञानानें त्या परमात्म्याचा साक्षात्कार करून घेतात. अनर्थानें रहित असलेला तो परमार्थ, दुःखाचें नांवही न राहणारा तो आनंद, आणि मरणापासून सर्वदा मुक्त झालेलें ते अमृत त्या धीरांना एका परमात्मलाभानें प्राप्त होतें. एका आत्म्यामध्यें सर्व आनंद आणि अमृत यांचा त्यांना अनुभव येतो.

भिद्यते हृदयग्रंथिः छिंद्यते सर्वसंशयाः ।
क्षीयंते चास्यकर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥

अनुवादः – त्या परावर ब्रम्हाच्या दर्शनानें त्या ज्ञान्याच्या सर्व हृदयग्रंथीचा भेद होतो. अनेक वासनांनीं पडलेल्या गांठी सुटतात. हृदयामध्यें घर करून जें काम बद्धमूल झालेले असतात, ते मुळासकट नाश पावतात; आणि विश्वाच्या सत्यरूपाविषयीं आजवर जे संशय मनाला आकुल करीत होते, ते त्या परमात्म्याच्या दर्शनानें क्षणात् नाहिसे होतात. या संसाररूपी महदनर्थाला कारण होणारीं त्या ज्ञान्याचीं सर्व कर्मं त्या परमपुरुषाच्या कृपाप्रसादानें निरास पावतात. जन्मांतरीची संचित आणि प्रारब्धबलानें घडणारीं क्रियमाण हीं सर्व कर्मं भस्मसात् होतात; आणि अशारीतीनें तो ज्ञानी साक्षात्कारी मुक्त होतो.

न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं ।
नेमा विद्युतो भांति कुतो ऽयमग्निः ॥
तमेव भान्तमनुभाति सर्वं ।
तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥

अनुवादः – त्या परब्रम्हाच्या ठिकाणीं सूर्य प्रकाशूं शकत नाहीं. चंद्र, तारका, आणि विद्युत् हींही त्याला आपल्या प्रकाशानें प्रकट करूं शकत नाहींत तेथें हा अग्नि त्याला काय दाखविणार? खरोखर ते परब्रम्ह स्वयं प्रकाशमान आहे म्हणून या सूर्याला प्रकाश आहे. तो परमात्मा ज्योतिर्मय आहे म्हणून हे चंद्र, ह्या तारका आणि हा अग्नि प्रकाशमान आहे. त्या परमपुरुषाच्या दीप्तीनेंच हे सर्वचंद्रादि प्रकाशत आहेत.

ब्रम्हैवेदममृतं पुरस्तात् ब्रम्ह पश्चात् ब्रम्ह दक्षिणतश्चोत्तरेण ।
अधश्चोर्ध्वं च प्रसृतं ब्रम्हैवेदं विश्वमिदं वरिष्ठं ॥

अनुवादः—हें अमृत ब्रम्हच पुढें आहें आणि मागें आहे, उजव्या हातांत आहें, आणि डाव्या हातांत आहे. खालीं आणि वर तेंच पसरलेलें आहें. हें सर्व क्षणभंगुर संसारप्रत्यय अज्ञानमात्र आहे. तो परमात्माच काय तो एक खरा आहे! त्याच्यावांचून या असार विश्वांत दुसरें काय सत्य आहे? दुसरें काय सुख आहे?

## तृतीय मुंडक.

द्वा सुपर्णा सयुजा सखाया ।
समानं वृक्षं परिषस्वजाते ॥
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्ति ।
अनश्नन्नन्यो अभिचाकशीति ॥

अनुवादः – सुंदर पंखाचें दोन पक्षी एका वृक्षावर राहत, ते सदा एकत्र असत, त्यांचा जन्म एकाच आईबापापासून झालेला होता. पण त्यांतील एक मात्र त्या झाडावरचे गोडफळ खात असे; व दुसरा त्या फळाला स्पर्श न करितां केवळ पाहात मात्र असे. आपल्या शरीररूपी वृक्षावर सुद्धा असेच पक्षी राहतात. एक जीवात्मा आणि दुसरा परमात्मा. दोघांचेंही अभिव्यक्तिकारण एकच. परस्परांचा निकट संबंध; परंतु कर्मांपासून निष्पन्न झालेलें सुखदुःखलक्षणफल एक नेहमीं खात असतो; पण दुसरा मात्र केवळ साक्षिरुपानें तें पाहत असतो.

समाने वृक्षे पुरुषो निमग्नः ।
अनीशया शोचति मुह्यमानः ॥
जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशम् ।
अस्य महिमानमिति वीतशोकः ॥

अनुवादः--शरीररूपी वृक्षावर राहून सुखदुःखरूप कर्मफलें चाखणारा हा जीव त्या शरीरभावांत निरनिराळ्या इंद्रियविषयांत डुबून जातो, तेव्हां अनंत अनर्थांनीं गांजलेला असा तो दीन बनून शोक करूं लागतो. विषयसुखांचा दास बनलेला तो आपल्या असमर्थतेनें लाचार बनतो, आणि संसारास विटलेला तो विषय पंकांतून बाहेर येऊन जेव्हां आजूबाजूस बघतो तेव्हां योगी व कर्मी यांनीं सेविल्या जाणाऱ्या परमेश्वराचें त्याला दर्शन होतें. त्या समयीं नित्य--शुद्ध--बुद्ध--मुक्त स्वभाव, जरा-मरण-क्षुधातृषादि-रहित अशा त्या परमात्म्याच्या रूपाचें आपणही आहोंत, असें तो बघतो. मी सुखी दुःखी हा मर्यादित भाव जाऊन हा जगद्रूप महिमा त्या परमात्म्याचाच आहे, असें तो जाणतो व आजवर भोगलेल्या महान् शोकसागरापासून समुत्तीर्ण होऊन धन्य धन्य होतो.

यदा पश्यः पश्यते रुक्मवर्णं ।
कर्तारमीशं पुरुषं ब्रह्मयोनिम् ॥
तदा विद्वान् पुण्यपापे विधूय ।
निरंजनः परमं साम्यमुपैति ॥

अनुवादः – असे जाणणारा तो जेव्हां सुवर्णाच्या कांतीप्रमाणें स्वयंज्योतिः-

स्वभाव असलेल्या त्या जगत्कर्त्या ईशाला पाहतो तेव्हां त्या ज्ञात्याची पुण्यपापें नाश पावतात. ब्रम्हच हें त्याचें उत्पत्तिस्थान आहे, हें त्याला कळलें म्हणजे संसारबंधास कारण होणारीं सर्व शुभाशुभ कर्में नष्ट होऊन तो क्लेशशून्य होतो; आणि अशा प्रकारें अद्वयरूप परमसाम्यास प्राप्त होतो.

प्राणो ह्येष यः सर्वभूतैर्विभाति ।
विजानन् विद्वान्भवते नातिवादी ॥
आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावान् ।
एष ब्रम्हविदां वरिष्ठः ॥

अनुवादः—हा प्राणाचा प्राण असा ईश्वरच सर्व भूतांच्या द्वारा प्रकाशमान होतो, सर्व विश्वांत तोच एक व्यापून स्थिर आहे असें जो पाहतो, तो शुष्क वादविवाद व निष्फल तर्कवितर्क करीत बसत नाहीं. त्या सर्वांतर्यामीवांचून जो दुसरें कांहीं पाहतच नाहीं, तो त्या सर्वात्म्यावांचून दुसरें काय बोलणार? आपण त्या सर्व भूतस्थाला पहात नाहीं म्हणून शुष्क काथ्याकूट करतो आणि द्वैत--अद्वैताविषयीं तंटे बखेडे माजवितो, परंतु ज्याची सर्व क्रीडा कांतापुत्रांना सोडून आत्म्यामध्येंच होत आहे, त्या परमात्म्यावाचून ज्याला दुसरें कांहीं गोड लागत नाहीं, आणि त्याच्या लाभासाठींच ज्ञान–ध्यान–वैराग्यादि क्रिया ज्याची चालती आहे, तोच खरोखर श्रेष्ठ आहे, ब्रम्हवेत्त्यांतील वरिष्ठ तोच !

---

# निबंधमाला–तिचें स्वरूप आणि कार्य

कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांची निबंधमाला सुप्रसिद्धच आहे. शास्त्रीबोवा मराठी भाषेचे गद्याचार्य आहेत. मालेचे मूळ ७२ अंक प्रयासानें मिळवून निबंध–मालेवर ६४ पानांचा एक टीकापर निबंध शके १८२६ मध्यें ‘ सरस्वतीमंदिर ’ मासिकांत रा० पांगारकर यांनीं लिहून प्रसिद्ध केला होता. तोच पुन्हा स्वतंत्र पुस्तकरूपानें छापला आहे. शास्त्रीबोवांचें संक्षिप्त चरित्र व नवीन अवतरणें जास्त दिलीं आहेत. निबंधमालेचा हेतु, मालेंतील मुख्य व अवांतर विषय, मालेचे गुण-दोष यांचें सविस्तर विवेचन यांत निर्भीडपणानें केलें आहे, किं. ८१० आणे.

# विष्णुकवीचीं पद्यें

## ( १ ) देवीस्तोत्र

### ओव्या

श्रीमन्मंगलदायके । श्रीमूळपीठनायके ।
माझी विनंति आयके । माझे आई रेणुके ॥ १ ॥
नारायणी श्रीशंकरे । अन्नपूर्णे विश्वंभरे ।
कृपा करणें हेंचि बरें । माझे आई रेणुके ॥ २ ॥
माया ममता वाढवी । पुत्रापरी लाडवी ।
दुःखापासुनी सोडवी । माझे आई रेणुके ॥ ३ ॥
भूमंडळीं या वासरा । तुझ्यावांचूनि दुसरा ।
पहा पहा नसे आसरा । माझे आई रेणुके ॥ ४ ॥
सखे धांवूनि ये गडे । नेई झांकुनि लुगडें ।
ठेवूं नको मज उघडें । माझे आई रेणुके ॥ ५ ॥
गंभीर गुण चांगले । वेद वर्णितां भागले ।
तुझे ध्यानचि लागलें । माझे आई रेणुके ॥ ६ ॥
पदारविंद पाहुं दे । सदा सद्गुण गाऊं दे ।
सदा सन्निध राहुं दे । माझे आई रेणुके ॥ ७ ॥
परमानंदें डोलणें । स्नेहधर्मानें चालणें ।
आतां किती हें बोलणें । माझे आई रेणुके ॥ ८ ॥
अंबे सांगणें इतुकें । प्रेमें प्रेमाचें भातुकें ।
देवोनि तोषवी कौतुकें । माझे आई रेणुके ॥ ९ ॥
आतां कुरंगडोळसे । पाजूनियां पाडसें ।
निद्रा करी हो राजसे । माझे आई रेणुके ॥ १० ॥
वेगें मजला भेट देई । तुझ्या आलों शरण पायीं ।
विष्णुदास म्हणे बाई । माझे आई रेणुके ॥ ११ ॥

— ॐ —

## ( २ ) श्रीगणपतिस्तवन

### ( चामर वृत्त—श्लोक )

( पार्वतीनें कार्तिकस्वामी व गणपती यांस सांगितलें कीं, जो सर्व देवांनां लग्नाक्षदा देऊन प्रथम येईल त्याचें लग्न अगोदर करूं; हें ऐकून मयूरारूढ होऊन कार्तिकस्वामी भराभर लग्नाक्षदा देऊं लागले पण गणपतीनें जगताचें अधिष्ठान श्रीशंकर यांचेपुढें अक्षत ठेऊन पार्वतीजवळ आला व सर्व देवांनीही गणपतीची अक्षत अगोदर पोंचल्याचें सांगितलें. )

श्री विनायकासहित रंगणीं तूं शारदे । चातकासि प्रेमवृष्टिचा जरा तुषार दे ।
या मयूर छंदि शीघ्र देइ मेघगर्जना । श्रीगणाधिशा नमो नमोस्तुते गजानना ॥१॥
मूषकावरूनि मारि काळ व्याळ मांजरा । पार्वती ह्मणे अझून रांगतो जरा जरा ।
शंकरासि हांसवीसि भांडसी षडानना ॥ श्रीगणाधिशा ॥ २ ॥
भक्त-संकटीं क्षणांत येसि जासि लक्षदां । स्वामिच्या अधी सुरांसि देसि लग्नअक्षदा ।
हर्ष तो गमे उमेसहित नंदिवाहना ॥ श्रीगणा० ॥ ३ ॥
बा ! तुझी कुठारधार वीजयी विनायका । तोषली बहूत देवि मूळपीठनायिका ।
भार्गवासि दीधलीस शत्रुकूळनाशना ॥ श्रीगणा० ॥ ४ ॥
विजयी जरी असे भली तुझी कुठारची । माझीं संकटें तरी निवारी मारि ठारची ।
चिंतिता सुरक्षिसी नुपेक्षि भाविकां जना ॥ श्रीगजा० ॥ ५ ॥
वीषयांकडे दशेंद्रियें बळेंचि हाकिती । ईकडे न येऊं देति ताप सांगुं हा किती ।
लांडगे धरोनि जेवि नेति वत्स कानना– ॥ श्रीगणा० ॥ ६ ॥
या प्रसंगिं येइ येईं धेईं धेईं वांकडें । त्राहि त्राहि पाहि पाहि माझिया जिवाकडे ।
या प्रमत्त षड्रिपूंनि मांडिली विटंबना ॥ श्रीगणा० ॥७॥
भो कृपाधना अतां दिनावरी कृपा करा । दावि पूर्ण मुखचंद्र या चकोरपांखरा ।
या सुखामृताचि धार लेशमात्र प्राशना ॥ श्रीगणा० ॥ ८ ॥
तूं उदार ज्ञानसिंधु दीनबंधु मोरया । याचकाचि वंचना नका करूं समोर या ।
राहिलों क्षुधीत दीन मीं करीत याचना ॥ श्रीगणा० ॥ ९ ॥
धर्मकामि आड येति विघ्नकारबंधना । वेष्टिती भुजंग जेविं कां सुगंध चंदना ।
पातकाभ्र तीं निरभ्र तूं करी प्रभंजना ॥ श्रीगणा० ॥ १० ॥
सिद्ध देवतां गुरूहि ज्ञानहीन पातक्या । बोलती तूं दूर जाइ जाइ आत्मघातक्या ।
तीर्थ पर्वण्या नद्या हि गर्जती नना नना ॥ श्रीगणा० ॥ ११ ॥

अवलोकितांचि कायका मदागाधपाप गा । शंकराचिया जटेंत गुप्त झालि आपगा ।
बौद्ध अवतार तो धरूनि देव बोलेना ॥ श्रीगणा० ॥ १२ ॥
चिंतिताचि देव स्तंभि कडकडोनि पावती । दीधलीं परंतु त्यासि म्यां रडोनि पावती ।
तारिती मला न कोणी या पदांबुजाविना ॥ श्रीगणा० ॥ १३ ॥
उद्धरावयासि नामकीर्तनीं अभंग गा । शुद्धभक्तिनें प्रसन्न होय पांडुरंग गा ।
भक्ति प्राप्त व्हावयासि ज्ञान कोणि देइना ॥ श्रीगणा० १४ ॥
देशि मुक्ति मुक्ति भक्ति बुद्धि ज्ञान चांगलें । बा ! मला ह्मणूनिया तुझेंचि ध्यान लागलें । तूं गुणांबुधी तुझ्या--समान देव अन्य ना ॥ श्रीगणा० ॥ १५ ॥
धर्म अर्थ काम मोक्ष पुरुषार्थ चारची । देतसा मलाहि याचि चालवा प्रचारची ।
जोडितों नमूनि दोन्ही हात कीर्तिवर्धना ॥ श्रीगणा० ॥ १६ ॥
अंकुशें वळोनि चित्त लावि आपुल्या पदां । फरशुनें समूळ विघ्न तोडि मागल्या पदां । दे पहावया स्वरूप दिव्यज्ञानअंजना ॥ श्रीगणा० ॥ १७ ॥
दुर्वांकुराचि हीरवी जुडी तुझ्या शिरावरी । हीरवीच शालजोडि पिंवळा पितांबर ।
हिरवीच कंठी पाचुची प्रकाशि भूवना ॥ श्रीगणा० ॥ १८ ॥
अंगिं चर्चिली उटी सुगंध गंध केशरी । वाढि ताटि एक अन्न अन्नपूरणेश्वरी ।
सार प्रार्थनाही स्वस्थ चित्त सारि भोजना ॥ श्रीगणा० ॥ १९ ॥
देशि प्रेमरंग चित्ति भक्तकामसारथी । सत्य प्रेमरंगिं नित्य मीं करीन आरती ।
लक्षवाति लाउनी निरंजनीं निरंजना ॥ श्रीगणा० ॥ २० ॥
ही जधीं अखंड ध्यानिं राहतील पावलें । मी तधीं ह्मणेन आत्म साक्ष मोक्ष पावले । बा ! कृपा करूनि पूरवावि माझी वासना ॥ श्रीगणा० ॥२१॥
एक ऐकही विनंति पूर्ण ज्ञानसागरा । घ्या पदाक्षराचि माळ जाइ जुई मोगरा ।
विष्णुदास हीनपक्षी रक्षि विघ्नभंजना ॥ श्रीगणाधिशा० ॥ २२ ॥

---

## ५ श्रीएकनाथ चरित्र. [आवृत्ति चवथी]

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचा जन्म व बाळपण ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर. इतक्या प्रकरणांत नाथांचे पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून ' स्तुतिसुमनांजलि ' नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणे दिलीं आहेत. पृ. सं. २८८ किं. ८१२.

## ३ अष्टक परमेश्वराचें
### ( शा० वि० )

श्रीचिंतामणि श्रीसरस्वति गुरू दत्तात्रयाच्या पदा ।
वारायास्तव वंदितों सकल ही— तापत्रयांच्याऽपदा ।
पाजावें मजला कृपामृत शशी—पाजितसें पांखरां ।
हे शंभो ! परमेश्वरा हरिहरा—विश्वंभरा शंकरा ॥ १ ॥
भक्तांची बहु तांतडी घडिघडी—वारावया संकटें ।
वाटे येउलि राहिला प्रभु तुह्मी — येथें उभे एकटे ।
कोठें श्रीगिरिजा क्षिराब्धितनया—आहे शशीशेखरा ॥ हे शंभो० ॥ २ ॥
नानारत्नखचीत हार कुंडल जटे — चा मस्त कीं टोपची ।
झाल्या कांहीं प्रसन्नता मगतसे—देण्यासि आटोपची ।
आनंदे दुबळेहि वांटिति पहा—देवालयीं साखरा ॥ हे शंभो० ॥ ३ ॥
माळा लिंग त्रिशूळ पन्नग करीं— त्रिपुंड्र पीतांबर ।
अंगि केशवमिश्र चर्चित उटी—सुगंध तैलांबर ।
पुष्पांचे हार भार डोलत गळां—जाइ जुई मोगरा ॥ हे शंभो० ॥ ४ ॥
मच्छादी अवतार मुख्य गणिले—व्यासे पुराणीं दहा ।
झाला शांत परंतु रामभजनें प्याला विषाचा दहा ।
जाणूनी परदुःखचि अनुभवें केलें पुरे आकरा ॥ हे शंभो० ॥ ५ ॥
माझी कां करुणा नयेचि तुमच्या अद्यापि चित्तांतरीं ।
आहो मी अपराधि फार ह्मणुनीं सांगू कितिदांतरीं ।
सांगावें तरि पावना पतित हा खोटा असे कीं खरा । हे शंभो० ॥ ६ ॥
कीर्ति वाढविणें म्हणूनि आणितां धाडोनि बोलावणें ।
तेहे वाढविणें यथार्थ आपल्या यादीस या लावणें ।
मागें धाडुं नये प्रसाद दिधल्या वांचूनिया किंकरा ॥ हे शंभो० ॥ ७ ॥
माराया उचलूं नकाचि सहसा तारावांचा चाकरा ।
ना लावी परक्यागृहीं मग तुह्मी वाटेल तैसें करा ॥ हे शंभो० ॥ ८ ॥
आसोनि हृदयस्थ मूर्ति नदिसे माझी मला कां तरी ।
विष्णूदास ह्मणे अंलितें पडदे डोळयांवरी कां तरी ।
या अज्ञानतमा हरावयासिये तूं ऊदया भास्करा ।
हे शंभो ! परमेश्वरा ! हरिहरा विश्वंभरा शंकरा ॥ ९ ॥

ॐ

# सामार स्वीकार

१ **साहित्यतोरणः**—भोरचे श्रीमंत पंतसचिव यांच्या संस्थानांतील प्रजाजनांपैकी जे विद्वान् व सुविद्य आहेत त्यांच्या लेखांचें हें तोरण साहित्याच्या मंदिरद्वाराला बांधलें आहे. भोर येथील विद्वान् व व्यासंगी पदवीधर रा. ना. म. भिडे व ना. चिं. देव यांनीं हा ग्रंथ संपादिला आहे. यांत पुष्कळ चांगले चांगले वांचनीय लेख आले आहेत. प्रथमच आमचे मित्र 'खडे तात्विक बोल' बोलणारे माधवराव मोडक यांचा 'अर्जुनाचें अज्ञान व कर्मयोग' हा विद्वत्ताप्रचुर लेख नजरेस पडतो. लेख कर्मयोगाचे पक्षपाताचा असला तरी मार्मिक व बोधप्रद आहे. मोडकांची बहुश्रुतपणाची व खोंचदार लेखनपद्धती यांतही नजरेस येते. ग्रंथ ६५० पृष्ठांचा असून अनेकांच्या विविध प्रकारच्या लेखांनीं शृंगारला आहे. श्री. वावडेकर यांची 'प्राचीन प्रजासत्ताक राज्यें' सीतारामशास्त्री यांचा 'ऋग्वेदांतील ओषधींची १०७ धामें, 'वीरपत्नी येसूबाई पंतसचिव' (कविता,) प्रा० धो. कानिटकर यांची 'वात्स्यायनकालीन आदर्शभूत गृहिणी' सौ. सरलाबाई जोशी यांची 'हिंदी स्त्रियांची राहणी' दिवेकर यांची 'राजाभाऊंची व्राटिका' बंगालींतील 'कृत्तिवासी रामायण,इत्यादि अनेक सुंदर लेख प्रस्तुत ग्रंथांत प्रसिद्ध झाले आहेत. पुस्तक संग्रहणीय आहे. भोरचे विद्याप्रेमी युवराज यांच्या स्फूर्तीनें प्रस्तुत ग्रंथांची कल्पना सुचलेली दिसते. किं० रु. २ ८ प्रकाशक—रामचंद्र गोविंद कानडे, ५४ शुक्रवार, पुणें २

२ **वागीश्वरीः**—प्रस्तुत मासिक नागपूर येथें प्रसिद्ध होत असतें. त्याचे तिसऱ्या वर्षाचे पहिले चार अंक आह्मांकडे आले आहेत. नागपूरवऱ्हाडांतील विद्याव्यासंगी लोकांनीं प्रस्तुत मासिक मोठ्या उत्साहानें चालविलें असून त्यानें महाराष्ट्रीय मासिकांत प्रमुख स्थान पटकावलें आहे. मासिकांतील लेख प्रौढ व विद्वत्ताप्रचुर असतात. ह्या चार अंकांतच गाथासप्तशतीचा काळ, स्त्रियांचें प्रसाधन, मगधविहार, गीतातात्पर्यासंबंधी एकवाक्यता, शशिसेना काव्य, वीणाझंकार व मुक्तछंद, विद्यापति व चंडीदास, उमर खय्यामच्या रुबाया, इ० लेख कोणत्याही अव्वल मासिकाला शोभा आणतील असेच आहेत. स्वतंत्र संशोधनात्मक लेख, प्रवासवृत्तें, कविता, शास्त्रीय किंवा भाषाविषयक चर्चा इ० महत्वाचीं अंगें प्रस्तुत मासिकाला असल्यामुळें तें सर्वांनाच आवडणारें आहे, हें मासिक बृहन्महाराष्ट्राचें आजच झालें आहे. चिरायु व कार्यक्षम होवो.

३ स्वाध्याय ज्ञानेश्वरीः—सांगलीचे सुप्रसिद्ध विद्वान् रा. केशव रामचंद्र छापखाने यांचीं ज्ञानेश्वरीवरील व्याख्यानें कोल्हापूर पुण्याकडील सुशिक्षित लोकांनीं ऐकलेलींच आहेत. ह्या भागांत 'अंतरंग व पाठसप्तशती' एवढींच प्रकरणें आलीं असून आणखी २ भाग प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. छापखाने यांचा व्यासंग जबर आहे, व थिऑसफीच्या दृष्टीनें ज्ञानेश्वरीकडे पाहण्याचा उपक्रम ठीक आहे, पण खरें सांगायचें ह्मणजे त्यांची अनुक्रमणी व मांडणी आह्मांस नीटशी आकळिता आली नाहीं.

४ बडोद्याचें मराठी साहित्यः—'साहित्यतोरण' बांधणारांचीच थोडीशी कल्पना या पुस्तकांत दिसते. यांत बडोद्याचें मराठीसाहित्य व साहित्यभक्त यांची संक्षिप्त जंत्री यांत दिलेली आहे. जीं पुस्तकें बडोद्यांत प्रसिद्ध झालीं किंवा ज्यांच्या प्रकाशनांत बडोद्याचें अंग आहे अशींच पुस्तकें रा. दंडवते यांनीं सूचींत दिलीं आहेत.

५ मनोबोध उर्फ मनाचे श्लोकः--कऱ्हाडचे श्रीसमर्थ वाङ्मयप्रेमी यांनीं अन्वयार्थासहित मनाचे श्लोक सुलभरीत्या प्रसिद्ध केले असून त्यांची किंमत अवघी पांच आणे आहे. प्रथम श्रीसमर्थांचें सुंदर छोटें चरित्र दिलें आहे. खिशांत मावण्याजोगें पुस्तक असून सर्वांच्या आटोक्यांतलें अतएव अल्पमूल्य आहे.

---

केसरी—"महाराष्ट्रीय साधुकवींच्या चरित्रांचे व ग्रंथांचे परिशीलन करून त्यांचें हृद्गत साध्या सोप्या पण वाचकांचे मनावर विलक्षण छाप बसविणाऱ्या भाषेत प्रगट करण्यास ज्या प्रेमळतेची, श्रद्धेची, सहृदतेची व भाषाप्रभुत्वाची जरूरी आहे ते गुण रा. पांगारकर यांचेमध्यें पुष्कळ अंशानें वास करीत असल्यामुळें त्यांची साधुचरित्रमाला महाराष्ट्रांत लोकप्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं."

१५/६/३२

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २६ मास १० ) जेष्ठ शके १८५४ जून इ. स. १९३२ ( नवें वर्ष १२ वें अंक ६

वार्षिक वर्गणी रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३/३

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. बी, ए.**

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.

मुद्रकः—विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६
लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | ... | १ |
| २ प्रेम! | .. | २ |
| ३ मराठी वाङ्मयाचा इतिहास--खंड १ ला ज्ञानेश्वरनामदेवांचा काल | ... | ३--६ |
| ४ संतकृत संतगौरव | ... | ७--८ |
| ५ श्रीदत्तस्तव | ... | ८ |
| ६ ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य (अ० १८) पुढें चालू | ... | ९--१३ |
| ७ प्राचीन देशीभाषा | ... | १३--२२ |
| ८ श्रीकृष्णांचें चरित्र--दर्शन (प्र. १४) | ... | २३--३५ |
| ९ अन्नमयकोश ह्म० स्थूलदेह | ... | ३६--४० |


---

## ग्राहकांस विनंतिः—

१ आमच्या नव्या ग्रंथाची अनुक्रमणिका पृ० ३ ते ६ वर पहावी. पुस्तकाची पृ० सं० ८०० वर असून किं. रु. चार व व्ही. पीनें रुपये ४॥८॥२ पडते.

२ जुन्या वर्गणीदारांस रु. ३॥४ पण व्ही. पी. सह रु. ४

३ मुंबईच्या वर्गणीदारांनीं तूर्त मुंबईस गिरगावांत प्रार्थनासमाजासमोर पागनीस पेटकर आणि मंडळी यांजकडे रु. ३॥४ भरून आपलें पुस्तक न्यावें. मुंबईच्या वर्गणीदारांची यादी त्यांजपाशी दिली आहे. इतरांनीं रु. ४ भरून तेथून पुस्तक विकत घ्यावें.

४ पुण्यास तूर्त पुस्तक मिळण्याचा पत्ताः— रा. लक्ष्मण यशवंत अयाचित, जोगेश्वरीजवळ, ६८२ बुधवार.

५ शंभर प्रती एकदम मागविणारास कमीशन २५ टक्के मिळेल.

पत्ताः—व्यवस्थापक 'मुमुक्षु' नासीक सिटी.

---

मुमुक्षु मासिक वर्ष १२ वें ] मंगलाचरण [ १ जून १९३२ अंक ६



# छंद

जय जय सुरनायक जनसुखदायक प्रनतपाल भगवंता
गोद्विजहितकारी जय असुरारी सिंधुसुता प्रियकांता ।
पालन सुर धरनी अद्भुतकरनी मरम न जानइ कोई
जो सहजकृपाला दीनदयाला करउ अनुग्रह सोई ॥ १ ॥

भावार्थः—जयजय सुरनायका ! जनसुखदायका प्रणतपालका भगवंत ! गोब्राह्मणहितकरा असुरांतका लक्ष्मीप्रियपते ! देव आणि पृथ्वी यांच्या पालका ! तुझी करणी अद्भुत आहे—तिच्यांतील मर्म कोणाला कळत नाहीं. हे सहजकृपाल व दीनदयाल नारायणा ! तूंच आह्मांवर अनुग्रह कर !

जय जय अबिनासी सबघटवासी व्यापक परमानंदा
अविगत गोतीतं चरितपुनीतं मायारहित मुकुंदा ।
जेहिलागि बिरागी अतिअनुरागी बिगतमोह मुनिवृंदा
निसिवासर ध्यावहि गुनगन गावहि जयति सच्चिदानंदा ॥२॥

भावार्थः--भगवन् ! तूं अविनाश आहेस, सर्व घटांत राहणारा आहेस, व्यापक व परमानंदरूप आहेस तूं अगम्य व इंद्रियातीत आहेस. तुझीं जन्मकर्में पावन आहेत व तूं स्वतः मायातीत आहेस. ज्याच्यासाठीं विरक्त व मोहरहित मुनिवृंद ह्म० साधुसंत अत्यंत भावभक्तीनें ध्यानांत मग्न होऊन राहिले आहेत, अहोरात्र ज्याचें ध्यान करून गुणानुवाद गात आहेत, अशा सच्चिदानंदा ! तुझा सर्वत्र जयजयकार असो !

जेहि सृष्टि उपाई त्रिविध बनाई संग सहाय न दूजा
सो करउ अघारी चिंत हमारी जानिय भगति न पूजा ।
जो भवभयभंजन मुनिजनरंजन बिपतिबरूथा
मन वच क्रम बानी छाडि सयानी सरन सकलसुरयूथा ॥३॥

भावार्थः--ज्यानें दुसऱ्या कोणाच्या संगसाहाय्यावांचून हीत्रिविध ह्म० सात्विक, राजस व तामस अशी किंवा देवदानवमानव यांनीं भरलेली ही सृष्टि निर्माण केली, तो पापनाशक परमात्मा आमची चिंता दूर करो. भक्ति अगर पूजा याचें मर्म आह्मी जाणत नाहीं. तो भवभयाचें भंजन करणारा, संतसज्जनांचे रंजन करणारा व सर्व आपत्तींचें कंदन करणारा भगवान् समर्थ आहे--त्यालाच आह्मी सारे देवसमाजाचे भाविक लोक अभिमान सोडून कायावाचामनानें शरण आलो आहोंत.

—तुलसीरामायण

# प्रेम !

प्रेम ही एक अजब चीज आहे! तिच्या नांवाचा व्यवहार ऐसपैस होत असतो, पण तिची खुमारी किती जणांना चाखायला मिळते देव जाणे!

२

म्हटलें तर प्रेमाची वस्ती घरोघर आहे, म्हटलें तर प्रेमाचें दर्शन दुर्लभ आहे!

३

प्रेमाचें नाणें जगाच्या व्यवहारांत अखंड चालू आहे! प्रेमाचे आंबे व्यवहाराच्या वसंतऋतूंत सर्व जीव पोटभर खात आहेत!

४

चार दिडक्यांना पाटीभर आंबे मिळतात व ते खाऊन मिटक्या मिटणारे लोक आहेत, रुपयाला चार दाणे मिळतात त्याचा आस्वाद घेणारेही भाग्यवंत आहेत.

५

'न वा अरे पत्युःकामाय पतिःप्रियो भवति आत्मनस्तु कामाय पतिःप्रियो भवति' असे म्हणणारी श्रुति आहे व 'कोण कुणाचा सखा जिवा' असलीं वचनें ऐकून माना डोलवणारे लोक आहेत!

६

तथापि पतीसाठी माती खाणाऱ्या सती जगांत आहेत, पत्नीसाठी परम वैराग्य घेणारा एखादा विरळ पति आढळतो! लेंकरासाठी प्राणार्पण करणाऱ्या आया कोणी पाहिल्या नाहींत?

७

जगांत प्रेम आहे कीं नाहीं? प्रेम दुर्मिळ आहे कां विपुल आहे? स्वस्त आहे कां महाग आहे?

८

प्रेमाचीं गीतें अनेक कवि गातात; 'सीतेचें अदर्शन होऊन बारा वर्षें झालीं तरी हा पाषाणहृदयी राम जिवंत आहेच!' असा निर्मळ शोक करणारा रामही मनुष्यदेहांत चमकून जातो! बाराव्याच्या आंत पत्रिका धुंडणारे काय कमी आहेत!

९

पहिल्या बायकोवर शोकगीतें रचून ती राजेरजवाड्यांना गाऊन दाखवून त्यांजपासून मिळालेल्या पैशावर दुसरें लग्न करणारे एक कवि आम्ही पाहिले आहेत! देवासाठी कळवळणारा व प्रेमाश्रु ढाळणारा कोणी दिसला कीं आपण त्याला भक्त म्हणतों व "रामवनवाला गेला तरी मी जिवंत आहे, मी कशाचा भक्त? ती योग्यता मजपाशी नाहीं" म्हणणारा भरतही आहे!

# मराठी वाङ्मयाचा इतिहास—खंड पहिला

## पृ० सं० ८३२ ] ज्ञानेश्वर नामदेवांचा काल. [ किंमत रुपये चार

### पूर्वार्ध

**प्रास्ताविकः**—वेदधर्मीयांची एकरूपता पृ. १ परंपरेच्या ज्ञानाची अवश्यकता ३

**१ वेदविद्याः**—विषयप्रवेश पृ. ९ ऋग्वेद ११ वैदिकदेवतांच्या प्रार्थना १३ ऋग्वेदांतील अध्यात्मविद्या १९ यजुर्वेद २६ सामवेद २८ अथर्ववेद २९ वेदांगें ३३ वेदोपांगें ३५ उपवेद ३८ सांख्यशास्त्र ३९ पातंजलयोग ४४

**२ उपनिषदांतील ब्रह्मविद्याः**—दशोपनिषदें पृ. ४७ आत्मविद्या व आत्मविद् ४८ शांडिल्य ५६ आरुणि ५७ दध्यङ् आथवर्ण ५९ याज्ञवल्क्य ६१ कठोपनिषद्–नचिकेत व यम यांचा संवाद ६४ सृष्टयुत्पत्तीची काहणी ७४ नीतीचा व साधनमार्गाचा उपदेश ७७ ब्रह्मविद्येचा आनंद ८० उपनिषदांतील कांहीं सूत्रें ८४

**३ भगवद्गीताः**—स्वधर्मकर्म ८७ मोहनिरास हा गीताशास्त्राचा हेतु ८८ ज्ञानोत्तरभक्ति हें गीतेचें रहस्य ९१ गीता आणि उपनिषदें १०५ गीताभागवतांतील नवविधाभक्ति १०८

**४ श्रीमद्भागवतः**—गीता आणि भागवत १११ भागवतपुराण ११२ भागवताचा काल ११३ अभेदाची बैठक ११६ भागवतांतील मुख्यविषय ११८ श्रीकृष्णाचा संसार १२३ भक्तीचें स्वरूप १३१ उत्तम भक्त १३४ भगवंताच्या रूपाचें ध्यान १३६ गुणानुवाद व नामसंकीर्तन १४१ संत व सत्संगाची महती १४६ भागवतधर्माची मुख्य तत्वें १४९ गोपींचें भक्तिप्रेम १५५

**५ भक्तिमार्गाचें अनादित्व व शिवविष्णुसंप्रदायः**—भक्तिमार्गाचें औदार्य १६५ भक्तिमार्ग वेदांत आहे १६६ पंचरात्रमत व भागवतधर्म १६९ शिवविष्णु ह्या देवता वैदिक आहेत १७१ शिवविष्णूंची एकात्मता १७७

**६ मधल्या काळाचा थोडा इतिहासः**—ब्राह्मण व क्षत्रिय १८१ अवनतीस आरंभ १८४ गौतमबुद्ध व महावीर १८५ वैदिक धर्माचे सिद्धांत १८७ बौद्ध व जैन पंथ १९० मौर्य चंद्रगुप्त १९१ अशोक १९३ अशोकाचे आदेश १९५ पुष्पमित्र व विक्रमादित्य १९९ समुद्रगुप्त, चंद्रगुप्त व गुप्तसाम्राज्य २०१ हूणांच्या टोळधाडी २०५ सम्राट् हर्षवर्धन २०६ सातव्या शतकांतल्या हिंदुसमाजाची स्थिति २०९ काश्मीर, कनोज, धार इ० हिंदु राज्यें २१५ टोळधाडी व त्यांचा प्रतीकार २१२ बुद्धपंथाचें परदेशीं प्रयाण २१३

७ तामीळांचें साम्राज्य, तामीळ संत व तामीळ आचार्यः—
तामीळांची श्रेष्ठ कामगिरी २२७ करिकेल चोल २२९ चोल राजे २३० चोलांची राज्यव्यवस्था २३४ पांड्य, चेर व पल्लव २३६ तामीळांचीं अजस्त्र शिल्पकामें २३८ तामील वाङ्मय २३९ बारा अळ्वार उर्फ वैष्णव २४२ नम्माळ्वार २४७ तिरुज्ञानसंबंदर २५० अप्पर २५४ संबंदर व अप्पर २५६ सुंदरमूर्ति २५८ माणिक्कवासहर २५९ तिरुमुल्लर २६४ प्रेममूर्ति नंद २६५ कुमारीलभट्ट २७४ शंकराचार्य २७६ शंकराचार्यांची कामगिरी २७९ आचार्यांची ग्रंथसंपत्ति २८२ रामानुजपंथाचे आचार्य २८६ शंकराचार्य व रामानुजाचार्य यांचीं मतें २९१ मध्वाचार्य २९५ तीनही आचार्यांचें मतैक्य २९८

## उत्तरार्ध

८ महाराष्ट्रदेश व मराठेः—दण्डकारण्य ३०१ महाराष्ट्राच्या चतुःसीमा ३०५ राष्ट्रकूट व शालिवाहन ३०८ पुलकेशी चालुक्य ३१४ पुन्हा राष्ट्रकूट ३१६ उत्तर चालुक्य ३१९ ठाण्याचे शिलाहार उर्फ शेलार ३२१ छोटीं मराठीं संस्थानें ३२३ देवगिरीचे यादव ३२५ भिल्लम व सिंघण ३२६ विद्या व कला यांना प्रोत्साहन ३२७ कृष्णदेव, महादेव व रामदेवराव ३२९ हेमाद्री व बोपदेव ३३१ पंढरपूरचा कृष्णभक्तिसंप्रदाय ३३५ ज्ञानेश्वरांनीं केलेले रामदेवरावांचे गौरव ३३७ स्वराज्याचें सुख ३३८

९ महाराष्ट्री ऊर्फ मराठी भाषाः—देशी भाषांचा उगम ३४३ वररुचीचें व्याकरण ३४६ हालाची सप्तशती ३४८ कर्पूरमंजरी ३५२ मराठी भाषा बनत होती, ३५४ मुकुंदराज व मराठी भाषा ३६० महानुभाव व मराठी भाषा ३६३ ज्ञानेश्वरांची मऱ्हाठी – साहित्य आणि शांति ३६७ संस्कृतच्या बरोबरीची मऱ्हाठी ३७० मऱ्हाठी शांतरसाचें घर ३७२ मऱ्हाठीं वाङ्मय हें आनंदाचें आवार आहे. ३७५ ग्रंथरचनेचा हेतु व सविनय समाधान ३७७ जुन्या काव्यांच्या प्रती ३८०

१० आदिकवि मुकुंदराजः—कालगणना ३८९ गुरुपरंपरा ३९२ ग्रंथरचना ३९५ विवेकसिंधु ३९६ परमामृत ४०१ वेदांत व राजयोग ४०६ सगुणोपासना ४१०

११ महानुभावपंथाचें मराठी वाङ्मयः—पंथाचे संस्थापक व प्रजारक ४१३ महानुभावपंथाचे आचारविचार ४१६ पंथाविषयीं लोकांत अप्रियता कां ४२४ सात प्रमुख ग्रंथ ४२६ कवीश्वर भास्कराचा 'शिशुपालवध' ४२७ भास्कराचा एकादशस्कंध ४४० भास्करकवीचें कृष्णचरित्रपर गद्यपद्यादि ग्रंथ ४४३ महदंबेचे धवळे ४४६ चक्रधरांची दिनचर्या ४५२ केशवराज सूरि ४५५ दामोदर-

पंडिताचें 'वत्सहरण' ४५६ नरेंद्रांचें रुक्मिणीस्वयंवर ४६५ ज्ञानप्रबोध ४६६ ऋद्धिपूरवर्णन ४७१ महानुभावपंथ व वारकरीपंथ ४७४

१२ नाथपरंपरा: — नाथपरंपरा ४८१ गोरक्षनाथ ४८२ नाथपंथाचीं मतें ४८४ नाथपंथाचा महाराष्ट्राशीं संबंध ४८५ गोरक्षनाथांचें कवित्व ४८८ गहिनीनाथांचा बोध ४९२ निवृत्तिनाथांचा गुरुपरंपरेचा अभंग ४९३ गुरुपरंपरेविषयीं ज्ञानेश्वरांच्या ओव्या ४९४

१३ श्रीज्ञानेश्वरदर्शन:—कालानुक्रम ४९७ ज्ञानेश्वरांचीं दोन जुनीं चरित्रें ४९९ नामदेवानीं वर्णिलेलें चरित्र ५० सत्यामळनाथलिखित ज्ञानेश्वर–चरित्र ५०६ ज्ञानेश्वरांचें आत्मचरित्र ५११ पूर्वील ग्रंथांचे संस्कार ५१७ श्रीगुरु–निवृत्तिनाथ ५२३ ज्ञानेश्वरांची गुरुभक्ति ५२९ कृष्णार्जुनप्रेमप्रसंग ५३६ समका–लीन संतांची ज्ञानेश्वरनिष्ठा ५४२ भक्तीचा जिव्हाळा व हृदयाची प्रेमलता ५४५

१४ भक्त नामदेव (पूर्वार्ध) : — नामदेवांच्या अभंगांची गाथा ५५३ नामदेव ५५५ पंढरीक्षेत्र व विठ्ठलभक्ति ५५८ प्रेमाचा रुसवा ५६५ भक्तीचें प्रेम–सुख ५६७ खऱ्याखोट्याची निवड ५६९ नामदेवांच्या वाणीची गोडी ५७२ पहिला शिष्य परिसाभागवत ५७३ ज्ञानेश्वरनामदेवांच्या तीर्थयात्रा ५७७ गोरा कुंभार ५८२ कच्चा घट ५८४ गुरु विसोबाखेचर ५८५ नामदेवांच्या घरची मंडळी ५८९

१५ संतमेळा व त्याचें अभंगवाङ्मय: — प्रास्तविक ५९५ ओवी व अभंग ५९६ ज्ञानेश्वरीकारांचेच अभंग आहेत. ५९७ 'बाप रखुमादेवीवर ६०१ ज्ञानेश्वरांची अभंगवाणी ६०२ 'गोपाळेत्रिण नुद्धरिजे' ६०८ 'आवडें तें करिसी देवा' ६१२ आंधळा, पांगडी, काऊ ६१३ हरिपाठाचे अभंग ६१७ मुक्ताबाई ६२० ताटीचे अभंग ६२२ मुक्ताबाई व चांगदेव ६२३ जनाबाई ६२६ जनाबाईची प्रेमळवाणी ६३१ मुक्ताबाई व जनाबाई ६३४ सोपानदेव ६३७ सच्चिदानंद बाबा कान्हू पाठक ६३९ सेना न्हावी ६४० नरहरि सोनार ६४३ सावता माळी ६४५ जगमित्र नागा ६४६ जोगा परमानंद ६४८ चोखामेळा ६५१ वैष्णवांचा मेळा ६५७ दहीकाल्याचा बाबा ६३८

१६ ज्ञानेश्वरींचें अंतरंग.—साहित्याची शोभा ६६१ उपमारूपकादि अलंकारांची गर्दी ६६२ गीतेची थोरवी ६७२ अठरा अध्यायांतील विषय ६७४ ज्ञानेश्वरींत मुख्य पातंजलयोग नाहीं, अध्यात्मयोग आहे. ६७६ जितेंद्रियता ६८० कर्मयोग ६८३ ज्ञानयोग ६८७ ज्ञानाची किंवा दैवीसंपत्तीचीं लक्षणें ६९१ अज्ञा–नाचीं किंवा आसुरीसंपत्तीचीं लक्षणें ६९५ धर्मनष्टांचे आचारविचार ६९७ भक्ति–योग ६९९ अद्वैतभक्तीचें स्वरूप ७०६ परमात्म्याची व्यापकता ७०७ पुरुषोत्तमाची

भक्ति ७१० कर्मांची हातवटी ७११ ज्ञानभक्तीची पराकाष्ठा ७१४ खरी शरणागति ७१७ परमरहस्य ७१९ अमृतानुभव ७२४

१७ ज्ञानेश्वरी सृष्टीः— आध्यात्मिक दृष्टि व आधिभौतिक सृष्टि ७३९ राजकीय परिस्थिति ७४० व्यापार व उद्योगधंदे-मोती चौक ७४३ व्यापार व उद्योगधंदे बाजार पेठा ७४६ शेती व बागाईत ७५० रोग, रोगनिवारण व वैद्य ७५३ नानाप्रकारचे लोक ७५५ लौकिक समजुती ७५८ शास्त्रीय कल्पना ७५९ प्रपंच ब्रह्मरूप आहे ७६१ पतिपत्नींची एकरूपता ७६२ लग्न व पाहुणे ७६६ भोजनाचे पदार्थ ७६८ पतिव्रता स्त्री ७६९ अपत्यप्रेम ७७० गुरुभक्ति ७७४ तरुणांचे खेळ ७७४ वृक्षवेली ७७५ पशुपक्षी व कृमिकीटक ७७८ सिंह आणि गाय ७८२ शिकार व बक ७९० इतर कांहीं प्राणी ७९२

१८ भक्त नामदेव (उत्तरार्ध): --कीर्तनाचा सुखसोहळा ७९७ पंजाबांतील कामगिरी ७९८ ग्रंथसाहेबांतलीं नामदेवांचीं पद्यें ८०० मेलेली गाय उठवली या बद्दल नामदेवांचें पद्य ८०५ नामदेव व नरसी मेहता ८०९

---

## ५ श्रीएकनाथचरित्र [आवृत्ति चवथी]

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचा जन्म व बाळपण ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर. इतक्या प्रकरणांत नाथांचे पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून ‘ स्तुतिसुमनांजलि ’ नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणे दिलीं आहेत. पृ. सं. २८८ किं. ८१२.

---

केसरी—“ महाराष्ट्रीय साधुकवींच्या चरित्रांचे व ग्रंथांचे परिशीलन करून त्यांचें हृद्गत साध्या सोप्या पण वाचकांचे मनावर विलक्षण छाप बसविणाऱ्या भाषेत प्रगट करण्यास ज्या प्रेमळतेची, श्रद्धेची, सहृदतेची व भाषाप्रभुत्वाची जरूरी आहे ते गुण रा. पांगारकर यांचेमध्यें पुष्कळ अंशानें वास करीत असल्यामुळें त्यांची साधुचरित्रमाला महाराष्ट्रांत लोकप्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं. ”

# संतकृत संतगौरव

ज्ञानेश्वरांच्या संगतिसुखांत मुरलेल्या संतांचा त्यांच्याविषयीं जो जिव्हाळा होता तोच त्यांच्यानंतर झालेल्या सर्व संतांचा होता. त्यापैकीं त्यांच्याच तोलाची कामगिरी करून त्यांचा संप्रदाय पुढें चालविणारे जे **एकनाथ व तुकाराम** हे त्यांच्याविषयीं काय ह्मणतात तें पाहूं. नाथांनीं आपल्या एकादशावरील टीकेंत (अ० १) ह्मटलें आहे: —

वंदूं प्राकृत कवीश्वर । निवृत्तिप्रमुख ज्ञानेश्वर ।
नामदेव चांगदेव वटेश्वर । ज्यांचें भाग्य थोर गुरुकृपा ॥१२०॥
जयांचे ग्रंथ पाहतां । ज्ञान होय प्राकृता ।
तयाचें चरणीं माथा । निजात्मता निजभावें ॥ १२१ ॥

नाथांचे ज्ञानेश्वरमंडळावर सुमारे ५० अभंग आहेत, त्यांत ज्ञानेश्वरकालीन सर्व संतांचे उल्लेख असून त्यापैकीं कित्येक लोकप्रसिद्ध कथांचे संदर्भही दिले आहेत. नामदेवाविषयीं नाथांनीं ह्मटलें आहे कीं प्रल्हाद, अंगद, उद्धव, व नामदेव हे एकाच भक्ताचे चार अवतार आहेत, नामदेवाचे श्रीपतीनें सर्व लळे पाळले, तो 'नामावांचूनि दुसरें कांहीं नेणे' ह्मणून त्याला नामदेव ह्मणत, त्यानें पंढरपुरीं महाद्वारी समाधि घेतली व त्यानें तीर्थयात्राभिषानें जगाचा उद्धार केला. चारी भावंडांविषयीं त्यानें प्रेमादरपूर्वक फार लिहिलें आहे. 'मुक्ताबाईनें बोध खेचरासी केला । तेणें नामयाला बोधियेलें' 'नामपाठें तरला चोखा तो महार' 'खुरपूं लागे देखा देव सावत्यासी' 'नामपाठें जनाबाई बरोबरी । दळी कांडी हरी शेणी वेंची' इत्यादि प्रकारें ज्ञानेश्वरकालीन संतांविषयीं प्रेमोद्गार काढून ज्ञानेश्वरांविषयीं एकनाथ ह्मणतात:--

कैवल्याचा पुतळा प्रगटला भूतळा । चैतन्याचा जिव्हाळा ज्ञानोबा माझा १
चालविली जडभिंती हरली चांगयाची भ्रांती । मोक्षमार्गिचा सांगाती ज्ञानोबा माझा २
वेड्यामुखीं वेद बोलविला गर्व द्विजांचा हरिला । शांतिबिंब प्रगटला ज्ञानोबा माझा ३

ज्ञानेश्वरचरित्रांतल्या ह्या कथा नाथांप्रमाणें तुकोबांनींही गायिल्या आहेत व उभयतांनींही त्यांना विष्णूचा अवतार ह्मटलें आहे. ज्ञानेश्वरांनीं सर्व संत एकत्रित केले--' सकळ मेळा हा सिद्धांचा । ज्ञानाबाईअनुग्रहाचा' असें नाथांनीं ह्मटलें आहे व 'जयानें घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची' असेंच तुकोबांनींही ह्मटलें आहे. ह्मणजे संतांचें संघटन केल्याचें श्रेय दोघांनींही ज्ञानेश्वरांसच दिलें आहे. ज्यानें अर्जुनास गीता सांगितली त्याच भगवंतानें ज्ञाने–

श्वररूपानें प्रगट होऊन लोकोद्धारार्थ देशभाषेंत ज्ञानदेवी ग्रंथ रचिला असें नाथांनीं म्हटलें आहे--तुकोबांनींही संतमंडळाच्या सर्व लोकप्रसिद्ध कथांचे उल्लेख अनेकशः केले आहेत.

[ १ ] ज्ञानियाचा राजा गुरुमहाराज । ह्मणति ज्ञानदेव ऐसें तुह्मां ॥ १॥

[ २ ] जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥ २॥

इत्यादि तुकोबांचे अभंग प्रसिद्धच आहेत.

---

## --- श्रीदत्तस्तव ---

( लेखकः—रामचंद्र बळवंत खाडिलकर, वकील, नाशीक )

[ चालः—रामदास माउली ]

स्वामिराज माउली । ग माय माझी । दत्तराज माउली ॥ध्रु॥
त्रिगुणात्मक विभु, विमल निरंजन । सच्चिद्घन सांवळी ॥ १ ॥
स्वयंप्रकाशी, रम्य मनोहर । मूर्ती बहु कोवळी ॥ २ ॥
त्रयमूर्ती ही गुरुरायाची । ऐश्वर्यें शोभली ॥ ३ ॥
गोड तुझ्या या रूपा पाहुनी । सुखरुप मति जाहली ॥ ४ ॥
अखंड निश्चळ निरुपम निर्मळ । जगिं नटली एकली ॥ ५ ॥
काहिं न होवुन सर्वचि होसी । लीला तव गमली ॥ ६ ॥
तव कृपेविण, दिससी नच तूं । असुनीयां जवळी ॥ ७ ॥
भक्तजनासी उद्धाराया । अवनीं अवतरली ॥ ८ ॥
संसृति—तापें, तप्त जनांसी । शीतल सुख–सावुली ॥ ९ ॥
नर--नारी--गण, सुरवरमुनिही । वंदिति चरणांगुली ॥ १० ॥
नाम जयाचें, प्रेमें गावुनी । नाचत भूमंडळीं ॥ ११ ॥
वानुं किती मी तव गुण माये । वाणी मौनावली ॥ १२ ॥
अत्रीनंदन, भवभयभंजन । बोधांजन घाली ॥ १३ ॥
जगन्माय तूं असति दयाघन । बाला करि जवळी ॥ १४ ॥
सत्संगतिं तव भक्ती देई । दूर्जनपण मावळी ॥ १५ ॥
नामस्मरणामृत तूं पाजी । आमुंचि तू गाउली ॥ १६ ॥
बालराम हा नमितो भावें । ठेवि सदा पाउलीं ॥ १७ ॥

# ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य.

## अध्याय अठरावा ( पुढें चालू )

ज्ञेय, ज्ञाता व ज्ञान अशी सर्व कर्मांची त्रिविध कर्मचोदना आहे ( कर्मचोदना ह्म० कर्म करण्याची प्रेरणा किंवा प्रवृत्ति, ) व कर्म, कर्ता व करण (इंद्रियसमुदाय) असा त्रिविध कर्मसंग्रह आहे. कर्मसंग्रह ह्म. कर्मांचें साहित्य. या प्रकारें कर्म करावें अशी चोदना उर्फ प्रेरणा झाल्यावर ज्ञाता तोच कर्ता होतो, अर्थात् कर्ता ज्या क्रिया उभारतो तें कर्म व ज्या साधनांनीं कर्म करितो तें करण ( इंद्रियजात); ह्याप्रमाणें कर्ता, कर्म, करण हा कर्मसंचय व ज्ञेय, ज्ञाता, ज्ञेय हें प्रवृत्तित्रय कर्मांचा हिशेब करितांना 'चोदना' ह्म० अंतःकरणप्रवृत्ति व 'संग्रह, ह्म० बाह्य क्रिया यांचा विचार करावा लागतो यापैकीं ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान यांचा विचार पूर्वी १३ व्या अध्यायांत केला आहे. येथें फक्त ज्ञान, कर्म व कर्ता यांचाच विचार पूर्णविचारानें गुणभेद सांगणाऱ्या सांख्यशास्त्राच्या अनुरोधानें सांगतातः—

**त्रिविधज्ञानः**— 'तरी अर्जुना गा तें फुडें। सात्विक ज्ञान चोखडें। जयाच्या उदयीं ज्ञेय बुडे। ज्ञातेनिसीं ' ॥ ५२९ ॥ शिवापासून तृणापर्यंत सर्व भूतांत एकच अविभक्त ( अखंड ) व अव्यय ( अविनाशी ) भाव ह्म० आत्मतत्व ज्या ज्ञानाच्या योगानें दिसतें व जेथें ज्ञानाची त्रिपुटी मावळते तें शुद्ध **सात्विक**-ज्ञान होय. हें मोक्षलक्ष्मीचें भुवन आहे. ' जे भेदाची कांस धरून चालतें ह्म. भूतें भिन्नभिन्नपणानें पाहतें व याप्रमाणें 'एकमेवाद्वितीय आत्म्याविषयीं भेदबुद्धि उत्पन्न करितें तें राजसज्ञानः—' अळंकारपणें झांकलें। बाळका सोनें कां वांया गेलें। तेवीं नामीं रूपीं दुरावलें। अद्वैत जया ॥ ५४२ ॥ अवतरली गाडग्यां घडां। पृथ्वी अनोळख झाली मूढां। '–असो 'तैसी जया ज्ञाना। जाणोनि भूतव्यक्ति भिन्ना। ऐक्यबोधाची भावना। निमोनि गेली ' ॥ ५४५ ॥ तें **राजसज्ञान** होय. आत्मज्ञानाव्यतिरिक्त सर्व शास्त्रें व ज्ञानें या वर्गांतच येतात. तामस ज्ञान ह्म० मातंगसदनच होय. तें डावलावयासाठींच त्याची ओळख असावी. एका कार्याच्या ठिकाणीं ( देह किंवा पाषाणप्रतिमा ) पूर्णपणें आसक्त झालेलें, वेदबाह्य, तत्वार्थशून्य व क्षुद्र असें जें ज्ञान तें तामसज्ञान होय. ' तरी किरीटी जें ज्ञान। हिंडे विधीचेनि वस्त्रें हीन। श्रुति पाठमोरी नग्न। ह्मणोनि तया'--तें विधीचें वस्त्र टाकून नागवें हिंडतें ह्मणून श्रुतिमाउलीनें त्याच्याकडे पाठ फिरविली आहे; ' अगा वांता कां वाढिलेया। साजुक कां सडिलिया। विवेक कावळिया। नाहीं जैसा ॥ तैसें निषिद्ध सांडूनि घावें। कां विहित आदरें घ्यावें। हें विषयांचेनि नांवें।

नेणेचि जें ॥ जेतुलें आड पडे दिठी । तेतुलें घेचि विषयांसाठीं । मग तें स्त्रीद्रव्य वांटी । शिश्नोदरां' ॥ ५५७ ॥ तीर्थातीर्थ हा विचार नाहीं 'तयाचि परी खाद्याखाद्य । न ह्मणे निंद्यानिंद्य । तोंडा आवडे तें मेध्य (पवित्र) । ऐसाचि बोधू'-- तामस ज्ञान सारें जग हें आपलें धन आहे व आपलें भोग्य आहे असें समजतें. तें देहालाच आत्मा मानतें. व सारें कर्म उदरासाठींच करितें. कदाचित् देव मानलाच तर पाषाणालाच मानतें ह्याला ज्ञानही ह्मणवत नाहीं; बधिराचे कान किंवा अपेयाला पान तसें त्याला हें नुस्तें आडनांव आहे. ह्या त्रिविध ज्ञानाच्या प्रकाशानेंच कर्त्यांच्या क्रिया प्रत्यक्ष होत असतात.

**त्रिविधकर्म**:--संग व फलाशा सोडून रागद्वेषरहित होऊन केलेलें जें नियत--नित्यनैमित्तिक कर्म तें **सात्विक कर्म**--' तरी घरीं मातापितरां । धड बोली नाहीं संसारा । येर विश्व भरी आदरा । मूर्ख जैसा ॥ कां तुळसीचिया झाडा । दुरूनि न घापे शिंतोडा । द्राक्षींचिये तरी बुडा । दूधचि लाविजे'--त्याप्रमाणें आवश्यक जीं नित्यनैमित्तिक कर्में त्याविषयीं अनादर आणि काम्यंकर्मांचे मोठ्या ईर्षेनें डोंगर उठवितो आहे त्याचें कर्म तें **राजसकर्म**. अनुबंध ह्म० पुढील परिणाम, क्षय ह्म० स्वतःचा वा दुसऱ्याचा घात, हिंसा व पौरुष ह्म० बळ या पैकीं कशाचाही विचार न करितां केलेलें जें कर्म तें **तामसकर्म**.

**त्रिविधकर्ता**:--आतां हें त्रिविध कर्म करणारा कर्ताही कर्मभेदानें त्रिविध कसा होतो तें पहाः संग ह्म० कर्तृत्वाहंकार नाहीं, कर्म सिद्ध होईल याविषयीं निर्विकार राहून धृति व उत्साह यांनीं युक्त होत्साता जो स्वधर्मकर्म आचरितो तो **सात्विककर्ता** होय राग, लोभ करणारा व कर्मांच्या सिद्धीनें हर्ष व असिद्धीनें शोक यांचे हेलकावे खाणारा तो **राजसकर्ता** होय; ' मनें वाचा कायें । भलतेया दुःख देत जाये । स्वार्थ साधितां न पाहे । पराचें हित ' ॥ ६'२६ ॥ हें -त्याचें लक्षण होय. आतां चंचळ मनाचा, विषयी, अहंकारी, कपटी, परघातक, पुण्यकर्मांच्या वेळीं आळसी, सदाविषादी ह्म० रडका, व दीर्घसूत्री असा कर्ता तो **तामसकर्ता** होय. आतां यापुढें बुद्धि, धृति व सुख यांची त्रिविधता सांगतातः--

**त्रिविधबुद्धिः** - स्वाधिकारानुरूप विधीच्या ओघानें जें नित्यकर्म तें केलें असतां आत्मप्राप्तीचें फळ मिळतें व यासाठीं प्रवृत्ति आणि निवृत्ति, कार्य आणि अकार्य, भय आणि अभय, बंध आणि मोक्ष हें सारें यथार्थ जाणणारी बुद्धि **सात्विक** होय. ती प्रवृत्तीनिवृत्तींच्या मापानें कार्याकार्याचा विवेक करिते. धर्माधर्म किंवा कार्याकार्य यथार्थ न समजणारी बुद्धि **राजस** व तमानें व्याप्त होऊन अधर्मालाच धर्म मानणारी व सर्व गोष्टी उलट्या पाहणारी बुद्धि **तामस** होय.

**त्रिविध धृतिः**--ज्या आत्मनिष्ठ अंतर्वृत्तीनें मोठ्या धैर्यानें मन, प्राण व इंद्रियें यांच्या क्रिया आवरल्या जातात ती **सात्विक--धृति**; ज्या धृतीनें धर्म, अर्थ व काम ( मोक्ष नव्हे ) हे तीन पुरुषार्थ साधले जातात व जी प्रसंगीं फळाची आकांक्षा बाळगते ती **राजस धृति** व ज्या धृतीनें मनुष्याला दुर्बुद्धि सुचून स्वप्न, भय, शोक, विषाद व मद यांनीं बुद्धि घेरली जाते ती **तामस धृति**--तिला धृति ह्मणणेंही गैर आहे, पण राक्षसांना पुण्यजन ह्मणतात किंवा ग्रहांतला अग्नि असा जो मंगळ त्याला मंगळ ह्मणतात, त्यांतलेंच हें समजावें ! ही त्रिविध बुद्धि व धृति सांगण्याचें कारण आहे तें ऐक-- बुद्धि कर्माला दाखवितें व तें कर्म इंद्रियें घडवून आणतात पण तें घडवून आणण्याला जें धैर्य लागतें तें तीन प्रकारचें आहे. कसें ते वर सांगितलेंच आहे. बुध्दीनें कर्म दाखविल्यावर व धृतीनें तें इंद्रियांकरवीं घड--वून आणल्यावर त्या कर्माचें फळ उत्पन्न होतें, त्या फळाला सुख असें ह्मणतात. तें सुखही त्रिविध आहे.

**त्रिविध सुखः**--' जें आत्मयाचिये भेटी । जीवांसी होय ' तें सुख, आत्म--सुख, अभ्यासानें ह्म० सततसेवनानें जेथें जीव रमतो व दुःखाचा विराम होतो तें सुख. सुखही गुणसंगतीनें त्रिविध होतें. आरंभीं विषासारखें कडु पण परिणामीं अमृततुल्य मधुर असून आत्मबुद्धिप्रसादामुळें होतें तें **सात्विक सुख**. श्रवणादि साधनें, कर्कश व्रताचरणें, सर्वस्नेहाचा त्याग करविणारें वैराग्य, विषयांपासून इंद्रियांना आवरण्याचे कष्ट--हें सर्वसोसल्यावर शेवट किती गोड होतो बरें ! आत्मज्ञानानें वैराग्यादिक परिपक्व झाल्यावर अविद्यानाश होतो ' तेव्हां सागरीं गंगा जैसी । आत्मीं मिनल्या बुद्धि तैसी । अद्वयानंदाची आपैसी । खाणी उघडे ॥ ऐसें स्वानुभावविश्रामें । वैराग्यमूळ जें परिणमे । तें **सात्विक** येणें नामें । बोलिजे सुख' ॥ ७९३ ॥ आतां राजस सुख. आधी गोड पण परिणामीं विषतुल्य असें विषयेंद्रियसंयोगापासून होणारें सुख तें **राजस**. आधी कडु व शेवटींही कडु असें निद्रालस्यप्रमादापासून होणारें व आत्मविस्मृति पाडणारें जें सुख तें तामस सुख. ' आणि अपेयाचेनि पानें । अखाद्याचेनि भोजनें । स्वैरस्त्री ( वेश्या )सन्निधानें । होय जें सुख ।। कां पुढिलांचेनि मारें । नातरी परस्वापहारें जें सुख अवतरे । थाटांच्या बोलीं ॥ जें आलस्यावरी पोखिजे । निद्रेमाजीं जें देखिजे । जयाच्या आद्यंतीं भुलिजे । आपुली वाट ॥ ८०८ ॥ तें गा सुख पार्था । तामस जाण सर्वथा ! मूळचें आत्मसुख कर्मभेदानें त्रिविध कसें झालें हें सांगितलें. कर्ता, कर्म व कर्मफळ या त्रिपुटीवांचून ह्या स्थूलसूक्ष्मसृष्टींत दुसरें कांहींच नाहीं आणि ही त्रिपुटी सत्वादि तीन गुणांनीं गुंफलेली आहे. ह्या पृथ्वीवर, अंतराळांत किंवा स्वर्गांत असा एकही

प्राणी नाहीं कीं जो त्रिगुणापासून सुटला आहे. सारी सृष्टि त्रिगुणात्मक आहे.

(आतां त्रिगुणविभागानेंच चातुर्वर्ण्याची व्यवस्था कशी लावली तें सांग--तात. स्वधर्म, नियत कर्म, विहित कर्म, भागाला किंवा वांट्याला आलेलें कर्म, उचित कर्म इ० प्रकारें गीताज्ञानेश्वरींत ज्या जागोजाग उपदेश केला आहे, तें कर्म कोणतें हें सांगतात.)

'धुरेचे (अग्रभागींचे) ब्राह्मण होत व 'वैदिक विधानीं योग्य' ह्मणून क्षत्रिय व वैश्य हेही ब्राह्मणांसारखेच मान्य आहेत. त्रिवर्णाला वेदाधिकार आहे. व सेवावृत्तीच्या सांनिध्यामुळें शूद्रवर्ण हा चौथा वर्ण झाला. या चारी वर्णांच्या कर्मभागाचें विवरण ह्मणजेच चातुर्वर्ण्यव्यवस्था होय. सत्वरजतमात्मक प्रकृतीच्या योगानें चारी वर्ण झाले. बाप जसा स्वकष्टार्जित धन पुत्रांना वांटून देतो, सूर्य जसा पांथिकांना भिन्नभिन्न मार्ग दाखवितो अगर स्वामी जसा सेवकांना त्यांचीं त्यांचीं पृथक् कामें सांगतो त्याप्रमाणें ही चातुवर्ण्यव्यवस्था श्रुतीनें सांगितली आहे. शम, दम, तप, शौच, क्षांति, आर्जव, ज्ञान, विज्ञान, आस्तिक्य हे शमादि नवगुण ज्या कर्मांत आहेत तें ब्राह्मणकर्म होय. शम ह्म० बुद्धीचा विराम ह्म० शांति. विधिदंडानें कर्मेंद्रियें अधर्माकडे जाऊं न देणें हा दम. 'ईश्वरनिर्णय चित्तीं वाहणें सदा' हें तप. 'मन भावशुद्धि भरलें. आंग क्रिया अळंकारिलें' असें अंतर्बाह्य निर्मलत्व हें शौच ह्म० शुचिता, पवित्रता. पृथ्वीप्रमाणें सहनशील असणें ही क्षमा. ओघ वांकडा असला तरी गंगा सरळच किंवा ऊंस पांठीकडे वळला तरी गोडच त्या प्रमाणें विषम जीवांसीही सरळपणानें वागणें हें आर्जव (ऋजुत्व, सरळपणा.) माळयानें झाडाच्या मूळाशीं घातलेलें पाणी फळरूपांत परिणाम पावतें त्याप्रमाणें 'शास्त्राचारें तेणें। एक ईश्वरचि पाळणें' हें विज्ञान. राजमुद्रा असलेल्याला प्रजा जशी मानते त्याप्रमाणें शास्त्रमार्गाला आदरानें मानणें हे आस्तिक्य. हा नवरत्न हार हें ब्राह्मणाचें मुख्य लेणें आहे. आतां क्षत्रियकर्म सांगतों. शौर्य, तेज, धृति, दाक्ष्य, युद्धांत अपलायन, दान व ईश्वरभाव हे सात गुण क्षत्रियाचे आहेत. सूर्याला दुसरा कोणी सोबती लागत नाहीं, किंवा सिंह जसा पाठिराखे किंवा कळप यांची अपेक्षा न करितां स्वबळावर उडी घालतो त्याप्रमाणें स्वतःच्या अंगच्या पराक्रमानें शत्रूवर तुटून पडणें तें शौर्य. (सूर्याचेनि प्रतापें। कोडिही नक्षत्र हारपे' त्याप्रमाणें स्वतःच्या प्रौढप्रतापानें जगाला विस्मय देणें--थक्क करून सोडणें तें तेज. आकाश कोसळून पडलें तरी बुद्धि अचळ राहणें ती धृति--सभोंवार हवें तितकें पाणी असलें तरी तें खालीं दडपून कमळ वर डोकें काढून विकास पावतें त्याप्रमाणें अनेक प्रसंगांतून

प्रज्ञाबळानें निश्चितार्थाला पावणें तें दाक्ष्य ( दक्षता ). समरांगणीं शत्रूला पाठ न दाखविणें ह्म० अपलायन हा पांचवा गुण किंवा गुणेंद्र होय. दुसऱ्याचा संतोष होइल असें विपुल देणें तें दान. वेदाज्ञेशीं एकनिष्ठ राहून जगाचें पालन करणें व जगाच्या संतोषानें जग भोगणें हा ईश्वरभाव. सप्तर्षींनीं आकाश सुशोभित होतें तसें शौर्यादि सप्तगुणांनीं पवित्र झालेलें जें कर्म तें क्षत्रियकर्म होय. सप्तगुणार्णवांनीं वेष्टिलेली पृथ्वी क्षत्रियच भोगतो. आतां वैश्यकर्म सांगतों. 'भूमिबीज नांगर । यया भांडवलाचा आधार । घेऊन लाभ अपार । मेळवणें जें' तें कृषिकर्म; शेतीवर निर्वाह; गोधनें राखणें किंवा 'समर्घाची महार्घ वस्तु' विकणें ह्म० स्वस्तभावानें घेतलेल्या जिनसा महाग करून विकणें हें वाणिज्य—तात्पर्य कृषि, गोरक्ष्य व वाणिज्य हीं तीन वैश्यकर्में होत. ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या तीनही वर्णांची शुश्रूषा ह्म० द्विजसेवा हें शूद्राचें कर्म होय.

---

# प्राचीन देशीभाषा.

## १ देशी भाषांची एकात्मता

हिंदुस्थानांत सांप्रत बोलल्या जाणाऱ्या भाषांत बंगाली, हिंदी, गुजराथी, मराठी, कानडी, तेलगू, मल्याळी व तामीळ ह्या भाषा प्रमुख होत. बंगाली भाषा बोलणारे लोक ५ कोटी, व हिंदी बोलणारे १० कोटि लोक आहेत. तेलगूही २ कोटी ३६ लक्ष लोकांची मातृभाषा आहे. मराठी व तामीळ ह्या प्रत्येकी १ कोटि ८७ लक्ष लोकांच्या मातृभाषा असून १ कोटि १० लक्ष लोकांची भाषा कानडी आहे व पाऊण कोट लोक मल्याळी भाषा बोलतात. १९२१ च्या खानेसुमारींत हे आंकडे दिलेले आहेत. या वर सांगितलेल्या सात भाषांचे दोन गट पाडतां येतात. बंगाली, हिंदी, गुजराथी व मराठी ह्या चार भाषांचा एक गट व कानडी, तेलगू, तामील व मल्याळी ह्या चार भाषांचा एक गट. पहिल्या गटांत आर्य भाषा व दुसऱ्या गटांत द्राविड भाषा प्रामुख्यानें येतात. तथापि आठही भाषा एका हिंदु संस्कृतीच्या असल्यामुळें व आठही भाषांवर संस्कृत भाषेचें व वैदिक वाङ्मयाचे संस्कार पूर्णपणें झाल्यामुळें ह्या आठही भाषा बोलणाऱ्या लोकांच्या संस्कृतींत, धर्मविचारांत व वाङ्मयांत एकसूत्रीपणा आहे, व ह्या आठही भाषा बोलणारे लोक एका संस्कृतींतच शतकानुशतकें वाढल्यामुळें त्यांच्यांत एक राष्ट्रीयत्व पूर्णपणें बाणलेलें आहे. चार आर्यभाषा व द्रावीड भाषा मिळून आठही भाषा

बोलणारे सर्व लोक हिंदुस्थानांतील आर्यसंस्कृतीचे व वैदिकधर्माचेच आहेत यांत बिलकूल संशय नाहीं. द्रावीड भाषांचा संघ आपणांस अगदी वेगळा वाटतो, पण तशी खरी स्थिति नाहीं. आर्यभाषांवर संस्कृत भाषेचा जसा पगडा बसला आहे तसा तो द्राविड भाषांवरही बसलेला आहे. तामीळ भाषेंत शेकडा ४० शब्द संस्कृत आहेत, तेलगू भाषेंत शेकडा ५० आहेत व मल्याळी भाषेंत तर ते शेकडा ६० आहेत! कानडी भाषेचीही हीच स्थिति आहे. तात्पर्य ह्या आठही भाषा (त्यांच्या पोटभाषा किंवा संबंधीभाषासगट) बोलणाऱ्या लोकांचा धर्म एक आहे, आचारविचार एक आहेत, संस्कृति एक आहे, सर्वस्वी हे एकरूप आहेत. चालीरीतींत किंवा स्वभावांत थोडेफार फरक दिसत असले तरी २४ कोटि हिंदु लोकांच्या एकत्वाला त्यामुळें अगदी बाधा येत नाहीं. बंगाल्यांत, उत्तर हिंदुस्थानांत, राजपुतान्यांत, गुजराथेंत, तेलंगणांत किंवा तामील देशांत हिंदु मनुष्य कोठेंही हिंडला तरी आपण आपल्याच लोकांत व देशांत आहोंत असें त्यास आढळून येतें. हिंदुस्थानभर हिंदुसंस्कृति एक आहे. देवाविषयीची पूज्यबुद्धि सर्वत्र आहे, शिवविष्णूंचीं मंदिरें व उपासना सर्वत्र आहे, गाईब्राह्मणांचा आदर सर्वत्र आहे, सर्वांच्या वाङ्मयाचें स्वरूप सामान्यतः एक आहे. जें हिंदुत्व काशीस आहे तेंच कांचींत आहे, जें सौराष्ट्रांत आहे तेंच बंगाल्यांत आहे. भाषा भिन्न झाल्या तरी वाङ्मय तेंच आहे, प्रदेश वेगळे दिसले तरी हिंदूंचा आत्मा एक आहे. असो--ज्ञानेश्वरी ग्रंथ मराठी भाषेंत शके १२१२ मध्यें झाला व अर्वाचीन महाराष्ट्राची त्यामुळें मुहूर्तमेढ रोवली गेली. शके १२१२ च्या पूर्वी हिंदुस्थानांतील इतर देशी भाषांत वाङ्मयाची स्थिति कशा प्रकाराची होती हें आपणांस थोडक्यांत पाहावयाचें आहे.

## २ हिंदी वाङ्मय.

हिंदी ही उत्तर हिंदुस्थानची मुख्य भाषा आहे. राजस्थानी, हिंदी व बिहारी या तीनही भाषा परस्परसदृश आहेत व तिन्ही भाषा बोलणारे लोक १० कोटींहून अधिक आहेत. मराठी भाषेची जशी ओवी व अभंग हीं दोन मुख्य वृत्तें, तशीं हिंदी भाषेचीं दोहा, सोरठा, चौपाई, छप्पै हीं मुख्य वृत्तें आहेत. हिंदी भाषेचीं प्रांतिक स्वरूपें भिन्नभिन्न असलीं तरी तिचें प्रधानरूप एकच आहे. रजपुतन्यांत पूर्वी बहुधा प्रत्येक राजाच्या दरबारीं राजकवि असत. हे चारण व भाट राजेमहाराजांच्या संगतीला राहून राजाचें यशोगायन करीत. हिंदी कवितेचा उगम भाटांच्या गायनांत आहे. हिंदी भाषेचा पहिला कवि चंदभाट हा होय. चंदभाटाच्या पूर्वी असे चारपांच भाटकवि उर्फ शाहीर झाले, पण त्यांचीं काव्यें उपलब्ध नाहींत. चंदभाट हा दिल्लीचा शेवटचा हिंदु राजा पृथ्वीराज चव्हाण

याच्या संगतीला होता. हा विद्वान् असून राजकार्यनिपुण होता. पृथ्वीराजाचा व त्याचा स्नेह होता महंमदघोरीबरोबर झालेल्या शेवटच्या युद्धांत पृथ्वीराज मारला गेला. त्याच युद्धांत आपल्या स्वामीबरोबर चंदभाटहीं धारातीर्थी पडला.ही गोष्ट इ० स० ११९२ ( शके १११३ ) मध्यें झाली. तेव्हां पृथ्वीराज ४३ वर्षांचा होता, व चंदकवि ६५ वर्षांचा होता, अर्थात् चंदभाटाची हयात शके १०४८ ते १११३ ही ठरते. चंदकवीनें पृथ्वीराजरासो नांवाचा पृथ्वीराजाच्या चरित्रवर्णनपर ग्रंथ केला तो हिंदीभाषेंतला पहिला ग्रंथ होय.

हा ग्रंथ ज्ञानेश्वरीपूर्वी बरोबर शंभर वर्षें झाला. ह्या ग्रंथाची भाषा जुनाट हिंदी असून अर्वाचीन काळच्या हिंदी पंडीतांसही ती लागणें कठीण जाते. ह्या ग्रंथाची भाषा प्रौढ, माहिती परिपूर्ण व वर्णनें रसभरित आहेत. ह्या ग्रंथांत पृथ्वीराजानें इतर राजांबरोबर ज्या लढाया केल्या त्या लढायांचें व पृथ्वीराजानें लढाया करून ज्या राजकन्या पळवून आणल्या त्यांच्या प्रणयलीलांचें वर्णन आहे. ह्मणजे ग्रंथांत शृंगार व वीर हे पहिले दोन रस प्रधान आहेत! मंगलाचरणांत शिव, गणेश व शारदा यांना वंदन केल्यावर दशावतारांच्या संक्षिप्त कथा दिल्या आहेत. ह्यानंतर ग्रंथांत परमार्थ कोठेंही नाहीं. खणाखणाचीं युद्धें, मृगया, कोठें-कोठें सृष्टि सौंदर्य व तरुणींचे विलास या विषयांचीं भरपूर वर्णनें आहेत! हिंदी भाषेच्या अभिमान्यांना ह्या ग्रंथाविषयीं मोठा आदर वाटतो. पृथ्वीराज विषय-विलासी व पराक्रमी होता. याचें वर्णन करण्यांत कवीनें आपली रसिकता व बहुश्रुतता व्यक्त केली आहे, राजानें युक्तीनें वा लढाया करून अनेक राजकन्या पळवून आणल्या व त्यांच्याशीं विवाह केले. देवगिरिच्या यादवराजाची कन्या शिशुव्रता त्यानें बलात्कारानें हरण करून आणली. याप्रमाणें त्यानें स्वतःस पुष्कळ शत्रू करून ठेवले. कनोजचा राजा जयचंद याची कन्या संयोगिता इच्यावर त्याचा डोळा होता, पण त्याचा मनोदय सिद्धीस गेला नाहीं. जयचंद त्याचा हाडवैरी मात्र बनला व त्यानें महंमदघोरीला बोलावून आणले! घोरीनें दिल्लीवर स्वारी केली त्या युद्धांत पृथ्वीराज पडला. घोरीनें दोन वर्षांतच कनोजवर स्वारी करून तेंही राज्य घेतलें! असो. विषयविलास, आपापसांतलीं वैमनस्यें व घरभेदीपणा या क्षत्रियांच्या दुर्गुणामुळें हिंदुस्थान मुसलमानांच्या ताब्यांत गेला हें ह्या चंद-भाटाच्या ऐतिहासिक काव्यावरून स्पष्ट होतें! पृथ्वीराजरासो ह्या ग्रंथांत शेकडा ३० शद्ब शद्ब संस्कृत, ३० शौरसेनी भाषेंतले व बाकीचे मागधी, अवधी, राज-पुतानी, पंजाबी, व्रज इ० भाषांतले आहेत. त्यांत थोडे अरबी शद्बही आहेत ग्रंथाचा शेवटचा भाग चंदभाटाचा मुलगा जल्हकवि यानें पुरा केला. मोहोबाचा परमाल राजा याचें असेच वर्णन चंदकवीचा समकालीन भाट कवि जगनायक

यानें केलें आहे. इ. स. १३२८ च्या सुमारास चंदकवीच्याच घराण्यांत झालेल्या सारंगधरभाटानें हम्मीरराजाच्या वर्णनपर हम्मीररासो व हम्मीरकाव्य हे हिंदी ग्रंथ लिहिले आहेत. तात्पर्य, हिंदी भाषेंतला पहिला ग्रंथ जरी ज्ञानेश्वरीच्या अगोदर शंभर वर्षें झाला असला तरी तो केवळ एका विषयी व अपेशी राजाच्या वर्णनाचा आहे व त्याच्यानंतर दोनशे वर्षेंही असल्या शाहीरांच्याच किरकोळ कवनांत गेली हें यावरून उघड दिसून येतें. हिंदी भाषेचा प्रसार हिंदुस्थानभर ज्या वैष्णव सत्कवींच्या ग्रंथामुळें झाला ते सर्व सत्कवि ज्ञानेश्वरानंतरचे आहेत. हे सत्कवि वैष्णवधर्माच्या लाटेबरोबर निर्माण झाले आहेत. रामानंदाचा शिष्य कबीर, केशवदास, तुळसीदास, बिहारीलाल, सूरदास, मिराबाई, सुंदरदास, शिखांचा 'आदिग्रंथ' लिहिणारा व संग्रह करणारा गुरु अर्जुन, शिवकालीन प्रसिद्ध भाट भूषण हे सर्व ज्ञानेश्वरीनंतर ३।४ शे वर्षांत झाले आहेत. पंजाबी हिंदी, काश्मीरी हिंदी, रजपूत हिंदी, मध्यप्रांतीय हिंदी, बंगाली हिंदी असे हिंदी भाषेचेही दहा पांच प्रकार आहेत, म्हणजे या सर्वांत थोडथोडा फरक आहे. हिंदी हें तिचें सर्वसामान्य स्वरूप असलें तरी प्रांतागणित तिच्यांत कांहीं फरक पडलेला आहे.

## ३ बंगाली वाङ्मय

मागधी भाषेंतून बंगाली भाषा निघाली असल्यामुळें व मगध (बिहार) हा देश बुद्धधर्म व जैनधर्म यांचें उत्पत्तिस्थान व विकासस्थान असल्यामुळें बंगाली भाषेतील पहिलें वाङ्मय ह्या धर्मांच्या प्रसारास वाहिलें गेलें व पुढील काळांतही दीर्घकाळपर्यंत बंगाली भाषेंतील हिंदु वाङ्मयावरही त्या धर्मांचेच परिणाम पुष्कळ झाले. बंगाली भाषेला बांगला, बंग किंवा बंगभाषा म्हणतात. बंगाली वाङ्मयांत प्रथम 'डाकेरवाचन' व 'धर्ममंगल काव्यें' हे रचनाविशेष ११ व्या शतकांत फार लोकप्रिय झाले. यावर बौद्धांच्या विचारांची छाप प्रथम पडलीं पण पुढें ब्राह्मणांनीं ब्राह्मणधर्माचीं तत्वें गोवून त्याच जातीचीं काव्यें केलीं व तीं बंगालभर पसरलीं त्यांच्या कर्त्यांपैकीं एक 'धर्ममयूर' नांवाचा ब्राह्मणकवि १२ वे शतकांत झाला. बौद्धांचा 'सहज पंथ' व त्या पंथाचें तांत्रिक वाङ्मय यांचा पगडा कांहीं काळ बंगाली लोकांवर पडला. त्या पंथानें निर्वाणप्राप्तीचें मुख्य साधन सौंदर्योपासना ठरविली ! त्याचा परिणाम वाईट झाला. वैवाहिक बंधनें व सामाजिक आचार हे त्यामुळें ढिले पडले. याचा एक परिणाम मात्र हा झाला कीं बौद्धधर्म त्याज्य वाटूं लागला व शिवाची उपासना उदयाला आली. बौद्धमतांत संन्यास ह्म० स्त्रीचा त्याग मुख्य मानीत, पण हा अस्वाभाविक असल्यामुळें

बुद्धपंथच मागें पडला. शिव व दुर्गा ( पार्वती ) यांचें ऐक्य आहे व हें जाणून संसार करीत असतांना समाधिसुख भोगतां येतें हें तत्त्व शिव-दुर्गोपासनेनें बंगाली लोकांस शिकविलें. बुद्धांच्या संन्यासकल्पनेचा अतिरेक होऊन अनीति मात्र फैलावली होती, तिला शिवदुर्गापूजेनें चांगला बंद पडला. शिवसंप्रदाय पुढें अद्वैताकडे झुकला व गूढ झाला तेव्हां राधाकृष्णांची उपासना पुढें आली. शके ११८० च्या सुमारास जयदेवकवीचें गीतगोविंदकाव्य पुढें आलें त्याचा परिणाम होत होत बंगाल्यांतील प्रसिद्ध व लोकप्रिय कवि चण्डिदास व विद्यापति यांचीं राधाकृष्णप्रेमाचीं पवित्र व मधुर गाणीं बंगाल व बहार प्रांतांत चोहोंकडे फैला-वलीं बंगाली लोक अत्यंत बुद्धिवान् व मधुरभक्तीचे भक्त आहेत हें त्यांच्या ह्या वेळेपासूनच्या पुढील सर्व वाङ्मयविस्तारावरून प्रतीतीस येते. विद्यापति हा बिहारचा कवि, मोठा पंडित असून कृष्ण भक्त होता. हा विद्वान् घराण्यांत जन्मला असल्यामुळें त्याच्या काव्यांत विद्वत्व, रसालंकारांची ठाकठिकी व विशाल कल्पना प्रगट आहेत. चंडीदास हा प्रथम शाक्त असून आचरणाचा ढिला होता, पण पुढें हा सुधारला व राधाकृष्णांचा एकनिष्ठ भक्त झाला. ह्या दोघांनीं कृष्णभक्तीचा बंगल्यांत पाया घातला व नंतर पुढें गौरंगप्रभु किंवा कृष्णचैतन्य यांनीं उज्ज्वल, पवित्र व उत्कट अशा कृष्णभक्तीनें बंगालच काय पण सारा उत्तरहिंदुस्थान हाल-वून सोडला. चौदाव्या शतकांत महाभारत व भागवत ह्या ग्रंथांचीं बंगालींत भाषांतरें झालीं व कृष्णचैतन्याच्या परमदिव्य स्फूर्तीनें बंगाल्यांत चैतन्य ओतलें; त्याचा अगदी अलीकडचा स्फुलिंग ह्म० रामकृष्ण परमहंस हे होत! वैष्णवधर्मानें बंगल व्यापला गेला, पण हा वैष्णवसंप्रदायाचा बंगाल्यांतला उत्कर्ष ज्ञानेश्वरांच्या नंतरचा आहे. त्यांच्या अमंळ पूर्वीं फक्त गीतगोविंद हें संस्कृत काव्य झालें होतें व कांहीं शिवपर पद्यें झालीं होतीं पण तीं आतां उपलब्ध नाहींत. पहिली, शिवदुर्गा यांची पूजा रूढ होती पण शिवाचें गूढ अद्वैततत्व लोकांस कळेनासें झाल्यामुळें दुर्गा तेवढी राहिली. शक्ति-दुर्गा-पार्वती—विश्वंभरी—जगज्जीवनी ही मानसादेवी, चंडीदेवी, गंगादेवी, शीतलादेवी इ० रूपांनीं लोकांच्या पूजेंत राहिली. बंगाल्यांत दुर्गापूजेचें माहात्म्यही अद्याप बरेंच आहे, तथापि कृष्णचैतन्यांच्या वेळेपासून बंगाल्यांत वैष्णवधर्म प्रधान होऊन राहिला आहे.

### ४ गुजराथी वाङ्मय.

गुजराथ ह्म० गुर्जरराष्ट्र व सौराष्ट्र मिळून होय. गुजराथेच्या पाश्चिमेस श्रीकृष्णाची द्वारका आहे. बलरामाची बायको रेवती ही आनर्त ह्म० उत्तर गुजरा-थच्या राजाची कन्या. गिरनारच्या यात्रेंत सुभद्राहरण झालें व प्रभास येथें यादवी होऊन यादवांचें राज्य बुडालें. द्वारका, प्रभास, सुदामपुरी उर्फ पोरबंदर,

व गिरनार ही सौराष्ट्रांतील प्राचीन स्थानें. डाकूर हें पुष्कळ अलीकडचें आहे. गिरिनगर उर्फ जुनागड ही अशोकाच्या वेळीं ह्म० २४०० वर्षांपूर्वीं सौराष्ट्राची राजधानी होती. क्षत्रप, गुप्त, वल्लभ, चालुक्य, राष्ट्रकूट, व राजपुतान्यांतील गुर्जर यांनीं ह्या प्रांतावर राज्यें केली. वल्लभ राजे हे गुर्जरक्षत्रिय असून त्यांच्या वेळेपासून गुर्जर, गुजराथ हे शब्द रूढ होऊं लागले. यांनीं ६ व्या शतकापासून गुजराथेवर ३०० वर्षें राज्य केलें. हे शैव असल्यामुळें ६ व्या शतकापासून गुजराथेंत शिवसंप्रदाय रूढ झाला. ८ व्या शतकापासून अनहिलवाडचें चावडा घराणें व नंतर चालुक्य उर्फ सोळंखी यांनीं १३ व्या शतकापर्यंत राज्य केलें. यापुढें मुसलमानांनीं ५०० वर्षें राज्य केलें व त्या नंतर मराठ्यांची गायकवाडी आज दोनशे वर्षें अंमल गाजवीत आहे. तात्पर्य रजपूत, मुसलमान व मराठे यांचाच अंमल गुजराथेवर सतत पंधराशे वर्षें आहे! कांहीं छोटे संस्थानिक किंवा राजे तिकडे आहेत, पण गुजराथ्यांना प्रायः परदास्यांतच राहावें लागलें आहे. जैनांचें एका काळीं गुजराथेंत प्राबल्य होतें, पण तें राजकीयदृष्ट्या नव्हे. गुजराथच्या चालुक्य घराण्यांत सिद्धराज जयसिंग (इ० स० १०९४ ते ११४३) व कुमारपाल (११४३--११७४) हे दोन मोठे पराक्रमी राजे झाले. त्यांनीं शैवसंप्रदायाचा फार मोठ्या प्रमाणावर पुरस्कार केला व जैन पंडितांनाही चांगला आश्रय दिला. सर्व गुजराथी राजांत जयसिंग हा पराक्रमी, धार्मिक व दानशूर होऊन गेला. यानें सिद्धपूर येथें रुद्रमाळ नांवाची सुंदर इमारत व पाटण येथें सहस्रलिंग नांवाचें सरोवर बांधलें. प्रसिद्ध जैनाचार्य हेमचंद्र हा याच्या आश्रयास होता. यावेळीं शेंकडो जैन ग्रंथ लिहिले गेले, तथापि यानंतर ब्राह्मण पंडितांनीं पुन्हां जोर केला व जैनांचें प्राबल्य कमी होत गेलें तें आज गिरनारपर्वतावरच कांहीं शिल्लक राहिलें आहे! गुजराथ प्रांत पहिल्यापासून सुपीक व संमृद्ध आहे. तेथील सोमनाथाच्या मंदिरांत अपरंपार संपत्ति होती ती महमंद गिजनीनें लुटून नेली, तरी जयसिंग व कुमारपाल यांच्या कारकीर्दींत पुन्हां हिंदुसंस्कृतीनें जोर केला. कुमारपालानें अनेक मंदिरांचा पुन्हां जीर्णोद्धार केला व सोमनाथाचें देऊळ पुन्हा पहिल्यापेक्षा उत्कृष्ट बांधलें. याचवेळीं ठाकूरचें देवस्थान उदयास आलें व १२ व्या शतकापासून शिव व विष्णु यांची उपासना गुजराथेंत फार जोरांत सुरू झाली ह्या पुढें गुजराथेंत मुसलमानी राज्य झालें तरी मुसलमान धार्मिक बाबींत हिंदूंच्या वाटेस प्रायः गेले नाहींत. तात्पर्य अर्वाचीन गुजराथ १२ व्या शतकांत अस्तित्वांत आला व तेव्हांपासूनच अर्वाचीन गुजराथी भाषाही प्रायः रजपूत व काठेवाडी भाषांच्या मिश्रणानें नवीन तयार झाली. पारतंत्र्याच्या मगरमिठीमुळें गुजराथी वाङ्मयाला राजकारणाचा स्पर्शच झाला नाहीं. गुर्जर राजांच्या स्तुतिपर

रासा भाट व चारण लोक गाऊं लागले, पण पंधराव्या शतकापर्यंत गुजराथी भाषेंत ह्मणण्यासारखें वाङ्मय तयार झालें नाहीं. मीराबाई (इ० स० १४०३–१४७०) व नरसी मेहता (१४१५--१४८१) हे वैष्णव भक्त पंधराव्या शतकांत झाले, तेव्हांपासून गुजराथी भाषा ऊर्जितदशेस आली. नरसी मेहता यांच्या कवितेंत त्यांच्या पूर्वीं होऊन गेलेल्या नामदेवांच्या कथांचा उल्लेख आहे. वैष्णवधर्माची प्रचंड लाट सर्व हिंदुस्थानभर १५ व्या शतकांत उसळली व सर्व प्रांतांत व सार्‍या देशी भाषांत संतकवि उदयास आले, तेव्हां गुजराथी वाङ्मयाला खरा प्रारंभ होऊन मिराबाई व नरसी मेहता यांनीं आपली मधुररचना गुजराथी भाषेंत केली व १५० वर्षांनीं पुन्हां दुसरी लाट आली त्या लाटेबरोबर प्रसिद्ध वेदांती कवि आखो, प्रेमानंद व सामळभट ही दिव्य त्रयी निर्माण झाली. गुजराथींतलें उत्तमोत्तम कवि हें पांचच--तात्पर्य, ज्ञानेश्वरकालीं गुजराथी भाषेंत वाङ्मयाची उभारणीच झाली नव्हती, ज्ञानेश्वरनामदेवानंतर शेदीडशे वर्षांनीं गुर्जरभाषासुंदरीनें आपले नेत्र उघडले व त्यांत मीराबाई व नरसीमेहता या दिव्य तारका प्रथम चमकूं लागल्या!

५ तेलगू वाङ्मय.

तेलगू लोकांच्या प्रदेशास तेलंगण किंवा आंध्रदेश ह्मणतात. तेलगू ह्म० त्रिलिंगम्, त्रिलिंग, तिलिंग, तेलिंग, तेनुगु, तेलगू हे सारे शब्द एकार्थीच आहेत. श्रीशैलमल्लिकार्जुन, कालेश्वर व भीमेश्वर ह्या तीन शिवलिंगांच्या मधला प्रदेश तो त्रिलिंगम् किंवा तेलंगण होय. ह्या प्रांतांतील लोक पहिल्यापासून शूर आणि विद्वान् ह्मणून प्रसिद्ध आहेत. त्रिलिंगम् देशामध्यें कलिंग व आंध्र ह्या दोनही प्रांतांचा समावेश होतो. संस्कृत भाषेंतील बहुतेक वाङ्मय तेलगू भाषेंत आलें असून ते लोक संस्कृतभाषेस आपल्या भाषेची जननी समजतात. तेलगू भाषेंत तत्सम, तद्भव, देशी व ग्राम्य असे चार प्रकारचे शब्द आढळतात. तेलगू कवींनीं सर्व संस्कृत-वृत्तें घेतलीं आहेत, तरी शार्दूलविक्रीडित, उत्पलमाला व चंपकमाला हीं त्यांचीं आवडतीं वृत्तें दिसतात तेलंगी पद्यांच्या चारी चरणांस प्रास असतो व प्रत्येक चरणास यति असतो. यति ह्मणजे थांबण्याची जागा. या लोकांत पहिल्यापासून प्रत्येक काव्य कोणास तरी अर्पण करण्याची चाल आहे! कोणी तरी राजा, महाराजा, जहागीरदार किंवा भाऊ, जांवई यास प्रत्येक काव्य अर्पण केलेलें असतें, त्यामुळें कवींस मोठमोठाल्या देणग्या, जमीनी, अग्रहार मिळत असतात. कांहीं काव्यें कवींनीं आपल्या उपास्य देवतांस अर्पण केलीं आहेत. याप्रमाणें बरींचशीं काव्यें नरांकित व कांहीं देवांकित आहेत. ज्याला काव्य अर्पण करावयाचें त्याला कृतिमर्ता ह्मणतात. त्याच्या गुणाचें

व परंपरेचें वर्णन प्रथम १०।५ श्लोकांत असायचेंच. कृतिभर्त्यांसमोर विद्वानांच्या सभेंत काव्य वाचून दाखवायच्या समारंभास 'रंगाधिरोहण' ह्मणतात. या सर्व प्रकारांपुळें तेलगु कवि व त्यांचे कृतिभर्तें यांचे कालनिर्णय करण्यास अलीकडच्या संशोधकांस फार सोपें जातें. राजपुतान्यांतील 'भाटचारण' हे प्रायः राजांचे आश्रित असत, तेलंगणांतले कवि स्वतंत्र असत पण त्यांना प्रसंगविशेषानें मोठाल्या देणग्या मिळत, तात्पर्य हिंदी व तेलगू या भाषा राजाश्रयानें उदयास आल्या असें ह्मणावयास हरकत नाहीं. ज्ञानदेवनामदेवांच्या काळीं तेलगू भाषेंत ४।५ नामांकित ग्रंथकार झाले व ते त्या भाषेंतले पहिले ग्रंथकार ह्मणून समजले जातात. त्या सर्वांत आद्य व सर्वश्रेष्ठ ग्रंथकार ह्मणजे नन्नयभट हा होय. हा संस्कृत, कानडी, पशाची व तेलगू या चारही भाषांत निष्णात होता हा राजमहेंद्री येथील चालुक्यराजा जो विष्णुवर्धन त्याच्या आश्रयानें उदयास आला व राजा राजराजनरेंद्र याच्या राजवटींत त्याचा भाष्योत्कर्ष झाला. चालुक्यांनीं राजमहेंद्री येथें ११ व १२ व्या शतकांत राज्य केलें असून राजनहेंद्राचा इ० स० १२७३ मधला एक शिलालेख उपलब्ध आहे यावरून त्या सुमारास नन्नयभट विद्यमान होता असें ह्मणतात.

## ६ कानडी वाङमय.

सामान्यतः कृष्णानदीच्या दक्षिणेस कावेरीपर्यंतच्या भूप्रदेशास कर्नाटक ह्मणतात बेंगळूर, मंगळूर, कारवार, धाडवाड, ह्मैसूर व निजामचे राज्यांतील कांहीं भाग, उत्तर कानडा, बल्लारी वगैरे जिल्हे कर्नाटकांत मोडतात. कानडी भाषा बोलणारे लोक १ कोटी १० लक्षांवर आहेत. कर्नाटक प्रांतावर कदंब, पल्लव, चालुक्य, राष्ट्रकूट, कलचूरी, होयसळ, विजयानगर, वोडेयर इतक्या घराण्यांनीं राज्य केलें आहे. याला २ हजार वर्षांपासूनचा इतिहास आहे व कानडी भाषेंत अभिजात वाङ्मयही बरेंच आहे. कर्नाटकाची सरहद्द सोलापूरापर्यंत भिडलेली होती. बाराव्या शतकापर्यंत कर्नाटकी भाषेंत जैन वाङमयाचेंच साम्राज्य होतें, पुढें बसवानें लिंगायतपंथ इ० स० ११६० च्या सुमारास काढल्यावर लिंगायत वाङमयास सुरुवात झाली. कांहीं काळ जैन व लिंगायत यांच्यांत चढाओढ चालली. पुढें १३ व्या शतकापासून मध्वाचार्य व त्यानंतर चैतन्य यांनीं प्रचार करून वैष्णवपंथ कर्नाटकांत वाढविला, ह्मणजे कर्नाटकी भाषेंत जैन लिंगायत व वैष्णव ह्या तीनही धर्मपंथांचें वाङमय आहे, व कर्नाटक भाषा बोलणाऱ्यांत तीनही पंथाचे लोक आहेत, राष्ट्रकूट राजा नृपतुंग (इ० स० ८१४ ते ८७७) याच्या राजवटींत कानडी साहित्यास खरा आरंभ झाला. तत्पूर्वीही जैनांचें बरेंच वाङमय कानडींत झालेलें आहे. दहाव्या शतकांत पंप, पोन्न, रन्न चावुंडराय इ० जैन ग्रंथकारांनीं जैनधर्मावर व

जैनांच्या तीर्थंकरांवर कानडींत ग्रंथ लिहिले. तसेंच नागवर्म यानें 'छंदोम्बुधि' नावांचा छंदःशास्त्रावरील कानडींत ग्रंथ रचिला व बाणाच्या कादंबरीवरून त्यानें 'कानडी कादंबरी' लिहिली. नागचंद्र यानें इ० स० ११०० च्या सुमारास 'रामचंद्रचरितपुराण' उर्फ 'पंपरामायण' रचिलें. ह्यांत वाल्मीकीच्या रामायणाचा मुख्य भाग कायम ठेवला आहे, तरी कवीनें पुष्कळ फरकही केला आहे. याच्या वेळेस कांति नांवाची एक कवयित्री होऊन गेली. ही पहिली कानडी कवयित्री होय. यावेळीं कानडीवर कांहीं व्याकरणग्रंथ झाले. १२ व्या शतकांत बसव व त्याचा शिष्य चन्नबसव यांनीं लिंगायत उर्फ वीरशैव संप्रदायाची उभारणी केली. लिंगायत हे शिवाचे उपासक आहेत व लिंगधारणा हें त्यांचें मुख्य चिन्ह आहे. हरीश्वर, राघवांक व केरेय पद्मरस हे लिंगायत ग्रंथकार १३ व्या शतकांत झाले व त्यांनीं आपल्या संप्रदायानुसार शिवभक्तीचा प्रचार केला. इ० स० १३६९ मध्यें भीमकवीनें बसवपुराण लिहिलें. तें षट्पदी छंदांत असून लिंगायतांत फार लोकप्रिय आहे. असो जैन व लिंगायत या पंथांत अनेक ग्रंथकार झाले त्यांची नामावलि देत नाहीं. यांनीं कानडी भाषा समृद्ध केली. षडक्षर देव याचा 'राजशेखर विलास' ( श० १५६० ) हा ग्रंथ सरस व लोकप्रिय आहे.

कानडी वैष्णव वाङ्मयांत स्वतंत्र असा थोडा भाग आहे, बहुतेक मदार संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें अगर रूपांतरें यावरच आहे. पहिला कानडी वैष्णव ग्रंथकार 'जगन्नाथविजय' लिहिणारा रुद्रभट हा होय. यांत विष्णुपुराणांतील कृष्णजन्मापासून बाणासुरवधापर्यंतची कृष्णकथा दिली आहे. हा श० ११४० च्या सुमारास झाला. यानंतर शके १२२० च्या सुमारास पंढरीच्या विठ्ठलाचा भक्त चावुंडरस यानें 'अभिनवदशकुमारचरित्र' हा ग्रंथ चंपूच्या धर्तीवर दंडीच्या ग्रंथाधारें लिहिला. शके १४३० मध्यें कानडींत महाभारताचें भाषांतर झालें. विजयानगरच्या कृष्णरायानें ह्या प्रचंड कार्यास चांगलें साह्य केलें. पहिल्या १० पर्वांचें भाषांतर नारणप्पा ( यास कुमारव्यास ह्मणतात ) या गौड ब्राह्मणानें केलें व बाकीच्यांचें तिमण्णानें केलें. हें सारें षट्पदी छंदांत लिहिलें आहे. यानंतर शके १५०० च्या सुमारास 'तोरवे रामायण' लिहिण्यांत आलें. हें सोलापुराकडील तोरवे गांवीं लिहिलें गेलें. याच्या मागोमाग षट्पदीवृत्तांत 'भागवतपुराण' हें चाटु विठ्ठलनाथ यानें लिहिलें. दशम स्कंधाच्या आधारें 'कृष्णलीलाभ्युदय' हा ग्रंथ वेंकट आर्य नांवाच्या माध्व ब्राह्मणानें लिहिला. ह्याप्रमाणें एका शतकांतच भारत, रामायण व भागवत ह्या हिंदूंच्या तीनही राष्ट्रीय ग्रंथांना कानडी वेष मिळून कानडी लोकांच्या कानावर रामकृष्णकथा जाऊं लागल्या. ह्या जातीचे आणखीही लहान मोठे ग्रंथ बरेच झाले, तथापि कृष्णभक्तीचा प्रसार लोकांत

होण्यास ‘ रगळे ’ ( भावनाकाव्य ) वृत्तांत रचलेलीं प्रेमळ पदें कारण झालीं. हीं पदें गात व भजन करीत वैष्णवप्रचारक गांवोगांव हिंडूं लागले. रामानुजाचार्य, मध्वाचार्य यांच्या शिष्यांनीं व बंगाल्यांतील चैतन्यप्रभूंच्या संचारानें कर्नाटकांत वैष्णवधर्माचा प्रसार फार झपाट्यानें होऊं लागला. हीं कानडींतील भक्तिपरपद्यें फार मधुर आहेत. तेराव्या शतकांत महाराष्ट्रांत पंढरपूरचा भक्तिपंथ जोरावला त्याचाही परिणाम ह्या कानडी वैष्णवभक्तांवर चांगलाच झाला. ह्या भक्तिपर पदें लिहिणाऱ्या व गाणाऱ्या कवींत पुरंदरदास याचीं पदें अत्यंत बहारीचीं आहेत. हा कांहीं वर्षें पंढरपुरास राहिलाच होता. हा एकनाथांच्या वेळीं ह्म० शके १४८० च्या सुमारास झाला. याचा समकालीन कनकदास बेड ( व्याध ) यानेंही सुंदर पद्यें रचिलीं असून शिवाय ‘ मोहनतरंगिणी ’ ‘ नलचरित्रे ’ ‘ विष्णुभक्तिसार ’ इ० ग्रंथही लिहिले आहेत. उडुपीचे कृष्णदास, विठ्ठलदास, विजयदास हेही विष्णुभक्तिप्रसारक याच काळांत झाले. हे तिघेही माध्वपंथी होते. पुरंदरदास आणि कनकदास यांना पंढरपूरच्या भक्तिपंथांत तेव्हांच मान्यता मिळाली होती. कर्नाटक महाराष्ट्र यांच्यामधले हे दुव्वे आहेत. कानडीची मराठीशी गट्टी आहे. आडवी, नींद, बोण, उगळी, मुग इ० कानडी शब्द अमृतानुभवांत व ज्ञानेश्वरींत आहेत. आप्पा, आण्णा, आत्या हे नात्याचे शब्द कानडी आहेत. ‘अडगुळे सोन्याचे मडगुळे कडगुळे’ ‘ औडक चौडक दामाडू दामाडूचा पंचाडू ’ व ‘ वकट लेंड मूंड, नाल ’-- हे कानडीचा मराठीवरील संस्कार दाखवितात.

### ७ मल्याळी वाङ्मय

द्रविड भाषांपैकी मलबार, कोचीन, कुर्ग, त्रावणकोर, ह्मैसूरचा दक्षिणभाग, निलगिरी वगैरे प्रांतांत मल्याळी भाषा बोलणारे लोक आहेत. तामीळ भाषेला जवळ पण तिच्याहून भिन्न मलयालम् उर्फ मल्याळी भाषा आहे. मलयाचल उर्फ निलगिरीच्या पर्वताच्या आसपासच्या लोकांची ही मूळ भाषा असावी. हिच्यांत प्राचीन वाङ्मय नाहीं. तेराव्या शतकांत त्रावणकोरच्या एका राजानें या भाषेंत ‘ रामचरित्र ’ लिहिलें किंवा लिहविलें पुढें, संस्कृत महाकाव्यांचीं व कांहीं नाटकांची मल्याळी भाषेत भाषांतरें झाली. पंधराव्या शतकांत चेरुस्सेरी नंबुरी यानें ‘ कृष्णगाथा ’ लिहिली. आर्य एसत्तु यानें महाभारताचें व कांहीं पुराणांचें भाषांतर केलें. याप्रमाणें संस्कृत ग्रंथांच्या आधारावर मल्याळी भाषेंत कांहीं अभिजात वाङ्मय उभारलें गेलें, यापलीकडे विशेष कांहीं झालें नाहीं.

# श्रीकृष्णांचें चरित्रदर्शन

## प्रकरण १४ वें

लेखकः--ना. श्री. वाटवे.

## जरासंधाशी सामना.

१ श्रीकृष्णांनीं कंसाला मारून उग्रसेनाला पुन्हा राजा केला असें पाहून कंसाच्या अस्ति व प्राप्ति अशा ज्या दोन बायका होत्या त्यांनीं आपल्या माहेरीं प्रयाण केलें. त्या दोघीही सख्ख्या बहिणी होत्या. त्यांचा बाप जरासंध हा त्या काळचा सार्वभौम राजा होता. त्याला ही बातमी कळतांच फार वाईट वाटलें व रामकृष्णांचा फार रागही आला. त्यानें रामकृष्णांना मारून टाकण्याचा निश्चय केला परंतु एवढ्यांत पावसाळा सुरू झाल्यामुळें त्याचा नाइलाज होऊन त्याला चार महिने स्वस्थ बसावें लागलें. एवढ्या अवधींत श्रीकृष्णांनीं आपल्यावर परचक्र येण्याचा संभव आहे हें ओळखून आपल्या सैन्याची वगैरे चांगली तजवीजपूर्वक तयारी करून ठेवली होती. पावसाळा संपतांच ठरल्याप्रमाणें जरासंधानें. कौरव, विराट, रुक्मी, भीष्मक, मद्रेश, चैद्य, भगदत्त, इत्यादि आपले मांडलीक राजे बरोबर घेऊन आपल्या २३ अक्षौहिणी सेनेसहवर्तमान मथुरेवर स्वारी केली. यादवांनींही आपल्या लहानशाच परंतु भीमविक्रमी सेनेच्या अग्रभागीं रामकृ-ष्णांना घेऊन वरील हल्ल्याला तोंड दिलें. मोठी घनघोर लढाई जुंपली. परंतु जरासंधाचा सपशेल पराभव झाला. ह्यावेळीं जरासंधाचें २० अक्षौहिणी सैन्य कामीं आलें असें लिहिलें आहे. बलरामानें जरासंधाला धरला असतांही श्रीकृ-ष्णाच्या सांगण्यावरून त्यानें जरासंधाला सोडून दिला.

२ अशा एकंदर सतरा स्वाऱ्या जरासंधानें मथुरेवर केल्या परंतु श्रीकृष्णांनीं व बलरामानें यादवसेनेच्या मदतीनें तितक्याही वेळा जरासंधाचा पराभव केला. दरवेळीं पराभव होई तरी तो हट्टास पेटलेला राजा जरासंध पुनःपुन्हा मथुरेवर स्वारी करी. परंतु अशा रीतीनें सतरावेळ पराभव झालेला पाहून अठरावे वेळी त्यानें कालयवन नांवाच्या एका अपरिमित सेनावाल्याराजाशीं तह केला व त्याला आपल्या मदतीला बोलावलें. त्या दोघांनीं मिळून मथुरेवर एकदम् हल्ला करावा असें ठरलें होतें. परंतु ही बातमी यादवांना समजली, तेव्हां सर्व यादवांनीं एक सभा भरविली व सर्वत्रांच्या वतीनें विकद्रूनांवाच्या यादवानें जरा धीट व स्पष्टोक्तिपूर्वक श्रीकृष्णांना असें विनविलें कीं,

चढला सर्वनृपांच्या माथां सांप्रत बळी जरासंध, ।
आम्हां प्रताप याचा, गंधगजाचा जसा गजां गंध ॥ १ ॥
आम्हीं वश तव मतिला, शक्राच्या जेविं सर्वही अमर ।
आहेस क्षम तूंही साग्रज अरिसीं करावया समर ॥ २ ॥
परि एक दिनहि कृष्णा! साहेल न हे पुरी निरोधातें ।
वांचेल कशी अबळा प्रबळाशीं करुनियां विरोधातें? ॥ ३ ॥
बा! सोशिले पुरीनें संग्रामनिरोध केशवा! सतरा; ।
म्हणत्ये, 'सोडुनि मातें, स्वीकारुनि अन्य देशवास, तरा' ॥४॥
तृणकाष्ठधान्यसंग्रह सरला, बहु पौर पावले पीडा; ।
नित्य उपद्रव होतां, त्यजिती पक्षीहि आपुल्या नीडा ॥ ५ ॥
प्राकार जीर्ण खचला, झाली लंघ्या भरोनि परिखाती; ।
असतां यथास्थिता, दशशतही अक्षौहिणींस परि खाती ॥ ६ ॥
पहिला राजा पडला, राज्य नवें आमुचें, बक्री अहित, ।
संग्राम विमर्द सदा, हें राष्ट्र बुडेल या जनांसहित ॥ ७ ॥
जन होतील व्याकुळ यावरि मथुरा पुरीं निरोधानें ।
म्हणतील 'यादवांच्या सर्व बुडालों महाविरोधानें' ॥ ८ ॥
मोठें संकट आलें, मूळ विरोधासि तूंचि बा! आधीं, ।
आम्हांसि आपणांसह संरक्षुनि, कीर्ति केशवा! साधीं. ॥ ९ ॥

विकद्रूचें हें म्हणणें वसुदेवालाही पसंत पडलें; त्यानेंही तसेंच मत दिलें. तेव्हां श्रीकृष्ण त्यांना म्हणाले. "तुम्हां सर्व वडील मंडळीचें मत मला मान्य आहे व मी अशी कांहीं युक्ती करितों कीं तिच्यायोगेंकरून तुमच्यावर कोणतीच आपत्ती न येतां तुम्हीं सुखानें एथें नांदू शकाल. तुम्हीं सर्व जण अगदीं निर्धास्त असा." असें हें श्रीकृष्णांचें आश्वासन ऐकून सर्व यादव मंडळीला परमसमाधान वाटलें. त्यांना पक्की खातरी होती कीं श्रीकृष्ण हे बोलल्याप्रमाणें खातरीनें करतील. त्यांनीं श्रीकृष्ण अशी कोणती युक्ती करणार होते याची पूर्वींच पृच्छा न करितां ते सर्व भगवंतांवर विश्वास ठेवून आपापल्या घरी निश्चिंतपणें चालते झाले.

३ वर सांगितल्याप्रमाणें जरासंध व कालयवन यांनीं मथुरेवर एकदम स्वारी करावी असें ठरलें होतें खरें परंतु कालयवन आधींच पुढें येऊन पोंचला व त्यानें आपल्या सेनेसह मथुरेस वेढा दिला. हें पाहून मथुरानिवासी लोक अगदीं हवालदील होऊन गेले. तेव्हां श्रीकृष्णांनीं बलरामाला मथुरेच्या रक्षणासाठीं ठेवून आपण एकटेच कालयवनाच्या सेनेवर तुटून पडले व फळी फोडून पार निघून गेले. अर्थात् कालयवन त्याच्यामागें लागला. भगवंतांनीं अनेक तऱ्हेच्या

हुलकावण्या दाखवीत दाखवीत त्याला जवळच्या एका जंगलांत नेलें व आपण एका गुहेंत शिरून दिसेनासे झाले. कालयवनही त्यांच्या मागोमाग आंत शिरला. तेथें त्यानें एक पुरुष निजलेला पाहिला. तेव्हां तोच श्रीकृष्ण अशा समजुतीनें त्यानें त्या निद्रिस्त पुरुषाला लात मारली व जागें केलें. परंतु त्या कृत्याचा परिणाम असा झाला कीं त्या निद्रिस्त पुरुषाची दृष्टी कालयवनावर पडतांच कालयवन ताबडतोब भस्मसात् झाला. इतक्यांत श्रीकृष्ण तेथें प्रगट झाले; व त्यांनीं मुचकुंदाला— हें त्या निद्रिस्त पुरुषाचें नांव होतें— दर्शन देऊन कृतार्थ केलें; व आपण परत मथुरेला येऊन कालयवनाच्या सैन्यावर बलरामासह तुटून पडले त्या दोघांनीं मिळून तें सर्व सैन्य ठार मारून निकाल करून टाकलें.

४ परंतु रामकृष्ण त्या यवन सैन्याची पडलेली संपत्ती गोळा करण्यांत गुंतले आहेत इतक्यांत जरासंध आपल्या अफाट सेनेसह तेथें येऊन हजर झाला. परंतु हें पाहून ती संपत्ती तेथेंच टाकून रामकृष्णांनीं दक्षिणदिशेला पलायन आरंभिलें. अर्थात् मानी जरासंध मथुरेवर हल्ला करण्याच्या भानगडींत न पडतां रामकृष्णांचाच पाठलाग करूं लागला. रामकृष्णांनीं जरासंधाला आपल्या मागें पळवीत थेट गोमंतकपर्वतापर्यंत नेलें व आपण त्यापर्वतावर लपून राहिले. हे असे लपून राहिलेले पाहून जरासंधानें शिशुपाळाच्या बापाच्या वगैरे मदतीनें व सल्यावरून त्या पर्वतास चारीबाजूंनीं आग लावून दिली व रामकृष्ण आतां ठार झालेच अशा समजुतीनें तें सर्व सैन्य परतत आहे इतक्यांत रामकृष्णांनीं पर्वतावरून अचानकपणें त्या सैन्यांत उड्या टाकल्या व एकदम् रणतुंबळ माजविलं. ह्यावेळीं त्यांनीं असें म्हणतात कीं एकंदर बारा अक्षौहिणी सैन्याचा चुराडा केला !

५ याप्रमाणें जरासंधाचा पराभव करून ते उत्तर दिशेला जाण्याच्या बेतांत आहेत असें पाहून त्यांच्या आतेचा नवरा व शिशुपाळाचा बाप जो दमघोष राजा त्यानें रामकृष्णांना फसवून मारण्याच्या उद्देशानें मोठ्या गौरवपूर्वक रथांत बसवून करवीरक्षेत्रीं नेलें. हेतु हाकीं तेथें अत्यंत पराक्रमी समजला जाणाऱ्या शृगाल— राजाच्या हातून त्यांचा वध व्हावा ! रामकृष्ण आपल्या नगरींत आले आहेत असें कळतांच शृगाल राजाला कोप येऊन तो त्यांना शासन करण्याकरितां म्हणून ताबडतोब युद्धास सिद्ध होऊन आला. त्याला वाटलें कीं रामकृष्ण हे आपल्यावर स्वारी करण्याकरितां आले आहेत. तो श्रीकृष्णाला म्हणाला,

कृष्णा ! गोमंतीं साग्रजें तुवां कर्म ।
केलें तें न मजपुढें होइल, शतकोटिचें असो वर्म ॥ १ ॥
मूर्खं अनायक राजे, त्यांच्या दुबेळ बळांत जें घडलें; ।
त्या दीनघातपापें, व्यसन असें हें तुझ्या गळां पडलें ॥ २ ॥

असें म्हणून त्यानें श्रीकृष्णांना द्वंद्वयुद्धास पाचारण केलें. परंतु थोड्याच वेळांत शगालराजा ठार झाला. तेव्हां त्याच्या पत्नीच्या शोकानें अंतःकरण कळवळून येऊन श्रीकृष्ण तिला म्हणालेः-

सति ! शक्रदेव त्याचा तैसा मामाहि पुत्र हा होय ।
अभय दिलें, अभिषेकहि करितों घेऊन निजकरीं तोय ॥ १ ॥

व त्यानीं ताबडतोब अल्पवयी शक्रदेवास राज्याभिषेक करून आपण मथुरेला निघून आले. यानंतर पुन्हा जरासंध त्यांच्यावर चाल करून आला नाहीं. तेव्हां त्याची रग जिरली असें पाहून तदनंतर एक दिवस श्रीकृष्णांची अनुमती घेऊन बलराम गोकुळाला निघून गेला व तो त्या ठिकाणीं कांहीं दिवस राहून परत मथुरेला आला व श्रीकृष्णांना तेथील सर्व वृत्त सांगता झाला.

६ याप्रमाणें जिकडे तिकडे स्थिरस्थावर केल्यावर श्रीकृष्णांनीं असा विचार केला कीं आपण एखादें नवेंच शहर स्वतांकरितां वसवावें; व तेथें सर्व यादव मंडळीलः नेऊन ठेवावें. हा विचार मनांत धरून त्यांनीं योग्य स्थळाचा विचार चालविला. शोधार्अंतीं त्यांना असें आढळून आले कीं रैवतपर्वत व समुद्र यांच्या दरम्यान असलेली भूमि ओसाड असून तेथें आपली नगरी वसविल्यास ती शत्रूला दुर्जय होईल. याप्रमाणें आढळून येतांच त्यांनीं मथुरा सोडून अन्य ठिकाणीं जाण्याबद्दल यादवांचें मत विचारलें.

'कृष्ण म्हणे, यादव हो ! वाटे मज या पुरीं नये राहूं ।
नीतिज्ञ म्हणाल तुम्हीं, वाक्या म्हणवेल या न येरा 'हूं' ॥१॥
जरि होय राजधानी वडिलांची हे पुरी न सोडावी, ।
अमरावती महेन्द्रें, तेविं त्यागून सिद्धि जोडावी. ॥ २ ॥
नीति अशी कीं ' अबळें प्रबळास रणीं कधीं न हटकावें ।
दैवें विरोध घडतां, बळहीनें त्यजुनि मान सटकावें ॥ ३ ॥
जीवित संरक्षाया बहु भीरु अशक्त जन जसा पळतो ।
जरि शक्तिमान्, पलायन करितो, वंचावया महाबळ तो ॥ ४ ॥
प्रबळ अराति जरासुत करिल उपद्रव पुन्हाः अनळस महा
द्वेष्टाचेष्टा याच्या ठाव्या असती तुम्हां; अनळसम हा ॥ ५ ॥
जेथें न घडे उपद्रव, राहू वसवूं पुरी नवी; साहे ।
न विमर्दातें जीर्णा; योग्या मथुरापुरी न वासा हे " ॥ ६ ॥

तेव्हां यादव म्हणति ' बहु बरें आम्ही तुझ्या शब्दाबाहेर नाहीं. ' ते तरी बिचारे आणखी काय म्हणणार ?

७ अशा रीतीनें यादवांची संमती मिळवून श्रीकृष्णांनीं वरील ठिकाणीं नवी पुरी वसविण्याची तयारी चालविली ती अशी. वरील ठिकाणीं समुद्र अगदीं उथळ होता, म्हणून सुमारें १२ योजनें क्षेत्रफळाची जमीन श्रीकृ-ष्णांनीं—पाणी मागें हटवून—तयार केली. हॉलंड देशांत जशीं समुद्रसपाटीच्या खालीं कित्येक नगरें आहेत तशाच धर्तीवर द्वारकेची रचना केलेली असावी. समुद्रांत एक मोठी भिंत घालून ओहटीच्या वेळीं अडविलेल्या जागेंतील पाणी बाहेर काढून लाविलें असावें; व ताबडतोब मोकळें ठेविलेलें तोंड बंद केलेलें असावें. कारण हरिवंशांत असें लिहिलेलें आहे कीं ' द्वादश योजन सिंधु स्थळ दे' कारण कीं ' तितुकेंचि प्रभु तया याची' अशा रीतीनें एका बाजूला डोंगरपठार व दुसऱ्या साऱ्या बाजूंना पाणी असे दोन विस्तीर्ण व दुर्भेद्य तट असलेल्या जागीं श्रीकृष्णांनीं आपली द्वारकानगरी वसविली होती. अर्थात्च ती नेहमीं शत्रूंनीं दुर्गम अशीच राहिली. परंतु श्रीकृष्णांच्या शत्रूंनीं याहीवर उपाय म्हणून विमानें बनवून त्यांतून सैन्य बसवून द्वारकेवर स्वारी केलीच. परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं ही गोष्ट वेगळी !

मग नगरी तयार झाल्यावर एके दिवशीं सुमुहूर्तावर सर्वजणांनीं मथुरानग-रींतून निघून द्वारकेस प्रयाण आरंभिलें, व तेथें जाऊन वस्ती केली.

द्वारकेचें वर्णन करणें आम्हांला शक्य नाहीं. तरी त्यावेळीं तिला इंद्रपुरीची उपमा देण्यांत येत असे असें सांगितलें असतां पुरें होईल असें वाटतें.

अशा रीतीनें स्वतांची स्वतंत्र नगरी वसवून तींत आपले ज्ञातिबांधव आणून स्थापन केल्यावर भगवंतांनीं तेथें कोणीच दरिद्री असूं नये अशा इच्छेनें:-

श्रीकृष्ण शंखनिधितें सांगे, 'जे द्वारकापुरीं असती, ।
सर्वेहि धनिक करावे, न रुचेचि दरिद्रता, जशी असती ' ॥ १ ॥

म्हणून ह्या भगवंतांच्या आज्ञेवरून

' बहुजनसदनें भरिलीं पुष्कळ संपत्तिनें महानिधिनें॥ १ ॥

व ह्यामुळें झालें काय तर

' प्रभुच्या वरप्रसादें पुसिलें, लिहिलें अभाग्य जें विधिनें. ।
जी द्वारका पुरजनीं, भूपजनीं तेविं संपदा नाहीं; ।
म्हणती अर्थिजनांच्या दारिद्र्या वैश्य ' संप ' दानांहीं ॥ २ ॥

यावरून असें म्हणावें लागतें कीं

कारण, ' जें स्वजनीं वात्सल्य प्रभुचें, येनाचि लेश तातातें. ।
' पुरवुनि काम, ' पुरवितों' ऐसें न मुखें रमानिवास वदे. ' ॥

असो सर्व आप्तजनांची सोय लावल्यावर,

प्रभुसत्तमें पुरोहित केला सांदीपनी द्विजश्रेष्ठ।
नृप उग्रसेन, जो बहुमान्य समस्तां वयें गुणें ज्येष्ठ॥
सचिन श्रेष्ठ विकद्रू, स्वचमूंचा पाळिता अनाधृष्टि।
सात्यकि वीराग्रेसर, ज्याची निर्मळ यशीं सदादृष्टी॥
दश उद्धव प्रमुख कवि केले प्रभुनें अशेष कार्यकर।
अतिरथ दारुक सारथिवर जो जय हेतु जेविं आर्यकर॥

सर्व व्यवस्था लावून श्रीकृष्णांनीं द्वारकेच्या आसपासच्या बऱ्याच मुलखावर ह्मणजे बहुधा मथुरेपर्यंतच्या सर्व मुलखावर आपला मातामह जो उग्रसेन त्याची सत्ता स्थापित केली असावी. नाहींतर त्यांना हें सर्व झालें तसें विनतक्रार करितां आलें नसतें.

८ याप्रमाणें आपलें वैभव व महत्व बरेंच वाढवून व स्थापित करून झाल्यावर सहजच रामकृष्णांच्या चरित्राला स्थिरता आली असें पाहून सर्व यादव वृद्धांना (व स्वतां त्यांनाही) रामकृष्णांचे विवाह व्हावे असें वाटणें स्वाभाविक होतें. अर्थात् तसा योग जुळून येतांच ह्मणजे.

भरणी चंद्रासि जशी पूर्वी विधिनें समर्पिली दक्षें;।
रामासि रेवती निजकन्या तैशीच रैवतें दक्षें.॥ २॥

आपण होऊन देऊं करतांच,

रामें द्वारवतींत प्रथम श्रीरेवती सती वरिली;।
मति सर्वांहि नरांची, नारींची, त्या महोत्सवें हरिली॥

असो. या ठिकाणीं जरासंधानें श्रीकृष्णांवर पहिल्यानें स्वारी केली तेव्हांपासून तों भगवंतांनीं द्वारकेला उग्रसेनाची स्थापना करीपर्यंतच्या कृष्णचरित्राचा गीता-दृष्ट्या विचार करूं.

९ जरासंधानें मथुरेवर स्वारी करितांच 'सेनानीनामहं स्कंदः' व 'पौरुषं-नृपु' ह्मणून सांगणाऱ्या श्रीकृष्णांनीं यादवांच्या अल्पशा सैन्याचें आधिपत्य स्वीकारून मोठें घनघोर युद्ध केलें; व शेवटीं जरासंधाच्या अफाट सैन्याचा धुव्वा उडविला. याप्रमाणें सतरावेळ घडलें. परंतु एकाही खेपेला शत्रूला जय मिळाला नाहीं हें पाहून सहजच श्रीकृष्णांनीं अर्जुनाला पुढें जें 'जयोऽस्मि' म्हणून सांगि--तलें आहे त्याची सत्यता मनाला चांगलीच पटते. प्रत्येक खेपेला जरासंधाला तो हस्तगत होत असूनही श्रीकृष्णांच्या सल्ल्यावरून बलराम सोडून देई.

१० या ठिकाणीं भगवंतांनीं जरासंधाला दरवेळीं हातीं सांपडत असतां कां सोडून दिलें याचीं ठरींव कारणें म्हणून जीं सांगण्यांत येतात त्यांच्याविषयीं थोडासा विचार करूं. बलराम जरासंधाला ठार माग्ण्यास तयार झाला असतां

म्हणे अशी आकाशवाणी झाली कीं ' तूं याला या वेळीं मारूं नको. तुझ्या हातून याचा मृत्यु नाहीं. ' तेव्हां बलरामानें हात आवरला. परंतु त्याला वारुणमानुष-पाशांनीं बद्ध करून ठेवलें. परंतु श्रीकृष्णांनीं त्याला सोडून दिलें. यांत श्रीकृष्णांचा पुढील हेतु होता असें सर्व सामान्य ठरीव मत आहे.

भागवतकार म्हणतात कीं:—

' मागधस्तु न हन्तव्यो भूयः कर्ता बलोद्यमम्
एतदर्थोऽवतारोऽयम् भूभारहरणाय मे ॥
संरक्षणाय साधूनां कृतोऽन्येषां वधायच
अन्योऽपि धर्मरक्षार्थे देहः संभ्रियते मया ॥
विरामायाप्यधर्मस्य काले प्रभवतः क्वचित् । '

म्हणजे " जरासंधाला मात्र मारूं नये. कारण तो जिवंत असला तर असाच पुनरपि सैन्याचा जमाव करणार, आम्हीं तें मारणार व अशा रीतीनें भूमीचा भार कमी होणार; तो मेला तर ही गोष्ट होणें शक्य नाहीं; माझा अवतार तर भूभार-हरणार्थच आहे, तसेंच मला साधूंचें संरक्षण करून दुष्टांचा पण वध करावयाचा आहे. शिवाय ह्या कृत्यांनीं मला धर्माचें संरक्षण करून अधर्माचें उच्चाटनही करावयाचें आहे. "

११ याप्रमाणें भगवंतांच्या अवतारकार्यांत भूभारहरणाचा समावेश भागवतकारांनीं केलेला दिसतो. परंतु खुद्द भगवंतांनीं गीतेंत ह्या गोष्टीचा उल्लेख केलेला नाहीं. कदाचित् गीतेंतील अवतारकार्याच्या सूत्रात्मक व्याख्येंत भूभार-हरणाचाही समावेश ' धर्मसंस्थापना व अधर्माचें उच्चाटन ' यांतच होण्यासारखा आहे असें वाटून बहुधा भगवंतांनीं त्याचा स्वतंत्र उल्लेख केलेला नसावा असेंही पण म्हणतां येईल. परंतु असा हा समावेश होऊं शकतो कीं काय व होत असल्यास तो कसा होतो हें पाहण्यापूर्वीं भूभारहरण म्हणजे काय व तो सैन्य मारून होतो कीं काय हें पाहिलें पाहिजे.

१२ या ठिकाणीं भूभार म्हणजे काय व भगवान् तो हरण करतात म्हणजे करतात काय याचा थोडक्यांत यथामति विचार करूं ' मीं नाहीं केलें म्हणून काय झालें ? माझें काम दुसरा कोणी तरी करील. ' असें म्हणणाऱ्या कर्तव्यच्युत माणसांच्या कामाचा बोजा इतरांवर पडतो. शिवाय असे कर्तव्यच्युत रिकामटेकडे लोक बहुधा जनतेला त्रास होईल असेंच कांहीं तरी करतांना आढळतात. तेव्हां अशाच्या दुष्कर्मांचा पाडाव करण्याचा बोजाही कर्तव्यनिष्ठ माणसांवर येऊन पडतो हाच तो भूभार होय व हा भूभार आत्मौपम्यबुद्धी नसणारे पापी अधर्मी मनुष्य उत्पन्न करीत असतांना त्यांचें शासन करून भगवान् त्यांना कर्तव्योन्मुख

करून धर्माची स्थापना करीत असतात हें त्यांचें कार्य म्हणजेच भूभारहरण समजावें असें आम्हांस तरी वाटतें. कारण सर्व भगवच्छत्रूंचें वर्णन पाहिल्यास ते स्ववर्णाश्रमधर्माला स्वतः लाथाडून व इतरांना पण बळजोरीनें तसें करावयास लावून भूमीवर अनर्थ करुन सोडीत असतात. व नंतरच सर्वत्र स्थिरस्थावर करण्यासाठीं भगवान् अवतार धारण करतात असें दिसून येतें. अशा तऱ्हेचें पाप जगावर वाढलें कीं भूमि गोरूपानें ब्रह्मदेवाला शरण जाते व त्यांच्या मध्यस्तीनें भगवान् अवतार देतात असें सर्व इतिहासपुराणें वंठरवानें सांगत आलीं आहेत. असो. आतां भूभार हरणाची गोष्ट बाजूला ठेवली तरी असें मात्र म्हणतां येईल कीं, इतक्या इतक्या माणसांचें मरण ह्या जरासंधाच्या मथुरेवरील स्वाऱ्यांमुळें व्हावयाचें आहे असें माहीत असल्यामुळें व जरासंधाला मारला तर तसें घडणें शक्य नसल्यामुळें श्रीकृष्णांनीं जरासंधाला दर वेळीं सोडून दिलें असावें परंतु ह्या व दुसऱ्या अशाच एका कारणांवरून श्रीकृष्णांनीं जरासंधाला दरवेळीं सोडून दिलें असावें असें आम्हांस वाटतें.

१२ एक तऱ्हेनें पाहतां हें असें करणें योग्य नव्हे. कारण पहिल्याच खेपेला रामकृष्णांनीं जरासंध हातीं लागला होता तेव्हांच त्याला मारून टाकला असता किंवा पकडून कैदेंत ठेवून दिला असता तर कायमची कटकट मिटली असती असें वाटणें साहजिक आहे. परंतु 'समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः' म्हणजे प्राणिमात्राच्या ठिकाणीं पक्षपात न करतां मीं समबुद्धीनें वागतों; माझा खरोखर कोणाशींही द्वेष नाहीं, व कोणाशीही माझी मैत्री पण नाहीं, म्हणून सांगणाऱ्या श्रीकृष्णांना त्याला तसा कायमचा बद्ध करून ठेवणें किंवा मारून टाकणें योग्य कां दिसले नाहीं हें पुढें दाखविलेल्या दृष्टीनें विचार करणाराला सहजच पटेल असें आम्हांस तरी वाटतें.

१३ ज्या अर्थी श्रीकृष्णांना कारणावांचून कोणाशींही वैर ( किंवा मित्रत्व ) करावयाचें नव्हतें व ज्या अर्थीं त्यांना 'अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः' म्हणजे अज्ञानानें भ्रान्तचित्त झाल्यामुळें मनुष्याची सदसद्विवेकबुद्धि योग्य काम बजावीनाशी होते व माणसें अविचारानें वागतात हें माहित होतें, त्या अर्थीं अन्यायी झाला म्हणून काय झालें? 'कंस आपल्याला पुत्रवत् असल्यामुळें त्याला साहसानें मारणाऱ्याला आपण देहान्त शासन केलेंच पाहिजे' असें व्यवहाराप्रमाणें जरासंधाला वाटणें साहाजिकच होतें हें पक्कें माहीत असणाऱ्या व यानें कितीही उड्या मारल्या तरी आपलें याच्या हातून किंचित्ही वाकडें होणें शक्य नाहीं हेंही पुरें जाणत असलेल्या श्रीकृष्णांनीं, आधींच जनक्षोभ झाला होता त्यांत जरासंधाला कायमचा कैद करून किंवा मारून टाकून होणाऱ्या आणखी

जनक्षोभाची भर घालावी हें विहित व प्रजेच्या सुस्थितिरक्षणाच्या दृष्टीनें कल्याणप्रद नाहीं हें जाणण्याइतकी चतुराई असलेल्या श्रीकृष्णांनीं, त्याला हातीं मिळाला असतांही अनेक वेळां सोडून देऊन त्याच्या प्रजेला व इतरांनाही ' आपण मनुष्याचा वैरी नसून अन्यायाचा तेवढा वैरी आहें व अगदींच नाइलाज झाल्याशिवाय केवळ चैनीनें शत्रूंना मारीत सुटत नाहीं, एवढेंच नव्हे तर शक्य तर त्यांना दया करून ते पुनः पुनः वैर करीत असतांही बिनशर्त सोडून देण्यासही कमी करीत नाहीं ' असें सिद्ध करून दाखविल्यामुळें आपल्यावर सर्वजनता खुष करून घेण्यांत मोठी कल्पकता, चतुराई व सावधगिरी दाखविली हें पाहून त्यांच्या राजनीतिपटुत्वाची तारीफ करावी असें कोणास बरें वाटल्यावांचून राहील ?

१४ जरासंध हा दुष्ट मनुष्य असून तो वध्य आहे असें त्यांना पक्कें माहित होतें. परंतु त्याला त्यावेळींच मारणें श्रीकृष्णांना योग्य वाटलें नाहीं, एवढें मात्र खरें. बाकी खरें कारण काय असेल तें असो. ज्याप्रमाणें श्रीकृष्णांना त्याप्रमाणें त्यालाही नित्य युद्धांत गुंतून राहणें कठीणच होतें. शिवाय प्रत्येक वेळीं हा पराभव पावतो व श्रीकृष्ण त्याला न मारतां सोडून देतात असें पाहून व नित्ययुद्धांला कंटाळून हळूहळू जरासंधाचे मांडलीक राजे त्याच्या मदतीला येण्याचें टाळूं लागले. कित्येक त्वेषाच्या पहिल्या झटक्याचा वेग कमी होतांच हळुहळू श्रीकृष्णांच्या पक्षाला अनुकूल होऊं लागले, व जरासंधाच्या हट्टीपणामुळें व अन्यायी कंसाच्या मृत्यूला इतकें अवास्तव महत्व दिल्यामुळें त्याच्यावर मनांतून नाराज होऊं लागले.

१५ एवढ्या अवधींत श्रीकृष्णही कांहीं अगदींच स्वस्थ बसले होते असतील असें कोणी समजूं नये. त्यांनींही आपली कारवाई चालू ठेवली असेलच व तिचाही परिणाम म्हणून हळूहळू जरासंधाचा पक्ष क्षीणबल होत असला पाहिजे; कारण पुढें श्रीकृष्णांनीं मथुरा सोडून देऊन द्वारकेला आपलें ठाणें दिल्यामुळें जे राजे श्रीकृष्णांच्या पक्षाला वळलेले होते. त्यांना जरासंधानें धरून कैदेंत ठेवून त्यांचा नरमेध करण्याचा बेत जरासंधानें केला होता परंतु त्या राजांनीं श्रीकृष्णांची गुप्तपणें मदत मागितल्यामुळें व श्रीकृष्णांनींही योग्य मुदतींत तशी तजवीज केल्यामुळें त्यांचे प्राण वांचले ( ही हकीगत पुढें येणार आहे. ) असो. याप्रमाणें आपला पक्ष हळुहळु क्षीणबल होत असून श्रीकृष्णांचा पक्ष बळकट होत आहे असें पाहून जरासंधानें अठराव्या खेपेला आपल्या मदतीला कालयवन नांवाचा एक अतिधोरणी, पराक्रमी, चतुर व सैन्यबलानें सज्ज असा यवन राजा बोलावला परंतु त्या राजाला झाला तरी आपल्या बळाचा गर्व होताच.

त्याला वाटूं लागलें कीं बाकी सर्वांना भारी असलेल्या श्रीकृष्णांना आपण एक-ट्यानेंच जिंकलें तर अनायासेंच आपणाला सम्राट्पद प्राप्त होईल ह्मणून तो आधींच पुढे आला. तो यादवांच्या हातून मारला किंवा जिंकला जाणार नाहीं असा शंकराचा त्याला वर होता. त्याचें सैन्यही अफाट होतें. परंतु 'बुद्धिर्बुद्धिमतामस्मि' ह्मणजे बुद्धिमतांची बुध्दी ती मींच किंवा 'नीतिरस्मि जीगीषताम्' म्हणजे विजिगीषुराजांचीं पाताळयंत्री कारस्थानें तीं मींच ह्मणून सांगणाऱ्या व 'बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते। तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्' ह्मणजे बुद्धिवानांला दुसऱ्यांचे ढिले व मजबूत अशा दोन्ही प्रकारचे बेत आपल्या यथायुक्त वर्तणुकीनें हाणून पाडतां येतात ह्मणून मनुष्यानें व्यवहारांत अशी युक्ती सुचविणाऱ्या बुद्धिगम्य मार्गाचें अवलंबन करून आपलीं कार्यें साधून घ्यावींत असा उपदेश करणाऱ्या श्रीकृष्णांच्या अत्यंत खोल बुद्धीचा थांग लागून तिच्यावर मात करतां न आल्यामुळें तो मुचकुंदाच्या हातून परस्पर मारला गेला. परमेश्वराची सर्वज्ञता म्हणतात ती यालाच!

१५ कालयवन मथुरेनजीक आला आहे असें समजतांच धिकद्रूनें केलेली श्रीकृष्णांची विनवणीवजा कानउघडणी व श्रीकृष्णांनीं त्याला दिलेलें उत्तर वगैरे हीं पाहिलीं कीं यादवांचा निर्भीडपणा व श्रीकृष्णांवरील दृढ विश्वास या बरोबरच श्रीकृष्णांची समयसूचकता व समाधान करण्याची शैली हीं चांगलींच ठळकपणें नजरेस येतात. आतां त्याबरोबरच हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं श्रीकृष्णांना म्हटल्याप्रमाणे करतां आले म्हणूनच त्यांचे वरील दोन्ही गुण वर्णनीय ठरतात, नाहींतर लफंगे कांहीं थोड्या बाता मारीत नाहींत! व दुसऱ्यांना सपशेल तोंडघशीं पाडायला चुकत नाहींत! परंतु अशांचा हजरजबाबीपणा कवडीमोल ठरतो म्हणजे बुद्धीला कृतीचे पाठबळ नसेल तर ती बुद्धी लगाम नसलेल्या घोड्याप्रमाणे कोठें भटकेल याचा नेम नसतो. ह्याच उद्देशानें श्रीकृष्ण गीतेंत म्हणतातः—

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन।
बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ २।४१ ॥

म्हणजे ज्याला कांहीं व्यवसाय म्हणजे व्यवहारक्षम उद्योग किंवा कृति करावयाची आहे त्याला आपला व्यवसाय म्हणजे कृति व आपले बुद्धिमान्य भाषणादि सर्व व्यवहार यांत एकसूत्रीपणा राखावा लागतो परंतु ज्याला कृति करण्याची चाड नाहीं याला हव्या त्या दिशेनें व हव्या तितक्या वल्गना करतां येतात. असो.

१७ कालयवनाचा निकाल लावून होतो न होतो तोंच जरासंधही येऊन

दाखल झाला. तेव्हां यादवांना दिलेल्या आश्वासनरूपी अभयवचनानुरूप श्रीकृष्ण त्याला पाहातांच दक्षिण दिशेला पळून गेले व शत्रूला गोमंतक पर्वताच्या पायथ्यापर्यंत लांब नेऊन तेथें त्याला चांगलाच हात दाखविते झाले, व स्वजनांना, 'न मे भक्तः प्रणश्यति' म्हणजे माझ्यावर विसंबून राहणारांना मीं केव्हांच तोंडघशी पाडीत नाहीं, ह्या गीतावाक्याची पूर्तता करून दाखविली. या वेळीं जरासंधाजवळ फक्त १२ अक्षौहिणी सैन्य होतें असें दिसतें. यावरूनच दिवसेंदिवस त्याचें सैन्यबळ श्रीकृष्णांच्या धाकानें, भेदानें वा प्रेमानें कशानेंही म्हणा--कमी कमी होत चाललें होतें असें आम्ही म्हटलें आहे.

१९ यानंतर मथुरेला येतांयेतां वाटेंत शृगालराजाचा वध केल्यावर श्रीकृष्णांनीं त्याच्या अल्पवयी मुलाला गादीवर बसवून त्याच्या एका गवताच्या काडीचाही अभिलाष केला नाहीं; याहून अधिक निस्पृहता, समता व कारुण्यबुद्धी कोणी दाखवूं शकेल असें आम्हांस तरी वाटत नाहीं. 'समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः' असें श्रीकृष्णांनींच म्हणावें; त्यानांच तें शोभतें. 'दयाभूतेष्वलोलुप्त्वं मार्दवम्' म्हणजे प्राणिमात्राच्या दुःखानें दुःखी होऊन त्यावर दया करणें, पूर्ण निर्लोभवृत्ती धारण करणें, हृदयाची अत्यंत कोमलता प्रगट करणें इत्यादि दैवीसंपत्तीचे गुण श्रीकृष्णचरित्रांत जसे दृष्टोत्पत्तीस येतात तसे इतर कोठेंच एकवटलेले दिसून येत नाहींत.

२० श्रीकृष्णांनीं जरासंधाचा अठरा वेळ पराभव केला खरा परंतु तो मोठा मानी असल्यामुळें पुनः पुनः आपल्यावर स्वारी करणार हें त्यांना निश्चितपणें माहीत होतें, व श्रीकृष्णही त्याच्याशीं सामना द्यायला समर्थ होते. तरीही नेहमींच श्रीकृष्ण घरीं राहणें शक्य नव्हतें. त्यांना आपल्यापुढें इतर पुष्कळ कामें दिसत होतीं. हीं करून ह्मणजे त्यांना स्वतांसाठीं विशेष कांहीं करायचें होतें असें नव्हे हें त्यांनीं —

'नमे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन
नानवाप्तमवाप्तव्यं; वर्त एव च कर्मणि ॥ ३ ॥

ह्मणजे ह्या तीन्ही लोकांशीं माझा कोणताच स्वार्थी संबंध नाहीं, मला त्यांपासून स्वतांसाठीं कांहींच नको आहे तरीही मीं कर्म करीत आहे- या श्लोकांत सांगितलेंच आहे. परंतु स्वतांच्या अवतारकार्यानुसार भगवंत स्वतःच जर 'यदिह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः' ह्मणजे आपलें काम चोख करणार नाहींत तर त्यांनींच सांगितल्याप्रमाणें 'मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः, म्हणजे लोकही भगवंतांच्याच कृतीचें अनुकरण करून आपापलें कर्तव्य चोख-

रीतीनें बजावते नसते. म्हणून आपलें इतर अवतारकार्य आपल्याला निर्धास्तपणें म्हणजे आपल्या सुहृज्जनांवर व आप्तमंडळींवर कांहीं संकट तर आलें नसेलना अशी चिंता नित्य वहावी न लागतां करतां यावें म्हणून भगवंतांनीं असें ठरविलें कीं आपण समर्थ असलों तरी जरासंधासारख्या प्रबळ शत्रूपासून होईल तितकें दोन पावलें दूर राहावें हें बरें, कारण असें आपण न केलें तर 'उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम्' म्हणजे आपल्या ह्या सर्व प्रजा एखादे वेळीं मोठ्या संकटांत सांपडून नाश पावतील म्हणून त्यांनीं आपल्या सर्व यादव मंडळीला एकत्र बोलावलें व त्यांच्यापुढें तो प्रश्न टाकला. त्यांचेंही मत तसेंच पडलें. तेव्हां श्रीकृष्णांनीं समुद्रतीरीं रैवतपर्वताच्या समुद्राकडल्या बाजूला पाणी अगदीं उथळ आहे असें पाहून समुद्रांत भिंत घालून आपल्याला हवी तेवढी जमीन मोकळी करून घेतली व त्या जागीं आर्यावर्ताच्या भगवंतांनीं थेट आर्यावर्ताच्या नमुन्या--वर म्हणजे तीन बाजूंनीं पाणी व एका बाजूनें पर्वताचा अभेद्य तट अशा जागीं आपल्या सर्व आर्यमंडळीसहवर्तमान स्वतांच्या आर्यत्वाला शोभेशा दिमाखानें राहण्यासाठीं सर्व आर्यावर्तांचें नाकच अशी दिव्यपुरी वसवून तिला द्वारका म्हणजे प्रवेशद्वारें अगदीं लहान म्हणजे अत्यंत कष्टसाध्य आहेत अशीं असें नामाभिधान केलें.

२१ श्रीकृष्णांनीं जी ही आपल्या नगरची लोकविलक्षण रचना केली ती पाहून 'योगः कर्मसु कौशलम्' ह्मणजे कोणतेंही काम अजब रीतीनें करून त्याला किंवा त्यापासून येणाऱ्या सर्व विघ्नांचा किंवा अडचणींचा आधींच शक्य तितका बंदोबस्त कसा करावा हें समजणें ह्मणजेच योग असें सांगण्याचा अधिकार त्या श्रीमूर्ती श्रीकृष्णांसच होता असें ह्मटलें असतां वावगें होईल काय? व अशा योगेश्वर श्रीकृष्णांस नेहमीं विजय मिळावयाचाच!

ह्या ठिकाणीं आल्यावर श्रीकृष्णांनीं मीठ पिकवून त्याचा व्यापार करण्याची सल्ला आपल्या अनुयायास दिली असावी व ते तो व्यापार करून सधन झाले असावे असें दिसतें; कारण हंस नांवाच्या राजानें श्रीकृष्णांना आपल्या राजसूय यज्ञाच्या वेळीं 'प्रभूत लवण आणावें' अशी आज्ञा केलेली होती. शिवाय मथुरेपर्यंत त्यांचें राज्यही पसरलेलें असावें असें दिसतें.

तसेंच द्वारकानिवासी जनांचें दारिद्र्य कायमचें फिटून जावें ह्मणून यत्न करणाऱ्या भगवंतानाच आपण भक्तांचा 'पिताहं अस्य जगतो माता धाता पितामहः' व 'गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्' असें ह्मणणें शोभतें. अथवा कालिदासाच्या शद्बांत सांगावयाचें तरः—

प्रजानां विनयाधानाद्रक्षणाद्भरणादपि ।
स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः ॥

ह्मणजे प्रजेचें शिक्षण, रक्षण व पोषण ह्या सर्व जबाबदाऱ्या आपल्यावर घेतल्या-मुळें तेच खरोखर प्रजांचे मातापितर होते. फक्त त्या सर्वांना भगवंतांनीं जन्म दिला नव्हता इतकेंच !

तसेंच 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः' ह्मणजे थोर लोक वागतात तसे इतर वागतात हें लक्षांत ठेवून सुशिक्षणाचे सहचारी असे लीनपणा व निगर्वी-पणा इत्यादि मूर्तिमंत सद्गुणांचें आचरण भगवान् किती चोख ठेवीत हेंही द्वार-केंतही उग्रसेनालाच राजा करून व आपण त्याच्या आज्ञेंत वागून भगवंतांनीं सर्व जनांच्या नजरेंत भरेल इतकें उज्ज्वल आचरून दाखविलें आहे. तेव्हां प्रत्येक आर्य ह्मणविणारानें त्यांचा हा गुण अवश्य आपल्या अंगीं आणावा.

---


## कविवर्य मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन )

ह्या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातु मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरी भारतांतील विशेष गुणः – सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस, शृंगाररस इ० कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचित्रें कुरुत्यांचीं वर्णनें, त्यांच्या वेळची पाकसिध्दी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. 'मुक्तेश्वर नीतिर-त्नमाला' ही शेवटी जोडली आहे. पृ. सं १४४ किं. रु. १

## मारुतिउपासना.

प्रथम मारुतिरायाचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी किं ८४ पत्ताः—मुमुक्षु कचेरी, नाशीक सिटी.

# अन्नमयकोश—स्थूलदेह.

( लेखकः—विष्णु बाळकृष्ण महाडेश्वर, सरव्हेअर, मुंबई. )

प्रश्नः—देहासंबंधानें विचार कसा करावयाचा ?

उत्तरः आपण देह आहों, किंवा देहाचा कोणीतरी आहों, आपण देहाला जाणतों, किंवा देह आपणाला जाणतो, याचा विचार करतां, 'माझा देह' असें आपण ह्मणतों. यावरून देहास पाहणारा ह्मणजे द्रष्टा, तो आपण आहों व देह हा आपणांस दिसणारा दृश्य आहे, आपणच देह आहों, असें मनुष्यानें समजूं नये. आपण देह आहों असें समजणें, ही केवळ भ्रांति आहे, ती सोडून द्यावी. ज्याअर्थी आपण देहाला असणाऱ्या सर्व अवयवांस आपण जाणतों, त्याअर्थी आपण देहाहून निराळे आहों, हें सिद्ध होतें.

प्रश्नः—हा देह कसा आहे ?

उत्तरः— हा देह अन्नापासून झालेला आहे, अन्नानें वांचतो, आणि अन्न न मिळालें तर नाश पावतो. ह्मणून ह्या देहाला 'अन्नमयकोश' असें ह्मणतात. रज-स्वलेचा जो विटाळ, त्याचा आळोनी बनलेला हा देह होय. हा देह त्वचा; चर्म, रक्त हाडे आणि विष्टा यांचा समुच्चय आहे. हा देह जन्माच्या पूर्वी, आणि मरणा नंतर नसतो केवळ वर्तमानकाळींच दिसतो हा क्षणोक्षणीं बदलतो. हा जड नाशिवंत, विकारी व मिथ्या आहे.

प्रश्नः— देह कसे बनतात ?

उत्तरः—तामस अहंकारापासून सूक्ष्म अहंशब्द उत्पन्न झाला. त्याचें दैवत रुद्र. त्याचे द्रव्यशक्तीपासून पंचमहाभूतें व पचवीस विकार उत्पन्न झाले. अशा सूक्ष्म अंडाच्या पोटीं अवकाश ह्मणजे पंचमहाभूतांपासून मनुष्य, पशु, पक्षी इत्यादिकांचे देह पांचभौतिक उत्पन्न झाले. चार खाणी चौऱ्यांशीं लक्ष योनी उत्पन्न झाल्या.

प्रश्नः----पंचमहाभूतें व पंचवीस विकार ते कोणते ?

उत्तरः----पंचमहाभूतें ह्मणजे १ पृथ्वी, २ आप, ३ तेज, ४ वायु ५ आकाश. पंचवीस विकार ह्मणजे (१) पृथ्वीच्या कठिण भागाच्या अंशापासून, १ केंस २ कातडी, ३ शिरा, ४ मांस, ५ हाडें हीं होतात. (२) उदकाच्या पातळ भागाच्या अंशापासून, १ लाळ, २ मूत्र, ३ रक्त, ४ मेंदु, ५ रेत हीं होतात. (३) तेजाच्या अंशापासून, १ भूक, २ तहान, ३ आळस, ४ निद्रा, ५ मैथुन हीं होतात. (४) वायूच्या धर्मापासून १ चलन, २ धावन, ३ निरोधन, ४ प्रसरण,

५ आकुंचन हीं होतात. (५) आकाशापासून, १ काम, २, क्रोध, ३ शोक, ४ मोह ५ भय हे होतात. याप्रमाणें पांच भूतांचे पंचवीस अंश मिळून, हा 'स्थूलदेह' बनलेला आहे. यापासून तूं निराळा आहेस.

प्रश्नः-- या स्थूलदेहाला विकार किती आहेत?

उत्तरः --या स्थूलदेहाला ६ सहा विकार आहेत. १ उत्पन्न होणें, २ असणें, ३ वाढणें, ४ प्रौढ होणें, ५ वृद्ध होणें, ६ मरणें, हे होत. अशाप्रकारें पंचमहाभूतें आणि पंचवीस विकारांचें वेष्ठणयुक्त हा देह आहे. याचा रंग, रूप, नांव हीं सर्व तूं जाणतोस, ह्मणून हा देह तुला निराळ्या जातीचा दिसतो. हा तूं नाशवंत देह नव्हेस. तूं या स्थूलदेहास व्यापून नखशिखांत राहिला आहेस. पण हा देह जड व अज्ञानी असल्यामुळें तो तुला जाणत नाहीं. तो तूं पुरुषही नव्हेस व स्त्रीही नव्हेस.

प्रश्नः— ह्या स्थूलदेहाचे परिणाम किती?

उत्तरः—ह्या स्थूदेहाचे परिणाम तीन आहेत. १ जाळला तर अग्नि खातो २ पुरला तर किडे खातात. ३ पडला तर गिधाड खातात. ह्याचे परिणाम तीन होतात १ कृमि, २ विष्ठा, ३ भस्म होऊन, पृथ्वीतत्वांमध्यें मिळतात.

प्रश्नः — जन्म कशामुळें प्राप्त होतो?

उत्तरः— नास्तिक व पाखंडी लोक 'मी देह आहे' असा अभिमान धरल्यानें जन्मादिक दुःखें भोगतात. यासाठीं मनुष्यानें देहाभिमान सोडून द्यावा. (काम्यकर्में बंद केल्यानें पुनः जन्म प्राप्त होत नाहीं.)

प्रश्नः— स्थूलदेहाचें स्वरूप कसें आहे?

उत्तरः— देह जड, हाडांचा समुच्चय, मांसानें लिंपलेला, विष्ठेनें भरलेला, अतिशय अमंगल, घाणेरडा असा आहे. हा देह स्वतः शाश्वत 'आत्मा' कसा होऊं शकेल.? कारण आत्मा ज्ञानरूप व आनंदरूप आहे. हाडांची रास हें त्याचें स्वरूप नव्हे. 'आत्मा' मांसानें लिंपलेला नाहीं, मळानें भरलेला नाहीं, व अमंगळही नाहीं. अज्ञानी व मूढ मनुष्य त्वचा, मांस, मेंद, हाडें, व विष्ठा यांच्या राशीला (देहाला) 'मी मी' असें ह्मणतो. पण विचारी व शहाणा मनुष्य देहांतून निराळें असें आपलें 'आत्मारामाचें स्वरूप' ओळखतो. 'आत्मा' हा देहाचा, देहाच्या धर्मांचा, देहाच्या कर्मांचा, व देहाच्या अवस्थादिकांचा साक्षी आहे ह्मणून आत्मा देहाहून निराळा आहे हें सिद्ध आहे. जोपर्यंत मनुष्य देहाभिमान (अहंबुद्धि) सोडीत नाहीं, तोंपर्यंत तो अनेक शास्त्रांत व विद्यांत निपुण झाला, तरी जन्ममरण न सुटतां, मोक्षप्राप्ति होणार नाहीं.

प्रश्नः— वेदांतादि शास्त्रामध्यें देहाभिमानाला काय संज्ञा आहे?

उत्तरः—मी अमका, माझें नांव अमकें, असा जो अभिमान त्याला शास्त्रांत 'विश्व' असें ह्मणतात.

प्रश्नः---स्थूलदेहाचें मिथ्यत्व कसें भासतें.?

उत्तरः---मरणकाळीं किंवा स्वप्नकाळीं पंचभूतें व पंचवीस विकार अशीं तत्वें नाश पावतात, व शून्य होतात. यावरून मनुष्यास स्थूलदेहाचें मिथ्यात्व अनुभवास येतें.

प्रश्नः---जन्ममरण कसें सुटेल.?

उत्तरः—'मी देह आहे' असा अभिमान सोडून, काम्यकर्मे त्याग केलीं पाहिजेत.

प्रश्नः—देह अभावीं मी कोण असावा.?

उत्तरः— स्थूलदेहाच्या निरसनाच्या ज्ञानामुळें, तुला मी स्थूलदेह नव्हे, मी देहापासून निराळा आहे, असें अनुभवास आलें. परंतु सुषुप्तिकाळीं देहीं श्वासोश्वास वाहत असतात. यावरून तुला आपण प्राण आहे; असें वाटत आहे.

प्रश्नः—पूर्वी स्थूलदेह प्रत्यक्ष दिसतो, हाच आत्मा, असें मानणारे मताभिमानी कोण होते.?

उत्तरः—पूर्वी देह हाच आत्मा आहे, हें मत दैत्य, राक्षस यांच्यामध्यें चालू होतें. तेंच मत चार्वाक व बौध्द, योगाचार, सौत्रांतिक, वैभाषिक, माध्यमिक, अर्हत ह्या सहा जणांनीं चालू ठेविलें होतें. ह्याचें मतांत काम व अर्थ हेच खरे पुरुषार्थ आहेत, अशी ह्यांची दृढ समजूत होती. हे नास्तिक मतवादी ईश्वरप्रणीत वेदांत व परलोकास मुळींच मानीत नव्हते स्थूलदेह निरसन होऊन, मिथ्या असा अनुभव आल्यामुळें, ह्या नास्तिकमतवाद्यांचें मत सहज खोटें ठरतें. स्थूलदेह नाशवंत व मिथ्या आहे.

प्रश्नः—मी भ्रांतिष्ट कां होतों.?

उत्तरः—देहाचा अभिमान धरल्यानें, मी देह आहें असें तुला वाटत होतें. ती तुझी 'तामस भ्रांति' विचारानें गेली. आतां 'प्राण मी आहें' असें तुला वाटत आहे, ही तुझी 'राजस भ्रांति' आहे. तीही भ्रांति विचारानें निरसन केली पाहिजे.

प्रश्नः—प्राण ह्मणजे काय.?

उत्तर—राजस अहंकारापासून सूक्ष्म कोहं ध्वनि झाला. त्याचें दैवत ब्रह्मा होय. त्याचे क्रियाशक्तिपासून, पंचप्राण, पंच उपप्राण, पंच ज्ञानेंद्रियें, पंचकर्मे--

द्रियें, व पंच विषम हीं उत्पन्न झालीं. ह्या सर्वांना मिळून 'सूक्ष्मदेह' असें ह्मणतात.

प्रश्न--पंचप्राण कोणते. ? व त्यांच्या क्रिया कोणत्या. ?

उत्तर--पंचप्राण ह्मणजे प्राण, अपान, व्यान, उदान, समान. हे सर्व वायुमय आहेत. (१) प्राण, ह्याचें हृदयस्थान, श्वासोश्वास वहाणें ही त्याची क्रिया होय. (२) अपानाचें गुदस्थान, मलमूत्रत्याग करणें ही त्याची क्रिया होय. (३) व्यानाचें संधिस्थान, सर्व शरीरांतील संधि हलविणें, ही त्याची क्रिया होय. (४) उदानाचें कंठस्थान, शद्व बोलविणें, ही त्याची क्रिया होय. (५) समानाचें नाभिस्थान, अन्नोदय व रस सर्व शरीरांत पोंचविणें ही त्याची क्रिया होय. तसेच उपप्राण पांच आहेत. जसेः-- नाग, कूर्म, कृकल, देवदत्त, धनंजय हे होत. (१) नागाचे हृदयस्थान, उचकी देणें ही त्याची क्रिया होय. (२) कूर्माचें नेत्रस्थान, पाहणें ही त्याची क्रिया होय. (३) कृकलाचें नासिकस्थान, शिंक देणें ही त्याची क्रिया होय. (४) देवदत्ताचें कर्णस्थान, ऐकणें ही त्याची क्रिया होय. (५) धनंजयाचें सर्व शरीरस्थान. शहारे आणणें ही त्याची क्रिया होय.

प्रश्नः—प्राण्यांच्या ऊर्मि किती आहेत ?

उत्तरः—प्राण्यांच्या ऊर्मि सहा आहेत क्षुधा, तृषा, दुःख, मोह, जरा, मृत्यु ह्या होत.

प्रश्नः—पंचज्ञानेंद्रियें तीं कोणतीं, व त्यांच्या क्रिया कोणत्या ?

उत्तरः—श्रोतृ, त्वचा, चक्षु, जिव्हा, घ्राण हीं पचज्ञानेंद्रियें होत. (१) श्रोतृ म्हणजे कान, शद्व ऐकणें ही त्याची क्रिया होय. (२) त्वचा म्हणजे शरीर, शीत, उष्ण, मृदु, कठीण जाणणें ही त्याची क्रिया होय. (३) चक्षु म्हणजे डोळे, पाहणें ही त्याची क्रिया होय. (४) जिव्हा म्हणजे जीभ, रसास्वाद जाणणें, ही त्याची क्रिया होय. (५) घ्राण म्हणजे नाक, सुगंध व दुर्गंध जाणणें, ही त्याची क्रिया होय.

प्रश्नः—पंच कर्मेंद्रियें तीं कोणतीं, व त्याच्या क्रिया कोणत्या. ?

उत्तरः--वाचा, पाणी, पाद, शिश्न, गुद हीं पंचकर्मेंद्रियें होत. (१) वाचा म्हणजे जीभ, शद्व बोलणें, ही त्याची क्रिया होय. (२) पाणी म्हणजे हात, पदार्थ देणे, घेणे, ही त्याची क्रिया होय. [ ३ ] पाद म्हणजे पाय, जाणे, येणे, ही त्याची क्रिया होय. [ ४ ] शिश्न म्हणजे इंद्रिय, मूत्र, रति करणें, ही त्याची क्रिया होय. [ ५ ] गुद म्हणजे मलद्वार, मलाचा त्याग करणें ही त्याची क्रिया होय.

प्रश्नः--पंचविषय ते कोणते ?

उत्तरः--शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, हे पांच विषय आहेत. [१] शब्द--विषयाची व्याप्ति, निंदा, स्तुति असून, त्यापासून श्रवणद्वारें द्वेषाद्वेष उत्पन्न होतात. [ २ ] स्पर्शविषयांत मृदु व कठिणपणा असून, संतोष व खेद उत्पन्न करतात. [ ३ ] रूपविषयांत, भ्यासुर व सुरेख, हे असून, हे असून, नेत्रद्वारें सुखदुःख उत्पन्न करतात. [ ४ ] रसनाविषयामुळें, आवड नावड उत्पन्न होऊन चांगलें वाईट ग्रह उत्पन्न करतात. [ ५ ] गंधविषयामुळें, सुगंध व दुर्गंध हे गुण असून, संतोष व त्रास उत्पन्न करतात.

प्रश्नः--विषय कसे आहेत. ?

उत्तरः--हे पंचविषय कृष्णसर्पाच्या विषापेक्षांही आपल्या अंगच्या दोषानें मारक आहेत.

प्रश्नः--सूक्ष्मदेहाचें मिथ्यत्व कसें भासतें. ?

उत्तरः--स्वप्नकाळीं पंचप्राण, पंच उपप्राण, पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें व पंचविषय या सर्वांचा आभास होतो. यावरून मनुष्यास ‘ सूक्ष्मदेहाचें ’ मिथ्यत्व अनुभवास येतें. ह्याला प्राणमयकोश म्हणतात. हाही ‘ आत्मा ’ होऊं शकत नाहीं. हा वायूपासून झालेला आहे. हा विकारी, अवस्थामय व परतंत्र आहे.

प्रश्नः---मी पंच प्राण, पंच उपप्राण, पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, व पंचविषय हीं नाहीं. हीं सर्व नाशवंत, विकारी, परतंत्र, व अवस्थामय असून, मिथ्या आहेत, हें माझ्या अनुभवास आलें. परंतु स्वप्नकाळीं मन प्रतिष्ठित असल्यामुळें, मी मन आहें असें मला वाटतें हें खरें कीं काय ?


उत्तरः---राजस भ्रांतीमुळें तुला ‘ सूक्ष्मदेह ’ आपण आहों, असें वाटत होतें, ती तुझी राजसभ्रांति नाहींशी झाली. आतां ‘ मन ’ मी आहे, असें तुला वाटत आहे, ही तुझी ‘ सात्विक भ्रांति ’ आहे तरी तीही विचारानें निरास केली पाहिजे.

प्रश्नः----अवस्था कशा होतात. आणि त्या किती आहेत ?

उत्तरः----अवस्था पांच आहेत. जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तूर्या, उन्मनि ह्या होत. [ १ ] सत्वगुणानें जागृति अवस्था उत्पन्न होते. [ २ ] रजोगुणानें स्वप्नावस्था होते. [ ३ ] तमोगुणानें सुषुप्ति अवस्था होते. [ ४ ] शुद्धसत्वगुणानें तूर्यावस्था होते. [ ५ ] निर्गुणानें उन्मनी अवस्था होते.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २६ मास ११ ) आषाढ शके १८५४ जुलै इ. स. १९३२ ( नवें वर्ष १२ वें अंक ७

वार्षिक वर्गणी रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३८३



## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी, ए

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.



मुद्रकः—विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६ लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | ... | १–४ |
| २ अठराश्लोकी गीता | ... | ५--७ |
| ३ श्री गंगाष्टक | ... | ९–० |
| ४ वर्णाश्रमसंघाची महाराष्ट्रीय परिषद् | ... | १०--० |
| ५ उपनिषदांतील वेंचें | ... | ११--१६ |
| ६ मराठी वाङ्मयाचा इतिहास | ... | १७--२० |
| ७ ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य | ... | २१--२३ |
| ८ त्रिंखड्या सिंहस्थ | ... | २३–२६ |
| पंचवटींत राम | ... | ,,_,, |
| मध्वमुनीचें जातें | ... | ,,_,, |
| ९ उत्कृष्ट उतारे | ... | २७--३३ |
| १० सार्थ सुभाषितरत्नखंडें | ... | ३४--४० |

१४/२

मुमुक्षु मासिक ] मंगलाचरण [ जुलई १९३२ 23/7/32
वर्ष १२ वें ] [ अंक ७



# छंद

जय सगुन निर्गुनरूप रूपअनूप भूपसिरोमने
दसकंधरादि प्रचंड निसिचर प्रबल खल भुजबल हने।
अवतार नर संसारभार बिभंजि दारुनदुख दहे
जय प्रनतपाल दयाल प्रभु संजुक्त सक्ति ननाम हे ॥

भावार्थः—हे सगुणा, निर्गुणरूपा, अनुपमसुंदरा, राजशिरोमणे! तुझा विजय असो! दशमुखप्रभृति प्रचंड प्रबळ व दुष्ट राक्षसांचा आपण आपल्या भुजबलाच्या योगानें संहार केलांत आपण हा मनुष्यावतारांत जीवांचा संसारभार भग्न केला असून त्यांच्या दारुणदुःखाचें निवारण झालें आहे. हे प्रणतप्रतिपाळा! दयाळा! शक्तिसीतासहवर्तमान आपणांस--हे प्रभो! आह्मी वंदन करितों.

२

तव विषम मायावस सुरासुर नाग नर अगजग हरे
भवपंथ भ्रमत अमित दिवस निसि कालकर्म गुनन्हि भरे।
जे नाथ करि करुना बिलोके त्रिविध दुख ते निर्बहे
भवखेदच्छेदनदच्छ हम कहँ रच्छ राम ननाम हे ॥

भावार्थः—हे हरे! आपल्या विषम ह्म० दुर्धर अशा मायेला वश झालेले देव, असुर, नाग, नर इत्यादि सारे संसारयात्रेंत अहर्निश अखंड भ्रमण करीत काल, कर्म व गुण यांत गुरफटले आहेत! हे नाथ! ज्यांचेकडे आपण करुणादृष्टीनें पाहतां त्यांचें त्रिविध दुःख निरस्त होते. भवदुःखच्छेद करण्याविषयीं दक्ष असणाऱ्या हे रामा! आमचें रक्षण करावें, आह्मी शरणागत आहोंत.

३

जे ज्ञानमानबिमत्त तव भवहरनि भगति न आदरी
ते पाइ सुरदुर्लभपदादपि परत हम देखत हरि।
बिस्वास करि सब आस परहरि दास तव जे होइ रहे
जपि नाम तव बिनु स्रम तरहिं भव नाथ सोइ स्मरामहे ॥

भावार्थः— ज्ञानाच्या अभिमानानें उन्मत्त होऊन ज्यांनीं भवहरण करणाऱ्या आपल्या भक्तीचा आदर केला नाहीं ते देवाला दुर्लभ अशी गति पावून सुद्धा भ्रष्ट होतात हें आह्मी प्रत्यक्ष पाहत आहोंत ! आणि जे केवळ आपणावर विश्वास टाकून व सर्व आशेचा परित्याग करून आपले दास बनून आपल्या नांवाचा जप करीत राहतात ते हे नाथ ! कष्टावांचून भव तरून जातात. हेंही आह्मीं जाणतच आहोंत !

४

जे चरण सिवअजपूज्य रज सुभ परसि मुनिपतिनी तरी
नखनिर्गता मुनिवंदिता त्रैलोक्यपावनि सुरसरी ।
ध्वजकुलिस अंकुसकंजयुत वन फिरत कंटककिन लहे
पदकंजद्वंद्व मुकुंद राम रमेस नित्य भजामहे ॥

भावार्थः— शिव व ब्रह्मा यांना पूज्य अशा ज्या शुभ चरणरजानें मुनिपत्नी अहल्या उद्धरली, ज्या चरणनखापासून मुनिवंदित अशी त्रैलोक्यपावनी भागीरथी निर्माण झाली, ध्वज, वज्र, अंकुश, कमल यांनीं जे चिन्हित आहेत व ज्यांना ( सीताशोधार्थ ) वनांत फिरत असतांना कंटकांचे व्रण पडले आहेत, अशा त्या चरणकमलयुगुलांचें— हे मुकुंदा रामा रमेशा ! आह्मांला निरंतर भजन घडो.

५

अव्यक्तमूलमनादितरु त्वच चारि निगमागम भने
षट कंध साखा पंचवीस अनेक पर्न सुमन घने ।
फल जुगल बिधि कटु मधुर बेलि अकेलि जेहि आस्रित रहे
पल्लवत फूलत नव ललित संसारबिटप नमाम हे ॥

भावार्थः—हे नाथा ! मनोहर प्रपंचवृक्षरूपाला तुला मी वंदन करितों. ह्या विश्ववृक्षाचें मूल अव्यक्त आहे ( यालाच सांख्यशास्त्रांत पुरुष ह्मणतात. ) ह्या वृक्षाचा देह अनादि आहे ( सांख्य याला प्रधान अगर प्रकृति ह्मणतात ). ह्याला त्वचा चार आहेत [ महत्तत्व व त्रिविध अहंकार ]. त्याला मुख्य शाखा सहा आहेत [ तीन गुण, काल, कर्म व जीव, ] व उपशाखा पंचवीस आहेतः-मनबुद्धिचित्तअहंकार हें चित्तचतुष्टय, पृथिव्यादि पंचमहाभूतें, पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, पंचविषय व पुरुष. ह्या वृक्षास जारज, स्वेदज व उद्भिज अशीं अनेक जीवरूपी अनेक पर्णें असून वासनारूपी घनदाट फुलें आलेलीं आहेत ! त्याला पापपुण्यानुसार एक मधुर व एक कटु अशीं स्वर्गनरकरूप दोन फळें आलेलीं आहेत. त्या वृक्षाला अहंममतात्मक अविद्यारूप एक वेली वेष्टून राहत आहे व

तिला नवीन पल्लव व फुलें [ जन्ममरणपरंपरात्मक अनंतवासनाबीजें ] येतच आहेत! अशा ह्या प्रपंचवृक्षरूपानें नटलेल्या हे नारायणा! तुला आमचें वंदन असो!

जे ब्रह्म अजमद्वैतमनुभवगम्य मनपर ध्यावहीं
ते कहहु जानहु नाथ हम तव सगुन जस नित गावहीं।
करुनायतन प्रभु सदगुनाकर देव यह बर माँगहीं
मन बचन कर्म बिकार तजि तव चरन हम अनुरागही॥

भावार्थः—जे अज, अद्वैत, अनुभवगम्य, मनवाचापर अशा ब्रह्माचें ध्यान करीत असतील ते हे नाथ! तें ब्रह्म खुशाल जाणोत व गात राहोत! आह्मी तर निरंतर तुझ्या सगुणरूपाचेच गुणानुवाद गात राहणार!! हे करुणा-सागर सद्गुणनिधान प्रभो! आह्मी तुझ्या चरणांपाशीं हाच एक वर मागत आहोंत कीं विकाररहित होऊन कायावाचामनानें आह्मी तुझ्या चरणाचे ठायीं अनुरक्त असावें!!!

—श्रीतुलसीरामायण [ उत्तरकांड ]

---

## मयूराच्या केका.

प्रभो! शरण आलियावरि न व्हां कधीं वांकडे,
म्हणोनि इतुकेंचि हें स्वहितकृत्य जीवांकडे;।
प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा! खरें;
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें॥ ४०॥

शिवे न तुझिया पदा अदयताख्य दोष क्षण;
प्रभो! चुकतसों, तरी करिसि तूंचि संरक्षण;।
नसेचि शरणागती घडलि सत्य अद्यापि ती;
रुचे विषय; ज्या मिळे अमृत, ते न मद्या पिती.॥ ४१॥

अवश्य करणें खरें प्रणतरक्षण स्वोचित;
उशीर मग कां? वसों कृपण मीही कां शोचित?।
नव्हे प्रभुवरा! तुम्हां उचित एकटें धांवणें;
कृतांत शिवला नसे तव, दिसे बरें पावणें.॥ ४७॥

कथासुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती;
शिशूंस जरठांसही निरखितां रसें दाटती;।
दुहोत भलते सदा, तरि न लेशही आटती;
स्ववत्समल भक्षिती परि न सर्वथा वाटती.॥ ५८॥

——मोरोपंत केकावलि

## प्रेमाची बहार !

१

ज्ञान, दान, यज्ञ, जप, कर्म ह्या साऱ्या चांगल्याच गोष्टी आहेत, त्या साधकाला साहाय्यक आहेत. ' यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्'–यज्ञ–दानतपादि कर्मे चित्तशुद्धिकर आहेत असें देवच बोलले आहेत. तथापि ह्या सर्वांनीं मिळून विमल प्रेमभाव उत्पन्न केला तरच यांची सफलता आहे नाहीं तर ही सारी कवाईत आहे !

२

' प्रेमसुख देईं प्रेमसुख देईं । प्रेमेवीण नाहीं समाधान ' असें नाथासार–ख्यांनीं ह्मटलें आहे.

३

प्रेमसुखाची गोडी ज्यांना देवानें दिली आहे ते अत्यंत भाग्यवान् होत. प्रेमसुख देवानेंच दिलें पाहिजे. ' जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा'

४

प्रेमसुखामुळें गरीबाच्या झोपडीला नंदनवनाची रम्यता येते, तें नसेल तर राजवाड्याला स्मशानाचीही किंमत नाहीं !

५

प्रेमामुळें भाकरीला चंव येते, घोंगडीला समाधानाची झोप येतें, साध्या भापणाला माधुरी येते, शरीराला सौंदर्य येते, अज्ञानाला ज्ञानाची शोभा येते व ज्ञानाला अपार मोल चढतें !

६

साधुसंत-ज्ञानामुळें नव्हे तर--प्रेमामुळें जगाला वश करितात, प्रेमानें दिल मिळतो, विश्वास वाढतो, दुसऱ्यांला व स्वतःला सुख होतें. नाथांच्या वेळीं पैठणास त्यांच्यापेक्षाही विद्वान् असतील, पण ते पंडित कालाच्या पोटांत गडप झाले, नाथांचा कीर्तिदुंदुभि जगावर चिरकाल गाजत राहणार ! सर्वभूतांतरात्मा झाल्यानेंच प्रेमसुख मिळतें. शुद्धज्ञान विरून त्याचा प्रेमरस होतो. ज्ञानाचा परिपाक ह्मणजे भक्तिप्रेम.

७

प्रेमसुखास्वाद भोगण्यासाठीं वाचकांनीं चतुर्मासांत भागवत, ज्ञानेश्वरी, अध्यात्मरामायण, नाथभागवत, तुलसीरामायण यांपैकीं एकाचें पारायण करावें.

# अठराश्लोकी गीता.

(लेखक — गोविंद रामचंद्र मोघे, मुंबई)

गेले कौरव आणि पांडव रणीं वर्णी कथा संजय ।
ती ऐके धृतराष्ट्र उत्सुकमनें वाटे तया विस्मय ॥
पाहे पार्थ रणीं कुलक्षय घडे चित्तीं विषादा धरी ।
युद्धापासुनि होउनी विमुख तैं टाकी धनुष्या दुरी १
झाला अर्जुन शोकमग्न बघुनी वेदान्त सांगे हरी ।
आत्मा शाश्वत देह नश्वर असे जाणूनि हें अंतरीं ॥
घेईं बाणधनू करीं समर तूं कर्तव्य तें आचरीं ।
वागें निस्पृह हर्षशोक न धरीं ज्ञानीजनांच्या परी ॥ २ ॥

विभो कर्मांहूनी अधिक बरवें ज्ञान ह्मणसी ।
तरी कां तूं येथें मजकरविं हिंसा करविसी ॥
वदे तैं पार्थासी यदुपति, करीं कर्म नियतें ।
फलेच्छा सांडोनी सहज मग नैष्कर्म्य घडतें ॥ ३ ॥
हराया भूभारा अमित अवतारांसि धरितों ।
विनाशूनी दुष्टां सतत निजदासां सुखवितों ॥
नियंता मी भूतां समजुनि असें कर्म मजसी ।
समर्पीं तूं कर्मां मग तिळभरी बद्ध नससी ॥ ४ ॥
करी सारीं कर्में विहित निरहंकार असुनी ।
त्यजी प्रेमद्वेषां धरुनि समता जो निशिदिनीं ॥
जया चिंता नाहीं पुढिल अथवा मागिल मनीं ।
खरा तो संन्यासी स्थिरमतिहि संकल्प सुटुनी ॥ ५ ॥

चित्ताचा सखया निरोध करणें तो योग मानीं खरा ।
हा मी हा पर भेद हा कधिं नसे चित्तीं मुळीं ज्या नरा ॥
जो सप्रेम सदा भजे मज तसा जो सर्व भूतीं सम ।
ठेवी मद्गत चित्त त्याहुनि दुजा योगी नसे उत्तम ॥ ६ ॥
माझ्या केवळ जाहली प्रकृतिनें ही सृष्टि सारी असे ।
पृथ्वीमाजि सुगंध मीच रस मी तोयांत पार्था वसे ॥
सर्वांतर्गत मी परी नुमजती जे ग्रस्त मायाबळें ।
जे चित्तीं मज चिंतिती सतत ते पापत्रयावेगळे ॥ ७ ॥

सदा ध्याती मातें हृदयकमळीं जे स्थिर मनें ।
तयां मी देहान्तीं सुख अमित देतों हरि ह्मणे ॥
तरी पार्था माझें निशिदिनिं करीं ध्यानभजन ।
मिळूनी मद्रूपीं मग चुकविसी जन्ममरण ॥ ८ ॥

भक्तीनें जल पत्र पुष्प फल कीं कांहीं दुजें अर्पिलें ।
तें मातें प्रिय, तेविं जे नर सदा मत्कीर्तनीं रंगले ॥
पार्था ! तें मुख धन्य ज्या मुखिं वसे मन्नामसंकीर्तन ।
विष्णो कृष्ण मुकुंद माधव हरे गोविंद नारायण ॥ ९ ॥

कोठें देवासि चिंतूं जरि ह्मणसि असें ऐक माझ्या विभूती ।
संक्षेपें अर्जुना हें तुज गुज कथितों मी असें सर्वभूतीं ॥
मी धाता विष्णु मी श्रीशिव रवि निगमीं साम मी विश्वरूप ।
माझी सर्वत्र सत्ता जगिं अणुनि असे दिव्य माझें स्वरूप ॥ १० ॥

पार्थ विनवि माधवासि विश्वरूप भेटवा ।
ह्मणूनियां हरी धरी विकट रूप तेधवां ॥
मांडिला अनर्थ थोर पांडुकुमर घावरे ।
ह्मणे पुनश्च दाखवा विभो स्वरूप गोजिरें ॥ ११ ॥

बरी सगुण भक्ति कीं भजन निर्गुणाचें बरें ।
पुसे विजय हें तदा हरि वदे तया आदरें ॥
असोत बहु योग ते तरिहि भक्तियोगाहुनी ।
नसेचि दुसरा असा सुलभ जो श्रमावांचुनी ॥ १२ ॥

क्षेत्रक्षेत्रज्ञ दोन्ही कथुनि मग पुढें कृष्ण पार्थासि सांगे ।
ज्ञानी त्यातें ह्मणावा मज भजुनि कदा जो मदानें न वागे ॥
तैसा ज्या भेद बाणे प्रकृतिपुरुषिंचा सर्व ठायीं समत्व ।
कर्मांची त्यासि बाधा तिलभरहि नसे पावला तो प्रभुत्व ॥ १३ ॥

पार्था मी जनिता, तशीच जननी माया, जगत्संतती ।
जीवां सत्वरजस्तमस्त्रिगुण हे स्वाभाविक व्यापिती ॥
जो सेवी परि भक्तिनें मज तया हे बाधती ना गुण ।
झाला मत्सम तो प्रियाप्रिय नसे त्यातें, नुरे मीपण ॥ १४ ॥

ऊर्ध्वी मूळ तळीं अपार पसरे अश्वत्थसंसार हा ।
छेदाया दृढ शस्त्र एकचि तया निःसंगता भूरुहा ॥
ऐसें ओळखुनी क्षराक्षर, मला जे पूजिती भारता ।
ते होती कृतकृत्य गुह्य कळुनी पावोनी सर्वज्ञता ॥ १५ ॥

१४/८७
१३/८/३२

दैवीप्रकृतिलक्षणें मनिं धरीं धैर्य क्षमाप्रौढता ।
चित्तस्वास्थ्य दया शुचित्व मृदुता सत्यादि बा भारता ॥
आतां दंभ असत्य मत्सरपणा वर्मी परा बोलणें ।
काम क्रोध अहंकृति त्यज सदा हीं आसुरी लक्षणें ॥ १६ ॥
सत्वरजस्तम तीन गुणांसह श्रद्धा; तप मख दान तसें ।
त्रिविध अन्नही; निज बीजापरि आवडि त्यांवरि दृढ बैसें ॥
उत्तम मध्यम अधम जाण हीं क्रमें, तयांतुनि सत्व धरीं ।
मग ॐतत्सत् वदुनि धनंजय ! ब्रह्मसमर्पण कर्म करीं ॥१७॥
त्यजूं पाहसी युद्ध परी तें प्रकृति करविल तुजकडुनी
तरि वद पार्था परिसुनि गीता रुचते ममता कां अजुनी ।
मग तो वदला मोह निरसला संशय नुरला खरोखरी
कृतार्थ झालों प्रसाद तव हा वचन तुझें मज मान्य हरी ॥ १८ ॥

---

## चातुर्मास्यांत !

१ चातुर्मास्यांत कांहीं तरी विशेष नेम धरण्याची चाल पूर्वापार आहे. सांप्रत ती बायकांत आणि तीही जुन्या चालीच्या बायकांत दृष्टीस पडते. अलीकडचे स्त्रीपुरुष ‘ बंधनाच्या पलीकडे ’ गेले आहेत !

२ मनुष्यप्राणी हा स्वभावतःच स्वेच्छाचारी आहे, त्याला बंधनें नको असतात, पण बंधनाच्या पलीकडे पशु असतात ! आपण होऊन आत्मश्रेयासाठीं कांहीं बंधनें लावून घेणें हें माणुसकीचें लक्षण आहे. चांगल्या गोष्टींचा स्वीकार व वाईटाचा त्याग, शास्त्रांनीं व संतसज्जनांनीं उत्तम ह्मणून सांगितलेल्या गोष्टींचा सादर अंगीकार व त्याज्य ह्मणून ठरविलेल्या गोष्टींचा त्याग एकदम् होत नसेल तर ‘ शनैः शनैः ’ त्याग—यांत माणुसकी आहे, स्वतःचा उद्धार आहे. ‘ कांहीं नित्यनेमेवीण । अन्न खाय तेंचि श्वान’ याप्रमाणें नित्यनेमावांचून नुस्तें पोट भरणाऱ्या मनुष्यास तुकोबारायांनीं कुत्र्याची उपमा दिली आहे. ती अगदी योग्य आहे.

३ “ नित्यनेम धरितां चित्तीं । तेणें शुद्ध चित्तवृत्ती । होवोनियां भगवंतीं । मार्ग फुटे ॥ नित्यनेमें सत्व चढे । नित्यनेमें शांति वाढे । नित्यनेमें थारा मोडे । देहबुद्धीचा ॥ नित्यनेमें दृढभाव । नित्यनेमें भेटे देव । नित्यनेमें पुसे ठाव । अविद्येचा ” याप्रमाणें नित्यनेमाचें महत्व सांगून समर्थ सांगतातः “हरिकथानिरूपण । प्रत्यहीं करावें श्रवण । निरूपणीं उणखूण केली पाहिजे ” ॥

४ श्रवण उत्तमच, पण तें न घडलें तर घरींच कोणत्या तरी एका सद्ग्रंथाचें नित्य वाचन किंवा पारायण केलें पाहिजे.

५ गीता, भागवत, विष्णुसहस्रनाम, अध्यात्मरामायण, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुलसी रामायण, रामविजय, हरिविजय व पांडवप्रताप, महिपति इत्यादिकांचीं संतचरित्रें इत्यादि पवित्र वाङ्मयांपैकीं कोणत्या तरी एक किंवा अनेक ग्रंथांची एक किंवा अनेक पारायणें, नित्य— निदान चतुर्मासभर तरी—श्रद्धाभक्तिसमन्वित होऊन देवासमोर प्रत्येकानें केलीं पाहिजेत. पारायणें स्नानसंध्या-पूजनोत्तर उपासनाबुद्धीनें करावीत. त्यांचा लाभ अधिक आहे. गीता व विष्णु-सहस्रनाम यांचे नित्य पाठ करावेत, व गुरूपदिष्ट मार्गानें जाऊन नित्यनेमाचा जप करावा.

६ संसारकृत्यें यथाकाल सारून आत्मकल्याणासाठीं वरीलप्रमाणें कांहीं तरी देवासाठी करावे.

७ संसारांतही चहाकॉफी हीं उष्णपेयें व वर्फ आइसस्क्रीम इ० थंडपेयें हीं सर्वथा वर्ज्य करावींत. स्वदेशीशिवाय कोणतीच वस्तु खरेदी करूं नये. पैसा स्वदेशीच राहील तें करावें. अनवश्यक कोणतीही वस्तु घेऊं नये. नाटकें, सीनेमा पाहण्यास जाऊं नये. सर्वथा नियमित असावें. बंधनाचें सुख नित्यनेमानें प्राप्त होतें.

---

# आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्रसंत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृतांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्र महोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. ‘ उपकृतिस्मरण ’ हें ७६ श्लोकांचें आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा, ग्रंथांचा, व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं. ॥१२

# श्रीगंगाष्टक.

(श्री० प० प० वासुदेवानंद टेंबेस्वामीविरचित)

न जाणें मी धर्मा नच विहितकर्मा अवगमा ।
न जाणे मी शर्मा नच न विहिताचारमहिमा ।
कुकर्माशीं कामाकुलित कृतकर्माचि सुभगे ॥
मला तारी गंगे सकळभयभंगे त्रिपथगे ॥ मला० ॥ १ ॥
न केव्हांही येथें सुकृतलव संपादित असे ।
न पूर्वींचें कांहीं सुकृत पदरीं भासत असे ।
पुढेंहि श्रेयाची गति नच दिसे खास मज गे ॥मला० ॥२॥
न साधूंच्या संगा क्षणभरिं धरीं भक्ति न करीं ॥
सुतीर्थक्षेत्राची वरवि पदवी तीहि न धरीं ॥
न देवाचें द्वारीं क्षणभरिं ठरे देवि सुभगे ॥ मला० ॥ ३ ॥
न केले बैसूनि क्षणभरिं पुराणश्रवणही ॥
कुकर्माच्या गोष्टी करुनि वय नेलें सकळही ॥
कदाकाळीं नेणें हरिभजन जें तें हि सुभगे ॥ मला० ॥४॥
असा हा मीं पायीं शरण तुज आलों हरिसुते ॥
तुवां वारी पापा शमवि मम तापा सुरनुते ॥
तुवां हातीं घेतां मग मजहि कांहींच न लगे ॥मला० ॥५॥
महापापी तूझ्या अमृतजलपानेंचि तरले ॥
सकृत्स्नानें गेले उपरि नच तेही उतरले ॥
असें मी ऐकूनी अयि शरण आलोंचि तुज गे ॥मला० ॥ ६॥
त्रितापाघ्नी ऐसें निजबिरुद तूं पाळि सदये ।
त्रितापाघ्नी ऐसें यशहि तव सांभाळि सुनये ।
अये योगिध्येये निगमगणगेये श्रितभगे ॥ मला० ॥७॥
तुवां पापी नेले असति जरि उद्धारुनि परे ॥
तयांहूनि श्रेष्ठा अजि मज अये उद्धरि बरे ॥
तरीच प्रख्याती करिशि जगतीं माझि सुभगे ॥ मला० ॥८।

# भारतवर्षीय वर्णाश्रमसंघाची
## महाराष्ट्रीय परिषद्.

धर्मेणराज्यं विन्देत धर्मेण परिपालयेत् ।
धर्ममूलां श्रियं प्राप्य न जहाति न हीयते ॥ श्री महाभारत

सनातनी हिंदूंच्या स्वधर्माप्रमाणें वागण्याच्या स्वातंत्र्याविरुद्ध पाश्चात्या-नुगामी आधुनिक संस्था व व्यक्ति यांचेकडून सारडाकायद्यासारखे कायदे व इतर प्रकार होत राहून राजकीय सत्तेच्या जोरावर आणि सभा, वर्तमानपत्रें, व्याख्यानें इत्यादि साधनांचें बळावर सनातन वैदिकधर्मासंबंधानें विपरीत भावना उत्पन्न करणें व अधर्म वाढविणें चालू आहे. तसेंच सरकारच्या चालू धोरणामुळें ह्या कामीं उत्तेजनहि मिळत आहे. हा अनर्थ टाळतां यावा आणि वर्णाश्रमानुकूल स्वराज्यप्राप्तीनें धर्माचारस्वातंत्र्याचा जन्मसिद्ध हक्क कायम राहावा त्यासाठीं सनातनी हिंदूंनीं संघटित होऊन जोमानें प्रयत्न करावा. ह्या कामीं त्यांना क्षेत्रो-क्षेत्रीं नियमानें भरत असलेल्या धार्मिक यात्रांच्या संधीचा उपयोग व्हावा या उद्देशानें श्रीक्षेत्र पंढरपूर येथें आषाढी यात्रेच्या वेळीं श्रीपांडुरंगाच्या चरणाजवळ अखिलभारतवर्णाश्रमस्वराज्यसंघाच्या पंढरपूरशाखेतर्फे सदर परिषद् भरविण्याचें ठरविलें आहे तरी वर्णाश्रमधर्मीय सनातनी हिंदुबांधवांनीं परिषदेसाठीं उपस्थित होण्याची कृपा करावी. परिषद आषाढ शु० १४ ते व० १ शनिवार ते सोमवार शके १८५४ [ता. १६ ते १८ जुलै १९३२ ] पर्यंत होईल. परिषदेमध्यें प्रवेश-पत्रिकेशिवाय प्रवेश मिळणार नाहीं. सन्मान्य पाहुण्यांना प्रवेशपत्रिका मिळ-ण्याची विशेष सोय केली आहे. साहाय्यक व प्रेक्षक ह्यांना कार्यकारी मंडळीच्या इच्छेप्रमाणें प्रवेशपत्रिका मिळतील. अखिल भारतवर्षीय वर्णाश्रमस्वराज्यसंघाचें सभासद असून संघाच्या शाखांनीं व पोषक संस्थानीं निवडलेल्या प्रतिनिधींनाच परिषदेमध्यें मताधिकार राहील. पुढें दिलेले आणि विषयनियामक मंडळांत पसंत होतील ते विषय परिषदेपुढें येतील. १ धर्मस्वातंत्र्य २ स्वधर्मशिक्षण ३ गोसेवा ४ सारडा कायदा ५ बृहन्महाराष्ट्रीय प्रांतिक संघ ६ धर्मप्राण द्रविडांचें स्मारक ७ विधायक व प्रतिबंधनिवारक कार्यक्रम ८ प्रचारकार्य ९ सरकारी, निमसरकारी व बिनसरकारी निवडणुकीचेळची दक्षता १० अस्पृश्यांचा हट्टाग्रह व सरकारी आणि निमसरकारी शाळा, कचेऱ्यादिकांतून सनातनीयांना स्वमतानुरूप वापर कर-ण्यास मोकळीक ११ प्राच्यविद्याविभूषितांना जादा मताधिकार १२ बेळगांव कोर्टांत यश मिळून श्रीमच्छंकराचार्य श्री शिरोळकर स्वामीमहाराज हेच जगद्गुरु

९५/२ १३/५/३२

कायम झाल्याबद्दल संतोष मानणें १३ राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांना राष्ट्रीय सभेच्या कामकाजांत धार्मिक बाबीमध्यें तटस्थता ठेवण्याबद्दल सूचना १४ मुसलमानांच्या दंडेलीचा निषेध १५ श्रीक्षेत्र नाशिक येथील श्रीकाळाराम व श्रीरामकुंड वगैरे पवित्र तीर्थें यांच्या पावित्र्यरक्षणासाठीं झटत आलेल्या नाशीककरप्रभृति सनातनीयांचे आभार १६ स्वकुलव्रतपूर्वक स्वदेशवस्तुप्रचार १७ देवस्थानविषयक कायदे इ०

---

# उपनिषदांतील वेंचे

लेखक—श्रीराम गोसावी, नाशीक.

मुंडकोपनिषत्

## तृतीय मुंडक [ चालू ]

सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा
सम्यग्ज्ञानेन ब्रम्हचर्येण नित्यम् ।
अंतःशरीरे ज्योतिर्मयोहि शुभ्रो
यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः ॥

अनुवादः - ह्या आत्म्याला प्राप्त करून घेण्याची साधनें अशीं आहेतः— आत्मा हा शाश्वत सत्यरूप असल्यानें आयुष्यांतील सर्व व्यवहारांत सत्याशी एकनिष्ठ राहण्यानेंच त्याच्याजवळ जाण्यासारखे होणार आहे. असत्याशीं यत्किंचित् संग ठेवून सत्यआत्म्याच्या उपलब्धीची आशा करणें हें व्यर्थ व बालिशपणाचें आहे. त्याचप्रमाणें त्या आत्म्याची प्राप्ती व्हावी अशी खरी मनीषा असेल तर नित्य अभ्यासरूप तपही हातून घडलें पाहिजे. क्षणभंगुर गृहदारादि संपत्तिजात मिळविण्यास जन्मभर रक्ताचें पाणि करावें व सर्वश्रेष्ठ आत्मलाभासाठीं बौद्धिक पुस्तकी शब्दवाद व दोन घटकांचें संसारसंकटकालीं केलेले भावनात्मक स्मरण पुरेसें मानावें हें फार विपरीत आहे. ह्याच्या प्राप्तीसाठीं शरीरमनाची पद्धतशीर आटणी केली तरच हा प्राप्त होण्याजोगा आहे. या परमात्म्याचें यथार्थ ज्ञान जरूर जरूर करून घ्यावें म्हणजे या मिथ्या मायामय संसाराची भ्रांति आपणास व्यथित करणार नाहीं. त्या आनंदमय अमृताचें योग्य ज्ञान झालें म्हणजे या दुःखालय अशाश्वताच्या संगाविषयीं आसक्ति उत्पन्न होणार नाहीं. अशाप्रकारें सर्व विषयसंग ज्याचा सुटला आहे व शरीराचे सर्व आचार व मनाचे सर्व विचार ज्याचे परब्रम्हस्वरुपीं लागले आहेत असे नित्य यत्नशील पुरुषच त्या

आत्म्याला पाहूं शकतात. शरीरामधील हृदयकमलांतील आकाशांत हा ज्योतिर्मय शुभ्र आत्मा असतो. सत्यानें, तपानें, सम्यक् ज्ञानानें व ब्रम्हचर्यानें ज्यानें आपलें सर्व दोष घालविले आहेत असे नित्य यत्नशील पुरुषच त्याची प्राप्ती करून घेतात.

सत्यमेव जयति नानृतं
सत्येन पन्था विततो देवयानः ।
येनाक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा
यत्र तत्सत्यस्य परमं निधानम् ॥

अनुवादः— सत्यवानाचाच जय होतो. दुसऱ्यांशीं वंचना करणारा, आंत एक आणि बाहेर एक दाखविणारा, लांडयालबाडया करून स्वतांचा स्वार्थ साधूं पाहणारा कधींही जय पावूं शकत नाहीं. सर्व देवयान मार्ग सत्यानेंच विस्तारला आहे. ज्यांच्या सर्व तृष्णा शांत झाल्या आहेत असे ते महापुरुष त्याच सत्याच्या मार्गानें त्या परम निधनाची प्राप्ती करून घेतात. कारण त्या परमधामाचा मार्ग एकच सत्याचा आहे. सत्य एकच सरळ तेथें नेऊन पोंचविते.

यं यं लोकं मनसा संविभाति
विशुद्धसत्वः कामयते यांश्चकामान् ।
तं तं लोकं जयते तांश्च कामान्
तस्मादात्मज्ञं ह्यर्चयेद् भूतिकामः ॥

अनुवादः— सर्व विषयसंगापासून मुक्त झाल्यानें जो निर्मल झाला आहे, व उत्कृष्ट तपानें ब्रम्हचर्यानें व सत्यानें ज्यानें तो परमात्मा प्राप्त करून घेतला आहे, तो ज्या ज्या लोकाला जाण्याची इच्छा करील तो तो लोक त्याला संकल्प-मात्रें करून प्राप्त होईल. जी जी वासना त्याला होईल ती ती फलद्रूप होईल. त्या सर्वात्म्यास ओळखले व त्याची प्राप्ती करून घेतली म्हणजे सर्व प्राप्त करून घेतल्यासारखे होते, म्हणतात तें यासाठींच. तेव्हां ज्याला स्वताचें कल्याण करून घ्यावें, अशी इच्छा आहे त्यानें आत्मज्ञानी मनुष्याचे पाय धरावे, त्याची पूजा करावी, त्याला प्रसन्न करावा. सत्यसंकल्प असलेला तो आत्मज्ञ आपल्या कृपा-मात्रें करून स्वतांचें कल्याण करू शकेल, असा विश्वास ठेवावा.

स वेदैतत्परमं ब्रम्ह धाम
यत्र विश्वं निहितं भाति शुभ्रम् ।
उपासते पुरुषं ये ह्यकामाः
ते शुक्रमेतदतिवर्तन्ति धीरा : ॥

अनुवादः— आपलें कल्याण व्हावें, अशा भूतिकाम मनुष्याची पूजा करावी

कारण तो तें ब्रम्ह जाणतो. तें परब्रम्हच शाश्वत विश्रांतीचें व शांतीचें उत्कृष्ट धाम आहे. सर्व कामांचें व अभिलाषांचें आस्पद तेंच एक आहे. हें समस्त विश्व त्यांतच स्थित आहे--त्यानेंच हें सारें धारण केलें आहे. तें स्वयं ज्योतिःस्वभाव शुभ्र निर्मल आहे. अशा त्या ब्रम्हाला तो आत्मज्ञानी जाणतो म्हणून या असार संसाराच्या सर्व कामना सोडून, या अशाश्वताचे सर्व लोभपाश तोडून जे मुमुक्षु त्या ब्रम्हज्ञाची उपासना करतात, त्यांना भजतात, त्यांची सेवा करतात, ते बुद्धिमान् अनंत दुःखदायी अशा जन्मपरंपरेला कारण होणाऱ्या या शरीरबीजाचें अतिक्रमण करतात, या दैन्यदायी अशा जन्ममरणसंततीचें उल्लंघन करून ज्योतिर्मय शुभ्र परब्रम्हाच्या उत्कृष्ट धामाला जातात.

कामान्यः कामयते मन्यमानः
स कामभिर्जायते तत्र तत्र ।
पर्याप्तकामस्य कृतात्मनस्तु
इहैव सर्वे प्रविलीयन्ति कामाः ॥

अनुवादः— गोष्ट अशी आहे कीं, जो ज्या वस्तूचें चिंतन करतो तो त्या वस्तूकडे जात असतो. विषयभोगाच्या गुणाचें चिंतन करण्यानें ते काम ज्या ठिकाणीं प्राप्त होतात त्या ठिकाणीं मनुष्य कामवेष्टित होऊन ओढला जातो. दृष्ट ऐहिक विषयांचा काम या संसारांत--याच जन्मांत--परिक्रमण करावयास लावतो, व अदृष्ट स्वर्गादि लोकांचा काम अनेक जन्मनिमित्तांस कारण होऊन अनेक जन्ममरणाच्या चक्रांत गोते देतो. तेव्हां जो खरा मुमुक्षु आहे, या शोकमय भवचक्रांतून सुटावें, अशी ज्याची खरी वासना आहे, त्यानें परमात्म्याव्यतिरिक्त कोणत्याही भोगगुणाचें चिंतन करतां कामा नये. संपत्तीनें प्राप्त होणाऱ्या ऐश्वर्याचा काम मनांत असतांना भवबंधमोचक वेदांताच्या गोष्टी करणें खोटेपणाचें आहे. सुंदर ललनांचे सुखमय बाहुपाश मनांत भावून अद्वैत तत्वज्ञानाचा शब्दवाद करणें ही स्ववंचना आहे. आपल्या अहंतागुणाचें स्तोम माजवीत स्वात्मार्पणाच्या गोष्टी शिष्यप्रशिष्यांस सांगणें हा अधःपात आहे. खऱ्या मुमुक्षूनें परमात्म्याचें यथार्थ ज्ञान करून घेऊन या अविद्यारूप संसाराच्या सर्व कामांपासून आपणास दूर करून घ्यावें, तो परमात्मा मिळवावा व पर्याप्तकाम व्हावें. हा सर्व दृश्य प्रपंच मिथ्या असून तो परमात्माच काय तो सत्य आहे--या महान् ज्ञानानें कृतात्मे व्हावे. अशाप्रकारें कृतार्थ झालेल्या साधकाचे सुखदुःखाला कारण होणारे व अनेक जन्ममरणाला निमित्त होणारे काम याच जन्मीं, याच देहांत, विलीन होतात, नाश पावतात; व तो परमात्म्याशीं एकरूप होतो.

सर्वकामाचा त्याग या भवचक्रांतून मुक्त होण्यास प्रत्येक मुमुक्षूला अत्यावश्यक आहे, असें श्रुतिमंत्रांत सांगितलें आहे.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो
न मेधया न बहुना श्रुतेन ।
यमेवैष वृणुते तेन लभ्यः
तस्यैष आत्मा विवृणुते तनूं स्वाम् ॥

अनुवादः—हा आत्मा पुष्कळ शास्त्राध्ययनानें वा त्याच्या प्रवचनानें प्राप्त होण्यासारखा नाहीं. अद्वैतसिध्दी तुम्ही कोळून प्यालेला असा की खंडनखंड---खाद्य अगदीं चावून पचविलेलें असा, त्याचा येथें उपयोग नाहीं. 'ग्रंथ भराभर केले पाठांतर जोंवरी अंतर शुद्ध नाहीं.' ग्रंथार्थ सांगण्यांत आपली धारणाशक्ति जबर असेल तर लोक फारतर तुमच्या अलौकिक मेधेचे कौतुक करतील पण आत्म्याला या गोष्टीचें कौतुक नाहीं. आपलें वाचन दांडगें असेल, श्रवण अफाट असेल तर आपणास विद्वान् म्हणू, व्यासंगी म्हणूं; पण केवळ आपल्या वाचन-श्रवणासाठीं आपण आत्मज्ञ आहां, असें आपणास म्हणतां येणार नाहीं. तेथें आपली एक मुमुक्षाच खरी कारण आहे त्या परमात्म्याला प्राप्त करून घेण्याची आपली तीव्र सद्वासनाच कांहीं तरी उपयोगाप्रत जाणार आहे. आपलें तत्वज्ञा-नाचें अध्ययन कदाचित् बौद्धिक जिज्ञासेचें असेल, अध्ययनानें ती पुरी होईल पण परमात्म्याच्या पदाच्या प्राप्तीची आपण स्वतंत्र इच्छा केली तरच ती त्याच्या पदाप्रत नेणार आहे. आपल्या हृदयांत तो परमात्मा वसत आहे, पण माया मोहानें आपणच त्याला झांकला आहे. संसारविषयवासनांनीं आपणच त्याला शतयोजनें दूर नेल्यासारखा केला आहे. ज्याक्षणीं त्या परमात्म्याची खरी वासना होईल, त्याक्षणीं हा मायामोह दूर सरकेल, विषयवासना गळून पडतील व तो स्वांतरीं झांकलेला परमात्मा प्रगट होईल.

नायमात्मा बलहीनेन लभ्यो
नच प्रमादात्तपसो वाऽप्यलिंगात् ।
एतैरुपायैर्यतते यस्तु विद्वान्
तस्यैष आत्मा विशते ब्रम्हधाम ॥

अनुवादः— बलहीन कमकुवत मनाच्या मनुष्याकडूनही हा आत्मा प्राप्त होण्यासारखा नाहीं. परमात्मप्राप्ती ही ढिल्या हृदयाचीं कामें नव्हत. 'चणे खावे लोखंडाचे । तेव्हां ब्रम्हपदीं नाचें; अशी येथें गोष्ट आहे.'तहाने तहानचि पियावी । भुकेलिया भूकचि खावी । अहोरात्र वारी मरत्वा वारा ॥ शीत वेढावे । उष्ण पांघुरावे । वृष्टीचीया असावे । घरा आंत ॥ किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेश नित्य नवा । भ्रतारावीण करावा । तो हा योगु'—असले येथें प्रसंग आहेत. ढिल्या पावलानें चालून वा रस्ता चुकून हा मुक्काम कधींच गांठला जाणार नाहीं. जेथें

जावयाचें तेथील यथार्थ ज्ञान जरूर पाहिजे, त्यांत थोडा विपरीतपणा आला कीं, रस्ता आणि मुक्काम भलताच पडला म्हणून समजावें. त्याचप्रमाणें, थोडा संसार, थोडा उपभोग, थोडा परमार्थ असल्या बुद्धीचाही येथें कांहीं एक उपयोग नाहीं. परमात्मबुद्धीशिवाय सर्वस्वाचा त्याग येथें सर्वस्वी अभिप्रेत आहे. सारांश जो कोणी विद्वान् बलिष्ठ निश्चयानें युक्त होईल, गृहधनदारादींच्या विषयसंगानें जे प्रमाद होतात ते ती संगबुद्धी टाकूनच परमात्मलाभासाठीं सर्वस्वाच्या त्यागानें सिद्ध होईल व सर्व आयुष्यभर निश्चयानें त्या परमात्म्याच्या नांवानें तपश्चर्या करील त्याचाच आत्मा त्या महान् ब्रम्हधामांत प्रवेश करील.

वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः
संन्यासयोगाद्यतयः शुद्धसत्वाः ।
ते ब्रम्हलोकेषु परान्तकाले
परामृताः परिमुच्यन्ति सर्वे ॥

अनुवादः—वेदान्तज्ञानाचें फल जी परमात्म्याची प्राप्ती तीविषयीं ज्या मुमुक्षूंनीं निश्चय केला असतो, त्या परमात्म्याच्या लाभासाठीं ज्यांनीं सर्वस्वाचा होम करण्याची तयारी करुन, अंतःकरणांत त्या एकाशिवाय कोणचाही भाव मनांत न ठेवल्यामुळें जे शुद्धसत्व झाले असतात व त्याच्या दर्शनासाठीं ज्यांची अहोरात्र खटपट चाललेली असते ते मुमुक्षु देहत्यागाचे वेळीं ब्रम्हलोकामध्यें परम अमृत होऊन राहतात व या सर्व संसारबंधापासून मुक्त होतात. त्या अमृतमय परमात्म्यामध्यें ते एकरूप होऊन जातात.

गताः कलाः पंचदश प्रतिष्ठा
देवाश्च सर्वे प्रतिदेवतासु ।
कर्माणि विज्ञानमयश्च आत्मा
परेऽव्यय सर्व एकीभवंति ॥

अनुवादः—अशा मुमुक्षूच्या प्राणादि पंधरा कला आपल्या प्रतिष्ठेप्रत जातात. आपापल्या तत्वामध्यें लय पावतात. कर्णनेत्रप्रभृति देव आपल्या प्रतिदेवतामध्यें लीन होतात. नेत्रशक्ति ही सूर्यांत लीन होते. शद्बशक्ति आकाशांत लीन होते. येणेंप्रमाणें इंद्रियशक्तींचा निरास होतो. फलभोग घेतलेल्या कर्मांचा भोगानेंच निरास होतो. पण अभुक्त संचित कर्में हीं हीं त्या मुक्तांची नष्ट होतात. आजपर्यंत संसाराची उपाधि देहरूपानें कां होईना धारण करीत असलेला तो आपला शेवटला मायासंगही सोडून देतो त्या परमश्रेष्ठ अविनाशी अशा परमात्म्यामध्यें एकरूप होतो.

यथा नद्यः स्यंदमानाः समुद्रेऽ
स्तं गच्छन्ति नामरूपे विहाय ।
तथाविद्वान्नामरूपाद्विमुक्तः
परात्परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥

अनुवादः --ज्याप्रमाणें वाहणाऱ्या नद्या आपलीं नांवें व रूपें टाकून समुद्रांत नाहींशा होतात; त्याच्याशीं एकरूप होतात; त्याप्रमाणें तो विद्वान् या नामरूपात्मक संसारापासून मुक्त होऊन सर्वश्रेष्ठ अशा दिव्य पुरुषोत्तमाच्या पदाला प्राप्त होतो.

स यो हवै तत्परमं ब्रम्ह वेद
ब्रम्हैव भवति । तरति शोकं । तरति पाप्मानं ।
गुहाग्रंथिभ्यो विमुक्तो ऽ मृतो भवति ॥

अनुवादः—सारांश जो कोणी या परमब्रम्हाला जाणतो तो परब्रम्हस्वरूपच होतो. त्याला पुनः शोक घडत नाहीं. सर्व पापांना तो उल्लंघून जातो. आणि हृदयांतील सर्व वासनाग्रंथींपासून मुक्त होऊन तो अमृत होतो.

मुंडकोपनिषत् समाप्त.

---


# कविवर्य मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन )

ह्या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातु मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरी भारतांतील विशेष गुणः—सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस, शृंगाररस इ. कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचित्रें, कुस्त्यांचीं वर्णनें, त्यांच्या वेळची पाकसिध्दी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. 'मुक्तेश्वर नीतिरत्नमाला' ही शेवटी जोडली आहे. पृ. सं १५४ किं. रु. १

# मारुतिउपासना.

प्रथम मारुतिरायाचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी किं ८४

पत्ताः—मुमुक्षु कचेरी, नाशीक सिटी.

# मराठी वाङ्मयाचा इतिहास—खंड पहिला

## पृ० स० ८३२ ] ज्ञानेश्वरनामदेवांचा काल. [ किंमत रुपये चार

ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए.


प्रास्ताविकः—वेदधर्मीयांची एकरूपता पृ. १ परंपरेच्या ज्ञानाची अवश्यकता ३

१ वेदविद्याः—विषयप्रवेश पृ. ९ ऋग्वेद ११ वैदिकदेवतांच्या प्रार्थना १३ ऋग्वेदांतील अध्यात्मविद्या १९ यजुर्वेद २६ सामवेद २८ अथर्ववेद २९ वेदांगें ३३ वेदोपांगें ३५ उपवेद ३८ सांख्यशास्त्र ३९ पातंजलयोग ४४

२ उपनिषदांतील ब्रह्मविद्या.—दशोपनिषदें पृ. ४७ आत्मविद्या व आत्मविद् ४८ शांडिल्य ५६ आरुणि ५७ दध्यङ् आथर्वण ५९ याज्ञवल्क्य ६१ कठोपनिषद्—नचिकेत व यम यांचा संवाद ६४ सृष्टयुत्पत्तीची काहणी ७४ नीतीचा व साधनमार्गाचा उपदेश ७७ ब्रह्मविद्येचा आनंद ८० उपनिषदांतील कांहीं सूत्रें ८४

३ भगवद्गीताः—स्वधर्मकर्म ८७ मोहनिरास हा गीताशास्त्राचा हेतु ८८ ज्ञानोत्तरभक्ति हें गीतेचें रहस्य ९१ गीता आणि उपनिषदें १०५ गीताभागवतांतील नवविधाभक्ति १०८

४ श्रीमद्भागवतः—गीता आणि भागवत १११ भागवतपुराण ११२ भागवताचा काल ११३ अमेदाची बैठक ११६ भागवतांतील मुख्यविषय ११८ श्रीकृष्णाचा संसार १२३ भक्तीचें स्वरूप १३१ उत्तम भक्त १३४ भगवंताच्या रूपाचें ध्यान १३६ गुणानुवाद व नामसंकीर्तन १४१ संत व सत्संगाची महती १४६ भागवतधर्माची मुख्य तत्वें १४९ गोपींचें भक्तिप्रेम १५५

५ भक्तिमार्गाचें अनादित्व व शिवविष्णुसंप्रदायः—भक्तिमार्गाचें औदार्य १६५ भक्तिमार्ग वेदांत आहे १६६ पंचरात्रमत व भागवतधर्म १६९ शिवविष्णु ह्या देवता वैदिक आहेत १७१ शिवविष्णूंची एकात्मता १७७

६ मधल्या काळाचा थोडा इतिहासः—ब्राह्मण व क्षत्रिय १८१ अवनतीस आरंभ १८४ गौतमबुद्ध व महावीर १८५ वैदिक धर्माचे सिद्धांत १८७ बौद्ध व जैन पंथ १९० मौर्य चंद्रगुप्त १९१ अशोक १९३ अशोकाचे आदेश १९५ पुष्पमित्र व विक्रमादित्य १९९ समुद्रगुप्त, चंद्रगुप्त व गुप्तसाम्राज्य २०१ हूणांच्या टोळधाडी २०५ सम्राट् हर्षवर्धन २०६ सातव्या शतकांतल्या हिंदुसमाजाची स्थिति २०९ काश्मीर, कनोज, धार इ० हिंदु राज्यें २१५ टोळधाडी व त्यांचा प्रतीकार २२२ बुद्धपंथाचें परदेशीं प्रयाण २२३

७ तामीळांचें साम्राज्य, तामीळ संत व तामीळ आचार्यः—
तामीळांची श्रेष्ठ कामगिरी २२७ करिकेल चोल २२९ चोल राजे २३० चोलांची राज्यव्यवस्था २३४ पांड्य, चेर व पल्लव २३६ तामीळांचीं अजस्त्र शिल्पकामें २३८ तामीळ वाङ्मय २३९ बारा अळवार ऊर्फ वैष्णव २४२ नम्माळवार २४७ तिरुज्ञानसंबंदर २५० अप्पर २५४ संबंदर व अप्पर २५६ सुंदरमूर्ति २५८ माणिक्कवासहर २५९ तिरुमुल्लर २६४ प्रेममूर्ति नंद २६५ कुमारीलभट्ट २७४ शंकराचार्य २७६ शंकराचार्यांची कामगिरी २७९ आचार्यांची ग्रंथसंपत्ति २८२ रामानुजपंथाचे आचार्य २८६ शंकराचार्य व रामानुजाचार्य यांचीं मतें २९१ मध्वाचार्य २९५ तीनही आचार्यांचें मतैक्य २९८

## उत्तरार्ध

८ महाराष्ट्रदेश व मराठेः— दण्डकारण्य ३०१ महाराष्ट्राच्या चतुःसीमा ३०५ राष्ट्रकूट व शालिवाहन ३०८ पुलकेशी चालुक्य ३१४ पुन्हा राष्ट्रकूट ३१६ उत्तर चालुक्य ३१९ ठाण्याचे शिलाहार उर्फ शेलार ३२१ छोटीं मराठीं संस्थानें ३२३ देवगिरीचे यादव ३२५ भिल्लम व सिंघण ३२६ विद्या व कला यांना प्रोत्साहन ३२७ कृष्णदेव, महादेव व रामदेवराव ३२९ हेमाद्री व बोपदेव ३३१ पंढरपूरचा कृष्णभक्तिसंप्रदाय ३३५ ज्ञानेश्वरांनीं केलेले रामदेवरावांचें गौरव ३३७ स्वराज्याचें सुख ३३८

९ महाराष्ट्री उर्फ मराठी भाषाः-देशी भाषांचा उगम ३४३ वररुचीचें व्याकरण ३४६ हालाची सप्तशती ३४८ कर्पूरमंजरी ३५२ मराठी भाषा बनत होती, ३५४ मुकुंदराज व मराठी भाषा ३६० महानुभाव व मराठी भाषा ३६३ ज्ञानेश्वरांची मऱ्हाठी-साहित्य आणि शांति ३६७ संस्कृतच्या बरोबरीची मऱ्हाठी ३७० मऱ्हाठी शांतरसाचें घर ३७२ मऱ्हाठी वाङ्मय हें आनंदाचें आवार आहे. ३७५ ग्रंथरचनेचा हेतु व सविनय समाधान ३७७ जुन्या काव्यांच्या प्रती ३८०

१० आदिकवि मुकुंदराजः—कालगणना ३८९ गुरुपरंपरा ३९१ ग्रंथरचना ३९५ विवेकसिंधु ३९६ परमामृत ४०१ वेदांत व राजयोग ४०६ सगुणोपासना ४१०

११ महानुभावपंथाचें मराठी वाङ्मयः—पंथाचे संस्थापक व प्रचारक ४१३ महानुभावपंथाचे आचारविचार ४१६ पंथाविषयीं लोकांत अप्रियता कां? ४२४ सात प्रमुख ग्रंथ ४२६ कवीश्वर भास्कराचा ‘शिशुपालवध’ ४२७ भास्कराचा एकादशस्कंध ४४० भास्करकवीचें कृष्णचरित्रपर गद्यपद्यादि ग्रंथ ४४३ महदंबेचे धवळे ४४६ चक्रधराची दिनचर्या ४५२ केशवराज सूरि ४५५ दामोदर-

पंडिताचें 'वत्सहरण' ४५६ नरेंद्राचें रुक्मिणीस्वयंवर ४६५ ज्ञानप्रबोध ४६६ ऋद्धिपूरवर्णन ४७१ महानुभावपंथ व वारकरीपंथ ४७४

**१२ नाथपरंपरा:**— नाथपरंपरा ४८१ गोरक्षनाथ ४८२ नाथपंथाचीं मतें ४८४ नाथपंथाचा महाराष्ट्राशीं संबंध ४८५ गोरक्षनाथांचें कवित्व ४८८ गहिनी-नाथांचा बोध ४९२ निवृत्तिनाथांचा गुरुपरंपरेचा अभंग ४९३ गुरुपरंपरेविषयीं ज्ञानेश्वरांच्या ओंव्या ४९४

**१३ श्रीज्ञानेश्वरदर्शन:**—कालानुक्रम ४९७ ज्ञानेश्वरांचीं दोन जुनीं चरित्रें ४९९ नामदेवानीं वर्णिलेलें चरित्र ५०१ सत्यामळनाथलिखित ज्ञानेश्वर-चरित्र ५०६ ज्ञानेश्वरांचें आत्मचरित्र ५११ पूर्वील ग्रंथांचे संस्कार ५१७ श्रीगुरु-निवृत्तिनाथ ५२३ ज्ञानेश्वरांची गुरुभक्ति ५२९ कृष्णार्जुनप्रेमप्रसंग ५३६ समकालीन संतांची ज्ञानेश्वरनिष्ठा ५४२ भक्तीचा जिव्हाळा व हृदयाची प्रेमलता ५४५

**१४ भक्त नामदेव (पूर्वार्ध):** - नामदेवांच्या अभंगांची गाथा ५५३ नामदेव ५५५ पंढरीक्षेत्र व विठ्ठलभक्ति ५५८ प्रेमाचा रुसवा ५६५ भक्तीचें प्रेम-सुख ५६७ खऱ्याखोट्याची निवड ५६९ नामदेवांच्या वाणीची गोडी ५७२ पहिला शिष्य परिसाभागवत ५७३ ज्ञानेश्वरनामदेवांच्या तीर्थयात्रा ५७७ गोरा कुंभार ५८२ कच्चा घट ५८४ गुरु विसोबाखेचर ५८५ नामदेवांच्या घरची मंडळी ५८९

**१५ संतमेळा व त्याचें अभंगवाङ्मय:**— प्रास्ताविक ५९५ ओवी व अभंग ५९६ ज्ञानेश्वरीकारांचेच अभंग आहेत. ५९७ 'बाप रखुमादेवीवर' ६०१ ज्ञानेश्वरांची अभंगवाणी ६०२ 'गोपाळेंविण नुद्धरिजे' ६०८ 'आवडे तें करिसी देवा' ६१२ आंधळा, घोंगडी, काऊ ६१३ हरिपाठाचे अभंग ६१७ मुक्ताबाई ६२० ताटीचे अभंग ६२२ मुक्ताबाई व चांगदेव ६२३ जनाबाई ६२६ जनाबाईची प्रेमळवाणी ६३१ मुक्ताबाई व जनाबाई ६३४ सोपानदेव ६३७ सच्चिदानंद बाबा कान्हू पाठक ६३९ सेना न्हावी ६४० नरहरि सोनार ६४३ सावता माळी ६४५ जगमित्र नागा ६४६ जोगा परमानंद ६४८ चोखामेळा ६५१ वैष्णवांचा मेळा ६५७ दहीकाल्याचा प्रसाद ६३८

**१६ ज्ञानेश्वरीचें अंतरंग:** - साहित्याची शोभा ६६१ उपमारूपकादि अलंकारांची गर्दी ६६२ गीतेची थोरवी ३७२ अठरा अध्यायांतील विषय ६७४ ज्ञानेश्वरींत मुख्य पातंजलयोग नाहीं, अध्यात्मयोग आहे. ६७६ जितेंद्रियता ६८० कर्मयोग ६८३ ज्ञानयोग ६८७ ज्ञानाची किंवा दैवीसंपत्तीचीं लक्षणें ६९१ अज्ञा-नाचीं किंवा आसुरीसंपत्तीचीं लक्षणें ६९५ धर्मनष्टांचे आचारविचार ६९७ भक्ति-योग ६९९ अद्वैतभक्तीचें स्वरूप ७०६ परमात्म्याची व्यापकता ७०७ पुरुषोत्तमाची

भक्ति ७१० कर्माची हातवटी ७११ ज्ञानभक्तीची पराकाष्ठा ७१९ खरी शरणागति ७१७ परमरहस्य ७१९ अमृतानुभव ७२४

१७ ज्ञानेश्वरी सृष्टी:—आध्यात्मिक दृष्टि व आधिभौतिक सृष्टि ७३९ राजकीय परिस्थिति ७४० व्यापार व उद्योगधंदे-मोती चौक ७४३ व्यापार व उद्योगधंदे—बाजार पेठा ७४६ शेती व बागाईत ७५० रोग, रोगनिवारण व वैद्य ७५३ नानाप्रकारचे लोक ७५५ लौकिक समजुती ७५८ शास्त्रीय कल्पना ७५९ प्रपंच ब्रह्मरूप आहे. ७६१ पतिपत्नींची एकरूपता ७६२ लग्न व पाहुणे ७६६ भोजनाचे पदार्थ ७६८ पतिव्रता स्त्री ७६९ अपत्यप्रेम ७७० गुरुभक्ति ७७४ तरुणांचे खेळ ७७५ वृक्षवेली ७७६ पशुपक्षी व कृमिकीटक ७७८ सिंह आणि गाय ७८२ शिकार, पारधी व पोपट ७८५ चकोर आणि चातक ७८७ भ्रमर, चक्रवाक, कासवी व बक ७९० इतर कांहीं प्राणी ७९२

१८ भक्त नामदेव ( उत्तरार्ध ):—कीर्तनाचा सुखसोहळा ७९७ पंजाबांतील कामगिरी ७९८ ग्रंथसाहेबांतलीं नामदेवांचीं पद्यें ८०० मेलेली गाय उठवली याबद्दल नामदेवांचें पद्य ८०५ नामदेव व नरसी मेहता ८०९

मिळण्याचा पत्ता:– मुमुक्षु कचेरी, नाशीक सिटी.

---

## श्रीएकनाथचरित्र. [आवृत्ति चवथी]

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचा जन्म व बाळपण ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर. इतक्या प्रकरणांत नाथांचे पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून ' स्तुतिसुमनांजलि ' नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणें दिलीं आहेत. पृ. सं. २८८ किं. ५१२.

केसरी—" महाराष्ट्रीय साधुकवींच्या चरित्रांचे व ग्रंथांचे परिशीलन करून त्यांचें हृद्गत साध्या सोप्या पण वाचकांचे मनावर विलक्षण छाप बसविणाऱ्या भाषेत प्रगट करण्यास ज्या प्रेमळतेची, श्रद्धेची, सहृदतेची व भाषाप्रभुत्वाची जरूरी आहे ते गुण रा. पांगारकर यांचेमध्यें पुष्कळ अंशानें वास करीत असल्यामुळें त्यांची साधुचरित्रमाला महाराष्ट्रांत लोकप्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं. "

# ज्ञानेश्वरीग्रंथतात्पर्य

## अध्याय अठरावा ( पुढें चालू )

चारी वर्णांचीं कर्में सांगितल्यावर ज्ञानेश्वरमहाराज सांगतात कीं प्रत्येकानें स्वकर्मनिरत असावें, आपापल्या वांट्याला आलेलें कर्म करावें, यांतच त्याचें कल्याण आहे. ' स्वे स्वे कर्मण्यभिरतः ' ' यतः प्रवृत्तिर्भूतानां ' ' श्रेयान्स्वधर्मो विगुणः ' ' सहजं कर्म कौंतेय' ह्या चार श्लोकांचा भावार्थ ज्ञानोबारायांनीं फार विशद करून सांगितला आहे. वर्णाश्रमधर्माप्रमाणें जें ज्याचें विहितकर्म ठरतें तें शास्त्रप्रमाणें करण्याची बुद्धि ठेवावीः ' तया स्वभावविहिता कर्मा । शास्त्राचेनि मुखें वीरोत्तमा । प्रवर्तावयालागी प्रमा । अढळ कीजे. ' आपल्याला रत्न घ्याव-याचें असलें कीं रत्नपारख्याला दाखवून त्याच्या पसंतीप्रमाणें आपण घेतों त्याप्र-माणें ज्ञातिवशें सहज आलेलें कर्म शास्त्रानुज्ञेप्रमाणें आपण करावें यांतच आपलें हित आहे. आळस व फळकामना सोडून स्वकर्म मोठ्या आदरानें व उत्साहानें केलें पाहिजे. ओघांत पडलेल्या पाण्याला वेगवेगळे प्रवाह माहित नसतात त्या-प्रमाणें काम्य व निषिद्ध कर्मांच्या आडवळणांस न जातां नित्यनैमित्तिक ह्म० विहित कर्मेंच आपण करावींत व तींही संग व फळाशा सोडून करावींत ह्मणजे एवढ्या-नेंही परमात्मा प्रसन्न होतो. " विहितकर्म पांडवा । आपुला अनन्य ओलावा । आणि हेचि परमसेवा । मज सर्वात्मकाची ॥ अगा जयाचें विहित । तें ईश्वराचें मनोगत । ह्मणोनि केलिया निभ्रांत । सांदडेचि तो ॥ तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा । पूजा केली होय अपारा । तोषालागीं ॥ " स्वधर्मकर्मा-चरणानें परमात्मा प्रसन्न होतो, हीच त्याची पूजा होय, हें ह्या तीन ओंव्यांत फार सुरेख सांगितलें आहे. ह्या स्वकर्मपूजेनें आत्मराज प्रसन्न होतो, त्याच्या प्रसादानें वैराग्यलाभ होतो, वैराग्यानें ज्ञान व ज्ञानानें मोक्ष मिळतो. अशी ही कर्मयोग-परंपरा आहे. कर्मयोगाचें रहस्य हें आहे. कर्म जड आहे. कर्म देहाश्रित आहे. कर्मानें चित्तशुद्धि होतें हें सत्य आहे, पण कर्म परमात्म्याच्या प्रसादाला कारण होईल तरच त्याचा कर्मयोगांत समावेश होईल. नुस्तें पोटाचें कर्म सर्व प्राणी करीतच असतात. देव मालक व आपण त्याचे दास आहोंत, ह्मणून ' स्वामीचिया मनोभावा । न चुकिजे हेचि परमसेवा' आणि स्वामीचा मनोभाव वेदशास्त्र सांग-तात ह्मणून शास्त्रानुसार कर्म करून परमात्मप्रसाद जोडावा हेंच कर्मयोगाचें मथित आहे. आपलें कर्म आचरण्यास कठिण असलें तरी परधर्माचारापेक्षा तें आपल्यास श्रेयस्कर होय. आरोग्य पाहिजे व वैद्यानें कडुलिंब घेण्यास सांगितलें

तरी त्याला कंटाळून कसें चालेल? आपली आई कुब्जा असली तरी तिचें प्रेम तर कुब्ज नाहीं ना? इतर स्त्रिया रंभा असल्या तरी बाळाला त्या काय होत? पाण्या--पेक्षा तूप श्रेष्ठ असलें तरी मासा काय तुपांत वांचेल? विषांतल्या किड्यांना विषांतच जगणें आहे, तो गुळांत मरेल! ह्मणून स्वकर्माचार कठोर वाटला तरी प्रत्येकानें तो आचरण्यांत कर्मबंधापासून सुटण्याचा उपाय आहे. पायाचें काम डोक्याला व डोक्याचें काम पायाला झेपेल काय? तात्पर्य:—

यालागीं कर्म आपुलें। जें जातिस्वभावें असे आलें।
तें करी—तेणें जितिलें। कर्मबंधातें॥ ९३३॥

सर्व कर्मांत दोष आहेतच ह्मणून आपलें सहज कर्म सदोष असलें तरी सोडूं नये. आपला धर्म आपण जागवावा, आपलें काम आपण करावें, यातच आपलें व समाजाचें कल्याण आहे. आपला धर्म सोडून दुसऱ्याचा धर्म घेतला तरी कष्ट चुकत नाहींतच! सरळ रस्त्यानें चालण्यांतही पायाला शीण आहे, शिळा घेतली तरी ओझें, शिदोरी नेतली तरी ओझें-मग शिदोरी घेतल्यानें विश्रांति तरी मिळेल!कण आणि भूंस कांडण्यांत श्रम एकच; हविष्यान्न व श्वानमांस पचविण्यांत श्रम सारखेच; शत्रूशीं लढतांना पाठीवर घाव बसला तरी मरण चुकत नाहीं मग त्याशीं समोरासमोर दोन हात कां न खेळावे? जाराच्या हातचा मार चुकत नाहीं मग नवऱ्याचें घर सोडण्यांत लाभ काय? तात्पर्य स्वधर्म व परधर्म या दोहींच्या आचरण्यांत जर श्रम सारखेच आहेत, तर मग स्वधर्माचार कां ह्मणून सोडावा? विहितकर्मानें विश्रांति आहे, मनःस्वास्थ्य आहे, लौकिक आहे, इहलोक आहे व परलोक आहे, मोक्षमार्ग निश्चित आहे. ह्मणून विवेक करून मनुष्यानें स्वध--र्मनौका सोडून संसारार्णवांत फुकट बुडूं नये. स्वधर्माची दिव्यौषधी सेवन करून भवरोगमुक्त व्हावें. तेणें करून वैराग्यलाभ होईल, सद्गुरु भेटतील, ज्ञान मिळेल व क्रमानें मोक्षपदही गांठता येईल.

[ हिंदुसमाज शतकानुशतकें ह्या शास्त्रसिद्धांताप्रमाणें वागत आला आहे. पाश्चात्य राष्ट्रांत समाजाची घडी नीट बसली नाहीं यामुळें त्यांच्या समाजाला त्रैलोक्याची संपत्ति हातांत असूनही मनःस्वास्थ्य मिळत नाहीं! खून, मारामाऱ्या, बांबगोळे, विमानें, सममराईन्स, व विषारी गॅसेस् ह्या आसुरी संपत्तीनें ते लोक वेढले आहेत. आंत एक बाहेर एक अशी त्यांची राजनीति आहे. तोंडानें शांत-तेच्या गोष्टी सांगत असून आंतून प्रत्येक राष्ट्र प्राणनाशक शस्त्रास्त्रें सज्ज करीत आहे. त्यांचीं कर्मफळें ते भोगतीलच, पण त्यांचें राजैश्वर्य, संपत्ती, व्यापार या मोहजालाला भुलून आमचे लोक एकंकार करूं पाहत आहेत! त्यानीं डोळे उघडून

आपल्या वर्णाश्रमधर्माला जागावें, आमची समाजघटना प्राचीन ऋषिमुनींनीं निर्भयपणें व निर्लोभपणें किती सात्विक पायावर सर्वांच्या हितार्थ उभारली आहे हें जाणावे यांतच सर्वांचें हित आहे. जातिद्वेषानें सारेंच राष्ट्र मरेल, पण सर्वांनाच वरील सिद्धांताप्रमाणें सुखासमाधानानें नांदतां येईल. ]

# त्रिखंड्या सिंहस्थ

यंदाच्या सिंहस्थाचे तीन खंड पडले आहेत.

( १ ) शके १८५३ आश्विन वद्य ११ ते पौष शुद्ध १३ पर्यंत. (ता० ६।११।३१ ते २१ जानेवारी १९३२ अखेर ) हा खंड.७२ दिवसांचा होता. हा संपून गेला आहे.

( २ ) दुसरा खंड सांप्रत चालू आहे. याचा आरंभ जेष्ठ वद्य ७ शके १८५४ (ता० २५ जून १९३२) हा असून शेवट मार्गशीर्ष शुद्ध १ (ता० २८ नोव्हेंबर १९३२ ) हा आहे.

( ३ ) तिसऱ्या खंडाचा प्रारंभ फाल्गुन शुद्ध ४ (ता० २८।२।३३ ) या दिवशीं होणार असून समाप्ती आषाढ वद्य ३० (ता० २८ जुलई १९३२ ) या दिवशीं होणार आहे.

हिंदुस्थानांत गोसावी व बैरागी यांची संख्या ५६ लक्षांवर आहे असें ह्मणतात! यांचे मेळे सिंह व कुंभ राशीवर गुरु आला असतांना भरतात. या मेळयांचीं मुख्य स्थानें हरिद्वार, प्रयाग, उज्जयिनी व नाशीक हीं होत. तीन तीन वर्षांच्या अंतरानें हे मेळे भरत असतात. चालु सिंहस्थांत ते नाशीक येथें भरत आहेत! ह्या मेळयांबरोबर इतर लोकही पुष्कळ येतात. ‘ आलीं सिंहस्थ पर्वणी। न्हाव्या भटा झाली धणी ’ हा उद्गार तुकोबांच्या तोंडून आला आहे तो अशाच एका प्रसंगीं ते नाशीक अगर त्र्यंबक येथें आले असतांना आला असावा! घर-- मालक, न्हावी, भट, कासार, गाडीवाले या सर्वांचीच सिंहस्थामुळें चंगळ उडते, पण सर्वांत अधिक चंगळ रेल्वेखात्याची उडत असली पाहिजे! पहिल्या खंडांत येथील म्युनसिपालटीचें व रेल्वेचें उत्पन्न बुडालें, ह्मणून तर सरकारनें मागील महिन्यांत रामकुंडावरचा स्पृश्य हिंदु व महार यांच्यांतला तंटा स्पृश्यांतर्फे निकाल देऊन तोडला असावा! कदाचित् सिंहस्थाचें रेल्वेचें उत्पन्न पदरांत पड-- ल्यावर एकवर्षानंतर सरकारला पुन्हा महारांचा कळवळा येईल, नाहीं कोणी ह्मणावे! सरकारची द्रव्यदृष्टी जबर आहे हें प्रसिद्धच आहे! सिंहस्थांत लाखो रुपयांचें उत्पन्न रेल्वेला होईल! न्हाव्याभटांची चांदरात झडेल ती त्यापुढे रुपयांत

आणा दोन आणे ! असो. एरवीच क्षेत्रांच्या ठिकाणीं क्वचित् खरे साधुसंत आढळतात, अशा महापर्वांच्या प्रसंगीं तर ते अधिक आढळण्याचा संभव असतो पर्वांच्या निमित्तानें बायकामुलांसह लोकांनाही बाहेरची हवा मिळते, भाविक सज्जनांचा समागम घडतो, सात्विकबुद्धी उदय पावते, व एकंदर अशा पर्वप्रसंगीं लोकांच्या भक्तिभावाची कमान थोडी तरी चढते यांत शंका नाहीं.

# पंचवटींत राम !

१

श्रीतुलसीरामायण वाचीत असतां त्यांत एकेक अत्यंत बहारीचें शब्द आढळून परमसमाधान वाटतें. सदर रामकथा ह्मणजे अमृतरसनिस्यंदिनी आहे. मराठी भाषेंत ज्ञानेश्वरी आणि हिंदी भाषेंत तुलसीरामायण हे दोनी ग्रंथ सारखेच भक्तिप्रेमप्रचुर आहेत. दोन्ही ग्रंथांचे सिद्धांत एक, अनुभव एक, माधुरी एक, भाषासौष्ठव एक व अंतरंग एक; असे विश्वाच्या वाङ्मयाचे ललामभूत हे ग्रंथ आहेत. असो. राम वनवासास निघाले असतां अत्रि, शरभंग, सुतीक्ष्ण यांच्या भेटी घेत घेत अगस्तीच्या आश्रमांत आले. उभयतांची प्रेमळ भाषणें झालीं. अगस्ती ह्मणालेः—“ औदुंबर वृक्षाप्रमाणें आपली माया विशाल असून अनंत ब्रह्मांडें हीं त्याला लगटलेलीं फळें आहेत. चराचर सृष्टींतले असंख्य जीव हे जंतु-समान असून ते त्या फळांत राहतात व परस्परांस ओळखीत नाहींत व रामा ! तुलाही जाणत नाहींत ! हे कृपानिधाना ! सीतालक्ष्मणांसह आपण माझें हृदयांत अखंड वास करून मला निश्चल भक्ति, वैराग्य, सत्संग व आपल्या चरणकमलाचे ठायीं अढळ प्रीति हेंच वरप्रदान द्यावें.

जद्यपि ब्रह्म अखंड अनंता
अनुभवगम्य भजहि देहिं संता ।
अस तव रूप बखानउँ जानहुँ
फिरिफिरि सगुन ब्रह्मरति मानऊँ ॥

आपण सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप अखंड व अनंत आहांत असें-अनुभवानें ज्यांनीं जाणलें आहे ते--संत सांगत असतात, तरी रामा ! आपल्या सगुण ब्रह्मरूपाच्याच ठायीं वारंवार प्रेम उत्पन्न होऊन आपल्या रूपगुणांचेंच गायन करण्याची मला आवड आहे ! आतां आपण कोठें वास्तव्य करावें हें मला मोठेपणा देऊन विचारतां ह्मणून मी आपणांस सांगतोंः—

है प्रभु परम मनोहर ठाऊँ
पावन पंचबटी तेहि नाऊँ ।

हे प्रभो ! पंचवटीनामक परमणीय आणि पवित्र स्थान आहे, तें दण्डकवनांत गोदावरीतीरीं आहे तेथें राहून तें स्थान आपण पूनीत करावें. हें ऐकून 'गोदावरीनिकट प्रभु रहे परनगृह छाई'—प्रभु गोदावरीनिकट पर्णशाळा बांधून राहिले. पंचवटीस रामानें वास केल्यापासून मुनि संकटमुक्त होऊन सुखी झाले.

गिरि बन नदी ताल छवि छाये
दिन दिन प्रति अति होहि सुहाये ।
खग मृगवृंद अनंदित रहही
मधुप मधुर गुंजत छवि लहही ।

पर्वत, वनें, नद्या, तळीं यांच्यावरही उत्तम कळा येऊन तीं दिवसेदिवस अधिक मनोहर दिसूं लागलीं. पशुपक्ष्यांचे समुदाय आनंदानें राहूं लागले. भ्रमर मधुर गुंजारव करीत फार मनोहर दिसत.

२

श्रीएकनाथमहाराजांनीं पंचवटी प्रत्यक्ष पाहिलेली, त्यांचा पहिला ग्रंथ 'चतुःश्लोकी भागवत' हा गुरुसंन्निध पंचवटींत झालेला, तेव्हां त्यांचें पंचवटीचें वर्णन (शके १५१० ह्म० इ० स० १५७८) प्रत्यक्षाला अधिक धरून आहे.

गंगातीराचे निकटीं । अति पावन पंचवटी ।
तेथें बांधोनि पर्णकुटी । अतिसंतुष्टी वसावें ॥

हें अगस्तिऋषींनीं सांगितल्यावर सीतालक्ष्मणासह प्रभु रामचंद्र पंचवटींत आले.

रम्य रमणीय गंगातटीं । पंचक्रोश पंचवटी ।
उल्हास तिघांच्या पोटीं । उठाउटी निघाली ॥
अरुणावारुणासंगमप्राप्ती । मीनली प्राची सरस्वती ।
तीर्थ पावन त्रिजगती । आवडे वस्ती श्रीरामा ॥
सुंदर आणि कपाळेश्वर । दोहीं तीरीं मनोहर ।
तीर्थें पावन परिकर । श्रीरामचंद्र रहिवास ॥

पंचवटी अरण्यांत असे-तिच्या तुलनेनें नाशकांत मनुष्यांची वस्ती असल्यामुळें नाशकास 'जनस्थान ह्मणत. दोन्ही स्थानांच्या मध्यें गोदावरी वाहत आहे. पंचवटींत श्रीरामांची वस्ती झाली. त्या जागीं आतां जें राममंदिर आहे तें १५० वर्षांपूर्वीं ओढेकर जहागीरदारांनीं बांधलें आहे. नाथांच्या पूर्वींपासून अरुणा, वरुणा व सरस्वती ह्या गोदावरीस मिळालेल्या तीन नद्या व सुंदरनारायण व कपालेश्वर हीं देवस्थानें प्रसिद्ध आहेत असें नाथांच्या वर्णनावरून स्पष्ट दिसत आहे. नाथांस ३५० वर्षें झालीं.

नाथांनीं पुढें आणखी वर्णन केलें आहेः—
पंचवटी गंगातटीं । श्रीराम सुखावे देखोनि दृष्टी ।
सुखावली सीता गोरटी । आल्हाद पोटीं सौमित्रा ॥
श्रीरामा देखोनि आल्हादें । कोकिळा कूजती पंचमशब्दें ।
घुमरी घुमघुमती स्वानंदें । सुखानुवाद अतिमधुर ॥
श्रीरामा तूं तूं सीता तूं तूं । धन्य धन्य सुमित्रा तूं तूं ।
ऐसें कपोत कूजतू । पुण्यपुरुषार्थी ये वनी ॥
मयूर आनंदें नाचत । शुक पिंगळे अनुवादत ।
ये वनीं बैसल्या श्रीरघुनाथ । पुण्यपुरुषार्थ पावेल ॥

पंचवटींत श्रीरामाच्या अनुज्ञेनें लक्ष्मणानें एक सुंदर पर्णशाळा बांधली, व तेथें त्रिवर्ग राहिले.

रामरायाच्या निवासामुळें पंचवटीक्षेत्रास सर्व भरतखंडांत मान्यता मिळाली.

---

# मध्वमुनींचें जातें !

संसारचक्र जातें । जड याला वोढूं जाते ॥
वोढितां वोढवेना । जडकाविलें आपुल्या हातें ॥१॥
कर्माकर्म दळूनियां । आपुल्या आपण खातें ॥
खावुनी तृप्ती नोहे । टकमकां पहातें ॥२॥
प्रवृत्तीही खालील तळीं । निवृत्ती तें वरील ब़ळी ॥
अष्टादश वर्ण धान्य । आपल्या भारानें दळी ॥३॥
दळूनियां पीठ केलें । काळ बैल तेही गिळी ॥
ऐसे हें दुष्ट जातें । बहुतां जनाला छळी ॥४॥
अहंतेचा खुंटा गाढा । याला धरील तेंचि द्वाड ॥
ब्रम्हादिकीं धरूं जातां । त्यावरी पडली देवधाड ॥५॥
आतां मी काय करूं । इतरांचा कोण पाड ॥
ममतेचा चिकटा धरी । त्याची न धरावी चाड ॥६॥
दळणाचें दुःख भारी । ऐसें जाणुनि संसारीं ॥
शरण गेल्या देवराया । मध्वनाथाचा कैवारी ॥७॥
जीवन्मुक्त अन्नछत्रीं । जेऊन बसल्या पोटभरी ॥
सच्चिदानंदबोधें । मग्न झालें निराकारीं ॥८॥

# उत्कृष्ट उतारे.

## १ अर्वाचीन काव्यांत प्रतिभा कां नाहीं?

" महाकाव्यनिर्मितिसमर्थ प्रतिभा असल्यावर ती कोणत्याहि परिस्थितींत तसलें काव्य लिहील हें जरी खरें असले, व तिच्या अभावीं कोणत्याहि परिस्थितींत उत्तम महाकाव्य उत्पन्न होणार नाहीं हें जरी खरें असलें, (लांबलचक व भुरळ घालणारी भाषा टाकून बोलायचें म्हणजे महाकाव्यें कशीं उत्पन्न होतात व कां होतात किंवा होत नाहींत हें जरी सांगतां येत नसलें!) तात्पर्य, प्रतिभेची निर्मिति कशी होते हें गूढ व दुर्ज्ञेय असलें, तरी सद्यःकालीन सुसंगत समाजाची मनःस्थिति अलीकडे कशी झाली आहे याचें दिग्दर्शन करून अलीकडे महाकाव्यें निर्माण करण्यास समर्थ असलेली प्रतिभा कां दिसत नाहीं याचें एक कारण सुज्ञांच्या विचाराकरितां सुचवितां येईल. अलीकडे बाह्य परिस्थितीमध्यें सापेक्षतः स्थिरता व निश्चितता आली आहे, पण अंतःसृष्टि ढांसळत चालली आहे, आणि अतिशयोक्ति करून बोलायचें म्हणजे तेथें बेबंदशाही किंवा अराजकता माजूं पाहाते आहे. जगाचा आपणाला अर्थ कळेनासा झाला आहे. अज्ञात लिपींत लिहिलेल्या सुप्रसिद्ध काव्याप्रमाणें जग हें आपणांस एका अर्थीं सार्थ व रम्य असावेंसें वाटतें, पण हा अर्थ व तें रम्यत्व हीं अनुभवाला तर पटत नाहींत, तेव्हां या विश्वात्मक ग्रंथाकडे आपण केवळ साश्चर्य व कुतूहलयुक्त दृष्टीनें पाहातों पण त्यापासून समाधान, उत्साह, प्रसन्नता, स्फूर्ति यांचा लाभ मिळत नाहीं. His Masters Voice ('धन्याचा आवाज') या नांवाच्या फोनोग्राफच्या जाहिरातींत एक कुत्रा दाखवितात, त्याला आपल्या धन्याचा आवाज तर ओळखतो, पण तो कोठून कसा येतो हें त्याला समजत नाहीं, व खरोखरचा धनी बोलतो आहे कीं हा भ्रम आहे असा त्याला प्रश्न पडलेला दिसतो, त्याप्रमाणेंच आपली स्थिति झाली आहे. म्हणजे जगाकडे पाहून व त्यांतील 'ध्वनि' ऐकून आपल्या धन्याचा आवाज आपणाला ओळखीच्यासारखा तर वाटतो, पण निश्चय मात्र कांहीं एक करवत नाहीं, अशी आपली स्थिति झाली आहे!

" अलीकडे धर्माच्या बाबतींत काय किंवा राजकीय व इतर बाबतींत काय, मतामतांचा गलबला आहे; सर्व कल्पना संशयास्पद झाल्या आहेत, कोणतीहि अशी नाहीं कीं तिला जोराचा धक्का मिळालेला नाहीं. अशा मनःस्थितींत कशाचा विशेष राग-लोभ नसतो, कशाबद्दल विशेष अगत्य किंवा उत्साह वाटत

नाहीं. परंपरेचे संस्कार टिकले आहेत, पण ते पुसट होत चालले आहेत. नवीन संस्कार कोणते करावयाचे हेंच निश्चित नसल्यामुळें कोणालाहि त्यांचें अगत्य नाहीं. थोडक्यांत सांगायचें म्हणजे अलीकडच्या शास्त्रीययुगांत बाह्य परिस्थिती–मध्यें सापेक्षतः स्थिरता, पण अंतःसृष्टीमध्यें अस्थिरता व अराजकता उत्पन्न झाली आहे. अशा मनःस्थितींत कोणत्याहि क्षेत्रांत मोठा पराक्रम कसा होणार ?

"सध्या आपणाला लहान लहान कर्तव्यें, लहान लहान प्रश्न, लहान लहान सौंदर्यें दिसतात, पण विश्वव्यापक कर्तव्यें, समुद्रगंभीर प्रश्न व विराटस्व–रूपी सौंदर्यें कल्पनेलाहि अगम्य झालीं आहेत; कारण धर्मावरचीच नव्हे तर नीतीवरची श्रद्धा उडालेली आहे, आधिभौतिक शास्त्रावरची उडालेली आहे, आणि सौंदर्यविषयक औचित्यांवरचीहि उडालेली आहे. पूर्वींच्या श्रद्धा, निष्ठा, भावना, कल्पना पार गेल्या असें म्हणण्यांत अतिशयोक्ति असेल; पण त्या जात चालल्या आहेत यांत काडीमात्र कांहीं खोटें नाहीं. ज्या भाव—भावनांच्या व विचार—विकारांच्या प्रेरणांनीं रामायणांतील व महाभारतांतील व्यक्तींना त्या त्या प्रसंगीं तें तें मानण्यास व बोलण्यास व करण्यास लावलें, त्या भाव-भावना व विचार—विकार आतां जीर्ण होत चालले आहेत.

सध्यांच्या काळीं आपली अशी मनःस्थिति झाली आहे कीं, आपली कशा-वर विशेष उत्कट श्रद्धा नाहीं; निष्ठा नाहीं. नित्यत्वानें किंवा निश्चयानें आदरणीय किंवा पूज्य असें कांहीं राहिलें नाहीं; भूतकाळावर श्रद्धा नाहीं; भविष्यकाळावर विश्वास नाहीं; वर्तमानकाळांत समाधान नाहीं; निश्चित सिद्धान्त नाहींत; निश्चित आकांक्षा व ध्येयें नाहींत; निश्चित स्नेह वगैरे नाहीं; निश्चयानें मनें आनंदविणारीं किंवा दुखविणारीं स्थळें किंवा कारणें नाहींत; निश्चयानें स्वांना जोडणारीं किंवा तोडणारीं सत्कर्में किंवा दुष्कर्में नाहींत; तर सर्वत्र अनिश्चय, संशय, ढिलेपणा, गुळमुळीतपणा व चालढकलपणा दिसत आहे !

"ज्या सुशिक्षित वर्गांतून महाकाव्यें निर्माण करणारे व वाचणारे निघाव–याचे त्या वर्गांतील बहुतेकांना वरील वर्णन कमी अधिक मानानें लागू पडेल असें वाटतें. हें जर खरें असेल, ज्या उच्च, व्यापक, सोत्साह व आत्मप्रत्ययपूर्ण वृत्तीनें व दृष्टीनें पाहिल्याशिवाय महाकाव्याची निष्पत्ति होऊं शकत नाहीं, ती दृष्टि अलीकडे फारशी दिसत नाहीं हें जर मान्य असेल—तर महाकाव्याच्या निर्मि–तीचे प्रयत्न कां होत नाहींत व झाल्यास ते यशस्वी कां होत नाहींत हें थोडेंसें कळेल.

प्रो० वामन मल्हार जोशी, एम्. ए.

## २ मूर्तिपूजा वेदांत आहे.

१— कासीत्प्रमा प्रतिमा किं निदानमाज्यं किमासीत्परिधिः क आसीत्। छन्दः किमासीत्प्रउगं किमुक्थं यद्देवा देवमयजन्त विश्वे ॥

ऋ० अ० ८।७।१८।३

२—संवत्सरस्य प्रतिमां यां त्वा रात्र्युपासते। प्रजाँ सुवीरां कृत्वा विश्वमायुर्व्यश्नवत् ॥

कृष्णयजुर्वेद अ० ५।७।२.

३—मा असि। प्रमा असि प्रतिमा असि ॥

तैत्तिरीय आरण्यक प्र. ४ अ. ५

४— न तस्य प्रतिमास्ति यस्य नाम महद्यशः। हिरण्यगर्भ इत्येषः मामाहिँ सीदित्येषा यस्मान्न जात इत्येषः ॥

शुक्लयजुर्वेद अ. ३२ मं. ३

५—'यदा देवतायतनानि कम्पन्ते दैवतप्रतिमा हसन्ति रुदन्तिःच साम गायेत' सामवेद ब्रा. १६.

(सामांचें गायन करीत असतां देवळें डोलूं लागलीं मूर्ति हसूं व रडूं लागल्या.)

आपण आतां वरील वचनांचा विचार करूं. 'कासीत्प्रमा०' ह्या मंत्रामध्यें देवांनीं ज्यावेळीं यज्ञ केला, त्यावेळीं इतर जगत् उत्पन्न झालेलें नसल्या कारणानें यागाला लागणारे पदार्थ कोणकोणचे होते? असा प्रश्न केला आहे. त्यांतच प्रतिमा देवता—कोणची होती, असा प्रश्न केला आहे. 'मीयते—निर्मीयते इति प्रतिमा'—'जी निर्माण केली जाते ती प्रतिमा' असा सायणाचार्यांनीं प्रतिमाशब्दाचा अर्थ केला आहे. तात्पर्य, ती देवता अन्तश्चक्षूंसमोर निर्माण केली जावो, अगर चर्मचक्षूंसमोर जडदृश्यरूपानें निर्माण केली जावो, साकारपदार्थांचें ध्यान करण्यास वेदांत सांगितलें आहे, ही गोष्ट यावरून निर्विवाद सिद्ध होते, 'संवत्सरस्य०' या मंत्रांत संवत्सराचा, रात्र हा प्रतिनिधि म्हणून सांगितला आहे व व ती रात्र देखील एका विटेच्या रूपानें होती. सारांश, व्यापक व अमूर्त संवत्सररूप कालाचा, अव्यापक व अमूर्त रात्रिरूप काल प्रतिनिधि सांगितला व तोहि अमूर्त असल्याकारणानें उपासनासौकर्यार्थ एका साकार विटेच्या रूपानें सांगितला, त्यावरून साकार पदार्थांची उपासना वेदांत सांगितली आहे, ही गोष्ट सिद्ध होते. 'मा असि०' या प्रकरणांतील प्रतिमाशब्द परिधीला उद्देशून आहे, पण त्याचा अर्थ परिच्छेद करण्यास समर्थ असा असल्याकारणानें त्याचा विचार येथें कर्तव्य नाहीं,

' न तस्य० ' ह्या मंत्राचा दयानंदसरस्वतींनीं 'सत्यार्थप्रकाश ' ह्या पुस्तकांत ' परमेश्वराची प्रतिमा—मूर्ति नाहीं ' असा अर्थ करून लोकांच्या डोळयांत धूळफेंक केली आहे.

उवटाचार्य व महीधराचार्य या दोन्ही आचार्यांनीं त्या मंत्रांतील प्रतिमाशब्दाचा अर्थ ' प्रतिमानभूतं वस्तु ' असा केला आहे, तोच सर्वथैव योग्य आहे. कारण त्याचें नांव व कीर्ति फार मोठी अद्वितीय आहे' असा आहे. जी वस्तु सद्वितीय असते तिलाच उपमा देतां येते. याविषयीं व्यावहारिक दृष्टान्त असा— एखाद्या रागीट मनुष्याला जमदग्नीची उपमा देण्यांत येते व जन्मदग्नीला साक्षात् अग्नीची उपमा पुराणांत दिली आहे. वास्तव 'त्याचा नांवलौकिक अद्वितीय आहे म्हणून त्याला कोणाचीहि उपमा देतां येत नाहीं ' हा कार्य–कारणभाव जसा जुळतो तसा ' त्याचा नांवलौकीक अद्वितीय आहे म्हणून त्याची प्रतिमा—मूर्ति नाहीं ' हा जुळत नाहीं. कारण गम्य वस्तु अद्वितीय असून देखील अज्ञानी लोकांना तिची उपासना करितां यावी म्हणून श्रुतींनीं ठिकठिकाणीं मुद्दाम प्रतीकोपासनांचें प्रतिपादन केलें आहे. सारांश—' न तस्य प्रतिमा अस्ति० ' या वाक्याचा दयानंदजींनीं अर्थविपर्यास केल्यामुळें ' वाक्याभासान्स्वस्वपक्षे योजयन्त्यप्यलज्जया ' ही विद्यारण्यांची शालजोडी दयानंदजीस अर्पण करून पुढें जाऊं.

याशिवाय मूर्तिपूजेचें द्योतक असे अनेक मंत्र वेदांमध्यें आहेत. ' हिरण्ययेन सविता रथेन देवो याति भुवनानि पश्यन् ' ऋ. अ. १।३।६ ( हा देदीप्यमान सविता सोन्याच्या रथामध्यें बसून, सकल भुवनांचें अवलोकन करीत येत आहे. ) 'नमो हिरण्यबाहवे० ' कृ. य. सं. ४।५।२ ( ज्याचे बाहू सोन्याचे आहेत, अशा परमेश्वराला नमस्कार असो. ) ' मन उष्णीषिणे० ' कृ. य. सं. ४।५।२ ( किरीट घातलेल्या परमेश्वराला नमस्कार असो. ) इत्यादि ठिकाणीं, रथ, डोळे, हात, मस्तक, इत्यादि अवयवांची कल्पना करण्यास वेदच सांगत आहे. हेहि मंत्र मूर्तिपूजानिषेधकांनीं दीर्घ डोळयांनीं अवश्य पहावे, अशी त्यांस विनंति आहे.

( ३ ) तसेंच उपनिषदांत ठिकठिकाणीं ' आदित्यो ब्रह्मेत्यादेश ' आदित्य ब्रह्म आहे, असा उपदेश आहे. ( सु. उ. सं. पृ. ३६९ ) ' नामैवैतन्नामोपास्व '— हें वर्तमान आहे. या नामाची ब्रह्म बुद्धीनें उपासना कर. (सु. उ. सं. पृ. १२०) इत्यादि वाक्यांनीं आदित्य, नाम, ओंकार, इत्यादि प्रतीकें घेऊन ज्या ब्रह्मोपासना सांगितल्या आहेत, त्या सर्व सगुणोपासनाच होत, साकार व सावयव मूर्तीच्या उपासनेपेक्षां साकार पण निरवयव प्रतीकोपासना श्रेष्ठ आहेत, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे. पण ज्यांना साकार, पण निरवय व प्रतीकोपासना करण्याची योग्यता प्राप्त झाली नसेल त्यांनीं मात्र सावयव अशा मूर्तींचाच अवलंब केला पाहिजे.

४ 'मृदं गां दैवतं विप्रं घृतं मधु चतुष्पथम्। प्रदक्षिणानि कुर्वीत विज्ञातांश्च वनस्पतीन्' व 'पूर्वाह्न एव कुर्वीत देवतानां च पूजनम्' (मनु. ४।३९ व १५२) याठिकाणीं दैवत व देवता या शब्दांनीं सावयव मूर्ति घ्यावयाची नाहीं, तर काय घ्यावयाचें!

सारांश—सर्व वेदांमध्यें मूर्तिपूजेचें द्योतक अनेक मंत्र असल्याकारणानें व उपनिषदांत आणि स्मृतींत साक्षात् मूर्तिपूजाविधायक वाक्यें असल्याकारणानें सुद्धां मूर्तिपूजाविधायक मंत्र असावेत, असें अव्यभिचारी अनुमान होतें. एवंच मूर्तिपूजा वेदप्रतिपाद्य आहे, ही गोष्ट निःसंशय सिद्ध आहे. ह्मणून 'वेद मान्य आहेत पण मूर्तिपूजा मान्य नाहीं' असें म्हणणाऱ्या समाजिष्टांची—'सर्व गीता मान्य आहे, पण 'यज्ञाद्भवति पर्जन्यः' हा चरण मात्र मान्य नाहीं' किंवा 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' हें पटतें; पण 'ध्रुवं जन्म मृतस्य च' हें पटत नाहीं, असें म्हणणाऱ्या आधुनिकांप्रमाणें कींव करावीशी वाटते.

—आचार्य—

# गृहिणी.

गृहिणी म्हणजे गृहलक्ष्मी-गृहाची स्वामिनी--गृहांत वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सुखशांतीचा लाभ करून देणारी गृहदेवता अर्थात गृहाची अंतर्व्यवस्था उत्तम प्रकारें ठेवणाऱ्या गृहलक्ष्मीलाच (Home mistress) गृहिणी हें थोर पद यथार्थ शोभेल. आपल्या शिरोधार्य वैदिक धर्म-संस्कृतीप्रमाणें आर्य भगिनींना हक्कानें प्राप्त झालेला गृहिणीपदाचा हा थोर अधिकार माझ्या ज्या भारत भगिनींना योग्य प्रकारें चालवितां येत नसेल आणि त्यामुळें गृहांत सुख—शांतीच्या अभावीं जर कलहाग्नि भडकत असेल तर अशा भगिनींना गृहिणी या थोर नामाभिधानानें न संबोधितां ग्रहिणी म्हणजे शनी, राहु, केतु, इत्यादि ताप--दायक ग्रहांच्या बहिणी हेंच पद शोभेल! गृहकुंडलीबाहेरचे व्यवसाय पुरुषानें सांभाळून जें कांहीं मिळेल तें गृहांत आणून टाकावें आणि अंतर्गृहांतील सर्व कारभार गृहिणीनें योग्य प्रकारें करून संसार आणि परमार्थ साधनार्थ गृहस्थाला योग्यप्रकारें शक्य तितकी मदत करावी ही आपल्या आर्य--पूर्वजांची प्रशंसनीय परंपरा हजारों वर्षांपासून चालत आलेली आहे. म्हणूनच आर्यस्त्रियांना पतीची अर्धांगी मानण्याची व पत्नी म्हणण्याची प्रथा पडलेली आहे. अर्धनारी नटेश्वराची भोळ्या शंकराची मूर्ति याच गोष्टीचीं सप्रमाण साक्ष देत आहे. अहिल्या, द्रौपदी, सीता, सावित्री, दमयंती, रुक्मिणी इत्यादि प्रातःस्मरणीय आर्यमहिलांचीं अनुकरणीय पवित्र चरित्रें याच अखंड सत्याची मूर्तिमंत साक्ष पटवीत आहेत.

सच्छील माता: --वरील प्रकारचा गृहिणी पदाचा थोर अधिकार संपादन करण्यास, तशा गृहशिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. विवाह होईपर्यंतचा मुलींचा बाल्यावस्थेचा सर्व काल मातृ--सान्निध्यांत जात असतो. अर्थातच गृहिणी-पदाचें बीजारोपण आणि त्याच्या नाजुक अंकुराचें संगोपन व संवर्धन करण्याची मुख्य जबाबदारी मातेवरच येते.

खाण तशी माती आणि माता तशी संतती ॥

ही साक्षी पण अक्षरशः खरी म्हण सर्वांस माहितच आहे. वधुपरीक्षा करतांना मुलीच्या शीलाला म्हणजे मातृ--पितृ -कुल--परंपरेला अग्रेसरत्वाचा मान देण्याची रूढी आहे. त्याचें मुख्य कारण हेंच. वधूनें पुस्तकी ज्ञान कितीही संपादन केलेलें असलें तरी तिच्या अंगीं स्त्रियांना भूषविणारी शीलसंपन्नता ( character ) जर नसेल तर अशा शीलहीन शिक्षित वधू पासून इष्ट फल प्राप्तीची इच्छा पूर्ण होण्याची आशा कमीच.

पाकशास्त्रः—विद्या मंदिरांत उच्च प्रकारचें शिक्षण घेऊन भाराभर परिक्षा पास झालेल्या माझ्या पुष्कळ आंग्लविद्याविभूषित आर्य भगिनींना गृहिणीपदाचें मुख्य जबाबदारीचें कर्तव्य म्हणजे पाकशास्त्र मुळींच अवगत नसतें. कारण स्वयं--पाक करण्याचें कार्य त्यांना कमी दर्जाचें वाटतें. म्हणून पुष्कळ भगिनी तिकडे मुद्दाम दुर्लक्ष करतात. पोटभर अन्न मिळावें म्हणून अखिल चराचर सृष्टींत मोठी निकराची चढाओढ व ताणाताण अनंत काळपासून एक सारखी चालू आहे. पोटा करितां प्रत्येक प्राणी धडपडत आहे. पण पोटाची व्यवस्था करणारें शास्त्र शिक--ण्यांत माझ्या कित्येक आंग्लविद्याविभूषित भगिनींना कमीपणा वाटतो! हा आंग्लसंस्कृतीचा हीन महिमा होय. सुग्रास अन्नाकरितां त्यांना भाड्याच्या स्वयं-पाकीणीच्या तोंडाकडे पाहावें लागतें. ही दांभिक शिक्षणाची व पोकळ श्रीमं--तीची खोटी ऐट नव्हे काय? जुन्या वळणाच्या गर्भ श्रीमंतांच्या गृहांतील सुख--संपन्न गृहिणी आपल्या यजमानांच्या आणि सोनुल्याच्या तोंडीं सुग्रास अन्न पडावें म्हणून मोठ्या अभिमानानें आणि प्रेमानें स्वतः स्वयंपाक करतात. कारण स्वयंपा-कीण कितीही चांगली असली तरी तिच्या भाड्याच्या अंतःकरणांत खऱ्या जिव्हा-ळ्याचें प्रेम असणें शक्य नाहीं; आणि जिव्हाळ्याच्या प्रेमाचा रस पक्वान्नांत घातल्याशिवाय तें चविष्ट व मधुर होणें शक्य नाहीं.

इतकेंच नाहींतर भाड्याच्या स्वयंपाकीणीकडून सांड उबड, नासधूस आणि चोरीलप्पी होऊन संसाराची धुळधाण उडते ती निराळीच. हा परिणाम कशाचा म्हणाल तर आमच्या भगिनींच्या आर्य संस्कृतिहीन नुसत्या आंग्ल विद्याविभूषित-पणाच्या दंभाचा!

हॉटेलांतील उष्ट्या व घाणेरड्या पदार्थांचा उष्टा पाहुणचार करण्याची मुंबईची भिकार घाणेरडी चाल आमच्या स्वावलंबी मुळींच नाहीं. आर्य स्त्रियांना भूषविणारें पाकशास्त्र ज्या स्त्रीला अवगत नाहीं ती पुस्तकी पोपटपंची ज्ञानांत कितीही पंडिता बनलेली असली तरी संसारोपयोगी गृहिणीच्या थोर पदास पात्र होऊं शकत नाहीं.

**चालू सदोष शिक्षणपद्धतिः**— सध्यांच्या विद्यामंदिरांत धार्मिक व शीलसंवर्धनोत्तेजक अशा अत्यंत आवश्यक शिक्षणाकडे मुलांच्या शाळेंत देखील मुळींच लक्ष दिलें जात नाहीं.

इंग्रजी संस्कृतीच्या वळणावर शिक्षण दिलें जातें. त्यामुळें आपल्या सुसंसरणीय व अनुकरणीय आर्यसंस्कृतीचा लोप होत चालला आहे आणि म्हणूनच सध्यांच्या शिक्षणांत फार दोष आहेत असा गिल्ला चहूंकडून होऊं लागला आहे. सूपशास्त्र, आरोग्यशास्त्र, बालसंगोपन, चित्रलेखन, गायन, शिवण इत्यादि उपयुक्त गृहशिक्षणाच्या अनेक संसारोपयोगी कला कुसरीच्या कामांत नैपुण्य संपादणें हें सुशिक्षित गृहिणीचें खरें कर्तव्य होय.

**फाजील फॅशनः**— वरील संसारोपयोगी शिक्षणाकडे दुर्लक्ष करून फाजील फॅशनचें बंड अलीकडच्या तरूण भगिनी वर्गांत फार बोकाळूं लागलें आहे. आर्य भगिनींना भूषविणारा आणि कुलीनपणा दर्शविणारा डोकीवरचा मर्यादशीलपणाचा पदर ( सेव ) डोकीवरून खांद्यावर टाकण्याची आणि नग्या शिरानें भर रस्त्यानें बिनदिक्कत फिरण्याची फाजील फॅशन, ठाणें देऊं लागली आहे! साध्या व पोक्त चोळीची जागा झालरदार पोलक्यानें पटकाविली आहे! खांद्यावर मुद्दाम झेलता ठेवलेला उडता पदर मिनिटांगणिक उडवून व पुनः वारंवार सांवरून झालरदार पोलक्याचें व गळ्यांतील साजाचें प्रदर्शन करणें, रस्त्यानें नीट सांभाळून संभाविती तऱ्हेनें न चालतां पदोपदीं उगीच नटणें, मुरडणें, रस्त्यानें चालतांना पायावरच्या रेखीव पदरावर आणि उघड्या डोकीवरच्या चमकदार केसांवर क्षणोक्षणीं हात फिरविणें आणि आपल्या अशा फाजील फॅशनकडे कोणाकोणाचें चित्त चंद्रचकोराप्रमाणें आकर्षिलें गेलें आहे हे विहंगम दृष्टीनें अवलोकन करण्याकरितां वारंवार चंचल दृष्टीनें मागें पुढें पाहाणें, कारण नसतां पर पुरुषांशीं हंसून बोलणें, डोळ्यानें चांगलें दिसत असूनही केवळ फॅशन करितां डोळ्यावर चष्मा चढविणें इत्यादि पाश्चात्य पद्धतीच्या पोरकट व फाजील फॅशनमुळें आर्यभगिनींच्या मूळच्या गंभीर व पोक्त स्वरूपास फाजील पोरकटपणाचें स्वरूप येऊं लागलें आहे!

# सार्थ सुभाषितरत्नखंडें.

भाषांतरकार--श्रीराम गोसावी, नाशीक.

---×---

१ 'अकालमेघवद्वित्तं अकस्मादेति याति च'

भलत्यावेळीं आलेल्या मेघाप्रमाणें पैसा हा अकस्मात् येतो आणि निघून जातो.

२ 'अक्षौभ्यतैव महतां महत्वस्य हि लक्षणम्'

सर्वकालीं शांत राहणें हेंच मोठ्याचें मोठेपण आहे.

३ 'अगुणस्य हतं रूपम्'

गुण नसला म्हणजे रूप व्यर्थ आहे.

४ 'अंकमारुह्य सुप्तं हि हत्वा किं नाम पौरुषम्'

मांडीवर येऊन निजलेल्याला मारण्यांत काय शौर्य आहे !

५ 'अंगीकृतं सुकृतिनः परिपालयंति'

एकदां कोणाचा अंगीकार केला म्हणजे चांगल्या शीलाचे लोक त्याचें पालन शेवटपर्यंत करितात.

६ 'अजानतो हठात्कुर्वन्प्राज्ञमानी विनश्यति'

माहीत नसतांना हट्टानें कांहीं करु गेल्यास मोठे शहाणे म्हणविणारेही नाश पावतात.

७ 'अजीर्णे भ जन विषम्'

अजीर्ण झालें असतां जेवणें म्हणजे विष घेणें आहे.

८ 'अज्ञता कस्य नामेह नोपहासाय जायते'

मूर्खपणा हा कोणाचा हसण्याचा विषय होत नाहीं ?

९ 'अतिभुक्तिरतीवोक्तिः सद्यः प्राणापहारिणी'

खादाडपणा आणि वाचाटपणा ह्या तात्काळ प्राणघेऊच गोष्टी होतात.

१० अतिलोभो न कर्तव्यश्चक्रं भ्रमति मस्तके,

फार लोभ करु नये, त्यानें डोकें फिरावयाला लागतें.

११ अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यति.

गवत नसलेल्या जागेवर अग्नि पडला म्हणजे आपोआप शांत होतो.

१२ अधर्मविषवृक्षस्य पच्यते स्वादु किं फलम्

अधर्माच्या विषवृक्षाला गोडफळ कोठून येणार ?

१३ अनध्वा वाजिनां जरा

चाल न पडणें म्हणजे घोड्यांचे म्हातारपण.

१४ अनवसरे याचितमिति सत्पात्रमपि कुप्यते दाता.

भलत्यावेळीं मागणी केली, म्हणजे माणूस चांगला असला तरी देणारा रागावतो.

१५ अनार्यजुष्टेन पथा प्रवृत्तानां शिवं कुतः

असन्मार्गाकडे वळलेल्याचें कल्याण कोठलें ?

१६ अनार्यसंगमाद्वरं विरोधोऽपि समं महात्मभिः

हलकट माणसाशीं संगत करण्यापेक्षां महात्म्याशीं विरोध केलेला पत्करला !

१७ अनुकूलेऽपि कलत्रे नीचः परदारलंपटो भवति.

बायको मनाप्रमाणें असली तरी हलकट मनुष्य दुसऱ्यांच्या बायकांनांच भुलायचा.

१८ अनुरागान्धमनसां विचारसहता कुतः ?

प्रेमानें आंधळें झालेल्यांना विचार कुठून पटणार ?

१९ अनुसृत्य सतां वर्त्म यत्स्वल्पमपि तद्वहु

सज्जनाच्या रस्त्यानें जातांना जें थोडे मिळेल ते पुष्कळच आहे.

२० अन्यस्माल्लब्धपदो नीचः प्रायेण दुःसहो भवति.

दुसऱ्यापासून जागा मेऊन अधिकार गाजविणारा हलकट मनुष्यच बहुशः दुःसह होतो.

२१ अन्योन्यशोभा जननाद्वभूव साधारणो भूषण भूष्यभावः

सामान्यतः आकृतीला शोभा आणण्यासाठीं अलंकार घालतात, पण येथें अलंकारालाही आकृती शोभवूं लागल्यामुळें भूषणभूष्यभाव समान झाला.

२२ अपथे पदमर्पयंति हि श्रुतवन्तोऽपि रजोनिमीलिताः

धडधडीत ऐकत असताही डोळ्यांत धूळ गेल्यासारखे लोक वाईट मार्गांत पाय टाकतात.

२३ अपि धन्वंतरिर्वैद्यः किं करोति गतायुषि

प्रत्यक्ष धन्वंतरी वैद्य उतरला, पण आयुष्यच सरलें तेथें तो काय करणार?

२४ अपि स्वदेहात्किमुतेन्द्रियार्थाद्यशोधनानां हि यशो गरीयः

इंद्रियांचे विलासविषयच काय पण प्रत्यक्ष स्वतांच्या देहापेक्षां मानी लोकांना यश हें मोठें वाटत असते.

२५ अप्रकटीकृतशक्तिः शक्तोऽपि जनस्तिरस्क्रियां लभते

मनुष्य मोठा शक्तिमान असला पण ती शक्ति योग्यवेळी दाखविलीन नाहीं तर त्याचा तिरस्कार होतो.

२६ अप्राप्यं नाम नेहास्ति धीरस्य व्यवसायिनः
निश्चयी आणि धीर अशा मनुष्याला न मिळण्यासारखें कांहीं नाहीं.

२७ अभद्रं भद्रं वा. विधिलिखितमुन्मूलयति कः ?
अभद्र असो भद्र असो, दैवाने लिहिलेलें, कोण पुसूं शकला आहे ?

२८ अभोगस्य हतं धनम्
उपभोग न घेणाऱ्याचा पैसा फुकट आहे.

२९ अभ्यर्थनाभंगभयेन साधुर्माध्यस्थ्यमिष्टेऽप्यवलंबतेऽर्थे
विनंतीचा अवमान होईल या भयानें सज्जन माणूस आपल्या इष्ट वस्तु बद्दल ताटस्थता स्वीकारतो !

३० अमृतं प्रियदर्शनम्
आपल्या आवडत्या माणसाचें दर्शन अमृतासारखें आहे.

३१ अमृतं शिशिरे वन्हिः
थंडीच्या दिवसांत अग्नी हा अमृतासारखा प्रिय वाटतो.

३२ अयिखलु विषमःपुराकृतानां भवति हि जंतुषु कर्मणां विपाकः
प्राण्यांनीं पूर्वी केलेल्या वाईट कर्मांचा परिणाम खरोखर वाईट होणारा आहे.

३३ अर्थभारवती वाणी भजते कामपि श्रियम्
अर्थानें भरलेल्या वाणीची शोभा कांहीं विशेष आहे.

३४ अर्थातुराणां न गुरुर्न बंधुः
पैशाच्या मागे लागलेल्यांना कोणी मोठा नाहीं आणि कोणी आपलाही नाहीं.

३५ अर्धमात्रालाघवेनापि पुत्रोत्सवं मन्यन्ते वैयाकरणाः
बोलण्यांत किंवा लिहिण्यांत अर्धी मात्रा जरी तोडतां आली तरी व्याकरणी लोकांना पुत्रोत्सवाचा आनंद होतो.

३६ अर्धो घटो घोषमुपैति नूनम्
घडा अर्धा भरलेला असला म्हणजेच जास्त आवाज करतो.

३७ अल्पविद्यो महागर्वी
विद्या थोडी आणि ताठा मोठा.

३८ अल्पश्च कालो बाहवश्च विघ्नाः
काळ थोडा आणि विघ्नें फार.

३९ अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छान्विचारमूढः प्रतिभासि मे त्वम्

थोड्या कारणासाठी मोठ्या गोष्टीचा नाश करु बघणारा तूं मला विचार-- शून्य दिसतोस.

४० अल्पाक्षररमणीयं यः कथयति निश्चितं स खलुवाग्मी·

थोड्या शद्बांत पण रम्यपणानें जो कांहीं सांगतो तोच खरोखर बोलणारा होय.

४१ अस्थिरे धनयौवने

पैसा आणि तारुण्य हीं चंचल आहेत.

४२ अवस्तुनि कृतक्लेशो मूर्खो यात्यवहास्यताम्

भलत्याच गोष्टींत लुडबुड करणाऱ्या मूर्खाचें हासूं होतें.

४३ अविद्याजीवनं शून्यं

विद्येवांचून आयुष्य हें फुकट आहे.

४४ असिध्देस्तु हता विद्या

सिद्धीवाचून विद्या फुकट आहे.

४५ अव्यवस्थितचित्तस्य प्रसादोऽपि भयंकर

भरमसाट माणसाचा प्रसाद सुद्धा भयंकर

४६ अश्रेयसे न वा कस्य विश्वासो दुर्जने जने

दुर्जन माणसावरील विश्वास कोणाच्या कल्याणाला कारण झाला आहे ?

४७ अहो अतीव भोगाशा कं नाम न विडंबयेत् !

अति भोगेच्छा कोणाच्या विटंबनेला कारण झाली नाहीं !

४८ अहो विधौ विपर्यस्ते न विपर्यस्यतीह किम् !

दैव उलटलें म्हणजे काय उलटत नाहीं ?

४९ आकरः स्वपरभूरिकथानां प्रायशो हि सुहृदोः सहवासः

दोन मित्रांचा समागम म्हणजे स्वतां विषयीं व दुसऱ्या विषयीं गप्पा-गोष्टी करण्याची एक खाणच बनते.

५० आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया.

गुरुजनाच्या आज्ञेविषयीं विचार करूं नये.

५१ आपदि स्फुरति प्रज्ञा यस्य धीरः स एव हि ।

संकटकालांत ज्याला बुद्धि सुचते तोच धीर मनुष्य होय.

५२ आपन्नार्तिप्रशमनफलाः संपदो ह्युत्तमानाम्

सज्जनांची संपत्ति ही संकटग्रस्तलोकांचीं दुःखें नाहिशी करण्यासाठीं असते.

५३ आरब्धे हि सुदुष्करेऽपि महतां मध्ये विरामः कुतः
कार्य दुष्कर असलें पण एकदां सुरु केले म्हणजे मोठे लोक मध्येच थांबत नाहीं.

५४ आर्जवं हि कुटिलेषु न नीतिः
कुटिलमाणसापुढे सरळपणानें वागणें शहाणपणाचें नाहीं.

५५ आवेष्टितो महासर्पैश्चंदनं किं विषायते
मोठ्या सापांनीं वेढला गेला म्हणून चंदन कांहीं विषारी होत नाहीं.

५६ इंद्रोऽपि लघुतां याति स्वयं प्रख्यापितैर्गुणैः
आपलें गुण आपणच वर्णन केले म्हणजे इंद्र जरी असला तरी त्याला कमीपणा येतो.

५७ उत्सवप्रियाः हि खलु मनुष्याः
लोकांना सणसमारंभ खरोखर आवडतात.

५८ उदिते परमानंदे नाहं न त्वं न वै जगत्
परब्रम्हाचा आनंद प्राप्त झाला म्हणजे तूं नाहीं मी नाहीं, आणि हें जगत्‌ही नाहीं.

५९ उद्वृत्तः क इव सुखावहः परेषाम्
उद्धट मनुष्य दुसऱ्यांना कसा सुखावह होणार ?

६० उन्नतो न सहते तिरस्क्रियाम्
डोकें वर करून चालणाराला कोणी त्याचा तिरस्कार केलेला सहन होत नाहीं,

६१ उष्णो दहति चांगारः शीतः कृष्णायते करम्
कोळसा ऊन असला तर चटका देतो, थंड असला तर हात काळा करतो.

६२ ऋद्धिश्चित्तविकारिणी
संपत्ति ही मनांत विकार उत्पन्न करणारी असते.

६३ एको हि दोषो गुणसंनिपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवांकः
पुष्कळ चांगले गुण असले म्हणजे चंद्रावरील जगाप्रमाणें एकादा दोष खपून जातो.

६४ ऐकचित्ते द्वयोरेव किमसाध्यं भवेदिति.
दोघांचे एक चित्त झालें म्हणजे असाध्य काय आहे ?

६५ कणशः क्षणशश्चैव विद्यामर्थंच साधयेत्
कणाकणानें का होईना पण हरक्षणीं विद्या आणि पैसा हीं मिळवावीं

६६ कर्मानुगो गच्छति जीव एकः
आपापल्या कर्मामागें जीव हा एकटा जातो

६७ कलासीमा काव्यम्
कलेची सीमा म्हणजे सुंदर काव्य.

६८ कलौ वेदान्तिनो भान्ति फाल्गुने बालका इव
या काळांतील वेदान्ति म्हणजे फाल्गुनांतली पोरें

६९ कवयः किं न पश्यन्ति
कवी लोकांना काय काय दिसत नाहीं ?

७० कष्टं निर्धनिकस्य जीवितमहो दारैरपि त्यज्यते
निर्धन माणसाच्या जीविताला धिक्कार असो. बायको सुद्धा त्याचा त्याग करते.

७१ कष्टः खलु पराश्रयः
दुसऱ्याच्या आश्रयानें राहणें हे खरोखर दुःख आहे.

७२ कष्टादपि कष्टतरं परगृहवासः परान्नं च
दुसऱ्याच्या घरी राहणें, आणि परक्याच्या अन्नावर जगणें हें सर्व दुःखापेक्षां दुःख देणारे आहे.

७३ कष्टा हि कुटिलश्वश्रूपरतंत्रवधूस्थितिः
वाईटसासूच्या ताब्यांतली सुनेची स्थिती फार वाईट असते.

७४ कस्य नाभ्युदये हेतुर्भवेत्साधुसमागमः
सज्जनाचा समागम हा कोणाच्या उत्कर्षाला कारण होत नाहीं.

७५ कस्य नोच्छूंखलं बाल्यं गुरुशासनवर्जितं
वडिलांचा धाक नसला म्हणजे पोरपणांत उच्छृंखलपणा यावयाचाच.

७६ कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा नीचैर्गच्छत्युपरि-
चदशा चक्रनेमिक्रमेण
केवळसूख किंवा केवळ दुःख कोणाला प्राप्त झालें आहे ? चाकाची धाव जशी एकदा खालीं एकदा वर होत जाते त्याप्रमाणें सुखदुःखाची गोष्ट आहे.

७७ कः परः प्रियवादिनाम्
गोड बोलणारांना परका मनुष्य कोठला ?

७८ काकोऽपि जीवति चिराय बलिं च भुंक्ते
कावळे सुद्धा बळी खातात आणि पुष्कळ दिवस जगतात.

७९ कामं व्यसनवृक्षस्य मूलं दुर्जनसंगतिः

वाईट व्यसनरूप वृक्षाचें मूळ बहुशः वाईट संगतींतच सांपडते.

८० कामातुराणां न भयं न लज्जा

एखादा मनुष्य कामानें पछाडला म्हणजे त्याला कशाचें भय नाहीं आणि लाज नाहीं.

८१ कामार्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु.

कामानें पछाडलेल्यांना चेतन का अचेतन, जड का जीवंत, दगड का देव याचा विचार राहत नाहीं.

८२ कामिनश्च कुतो विद्या.

एकदां कामशृंगार सुरु झाला म्हणजे मग कसली विद्या आणि कसचा अभ्यास !

८३ कायः कस्य न वल्लभः

स्वतांचें शरीर कोणाला प्रिय नाहीं !

८४ कालयुक्त्या ह्यरिर्मित्रं जायते न च सर्वदा

प्रसंगाप्रसंगानें शत्रुमित्र होत असतात, नेहमीं नाहीं.

८५ कालस्य कुटिला गतिः

कालाची गति ही कठीण आहे.

८६ काले दत्तं वरं ह्यल्पमकाले बहुनापि किं !

वेळेंवर थोडेसें मिळालें तरी बरें पण वेळ गेल्यावर पुष्कळ दिलें तरी त्याची काय किंमत.

८७ कालो ह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी

काळ अमर्याद आहे आणि पृथ्वी विशाल आहे.

८८ किं हि न भवेदीश्वरेच्छया.

परमेश्वराच्या इच्छेने काय होणार नाहीं ?

८९ किंचित्कालोपभोग्यानि यौवनानि धनानि च

पैसा आणि तारुण्य यांचा उपभोग किंचित्कालाचाच असतो.

९० किं दूरं व्यवसायिनाम्

निश्चयी माणसाला काय दूर आहे !

९१ किमिव हि मधुराणां मंडनं नाकृतीनाम् ?

सुंदर रूपाला काय शोभा आणीत नाहीं ?


९२ किमिवास्ते यन्न सुकरं मनस्विभिः

मनस्वी माणसाला काय सुलभ नाहीं ?

अपूर्ण

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २६ मास १२ ) श्रावण शके १८५४ ऑगस्ट इ. स. १९३२ ( नवें वर्ष १२ वें अंक ८

वार्षिक वर्गणी रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३॥

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी, ए

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.

मुद्रकः— विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६ लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| १ मंगलाचरण | ... | १–३ |
| २ मूर्तिपूजा व ब्राह्मणपरीक्षा (उतारे) | ... | ४ |
| ३ रामभक्ताचे मनोरथ | ... | ५–७ |
| ४ नाशीकपंचवटीच्या कथावार्ता. | . | ८ |
| ५ नाथांचीं दोन अपूर्व पदें (अर्थावी चर्चा) | .. | ९–१२ |
| ६ उपनिषदांतील वेंचे | ... | १३–२० |
| ७ सार्थ सुभाषितरत्नखंडें | ... | २१–२६ |
| ८ नाथांची अमृतवाणी | . . | २७ |
| ९ विरोधभक्ति | . | २८ |
| १० श्रीकृष्णाचें गोचरण | ... | २९ |
| ११ श्रीवल्लभाचार्य | ... | २९–३० |
| १२ आनंदाच्या लहरी | ... | ३१–३६ |
| १३ मराठी वाङमयाचा इतिहास-खंड १ ला | ... | ३७-४० |


## ग्राहक–वाचकांस

१ मुमुक्षूचे सपटंबर महिन्यांत सुरू झालेले वर्गणीदार ह्म० ज्यांचे नंबरामागें ९ आंकडा आहे त्यांनीं आपली नव्या वर्षाची वर्गणी रु. ३ म. आ. नें पाठवावी. ती आगष्टअखेर अगर निदान सपटंबर १ तारखेच्या आंत आमचे हातीं न आल्यास सपटंबरचा अंक रु. ३।३ चे व्ही. पी. नें येईल तो स्वीकारावा. म. आ. करणें सोईचें.

२ सपटंबरमध्यें ज्यांचें वर्ष सुरू होतें त्यानीं 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' हा नवा ग्रंथ घेणें असेल तर त्याच्या सवलतीची किंमत रु. ३।४+वर्गणी रु. ३ व व्ही. पी. खर्च ०।१२ मिळून रु. ७ म. आ. नें पाठवावेत.

३ मुंबईच्या वर्गणीदारांच्या सोईसाठी हा आमचा नवा ग्रंथ मुंबईस गिरगावांत प्रार्थनासमाजमंदिरासमोर 'पागनीसपेटकर आणि मंडळी' यांजकडे रु. ३।४ भरून ग्रंथ न्यावा अगर रु. ६।४ भरून वर्गणीही द्यावी. मुंबईच्या सर्व वर्गणीदारांनीं याचा लाभ घेतल्यास त्यांचा व्ही. पी. खर्च टळून पुस्तकही सवलतीनें मिळेल.

४ इतरांनीं ग्रंथ रु. ४।१२ च्या व्ही. पी. नें मागवावा.

पत्ता:–'मुमुक्षु' नाशीक सिटी.

९८/९३२

मुमुक्षु मासिक वर्ष १२ वें ] **मंगलाचरण** [ आगष्ट १९३२ अंक ८



## ( रावणवधानंतर ब्रह्मदेवानें केलेली रामस्तुति )

### तोटक वृत्त

जय राम सदासुखधाम हरे
रघुनायक सायकचापधरे।
भववारनदारन सिंह प्रभो
गुनसागर नागर नाथ विभो ॥ १ ॥

हे चिरसुखधामा रामा ! रघुनायका! चापबाणधरा ह्म — धनुर्बाणधरा! भव-वारणदारका ह्म० भवगजविदारक केसरी ! प्रभो ! गुणसागरा ! सुंदरा नाथा ! विभो ! आपला जयजयकार असो !

तन काम अनेक अनूप छवी
गुन भावत सिद्ध मुनींद्र कवी।
जसु पावन रावन नाग महा
खगनाथ जथा करि कोप गहा ॥ २ ॥

अनेकमदनतुल्य लावण्य धारण करणाऱ्या रामा ह्म० असंख्य मदनांच्या बरोबरीची लावण्यतनु धारण करणाऱ्या रामा ! सिद्ध, मुनि कवि आपल्या गुणांचें गायन करीत असतात. महासर्प अशा रावणाला आपण कोपानें गरुडाप्रमाणें धरून मारलें हें आपलें यश जगाला पावन करणारें आहे.

जनरंजन भंजन सोकभयं
गतक्रोध सदा प्रभु बोधमयं
अवतार उदार अपारगुनं
महिभारबिभंजन ज्ञानघनं ॥ ३ ॥

आपण जनांचें रंजन व शोकभयांचें भंजन करणारे आहांत. वस्तुतः आपण क्रोधातीत असून विश्वाचें विज्ञानघन प्रभु आहांत. लोकोपकाराकरितां आपला अवतार असून आपले गुण अपार आहेत. आपण रावणवधानें पृथ्वीचा भार हलका केलांत आपण ज्ञानमूर्ति आहांत.

अज व्यापकमेकमनादि सदा
करुनाकर राम नमामि मुदा ।
रघुबंसविभूषन दूषनहा
कृत भूप बिभीषन दीन रहा ॥ ४ ॥

रामा ! आपण जन्मरहित, व्यापक, एकमेवाद्वितीय, अनादि असे असून करुणासागर आहांत. मी आनंदानें (मुदा) आपणांस वंदन करीत आहे. आपण रघुवंशाचें भूषण असून पापनाशक (दूषणादि राक्षसांचे संहारक) आहांत, विभीषणासारख्या दीनाला ह्म० शरणागताला आपण राज्यपद दिलेत.

गुनग्यान निधान अमान अजं
नित राम नमामि विभुं विरजं ।
भुजदंड प्रचंडप्रतापबलं
खलवृंद निकंद महाकुसलं ॥ ५ ॥

गुण व ज्ञान यांचे आपण निधि असून मानरहित, जन्मरहित ह्म० जन्ममरणातीत, व्यापक व मायातीत (विरज) आहांत. आपणांस माझे निरंतर प्रणाम असोत. दुष्टांचा निःपात करण्यांत आपण परमनिपुण आहांत.

बिनुकारन दीनदयाल हितं
छबिधाम नमामि रमासहितं ।
भवतारन कारनकाजपरं
मनसंभवदारुन दोषहरं ॥ ६ ॥

स्वतः स्वार्थरहित असून दीनांविषयीं दयाळ व दीनहित करणारे आहांत. लावण्यसागराला तुह्मांला सीतेसहित मी वंदन करितों, आपण भवतारक व कार्य-कारणातीत आहांत. मनांत उत्पन्न होणाऱ्या कल्मषांचे विनाशक आहांत.

सरचाप मनोहर त्रोनधरं
जलजारुन लोचन भूपबरं
सुखमंदिर सुंदर श्रीरमनं
मद मार मुधाममतासमनं ॥ ७ ॥

चाप बाण धारण करणारे आपण फार मनोहर दिसतां. आपले नेत्र रक्तकमलाची स्पर्धा करणारें असून आपण राजमंडळांत सर्वश्रेष्ठ आहांत. सुखनिधान, लक्ष्मी-रमण, परमसुंदर असे आपण मद, काम, मोह ममता यांचें शमन करणारे आहांत.

अनवद्य अखंड न गोचर गो
सबरूप सदा सब होइ न सो ।

इति बेद बदंति न दंतकथा
रवि आतपभिन्न न भिन्न जथा ॥ ८ ॥

निंदारहित अगर निंदेच्या पलीकडचे, अखंड व वाणीला अगोचर आहांत. सर्व रूपांत नित्य व्याप्त असून अरूप आहांत. रवि हा प्रकाशाशीं एकरूप असून त्याहून भिन्न आहे तसें आपण आहांत. हें वेदांनींच सांगितलें आहे, ही कांहीं दंतकथा नाहीं.

कृतकृत्य बिभो सब वानर ए
निरखंत तवानन सादर जे ।
धिग जीवन देवसरीर हरे
तव भक्तिबिना भवभूलि परे ॥ ९ ॥

हे विभो! हे सर्व वानर कृतकृत्य ह्म० धन्य आहेत, कां कीं त्यांस आपलें मुखकमल आदरपूर्वक अवलोकन करण्यास मिळत आहे. माझ्या ह्या जीवितास व देवशरीरास धिक्कार असो, कां कीं मी ह्या भक्तिशून्य संसारांतच गर्क होऊन पडलों आहे.

अब दीनदयाल दया करिये
मति मोरि बिभेदकरी हरिये ।
जेहि ते बिपरीत क्रिया करिये
दुख सो सुख मानि सुखी चरिये ॥१०॥

आतां हे दीनदयाळा! दया करा व भेदभावात्मक माझ्या बुद्धीला दूर करा, तिच्या योगेंच (द्वैतबुद्धीमुळेंच) विपरीत क्रिया माझ्या हातून घडत आहे! आतां दुःख हेंच सुख मानून सुखी होत्सांता मी विश्रांत संचरेन अशी दया करा.

खलखंडन मंडन रम्य छमा
पदपंकज सेवित संभु उमा ।
नृपनायक दे बरदानमिदं
चरनांबुज प्रेम सदा सुभदं ॥ ११ ॥

आपण दुष्टांचे नाशक असून ह्या पृथ्वीचें (क्षमा—छमा) मनोहर भूषण आहांत. शिवपार्वती सुद्धा आपल्या चरणांचें ध्यान करीत आहेत. हे राजराजेश्वरा! मला एवढेंच वरदान द्या कीं आपल्या चरणकमलांचे ठायीं माझें मंगलकारक (सुभद्र-सुभद) असें प्रेम जडावें!

—श्रीतुलसीरामायण— (लंकाकांड)

# मूर्तिपूजा — आक्षेपनिरसन.

" मूर्तीची केलेली पूजा ईश्वराला कशी पोंचतें या आक्षेपाचें निरसन असें कीं बादशाहाच्या अगर एखाद्या सर्वमान्य पुरुषाच्या जन्मदिवशीं त्यांच्या फोटोला येथें घातलेले हार सात हजार मैलांवर असलेल्या त्या व्यक्तींच्या गळयांत पडतात काय? तसेंच सुस्वर (?) वाजविलेले ब्यांड, अगर कर्णकटु उडविलेल्या तोफा, त्यांना ऐकूं जातात काय? आणि 'बादशहांना दीर्घायु कर' अशा अर्थाची म्हटलेली प्रार्थना आकाशस्थ पित्याला ऐकूं जाते काय? जर ती प्रार्थना ऐकूं जाण्याइतकें आकाशस्थ पित्याचें कर्णेंद्रिय व्यापक असेल तर आमचा व्यापक परमेश्वरहि भक्ताच्या संनिध असलेल्या मूर्तीमध्यें, आमचे षोडशोपचार ग्रहण करण्यास सदैव तयार आहे!

" ज्याप्रमाणें एक मोठा आरसा घेऊन त्यांत आपल्या डोळयांतील बुबुळा-कडे एकाग्र दृष्टीनें पहात असतां, डोळयांसमोर असलेल्याहि भिंगाचें ( चौकोनी, पांढरें, गुळगुळीत इ० ) ज्ञान होत नाहीं; तद्वत् आम्ही श्रद्धेनें मूर्तीकडे पहात असतांना आम्हांला तिच्यामध्यें देवत्वच भासतें, पाषाणत्वादि धर्म भासत नाहींत. 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्' गी. ४।३९ 'मंत्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ। यादृशी भावना कुर्यात्सिद्धिर्भवति तादृशी' 'श्रद्धेनें भजल्यातें पाषाणहि फलप्रद' व 'भाव तेथें देव' ही आमच्या भक्तिमार्गांतील चतुःसूत्री आहे. भक्ताला मोक्षाधिकारी बनविण्याचें सामर्थ्य या चतुःसूत्रीमध्यें आहे.

" सध्यां युरोप, अमेरिकेंत 'श्रद्धाचिकित्सापद्धति' सुरू झाली आहे. (पुरुषार्थ. व. ८ अ. ९ पृ. ५०२) मेस्मेरिझमचे प्रयोग व मानसोपचार श्रद्धावान् पुरुषावरच होऊं शकतात, असें मानसोपचारपद्धतीनें रोग बरे करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांचें म्हणणें आहे. तसेंच औषध व वैद्य यांच्यावर श्रद्धा असल्या-शिवाय रोगी मनुष्यास गुण येत नाहीं हा अनुभव तर सर्वजनप्रसिद्धच आहे. "

—आचार्य.

## ब्राह्मणांची परीक्षा!

सुवर्णांचें सुवर्णत्व घर्षण, च्छेदन, तापन व ताडन यावांचून जसें सिद्ध होत नाहीं, त्याचप्रमाणें ब्राह्मणांचें ब्राह्मण्य त्यांतील व्यक्तींनीं क्लेशादि सहन केल्यावांचून व इतरांनीं ते देण्यास अहमहमिकेनें प्रवृत्त झाल्यावांचून सिद्ध होणार नाहीं. म्हणून ब्राह्मण्याच्या विरोधी जनतेचा जो प्रयत्न चालला आहे तो तत्वतः इष्ट आहे व अपरिहार्यहि आहे. —आचार्य.

# रामभक्ताचे मनोरथ.

अगस्तिमुनींचा सुतीक्ष्ण नांवाचा एक शिष्य होता. तो कायावाचामनानें रामचरणसेवा करीत वनांत राहिला होता. त्यानें स्वप्नांतही अन्य देवतांचा आश्रय केला नाहीं. रामराय वनांत आले असून आपल्या भागाकडे येत आहेत हें कळल्यापासून तर त्याला रामदर्शन कधी होईल असें होऊन गेलें. 'हे विधि! राम माझ्या सारख्या शठावर येऊन दया करितील काय?

मोरे जिय भरोस दृढ नाही। भगति बिरति न ज्ञान मन माही।
नहि संतसंग जोग जप जागा। नहि दृढ चरणकमल अनुरागा॥

माझ्या चित्तांत दृढ विश्वास नाहीं, माझ्या ठिकाणीं भक्ति, विरक्ति किंवा ज्ञान यापैकी कांहीं एक नाहीं. सत्संग, योग, जप, याग हें कांहीं मी केलें नसून चरणकमलीं निश्चल प्रेमही नाहीं! राम करुणानिधान असून अनन्यसेवकाची ते उपेक्षा करीत नाहींत अशी त्यांची मी ख्याति ऐकून आहे, त्यांचें मुखकमल मला दिसून माझें नेत्र धन्य होणार आहेत!

सुतीक्ष्ण हा महाज्ञानी असून निर्भरप्रेमांत मग्न झाला! मी कोण व कोठें जात आहे, मार्ग सरळ आहे का वांकडा आहे याचेंही त्याला भान राहिलें नाहीं. तो कधी पुढे चालत जाई तर कधी मागेच चालू लागे. त्याची अविरल भक्ति पाहत प्रभुराम वृक्षखंडाआड लपून राहिले! त्याचें उत्कट प्रेम पाहून रामाला धीर निघेना. रघुवीर त्याच्या हृदयांत प्रगट झाले! तेव्हां मुनि मार्गांतच अचल होऊन बसला. त्याचें सर्वांग फणसाप्रमाणें रोमांचित झालें. राम त्याचे जवळ आले, त्याचें भक्तिप्रेम पाहून रामांनीं त्याला जागे करण्याचा प्रयत्न केला, पण तो ध्यानसुख भोगीत असल्यामुळें शुद्धीवर आला नाहीं! रामरायानें आपलें चतुर्भुज रूप त्याच्या हृदयांत प्रगट केलें, तेव्हां तें पाहत मुनि विकल होऊन जागा झाला. सीतालक्ष्मणासह राम समोर उभे आहेत हें पाहून तो महाभाग्यवान् मुनि प्रेममग्न होऊन त्यांच्या पायांवर पडला. रामांनीं आपल्या विशाल बाहूंनीं त्याला उचलून प्रेमानें पोटाशीं धरिलें. राममुखकमलाकडे एकसारखा पाहत मुनि चित्रलिखित पुतळ्यासारखा निश्चळ उभा राहिला! त्यानें रामास आपल्या आश्रमांत आणले व अनेक प्रकारांनीं त्याचें पूजन केलें.

रामा! कोणत्या शब्दांनीं तुझी स्तुति करूं? तुझा महिमा अपार आहे आणि मी अल्पमति आहे! रवीपुढें काजव्यानें चमकावें तसें हें स्तवन होणार आहे!

श्याम कमलनालाप्रमाणें ज्याचें शरीर आहे, ज्याच्या मस्तकीं जटाजूट असून ज्यानें वल्कलें परिधान केलीं आहेत, ज्याच्या हातीं चापबाण असून कमरेला भाते लटकत आहेत अशा रघुवीराला माझें वंदन असो!

मोहरूप घनारण्याला तूं दग्ध करणारा असून संतरूप कमलवनाला विक-

सित करणारा सूर्य आहेस. हं शिवहृदयमानसमराला ( राजहंसा )! रिपुगजवि--दारणारा तूं सिंह आहेस.

संसयसर्पग्रसन उरगादः
समन सुकर्कसतर्कविषादः ।
भवभंजन रंजनसुरजूथः
त्रातु सदा नो कृपावरूथः ॥

संशयरूप सर्पांचा ग्रास करणारा तूं गरुड असून अत्यंत कठोर अशा तर्क--जन्य विषादाचें शमन करणारा आहेस. तूं संसाराचा भंग करणारा व देवगणांचें रंजन करणारा दयानिधान करणारा आहेस. आमचें सर्वदा सर्वप्रकारें रक्षण कर.

निर्गुन सगुन विषमसमरूपँ
ज्ञान गिरा गोतीतमरूपँ ।
अमलमखिलमनवद्यमपारँ
नौमि राम भंजनमहिभारँ ॥

तूं भक्तांच्या भावनेप्रमाणें सगुण, निर्गुण व समविषमरूप असून ज्ञान, वाणी व इंद्रियें यांना अगोचर आहेस ! तूं अरूप अखंड, अनिंद्य ह्म॰ निर्दोष असून तुझा कोणासही पार लागला नाहीं. तथापि पृथ्वीचा भार उतरणारा तूं आहेस, तुला मी वंदन करितों.

तूं भक्तांना कल्पवृक्षासम आहेस ह्म॰ कल्पतरूंच्या उपवनाप्रमाणें आनंद--दायक आहेस. कामक्रोधादिकांना तुझें भय आहे. तूं भवसागरसेतु आहेस. तूं शक्तीचें आगर असून तुझा भुजप्रताप अतुल आहे. तुझ्या नामानें कलिकालांतील अनेक दोषांचा नाश होतो. तुझा गुणग्राम हा धर्माचें वर्म आहे. तूं मायारहित, व्यापक व अविनाशी आहेस तरी तुझी ही सगूण मूर्ति माझ्या मनांत अखंड वास करो !

जे जानहि ते जानहु स्वामी
सगुन अगुन उर अंतरजामी ।
जा कोसलपति राजिवनैना
करउ सो राम हृदय मम ऐना ॥

हे हृदयांतर्वासी स्वामिन् ! तुला कोणी सगुण ह्मणून जाणोत किंवा कोणी निर्गुण ह्मणून जाणोत माझ्या मात्र हृदयांत हें आपलें, अयोध्याधीश कमलनयन रामरूप अखंड निवास करो !

अस अभिमान जाय जनि भोरे
मै सेवक रघुपति पति मोरे ।

१५ ५/२ १५/१३२

रघुपति माझे स्वामी असून मी त्यांचा सेवक आहे हा माझा अभिमान मला चुकून देखील सोडून न जावो !

हें मुनिवचन ऐकून राम प्रसन्न झाले. त्यांनीं त्याला आपलें दुर्लभ आलिंगन दिलें व एखादा वर मागून घे असें ह्मणाले. यावर मुनि ह्मणालाः —

मुनि कह मैं वर कबहु न जाचा
समुझि न परइ झूट का साचा ।
तुह्महि नीक लागइ रघुराई
सो मोहि देहु दाससुखदाई ॥

मुनि ह्मणाले ' मी कधीच वराची याचना केली नाहीं, तो खरा का खोटा हें मला ठाऊक नाहीं. हे रघुराया ! आपणांस उचित दिसेल व दासाचें ज्यांत कल्याण असेल असाच वर द्या. रामानें मग वर दिलाः—

अबिरल भगति बिरति बिज्ञाना
होहु सकलगुनज्ञाननिधाना ।
प्रभु जो दीन्ह जो बर मैं पावा
अब सो देहु मोहि जो भावा ॥

' पूर्णभक्ति, वैराग्य व विज्ञान ह्म० आत्मानुभव यांचा तुला लाभ होऊन तूं सकल गुण व ज्ञान यांचें भांडार होशील ' असा वर मिळतांच मुनि ह्मणाला ' प्रभो ! आपण जो वर दिला तो मला पावला. आतां माझा मनोरथ पूर्ण करावा आणि तो मनोरथ असा '

दोहाः— अनुजजानकीसहित प्रभु चापबानधर राम ।
मम हियगगन इंदु इव बसहु सदा निःकाम ॥

हे प्रभो ! सीतालक्ष्मणासहवर्तमान चापबाण धारण करणाऱ्या ह्याच राम-रूपानें माझ्या हृदयरूपी आकाशांत आपण अखंड वास करावा व मी निरंतर निष्काम असावे.

—श्रीतुलसीरामायण ( अरण्यकांड )

रामलक्ष्मण जानकी । जय बोलो हनुमान की ॥

नाशीकला सिंहस्थ आषाढापासून जोरानें सुरू झाला आहे. रामकुंडावरचा महारांचा सत्याग्रह सरकारी कायद्यानें उठला व राममंदिराचे सारे दरवाजे खुले झाले, यामुळें बाहेरगांवच्या यात्रेकरूंना नाशीकला येण्यास व येथील क्षेत्रविधी करण्यास कांहींच अडकाठी राहिली नाहीं. पंढरपूरची आषाढीयात्रा संपून परत जातांना कित्येक यात्रेकरू नाशीकत्र्यंबकची यात्रा करण्यासाठीं येथें उतरले. गोसावी व बैरागी यांचेही मेळे पंचवटींत व तपोवनांत पाले व डेरेतंबू घालून व ओटे बांधून राहिले आहेत. तपोवनांत अतोनात गर्दी आतांच झाली असून पुढें भयंकर यात्रा लोटल्यावर तर येथें पाउल ठेवायलाही जागा मिळणार नाहीं असें वाटण्यासारखी स्थिति आज ह्म० आषाढाच्या वद्यपक्षांतच झाली आहे. गोसावी--बैराग्याच्या मेळ्यांत रामानुजपंथी त्रिपुंड लावलेले लोकच फार दिसतात. सायंकाळीं ठायीं ठायीं तुलसी रामायणावर पुराणें चालू असतात. कोठेकोठें यज्ञ--यागही होऊं लागले आहेत. मुंबईच्या व खानदेशच्या भाविक लोकांच्या थैल्या मोकळ्या होऊं लागल्या आहेत. येथें गुदस्तापर्यंत बाबूराव गाडगीळ नांवाचे पुणेरी गृहस्थ 'कोहिनूर' नांवाचें एक पत्र काढीत, असत ते एकाएकी 'बाळ-कृष्ण महाराज' नांवानें प्रगट झाले असून त्यांच्या प्रेरणेनें कांहीं गुजराथी भाटे मंडळी यज्ञयागादि मोठ्या थाटावर करीत आहेत ! पुण्यकर्मांची प्रेरणा देणारालाही पुण्यलाभ होतोच. येथें अनेक महाराज व बोवा यांची ही गर्दी होणार असें दिसतें. पहिल्याच 'ध्वजावंदनास' ७ हजार गोसावी बैरागी व २५ हजार लोक होते !

'आली सिंहस्थपर्वणी । न्हाव्या भटा झाली धणी' हा तुकोबांचा अभंग-पाद बहुतेकांच्या मुखीं असतोच, पण न्हावी व भट यांजबरोबर भांडेवाले कासार, घरवाले यजमान, म्युनिसिपालट्यांचीं नाकीं, तांगेवाले, मोटारवाले, रेल्वे या सर्वांची चांगलीच पोळी पिकत आहे ! 'न्हावी भटांच्या' वाट्याला त्यांच्या मानानें फार थोडा भाग येणार आहे. नाटककंपन्या, सिनेमावाले, चहाचे दुकानदार यांनाही ऊत येऊं पाहत आहे ! कांहीं सद्भाविक संसारीही येवढ्या मोठ्या यात्रेंत जरूर येणारच. खरेखरे संतसद्भक्त विरळच आढळायचे पण तेही या मोठ्या दंगलींत 'दर्यामे खसखस' असेच असायचे, 'गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः' हें सुभाषित खरें आहे. श्रीसमर्थांनीं ह्मटल्याप्रमाणें 'भाविकां देव यथार्थ' आहे. श्रीरामराय भक्तिभाविकांना दर्शनसुख देण्यास उभे आहेत, पावनी गंगामाई चित्तशुद्ध पुरुषांस स्नानदानादिकें करून पावन करण्यास सज्ज आहे. पारमार्थिक बुद्धीनें यात्रेस येण्याऱ्या सज्जनांची यात्रा चित्तसमाधानकर झाल्याशिवाय राहत नाहीं. यात्रेकरूंचे वडे मेळे श्रावण शुद्ध ८ व १५ या दिवसीं जमणार आहेत.

# नाथांचीं दोन पदें.

( ले० रा० ल० घरत. )

शके १८५२ तील ज्येष्ठ महिन्याच्या मुमुक्षूंत संपादकांनीं श्रीएकनाथ महाराजांचीं पुढील दोन पदें देऊन त्यांचा अर्थ विचारलेला आहे. त्या गोष्टीस इतका काळ लोटला तरी कोणाकडून अर्थ झालेला दिसत नाहीं. हा विषय मागें न पडतां पदांच्या अर्थाची चिकित्सा व्हावी म्हणून तीं पदें मुमुक्षूंत पुनः देऊन व आपल्या अल्पमतीप्रमाणें त्यांचा अर्थ सुचवून मी त्या विषयास चालना देण्याचें धाष्टर्य करीत आहे. तज्ज्ञांकडून योग्य तो विचार होईल अशी आशा आहे.

पदें:—

नवरी.

म्यां आईच नवरी केली । खुशाली झाली । खु० ॥ ध्रु० ॥
आला विवेक ब्राह्मण । त्याणें निश्चय केला जाण ।
भाव एक शुद्ध पाहून । कृपा केली ॥ म्यां० । खु० ॥१॥
बहीण वऱ्हाडणी चार । त्यांनीं केला हा उपकार ।
सर्व मिळूनि केला विचार । तेव्हां लाधली ॥ म्यां० । खु० ॥२॥
डोळस पाहतां आंधळे झाले । बोलके ते मुकावले ।
ऐकणें निवांत राहिलें । भूलचि पडली ॥ म्यां० खु० ॥३॥
दहाजणांची केली चोरी । त्यांचा पांगुळला अधिकारी ।
आनंद झाला मम अंतरीं । न बोलवे ॥ म्यां० । खु० ॥४॥
चारी वर्ण एक्या ठायीं । त्यासी ध्याताती हृदयीं ।
एका जनार्दनाचे पायीं । आई लाधली ॥ म्यां० । खु० ॥५॥

लाजाळू

बाई मी लाजाळू लाजाळू । किती लाज सांभाळूं ॥ ध्रु० ॥
पतीस म्हणती पाहांटे उठा । मी दळिते तुम्हि भांडीं उटा ।
आपण दोघे जण दळूं । बाई० ॥ १ ॥
आपण बसती धनणीवाणी । नवऱ्यास म्हणती करा सडापाणी ।
आपण दोघे शेण वळूं । बाई० ॥ २ ॥
पती चालले बाजारा । खाऊं वाटलें खजूरा ।
त्यानें आणलें पैशाचें आलु । बाई० ॥ ३ ॥
एका जनार्दनीं लाजाळू । आपण बसती गुरूजवळूं ।
नवऱ्याचे हातीं दिली तीनें झोळी ॥ बाई० ॥ ४ ॥

पहिल्या पदांत " म्यां आईच नवरी केली । खुशाली झाली । " हें ध्रुवपद असून त्याचाच अर्थ विशेष महत्त्वाचा आहे. जेथून उत्पत्ति किंवा जन्म झाला तें

मातृस्थान मराठींत आई म्हणून संबोधिलें जातें. जिच्याशीं विवाह करावयाचा ती नवरी होय. मानवजातींत आईबरोबर विवाह करून खुशाली किंवा सुख प्राप्त करून घेणें हें शास्त्र व रूढी यांविरुद्ध आहे. मग नाथांनीं हें विपरीत वर्णन कोणाचें केलें आहे? मनुष्येतर प्राण्यांचें तें खास नव्हे. कारण पदांतील विवेक-ब्राह्मणादींचें वर्णन मनुष्याच्या संबंधांतच येणें शक्य आहे. अनेक ठिकाणांप्रमाणें येथेंहि नाथांच्या घरची कांहीं "उलटी खूण" असली पाहिजे हें उघड आहे. या पदांत व पुढील दुसऱ्या पदांत नाथमहाराज आपला स्वतांचा व इतर कृतार्थ झालेल्या ब्रह्मज्ञान्यांचा अनुभव सांगत आहेत. शेवटच्या कडव्यांत श्रीगुरुजनार्दन-स्वामींच्या योगानें मला आई प्राप्त झाली असें नाथांनीं म्हटलेंच आहे. योग्य नवरी मिळवून तिच्याद्वारें सुखी होणें ही प्रपंचांतील सुखाची परमावधि आहे. पारमार्थिक सुखाला ब्रह्मविद्या हीच उत्तम व योग्य नवरी आहे. ब्रह्मविद्वरिष्ठ नाथमहाराज म्हणतात, ज्या ब्रह्माच्या ठायीं सागरावरील तरंगाप्रमाणें माझी उत्पत्ति आहे व म्हणून जें मला मातृस्थानीं आहे त्या ब्रह्मालाच मी आत्यंतिक सुखासाठीं वधूप्रमाणें मानून त्यांतच रममाण होऊन सुखी होण्याची इच्छा केली. वाङ्निश्चयादि विधि ब्राह्मणद्वाराच व्हावयाचे असतात, त्याप्रमाणें विवेक या ब्राह्मणानें मला साहाय्य केलें. माझा शुद्धभाव पाहून म्हणजे श्रीगुरुंच्या ठिकाणीं असलेली माझी पूर्णश्रद्धा लक्ष्यांत घेऊन त्यांनीं मजवर कृपा करून विवेकाच्या द्वारें ब्रह्मविद्यारूप वधूबरोबर माझें लग्न लावून मला अविनाशी सुखाचा लाभ करून दिला. ज्या चार वेदांची उत्पत्ति माझ्या प्रमाणेंच स्वरूपावर आरोपित आहे, आणि म्हणूनच ज्यांस मी बहिणी समजतों, त्यांनीं उपकार करून मला विवेकाची भेट करून दिली, व आपण वऱ्हाडणींप्रमाणें या माझ्या सुख-सोहळ्यांत वावरूं लागल्या म्हणजे त्या वेदांतील वेदान्तविषयाचें श्रवणमनन माझ्या आत्मानंदांत भरच टाकूं लागलें. (येथें चार वेद न घेतां वेदान्त म्हणून संबोधिलीं जाणारीं उपनिषदें घेतां येतील. उपनिषद् हा शब्द संस्कृतांत स्त्रीलिंगी आहे. चार हा शब्द केवळ अनेकत्ववाचक घेतां येईल. त्याप्रमाणेंच इतर संस्कृत व प्राकृत वेदान्त ग्रंथहि घेतां येतील. किंवा साधनचतुष्टय देखील घेण्यास हरकत दिसत नाहीं. श्रुतिशास्त्रें पुढील चरणांत आलीं आहेतच.) ब्राह्मण व वऱ्हाडणी या सर्वांनीं माझ्याबरोबर एकत्र विचार केला, तेव्हां मला ही नवरी मिळाली, म्हणजे श्रवणमनननिदिध्यास आणि श्रीगुरुकृपा यांच्या योगानें मी अध्यात्म-विद्या साध्य करून पूर्ण ब्रह्मरूप होऊन सुखी झालों. डोळस म्हणजे षड्दर्शनें-सहाशास्त्रें-त्यांस दिसेनासें झालें, म्हणजे त्यांस ब्रह्माचें दर्शन होणें अशक्य झालें. (नुसत्या शाब्दिक शास्त्रज्ञानानें ब्रह्मप्राप्ति शक्य नाहीं, त्यासाठीं विचारच

पाहिजे.) सर्वेच प्रतिपादन करणारे जे वेद त्यांनीं स्वरूपस्थिति सांगतांना मौन धारण केलें. श्रुति "नेति नेति" असें म्हणून स्तब्ध राहिल्या. त्यांना भूल पडून पुढें कांहीं सुचेनासेंच झालें. दशेंद्रियांचे विषयच विपयरूपानें त्यांपाशीं मीं संबध न ठेवल्यामुळें त्यांचा राजा मन हें पांगळें झालें, म्हणजे विषयचिंतनासाठीं तें विपयांकडे धांव घेईनासें झालें. मला अंतरांत जो आनंद झाला तो शब्दांनीं सांगणें शक्यच नाहीं. चारहि वर्ण एकत्रच त्या ब्रह्माचें हृदयांत चिंतन करतात. (ब्राह्मणाचें ब्रह्म तें सोंवळें। आणि शूद्राचें ब्रह्म तें ओंवळें। ऐसें वेगळें आगळें। नाहीं तेथें ॥ दासबोध.) श्रीसद्‌गुरुजनार्दन महाराजांच्या कृपेनें ही अध्यात्मविद्या मला प्राप्त होऊन माझी आई जें परब्रह्म त्याच्या ठिकाणीं मी रत झालों. स्त्रीस आलिंगन देऊन सुखी होण्याप्रमाणें ब्रह्मचिंतनांत निमग्न असण्याचें हें रूपक मोठें मजेदार आहे.

दुसऱ्या पदांतहि नाथमहाराज आपला अनुभवच सांगत आहेत. येथील रूपकांत गुरुशिष्यांचें पति व पत्नी असें वर्णन करून गुरूंनीं शिष्याला आपल्या-सारखें केल्यामुळें शिष्य गुरुपदच कसा पावतो हें दाखविलें आहे. गुरुशिष्यांचें नातें पतिपत्नीसारखें असल्याचें इतरत्र वर्णन आहेच. पत्नीनें पतीची उत्तम सेवा करून व पतीवर अकृत्रिम प्रेम करून त्याला जसें पूर्ण वश करावें, लाजाळुपणा बाजूस ठेवून त्याच्या संनिध बसण्यास योग्य व्हावें आणि बरोबरीच्या नात्यानें त्यास आपली इच्छा पूर्ण करण्यास सांगावें, तद्वत् गुरुमहाराजांची पूर्ण कृपा संपा-दून त्यांच्याबद्दलची थोडी मर्यादाहि बाजूस सारून शिष्य तद्रूपच कसा होतो हें येथें सांगितलें आहे. नाथमहाराज म्हणतात, "गुरुमहाराजांनीं मजवर पूर्ण कृपा केल्यामुळें मी त्यांच्याशीं मर्यादेनें वागावें हें खरें, परंतु त्यांनीं मला आत्मरूपीं इतकें तल्लीन केलें आहे कीं, ती मर्यादा आतां सुटत चालली आहे. मला ती यापुढें पाळतांच येणें शक्य नाहीं. श्रीगुरु पतीप्रमाणें असून मी जरी पत्नीप्रमाणें आहें तरी त्यांनीं मला आपल्याशीं समरस केल्यामुळें मी पत्नी जशी पतीस पहांटेस उठावयास सांगून भांडीं घांसून स्वच्छ करावयास सांगते व मी दळीत राहातें असें म्हणते; त्याप्रमाणें श्रीगरूंनीं मुमुक्षूंच्या शंकांचें समाधान करावें, व मी मुमुक्षूंना तयार करीत राहावें अशी स्थिति झाली आहे. दोघांनाहि दळण्याचें काम करतां येईल, त्याप्रमाणें दोघांनाहि निरूपणद्वारां मुमुक्षूंच्या शंकांचें पीठ करून त्यांच्या ठायीं मोक्षेच्छा उत्पन्न करतां येईल. पत्नीनें पतीच्या पूर्ण कृपेनें आपण यजमानीण होऊन बसावें व पतीस सडापाणी करावयास सांगावें, त्याप्र-माणें मी आत्मसुखांतच केव्हां केव्हां तल्लीन झाल्यामुळें श्रीगुरुमहाराजांसच मुमु-क्षूंच्या शंकांचें समाधान करावें लागतें. पतिपत्नी दोघेंहि जाळण्यासाठीं गोवऱ्या

तयार करतात, त्याप्रमाणें गुरुमहाराजांस व मला मुमुक्षूंचे दोष नष्ट करतां येतात. पत्नीला खजूर खाण्याची इच्छा झाल्यामुळें पति बाजारांत जाऊन ज्याप्रमाणें त्यांनीं खजुराऐवजीं पैशाचें अळुच आणावें, त्याप्रमाणें मला सर्व मुमुक्षु एकदम मजप्रमाणें कृतार्थ व्हावे असें वाटलें असतां ती इच्छा मुमुक्षूंची तयारी नसल्यामुळें व्यर्थ ठरली. मी मात्र गुरुश्रीजनार्दनमहाराजांची मर्यादा पाळून त्यांच्या शेजारींच बसलों आहें व पत्नीनें पतीस ज्याप्रमाणें भिक्षेसाठीं पाठवावें, त्याप्रमाणेंच मी मुमुक्षूंच्या उद्धाराचें काम गुरुमहाराजांवरच सोंपविलें आहे."

वरील दोनहि पदांचे अर्थ मी आपल्या अल्पमतीप्रमाणें सुचविले आहेत त्यांत चुका होण्याचा फार संभव आहे. तज्ज्ञांनीं त्या चुका दाखवून योग्य तो अर्थ सुचवावा अशी माझी नम्र विनंति आहे.

---


# कविवर्य मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन )

ह्या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातू मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरी भारतांतील विशेष गुणः - सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस, शृंगाररस इ. कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचित्रें, कुस्त्यांचीं वर्णनें, त्यांच्या वेळची पाकसिध्दी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. 'मुक्तेश्वर नीतिरत्नमाला' ही शेवटी जोडली आहे. पृ. सं १४४ किं. रु. १

# मारुतिउपासना.

प्रथम मारुतिरायाचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी किं ८४

पत्ता:—मुमुक्षु कचेरी, नाशीक सिटी.

अनुवादक—श्रीराम गोसावी, नाशीक.

## ३ श्वेताश्वतरोपनिषत

### प्रथम अध्याय

उद्गीतमेतत्परमं तु ब्रम्ह
तस्मिंस्त्रयं स्वप्रतिष्ठाक्षरं च ।
अत्रान्तरं ब्रम्हविदो विदित्वा
लीना ब्रम्हणि, तत्परा योनिमुक्ताः ॥

**अनुवाद**—त्या श्रेष्ठ ब्रम्हाचें गान अशाप्रकारें केलें आहे. भोक्ता जीव, भोग्य विषय व उपभोगाची प्रेरणा अशी त्रयी या परब्रम्हाच्याच ठिकाणीं उत्पन्न झाली आहे. या त्रयींतच या विश्वाची उत्पत्ति आहे; त्यामुळें या विश्वाची व स्वताची प्रतिष्ठा हें परब्रम्ह आहे. पण हें विश्व विनाश पावणारें आहे, तसें हें परब्रम्ह नाहीं; त्याला कोणत्याच काळीं विनाश नाहीं, असें हें ब्रम्ह आप--ल्याच अंतरांत वसलेलें आहे, असें इहलोकी जाणून ब्रम्हवेत्ते त्याचीच उपासना करितात, आपल्या सर्व वृत्ति त्याच्या ठिकाणी लीन करतात; त्याच्याशिवाय या विश्वांत दुसरें प्राबल्य नाहीं, असा निश्चय करुन आपल्या सर्व शक्ति त्याचे ठायीं अर्पितात, आणि अशाप्रकारें जन्ममरणाच्या चक्रांतून आपली सुटका करुन घेतात; गर्भवासाचा रस्ता वाहण्याचा प्रसंग पुनः त्यांचेवर येत नाहीं.

संयुक्तमेतत्क्षरमक्षरं च
व्यक्ताव्यक्तं भरते वीश्वमीशः
अनीशश्चात्मा बध्यते भोक्तृभावात्
ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः

**अनुवाद**--हें दृश्यमान् होणारें विश्व दोन तत्त्वांचें बनलें आहे. रोज क्षर-णारा भाव एका अक्षरावर प्रतिष्ठित आहे. आणि हें म्रियमाण व्यक्त एका अव्य-क्ताशीं संबद्ध आहे. अशाप्रकारें क्षर आणि अक्षर, व्यक्त आणि अव्यक्त यांनीं संयुक्त असलेल्या या विश्वाचा प्रतिपाळ तो परमात्मा करीत असतो. त्या परमा-त्म्याहून आपण कोणी भिन्न आहोंत असें जेव्हां आत्मा बघूं लागतो, तेव्हांच तो या मायापाशांनीं बांधला जातो. आपल्या देहसौंदर्याची हानी होऊ नये असें त्याला वाटतें. कारण चिरंतन परमात्म्याचा आधार सोडल्यावर देहगृहदारादि हेंच आपल्या जीविताचे आधार त्याला वाटूं लागतात. पत्नीवांचून आपल्याला कोण सुखस्वास्थ्यांत ठेवील, वृद्धपणीं मुलावांचून आपली कोण काळजी करील आणि

पैशावांचून हा संसार, अब्रू सांभाळून, कसा निभावेल अशा विचारांनीं तो आपणास बांधून घेतो. परंतु ज्याक्षणीं आपण आणि तो अक्षर परमात्मा एकाच रूपाचें आहों असें त्याला कळून येते, तो परमात्मा शुद्ध, बुद्ध, मुक्तस्वभाव, सत्यमय आणि आनंदमय असें तो जाणतो व आपलें स्वरूपही असेंच आहे ही प्रतीति त्याला येते, तेव्हां परमात्म्यावेगळा मिथ्या आणलेला भोक्तृभाव तो सोडून देतो; त्याबरोबर त्या मिथ्या अहंभावावर उत्पन्न झालेलें अनंत पाश अपोआप गळून पडतात. स्त्रीपुत्रांचे खोटेच आधार आपण धरले होते; असें त्यास आपोआप कळून येते; व क्षणभंगुर वस्तूंचा आधार आपण अविनाशी रुपाचें असतांना घेतलेला पाहून मायेचे वंचनात्मक रूप त्यास पूर्णपणें कळते; व तिच्या जाळ्यांतून तो कायमचा मुक्त होतो.

क्षरं प्रधानममृताक्षरं हरः<br>
क्षरात्मानावीशते देव एकः ।<br>
तस्याभिध्यानाद्योजनात् तत्वभावाद्<br>
भूयश्चान्ते विश्वमाया निवृत्तिः ॥

**अनुवाद**- प्रधान म्हणजे ही प्रकृति क्षरणारी आहे, विनाशशील आहे आणि हर म्हणजे परमात्मा अमृतधर्मा असून त्याला विनाश नाहीं. ही क्षरप्रकृति आणि तिजशी संयुक्त झालेला आत्मा यावर हा परमात्माच देखरेख करतो. ज्या क्षणीं जीवात्मा हा या क्षरप्रकृतीचा आपला संबंध सोडून त्या अक्षर परमात्म्याशीं युक्त होतो, तेव्हां त्याच्या सर्व मिथ्या संसाराचा निरास होतो. या मोहमयी मायेचा संबंध सोडून, त्या भगवंताचाच जेव्हां तो ध्यास घेतो, त्याच्याच ध्यानांत चिंतनांत मग्न होतो, तेव्हां ही दुरत्यया प्रकृति आपल्या पाशापासून त्याला विमुक्त करते; आणि तो परमात्मा व मी एकच आहे असा तत्वभाव जेव्हां त्याच्या शुद्ध निर्मल चित्तांत उदित होतो तेव्हां देहान्तीं तो त्या श्रीहरीच्या रूपास प्राप्त होतो व त्याचे सर्व प्रकारचे मायाबंध नाश पावतात.

ज्ञात्वा देवं सर्व पाशापहानि<br>
क्षीणैः क्लेशैर्जन्ममृत्युप्रहाणिः ।<br>
तस्याभिध्यानातृतीयं देहभेदे<br>
विश्वैश्वर्यं केवल आप्तकामः

**अनुवाद**—त्या भगवंताला जाणलें, म्हणजे सर्व संसारपाशाचा नाश होतो. बरोबरच आहे, त्याची विस्मृती घडली म्हणूनच हे मायापाश लिगटले. त्या अमृताला दूर केले म्हणूनच मृत्यू मागें लागला. त्या आनंदाला बाजूला केलें म्हणूनच संसाराची ही दुःखकथा सुरू झाली, तेव्हां जसें सूर्यानें यावें व अंधका-

रानें पळावें, त्याप्रमाणें त्या श्रीहरीचें ज्ञान--दर्शन होतांच संसारानें आपलें तोंड काळें करावें हें साहजिकच आहे. जीवात्मा वासनाबंधांनीं जखडला गेला म्हणून आजपर्यंत नाना क्लेश होते, पण हे वासनाबंध त्या परमात्म्याच्या दर्शनमात्रेंकरून जसे तुटूं लागतात तसतसे क्लेशही क्षीण होत जातात. आणि सर्व वासनापाश ज्या दिवशीं निघून जातात त्यावेळीं आतां कोणचेंच जन्मनिमित्त न राहिल्यानें जन्ममरणाच्या घोर चक्रांतून त्याची आतां सुटका होते. आणि त्या विराट् विश्वरूप परमात्म्याच्या अभिध्यानांत या शेवटल्या देहाचा भेद झाला, हा पडला, म्हणजे सर्व विश्वाचें ऐश्वर्य त्याला प्राप्त होते, सर्व काम त्याचे तृप्त होतात; व तो परब्रम्हस्वरूपीं विलीन होतो.

एतज्ज्ञेयं नित्यमेवात्मसंस्थं
नातः परं वेदितव्यं हि किंचित्
भोक्ता भोग्यं प्रेरितारं च मत्वा
सर्वं प्रोक्तं त्रिविधं ब्रम्हमेतत्

**अनुवाद** – नित्य परब्रम्हाचें तत्व आपल्या आत्म्यामध्यें स्थित आहे, आपलें खरें स्वरूप तेंच आहे, हेंच काय तें येथें जाणावयाचें आहे. नाशिवंत गृहधनदारादींना जें स्वतांचें आत्मरूप मानीत होतों, तें आतां हीं कोणी माझीं नव्हत, मिथ्या नाशिवंतमायेचे हे सर्वपाश असून, ही सर्व सुखाची सोयरीक जमली आहे, थोड्याशा स्वार्थहानीनेंही ही दूर सरकणारी आहे, यांचा माझा नित्य संबंध असूं शकत नाहीं, सरते शेवटीं भगवंत हाच माझा खरा कैवारी होऊं शकणार आहे व तेंच माझें खरे स्वरूप आहे हीच काय ती गोष्ट या आयुष्यांत जाणून घ्यावयाची आहे! या शिवाय खरोखर जाणून घेण्यासारखे या जगांत दुसरें काय आहे? सर्व विषयविलासासकट हें संपत्तिजात, सर्व मोहमय प्रेमभावासकट ललनापुत्र, आणि स्वदेहासकट हें सकल दृश्य विश्व निघून जाणारें आहे, नाश पावणारे आहे, याचा आपला संबंध तुटणार आहे, ही गोष्ट या सर्व दृश्यप्रपंचाविषयीं स्पष्ट आहे, श्रेष्ट ज्ञान कोणाचें जाणावयाचें असेल व परमप्राप्ती कोणची करून घ्यावयाची असेल तर ती त्या परमात्म्याची. भोक्ता भोग्य आणि भोगविषयप्रेरणा करणारें असे हें ब्रम्हच त्रिविध झालें आहे. आपला एक भोक्तृभाव नष्ट झाला म्हणजे त्या ब्रम्हाशीं आपण एकरूप होणार आहोंत. या साठीं त्या प्रेरकाचें, त्या सर्वांतर्यामीचें अभिध्यान नित्य हातून घडलें पाहिजे. कालेंकरून तो प्रसन्न झाला म्हणजे त्याच्या प्रसादानें अमृतत्वाची प्राप्ती होणार आहे.

वन्हेर्यथा योनिगतस्य मूर्तिः
न दृश्यते नैव च लिंगनाशः

स भूय एवेंधनयोनिगृह्यः
तद्वोभयं वै प्रणवेन देहे

अनुवाद—अग्नी काष्ठांतून निघतो, पण नुसत्या काष्ठांत त्याचें रूप दिसत नाहीं म्हणून तो तेथें नाहीं असें म्हणतां येत नाहीं. स्थूल रूपानें तो तेथें प्रकट नसला तरी सूक्ष्मरुपानें तो तेथें असतो व दोन काष्ठांच्या मंथनानें तो त्यांतून जसा प्रकट करून घेतां येतो, त्याचप्रमाणें याच देहांत भोक्ता जो जीवात्मा त्याला स्वतांव्यतिरिक्त भोग्यरूप व प्रेरकरूप असे द्विविध ब्रम्ह प्रणवमंत्राच्या साह्यानें समजून घेता येतें. ॐ काराच्या स्मरणानें सर्व ब्रम्हभाव याच देहीं याच जन्मीं आपणाठायीं प्रकट करून घेतां येतो आज जरी तें ब्रम्ह स्वतांस प्रत्यक्ष नसलें तरी सूक्ष्म भावानें ते आपणांत वसत आहे. त्याच्या सतत ध्यानानें तें आपणांत प्रत्यक्ष होतें.

स्वदेहमरणिं कृत्वा प्रणवं चोत्तरारणिम्
ध्याननिर्मथनाभ्यासाद्देवं पश्येन्निगूढवत्

अनुवाद -यासाठीं असें समजावें कीं आपला स्वतांचा देह परब्रम्हरूप अग्नि उत्पन्न करण्याचें काष्ठ आहे; आणि प्रणवमंत्र ही उत्तरारणि आहे, वर घासण्याचें काष्ठ आहे. तेव्हां ध्यानरूप सतत मंथनानें आपणांत गूढ रूपानें राहणारा तो परमात्मा मोठ्या अभ्यासपूर्वक आपण प्रत्यक्ष करावा, त्या भगवंताच्या दर्शनाचे वेळीं या देहाचा धूप करून त्याचेपुढें जाळावा व त्याबरोबर आपला सर्व अहं-भाव खाक करुन त्याच्या ज्योतिः स्वरुपांत मिळून जावें

तिलेषु तैलं दधनीव सर्पि-
रापः स्रोतस्स्वरणीषु चाग्निः
एवमात्मात्मनि गृह्यतेऽ सौ
सत्येनैनं तपसा योऽनुपश्यति

अनुवादः -घाण्यांत घालून रगडलें म्हणजे तिळांतून तेल निघते, दही रवीनें उत्कृष्ठ घुसळलें म्हणजे त्यांतून लोणी प्राप्त होते, नदीच्या कोरड्या पात्रांत वाळू बाजूला केली म्हणजे त्यांतून पाणी आणि काष्टांतून अग्नि प्रगट होतो, त्याप्रमाणें जो कोणी सत्यानें, नित्यप्रयत्नरूप तपानें या आत्म्याचा ठाव घेतो, त्याला त्यांत परमात्म्याचा लाभ होतो.

—— × ——

## द्वितीय अध्याय.

त्या परमात्म्याच्या प्राप्तीसाठीं आचरावयाचा योग या अध्यायांत सांगितला आहे.

त्रिरुन्नतं स्थाप्य समं शरीरं
हृदींद्रियाणि मनसा संनिवेश्य
ब्रम्होडुपेन प्रतरेत विद्वान्
स्रोतांसि सर्वाणि भयावहानि

**अनुवाद**—आपळें मस्तक, मान व छाती हीं उंच धरावीं, पाठींत पोक काढून, मान ढिली सोडून, व मस्तक कलते ठेवून बसू नये. शरीर सम--सरळ-ठेवावे, आणि मनासह सर्व इंद्रियशक्तींना हृदयकमळांत एकत्र करावे. इंद्रियांचा विषयभोग पूर्णपणें बंद ठेवावा; व मनानेंही विषय चिंतन करूं नये. असें केल्यानें जी स्थिरता प्राप्त होईल, त्यानें हळू हळूं ब्रम्हभाव स्वात्म्यामध्यें प्रकट होईल. अशाप्रकारें ब्रम्हरूप नौकेंत बसून विद्वानानें संसाराच्या सर्व भयावह नद्या तरुन जाव्या.

प्राणान्प्रपीडयेह संयुक्तचेष्टः
क्षीणे प्राणे नासिकयोच्छ्वसीत
दुष्टाश्वयुक्तमिव वाहमेनं
विद्वान्मनो धारयेताप्रमत्तः

**अनुवाद**—या शरीरांतील प्राणशक्तींचा संयम करावा. आहार विहारादि सर्व कर्में परिमितपणें करावीं, कारण 'नात्यश्नतस्तु योगोऽस्ति' या गीताश्लोकांत सांगितल्याप्रमाणें जो रसनेंद्रियाच्या अंकित झाला, निद्रेला ज्यानें आपलें जीवित विकून टाकले, तो योगाचा अधिकारी होऊं शकत नाहीं. किंवा आग्रहाच्या बेडींत पडून जो क्षुधा तृषा कोंडतो, किंवा आहार तोडून मारू पाहतो त्याला योग साधणें शक्य नाहीं. तर 'युक्ताहार विहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु। युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा' हें श्रीकृष्णजींनीं सांगितलेंलेंच योगाच्या बाबतींत खरें आहे. प्राणाचें प्रपीडन असल्याप्रकारच्या युक्तचेष्टेनेंच होते. अतीशयपणानें प्राणशक्ति प्रक्षुब्ध होतात; आणि परिमितपणानें त्या शांत राहतात; अशावेळीं साधकानें मंदश्वास घेऊन हृदयांत उत्पन्न होणाऱ्या ब्रम्हभावाला अधिकाधिक स्थिरतां आणावी. शरीर हें एका रथासारखें आहे. इंद्रिये हीं या रथास लावलेली घोडीं आहेत. बुद्धी ही रथ हाकणाऱ्या जागी असून मन हे लगाम आहेत. रथांत बसलेल्या आत्म्याला परमात्म्याकडे नेऊन पोंचविण्याचें ज्या बुद्धीनें ठरविलें असेल, तिनें आपलें घोडे बेफाट होऊ देऊ नयेत. योगाच्या राजमार्गावरून रथाला ढळूं देऊ नये. इंद्रियमनाला स्वाधीन ठेवावें. असें केलें तरच परमात्म्याच्या महाधामाला पोंचणें शक्य आहे.

समे शुचौ शर्करावन्हिवालुका—

—विवर्जिते शब्दजलाश्रयादिभिः ।
मनोनुकूले न तु चक्षुपीडने
गुहानिवाताश्रयणे प्रयोजयेत् ॥

**अनुवाद**—योगसाधन करण्याचें स्थल अशाप्रकारचें असावें. जागा समान असावी, उंचसखल असू नये, कारण मग आसन अस्थिर होतें. ती पवित्र असावी. अशुची जागेंत मन शांत राहू शकत नाहीं. जागेचा अपवित्रपणा मनालाही चिकटतो. त्याचप्रमाणें ती गारगोट्यांनी भरलेली वा वाळू टाकलेली असू नये. एक तर अशी जागा खालून रुतते आणि दुसरें असें कीं वाळूंत किडीमुंगी असण्याचा फार संभव असतो. त्याचप्रमाणें जवळपास अग्नी असल्यास त्यानेंही शरीरास पीडा होते. एकंदरींत जागा अशी असावी की तेथें येणारे आवाज, वाहणारे पाणी इ० सर्व कांहीं मनाला अनुकूल असणारें असावें. जेथें वसलें असतां "आभ्यासचि आपण याते वरी । हृदयाते अनुभव वरी।" अशी रम्यपणाची थोरी त्या ठिकाणीं प्राप्त होईल; डोळ्यांना त्या ठिकाणीं त्राप होणार नाहीं, त्याचप्रमाणें ती एकादी निगूढ गुहेची जागा असावी. कारण एक तर लोकांच्या पायरवाचा त्रास होत नाहीं. व उघड्या जागेवर जोराच्या वाऱ्याची भीति असते, कारण तो स्थिरपणाला विघ्न करणारा आहे. योगसाधनाला 'आतप ( ऊन ) अळुमाळ। जाणिजे तरी शीतळ। पवन अति निश्चळ। मंद झुळुके' अशाप्रकारची जागा लागते. तेव्हां साधकानें असें स्थान पाहून योगाभ्यासाला सुरवात करावी.

नीहारधूमार्कानिलानलानां
खद्योतविद्युत्स्फटिकशशिनाम् ।
एतानि रूपाणि पुरःसराणि
ब्रम्हण्यभिव्यक्तिकराणि योगे ॥

**अनुवादः**—आसनाला स्थिरता आली म्हणजे, अहंभाव हळू हळू जाऊं लागतो, विषयांचा विसर पडतो, इंद्रियांचीं कसमस मोडते, आणि हृदयकमलांत मनाची घडी बसू लागते, प्रवृत्ति मागे फिरते आणि समाधी पुढ्यांत उतरते, अशावेळीं खालील चिन्हें दृष्टीस पडतात धुकें, धूर, सूर्य, वायु, अग्नि, काजवा, वीज, स्फटिक चंद्र यांची रूपें साधकाच्या निमीलित नेत्रापुढें दिसूं लागतात. योगामध्यें परब्रम्हाचें दर्शन करविणारीं ही प्रथमरूपें समजलीं जातात.

पृथ्व्यप्तेजोनिलखे समुत्थिते
पंचात्मके योगगुणे प्रवृत्ते ।
न तस्य रोगो न जरा न मृत्युः

प्राप्तस्य योगोग्निमयं शरीरम् ॥

अनुवाद—वरील प्रकारचा योगाभ्यास बराच दृढावला म्हणजे पृथ्वी, आप, तेज वायु आणि आकाश या पंचतत्वाच्या बनलेल्या या शरीरांत एक योगशक्ति निर्माण होते. ह्या जागृत झालेल्या शक्तीच्याच योगानें शरीरांत एक-प्रकारचा अमृतरस तयार होतो. असे तें योगशक्तिमय झालेलें शरीर मग रोगानें ग्रस्त होत नाहीं, त्याला जरा नाहीं, व योग्याच्या इच्छेवांचून मरण येऊं शकत नाहीं. योग्याच्या देहाकृतीला मग कृतांत सुद्धां भिऊं लागतो, वार्धक्य असलें तर तें जणूं मागें परतून व तारूण्याची गाठ तोडून सुंदर बाळदशेप्रत येते. पण ही बाळदशा म्हणजे बलीष्ठपणाची दशा, अशा प्रकारें ज्ञानेश्वरमहाराजांनीं या दशेचें वर्णन केलें आहे.

लघुत्वमारोग्यमलोलुपत्वं
वर्णप्रसादं स्वरसौष्ठवं च
गंधः शुभो मूत्रपुरीषमल्पं
योगप्रवृत्तिं प्रथमां वदन्ति

अनुवाद योगशक्तीमुळें साधकाच्या योगाग्निमय शरीरांत आणखीही कांहीं गुण उत्पन्न होतात. शरीराला हलकेपणा येतो, जाड्य सर्व नाहींसे होते. पूर्ण आरोग्य त्याच्या शरीरांत नांदू लागते. त्यामुळें शरीराला वर्ण प्रसाद म्हणजे सुंदर कांति प्राप्त होते. स्वरसौष्ठव म्हणजे त्याचा आवाज मधुर बनतो. त्याच्या शरीरापासून सुंदर गंध फुलाप्रमाणें सुटतो, मूत्र आणि विष्ठा यांना अगदीं अल्पत्व येते व त्याचें मन निरासक्तीनें प्रसन्न असते ज्ञानेश्वर महाराजांनीं या स्थितीचें वर्णन खालील ओव्यांत केलें आहे.

आइके देह होय सोनियाचे । परी लाघव ये वायूचें
जे आप आणि पृथ्वीचे । अंश नाहीं.
मग समुद्रापलीकडील देखे । स्वर्गींचा आलोचु आइके
मनोगत वोळखे । मुंगियेचे
पवनाच्या वारिका ( घोड्यावर ) वळघे । चाले तरी उदकीं पाउल न लागे
येणें येणें प्रसंगे । येती बहुता सिद्धी.

ही स्थिती प्राप्त झाली म्हणजे योगमार्गांतील पहिला मुक्काम आला असें समजतात.

यथैव बिंबं मृदयोपलिप्तं
तेजोमयं भ्राजते तत्सुधान्तम् ।
तद्वाऽत्मतत्वं प्रसमीक्ष्य देही

एकः कृतार्थो भवते वीतशोकः ॥

**अनुवाद**—ज्याप्रमाणें एकादा मातीनें माखलेला आरसा स्वच्छ धुतला म्हणजे तेजस्वी दिसावयास लागतो व लकलकतो, त्याप्रमाणें आत्मा हा जो माया मोहरूप कर्दमानें माखला होता तो आतां योगाभ्यासानें सर्व संसार पसाऱ्यापासून धुवून निघाला, म्हणून साधकाला परमात्मतत्वाचें सुंदर रूप आपल्या आत्म्यांतच दृष्टीस पडते; व त्या भगवंताचें दर्शन झाल्यावर तो कृतार्थ होतो, धन्य धन्य होतो. आजपर्यंत केलेल्या सर्व कष्टाचें परिमार्जन होते, सर्व शोक नाहिसे होतात; व त्यापरमात्म्याशीं एकरूप होऊन जातो.

यदाऽऽत्मतत्वेन तु ब्रम्हतत्वम्
दीपोपमेनेह युक्तः प्रपश्येत् ।
अजं ध्रुवं सर्वतत्वैर्विशुद्धं
ज्ञात्वा देवं मुच्यते सर्व पाशैः ॥

**अनुवाद**—ज्याप्रमाणें सुंदर स्वच्छ तेजोमय दिव्याच्या प्रकाशांत एकादी वस्तु स्पष्ट पाहतां येतें, त्याप्रमाणें योगाभ्यासानें ज्यानें आपल्या आत्म्यावरील संसारसंस्काराचें किटण बाजूला केले, त्या भगवंतास बघावें याच एका वासनेची वात प्रज्वलीत केली व तिला ध्यानाचें तेल घातलें तेव्हां त्या अज, ध्रुव, व सर्व तत्वांनीं शुद्ध निर्मळ असलेल्या परमात्म्याचें रूप योगी साधकापुढें उभें राहिलें; व तो सर्व संसारबंधांतून मुक्त झाला. असें सर्व मुमुक्षूंनीं करावें.

—< + >—

# आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्रसंत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृत्तांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्र महोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. ‘ उपकृतिस्मरण ’ हें ७६ श्लोकांचें आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा, ग्रंथांचा, व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं.॥१२

# सार्थ सुभाषितरत्न खंडें

भाषांतरकार—श्रीराम गोसावी, नाशीक

—— × ——

९३ किं मर्दितोऽपि कस्तुर्या लशुनो याति सौरभम्?

कस्तुरींत लसूण घोळला वा वाटला तरी त्याला थोडाच सुगंध सुटाव-याचा आहे?

९४ किं मिष्टमन्नं खरसूकराणाम्?

गाढवाडुकरांना पक्कान्नें काय होत?

९५ कुकृत्ये को न पंडितः।

वाईट कर्म करतेवेळीं शहाणा कोण नाहीं?

९६ कुगेहिनीं प्राप्य गृहे कुतः सुखम्?

खाष्ट बायकोशीं गांठ पडली म्हणजे घरांत सुख कोठलें?

९७ कुतः सत्यं च कामिनाम्?।

कामानें पछाडलेल्यांना सत्य कोठले?

९८ कुभोजनं चोष्णतया विराजते!

गरीबीचें अन्न असलें तरी ताजें असलें म्हणजे गोड लागतें.

९९ कुभोज्येन दिनं नष्टम्।

वाईट जेवण झालें म्हणजे सारा दिवस फुकट जातो.

१०० कुरहस्यसहाये हि भृत्ये भृत्यायते प्रभुः

धन्याच्या वाईट गुपितांत नोकराचा हात असला म्हणजे धन्यालाच नोकराची गुलामगिरी करावी लागते.

१०१ कुरूपता शीलतया विराजते

वाईट रूप गुण चांगले असले म्हणजे शोभून जातें

१०२ कुवस्त्रता शुभ्रतया विराजते·

गरीबीचीं वस्त्रें स्वच्छतेनें शोभून दिसतात.

१०३ कुवाक्यान्तं च सौहृदम्

शब्द गोड तोंपर्यंत मैत्री, तोंच कडु शब्द आला कीं मैत्री संपली.

१०४ के वा न स्युः परिभवपदं निष्फलारंभयत्नाः

ज्यांचीं करणीं सगळीं वांझ ते इतरांच्या अनादराला प्राप्त होतात.

१०५ को जानाति जनो जनार्दनमनोवृत्तिः कदा कीदृशी.

भगवंताची इच्छा केव्हां कशी काय आहे, हें कोण्या माणसाला कळलें आहे?

१०६ को धर्मः कृपयाविना

दया नाहीं तर धर्म कसचा ?

१०७ को न याति वशं लोके मुखे पिण्डेन पूरितः

एकदा तोंड दाबलें म्हणजे कोण वश होत नाहीं ?

१०८ कोऽर्थान् प्राप्य न गर्वितः

पैसा मिळाला म्हणजे गर्व कोणाला चढत नाहीं.

१०९ कोऽर्थी गतो गौरवम्

भिकाऱ्याना मान कोठला ?

११० कोऽवकाशो विवेकस्य हृदि कामान्धचेतसः

मन कामानें आंधळें झालें म्हणजे हृदयांत विवेकाला जागा कोठली ?

१११ को वा दुर्जनवागुरासु पतितः क्षेमेण यातः पुमान्

दुर्जनाच्या जाळयांत पडल्यावर सुरक्षीतपणानें त्यांतून कोण माणूस सुटला आहे ?

११२ को विदेशः समर्थानाम्

शक्तिमानांना परका देश असा कोणता आहे ?

११३ को हि वित्तं रहस्यं वा स्त्रीषु शक्नोति गूहितुम्॥

स्त्रियांचे ठिकाणीं आपला पैसा आणि गुपित छपवून ठेवण्यास कोण समर्थ आहे ?

११४ को हि संपत्सु चपलास्वाश्वास्थै वनितासु च

चंचल संपत्ति आणि स्त्रिया यांच्यावर कोणी विश्वास ठेवावा ?

११५ क्रियाणां खलु धर्म्याणां सत्पत्न्यो मूलकारणम्

पतीच्या पुष्कळ धर्मकृत्यांना त्यांच्या चांगल्यास्त्रिया याच मूलकारण असतात.

११६ क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे

कार्यांची सिद्धी मोठेलोक आपल्या स्वशक्तीनें घडवून आणतात; बाह्य उपकरणसाधनांवर त्यांचीं कार्यसिद्धी अवलंबून नसते.

११७ क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः

हरक्षणीं जें नवीन नवीनच वाटतें तेंच खरोखर रम्यपणाचें रूप आहे.

११८ क्षितितले किं जन्म कीर्तिंविना

या जगांत कशांत तरी चांगली कीर्ति मिळविली नाहीं तर तो जन्म काय कामाचा ?

११९ क्षीणा नरा निष्करुणा भवंति.

दुर्बळ कष्टी झालेल्या लोकांना दया राहत नाहीं.

१२० क्षुधातुराणां न रूचिर्न पक्वम्

रुचि बेरुची, आणि शिजलें कच्चें, याचा विचार भुकेनें व्याकुळ झाले-ल्यांना नसतो.

१२१ क्रुध्यन्ति प्रसभमहो विनाऽपि हेतोर्लीलाभिः किमु सति कारणे रमण्यः

मजेखातर कांहीं एक कारण नसता स्त्रिया रागावतात व जाणावतात मग कारण झाल्यावर काय सांगायला पाहिजे ?

१२२ गतं न शोचामि कृतं न मन्ये.

गेलें त्याचा मला शोक नाही, आणि केलें त्याचा गर्व नाहीं.

१२३ गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः

कोणाच्या तरी पावलावर पाऊल ठेवून जाणारे लोक असतात. सत्यां-न्वेषी कोणी नाहीं.

१२४ गुणान्भूषयते रूपम्

सुंदर रूप हें सद्गुणांना अलंकाराप्रमाणें शोभा देतें.

१२५ गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः

चांगले गुण हेच पूजनीय आहेत. ते ज्याच्या ठिकाणीं आहेत, त्याची जातवय पाहण्याचें कारण काय ?

१२६ गुणिनि गुणज्ञो रमते नागुणशीलस्य गुणिनि परितोषः

गुणी माणसाला पाहून गुणाचा भोक्ता सुखावतो, पण गुण कांहीं नसणें हेंच ज्यांचें शील त्यांना त्याचा काय संतोष ?

१२७ गुणी गुणं वेत्ति न वेत्ति निर्गुणः

गुणी माणसाला गुणाची पारख, निर्गुण्याला काय ?

१२८ गुणैर्विहीना बहु जल्पयंति

कांहीं गुण नसलेले बहुधा फार बडबड करितात.

१२९ गुर्वपि विरहदुःखमाशाबंधः साहयति.

प्रियाच्या वियोगाचें दुःख कितीही मोठें असलें तरी त्याच्या भेटीचा आशाबंध ते सहन करावयास लावतो.

१३० गृहे या पुण्यनिष्पत्तिः साध्वनि भ्रमतः कुतः

घरांत स्वस्थपणानें पुण्यकृत्यें करून जो पुण्य संचय करितां येईल तो भटक्याच्या हातून भटकतांना कसा होणार ?

१३१ चौरे गते वा किमु सावधानम्

चोर निघून गेल्यावर सावध होण्याच्या गोष्टी काय कामाच्या ?

१३२ ग्लपयति यथा शशांकं न तथा कुद्मतीं दिवसः

दिवस हा चंद्राला जितका म्लान करतो तितका चंद्रविकासिनी कमलिनीला करीत नाहीं.

१३३ चकास्ति योग्येन हि योग्यसंगमः

योग्य माणसाशी योग्य माणसाचा संगम घडून आला म्हणजे तो शोभून दिसतो.

१३४ चक्रवत्परिवर्तंते दुखानि च सुखानि च

दुःखा मागून सुख आणि सुखामागून दुःख ही चाकासारखी फिरत असतात.

१३५ चंद्रचंदनयोर्मध्ये शीतला साधुसंगतिः

चंद्राची शीतलता आणि चंदनाची थंडाई या पेक्षा साधुसंगति ही जास्त सुखकर आहे.

१३६ चांडालः पक्षिणां काकः

सर्व पक्ष्यांत नीच आणि दुष्ट कोणी असेल तर (व्रणावर चोंच मारणारा) कावळा.

१३७ चांडालोऽपि नरः पूज्यो यस्यास्ति विपुलं धनम्

मनुष्य महा नीच पण जवळ पैसा सपाटून तर त्याचा आदर होतो !

१३८ चित्तमेतदमलीकरणीयम्

आपले हें चित्त प्रत्येकानें नेहमी शुद्ध करीत असावें

१३९ चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता

मनांत, वाणींत, आणि क्रियेंत चांगले लोक एकपणा ठेवतात.

१४० चित्रा गतिः कर्मणाम्

कर्मांची गति विचित्र आहे.

१४१ चिंता जरा मनुष्याणाम्

मनुष्यांना म्हातारपण आणणारी चिंता आहे.

१४२ चोराणामनृतं बलं

खोटेपणा हेंच चोरट्यांचें सामर्थ्य.

१४३ छिद्रेष्वनर्था बहुलीभवंति.

एकदा छिद्र पडलीं म्हणजे सर्वबाजूंनीं फाटायला सुरुवात होते.

१४४ जठरं को न बिभर्ति केवलम्

नुसतें पोट कोण भरीत नाहीं?

१४५ जायंते वत मूढानां संवादा अपि तादृशाः
मूर्खांचीं बोलणीं हीं मूर्खपणाचींच असावयाचीं.

१४६ जीवन्तमेव कृष्णाति काकीव कुकुटुंबिनी.
कैदाशीण बायको जीवन्तपणींच एखाद्या कावळीप्रमाणें हृदयाचे लचके तोडीत असते.

१४७ ज्ञानमार्गे ह्महंकारः परिघो दुरतिक्रमः
ज्ञानमार्गांत अहंकाराचा अडसर ओलांडून जाणें कठीण आहे.

१४८ ज्ञानमेव शक्तिः Knowledge is power
ज्ञान हेंच सामर्थ्य आहे.

१४९ ज्ञानस्याभरणं क्षमा
क्षमा हे ज्ञानाचें भूपण आहे.

१५० ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रम्हापि च तं नरं न रंजयति
एका ज्ञानकणानें स्वतांस पंडित लेखणाऱ्या मूर्खांचें मन खुद्द ब्रम्हदेव-सुद्धां धरूं शकत नाहीं.

१५१ झटिति पराशयवेदिनो हि विज्ञाः
शहाणे लोक दुसऱ्याचें मन चटकन् जाणतात.

१५२ तदेव दुःसहं स्त्रीणामिह प्रणयखंडनम्
प्रेमांत खोड येणें हे स्त्रियांना अतिदुःसह होतें

१५३ तपःसीमा मुक्तिः
मुक्ति मिळाली की तप करण्याची मर्यादा संपली.

१५४ तपोधीना हि श्रेयांसि ह्युपायोऽन्यो न विद्यते.
कल्याण हें तपाच्या अधीन आहे, झटण्यांत, दीर्घोद्योगांत आहे, त्याला दुसरा उपाय नाहीं.

१५५ तपोधीना हि संपदः
पैसे मिळणें हें दीर्घोद्योगावर अवलंबून आहे.

१५६ तस्करस्य कुतो धर्मः
चोरट्यांना धर्म कसचा ?

१५७ तस्य तदेव हि मधुरं यस्य मनो यत्र संलग्नम्
ज्याचें मन जेथें चिकटलें तें त्याला गोड !

१५८ तुष्यंति भोजनैर्विप्राः
भटभिक्षुकें हीं भोजनावर ताव मारला कीं खूष !

१५९ तुण्डैका तरुणायते.

सर्वांना म्हातारपण येते पण एक तृष्णा मात्र रोज तरुण बनत असते.

१६० तेजसां हि न वयः समीक्ष्यते

तेजस्वी माणसाच्या वयाकडे कोणी पाहात नाहीं.

१६१ तेषामिंद्रियनिग्रहो यदि भवेद्विंध्यस्तरेत्सागरम्

विषयलोलुप लोकांच्या हातून जर इंद्रियनिग्रह घडला तर विन्ध्यपर्वत सागर तरल्यासारखे होईल.

१६२ दया मांसाशिनः कुतः

दुसऱ्यांचे मांस खाणारांना दया कसली ?

१६३ दरिद्रता धीरतया विराजते

धीरगंभीरपणा असला म्हणजे गरिबीसुद्धा शोभून दिसते.

१६४ दर्दुरा यत्र वक्तारस्तत्र मौनं हि शोभनम्

बेडकांची टरावटराव जेथें सुरु झाली तेथें शहाण्यानें मुकें बसणें हें बरें.

१६५ दारिद्र्यदोषो गुणराशिनाशी

एक दारिद्र्याचा दोष असा आहे कीं तो अनेक गुण समुदायाचा नाश करुं शकतो.

१६६ दारिद्र्यं परमांजनम्

ऐश्वर्यमदानें उन्मत्त झालेल्यांना दारिद्र्य हें एक क्षणक्षणित अंजन आहे.

१६७ दुग्धधौतोऽपि किं याति वायसः कलहंसताम्

दुधांत धुवून काढला म्हणून कावळा राजहंस थोडाच होणार आहे.

१६८ दुरधीता विषं विद्या.

अव्यवस्थितपणें शिकलेल्या विद्येचा परिणाम विषारी होतो.

१६९ दुर्जनस्य कुतः क्षमा.

हलकटमाणसाला क्षमा कसली ?

१७० दुर्जया हि विषया विदुषापि.

शहाण्या माणसांना सुद्धा हे विषय जिंकण्याला कठीण आहेत.

१७१ दुर्लभं भारते जन्म मानुष्यं तत्र दुर्लभम्.

या भरतभूमींत जन्म येणें ही तर फारच कठीण गोष्ट आहे आणि त्यांतून माणसाचा येणें हें फार दुर्लभ.

१७२ दूरतः पर्वता रम्याः

दुरुन डोंगर साजरे.

१७३ देवो दुर्बलघातकः

दुबळ्याच्या घातावर देव सुद्धा असतो.

# नाथांची अमृतवाणी.

( १ ) सांडूनि संसारस्फूर्ती । चित्स्वरूपीं जडे वृत्ती ।
जीवशीव एकत्वा येती । योगसंग्रहस्थिती या नांव ॥

( २ ) एवं भावार्थापरतें कांहीं । देवासी आवडते नाहीं ।
तो भावो नाहीं ज्याचे ठायीं । तें मूर्ख पाहीं बालिश ॥

( ३ ) करूनि फळाशेचें शून्य । स्वधर्में करिती माझें भजन ।
पुरुष अथवा स्त्रिया जाण । सत्वसंपन्न निश्चित ॥

( ४ ) माझें स्वरूप निजनिर्गुण । अथवा वैकुंठीचें सगुण ।
दोन्ही एकचि निश्चयें जाण । सगुणनिर्गुण समसाम्य ।

( ५ ) छाया विष्टेवरी पडे । कां पालखीमाजी चढे ।
तेणें पुरुषा सुखदुख न जोडे । मुक्तासी तेणें पाडे देहभोग ।
स्वजनधनस्त्रीपुत्रांसीं । नांदोनि जो नातळे त्यासी ।
स्वप्न-घरवात जागृता जैसी । त्यासी साधूसी संसारू ॥

( ६ ) पृथ्वीतळीं देवता साधु । साधु दीनांचे सखेबंधु ।
साधुरूपें मी परमानंद । जाण प्रसिद्ध परमात्मा ॥

( ७ ) पर्वविशेषीं जयंतीसी । मेळवूनि संतवैष्णवांसी ।
करावें गीतनृत्यकीर्तनांसी । अतिप्रेमेसी अहोरात्र ॥

( ८ ) कलियुगीं जन मंदमती । त्यांसी तरावया सुगमस्थिती ।
परमपावन कृष्णकीर्ती । कृपेनें निश्चितीं विस्तारली ॥
जेथें श्रीकृष्णकीर्तिकीर्तन । तेथें कर्माकर्मांची उजवण ।
होय संसाराची बोळवण । जन्ममरणसमवेत ॥
श्रीकृष्ण कामासी नातळत । कामिनीकाम पूर्ण करित ।
लाजवूनि विधिवेदार्थ । गोपिका समस्त तारिल्या ॥
कृष्ण अंतर्यामी सर्वभूतां । जगत्कर्मांचा कृष्ण कर्ता ।
कर्म करूनि तो अकर्ता । विदेहता निजरूपें ॥
यदुवंशीं कृष्णनाथ । सर्वकर्मीं सदा अलिप्त ।
सृष्टिस्थितिलयतीं नित्यमुक्त । त्यासी परमाद्भुत ते कायी ॥
कृष्णें देह नेला ना त्यागिला । तो लीलाविग्रहें संचला ।
भक्तध्यानीं प्रतिष्ठिला । निजधामा गेला निजात्मयोगें ॥

— श्रीएकनाथी भागवत.

कृष्णस्मरणें उद्धार पतिता । त्याच्या अंगसंगें तरल्याव निता ।
हें आश्चर्य नव्हे तो स्वता । भर्ता भोक्ता प्रतिक्षेत्रीं ॥

—श्रेष्ठांचें भक्तिरहस्य.

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांस—वि. वि.

गेल्या चैत्राच्या मुमुक्षूंत श्रीयुत श्रीराम गोसावी यांनीं श्रीयुत वाटवे यांच्या विरोधभक्तीवरील टीकेस समर्पक उत्तर दिलेंच आहे. त्यांतच आणखी एक मुद्दा पुढें आणावा असें मला वाटतें. परमात्म्याचे हातून पाहिजे त्यास मृत्यु येऊन मुक्ति मिळेल ही गोष्ट संभवनीय नाहीं. जो परमेश्वरभक्त असेल त्यालाच परमेश्वराच्या हातून मृत्यु येईल, व तो मुक्त होईल. विरोधभक्ति करून किंवा अन्यकारणानें परमेश्वराचे हातून मरण येणारे जन्मान्तरीं परमेश्वरभक्तच असले पाहिजेत. पूर्वींच्या जन्मांत कांहीं फार मोठे ज्ञाताज्ञातदोष हातून घडल्यामुळें त्यांस शापदेह प्राप्त झालेले असतात. हिरण्यकश्यपु, रावण इत्यादिकांच्या गोष्टी पुराणप्रसिद्ध आहेतच. राक्षस, हिंस्र पशु इत्यादि ज्या योनींत शापदेह येईल त्या योनिधर्माप्रमाणें त्याच्या क्रिया असणारच. विरोधभक्ति हा केवळ देहसंबंध आहे. आपल्या जन्मातरीं असलेल्या एकनिष्ठ भक्तास मुक्ति देणें हें परमेश्वराचें ब्रीदच आहे.

तो केवळ भक्तांसच मुक्त करतो. " तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान् । क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥ " इत्यादि त्याच्या प्रतिज्ञेस मुळीच बाध येत नाहीं.

रा. ल. घरत.

---

# श्रीएकनाथचरित्र. [आवृत्ति चवथी]

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचा जन्म व बाळपण ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर. इतक्या प्रकरणांत नाथांचे पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून ' स्तुतिसुमनांजलि ' नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणें दिलीं आहेत. पृ. सं. २८८ किं. ८११.

केसरी—" महाराष्ट्रीय साधुकवींच्या चरित्रांचे व ग्रंथांचे परिशीलन करून त्यांचें हृद्गत साध्या सोप्या पण वाचकांचे मनावर विलक्षण छाप बसविणाऱ्या भाषेंत प्रगट करण्यास ज्या प्रेमळतेची, श्रद्धेची, सहृदतेची व भाषाप्रभुत्वाची जरूरी आहे ते गुण रा. पांगारकर यांचेमध्यें पुष्कळ अंशानें वास करीत असल्या-मुळें त्यांची साधुचरित्रमाला महाराष्ट्रांत लोकप्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं. "

## श्रीकृष्णाचें गोचरण ( गाई चारणें )

यमुनातटगत चिमणासा हरि, बाळकृष्ण गोपाळबाळ, बहु कपाळ विस्तृत भाळीं नूतन केशरसुतिलक, वामगळां वनमाळ कमलसम, विशाळ डोळे, मवाळ मनिचा, मृणालभुज करि वेणुनाळ अधरीं राग आळवित, दयाळ श्रीहरिकाणीं कुंडलें ढाळदूध दहि व ढाळ भवत्या दुधाळ गायी, पाळिताति पशुपाळ पाळिनें, माळोमाळ घालिती धुमाळ, त्यांत काळयाढवळया निळया, गवळयाघरिच्या सावळया हरिनें, चुचकारुनि बावळयाच केल्या, उतावळयाशा धांवुनि येती हिरव्या गवतीं, कवळ मुखांतचि, टवकारुनियां तिला सेवावें, खाजवावें, गळां पडावें, कुरवाळावें, पोटा-खालुनि यावें जावें, थान चोखुनी दुग्धचि प्यावें, प्रदक्षणुनियां नमन करावें, कृपाकटाक्षें वरवें पाहावें, नांव घेउनि पाचारावें, ' माय यशोदे ' ह्मणुनि बहावें, ' कौसल्ये ये ! रेणुके ये ! आदित्ये ये ! अनुसूये ये ! अक्रूरे ये ! बिभीषणे ये ! भागिरथि ये ! नर्मदे ये ! पुंडलिके ये ! भीवरे ये ! ' इत्यादी अभिधानें आपुल्या आवडीनें माधव कुंजवनीं, विहरतां सुखानें वेणुनाद, गोपद्म पाउलीं मधें उमटलीं, श्रीपांडुरंग प्रत्यक्ष पाहतो विठ्ठलनिकटीं ॥ गोविंद गाई चारितो कालिंदीतटीं ॥ध्रु०॥

—अमृतराय.

---

## वल्लभाचार्य ( शके १४००–१४५२ )

लक्ष्मणभट्ट नामक एक यजुर्वेदी तेलंगी ब्राह्मण काशीयात्रेसाठीं मगधदेशां-तील चंपकारण्यांतून जात असतांना त्याची स्त्री एलम्मागारु प्रसूत होऊन तिच्या पोटीं एक बाळ जन्मलें ते वल्लभाचार्य होत. यांनीं वृंदावनास व मथुरा येथें आपलें बाल्य व तारुण्य काढलें व तेथेंच श्रीभागवत व इतर भागवतपंथाचे ग्रंथ त्यांच्या श्रवणांत येऊन त्यांना कृष्णभक्तीचा छंद लागला. गोवर्धन पर्वतावर त्यांना श्रीनाथजींचा साक्षात्कार व अनुग्रह झाला. वल्लभाचार्यांनीं पुढें कृष्णभक्तीचा एक विशिष्ट संप्रदाय काढला व त्याच्या प्रसारार्थ वेदांतसूत्र अनुभाष्य भागवतटीका सुबोधिनी व तत्वदीप इ० ग्रंथ लिहिले, व कांहीं सुबोध पद्येंही लिहिलीं. ह्या संप्रदायांत तत्वज्ञान विशेष नाहीं. हा एक भक्तीचा पंथ आहे. याला पुष्टिमार्ग ह्मणतात. पुष्टि ह्म० ईश्वरी अनुग्रह. पुष्टि अनेक प्रकारची आहे. पुष्टीच्या प्रेम, आसक्ति व व्यसन अशा तीन अवस्था आहेत. व्यसन ही पूर्णावस्था होय. जे या अवस्थेप्रत पोंचतात ते मोक्षालाही तुच्छ मानून अखंड हरिसेवा---सुखाचा मार्ग पत्करितात. हरीचें व्यसन ह्म० सर्वांठायीं हरि दिसणें, विश्वांत अंतर्बाह्य पुरुषो-त्तम भरून उरला आहे याचा अनुभव येणें. श्रीकृष्णाच्या बाललीलांचें अनुकरण करणें, कृष्णचिंतन करणें, कृष्णाच्या व्रजभूमींतील लीलांचें निरंतर गायन करणें,

श्रीकृष्णाशी निरंतर गोप किंवा गोपीरूपानें क्रीडा करण्यास मिळणें, राधाकृष्ण-भक्तीचा सोहळा अंतर्यामीं भोगणें, राधाकृष्णांच्या गोलोकीं कृष्णसेवेंत निरंतर रहावयास मिळणें हें या पंथाचें ध्येय आहे. 'नारदभक्तिसूत्रें' या संप्रदायांत अतिशय प्रिय आहेत. हा संप्रदाय मूळचा प्रेमलक्षणभक्तीचा गोड संप्रदाय आहे. ह्या पंथाचा प्रसार गुजराथ, राजपुताना, मथुरावृंदावन या बाजूस बराच झाला आहे. या पंथाचे अनुयायी लक्षाधीश व कोट्यधीश असून बहुतेक वैश्य वर्गांतले आहेत. पूर्वी विष्णुस्वामी ह्मणून द्रविडदेशांत एक नृसिंहोपासक होऊन गेले त्यांच्याच सांप्रदायिक गादीवर यांची प्रथम स्थापना झाली होती. वल्लभाचार्य आपणांस शुद्धाद्वैती ह्मणवितात पण शंकराचार्यांचे मतांशीं हे मिळून नाहींत. यांच्या पंथांत जीव दोन प्रकारचे मानले आहेत. पुरुषोत्तम श्रीकृष्णाची सेवा करणारे ते शुद्ध जीव व बाकीचे अशुद्ध जीव. सेवा ही द्विविध आहे. तनधनांनीं होणारी सेवा ती साधनरूप व मनानें होणारी ती फलरूप. आपण वृंदावनांतील गोपीरूप आहोंत अशा भावनेनें मायोपाधिरहित शुद्ध साकार सच्चिदानंद पुरुषोत्तम जो श्रीकृष्ण त्याच्या अनुग्रहानें जो निर्भर रसानुभव प्राप्त होतो ती यांची मुक्ती, व त्याची शुद्धांतकरणानें सेवा करणारा पण त्याहून भिन्न असा जो जीव तो शुद्ध जीव. वरील अर्थाच्या या संप्रदायांत १० आज्ञा आहेत. गोवर्धन पर्वतावर अप्र-लेली गोवर्धननाथाची मूर्ति शके १४४१ मध्यें वल्लभाचार्यांनीं आणली व मेवा-डांत तिची स्थापना केली. त्या स्थळास नाथद्वार ह्मणतात. वल्लभाचार्यांनीं व त्यांच्या सांप्रदायिक थोर पुरुषांनीं जैनधर्मांतून हजारो भाट्यांस व गुजराथी लोकांस वैदिक धर्मांत आणून कृष्णभक्तीस लावलें आहे. गुरूला समर्पण केल्या-शिवाय आपण कांहीं घ्यायचें नाहीं या भावनेचा गुरूंनीं व महाराजांनीं कसा दुरुपयोग केला हें सर्वश्रुत आहे.

---

# आनंदाच्या लहरी.

( लेखक श्रीहनुमान् प्रसाद पोद्दार, गोरखपूर. )

'पुत्र, स्त्री व धन यांनीं खरी तृप्ति होऊं शकत नाहीं. यांनीं जर ती होत असती तर कोणत्या ना कोणत्या योनींत आजपर्यंत झालीच असती. खऱ्या तृप्तीचें साधन आहे केवळ एक परमात्मा. परमात्मप्राप्ति झाल्यावर जीव सर्वकाळ संतुष्ट होऊन राहतो. दुःख हें मनुष्याच्या विकासाचें साधन आहे. खऱ्या मनुष्याचें जीवन दुःखांनींच विकसित होत असते. सोन्याचा रंग तापविल्यावरच चमकतो,

'नेहमी हंसत —सुख रहा, कधीं म्लानमुख होऊं नका. तुमच्यासाठीं शोक जगतांत उत्पन्नच झाला नाहीं असा पूर्णनिश्चय असूं द्या. आनंद स्वरूपांत हंसण्या-खेरीज चिन्तेला स्थान कोठें आहे ?'

'सर्वत्र परमात्म्याची मधुरमूर्ति पाहून आनंदांत मग्न व्हा, ज्याला सर्व जागीं त्याची मूर्ति दिसते तो स्वतःच आनन्दस्वरूप आहे'

'शांति तुमच्या अंतरांत आहे. कामनारूपी डाकीणीचा आवेश उतरला कीं शांतीचें दर्शन झालेंच म्हणून समजा. वैराग्याच्या महामंत्रानें कामनेला पिटाळून लावा म्हणजे तुम्हांला सर्वत्र शान्तीची प्रशान्त मूर्तिच दिसूं लागेल.'

'जेथें संपत्ति तेथें सुख परंतु संपत्तीच्या भेदानें सुखांतही भेद होतो. दैवीसंपत्तिमानांना परमात्मसुख, आसुरीसंपत्तिमानांना आसुरी सुख आणि नरकां-तल्या किड्यांना नरकसुख मिळतें.'

'कोणत्याही अवस्थेंत मनाला व्यथित होऊं देऊं नका; देवाच्या घरीं कधीं भूल होत नाहीं किंवा त्याचें कोणतेंही विधान दयाशून्यही असत नाहीं, या गोष्टीची चांगली याद ठेवा,'

'परमात्म्यावर विश्वास ठेवून आपलें जीवनसूत्र त्याच्या चरणीं नेहमीं बांधून ठेवा म्हणजे निर्भयता तुमच्या चरणांची दासी होऊन राहील.'

'झाल्यागेल्या गोष्टींची उगीच काळजी करीत बसूं नका, पुढें पहा, आतां जें करावयाचें आहे त्याचा पूर्ण विचार करा आणि तो हाच करा कीं उरलेलें सारें आयुष्य केवळ त्या परमात्म्याच्याच कामीं खर्च करीन.'

'ज्याच्या आयुष्याचा एक एक क्षण आपल्या प्रियतम परमात्म्याच्या अनु-कूलतेसाठीं वेंचला जातो तोच धन्य आहे; ती अनुकूलता पाहिजे तर त्याच्या संयो-गानें होवो किंवा वियोगानें, स्वर्गांत होवो किंवा नरकांत होवो, सन्मानांत होवो-किंवा अपमानांत होवो, मुक्तींत होवो किंवा बंधनांत होवो.'

'सदा आपल्या हृदयाला पारखत रहा, कोठून तरी त्यांत काम, क्रोध,

वैर, ईर्षा, घृणा, हिंसा, मान आणि मदरूपी शत्रूंना येऊन, आपलें बिऱ्हाडी करण्याला वाव मिळूं नये; या पैकीं जो कोणी दिसेल त्याला ठोकून पिटाळून लावा. पण दक्षतापूर्वक करडी नजर मात्र ठेवली पाहिजे कारण हे चोर हळूंच आंत शिरून छपून बसतात आणि वेळ साधून आपलें विक्राळ रूप प्रगट करतात.'

'वरवरचें आचरण पाहून कोणालाही पापी समजूं नका. संभव आहे कीं त्याच्यावर मिथ्या दोषारोपण केलें जात असेल आणि तो त्यापासून आपणाला निर्दोष शाबीत करण्यासारख्या परिस्थितींत नसेल, किंवा त्यानें विशिष्ट परिस्थितींत सांपडल्यामुळें अनिच्छेनें एखादें वाईट काम केलें असेल, तथापि त्याचें अंतःकरण तुमच्या अंतःकरणापेक्षां अधिक पवित्र असूं शकेल!'

'घर माझें आहे या भावनेंत चुन्यामातीच्या कणाकणांत माझेपणा भरला आहे; तें विकून टाकलें, चेक हातांत आला, त्यानंतर घराला आग लागली. मी म्हणूं लागतों 'फार चांगलें झालें, रुपये मिळालें' 'माझेंपण' सुटतांच घर जळाल्याचें दुःख मिटलें. आतां चेकरूपी कागदाच्या तुकड्यांत 'माझेंपण' आलें; मोठ्या थोरल्या घरांतून सगळें 'माझेंपण' निघून कागदाच्या एका चिटोऱ्यांत आलें; आतां त्या चेकाकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची कोणाचीहि छाती नाहीं. चेक वटविला गेला, रुपयांची पिशवी हातांत आली. मग चेक फाटला किंवा जळून गेला तरी चिंता नाहीं. सगळी ममता पिशवींत उतरली! आतां त्या पिशवीचीच काळजी. त्यानंतर कोणा सावकाराजवळ ठेव ठेविली. ठेवीनंतर पाहिजे तर त्या रुपयांची चोरी कां होईना त्यांची मुळींच फिकीर नाहीं. त्याच्या खातेवहींत आपले रुपये जमा असावेत आणि त्याची सावकारी मात्र चालू असावी म्हणजे झालें; चिंता असलीच तर हीच कीं सावकारानें आपलें दिवाळें वाजवूं नये या प्रमाणें ज्या ठिकाणीं ममता जडते त्याचीच काळजी वाटू लागते. ही ममताच दुःखाचें मूळ आहे. वास्तविक 'माझें' हा कांहीं पदार्थ नाहीं. तसा तो असतां तर नेहमीं बरोबर राहिला असता, परंतु शरीर देखील बरोबर जात नाहीं. फुकटच 'माझें—माझें' म्हणून दुःखाचें ओझें लादलें जात आहे. ज्याची वस्तु त्याच्यावर सोंपवून टाका. जगतांतील सर्व पदार्थांतून 'माझेंपण' काढून घेऊन केवळ परमात्म्यालाच 'माझा' म्हणा. मग दुःखाचें मूळच उखडलें जाईल.'

'या जगतांत सगळेच धर्मशाळेंतले उतारू आहेत, थोडा वेळ एकाजागीं टिकले आहेत. वेळेवर सर्वांनाच येथून जावयाचें आहे. घरदार कोणाचेंही नव्हे मग त्यासाठीं दुसऱ्याशीं भांडावें कशाला?'

'सृष्टींत जड असें कांहींही नाहीं. आमची जडवृत्ति हीच आम्हांला जडतेचें दर्शन करवीत आहे! खरें पाहिलें तर जिकडें पहावें तिकडें तें परम सुखस्वरूप

नित्यचैतन्य भरून राहिलें आहे. तुम्ही—आम्हीं कोणीही त्यापासून भिन्न नाहीं. असें असतांना मग दुःख कां भोगता? सर्वदा—सर्वथा निजानन्दांत निमग्न होऊन रहा.'

'जेथें गुणांचें साम्राज्य नाहीं अशा प्रदेशीं जाऊन रहा. म्हणजे निर्भय आणि निश्चित व्हाल. हे गुणच दुःखांच्या राशी होत.'

'दुसऱ्यांना पापाचें प्रायश्चित्त देण्याची काळजी नका करूं, प्रथम स्वतःच्या पापाचें प्रायश्चित्त घ्या.'

'एखाद्याचे दोष पाहून त्याची घृणा करूं नका किंवा त्याचें वाईट चिंतूं नका. असें न कराल तर, न जाणें त्याचा दोष केव्हां दूर होईल तो, पण तुमच्या ठिकाणीं घृणा, क्रोध, द्वेष आणि हिंसा यांना अवश्य स्थान मिळेल. त्याच्यांत एकच दोष होता पण तुमच्यांत मात्र चार येतील. तुमच्या व त्याच्या दोषांचीं नांवें निरनिराळीं असतील.

'दुसऱ्यांचें पाप चवाट्यावर मांडण्याऐवजीं त्यांचे सुहृद् होऊन तें झांका. सुई छिद्र करते पण दोरा आपल्या शरीराचा अंश देऊनही ते छिद्र भरून काढतो; त्याप्रमाणें दुसऱ्यांचीं छिद्रें भरण्यासाठीं आपलें शरीर अर्पण करा; पण त्यांची छिद्रें मात्र उघडी करूं नका. दोरा व्हा सुई होऊं नका.'

'भगवंत नेहमीं आपल्या बरोबर आहे याची याद ठेवून काम केलें म्हण--जेच पापांपासून रक्षण होतें आणि कार्यांत सफळता मिळते.'

'आपलें मनच वैरी आहे. त्याला जिंकण्याची हिंमत केली पाहिजे.'

'न्यायी व धर्मशील शत्रु देखील अन्यायी व अधर्मी मित्रापेक्षा चांगला.'

'आपली स्वतंत्रता राखण्यासाठीं दुसऱ्याला परतंत्र करणें हें अगदींच अनुचित होय.'

'जर तुम्हाला दुसऱ्यानें स्वस्थपणानें आपलें म्हणणें ऐकावें व समजून घ्यावें असें वाटत असेल तर अशा प्रकारें त्याचें म्हणणें ऐकून घेण्याला तुमचीही तयारी असली पाहिजे.'

'जर तुमची अशी इच्छा असेल कीं दुसरे लोक सहनशील असावेत तर तुम्हीं प्रथम खुद्द सहनशील बना.'

'जर तुम्हीं, दुसऱ्या कोणाच्या मनाविरुद्ध एकादें कार्य करण्याचा आपला अधिकार मानत असाल तर त्याचाही हाच अधिकार कबूल करा.

'आपल्या मनाविरुद्ध शद्ब कानीं येताच एकाद्याच्या प्रामाणिकपणासंबंधीं संदेह करणें उचित नाहीं.'

'आपल्या पापांवर नजर ठेवणें व त्यांना प्रसिद्ध करणें हाहि पापापासून

सुटण्याचा एक प्रधान उपाय आहे. '

' जे लोक भगवन्नामाचा आधार घेऊन पाप करतात, जे नित्य नवें पाप करून प्रत्येक दिवशीं नामानें तीं धुवून टाकण्याची अभिलाषा धरतात, त्यांना नीचच समजा, त्यांचें पाप यमराज सुद्धां धुवूं शकत नाहीं. '

' पापांपासून सुटावें म्हणून किंवा भोग मिळावेत म्हणूनही भगवन्नामाचा उपयोग करणें शहाणपणाचें नव्हे. पापाचा नाश प्रायश्चित्तानें प्रारब्धभोगानें होऊन जातोच, तुच्छ अशा नाशवंत भोगांची पर्वाच कशाला करावी ? ते मिळाले किंवा न मिळाले तर त्यांत लाभ – हानि ती कोणती ? '

' भगवन्नाम ही अत्यंत प्रियतम अशी वस्तु आहे तिचा उपयोग फक्त त्याच्यासाठींच केला पाहिजे. '

' पाप प्रारब्धानेंच होते या भ्रमांत राहूं नका, तें होतें तुमच्या आसक्तीमुळें आणि त्याचें फल तुम्हांस भोगावेंच लागेल. '

' परमात्म्यावर विश्वास नसल्यामुळेंच विपत्तींचें, विषयांच्या नाशाचें आणि मृत्यूचें भय वाटतें आणि तोंपर्यंतच शोक व मोह राहतात. ज्यांचा त्या भयहारि भगवंतावर भरंवसा आहे ते शोकरहित, निर्मोह आणि नित्य निर्भय होऊन जातात. '

' मानाचे इच्छुकच अपमानाला उरतात. मानाचें ओझें मनावरून उतरतांच मन हलकें व बेडर बनून जाते. '

' शरीराचा नाश हा मृत्यु नव्हे, खरें म्हटलें तर पापाची वासना म्हणजेच मृत्यु ! '

' मृत्यूला स्वाभाविक बनविणारेच सुखानें मरतात. '

' जे आत्म्याला अमर जाणत नाहींत तेच मृत्यूला थरथर कापूं लागतात. '

' कोणाला शिवी देऊं नका, वृथा बोलूं नका, चुगली करूं नका, असत्य बोलूं नका, सदा कमी बोला आणि प्रत्येक शब्द सावधानतापूर्वक उच्चारण करा. '

' दुसऱ्यांची उणीव व कमजोरपणा सहन करा, तुमच्यांतही पुष्कळ उणीवा आहेत व त्या सहन करणें दुसऱ्यांना अशक्य आहे. '

' कोणाला पापी समजून, मी पुण्यात्मा आहे असा मनांत अभिमान करूं नका. कोण जाणें आयुष्यांत कसा कुअवसर येईल आणि तुम्हालाही त्याच्यासारखेंच पाप करावें लागेल! '

' वारंवार आत्मनिरीक्षण होत नसेल तर निदान कमींत कमी दिवसाकाठीं सकाळीं व सायंकाळीं दोनवेळा आपलें अन्तर अवश्य पहात जा. म्हणजे दिवसभर तुमच्याकडून ईश्वराचें व जीवाचें किती अपराध झाले आहेत याचा पत्ता लागेल. '

'श्रीमंतांचें बाहेरचें ऐश्वर्य पाहून लोक समजतात कीं हे मोठे सुखी आहेत, आम्ही ही असेंच ऐश्वर्यवान् होऊं तेव्हां सुखी होऊं, पण ते भुलत आहेत; ज्यानीं श्रीमंतांच्या अंतःकरणाचा ठाव घेतला आहे त्यांना याचा पत्ता लागला आहे कीं, श्रीमंत, दरिद्र्यांहून कमी दुःखी नाहीं आहेत. दुःखाचें कारण आणि त्याचें रूप ही मात्र अवश्य भिन्न भिन्न आहेत.

'धनाची इच्छा कधीं करूं नका, इच्छा धरा त्या परमधन परमात्म्याची कीं जें एकदां मिळाल्यावर कधींच नष्ट होत नाहीं.'

'धनांत सुख नाहीं. कारण धन हें आज आहे व उद्यां नाहीं. खरें सुख परमात्म्याचें ठिकाणीं आहे जे नेहमीं जसेंच्या तसेंच राहते.'

'प्रत्येक दिवशीं सकाळ—संध्याकाळ मन लावून भगवंताचें स्मरण अवश्य करीत जा, त्यानें चोवीस तास शांति राहील आणि मन वाईट संस्कारांपासून बचावेल.'

'धन—संपत्ति किंवा मित्र मिळाले असतां अभिमान करू नका. ज्या परमात्म्यानें तुम्हाला हें सर्व दिलें आहे त्याचे उपकार माना.'

'ज्याचें अंतःकरण समस्त पाप—तापांतून मोकळे होऊन तें केवळ आपल्या इष्टदेव परमात्म्याचें नित्य निकेतन बनून गेलें आहे तोच भक्त होय.'

'भक्ताचें हृदयच जर पाप—शून्य होतें तर त्याच्या शारीरिक क्रियांत पापाला स्थान कोठें आहे? जे रात्रंदिवस पापांतच लोळत राहून आपणाला भक्त समजतात ते, एक तर लोकांना लुबाडण्याकरितां असें करीत आहेत किंवा स्वतः ठकले गेले आहेत!'

'भक्त व साधु बनलें पाहिजे, म्हणविले जाऊं नये. दुसऱ्यांनीं म्हणावें याकरितां जे भक्त बनूं इच्छितात ते पापाकडून ठकले जातात; अशा लोकांवर पहिल्याप्रथम दंभाचें आक्रमण होतें.'

'भक्ति आपल्या सुखासाठीं केली जाते, दुनियेला दाखविण्यासाठीं नाहीं. जेथें दाखविण्याचा भाव आहे तेथें कृत्रिमता आलीच.'

'पापी माणसें आपल्या पापाचा दोष हलका करण्यासाठीं किंवा पापकर्माला सवड मिळावी म्हणून शास्त्राचा मन मानेल तसा अर्थ करून आपले मनोरथ सिद्ध करूं पहातात. भगवान् श्रीकृष्णाच्या ठिकाणीं कलंक नाहीं. पाप्यांची पापवासनाच त्याच्यावर कलंकाचा आरोप करीत असते.'

'श्रीकृष्णाचें उदाहरण देऊन पाप करणारेच कलंकस्वरूप होत, श्रीकृष्याचें निर्मळ चरित्र तर नेहमींच निष्कलंक आहे.'

‘ भगवंताकडून ढोंगी मनुष्याला कोपाचा आणि अकृत्रिम मनुष्याला करु-णेचा प्रसाद मिळत असतो. कोपाचा प्रसाद तावून तापवून त्याला शुद्ध करतो आणि करुणेचा प्रसाद तर शुद्ध झालेल्या पुरुषालाच मिळतो. ’

‘ ज्याला भगवंताचा भक्त व्हावयाचे असेल त्यानें प्रथम आपलें हृदय शुद्ध केलें पाहिजे. त्यानें भगवंताला एकान्तांत कातरस्वरानें अशी प्रार्थना करावी कीं ‘ हे भगवंता ! तुला प्रत्येकक्षणीं हृदयांत विराजत असलेला पाहून माझ्या मनांत किंचित् देखील पापवासना उत्पन्न होऊं नये अशी कृपा कर; आणि मग त्या निर्मल हृदयसिंहासनावर तुला स्थिर करून तुझें क्षणोक्षणीं दर्शन घेत मी निरति-शय आनंदांत निमग्न होऊन रहावें. ’

---

# सार्थ सुभाषितरत्नखंडें

## भाषांतरकार—श्रीराम गोसावी, नाशीक

१७४ **देहस्नेहो हि दुस्त्यजः**

आपल्या देहावरची ममता टाकणें फार कठीण आहे.

१७५ **दैवे दुर्जनतां गते तृणमपि प्रायेण वज्रायते.**

एकदां दैवानेंच दावा धरला मग गवताच्या काडीचेंही वज्र होण्यास काय अवकाश आहे ?

१७६ **द्रव्येण सर्वे वशाः**

पैशानें सारे मारले जातात.

१७७ **धनं सर्वप्रयोजनम्.**

सर्वांला पैशाची जरुरी आहे.

१७८ **धर्मः सत्येन वर्धते.**

धर्माची वाढ सत्यानें होत असतें.

१७९ **धिक्पुत्रमविनीतं च**

उद्धट पोराचा धिक्कार असो.

१८० **न जाने संसारः किममृतमयः किं विषमयः**

हा संसार अमृतमय आहे कीं विषमय आहे, कांहीं कळत नाहीं.

---

# मराठी वाङ्मयाचा इतिहास—खंड पहिला

**पृ० सं० ८३२ ] ज्ञानेश्वरनामदेवांचा काल [ किंमत रुपये चार**

**ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए.**


**प्रास्ताविकः**—वेदधर्मीयांची एकरूपता पृ० १ परंपरेच्या ज्ञानाची अवश्यकता ३

**१ वेदविद्याः**—विषयप्रवेश पृ. ९ ऋग्वेद ११ वैदिकदेवतांच्या प्रार्थना १३ ऋग्वेदांतील अध्यात्मविद्या १९ यजुर्वेद २६ सामवेद २८ अथर्ववेद २९ वेदांगें ३३ वेदोपांगें ३५ उपवेद ३८ सांख्यशास्त्र ३९ पातंजलयोग ४४

**२ उपनिषदांतील ब्रह्मविद्याः**—दशोपनिषदें पृ. ४७ आत्मविद्या व आत्मविद् ४८ शांडिल्य ५६ आरुणि ५७ दध्यङ् आथर्वण ५९ याज्ञवल्क्य ६१ कठोपनिषद्—नचिकेत व यम यांचा संवाद ६४ सृष्ट्युत्पत्तीची काहणी ७४ नीतीचा व साधनमार्गाचा उपदेश ७७ ब्रह्मविद्येचा आनंद ८० उपनिषदांतील कांहीं सूत्रें ८४

**३ भागवद्गीताः** - स्वधर्मकर्म ८७ मोहनिरास हा गीताशास्त्राचा हेतु ८८ ज्ञानोत्तरभक्ति हें गीतेचें रहस्य ९१ गीता आणि उपनिषदें १०५ गीताभागवतांतील नवविधाभक्ति १०८

**४ श्रीमद्भागवतः**—गीता आणि भागवत १११ भागवतपुराण ११२ भागवताचा काल ११३ अभेदाची बैठक ११६ भागवतांतील मुख्यविषय ११८ श्रीकृष्णांचा संसार १२३ भक्तीचें स्वरूप १३१ उत्तम भक्त १३४ भगवंताच्या रूपाचें ध्यान १३६ गुणानुवाद व नामसंकीर्तन १४१ संत व सत्संगाची महती १४६ भागवतधर्माची मुख्य तत्वें १४९ गोपींचें भक्तिप्रेम १५५

**५ भक्तिमार्गाचें अनादित्व व शिवविष्णुसंप्रदायः**—भक्तिमार्गाचें औदार्य १६५ भक्तिमार्ग वेदांत आहे १६६ पंचरात्रमत व भागवतधर्म १६९ शिवविष्णु ह्या देवता वैदिक आहेत १७१ शिवविष्णूंची एकात्मता १७७

**६ मधल्या काळाचा थोडा इतिहासः**—ब्राह्मण व क्षत्रिय १८१ अवनतीस आरंभ १८४ गौतमबुद्ध व महावीर १८५ वैदिक धर्माचे सिद्धांत १८७ बौद्ध व जैन पंथ १९० मौर्य चंद्रगुप्त १९१ अशोक १९३ अशोकाचे आदेश १९५ पुष्पमित्र व विक्रमादित्य १९९ समुद्रगुप्त, चंद्रगुप्त व गुप्तसाम्राज्य २०१ हूणांच्या टोळधाडी २०५ सम्राट् हर्षवर्धन २०६ सातव्या शतकांतल्या हिंदुसमाजाची स्थिति २०९ काश्मीर, कनोज, धार इ० हिंदु राज्यें २१५ टोळधाडी व त्यांचा प्रतीकार २२२ बुद्धपंथाचें परदेशीं प्रयाण २२३

७ तामीळांचें साम्राज्य, तामीळ संत व तामीळ आचार्यः—
तामीळांची श्रेष्ठ कामगिरी २१७ करिकेल चोल २२९ चोल राजे २३० चोलांची राज्यव्यवस्था २३४ पांड्य, चेर व पल्लव २३६ तामीळांचीं अजस्र शिल्पकामें २३८ तामीळ वाङ्मय २३९ बारा अळवार ऊर्फ वैष्णव २४२ नम्मा-ळवार २४७ तिरुज्ञानसंबंदर २५० अप्पर २५४ संबंदर व अप्पर २५६ सुंदरमूर्ति २५८ माणिकवासहर २५९ तिरुमुलर २६४ प्रेममूर्ति नंद २६५ कुमारीलभट्ट २७४ शंकराचार्य २७६ शंकराचार्यांची कामगिरी २७९ आचार्यांची ग्रंथसंपत्ति २८२ रामानुजपंथाचे आचार्य २८६ शंकराचार्य व रामानुजाचार्य यांचीं मतें २९१ मध्वाचार्य २९५ तीनही आचार्यांचें मतैक्य २९८

## उत्तरार्ध

८ महाराष्ट्रदेश व मराठेः – दण्डकारण्य ३०१ महाराष्ट्राच्या चतुःसीमा ३०५ राष्ट्रकूट व शालिवाहन ३०८ पुळकेशी चालुक्य ३१४ पुन्हा राष्ट्रकूट ३१६ उत्तर चालुक्य ३१९ ठाण्याचे शिलाहार उर्फ शेलार ३२१ छोटीं मराठीं संस्थानें ३२३ देवगिरीचे यादव ३२५ भिल्लम व सिंघण ३२६ विद्या व कला यांना प्रोत्साहन ३२७ कृष्णदेव, महादेव व रामदेवराव ३२९ हेमाद्री व बोपदेव ३३१ पंढरपूरचा कृष्णभक्तिसंप्रदाय ३३५ ज्ञानेश्वरांनीं केलेले रामदेवरावांचें गौरव ३३७ स्वराज्याचें सुख ३३८

९ महाराष्ट्री उर्फ मराठी भाषाः–देशी भाषांचा उगम ३४३ वररुचीचें व्याकरण ३४६ हालाची सप्तशती ३४८ कर्पूरमंजरी ३५२ मराठी भाषा बनत होती, ३५४ मुकुंदराज व मराठी भाषा ३६० महानुभाव व मराठी भाषा ३६३ ज्ञानेश्वरांची मऱ्हाठी–साहित्य आणि शांति ३६७ संस्कृतच्या बरोबरीची मऱ्हाठी ३७० मऱ्हाठी शांतरसाचें घर ३७२ मऱ्हाठी वाङ्मय हें आनंदाचें आवार आहे. ३७५ ग्रंथरचनेचा हेतु व सविनय समाधान ३७७ जुन्या काव्यांच्या प्रती ३८०

१० आदिकवि मुकुंदराजः—कालगणना ३८९ गुरुपरंपरा ३९२ ग्रंथर-चना ३९५ विवेकसिंधु ३९६ परमामृत ४०१ वेदांत व राजयोग ४०६ सगुणो-पासना ४१०

११ महानुभावपंथाचें मराठी वाङ्मयः–पंथाचे संस्थापक व प्रचारक ४१३ महानुभावपंथाचे आचारविचार ४१६ पंथाविषयीं लोकांत अप्रियता कां? ४२४ सात प्रमुख ग्रंथ ४२६ कवीश्वर भास्कराचा 'शिशुपालवध' ४२७ भास्क-राचा एकादशस्कंध ४४० भास्करकवीचें कृष्णचरित्रपर गद्यपद्यादि ग्रंथ ४४३ महदंबेचे धवळे ४४६ चक्रधराची दिनचर्या ४५२ केशवराज सूरि ४५५ दामोदर-

पंडिताचें 'वत्सहरण' ४५६ नरेंद्राचें रुक्मिणीस्वयंवर ४६५ ज्ञानप्रबोध ४६६ ऋद्धिपूरवर्णन ४७१ महानुभावपंथ व वारकरीपंथ ४७४

१२ नाथपरंपरा:—नाथपरंपरा ४८१ गोरक्षनाथ ४८२ नाथपंथाचीं मतें ४८४ नाथपंथाचा महाराष्ट्राशीं संबंध ४८५ गोरक्षनाथांचें कवित्व ४८८ गहिनी-नाथांचा बोध ४९२ निवृत्तिनाथांचा गुरुपरंपरेचा अभंग ४९३ गुरुपरंपरेविषयीं ज्ञानेश्वरांच्या ओव्या ४९४

१३ श्रीज्ञानेश्वरदर्शन:—कालानुक्रम ४९७ ज्ञानेश्वरांचीं दोन जुनीं चरित्रें ४९९ नामदेवानीं वर्णिलेलें चरित्र ५०१ सत्यामळनाथलिखित ज्ञानेश्वर चरित्र ५०६ ज्ञानेश्वरांचें आत्मचरित्र ५११ पूर्वील ग्रंथांचे संस्कार ५१७ श्रीगुरु-निवृत्तिनाथ ५२३ ज्ञानेश्वरांची गुरुभक्ति ५२९ कृष्णार्जुनप्रेमसंग ५३६ समकालीन संतांची ज्ञानेश्वरनिष्ठा ५४२ भक्तीचा जिव्हाळा व हृदयाची प्रेमलता ५४५

१४ भक्त नामदेव (पूर्वार्ध):—नामदेवांच्या अभंगांची गाथा ५५३ नामदेव ५५७ पंढरीक्षेत्र व विठ्ठलभक्ति ५५८ प्रेमाचा रुसवा ५६५ भक्तीचें प्रेम-सुख ५६७ खऱ्याखोट्याची निवड ५६९ नामदेवांच्या वाणीची गोडी ५७१ पहिला शिष्य परिसाभागवत ५७३ ज्ञानेश्वरनामदेवांच्या तीर्थयात्रा ५७७ गोरा कुंभार ५८२ कच्चा घट ५८४ गुरु विसोबाखेचर ५८५ नामदेवांच्या घरची मंडळी ५८९

१५ संतमेळा व त्याचें अभंगवाङ्मय:—प्रास्ताविक ५९५ ओवी व अभंग ५९६ ज्ञानेश्वरीकारांचेच अभंग आहेत. ५९७ 'बाप रखुमादेवीवर' ६०१ ज्ञानेश्वरांची अभंगवाणी ६०२ 'गोपाळेंविण नुद्धरिजे' ६०८ 'आवडे तें करिसी देवा' ६१० आंधळा, घोंगडी, काऊ ६१३ हरिपाठाचे अभंग ६१७ मुक्ताबाई ६२१ ताटीचे अभंग ६२२ मुक्ताबाई व चांगदेव ६२३ जनाबाई ६२६ जनाबाईची प्रेमळवाणी ६३१ मुक्ताबाई व जनाबाई ६३४ सोपानदेव ६३७ सच्चिदानंद बाबा कान्हू पाठक ६३९ सेना न्हावी ६४० नरहरि सोनार ६४३ सावता माळी ६४५ जगमित्र नागा ६४६ जोगा परमानंद ६४८ चोखामेळा ६५१ वैष्णवांचा मेळा ६५७ दहीकाल्याचा प्रसाद ६५८

१६ ज्ञानेश्वरीचें अंतरंग:—साहित्याची शोभा ६६१ उपमारूपकादि अलंकारांची गर्दी ६६२ गीतेची थोरवी ६७२ आठरा अध्यायांतील विषय ६७४ ज्ञानेश्वरींत मुख्य पातंजलयोग नाहीं, अध्यात्मयोग आहे. ६७६ जितेंद्रियता ६८० कर्मयोग ६८३ ज्ञानयोग ६८७ ज्ञानाची किंवा दैवीसंपत्तीचीं लक्षणें ६९१ अज्ञा-नाचीं किंवा आसुरीसंपत्तीचीं लक्षणें ६९५ धर्मनष्टांचे आचारविचार ६९७ भक्ति-योग ६९९ अद्वैतभक्तीचें स्वरूप ७०६ परमात्म्याची व्यापकता ७०७ पुरुषोत्तमाची

भक्ति ७१० कर्माची हातवटी ७११ ज्ञानभक्तीची पराकाष्टा ७१४ खरी शरणागति ७१७ परम रहस्य ७१९ अमृतानुभव ७२४

१७ ज्ञानेश्वरी सृष्टीः—आध्यात्मिक दृष्टि व आधिभौतिक सृष्टि ७३९ राजकीय परिस्थिति ७४० व्यापार व उद्योगधंदे--मोती चौक ७४३ व्यापार व उद्योगधंदे- बाजार पेठा ७४६ शेती व बागाईत ७५० रोग, रोगनिवारण व वैद्य ७५३ नानाप्रकारचे लोक ७५५ लौकिक समजुती ७५८ शास्त्रीय कल्पना ७५९ प्रपंच ब्रह्मरूप आहे. ७६१ पतिपत्नींची एकरूपता ७६२ लग्न व पाहुणे ७६६ भोजनाचे पदार्थ ७६८ पतिव्रता स्त्री ७६९ अपत्यप्रेम ७७० गुरुभक्ति ७७४ तरुणांचे खेळ ७७५ वृक्षवेली ७७६ पशुपक्षी व कृमिकीटक ७७८ सिंह आणि गाय ७८२ शिकार, पारधी व पोपट ५८५ चकोर आणि चातक ७८७ भ्रमर, चक्रवाक, कासवी व बक ७९० इतर कांहीं प्राणी ७९२

१८ भक्त नामदेव ( उत्तरार्ध ) : -कीर्तनाचा सुखसोहळा ७९७ पंजाबांतील कामगिरी ७९८ ग्रंथसाहेबांतलीं नामदेवांचीं पद्यें ८०० मेलेली गाय उठवली याबद्दल नामदेवांचें पद्य ८०५ नामदेव व नरसी मेहता ८०९

मिळण्याचा पत्ता --मुमुक्षु कचेरी नाशीक सिटी.

---

# मोरोपंती वेचे.

आवृत्ति दुसरी. किं. १॥१२

ग्रंथकारः--ल. रा. पांगारकर. बी. ए.


महाकवि श्रीमोरोपंत यांची पाउणलाख कविता घेऊन वाचण्याची ज्यांना सवड नाहीं त्यांनीं पंतकवितार्णवांतील रमणीय मोत्यें एकत्रित केलेला हा एकच ग्रंथ जवळ करावा केसरीकारांनीं म्हटलें आहे. " महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक, प्रेमळ, भाषाभिमानी, धर्मनीतिव्यवहारज्ञ व लहान थोर अशा सर्व वाचकांनीं संग्रह करण्यासारखा रा. पांगारकरांचा हा ग्रंथ झाला आहे. या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं आहेतः--

१ ईश्वरभक्तिपर २ कवि आणि कविता ३ उपदेशपर ४ वर्णनपर ५ कथानकपर ६ चक्रीरामायण ७ विविधविषयपर.

प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत निबंध दिला असून त्यांत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे गुण, काव्याची महती इ० विषयांचे सांगोपांग विवेचन केलें आहे. ग्रंथाला टीपा, संदर्भ कांहीं अप्रसिद्ध प्रकरणें व पंताचें संक्षिप्त चरित्र जोडलें आहे.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २७ मास १ ) भाद्रपद शके १८५४ सपटंबर इ. स. १९३२ ( नवें वर्ष १२ वें अंक ९

वार्षिक वर्गणी रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३८३



## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी, ए.

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.



मुद्रकः—विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६ लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | ... | १ |
| २ पारिजातकाचीं फुलें | ... | २ |
| ३ संत वाङ्मय | ... | ३--१९ |
| ४ मराठी वाङ्मयाचा इतिहास. | | ११-१२ |
| ५ मनबागेचा सोनचाफा | | १३--१७ |
| ६ उपनिषदांतील मननीय वेंचे | ... | १८--२३ |
| ७ भक्तीवरील कांहीं आक्षेप | ... | २४--२९ |
| ८ श्रीयाज्ञवल्क्य मूर्ति प्रतिष्ठा | ... | ३० |
| ९ मराठी वाङ्मयाचा इतिहास ( ज्ञानप्रकाश व महाराष्ट्र या पत्रांचे अभिप्राय ) | ... | ३१--३२ |
| १० आनंदाच्या लहरी | ... | ३३--४० |


## ग्राहक-वाचकांस

१ ग्राहकांपैकीं प्रत्येकानें आणखी दोन नवे ग्राहक सपटंबरपासून मिळवून द्यावेत ह्मणजे मुमुक्षूचें जीवन सुरक्षित राहील. वर्गणीदारां--वरच मुमुक्षु जिवंत राहणें शक्य आहे, तो बंद करण्याची पाळी न यावी अशी आमची फार इच्छा आहे. वर्गणीदार वाढण्याऐवजीं घटत चालल्यास हें अशक्य होईल.

२ 'मराठी वाङ्मयाचा इतिहास'—खंड १ ला हा आमचा नवा ग्रंथ येथें आमचे कचेरींतच मागवावा किं रु ४ व्ही पी नें ४।१२

३ मुंबईस हा ग्रंथ 'पागनीस पेटकर आणि मंडळी' प्रार्थना समाजसमोर गिरगावांत मिळेल व पुण्यास लक्ष्मणराव अयाचित, जोगेश्वरीजवळ, पेठ बुधवार, यांजकडे मिळेल.

पत्ता:—'मुमुक्षु' कचेरी, नाशीक सिटी.

सुमुक्षु मासिक
वर्ष १२ वें

# मंगलाचरण

सपटंबर १९३२
अंक ९



## श्लोक

मुदा करात्तमोदकं सदा विमुक्तिसाधकं
कलाधरावतंसकं विलासिलोकरक्षकम् ।
अनायकैकनायकं विनाशितेभदैत्यकं
नताशुभाशुनाशकं नमामि तं विनायकम् ॥ १ ॥

**भावार्थः—** श्रीविनायकाला माझें नमन असो ! त्यानें आनंदानें हातांत मोदक घेतला आहे. विनायक हा मोक्ष साधून देणारा आहे. तो सकल कलावंतांचा अग्रणी आहे. विलासि लोकांचा रक्षक असून ज्यांना कोणी नायक नाहीं अशा अनाथांचा तो नाथ आहे. इभदैत्याचा त्यानें स्वपराक्रमानें नाश केला आहे. तो शरणागतांचीं विघ्नें त्वरित निवारण करीत असतो.

नितान्तकान्तदन्तकान्तिमन्तकान्तकात्मजं
अचिन्त्यरूपमन्तहीनमन्तरायकृन्तनम् ।
हृदन्तरे निरंतरं वसन्तमेव योगिनाम्
तमेकदन्तमेव तं विचिंतयामि सन्ततम् ॥ २ ॥

**भावार्थः—** ज्याच्या दंतांची कान्ति अत्यंत रमणीय आहे, मृत्यूचा पराजय करणाऱ्या मृत्युंजयाचा ह्म० शंकराचा जो पुत्र आहे, ज्याचें स्वरूप अचिंत्य आहे, ज्याला अन्त नाहीं ह्मणजे जो अनंत आहे, जो अंतरायांचा ह्म० विघ्नांचा फडशा उडवून टाकणारा आहे, जो योग्यांच्या हृदयांत निरंतर वास करितो, त्या एकदंताचें मी सतत चिंतन करितों.

यमेकाक्षरं निर्मलं निर्विकल्पं
गुणातीतमानंदमाकारशून्यम् ।
परंपारमोंकारमाम्नायगर्भं
वदन्ति प्रगल्भं पुराणं तमीडे ॥ ३ ॥
चिदानंद सांद्राय शांताय तुभ्यं

नमो विश्वकर्त्रे च हर्त्रे च तुभ्यम् ।
नमोऽनंतलीलाय कैवल्यभासे
नमो विश्वबीज प्रसीदेशसूनो ॥ ४ ॥
—श्रीमच्छंकराचार्याः

# पारिजातकाचीं ताजीं फुलें

१

गुणश्रेष्ठ, उदात्त, उन्नत व्यक्ति किंवा वस्तु यावर समाज लुब्ध होतो तेव्हां तो उन्नतीच्या मार्गाला लागला आहे असें समजावें; याच्या उलट हीन वस्तु व हीन व्यक्ति लोकांना आवडायला लागल्या कीं समाज अधोगतीला चालला आहे हें निश्चयानें जाणावें.

२

सांप्रत थोडीफार विद्या शिकलेलेच नव्हेत, तर बी. ए. एम्. ए. झालेले विद्वान् बेकारींत जमा होत आहेत, व चहाचे दुकानदार, हेअरकटिंग सलून काढणारे व दारूच्या मत्त्याचे दलाल यांची चलती होत आहे !

३

विद्वानांचे शास्त्रीय ग्रंथ मागे पडून ठक्रूरंगूच्या प्रणयकथांवर व नाटकसिनेमांवर, तरुणांच्या उड्या पडत आहेत हें काय उन्नतीचें लक्षण समजायचें ! पनवेलकर फडक्यांच्या 'नवयुगधर्मांच्या' किंवा कोल्हाटकरांच्या 'भागवतादर्शां'च्या प्रती कोन्याकोपऱ्यांत पडून राहिल्या आहेत आणि बाष्कळ प्रणयांच्या कल्पित कथा खपत आहेत ! औंधचा 'पुरुषार्थ' बडोद्याचा 'व्यायाम' धुळ्याचा 'रामदास-रामदासी' असल्या भारदस्त मासिकांना ग्राहक नाहींत; 'मुमुक्षु'ही नुकसानींत चालला आहे! आणि:—

४

५०।६० वर्षांपूर्वी नगरच्या एका कवीनें वर्णन केलेलें स्मरतें:—

समय बाका । कुणिकडे लपाला पैका ॥ ध्रु० ॥
वेदशास्त्राला कोणि पुसेना ह्मणति लावण्या शिका ।
पतिव्रता त्या दुःख भोगिती डोइंत झाल्या लिखा ।
शिंदळी रांडा मौजा मारिती निशिदिनि वाजति डंका ॥

५

या सृष्टींत परमेश्वर सत्यनिष्ठ लोकांवर, सच्छील नेमनिष्ठ माणसांवरच

अधिक संकटें आणतो यांत त्या दयासागराचाही कांहीं गूढ हेतु असलाच पाहिजे. कसावर घांसल्याशिवाय सोन्याचें सोनेपण सिद्ध व्हावें कसें! सोनें आणि पितळ एरवी सारखेंच दिसतें. 'घृष्टं घृष्टं पुनरपि पुनश्चंदनं चारुगंधं' चंदन अधिकाधिक जों घासलें जातें तों तों त्याचा अधिकाधिक परिमळ पसरत जातो! चंदनानें घर्षणाला त्रासता कामा नये व अस्सल चंदन त्रासतही नाहीं व ह्मणूनच तें चंदन या मोलानें पुढें विकूं लागतें.

[ गेल्या महिन्यांत बडोद्याच्या सहविचारणी सभेच्या आमंत्रणावरून रा० पांगारकर हे 'संतवाङ्मय' ह्या विषयावर व्याख्यानें देण्यास तेथें गेले होते. तेथें त्यांचीं तीन व्याख्यानें झालीं. त्यांचा गोषवारा पुढें दिला आहे. ]

# संत वाङ्मय

१ **संत व संतवाङ्मयाचा कालः** संत हे सर्वकाळीं असतातच, तथापि संतपदानें जो बोध होतो त्या अर्थानें संतांचा व संतवाङ्मयाचा काळ हा सुमारें हजार वर्षांचा धरायला पाहिजे. वेदोपनिषदांचा काळ, शास्त्रकाल, पुराणकाल बौद्धजैनांचा काल व संतांचा काल असे भरतखंडाच्या इतिहासाचे पांच काल सामान्यतः पडतात, व तुकोबांनींहीं 'वेद अनंत बोलिला' व 'विश्वीं विश्वंभर' ह्या दोन अभंगांत हेंच सांगितलें आहे. वेदशास्त्रपुराणांचें रहस्य 'विठोबाशीं शरण जावें। निजनिष्ठा नाम गावें' हेंच आहे, असें पहिल्या अभंगांत सांगितलें असून दुसऱ्यांत 'विश्वीं विश्वंभर' हा वेदवेदांताचा, 'जगीं जगदीश' हा शास्त्रांचा, 'व्यापिलें हें नारायणें' हा पुराणांचा मथितार्थ असून 'जनीजनार्दन। संत बोलती वचन', या प्रमाणें संतांनींही तेंच तत्व सांगितलें आहे, असें ह्मटलें आहे. दोन्ही अभंगाचा कालक्रमानुसार विचार केला तर वेदवेदांताचा, शास्त्रांचा पुराणांचा व संतांचा असे चार कालानुक्रम तुकोबांनीं धरिले आहेत. बौद्ध जैनांचा काल त्यांनीं धरिला नाहीं. हा काल ह्मणजे वेदबाह्यांचा काल असल्या-मुळें व 'वेदबाह्य लंड। बोले तो पाखांड' याप्रमाणें सदरसारख्या मतांची गणना पाखांडमतांत होत असल्यामुळें त्याला त्यांनीं स्वतंत्र स्थान दिलें नाहीं. ह्या वेदबाह्य मतांचें अशोकाच्या वेळेपासून हिंदुस्थानांत फार प्राबल्य झाल्यामुळें व त्याशीं झगडून पुन्हा वैदिकधर्माभिमानी अनेक राजे, संत व आचार्य यांना प्रयास करावे लागल्यामुळें ह्या संतकाळांतच प्रतिपक्षिरूपानें त्यांचा समावेश कर--

ण्यास हरकत नाहीं. बाकी हीं वेदबाह्य मतें ज्ञानेश्वरपूर्वकालींच दुर्बल झालीं होतीं. त्यांना दुर्बल करून पुन्हा वैदिकधर्माचें पुनरुज्जीवन करण्याचें श्रेय तामीळ इ० द्रविड संतांना आहे. तामीळ संतांकडे वळण्यापूर्वी संतवाङ्मय म्हणजे काय हें आपण थोडक्यांत पाहूं.

२ **संत** म्हणजे सत्, शाश्वत परब्रह्म, आणि अंतर्बाह्य सद्रूप झालेले जे महापुरुष त्यांना सन्त म्हणतात. संत म्ह० ब्रह्मनिष्ठ, किंवा भगवद्भक्त; देवाचे झालेले किंवा देवमय झालेले. परमात्मा हा 'एको देवः सर्वभूतेषु गूढः' असा आहे. श्रुतिशास्त्रांनीं त्या एकालाच गायिलें आहे. ब्रह्माचीं किंवा देवाचीं नांवें अनंत असलीं किंवा विविधरूपानें तो नटला असला किंवा भक्तांनीं आवडीच्या भरें नटविला असला तरी देव एकच आहे.

'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति'
'एकं सन्तं बहुधा कल्पयन्ति'
'एको वशी सर्वभूतान्तरात्मा
एकं रूपं बहुधा यः करोति ॥'
'विश्वतश्चक्षुरुत विश्वतो मुखम् ..
द्यावापृथिवी जनयन् देव एकः'

इत्यादि प्रकारें श्रुतीनें ज्याचें वर्णन केलें आहे त्यालाच पुढें सन्तांनीं राम, कृष्ण, नरहरी, शिव, दत्त, गणेश, जगदंबा इ० नांवांनीं आळविलें आहे, 'विश्वं विष्णुः' इत्यादि सहस्रनामें त्या एकाचींच आहेत. 'जनी म्हणे सृष्टीवरी। एक असशी तूं बा हरी' श्रुति सांगते तेंच संत सांगत आहेत. एकच अनेक आहे व अनेक तरी एकच आहे. त्या एकाला श्रुतीनें संस्कृतांत गायिलें आहे, संतांनीं देशी किंवा प्राकृत भाषांतून गायिलें आहे. ॐकारच विठ्ठल आहे. देव दोन नाहींत, देव एक आहे, व तो एकच अनेक झाला आहे. उपास्यें अनेक असलीं तरी 'अनेकीं सदा एक देवासी पाहे'. श्रुतीनें ज्याला परोपरीनें गायिलें आहे—'तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा!' 'तूं सदा एकरस रामजी रामजी' 'तूं सदा एकरस कृष्णजी कृष्णजी' 'अगुणी एका सगुणी एका। गुणातीत देखों एका' त्या एकालाच सगुणोपासनेच्या मार्गानें अनुभवाला आणून संतांनीं त्याला भोगला आहे.

३ **संत वाङ्मयः**—असे भगवत्पर झालेले जे संत त्यांच्या मुखांतून स्वात्मसुखार्थ व परबोधार्थ स्रवलेली जी अमृतगंगा तिला संत वाङ्मय म्हणतात. वाङ्मयही सात्विक, राजस व तामस असें तीन प्रकारचें आहे. समर्थांनीं चार

प्रकारचे कवि सांगितले आहेत ( दास० द० १४ स० ३ ) धीट कवि, पाठ कवि, धीटपाठ कवि व प्रासादिक कवि. 'जें आपल्या मनासि आलें। बळेंचि कवित्व रचिलें' अशा हठकवींना धीट कवि ह्मणतात. पाठ कवि कोणते? 'पाठ ह्मणिजे पाठांतर। बहुत पाहिले ग्रंथांतर। तयासारिखा उतार। आपणहि केला.' पाठांतराच्या व शब्दपांडित्याच्या बळावर कविता करणारे ते पाठ कवि. 'शीघ्रचि कवित्व केलें। दृष्टीं पडिलें तेंचि वर्णिलें। भक्तीवांचूनि जें केलें। या नांव धीटपाठ' बहुतेक कवि या तीन वर्गांत पडतात. संतवाङ्मयांत रमलेल्या रसिकांस असें भक्तिहीन कवित्व मनापासून आवडत नाहीं. अर्वाचीन कवींत बालकवि ठोंबरे, चंद्रशेखर, दत्त असले कांहीं कवि चांगल्यापैकीं आहेत. भक्तिरसानें ओथंबलेली कविता ती प्रासादिक कविता व तेवढीच संतभाविकांना पसंत पडते. कामिक, रसिक, शृंगारिक, वीर, हास्य, कौतुक, विनोद इत्यादि नवरसान्वित कवितेला समर्थ धीटपाठ कवींचा वाग्विलास असें ह्मणतात व

जो भगवद्भजनेवीण। जाऊं नेदी एक क्षण।
सर्वकाळ अंतःकरण। भक्तिरंगें रंगलें॥

अशीं भक्ताच्या भगवद्भक्तीचें कौतुक याला समर्थांनीं प्रासादिक कविता असें ह्मटलें आहे. भगवत्प्रसादाची वाणी ती प्रासादिक कविता होय. 'परतत्वस्पर्श' झालेली वाणी प्रासादिक होय. वाणी चार प्रकारच्या असून ज्ञानी लोकांना त्या चारही वाचांची ओळख असते. लोकव्यवहार सारे चौथ्या वैखरी वाणीनेंच होत असतात. तथापि परावाणीला स्फूर्ति जेथून होते तेथें संत वसत असतात. "परेहून परतें घर। तेथें राहे निरंतर॥ उन्मनीच्या सुखाआंत। पांडुरंग भेटी देत" हा अनुभव जनाबाईसारख्या संत कवयित्रीचा होता. प्राचीन संतकवींच्या सिद्धांतवाणीची ओळख रवींद्रनाथांनी इंग्रजी भाषेच्या द्वारें जगास करून दिली हा त्यांचा मोठा पराक्रम होय, तथापि जनीसारख्या श्रेष्ठ जीवांची योग्यता कांहीं और आहे! वाणी जेथून प्रस्फुरित होते तेथले गूढ अभिप्राय संतांच्या वाणीनें व्यक्त होतात. भाषाशास्त्र व साहित्य त्यांच्या सेवेला हजर असतातच, तथापि अध्यात्माचे सकल सिद्धांत त्यांच्या मुखावाटे सहज प्रगट होतातः—

सिद्ध प्रज्ञेचेनि लाभें। मनचि सारस्वत दुभे।
मग सकल शास्त्रें स्वयंभें। निघती मुखें॥ ३५२॥
दुर्भेद जे अभिप्राय। कां गुरुगम्य हन ठाय।
तेथ संसरेवीण जाय। बुद्धि तयाची॥४५९॥ (अ० ६)
जे प्रज्ञा आंतुलीकडे। न समाती बाहेरी वोसंडे।
बसंतीं पद्मखंडें। द्रुती जैसी॥ २१२ (अ० १४)

हा ज्ञानेश्वरमहाराजांसारख्या अवतारी कवीश्वरांचा अनुभव आहे व संतकवि या नांवाखाली मोडणारे बहुतेक श्रेष्ठ कवि ह्या अनुभवाच्या जवळपास असतातच. निवृत्तिनाथ समोर बसले आहेत व इतरही संत सन्मुख आहेत अशा वेळीं तोंड वडबडायला गेलें तों ज्ञानेश्वरी सहज मुखांतून आली असें त्यांनीं ह्मटलें आहे! " रिकामें तोंड। करूं गेलें वडबड। तों गीतेऐसें गोड। आंतुडलें!" माझ्या श्वासोच्छ्वासाबरोबर प्रबंध बाहेर पडत आहेत! संत देहातीत परमात्मवस्तु अंगानें झालेले असल्यामुळें

आपुलिया बळें नाहीं बोलवत। सखा भगवंत वाचा त्याची॥

४ हें अगदी खरेंच आहे. संतांच्या चारित्र्यानें, लोकोद्धारबुद्धीनें, भक्तिप्रसारार्थ त्यांनीं केलेल्या संचारानें व काव्यवाणीनें जगाचा संसार सुखाचा झाला आहे. जगाला शांति व सुखसमाधान देणारी धीराची वाणी संतांचीच आहे. परमात्मदर्शन हाच तिचा अनन्य विषय असतो. भागवतानें हा विषय फार चांगला मांडला आहे व संतांनीं भागवताचेंच अनुसरण केलें आहे 'संकीर्त्यमानो भगवाननंतः' – परमात्मा हाच एक वर्ण्य विषय आहे, जेथें त्याचे गुणानुवाद नाहींत त्या असत्कथा आहेत, साधु त्याकडे ढुंकूनही पाहायचे नाहींत, जी वाणी चित्रविचित्र शब्दार्थालंकारांनीं विभूषित आहे पण जींत भगवत्कथा नाहींत—'तत्, ध्वांक्षतीर्थं नतु हंससेवितम्- ती कावळ्यांना ह्म० विषयी पामरांना आवडते हरिप्रेमाच्या मानससरोवरांत विहार करणारे राजहंस तिचें सेवन करीत नाहींत; उलट पक्षीं एखाद्या कवीची वाणी व्यवस्थित सुबद्ध नसली पण जर ती हरिगुणगान करीत असेल तर ती 'शृण्वन्ति गायन्ति गृणन्ति साधवः' असें भागवताच्या द्वादशस्कंधांत स्पष्ट सांगितलें आहे! हा काक व हंस यांचा दृष्टान्त याचा अर्थानें ज्ञानेश्वरांनीं व तुळसीदासांनीही घेतला आहे. ज्ञानेश्वर (अ० ६) सांगतात कीं कैवल्यरसानें भरलेलीं हीं ताटें मी निष्कामाला अर्पण करीत आहे व आत्मबोधाच्या आवडीपुढें जे स्वर्गसंसारसुखें तुच्छ मानतात अशा संतसज्जनांवांचून माझी ही कविता सहसा कोणाला मनःपूर्वक आवडायची नाहीं—'जैसा वायसीं चंद्र नोळखिजे। तैसा प्राकृतीं ग्रंथ हा नेणिजे'—त्यांच्यासाठी 'आन गांवो'-अन्य गांवें वसलेलीं आहेत! लौकिक काव्यें, नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा इ० इ० ग्रंथ पामरांसाठी आहेत, त्यांनीं तिकडे जावें, आमच्याकडे हंस तेवढेच येतील! आतां माझ्या ग्रंथांत 'साहित्य आणि शांति'—Literature and Eternal peace हे दोन्ही सांपडतील खरें, पण ह्या अध्यात्मशास्त्राचे अधिकारी अंतरंग पुरुषच आहेत, 'येर लोक वाक्यातुर्यें। सुखिया होईल—' भाग,

काव्य, साहित्य ई० बहिरंगदृष्टीचे वाचकही अलंकार, रस, अर्थ, पदलालित्य इ० पाहूनही सुखावतील हा लाभ निराळा!

तुळसीदासजी सांगतात: —

> कहहु कथा सोई सुखद सुहाई। सादर सुनहु सुजन मन लाई॥
>
> रामसीयजस सलिल सुधासम। उपमा बीचि बिलास मनोरम॥

ही माझी रामकथा सुखदायक व रसाळ आहे व सुजनहो! तुम्ही आदरानें मन लावून ती ऐका; रामसीता यांचें यश हें अमृतनिस्यंदिनी गंगेसारखें पावन आहे. हा सहज ओघ चालला आहे. उपमादृष्टांतादि अलंकार हे तिच्या प्रवाहावर लीलेनें उठणारे रम्य विलासतरंग आहेत. कावळे, बक, जंबुक, शृगाल हे तिच्या संन्निध नाहीं यायचे!

> अतिखल जे बिषयी बक कागा। एहि सर निकट न जाहि अभागा॥
>
> संबुक भेक सेवार समाना। इहां न विषय कथारस नाना॥
>
> भनिति विचित्र सुकविकृत जोऊ। रामनामबिनु सोह न सोऊ॥

चांगल्या कवीनें सुंदर व विचित्र काव्य केलें तरी रामनामावांचून तें शोभा पावत नाहीं, रामनामयशोंकित असें काव्य कुकवीनें रचलेलें असून गुणरहित असलें तरी मधुकर संत त्याचेंच सेवन करितात.

५ तात्पर्य भक्तिज्ञानरसानें ओथंबलेलें काव्यच संतसज्जनास पसंत असतें, व अद्यापही संतकाव्यांचीच छाप लोकांच्या मनावर बसलेली स्पष्ट दिसत आहे. समर्थांनीं सुद्धा पंचभूतात्मक नाशवंत सृष्टीचें व सृष्टींतील पदार्थांचें गायन न करितां मूळाकडे जा – उगमाकडे वळा व त्याचेंच गायन करा असा सर्व कवींस जिव्हाळयाचा बोध केला आहे!

> उपाय तो अपाय रे। भुतें भजोनि काय रे।
>
> भजा अनंत व्यापका। चतुर हो चळों नका॥
>
> भुतें समस्त वावरे। प्रकुर्तीचा स्वभाव रे।
>
> अनंत संत वोळखा। मुळाकडे चुकों नका॥

संतांची योग्यता व संतांच्या वाङ्मयाचें धोरण यावरून कळणार आहे. ' देव भक्त आणि नाम ' हे तीन विषय संतांच्या आवडीचे आहेत व हें वर्णि-तांना ओघानें जे वाङ्मयाचे गुण आले ते त्यांच्यांत आहेत. अत्युत्कट भक्ति, उज्वल ज्ञान, निस्सीम नामप्रीति, लोकोद्धाराची कळकळ व सर्वांभूतीं भगवद्भाव हे संतांचे व संतवाङ्मयाचे प्रधान गुण आहेत. इंग्रजी विद्या आपल्या देशांत आल्यापासून आपल्या वाङ्मयाला निराळें व नवें वळण लागत चाललें आहे व

देशकालवर्तमानाप्रमाणें नवे नवे प्रकार सुरू होणारच, तथापि संतवाङ्मयाचा हा आद्य ओघ ध्यानांत ठेवून नवीन ग्रंथकारांनीं तदनुरोधानें वागावें व प्राचीन उज्वल परंपरेचा अनादर न करावा यांत त्यांचें कल्याण आहे. संतकवींची छाप समाजावर केवढी आहे हें पंढरपूर, आळंदी, पैठण, देहु, त्र्यंबकेश्वर, सज्जनगड, इत्यादि पवित्र स्थळीं जो कोणी डोळे उघडून जाईल व पाहील त्याच्या ध्यानांत येणार आहे.

६ **शिव आणि विष्णु यांच्या उपासना** तीन हजार वर्षांपूर्वींच सार्वत्रिक झाल्या. शिव व विष्णु हे दोन्ही देव वैदिक आहेत. महाभारतांत हे दोन्ही देव व त्यांचे उपासक यांत पूर्ण एकरूपता असल्याचें दिसून येते. पुढे माध्वसंप्रदाय निघाल्यापासून शैववैष्णवांचे तंटे द्रविड देशांत सुरू झाले पण द्रविडांतच दीड दोन हजार वर्षांपूर्वीं दोन्ही देवांचे भक्त अभेदभावानें पण एकनिष्ठेनें या देवांच्या पूजाउपासना करीत. नम्माळवारादि बारा अळवार ह्म० वैष्णव व ६३ शैव यांच्या वेळीं हा भेदभाव नव्हता. महाराष्ट्रांत व उत्तरेकडेही हा भेदभाव पसरला नाहीं. 'आदिगुरु शंकरापासून' आपला वैष्णवसंप्रदाय रूढ झाल्याचें ज्ञानेश्वर सांगतात. मोरोपंत तर ह्मणतात कीं परस्परद्वेषी अशा भेदवाद्यांवांचून इतर सर्वांचा कैवारी पांडुरंग आहे !

जो शैव वैष्णवारी, ज्ञाता वैष्णव असोनि शैवारी ।
त्याहुनि इतरा सर्वां भक्तांचा पांडुरंग कैवारी ! ॥

'हरिहरा भेद। नाहीं नका करूं वाद' असें तुकोबांनीं ह्मटलें आहे. तुलसीदासांनीं रामायणांत स्पष्ट ह्मटलें आहे कीं 'सिवपदकमल जिन्हहि रति नाहीं। रामहि ते सपनेहु न सुहाही' ह्म० शिवपदकमलाच्या ठायीं ज्यांचें प्रेम नाहीं त्यांना स्वप्नांतही रामप्रेम लाभणार नाहीं. शंकरद्रोही वैष्णव किंवा विष्णुद्रोही शैव यांना शिवपदही मिळत नाहीं व रामपदही मिळत नाहीं. 'सिवसमान प्रिय मोहि न दुजा' असें राम स्वमुखानें सांगत आहेत. 'हरिहरनिंदा सुनइ जो काना। होइ पाप गोघातसमाना. तात्पर्य साऱ्या भरतखंडांत प्राचीन कालापासून हरिहरांची अभेदभावानें उपासना होत आहे.

वेदकालीन सर्वदेवतांचा शिव व विष्णु या दोन देवतांतच आपल्या पूर्वज्यांनीं समावेश कां केला याबद्दल माझा अभिप्राय मी सांगतों. पारमार्थिक भावना ज्यांच्यांत उदित होतात त्यांत दोन प्रकृतिस्वभावांच्या लोकांचे दोन वर्ग आढळतात कांहीं भोगी असतात व कांहीं त्यागी असतात. देव पाहिजे असला तरी कांहींची भोगलालसा सुटलेली नसते, व कांहीं स्वभावतः विरागशील

असतात. वैराग्यावांचून ज्ञान टिकत नाहीं. वैराग्यलाभ भगवंताच्या कृपेवांचून होत नाहीं. वैराग्य झालें नसलें तर तें झालें आहे असें बळेंच सांगणें हा मिथ्याचार आहे, हें ढोंग आहे. बरें वैराग्य नसलें तरी देवाच्या मनांत कृपा करायची असली कीं तेवढ्यावांचून कांहीं अडत नाहीं. शेकडा पांच साधु विरागी किंवा संन्याशी असतात व शेकडा पंचाणव घरभरी ह्म० संसारी असतात. अंतरांत हरिप्रेम निरतिशय उत्पन्न झालें कीं बाहेरचा संसार असला काय व टाकला काय याची किंमत नाहीं. त्यागाचें वर्म कळलें ह्मणजे झालें. तें वर्म कळलें तर भोग भोगून ब्रह्मचारी राहतां येते व न कळलें तर बाह्यविरागाचा कांहीं उपयोग नाहीं; भोगांत त्याग आहे व त्यागांत भोग आहे! कृष्ण परमात्मा भोगत्यागविरहित आहे—'तुका ह्मणे जैसी स्फटिकशिळा.'

कृष्ण नोहे भोगी शंकर नोहे त्यागी। तुका पांडुरंगीं हा प्रसाद लाधला॥

तात्पर्य, श्रीहरीला पावायचें वर्म भोगांत नाहीं व त्यागांत नाहीं. एक देव भोगाचा पुतळा व एक त्यागाची मूर्ति अशी भिन्न मनोवृत्तीच्या लोकांसाठी द्विविधा उपासना आहे, किंबहुना देवानेंच लक्ष्मीपति व भोगी नारायणाचें रूप दाखविलें व त्यानेंच स्मशानवासी वैराग्यशील शिवाचें रूप दाखविलें. ज्यानें त्यानें आपल्या आवडीप्रमाणें उपासना पत्करावी, देव एकच आहे! हरिहर दोन नाहींत.

[ हरिहर ह्म० शिवविष्णु यांच्या उपासनांचा प्रचार प्रथम द्रविड देशांत झाला व हरिहरांच्या भक्तीचीं मधुर कवनें तामील भाषेंत झालीं. तामीळांची श्रेष्ठ कामगिरी, त्यांच्या साम्राज्याचा विस्तार व व्याप; तिसऱ्या शतकापासून तों नवव्या शतकांपर्यंत तामीळांत झालेले बारा आळवार ह्म० वैष्णव व त्रेसष्ट शैव; नम्माळवार, संबंदर, अप्पर, माणिक्य वासहर, प्रेममूर्ति नंद इत्यादि भगवद्भक्तांचीं चरित्रें व मनोहर काव्यें—हा सर्व मनोरम भाग 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' ह्या माझ्या नव्या ग्रंथाच्या सातव्या प्रकरणांत सांगितला आहे. तो मूळ ग्रंथांतच पाहावा. ह्या भक्तांत सर्व जातींचे लोक आहेत. नंद हा चांभार जातींत जन्मला असून त्याचे दिव्य चरित्र मूळांतून वाचलें पाहिजे. ]

७ भाव, भक्ति, श्रद्धा हा संतवाङ्मयाचा प्राण आहे. 'प्रेमसुख देईं प्रेमसुख देईं। प्रेमेवीण नाहीं समाधान.' सुखासाठीं प्राणिमात्राची धडपड आहे व तें अवीट, अखंड व अनुपम सुख भक्तिप्रेमावांचून कशानेंही मिळत नाहीं असा संतांचा अनुभव आहे व तो त्यांनीं लक्षवेळा सांगितला आहे. प्रेमसुखासाठीं देव सगुणही असावा लागतो, ह्मणून देव निर्गुण आहे व सगुणही आहे; त्याच्या सगुणावतारांच्या लीला व गुणानुवाद गाणें, त्याच्या नामरंगीं रंगणें, त्याचे प्रेमळ भक्त

अत्यंत प्रिय वाटणें, त्याच्या मूर्तीची उपासना करणें या गोष्टी संतांच्या वाङ्मयांत वरचेवर सांगितल्या आहेत. पाश्चात्य संस्कृतीचा आपल्याकडे प्रसार झाल्यापासून देवाधर्मांच्या व साधुसंतांच्या गोष्टींवरील तरुणांची श्रद्धा डळमळित झाली आहे! श्रद्धाभक्तीचा वसंत जाऊन अतिचिकित्साबुद्धीचा, तर्कटाचा, पाखांडवादाचा हेमंत सुरू झाला आहे किंबहुना त्याचा सध्या भर आहे! 'सुदाम्याचे पोहे' – नांव गोड पण आंत सारी कुटाळकी, गणेशासारख्या लोकपूज्य देवाच्या निंदा– असले ग्रंथ लोक शिरोधार्य मानतात, त्यांचें कौतुक होतें, ते कॉलेजांत शिकविले जातात! प्रत्येक जण ह्मणतो 'माझें मत असें आहे' पण आपली किंमत काय याचा कोणी विचार करीत नाहीं. चिकित्सकबुद्धि नको असें मी ह्मणत नाहीं, पण तिचें फाजील स्तोम माजवून भक्तिसुखाला मुकणें शाहणपणाचें नाहीं! वाटेल त्या अलबत्यागलबत्याची चिकित्साबुद्धि काय कामाची? कोणी ह्मणतो 'रेड्याकडून वेद बोलवणें व भिंत चालवणें या गोष्टींवर श्रद्धा ठेवावी कशी?' माझें उत्तर तीन प्रकारचें आहे. एकतर साधुसंतांचे चमत्कार हें कांहीं त्यांच्या साधुत्वाचें मुख्य लक्षण कोणी मानीत नाहीं; आणि चमत्कार होणें असंभाव्य तरी कां मानावें! अर्वाचीन शास्त्रें कोठें पूर्णतेला गेलीं आहेत? मग संतांना सोडून या शास्त्रज्ञांना तरी 'बाबावाक्यं प्रमाणं' कां मानावें? कोणतें शास्त्र पूर्णत्वाला पोंचलें आहे? डॉक्टरी विद्येंत एकाचें मत दुसऱ्याशीं मिळत नाहीं, आजचे सिद्धांत उद्या टिकत नाहीं. डार्विनची थिअरी वीस वर्षांत दुसऱ्या विद्वानानें खोडून टाकली! चिकित्सकांचा कोठेंच विश्वास बसत नसेल तर तें आपल्या संशयात्मक ज्ञानामुळें नेहमीच तळमळत राहणार व विश्वास बसत असेल तर दुसरे लोक असेच साधुसंतांवर विश्वास ठेवतात. त्यांना वेडे ह्मणायचा तुह्मांला काय अधिकार पोंचतो. संतवाङ्मयानें लाखो जीवांना सुखसमाधान दिलें आहे देत आहे व देत राहणार!

## आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्रसंत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृत्तांत आहे. या पुस्तकांत महाराष्ट्र महोदय व द्वैताद्वैतसंगति यांचाही समावेश केला आहे. 'उपकृतिस्मरण' हें ७६ श्लोकांचें आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा, ग्रंथांचा, व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं. ८१२

# मराठी वाङ्मयाचा इतिहास–खंड पहिला

**पृ० सं० ८३२ ] ज्ञानेश्वरनामदेवांचा काल. [ किंमत रुपये चार.**

**ग्रंथकारः — लक्ष्मण रामचंद्र पांगारकर नाशीक सिटी.**

मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा हा पहिला खंड आहे. याच्या पूर्वार्धांत ७ व उत्तरार्धांत ११ प्रकरणें आहेत. पूर्वार्धांत देशी वाङ्मयाला आधारभूत असलेल्या वेदशास्त्रपुराणांची पूर्वपीठिका ह्मणजे विचारप्रवाहांची पूर्वपरंपरा दिली आहे बाराव्यातेराव्या शतकांत जें मराठी वाङ्मय निर्माण झालें त्यालापूर्वपरंपरा आहे व ती वेदापासून आहे, वेदांतील देवतांच्या प्रार्थनांत भक्तिमार्गाचें व आध्यात्मिक सूक्तांत ज्ञानमार्गाचें बीज कसें आहे, उपनिषदांतून अध्यात्मविद्या कशी स्पष्ट व सुलभ केली आहे, गीताभागवतांनीं ज्ञानाला भक्तीची जोड देऊन परमार्थ सर्वजनसेव्य कसा केला आहे, भक्तिमार्ग अनादि वेदापासून चालत आला असून शिवविष्णूंच्या उपासनांत एकात्मता कशी आहे हा सर्व वैदिक धर्माचा इतिहास विपुल अवतरणांसह व्यवस्थितपणें सर्वांस समजेल अशा सुलभ-रीतीनें पहिल्यापांच प्रकरणात सांगितला आहे, पुढील दोन प्रकरणें ऐतिहासिक आहेत बौद्ध व जैन हे वेदविरोधी पंथ उत्पन्न झाले, अशोक व त्याचे आदेश यामुळें बौद्धपंथ सर्वत्र पसरला, दोन्ही पंथाचे विशेष व वैदिकधर्माचे सिद्धांत, पुष्पमित्र, विक्रमादित्य, समुद्रगुप्त, हर्षवर्धन, ललितादित्य, भोज इ० हिंदुसम्राटांच्या राजवटींत या पंथांशीं वैदिकधर्माच्या झटापटी होऊन त्याचें पुनरुज्वीवन झाले हा इतिहास ६ व्या प्रकारणांत दिला असून ७ व्यांत द्रविडांचें व विशेपतः तामीळांचें साम्राज्यवैभव, त्यांचे प्रतापी सम्राट्, त्यांचीं अजस्त्र शिल्पकामें, देशीभाषांतली पहिली तामील भाषा व तिचें वाङ्मय, त्यांचे नम्माळवार आदि बारा आळ--वार उर्फ वैष्णव, तिरुज्ञानसंबंदर, अप्पर, माणिक्कवासहर, नंद इत्यादि ६३ शैव, त्याचें वाङ्मय व त्यांचे बौद्धजैनांशीं झालेले यशस्वी झगडे, कुमारीलभट्ट व मध्वाचार्य [ तैलंग ] व शंकराचार्य व रामानुचार्य [ तामीळ, ] आचार्यांची कामगिरी, त्यांचें वाङ्मय, त्याची धर्ममतें हा सर्व महत्वाचा विषय ७ व्या प्रकरणांत दिला आहे.

'महाराष्ट्र देश व मराठे लोक' हें आठवें व 'महाराष्ट्री ऊर्फ मराठी भाषा' हें नववें हीं प्रकरणेंही महत्वाचीं आहेत. दण्डकारण्य, महाराष्ट्राच्या चतुःसीमा, मऱ्हाटे लोक, राष्ट्रकूट, शालिवाहन, चालुक्य, जाधव, हेमाद्री व वोपदेव, देशी भाषांचा उदय, वररुची, हालाची सप्तशती, महाराष्ट्रीची मराठी बनत बनत चालली, मुकुंदराज, महानुभाव कवि व मुख्यतः ज्ञानेश्वर यांचें मराठीचें धोरण व हेतु, मराठीची योग्यता, साहित्य आणि शांति, शांतरसाचें घर व आनंदाचे आवार याविषयीं काढलेले उद्गार, मराठी काव्यांच्या जुन्या प्रती व राजवाडे हे विषय

या दोन प्रकरणांत आले आहेत. १० वें प्रकरण 'आदिकवि मुकुंदराज' यांना व १२ वें 'नाथपरंपरेला' दिलें आहे. ११ वें प्रकरण महानुभाव पंथ व त्याचें गद्यपद्यात्मक प्राचीन वाङ्मय याला दिलें असून त्यांत पंथाचे संस्थापक, पंथाचे आचारविचार, पंथीयांची कृष्णभक्ति, वारकरीपंथाशी त्याचें साम्य व वैषम्य, या मुद्यांचा सहानुभूतिपूर्वक ऊहापोह करून कवीश्वर भास्कर व त्याचा शिशुपाल वध, महदंबेचे धवळे, दामोदरपंडिताचें वत्सहरण, एकादश, रुक्मिणीस्वयंवर, ज्ञानप्रबोध, ऋद्धिपूरवर्णन, दिनचर्या इ० गद्यपद्यग्रंथाचें विवेचन अवतरणें देऊन सविस्तर केलें आहे. १३ वें प्रकरण श्रीज्ञानेश्वरदर्शन, १४ वें नामदेवराय व त्यांचें पंढरपूर आणि विठ्ठल या विषयीं अलोट प्रेम व महाराष्ट्रांतील कामगिरी, १५ वें समकालीन संत व त्यांचें अभंग वाङ्मय, १६ वें ज्ञानेश्वरांचें अंतरंग, १७ वें ज्ञानेश्वरी सृष्टि व १८ वें नामदेवांची पंजाबांतील कामगिरी; हीं सर्वच प्रकरणें मुळांतून साग्र वाचल्यावर त्यांत सांगायचें कांहीं राहिलें नाहीं असें वाचकांस वाटेल असा भरवसा, वाटतो. ज्ञानेश्वरांचीं दोन जुनी (एक अप्रकाशित) चरित्रें, त्यांच्या ग्रंथांतून प्रगट झालेलें त्यांचें आत्मचरित्र, ज्ञानेश्वरीवर पूर्वील ग्रंथांचे संस्कार, निवृत्तिनाथ, कृष्णार्जुनप्रेमप्रसंग, संतांची ज्ञानेश्वरभक्ति, ज्ञानेश्वरांच्या हृदयीचा जिव्हाळा (प्र० १३); नामदेव, विठ्ठलभक्ति, त्यांच्या अभंगांची गोडी, गुरु विसोबाखेचर, शिष्य परिसा भागवत, [प्र० १४] ओवी व अभंग, अभंग ज्ञानेश्वरीकारांचेच, ज्ञानेश्वरांची अभंगवाणी, चांगदेव, मुक्ताबाई व जनाबाई, गोरा कुंभार, सेना न्हावी, नरहरि सोनार, सावतामाळी, जोगा परमानंद, चोखामेळा इ० भक्त व त्यांची कविता, वैष्णवांचा मेळा व दहीकाल्याचा प्रसाद [प्र० १५] उपमारूपकादिकांची गर्दी, गीतेची थोरवी, अठरा अध्यायांतील विषय, ज्ञानेश्वरीचा मुख्य विषय अध्यात्मयोग उर्फ ज्ञानभक्तियोग, कर्म, ज्ञान, भक्ति, ज्ञानाज्ञानांचीं लक्षणें अद्वैतभक्तीची पराकाष्ठा, परमरहस्य, अमृतानुभव [प्र० १६] आध्यात्मिक दृष्टि व आधिभौतिक सृष्टि, ज्ञानेश्वरींत प्रतिबिंबिलेली लोकस्थिति राजकीय, उद्योग व व्यापार धंदे, शेती व बागाईत, रोग व रोगनिवारण, लौकिक समजुती' शास्त्रीय कल्पना, प्रपंचाची ब्रह्मरूपता, पतिपत्नी, भोजनाचे पदार्थ, लग्न व पाहुणे' अपत्यप्रेम, वृक्षवेली, पशुपक्षी व कृमिकीटक, सिंह आणि गाय, पारधी व पोपट, चकोर व चातक, भ्रमर, चक्रवाक, कासवी, राजहंस, बक इ० इ० [प्र. १७] कीर्तनाचा सुख--सोहळा, नामदेवांची पंजाबांतील कामगिरी, शीखांच्या ग्रंथसाहेबांतील नामदेवांची पद्यें [अर्थासह,] नामदेव व नरसी मेहता, [प्र. १८]

शंभर किंवा अधिक प्रती घेणारांस कमीशन २५ टक्के मिळेल. कागद व छपाई उत्कृष्ट. पत्ता:— लक्ष्मण रामचंद्र पांगारकर नाशीक सिटी,

# मनबागेचा सोनचाफा.

## सुवास तिसरा

( ले० गो० द० करकरे, नागपूर, )

( ५१ ) 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या न्यायानें जगांत व्यवहार करितांना अनेक क्षुद्र व कोत्या विचारांच्या व्यक्तींशींही संबंध येतात त्यांच्या तापदायक विचारांनीं आपल्या अंतःकरणाचें स्थैर्य नाहीसें होतें, परंतु तो ताप चुकविण्या-साठीं सर्वसंगपरित्याग करून रानांत जाणें हें प्राज्ञपुरुषाचें काम नव्हे, कारण एक-तर असल्या कृत्यानें आपण स्वतःच्या मनाचा कमकुवतपणा सिद्ध करीत असतो; आणि दुसरें, लक्षावधी कावळे आकाशांत उडत असतात म्हणून राजहंसांनीं आकाशांतून उडणें सोडून दिलें आहे काय ?

( ५२ ) नामस्मरणाचा चंद्र जर तुमच्या अंतःकरणांत सदोदित झळकत असेल तर त्यापुढें कामक्रोधादि काजव्यांची काय कथा ? अंधाऱ्या रात्रींच काज-व्यांना जोर चढतो नामस्मरणाचा विसर पडून अज्ञानतिमिराचा काल आला कीं हे खद्योत आपली करामत दाखवूं लागतात.

( ५३ ) चंद्राचा प्रकाश जर तलावांत पडला तर अजूबाजूच्या वनश्रीसह तो फिरून चढतो आहे असें दिसेल. तोच जमिनीवर पडला तर त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. सर्व विश्वावर सारखे तेज पडत असतांना चंद्रोदयानें चंद्र-कांताला पाझर फुटतो व समुद्राला भरती येते, परंतु पृथ्वीला विकार होत नाहींत उपदेश एकच असला तरी ग्राहकांच्या अंतःकरणमनोभूमिकेंतील बीजाच्या स्थितीवर त्याचे परिणाम अवलंबून असतात. त्यामुळे साधकांस उपदेश ऐकून प्रेमाश्रु येतात, मुमुक्षूस अननुभूत हेलकावे मिळतात परंतु बद्ध मात्र अविकृत राहतात !

( ५४ ) मानवी आयुष्यांत अनेक वेळा जगाविषयीं उदासीनता उत्पन्न कर-णारे प्रसंग येतात. परिचयाच्या समाजांत अपमान झाला असतां, मूर्खांनीं आपला उपहास केला असतां, उदरंभरणासाठीं वरिष्ठांचे पाय धरूनही ते संतुष्ट न झाल्यानें तसेच अनेक कौटुंबिक कारणांवरून पुष्कळांचे मनांत औदासीन्य उत्पन्न होतें. पण तें औदासीन्य कृष्णपक्षातील चंद्राप्रमाणें असतें. कांहीं वेळानें ते विचार ओसरत जातात व व्यक्ति पुन्हा व्यावहारिक देवघेवींत दंग होऊन जाते.

( ५५ ) काठचें गवत ओढ्याच्या संगतींत असल्यानेंच हिरवें राहतें. सज्जनाच्या संगतींत जर मुमुक्षु असला तरच त्याची सुधारणा होते. एरवी त्याच्या अंतःकर-णांतील ईश्वराविषयीच्या भावना सुद्धां खलसंगदावाग्नीनें पार सुकून जातील.

(५६) पतंगाला जसजसा जास्त दोरा मिळतो तसतसा तो जास्त वर जातो, मनाला जसजसा नामस्मरणाचा जास्त आधार मिळत जातो तसतसें तें अध्यात्ममार्गांत लवकर प्रगति करितें.

(५७) गाण्यांत जर गवयाची तन्मयता झाली असेल तरच तें गाणें उत्तम वठतें. उपदेशाचे शब्द जरी तेच असले तरी अधिकारी माणसांनीं आपल्या उपासनेच्या जोरावर सांगितले म्हणजे ऐकणाऱ्यांच्या अंतःकरणावर चांगले ठसतात.

× × ×

(५८) अनुकूल नैसर्गिक परिस्थिती असतांनासुद्धां परमेश्वराची आठवण होण्याला अंतःकरणांत ओलावा असावा लागतो. पिकें उभीं असतांना पांखरें उडविण्याचें काम महाराष्ट्रांतील शेतकरी आज कैक वर्षें करीत आले आहेत, परंतु त्या कामावर तुकोबाराय बसतांच त्यांना विठोबाची आठवण झाली. इतरांना घरची आठवण व्हायची !

(५९) 'सोहं सोहं' असें तत्त्वज्ञानाचें उद्गार कमळाचा वास जोंपर्यंत आला नाहीं तोपर्यंतच भुंगा करीत असतो. मोहानें जोंपर्यंत प्रादुर्भाव केला नाहीं तो पर्यंतच तत्त्वज्ञान सांगणारे पुष्कळ असतात. परंतु मोहाची वस्तू दिसली कीं, ते तिला बळी पडतात.

Many talk like philosphers but act lik fools

× ×

(६०) ज्ञान श्रेष्ठ कीं कर्म श्रेष्ठ हा वाद आज कैक शतकें चालत आहे. शुद्ध कर्म आणि शुद्ध ज्ञान हीं दोन्ही पक्ष्याच्या पंखाप्रमाणें आहेत. ज्याप्रमाणें एकच पंख असल्यास पक्षाला उडतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें ज्ञान आणि कर्म यापैकीं एकच वस्तु असल्यास भागणार नाहीं.

× ×

(६१) वारा जोरानें वाहूं लागला कीं नासकीं, कुजकीं पानें खालीं गळून पडतात. नामस्मरणाचा वारा जर अंतःकरणांत जोरानें वाहूं लागला कीं कामक्रोधादिकांविषयीचे कुविचार केव्हाच उडून जातात.

(६२) एकादी गोष्ट करण्यापेक्षां ती न करण्यांत होणारा आनंद हा श्रेष्ठ असतो. उदाहरणार्थ आपणास एकादा सुंदर देखावा पहाण्यास जावें असें वाटत असतें; अशा वेळीं प्रत्येक क्षणाला मन हेलकावें देत असतें. ते हेलकावे थांबविणें म्हणजेच योजित कर्म न करणें, अशा रीतीनें मनावर हळूंहळूं ताबा मिळविण्याचा यत्न करणें ही वृत्तिनिरोधाभ्यासांतील एक पायरीच आहे; व म्हणून

मोहाच्या समयीं मनांवर ताबा मिळविल्यानें होणारा आनंद हा इष्ट वस्तूच्या-प्राप्तीनें होणाऱ्या आनंदापेक्षा जास्त स्पृहणीय आहे.

× ×

( ६३ ) अवनतीच्या खोल दरींत जावयाचे असल्यास धडपड करावी लागत नाहीं; मनाला मोकाट सोडले कीं कार्यसिद्धी होते! आत्मोन्नतीच्या उच्च शिखरावर चढावयाचे असले तरच श्रम पडतात. चढायला श्रम लागतात, पडायला लागत नाहींत!

( ६४ ) आपल्या देहाची आधिभौतिक पद्धतीनें आगगाडीच्या एंजिनशी तुलना करतात ती सर्वांच्या परिचयाची आहे. त्याचप्रमाणें आध्यात्मिकरीतीनें ही देहाची एंजिनशी तुलना करता येते. देह हा वस्तुतः जड परंतु आत्म्याच्या अस्तित्वानें सचेतन आहे, देह सचेतन म्हणावा तर आत्म्यावांचून जड आहे. त्याचप्रमाणें एंजिन वाफेवांचून जड आहे. वाफ तयार असून सुद्धां एंजिन चालू करण्याला ज्याप्रमाणें ड्रायव्हरची जरुरी लागते त्याचप्रमाणें देहाचें कार्य करण्याला-बुद्धी, व मन, यांची जरुरी आहे. ड्रायव्हर जर निष्काळजी असला तर अपघात होतात, त्याचप्रमाणें मन जर अपरिपक्क असलें तर आत्म्याला त्रास होतो, याचा उपसर्ग देहलाही पोहोंचतो. आगगाडीचा रस्ता आंखलेला असल्यास प्रवास सुखकर होतो, त्याचप्रमाणें आपल्या देहाचें उद्दिष्ट ठरवून त्याप्रमाणें वागल्यानें व्यक्तीचें कल्याण होतें.

× ×

( ६५ ) निसर्गांतील प्रत्येक वस्तु ही निःस्वार्थबुद्धीची व कर्तव्यतत्पर दिसते. आपला सुवास चोहींकडे उधळतांना फुलांनीं कांहीं मोबदल्याची अपेक्षा कधी तरी केली आहे काय? आपला मध फुलपांखरें खात असतांना फुलांनीं त्या बद्दल कधी तरी तक्रार केली आहे काय? पण हीच निगर्वी वृत्ती मानवी जगांत न दिसून येणें हीच त्याची थोरवी!

× ×

तुझ्यां ठिकाणीं नाचिकेतांची श्रद्धां असू दे.

---स्वामी विवेकानंद.

( ६६ ) श्रद्धा किंवा विश्वास हीं जरुर पाहिजे. त्याशिवाय आध्यात्मिक उन्नती होणार नाहीं. परमेश्वरावर इतका विश्वास पाहिजे कीं कोणीं जरी आपल्या अंगावर शस्त्र फेकलें तरी तो आपले नुकसान करीत नसून आपण जगांत राहिल्यानें पुढें होणारा अनर्थ तो टाळत आहे इतका भाव पाहिजे. अशा विश्वासानें

(श्रद्धेनें) श्रीरामचंद्रप्रभूच्या दरबारांत शिरलें पाहिजे. एकदा प्रत्यक्ष श्रीरामचंद्राचें दर्शन घेईन ही दृढ इच्छा व विश्वास पाहिजे. एकदा देहाचें सार्थक करुन घेत— ल्यावर मग व्यवहारांत पडण्यास हरकत नाहीं; पण ध्येयाकडील लक्ष ढळतां कामा नये. ज्ञान श्रद्धावानाला मिळतें! श्रद्धा अभ्यासानें वाढते, अभ्यासाची गोडी चित्तशुद्धीमुळें लागते, व नामस्मरणानें चित्तशुद्धी होते, म्हणून नामस्मरणाचें महत्व.

(६७) आपलीं इंद्रियें बहिर्मुख आहेत, कारण त्यांचे विषय म्हणजे त्यांनीं आकलन करावयाचे पदार्थ हे बाह्य आहेत. तीं जर अंतर्मुख असतीं तर पोटांतील घाणीचा वास नाकाला आला असता! तीं बहिर्मुख असल्यानें पदार्थांच्या संयोगानें होणारें जें ज्ञान त्यामुळें आपणास सुख झालें असे वाटतें, परंतु हें सुख खरें नाहीं. हीं बहिर्मुख इंद्रियें जर अंतर्मुख केलीं म्ह० त्यांचें लक्ष आंत लावलें तर त्यायोगें होणारें ज्ञान व तद्भव आनंद शुद्ध व सात्विक असतात.

× ×

(६८) प्रशांत समुद्रांत प्रवास करताना नाविकांस आल्हाद वाटतो व नांव सुरक्षित असते. त्याच जोराच्या लाटा सुरू झाल्या म्हणजे नाविक घाबरतोच पण नांवही बुडण्याचा संभव असतो. वासनासमुद्र शांत असतांना आत्म्याला प्रवास सुखकर होतो पण तोच समुद्र खवळला तर आत्मा व्याकुळ होतो व देहरुपी नाव ही बुडते. वासनात्यागाचे याचसाठी फार महत्व आहे.

× ×

(६९) देहरूपी रथाला मन हा घोडा जोडलेला असून आत्मा हा सारथ्याचें काम करीत आहे. घोडा जर बेताल झाला तर रथ कोणत्या खड्यांत जाऊन पडेल याचा नेम नाहीं.

(७०) एकाद्या प्रशांत जलसमूहांत जळती विडी टाकली असतां फक्त एकच क्षण तीचा सुर् असा आवाज होतो व पुढें तिचें नांव गांव सुद्धां ऐकू येत नाहीं. हीच मानवी आयुष्य व कर्तृत्व यांची गत आहे! अहंकार, विद्या, मान व धन, यांनीं ग्रस्त झालेला जीव एकदा कालौघांत नाहीसा झाला म्हणजे त्याचा मागमूस सुद्धा रहात नाहीं. कित्येक रवींद्रनाथ व कित्येक जगदीश बोस आजपर्यंत या अनंत कालौघांत लुप्त झाले आहेत!

× ×

(७२) आयुष्याचा एक तास फुकट गेला हें सांगण्यासाठीं देवडीवाला टण टण असें ठोके मारतो. परंतु हे ठोके मारीत असतानांच आपल्याही आयु--

त्याचा एक बहुमोल तास आपण दवडला आहे याची त्याला जाणीव नसते. आणि ही जाणीव नसल्यानेंच एक देवडीवाला मेल्यावर त्याची जागा दुसरा घेतो व अशा रीतीने देवडीवाल्याचा ‘ लोकोपदेश ’ चालूच असतो.

× ×

( ७२ ) लग्नाच्या वरातींत गॅसची बत्ती घेऊन जाणारा मजूर हा वरातींतील लोकांपैकीच एक आहे असा भास होतो. कारण तो त्या लोकांबरोबर चालत असतो. परंतु वरातीविषयीं त्याच्या मनांत कोणत्याच आनंदाच्या भावना नस-तात, उलट ही वरात केव्हां संपेल याची तो उत्कंठेनें वाट पहात असतो. स्थितप्रज्ञ मनुष्याचें संसारांत वर्तन याचप्रमाणें असतें. जगाच्या उलाढालींत व धावपळींत तो हजर असतो परंतु त्याबद्दल त्याला जिव्हाळा नसतो, उलट ही धावपळ केव्हा बंद होते व परमात्म्याशी केव्हा समरसता होतें याची त्याला प्रत्यहीं काळजी असते.

× ×

( ७३ ) बैल गळयांत घुंगरू अडकवून त्याला गाडीला जुंपला कीं त्या घुंगरांच्या नादानें तो बिनतक्रार पळूं लागतो. रुपयांचा छन् छन् असा आवाजां कानीं पडला कीं मनुष्य संसाराचें सर्व ओझें बैलाप्रमाणे वाहून नेण्यास खुशीनें तयार होतो.

( ७४ ) चंद्रांत कोणाला डोंगरदऱ्या दिसतात; तर कोणाला हरीण दिसतें. कोणाला त्यांत मनुष्याचा चेहरा दिसतो तर कोणाला त्यांत काव्याचा आत्मा दिसतो. स्थितप्रज्ञ मनुष्य व चंद्र यांचें या बाबतींत साम्य आहे. स्थितप्रज्ञ माणसा-कडे पाहाणाऱ्या व्यक्तीची जी मनस्थिती असेल त्या प्रमाणें तो त्याला भासतो.

× ×

( ७५ ) अंधःकारांत मोटार चालविण्यास झगझगीत प्रकाशाची गरज असते तद्वत् ज्ञानाच्या दिव्य प्रकाशाशिवाय अज्ञानांधःकारांत जीवनाची गाडी चालविणें शक्य नाहीं. हेकटपणानें गाडी चालविण्याचा कोणी प्रयत्न केल्यासच ती दुःखाच्या खोल दरींत कोसळून सर्वनाश झाल्याशिवाय राहणार नाहीं.

× ×

# उपनिषदांतील मननीय वेंचे.

अनुवादकः—श्रीराम गोसावी, नाशीक.

## ३ श्वेताश्वतरोपनिषत्

### तृतीय अध्याय

या अध्यायांत परमात्म्याचें स्वरूपकथन आणि स्तवन आहे.

य एको जालवानीशत ईशनीभिः
सर्वांल्लोकानीशत ईशनीभिः
ये एवैत उद्भवे संभवे च
य एतद्विदुरमृतास्ते भवंति ॥

अनुवाद—या मायामय विश्वाचें जाळें त्या परमात्म्यानेंच पसरलें आहे; आणि त्याचीं सूत्रें आपल्या हातीं राखून तोच त्यावर सत्ता चालवीत आहे. सर्व लोकांवर त्याच्या शक्तीचीच सत्ता आहे. या विश्वाच्या उत्पत्तीच्या वेळीं तो होता, स्थितिकाळीं आहे आणि संहारकालींही असणार आहे. अशा त्या परमात्म्याचें सर्वशक्तित्व आणि त्रिकालींही भंग न पावणारें शाश्वत शुद्ध निर्मल रूप जे कोणी मर्त्य जाणून घेतील, त्याचे सत्तेपुढें आपलें मस्तक विनम्र करून त्याच्या शुद्धरूपाशीं ध्यानानें एकात्मता पावतील, ते जन्ममरणाच्या चक्रांतून सुटतील व अमृतधर्म होतील. मरणभयाचा जाच त्यांना होणार नाहीं.

यो देवानां प्रभवश्चोद्भवश्च
विश्वाधिपो रुद्रो महर्षिः ।
हिरण्यगर्भं जनयामास पूर्वम्
स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तु ॥

अनुवाद—देवांचें उत्पत्तिस्थान आणि त्यांना उत्पन्न करणारा तो परमात्मा आहे. तो विश्वाचा राजा आहे. तो महादेव आहे. तो महा ऋषी आहे. विश्वकर्म्या ब्रम्हदेवाला त्यानेंच प्रथमतः उत्पन्न केलें आहे. त्यानें आम्हांला शुभ बुद्धि द्यावी. अहंकाराचा उन्माद आम्हांस चढला आहे, दंभमानमदांनीं आम्ही मूर्ख बनलों आहोंत. कामक्रोधादि विकारांनीं आम्हांस वेडेपिसे केले आहे. त्या दयाघन देवानें आम्हांला सद्वासना द्यावी, आमची मति शुद्ध करावी. आम्हांवर सकृप होऊन त्यानें आमचें मंगल करावें.

या ते रुद्र शिवा तनूरघोरा पापकाशिनी ।

तया नस्तनुवा शंतमया गिरिशंताभिचाकशीहि ॥

**अनुवाद**—हे रुद्रा! तुझी मूर्ति कल्याणमय आहे. तिच्यांत घोरपणा नसून पापाचें नाश करण्याचें सामर्थ्य मात्र तिच्यांत आहे. हे गिरिनिवासा! त्या तुझ्या शांत मूर्तीचें दर्शन एकदां आम्हांस घडूं दे. आमच्या हातून आतांपर्यंत घोर पातकें झालीं आहेत तीं तुझ्या दर्शनानें नाश पावूं दे. संसारवासनांनीं आजपर्यंत आम्ही आमचें परम अकल्याण केलें आहे, तेव्हां हे कल्याणमया! तुझ्या शिवस्वरूपाच्या दर्शनानें आमच्या सर्व जन्माचें मंगल होऊं दे.

ततःपरं ब्रम्हपरं बृहंतं
यथानिकायं सर्वभूतेषु गूढम् ।
विश्वस्यैकं परिवेष्टितारम्
ईशं तं ज्ञात्वाऽमृता भवंति ॥

**अनुवाद**—या सर्व दृश्याहून तें ब्रम्हच श्रेष्ठ आहे. तो परमात्माच खरोखर सर्वांहून महान् आहे; त्याच्या व्यापाचा आटोप करण्याचें सामर्थ्य कोणांत नाहीं, कारण तोच या सर्व दृश्य व अदृश्य विश्वाला व्यापून उभा आहे. सर्व प्राणिमात्रांत त्या त्या शरीरांत तोच गुप्तरूपानें वसत आहे. जे कोणी त्या सर्वेश्वराला अशाप्रकारें जाणतील ते अमृत होतील. मरणाच्या महाभयांतून त्यांची सुटका होईल.

वेदाहमेतं पुरुषं महान्तम्
आदित्यवर्णं तमसः परस्तात् ।
तमेव विदित्वाऽतिमृत्यमेति
नान्यः पंथा विद्यतेऽयनाप ॥

**अनुवाद**—त्या परम पुरुषाचा वर्ण आदित्याप्रमाणें आहे. सुवर्णाप्रमाणें त्याची कांति आहे. सर्व तमाच्या--अज्ञानाच्या तो पलीकडे आहे. अज्ञान, अप्र--काश त्याच्या ठिकाणीं राहूं शकत नाहीं हें मी जाणतों; आणि हीही माझी खात्री आहे कीं त्याला जाणूनच मृत्यूचें उल्लंघन करणें शक्य आहे. त्याचें निर्मल ज्ञान हेंच या संसारसागरांतून तरून नेण्यास समर्थ आहे. भवबंधांतून सुटण्यास याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. त्या भगवंताचें सुदर्शन (सम्यक् ज्ञान) हेंच या भवचक्राचा भंग करण्यास शक्त आहे. मोक्षाला याशिवाय दुसरा रस्ता नाहीं.

यस्मात्परं नापरमस्ति किंचित्
यस्मान्नाणीयो न ज्यायोऽस्ति कश्चित् ।
वृक्ष इव स्तब्धो दिवि तिष्ठत्येकः
तेनेदं पूर्णं पुरुषेण सर्वम् ॥

**अनुवाद**--परमात्मा हा एकच एक अद्वितीय असा आहे. त्याच्याहून

कोणी श्रेष्ठही नाहीं आणि कनिष्ठही नाहीं आणि मोठाही नाहीं. तो नित्य निर्गुण स्वरूपाचा असल्यानें हो दुबळ नाहीं वा निष्कळही नाहीं; अक्रिय नाहीं किंवा क्रियाशील नाहीं; कृश नाहीं वा स्थूल नाहीं. त्याच्या अरूपपणामुळें साभास किंवा निराभास, सप्रकाश वा अप्रकाश, अल्प वा बहुवस तो होऊं शकत नाहीं. त्याच्या शून्यपणानें रिता वा भरता, रहित वा सहित, मूर्त वा अमूर्त तो बनू शकत नाहीं. एक आत्मपणानें तो नित्य नांदत असल्यानें, आनंद वा निरानंद, एक ना विविध, मुक्त वा बद्ध, या विशेषणांचा उपचार त्याच्या ठिकाणीं भावत नाहीं. त्याच्या अलक्ष्यपणामुळें तो, इतका किंवा तितका, आइता किंवा रचलेला, बोलता किंवा उगेला, या भाषा त्याच्या ठिकाणीं संभवत नाहींत. सृष्टीच्या रचनेनें तो रचला जात नाहीं, सर्वसंहारानें तो नाश पावत नाहीं. आहे आणि नाहीं या दोन्ही बोलांचें तो एंचत्व आहे. असा तो परमात्मा स्वर्गलोकांत एकाद्या वृक्षाप्रमाणें एकटा एक निश्चल उभा आहे. त्या महापुरुषामुळेंच हें सर्व विश्व पूर्ण आहे. त्यानेंच हें सारें दृश्यजात भरलें आहे.

ततो यदुत्तरतरं तदरूपमनामयम्
य एतद्विदुरमृतास्ते भवंति ।
अथेतरे दुःखमेवापियंति

अनुवाद— या सर्व दृश्याच्या पलीकडे जें आहे, तें क्षणभंगुर अशा रूपानें युक्त नाहीं किंवा कोणत्याही क्लेशमय रोगानें ग्रस्त नाहीं. अशा त्या सर्वरूपजाताला अतिक्रमण करून राहणाऱ्या अनामयाला जें जाणतात त्यांना पुनः मृत्यु हा कधीं ग्रस्त करूं शकत नाहीं. भवरोगाची बाधा त्यांना पुनः कधीं होत नाहीं. अशाश्वत आणि दुःखालय अशा संसाराप्रत ते पुनः कधीं येत नाहींत, पण जे कोणी प्रकृतिमंत होऊन, इंद्रियांना लळा देऊन, या ज्ञानाचा अव्हेर करून त्याला दूर लोटतील, त्याला सामान्यपणें लेखून, त्याची अवज्ञा करून, वाचाटपणें त्याची हेटाळणी करतील, ते मूर्ख लोक विषयविषानें पक्कें घेरले म्हणून समजावे. मोहमदिरा पिऊन ते मातले व अज्ञानरूपीं पंकांत बुडाले अशी खात्री धरावी. जे कोणी या थोर आत्मज्ञानाची प्राप्ती करून घेणार नाहींत त्यांना काळ तर दंडील--च पण सर्व दोष त्यांना गिंवसींत त्यांच्याभोंवती जमा होतील आणि रात्रीं स्मशानांत जशीं भूतें जमतात तशीं त्रिभुवनाचीं दुःखें आणि नानाविध पातकें आणि जगांतील सारें दैन्य त्यांच्या ठिकाणीं गोळा होईल. 'ऐसे होय तया उन्मत्ता । मग न सुटे बापा रुदतां ।' अशी दशा त्याला प्राप्त होईल.

अंगुष्ठमात्रः पुरुषोऽन्तरात्मा

सदा जनानां हृदये संनिविष्टः ।
हृदा मनीषी मनसाऽभिक्लृप्तो
य एतद्विदुरमृतास्ते भवंति ॥

अनुवाद– अंगुष्ठप्रमाण असा तो पुरुष सर्वांचा अंतरात्मा असून सर्व लोकांच्या हृदयांत तो स्थिर आहे. तो सर्वांतर्यामी असल्यानें सर्वांच्या कर्माकर्मांचा ज्ञाता आहे. तो ज्ञानाचा ईश आहे. हृदय एकाग्र करून अभिध्यानाच्या योगानें तो समजला जाणारा आहे. अशा त्याच्या स्वरूपाला जे कोणी जाणतात ते अमृत होतात.

सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ।
स भूमिं विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठद्दशांगुलम् ॥

अनुवादः—सर्व प्राणिमात्रांची शिरें, नेत्र आणि पाय त्या परमात्म्याचीच असल्यामुळें श्रुतीनें त्या पुरुषाचें वर्णन अनंत मस्तकाचा, अनंत नेत्रांचा व अनंत चरणांचा असें केलें आहे. या पृथिवीला सर्व बाजूंनीं व्यापून तो दश अंगुलें उरलाच आहे. या दृश्य विश्वाला व्यापून त्याचा व्याप संपला नाहीं; तर तो जें जें दिसेल, जें जें कल्पिलें जाईल, त्याच्या पलीकडे आहेच.

पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यम् ।
उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ॥

अनुवाद– सर्व झालेलें आणि पुढें होणारें तो पुरुषच आहे. सर्व भूत काल, वर्तमान व भविष्य त्याच्यांतच होणारे आणि जाणारे आहेत. या पृथिवीच्या अन्नावर वाढणारें जें जें म्रियमाण त्याचा तो तर स्वामी आहेच, पण प्रत्यक्ष अमृताचाही तो ईशिता आहे, मालक आहे.

सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोक्षिशिरोमुखम् ।
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥

अनुवाद– या दृश्य विश्वांत होणाऱ्या सर्व क्रिया त्या परमात्म्यामुळेंच होत असल्यानें तो विश्वबाहू आहे. स्थूलांत किंवा सूक्ष्मांत होणारें चलन सर्वपणानें सर्वदा त्याचेमुळेंच होत असल्यानें किंवा हें विश्व त्याचेंचमुळें चालत आहे म्हणून तोच विश्वांघ्रि झाला आहे. परमात्मा खरोखर अचक्षु, अकर्ण, स्थूल-डोळे किंवा कान त्याला नाहींत पण सूर्याला डोळे नसते तरी त्याचें सर्व स्वरूप जसें द्रष्टे आहे त्याप्रमाणें परमात्मा हा सर्वसाक्षी आहे म्हणून तो विश्वतश्चक्षु झाला आहे, किंवा सर्वांचें दर्शन श्रवण त्याच्या आधारामुळें होत आहे म्हणून श्रुतीनें सर्वचक्षु, सर्वश्रवण असें त्याचें वर्णन केलें आहे. त्याचप्रमाणें सर्वांच्या

शिरावर सर्व प्रकारें नित्य नांदत असल्यामुळें तोच विश्वमूर्धा झाला आहे. आणि अग्नीचें सर्व अंग म्हणजेच त्याचें मुख; त्याप्रमाणें सर्व भोक्तेपणामुळें विश्वमुख अशी संज्ञा त्या परमात्म्यास प्राप्त झाली आहे. खरोखर त्याला हात आहेत, पाय आहेत, नेत्र आहेत ही भाषा त्या सर्व व्यापकाला लागू होत नाहीं. एका जलरुपानें पसरलेल्या सागराला तरंगरूपानें गात्रता येत नाहीं; त्याप्रमाणें बुद्धीनें कल्पिलेल्या मर्यादित शक्तीनें तो शक्तीमान् होत नसून त्याच्या सर्वव्यापित्वानें या सर्व हस्तपादादींच्या शक्ति त्याच्या ठिकाणीं वसत आहेत म्हणून श्रुतीनें त्याचें असें दिग्दर्शनार्थ वर्णन केलें आहे.

सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम्।
सर्वस्य प्रभुमीशानं सर्वस्य शरणं बृहत् ॥

अनुवाद—सर्व इंद्रियशक्तींचा प्रकाशक हा परमात्माच पण तो स्वतां मात्र इंद्रियवर्जित आहे. दीपाला दीपत्व तेजामुळें येतें पण स्वतां तेज हें जसें दीप असत नाहीं, त्याप्रमाणें सर्व इंद्रियांना त्याची शक्ति आहे पण तो मात्र कोणतेंच इंद्रिय नाहीं. सोन्याकडे अलंकाराच्या दृष्टीनें पाहिल्यास तें अलंकारासारखें दिसेल पण एरवीं जसें ते सोनेंच आहे; त्याप्रमाणें इंद्रियशक्तीच्या दृष्टीनें तो सेंद्रियसा वाटेल पण मुळांत तो इंद्रियविवर्जित आहे. ओघ वाकडा असला म्हणून पाणी वाकडे जसे होत नाहीं किंवा घट वाटोळा म्हणून आकाश वाटोळें म्हणतां येत नाहीं त्याप्रमाणें मनाला मनपण याचेमुळें पण मन विकारी तसा हा परमात्मा विकारी होऊं शकत नाहीं. सर्व अलंकारांना आधार सोनें पण सोन्याचें स्वरूप जसें अलंकाररहित असूं शकतें त्याप्रमाणें सर्व विक्रियेला याचा आधार असला तरी तो विकारी नाहीं म्हणूनच या सर्व क्रियाजाताचा तो प्रभू आहे. त्याच्या सत्तेमुळें विकारांचे खेळ चालतात म्हणूनच तो त्यांचा अधीश आहे, राजा आहे. त्या प्रभूशिवाय इतर सर्व विकारी, भंगुर, चंचल आणि विनाशी असल्यामुळें तोच खरोखर आपलें सर्वांत मोठें आश्रयस्थान आहे. त्याच्याशिवाय आपण अगतिक आहोत म्हणून सर्वभावानें तोच एक भावावा, आणि वानावा.

नवद्वारे पुरे देही हंसो लेलायते बहिः ।
वशी सर्वस्य लोकस्य स्थावरस्य चरस्य च ॥

अनुवाद—चर आणि अचर अशा सर्व विश्वाचा अधीश परमात्माच या नऊद्वारांनीं युक्त असलेल्या पुरांत विलसत आहे; या देहांतून बाहेर फाकणारा सर्व चैतन्यप्रकाश त्या जगदीशाचाच आहे. आंत आणि बाहेर होणारा सर्व व्यवहार त्याच्या इच्छामात्रें करून चालला आहे. आंतर आणि बाह्य सर्व क्रियांचा तोच सूत्रचालक आहे.

अपाणिपादो जवनो ग्रहीता
पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः।
स वेत्ति वेद्यं न च तस्यास्ति वेत्ता
तमाहुरग्र्यं पुरुषं महान्तम् ॥

अनुवादः—त्या परमात्म्याला चरण नसून तो चालतो; कारण विश्वांत विचरणारें सर्व चैतन्य तोच आहे. त्याला हात नसून तो देतो घेतो. कारण दात्याचें दान देणारे हात आणि याचकाचें प्रतिग्रह स्वीकारणारें हात तोच आहे. तो नेत्र-रहित असून सर्व पाहतो; कारण सर्वांच्या नेत्रांचाही तो नेत्र आहे. कान नसून तो ऐकतो कारण ऐकणाऱ्या कानांचा ही तो कान आहे. जाणावयाचे सर्व विषय तो जाणतो पण त्याला जाणणारा कोणी नाहीं. सर्व द्रष्ट्यांचा जो द्रष्टा त्याला कोण पाहणार? सर्वांचा जो ज्ञाता त्याला कोण जाणणार? सर्व श्रेष्ठ पुराणपुरुष म्हणतात तो हाच त्याहून दुसरा कोणी मोठा नाहीं.

अणोरणीयान्महतो महीयान्।
आत्मा गुहायां निहितोऽस्य जंतोः ॥
तमक्रतुं पश्यति वीतशोको।
धातुः प्रसादान्महिमानमीशम् ॥

अनुवाद—सूक्ष्म अणूपेक्षांही जो लहान आहे आणि अत्यंत स्थूलापेक्षांही जो महान् आहे. असा तो आत्मा प्राण्याच्या बुद्धिरूप गुहेंत वसत आहे. बुद्धीच्या अत्यंत शुद्ध आणि सूक्ष्म स्वरुपांत तो निमुटपणे स्थित आहे. त्या जगत्कर्त्यापरमा-त्म्याच्या प्रसादानेंच सर्व संकल्पाच्या पलीकडे असलेल्या त्याच्या रुपास आणि ऐश्वर्यास एकादा भाग्यवान् पाहू शकतो; तत्क्षणींच त्याचे सर्व शोक नष्ट होतात. जरा मृत्यु आणि इतर सर्व प्रकारच्या व्यथा त्याच्या नाहीशा होतात.

वेदाहमेतमजरं पुराणं
सर्वात्मानं सर्वगतं विभुत्वात्।
जन्मनिरोधं प्रवदंति यस्य
ब्रम्हवादिनो हि प्रवदंति नित्यम् ॥

अनुवाद—तो अजर आहे, तो पुराणपुरुष आहे, त्याच्या विभुत्वामुळें सर्व-व्यापित्वामुळें तो सर्वत्र संचारणारा आहे, तो सर्वांतर्यामी आहे, हें त्याचें स्वरुप मी आतां जाणलें. ज्याला जन्म नाहीं असे म्हणतात. आणि ब्रम्हवादी ज्याच्या नित्य श्रवणमनननिदिध्यासांत रममाण झाले आहेत, तो कसा आहे हे मी आतां जाणतों.

—x—

# भक्तीवरील कांहीं आक्षेप

लेखकः-गोविंद रामचंद्र राजोपाध्ये, बी. ए.

श्रीयुत तुळजापुरकर यांनीं 'माझें रामायण' नांवाची कादंबरी लिहिली आहे. ही अनेक दृष्टींनी उत्तम साधली आहे. याची एकच साक्ष म्हणजे ही कादंबरी मुंबई युनिव्हर्सिटीच्या एम्. ए. च्या परीक्षेस मराठी भाषा या विषया-करितां नेमलेल्या पुस्तकांपैकीं एक आहे! हींतील विविध प्रसंगांची जुळणी तर सुंदर आहेच पण वेदान्त, फलज्योतिष यांसारख्या रुक्ष वाटणाऱ्या विषयांची चर्चा असे प्रसंग साधून तींत केली आहे कीं ती चर्चा सुद्धां कंटाळवाणी होत नाहीं. या कादंबरीचें गुणदोषविवेचन आपल्यास कर्तव्य नाहीं. तींत भक्तीसंबंधी जी चर्चा केली आहे तिचें थोडें परीक्षण करण्याचें योजिलें आहे. वेदान्त, निष्काम कर्म, पुनर्जन्म याविषयांसंबंधी अनुकूल चर्चा या कादंबरींत केली असून भक्तीसंबंधी मात्र कांहीं प्रतिकूल चर्चा केली आहे. त्यामुळें आस्तिकांच्या मनावर या चर्चेचा विशेष पगडा बसण्याचा संभव आहे. वरील सर्वच विषयासंबंधी प्रतिकूल चर्चा झाली असती तर ती नास्तिकाची चर्चा समजून आस्तिकांना तिकडे पहाण्याचें प्रयोजन नव्हतें; पण आस्तिकांपैकींच एकानें भक्तीसंबंधी मात्र प्रतिकूल चर्चा केलेली असल्यामुळें तिला महत्व आलें आहे व तिचें परीक्षण करण्यास विशेष कारण उत्पन्न झालें आहे.

वरील ग्रंथकाराचें भक्तीवरील आक्षेप येणेप्रमाणें आहेतः —

१ कर्मविपाकाच्या सिद्धांताची तर्कशास्त्राच्या दृष्टीनें मध्यें कोठेंही न थांबतां अखेरपर्यंत कड लावल्यास उपासनेची जरुरी मुळीच सिद्ध होऊं शकत नाहीं-आवृत्ती पहिली पान २४२

२ परमेश्वराची उपासना केल्यामुळें मनुष्यावर आलेलें संकट टळतें म्हणजे कर्माचा विपाक जसा नेहमींप्रमाणें व्हावयास पाहिजे तसा न होतां त्या नियमाला अडथळा येऊन तो निराळ्या रीतीनें होतो. हा सिद्धांत जर खरा मानला तर परमेश्वरावर विषमतेचा व निर्दयतेचा आरोप लागूं होऊं शकतो. 'परमेश्वराची उपासना किंवा भक्ति केल्यास आलेलें किंवा येणारें संकट टळतें' हा सिद्धांत समजणें ज्यांना केवळ अशक्य आहे अशीं लहान मुलें किंवा बुद्धिभ्रंश झाल्यामुळें खुळीं किंवा वेडी झालेलीं माणसें यांच्यावर संकट येऊन त्यांना दुःख केव्हाही होता उपयोगी नाहीं. नाहींतर त्यांच्या संकटांत हा वरील नियम लागूं नाहीं असें म्हणावें लागेल. पण म्हणजे मग परमेश्वरालाही निर्दय म्हणावें लागेल.— पान २४३

३ कर्मांचा विपाक म्हणजे होणारा परिणाम तो ज्या नियमांनीं व ज्या पद्धतीनें व्हावयाचा त्याच नियमांनीं व त्याच पद्धतीनें होणार, त्यांत परमेश्वराच्या भक्तीमुळें किंवा उपासनेमुळें खंड पडत नाहीं, खंड पडणें शक्य नाहीं. असें मानणें तर्कशुद्ध आहे.—१४३

या आक्षेपांचा आपण यथाक्रम विचार करूं.

पहिल्या आक्षेपाचा विस्तार आक्षेपक असा करतात कीं मनुष्य चालू जन्मांत जीं कर्में करतो त्यांपैकीं कांहीं त्याच्या पूर्वजन्मांतील कर्मांचा विपाक म्हणून असतात व बाकींचीं नवीन असतात. मनुष्याचें आयुष्य पूर्वकर्मांच्या फलांचा भोग व नवीन कर्म यांनीं बनलेलें असतें. नवीन कर्मांतली वासना काढून टाकून तें 'मृत' केलें म्हणजे त्यापासून भोगण्यासारखें फल उत्पन्न होत नाहीं, व जुनीं कर्में भोगून संपविलीं म्हणजे भोगावयास कांहींच उरत नाहीं. अशा रीतीनें केवळ निष्काम कर्मामुळें मोक्षप्राप्ति होऊं शकते. म्हणून मोक्षप्राप्तीला भक्तीची किंवा उपासनेची अवश्यकता रहात नाहीं कर्मविपाकाच्या सिद्धांताची आक्षेपकांनीं अशा प्रकारें मोक्षापर्यंत मध्यें न थांबतां कड लावली आहे. अशा प्रकारें कड जर आक्षेपकांच्या मताप्रमाणें लावतां येते तर भक्तीप्रमाणें ज्ञानावरही अनवश्यकतेचा आक्षेप त्यांनीं करावयास पाहिजे होता. तो त्यांनीं कां केला नाहीं समजत नाहीं. लो. टिळकांनीं कर्मयोगाची महती वाढविली तरी 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' हा सिद्धांत त्यांना मान्यच होता. 'माझें रामायण' कार रहस्यकारांच्याही पुढें जातात व वरील प्रकारच्या विचारसरणीनें ज्ञानाचीही अनवश्यकता ध्वनित करून कर्मयोगाची महती अधिकच वाढवितात. परंतु ही विचारसरणी शुद्ध असती तर रहस्यकारांनीं तिचा फायदा घेऊन कर्मयोगाची महती 'माझें रामायण'कार वाढवितात तितकी वाढविण्यास खास कमी केलें नसतें. रहस्यकारांनीं तसें केलें नाहीं याचें कारण ज्ञानाच्या अवश्यकतेस बाध आणणारी वरील विचारसरणी शुद्ध नाहीं हें होय. कर्मांतली नुसती वासना काढल्यानें तें कर्म 'मृत' किंवा दग्ध होतें असें नाहीं. वासना काढून टाकल्यानें कर्म सात्विक होतें (गीता १८।२३) व सात्विक कर्म सुखसंगानें व ज्ञानसंगानें कर्त्याला बद्ध करतें (गीता १४।६) म्हणजे त्याच्या फलाचा उपभोग घ्यावयास लावतें. तात्पर्य चालू जन्मांतील नवीन कर्में वासना काढून केली तरी तेवढ्यानें कर्त्यांच्या पुढील जन्मांच्या सिद्धतेची निवृत्ति होत नाहीं. तो कर्मबंधातून मुक्त होत नाहीं. आतां जुन्या कर्मांचा विचार केला तर त्यांचा सांठा अनंत आहे. अनादि कालापासून संचित कर्म बनत आलें आहे. तें कितीही भोगलें तरी त्याचा अंत भोगानें होणें

शक्य नाहीं. एवंच नव्या व जुन्या दोन्हीं कर्मांच्या बंधांत अडकलेला मनुष्य कर्मांतील केवळ वासना टाकल्यानें त्यापैकीं कोणत्याही कर्मांतून मुक्त होऊं शकत नाहीं कर्मांचा बंध तोडण्यास ज्ञानच अवश्य आहे. ज्ञानच जुन्या व नव्या सर्व कर्मांना 'मृत' किंवा दग्ध करण्यास व मनुष्यास मुक्त करण्यास समर्थ आहे. कर्मविपाकाच्या सिद्धांताची कड लावतांना मध्यें ज्ञानाचा टप्पा अवश्य घ्यावा लागतो असें ठरल्यावर आतां ज्ञानाच्या पूर्वीं आणखी एकदा टप्पा घ्यावा लागतो कीं काय हें पाहूं,

'ज्ञानाच्या सिद्धीस मन शुद्ध असून एकाग्र व्हावें लागतें. निष्काम कर्मानें मन शुद्ध होते पण तेवढ्यानें तें एकाग्र होत नाहीं. एकाग्र होण्यास योग किंवा भक्ति यांची अवश्यकता आहे पैकीं योगाचा मार्ग खडतर असल्यामुळें सामान्य मनुष्यास भक्तीवांचून गत्यंतर नाहीं. भक्तीनें ज्यांचें अंतःकरण 'युक्त' होतें त्याला परमेश्वर बुद्धियोग देतो. भक्ति ज्ञानाला उपकारक असल्यामुळें तिची अवश्यकता सिद्ध होते. भक्ति व ज्ञान यांच्या व्यतिरिक्त नुसत्या निष्कामकर्मानें मोक्षापर्यंत कड लागणें अशक्य आहे. ती लागण्यास प्रथम भक्ति व नंतर ज्ञान यांचा आश्रय घेणें प्राप्त आहे.

आक्षेपकांचा दुसरा आक्षेप असा कीं परमेश्वराची उपासना केल्यानें मनुष्यावर आलेलें संकट टळतें हा सिद्धांत खरा मानल्यास 'उभयतः पाशारज्जू'चा प्रसंग येतो. कारण ज्यांना हा सिद्धांत समजणें शक्य नाहीं अशीं लहान मुलें किंवा वेडीं झालेलीं माणसें यांच्यावर आलेलीं संकटें टाळण्यास मार्गच नसल्यामुळें त्यांना तीं भोसावींच लागणार, अर्थात् परमेश्वराला त्यांची दयाच येत नाहीं, तो निर्दय आहे. असा आरोप त्याच्यावर लागू होणार. बरें, निर्दयपणाच्या आरोपांतून परमेश्वराला सोडविण्याकरितां परमेश्वर अशा माणसांवर संकटेंच येऊं देत नाहीं, त्यांच्या कर्मांचा विपाक संकटांत होऊं देत नाहीं, असें म्हणावें तर त्यांच्यापुरताच कर्मविपाक थांबविणारा परमेश्वर त्यांचा पक्षपाती म्हणून वैषम्यदोषास पात्र होणार, असें कोडें आक्षेपक पुढें करतात. याशिवाय आपल्या भक्ताचेच संकट परमेश्वर दूर करतो, इतरांचें करीत नाहीं असें मानण्यानेंही वैषम्याचा व निर्दयतेचा आरोप परमेश्वरावर केल्यासारखें होते, असाही आक्षेपकांचा आशय या आक्षेपांतून निघू शकतो. प्रथम आक्षेपकांनीं जें कोडें उपस्थित केलें आहे त्याचा विचार करूं.

हें कोडें भक्तिविषयक सिद्धांताच्या अज्ञानावर उभारलें आहे. हें कोडें उपस्थित करून भक्तिविषयक सिद्धांतावर जसा आक्षेप घेतला आहे तसा आक्षेप कर्मविपाकाच्या सिद्धांतावरही घेतां येईल. लहान मुलें किंवा बुद्धिभ्रंश झालेली

माणसें—ज्यांना कर्मविपाकाचा सिद्धांत समजणें शक्य नाहीं—त्यांच्या हातून नवीन कर्में प्रारब्ध भोगाशिवाय होतात असें मानल्यास त्यांचें बरें किंवा वाईट फल त्यांना भोगावें लागतें असें मानावें लागेल. पण त्याचा अर्थ असा होईल कीं कांहीं एक ज्ञान नसतां अशा माणसांच्या हातून जीं कर्में होतात त्यांचें प्रायश्चित त्यांना भोगावें लागतें, म्हणजे त्यांचा कांहींएक अपराध नसतांना परमेश्वर त्यांना शिक्षा करितो हा निर्दयपणाचा आरोप परमेश्वरावर लागू होतो. बरें, अशा बुद्धिभ्रष्ट माणासांच्या हातून नवीन कर्में होतच नाहींत असें मानलें तर हीं माणसें केवळ प्रारब्धभोग घेत रहातात असें मानावें लागेल. म्हणजे अशीं माणसेंही आपलीं कर्में आक्षेपक म्हणतात त्याप्रमाणें मृत किंवा दग्ध करतात असें होईल व त्यांनाही मोक्षापर्यंत कर्मविपाकाच्या सिद्धांताची कड लावतां येते असें मान्य करावें लागेल. म्हणजे पर्यायानें असें म्हणण्याचा प्रसंग येईल कीं वासना काढून टाकणें हें जसें कर्में 'मृत' करण्याचें साधन तसें बुद्धिभ्रंश होणें किंवा करणें हेंही कर्में 'मृत' करण्याचें एक साधन आहे! अत एव या बाजूनें निष्कामकर्मी व बुद्धिभ्रष्ट या दोघांना एकाच पंक्तींत बसविण्याचा वैषम्यदोष परमेश्वरावर लागू होतो. पण हें कोडें उपस्थित करून कर्मविपाकाच्या सिद्धांतावर आक्षेप घेतां आला तरी त्या सिद्धांताला बाध येत नाहीं. तद्वत् आक्षेपकांनीं भक्तिविषयक सिद्धांतावर वर उध्दृत केलेलें कोडें उपस्थित करून आक्षेप घेतला तरी त्या योगानें भक्तिविषयक सिद्धांताला बाध येत नाहीं. कर्मविपाकाचा असो भक्तीचा असो किंवा दुसरा कोणताही सिद्धांत असो त्याचे नियम तद्विषयक अज्ञानामुळें टळत नाहींत व त्या अज्ञानामुळें तो सिद्धांत खोटा ठरत नाहीं. कर्मविपाकाच्या अज्ञानाचा फायदा कोणालाही मिळत नाहीं. अज्ञानामुळें कर्मविपाकाचें कार्य थांबत नाहीं. कर्में केलीं कीं त्यांचें फल मिळणारच त्याप्रमाणें भक्तीच्या अज्ञानाचाही फायदा कोणास मिळत नाहीं. अज्ञानामुळें भक्ति न केली तरी भक्तीचें कार्य व्हावें अशी अपेक्षा करतां येत नाहीं. भक्ति न केली तर तिचें कार्य होणार नाहीं. तात्पर्य सिद्धांताच्या अज्ञानावर उभारलेलें कोडें टिकत नाहीं व तें भक्तीच्या सिद्धांताचा बाध करूं शकत नाहीं. परमेश्वर आपल्या भक्ताचेंच संकट दूर करतो इतरांचें करीत नाहीं हा जर परमेश्वराचा वैषम्यदोष मानला तर तो चांगलीं कर्में करणाऱ्यालाच चांगलीं फळें देतो वाईट कर्म करणाराला चांगलीं फळें देत नाहीं हाही त्याचा वैषम्यदोष मानावा लागेल, वास्तविक, चांगलीं फळें हा वैषम्यपरिहार होय. तद्वत् भक्ति करणाराला तिचें फळ, न करणाराला तिचें फळ नाहीं हें वैषम्य नसून वैषम्यपरिहार होय.

आतां भक्तीमुळें कर्मविपाकांत खंड पडत नाहीं असें मानणें तर्कशुद्ध होय, या तिसऱ्या आक्षेपाचा विचार करूं. भक्ति कर्माहून अगदीं भिन्न असती तर तिच्यामुळें कर्मविपाकांत खंड पडत नाहीं असें मानणें तर्कशुद्ध झालें असतें. पण तसें नाहीं. भक्ति हें मानसिक कर्मच होय. या कर्मानें इतर कर्माच्या विपाकांत खंड पडणें कां शक्य नाहीं? प्रारब्ध या जुन्या कर्माच्या विपाकांत यत्न या नवीन कर्मामुळें जसा खंड पडणें शक्य आहे त्याचप्रमाणें भक्ति या मानसिक कर्मामुळें इतर कर्मांच्या विपाकांत खंड पडणें शक्य आहे. पाण्याचा ओघ अनेक मार्गांनीं विभागला गेल्यास त्याचा जोर कमी होतो तोच ओघ एकाच मार्गानें गेल्यास त्याचा जोर अतिशय वाढतो. त्याप्रमाणें भक्ति हें एकाग्र मनाचें कर्म असल्यामुळें त्याचा जोर व्यग्र मनानें केलेल्या इतर कर्मांपेक्षां जास्त असणें स्वाहजिक आहे. प्रारब्धापेक्षां प्रयत्नाचा जोर जास्त झाल्यास प्रारब्ध बदलतें त्याप्रमाणें एकाग्र मनानें केलेल्या भक्ति या कर्माचा जोर इतर कर्मांपेक्षां जास्त झाल्यास त्या इतर कर्मांच्या विपाकांत खंड पडतो. तेव्हां भक्तीमुळें कर्मविपाकांत खंड पडत नाहीं असें मानणें तर्कशुद्ध नसून खंड पडतो असें मानणेंच तर्कशुद्ध होय.

कर्माचा परिणाम झालाच पाहिजे हा कर्मविपाकाचा सिद्धांत होय. याच सिद्धांतांतून दुसरा एक सिद्धांत असा निघतो कीं दोन विरुद्ध कर्मांपैकीं ज्याचा जोर जास्त होईल त्याचा परिणाम दुसऱ्या दुर्बल कर्माच्या परिणामाला जिंकून अधिक प्रभावी झालाच पाहिजे. जोरदार कर्माचा जोरदार परिणाम हाही कर्म-विपाकाचाच सिद्धांत नव्हे काय? सारांश, भक्तीचा सिद्धांत कर्मविपाकाच्या सिद्धांताला बाधक नसून उलट साधकच आहे असें ठरतें.

भक्तांच्या भक्तीमुळें त्यांचीं संकटें दूर झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. सृष्टिनियमाच्या विरुद्ध ही गोष्ट घडते कशी ही शंका पुष्कळांना येते. वरील आक्षेपाच्या बुडाशीं हीच शंका असण्याचा संभव आहे. पण सृष्टीचे सर्व नियम समजले आहेत कोणाला? भक्तीनें संकटें दूर होतात हाही सृष्टीचाच नियम असें कां म्हणूं नये? एखाद्या खेडवळाला बैल किंवा घोडे यांवाचून मोटारादि वाहनें चालतात ही गोष्ट सृष्टिनियमाविरुद्ध वाटण्याचा संभव आहे. पण ज्याला भौतिक शास्त्राचें ज्ञान आहे त्याला तसें वाटत नाहीं. त्याप्रमाणें अध्यात्मशास्त्र ज्याला माहीत नाहीं त्याला भक्तीचें कार्य सृष्टिनियमाविरुद्ध वाटेल, पण तच्छास्त्रपारंगताला भक्तीनें संकटें दूर होतात ही गोष्ट सृष्टिनियमाला धरूनच आहे असें वाटेल.

परमेश्वर सर्वशक्तिमान् आहे असें आक्षेपक मानतात, असें असून भक्तीनें संकटें दूर होत नाहींत अर्थात् परमेश्वराला ती दूर करतां येत नाहींत असा आक्षेप करितात ही विसंगति आहे. 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहं' म्हणजे जे ज्या भावनेनें मला शरण येतात त्या भावनेला अनुरूप असा अनुग्रह मी त्यांच्यावर करतो असे गीतेंत परमेश्वर सांगत आहे. संकटनाशाच्या भावनेनें परमेश्वरास शरण गेलेल्या लोकांचीं संकटें दूर करण्याचें सामर्थ्य त्याला आहे असें त्याच्या वरील वाक्यावरूनच सिद्ध होतें. परमेश्वराचें अस्तित्व मानून त्याला तसें सामर्थ्य नाहीं असें मानणें हा एक प्रकारचा नास्तिकपणाच आहे. 'माझ्या भक्तांचा योगक्षेम मी वहातों' असेंही परमेश्वर स्पष्ट सांगत आहे. 'योगक्षेम' याचा अर्थ कोणत्याही संकटापासून संरक्षण असा करण्यास प्रत्यवाय नाहीं. मनुष्याच्या इतर कर्मांमुळें त्याच्यावर संकटें आलीं तर भक्ति या मानसिक कर्मामुळें तीं संकटें दूर होतात असें परमेश्वर बजावून सांगत आहे. परमेश्वर आपल्या भक्तांना मायेंतून तारून नेतो. माया ही त्याची शक्ति आहे; तींतून नेण्यास तोच समर्थ आहे यांत नवल नाहीं, असें असतां क्षुल्लक संकटाची पर्वा काय! तेव्हां भक्तीनें संकटें दूर होत नाहींत असे आक्षेप व्यर्थ होत.

---


## कविवर्य मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन )

ह्या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातू मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरी भारतांतील विशेष गुणः—सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस, शृंगाररस इ. कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचित्रें, कुस्त्यांचीं वर्णनें, त्यांच्या वेळची पाकसिद्धी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. 'मुक्तेश्वरनीतिरत्नमाला' ही शेवटी जोडली आहे. पृ. सं १४४ किं. रु. १

## मारुतिउपासना.

प्रथम मारुतिरायांचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी

किं ८४ पत्ताः—मुमुक्षु कचेरी, नाशीक सिटी.

॥ श्री ॥

# श्रीयाज्ञवल्क्यमूर्तिप्रतिष्ठा ।

## शुक्ल यजुर्वेदाचे प्रवर्तक श्रीयाज्ञवल्क्य

महर्षि हे जनकराजाच्या सभेमध्यें समस्त ऋषिमंडलाच्या हृदयांत उत्पन्न झालेल्या आत्म–विषयक संशयसमूहाला दूर करून अद्वितीय आत्मस्वरूप ब्रह्मनिष्ठत्वाला प्रगट करून जनकराजानें पण लावलेल्या एकहजार गायींना घेऊन मोक्ष-इच्छापन्न ( मुमुक्षु ) जनकराजाला अद्वैतवेदान्ताचा उपदेश करून सर्वांचे सुप्रसिद्ध असे सद्‌गुरु झाले तेव्हां पासून आजपर्यन्त त्या तहार्षिंची नित्यपूजा करण्या करितां आसेतुहिमाचलपर्यंत कोठेही शिलामूर्तिरूपानें सुप्रतिष्ठा झालेली न पाहून, ह्यावेळेस श्रीकाशीक्षेत्रस्थ पंचगंगानदीतीरावर श्रीबिन्दुमाधवाचे समीप असलेल्या सुप्रसिद्धस्थानीं ह्या वर्षाच्या माघमासांमध्यें याज्ञवल्क्यमहर्षिंची मूर्ति स्थापन करण्याचा मी निश्चय केला आहे. श्रीमूर्तीच्या प्रतिष्ठेच्या पूर्वकर्तव्य अशा कार्यांकरितां अपेक्षित द्रव्य संख्या रु० ३००० आवश्यक आहे. त्यानंतर रोजच्या पूजा-वेतनादि सर्व खर्चाकरितां प्रतिमासीं ३० रुपये आवश्यक आहेत त्या साठी मूळधन ६००० रुपयांची जरूरी आहे. एकंदर नऊ हजार रुपये ह्या प्रतिष्ठेच्या कार्यांस वसूल करणें अवश्य आहे. चतुर्थाश्रमी असलेल्या अशा माझा जीवननिर्वाह सद्‌गृहस्थाधीनच आहे म्हणून मी निर्धन आहे ह्या प्रतिष्ठेच्या कार्याला लागणाऱ्या द्रव्यसहाय्याला उद्देशून या पत्रिकेद्वारा माझा अभिप्राय आपणांसमोर मीं प्रगट करितो, ह्याकरिता अशा सद्‌गुरुदेवतेच्या प्रतिष्ठेविषयीं ज्यांना अत्यन्त अभिमानपूर्वक भक्तिश्रद्धा असेल त्यानीं अर्पण केलेल्या द्रव्याविषयीं अन्यथा विनियोग होईल असा संशय सोडून सांसारिक नैसिर्गिककष्टांचा विचार न करता गुरुदेवतांचें अर्चन सर्व अरिष्टांची निवृत्ति करून सकलमनोरथ पूर्ण करणारे ऐहिक व पारलौकिक श्रेय देणारे हें कार्य आहे असा निश्चय करून श्रीकाशीक्षेत्राचा महिमा आणि तेथे होणारी श्रीयाज्ञवल्क्यांच्या प्रतिष्ठेची आवश्यकता ह्याचा विचार करून आपल्या शक्तीप्रमाणें सहाय्य करावे तसेच तुमचे स्थान काशीहून दूर असल्यामुळें व कर्तव्यकार्यें फार असल्यामुळें पुन्हा २ ह्या विषयांत सूचना करणें अशक्य असल्यामुळें आपण सद्‌गृहस्थांनीं जें द्रव्य देण्याचा संकल्प केला असेल तें द्रव्य लौकरच खाली लिहिलेल्या पत्त्यांवर पाठवावें प्रतिष्ठेच्या सुमुहूर्तांचा निश्चय करून निमंत्रणपत्रिका मी पाठवेन.

मि० श्रावण शुक्ल पंचमी रविवासरे सं० १९८९

श्रेयोभिलाषी
श्रीब्रह्मानन्दसरस्वती स्वामी,
श्रीपंचगंगेश्वर मठामध्ये, श्रीबिन्दुमाधव घाट, काशी।

# मराठी वाङ्मयाचा इतिहास-खंड १ ला.

## (१) पुणें, ज्ञानप्रकाश (ता० २।९।३२)

"मराठी वाङ्मयाचा इतिहास या पुस्तकमालेच्या नांवावरूनच त्याची व्यापकता दिसून येणारी आहे. पुस्तकाला व्यापक नांव देणें कठिण नाहीं पण त्याप्रमाणें करणी करून दाखविणें हेंच काम खरोखर बिकट आहे. त्यास नुस्ता उत्साह असून चालत नाहीं. त्या उत्साहाचें योग्य चीज होण्यास दीर्घ व्यासंग व प्रशंसनीय विद्वत्ता यांची अवश्य जोड लागते व हे सर्व गुण रा. पांगारकर यांच्या अंगीं पूर्णतेनें वसत आहेत याबद्दल समंजस माणसांत मतैक्यच होईल असा आह्मांस भरवसा वाटतो. रा. पांगारकर यांचा मराठी भाषेचा व्यासंग अनेक वर्षांचा आहे किंबहुना त्यांनीं तें आपलें जीवितकार्यच केलें आहे असें ह्मटलें असतांही चालेल. आजपर्यंत त्यांनीं मराठी वाङ्मयास व पर्यायानें त्याच्या इति-हासास साहाय्यक किंवा उपकारक होणारीं अशीं अनेक वाचनीय पुस्तकें लिहिलीं आहेत, पण त्यांचा प्रस्तुतचा प्रयत्न हा त्या सर्वांच्या शिरोभागीं बसविण्यासारखा आहे. यांत मराठी भाषेची उत्पत्ति व विकास यांचा केवळ जंत्रीवजा वृत्तांत दिला नसून प्रत्यक्ष पुस्तक पाहिल्यावर कर्त्याची इतिहासदृष्टि फार व्यापक व पल्लेदार असल्याचें दिसून येईल. आपण केलेल्या दीर्घव्यासंगाचा जनतेस खरोख-रीच योग्य उपयोग व्हावा अशी श्रेयस्कर दृष्टि बाळगूनच त्यांनीं हें पुस्तक अत्यंत परिश्रमशीलतेनें व वाचकांस बहुश्रुत करण्याच्या सदिच्छेनें लिहिलें असल्याचा प्रत्यय येतो........ शेवटच्या प्रकरणांतून ज्ञानेश्वरीचें अंतरंग आविष्कृत केलें आहे. ज्ञानेश्वरीची सर्वतोमुखी स्तुति होत असते, पण प्रत्यक्ष वाचणारे थोडे. ज्ञानेश्वरी ह्म० काय चीज आहे हें यांतील प्रकरणांवरून उत्कृष्ट दिसून येणारें आहे. ज्ञानेश्वरींतील प्रतिपाद्य विषय हृद्य व मनोरम रीतीनें ह्या ग्रंथांत वर्णन केले आहेत. ग्रंथकर्त्याचा ज्ञानेश्वरीचा व्यासंग जसा उत्कृष्ट दृष्टोपत्तीस येतो त्याप्रमाणेंच रम्य स्थळें निवडून काढण्यासंबंधांतील त्यांची रसिकताही निदर्शनास येते...... ज्ञानेश्वरीची दृष्टि अध्यात्मिक असली तरी त्या दृष्टींत आधिभौतिक सृष्टिही कशी सामावली आहे हें १७ व्या प्रकरणांत सविस्तर दाखविलें आहे. त्यावरून तत्का-लीन परिस्थितीवर जसा उत्कृष्ट प्रकाश पडतो त्याप्रमाणेंच ज्ञानेश्वर महाराजांची सर्वव्यापी किंवा सर्वंकष निरीक्षणशक्ति दृग्गोचर होते...... तात्पर्य हा ग्रंथ ऐति-हासिक दृष्टीनें सर्वस्वी वाचनीय असा झाला आहे. एवढ्या काळाचा सुसंगत असा इतिहास लिहिण्याचा रा. पांगारकर यांनीं संकल्प करून त्यांतला पहिला खंड —

पुढील खंडही उत्कृष्ट निघतील अशी ग्वाही देणाऱ्या स्वरूपांत—काढला याबद्दल त्यांचें कोणीही प्रशंसापूर्वक अभिनंदनच करील. त्या काळचा श्रद्धापूर्वक कोणास अभ्यास करावयाचा असल्यास हा ग्रंथ जसा उपकारक ठरणार आहे, तसाच त्याचा चिकित्साबुद्धीनें अभ्यास करणारांसही तो अनेक रीतीनीं साहाय्यक होणार आहे, किंबहुना अशा व्यापक व सर्वोपयोगी विषयास रा. पांगारकर यांच्यासारखा परिश्रमशील, पर्युत्सुक व पारंगत असा ग्रंथकार लाभला हें मराठी वाङ्मयाचें सुदैवच समजलें पाहिजे. पुढील खंड लवकर प्रकाशित व्हावोत असी प्रस्तुत खंडाची शोभन मांडणी पाहून कोणीही सदिच्छा करील."

## ( २ ) नागपूर, महाराष्ट्र ( ता. ३१।७।३२ )

"विद्वत्तेच्या, भाषाप्रभुत्वाच्या आणि ग्रंथकर्तृत्वाच्या दृष्टीनें ज्यांना मराठी वाङ्मयाच्या निरनिराळ्या शाखांचे आचार्य ह्मणतां येईल अशा श्रेष्ठ लेखकांत श्री. पांगारकर यांची गणना होते. मराठी प्राचीन काव्यांचें त्यांच्याइतकें व्यापक आणि नैष्ठिक अध्ययन केलेला पंडित आज महाराष्ट्रांत प्रायः एकही सांपडणार नाहीं. प्राचीन कवींचा व्यासंग, त्यांच्या ग्रंथांच्या आणि विचारांच्या भूमिकेशीं समरस होऊन, केलेला बहुश्रुत ग्रंथकार आज महाराष्ट्रांत पांगारकराशिवाय एकही नाहीं......त्यांच्या परिशीलनाची व्याप्ती आणि ग्रंथलेखनही इतर ग्रंथकारांपेक्षा खचित अधिक विस्तृत आहे......भावे यांच्या 'महाराष्ट्रसारस्वतांपेक्षा हा ग्रंथ सर्वच दृष्टीनीं अधिक भरदार आहे...पाश्चात्य वाङ्मयाच्या इतिहासांतून त्या त्या काळच्या घडामोडी व त्यांचे वाङ्मयावरील परिणाम यांचें ज्याप्रकारचें विवरण आपण वाचतों त्या प्रकारच्या विवेचनाचा अल्पांशही भावे यांच्या ग्रंथांत दृष्टीस पडत नाहीं; श्री. पांगारकर यांचा ग्रंथ त्या मानानें किती तरी अधिक समावेशक असून, त्यांत प्राचीन मराठी वाङ्मयाची भूमिका विशद करण्यासाठीं त्यांनीं अतिशय परिश्रम घेतले आहेत... श्री. पांगारकर यांनीं ग्रंथाच्या पूर्वार्धांत वैदिक उपनिषद्वाङ्मय आणि दुसऱ्या बाजूनें तामील वाङ्मय यांचा विस्तारानें केलेला प्रपंच समर्थनीयच वाटतो. ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी यांच्या विषयीं २५० पृष्ठांत जें विवेचन केलें आहे त्यांत श्री. पांगारकर यांच्या अध्ययनाचा परिपाक सांठविला आहे......मराठी भाषा आणि प्राचीन मराठी वाङ्मय यांची भूमिका परिश्रमपूर्वक व मार्मिकतेनें विशद केलेली असून मुकुंदराज, ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या काव्यांचें विवेचन अत्यंत सरस केलें आहे. मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना प्रस्तुत ग्रंथ ह्मणजे एक वरदानच वाटेल."

# आनंदाच्या लहरी.

लेखकः—श्रीहनुमानप्रसाद पोद्दार, गोरखपूर.

"मग भगवंता! तुझ्याकरितां साऱ्या भोगांना विषमरोग मानून त्यांचाही त्याग माझ्या कडून व्हावा आणि केवळ तुलाच घेऊन मौज करावी.

इंद्राचें— ब्रह्मदेवाचें पदही त्यापुढें तुच्छ—अगदीं तुच्छ होऊन जावें;

'मग श्रीशंकराचार्यांच्याप्रमाणें मी हे गाऊं लागावें:—

सत्यपि भेदापगमे नाथ! तवाहं न मामकीनस्त्वम्।
सामुद्रोहि तरंगः क्वचन समुद्रो न तारङ्गः॥

"बाहेरील पवित्रतेपेक्षा हृदयाची पवित्रता मनुष्याच्या चरित्राला उज्ज्वल बनविण्याचें कामीं अधिक सहायक होते. मनुष्यानें काम, क्रोध, हिंसा, वैर, दंभ आदि दुर्गंधीनें भरलेला कचरा बाहेर फेकून हृदय नेहमीं स्वच्छ राखिलें पाहिजे.'

"वरून निर्दोषी म्हणविण्याचा प्रयत्न न करितां मनांतून निर्दोषी बनले पाहिजे निर्दोषमनाच्या मनुष्याला जगानें दोषी म्हटलें तरीही कांहीं हरकत नाहीं, परंतु मनांत दोष ठेवून वरून निर्दोषी म्हणविलें जाणें हानिकारक आहे!

"निर्दोष सत्कार्य, भयानें, संकोचानें किंवा अल्प–मतामुळें कधींही सोडूं नये. कार्याची निर्दोषता, त्याचें उपकारित्व आणि तुमची श्रद्धा, प्रामाणिकता व दृढता यांच्या प्रभावानें आज नाहीं तर कालांतरानें कां होईना लोकांना त्या कार्याची आवश्यकता पटेल.

"आपल्या विरोधी मनुष्याला अनुकूल करून घेण्याचा सर्वांत उत्तम उपाय म्हणजे त्याच्यावर सरळ व खरें प्रेम करणें हा होय. तो तुमचा द्वेष करो, तुमचें कांहीं अनिष्ट करो, तथापि तुम्ही त्याजवर प्रेमच करा. प्रतिहिंसेला स्थान दिलें कीं पडलाच म्हणून समजा.'

"संसारसुखापेक्षां परमात्मसुख अत्यन्त विलक्षण आहे हें लक्षांत ठेवा. संसारिक सुखासाठीं परमात्मसुखाच्या कार्यांत कधीं बाधा येऊं देऊं नका.

"कर्तव्यपालनांत प्रमाद होऊं न देणें हीच सफलतेची गुरुकिल्ली आहे अशा प्रकारें वागणाऱ्यावरच परमेश्वराची कृपा होते, आळशी व कर्तव्यविमुख लोक त्या कृपेला योग्य नव्हत.'

'एखाद्याच्या तोंडून आपल्याविरुद्ध गोष्ट ऐकतांच त्याला आपला विरोधी समजूं नका. विरोधाचें कारण शोधा आणि त्याचें निराकरण करण्याला अंतःकरणापासून झटा; शक्य आहे कीं तुमच्यांतच एखादा दोष असेल आणि तो आजपर्यंत तुम्हांला दिसला नसेल अथवा वाईट हेतु नसतांनाहि तोच एकाद्या परिस्थितीच्या

प्रवाहांत वाहवला असेल. अशा परिस्थितींत शांतीनें व प्रेमानेंच घेतलें पाहिजे.

" आपल्या हृदयाचें परीक्षण करीत राहाणें हेंच साधकाचें कर्तव्य आहे, त्यांत घृणा, द्वेष, हिंसा, वैर, मान, अहंकार, कामना आदींना आपलें घर करावयाला सवड मिळूं नये. वाईट म्हणविला जाणें एका परीनें चांगलें पण चांगला म्हणवून घेऊन वाईटच राहणें हें तर त्याहूनही अगदींच वाईट आहे.

## विसरून जा

' तुमच्याकडून एकाद्या प्राण्याची कधीं कांहीं सेवा घडली तर मीं त्याच्यावर उपकार केला असा अभिमान करूं नका. तुमच्याकडून झालेल्या सेवेनें त्याला जें सुख मिळालें तें त्याच्या कोणत्यातरी पूर्व शुभ कर्मांचें फल आहे असें निश्चित समजा; तुम्हीं केवळ निमित्त झाला आहांत; एखाद्याला सुख. देण्याच्या कामीं ईश्वरानें तुम्हांला निमित्त केले याबद्दल ईश्वराला धन्यवाद द्या आणि त्या प्राण्यानें तुमच्या सेवेचा स्वीकार केला याबद्दल त्याचें उपकार माना. जर तो तुमचे उपकार मानूं लागेल किंवा कृतज्ञता प्रकट करूं लागेल तर मनांतल्या मनांत तुम्हाला संकोच वाटला पाहिजे आणि त्यावेळीं तुम्ही भगवंताची अशी प्रार्थना करा कीं 'हे भगवन् ! तुझ्या कार्यांत मला व्यर्थ मोटेपणा कां मिळत आहे आणि? त्याला नम्रतेनें सांगा कीं ' अहो! ज्यानें तुमच्यासाठीं अशी व्यवस्था करून टेविली होती त्या ईश्वराचे तुम्ही कृतज्ञ व्हा आणि नेहमीं सत्कर्म करीत रहा म्हणजे फलस्वरूपा तुम्हांला वारंवार सुख मिळत राहील. मी तर निमित्त मात्र आहे मला मोटेपणा देऊन अभिमानी बनवूं नका. '

' मी तुझ्यावर उपकार केला अशी जाणीव त्याला देऊं नका, त्याला असें जाणवितांच त्याला तुमच्या उपकाराचें मोठें थोरलें ओझें वाटूं लागेल. तो दुःखी होईल, पुढें तुमची सेवा स्वीकारतांना त्याला संकोच वाटूं लागेल. तुमची दिलेली जाणीव तो जर न मानील तर तुम्हाला दुःख होईल, तुम्ही त्याला कृतघ्न समजाल आणि याचा परिणाम तुम्हां दोघांच्या हृदयांत द्वेष उत्पन्न होण्यांत होईल. म्हणून मी कोणाची सेवा केली आहे ही गोष्ट बिलकूल विसरून जा. '

## याद राखा.

' तुमच्याकडून एखाद्या प्राण्याचें कांहीं अनिष्ट झालें किंवा त्याला दुःख पोचलें तर त्याबद्दल तुम्ही अतिशय पश्चात्ताप करा. आपणाला असें वाटूं देऊं नका कीं ' त्याच्या भाग्यांतच दुःख होतें, मी फक्त निमित्तमात्र झालों, मी निमित्त बनलो नसतो तर त्याच्या कर्मांचें फल त्याला कसें मिळालें असतें !

त्याच्या भाग्यामुळेंच असें झालें आहे, यांत माझा काय दोष ? ' त्याच्या भाग्यांत कांहींही असो त्याच्याशीं तुम्हांला कांहीं कर्तव्य नाहीं, तुम्हांला ईश्वराची व शास्त्राची अशीच आज्ञा आहे कीं कोणाचेंही अनिष्ट करूं नये. तुम्ही कोणाचें वेडे वांकडे करीत असाल तर तो तुमचा अपराध आहे आणि त्याबद्दल तुम्हाला अवश्य दंड भोगावा लागेल त्याला कर्म--फल भोगविण्यासाठीं ईश्वर आपणहूनच दुसऱ्या कोणाला निमित्त करता. तुम्ही निमित्त होऊन पापाचें ओझें कां उचललें ? '

' ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं आपल्याला दुसऱ्याकडून जरासेंही कष्ट मिळताच जसे दुःख होतें तसेंच दुसऱ्यालाही होतें. याकरितां चुकून सुद्धां दुसऱ्याचें अनिष्ट व्हावें अशी भावना करूं नका; ईश्वराला नेहमीं अशी प्रार्थना करा कीं 'देवा! जिच्या योगानें तुझ्या सृष्टींतील तुझ्या कोणत्याही बालकाचें अनिष्ट करण्यास किंवा त्याला दुःख देण्यास मी कारणीभूत होऊं नये अशी सद्बुद्धि मला दे. ' सदा सर्वांचें खरें कल्याण व्हावें अशीच इच्छा बाळगा आणि यथासाध्य दुसऱ्यांची सेवा करण्याची वृत्ति ठेवा कुष्ट भरलेला, गांजलेला, दुःखी—दरिद्री यांना पाहून ' हा आपल्या वाईट कर्माचें फल भोगीत आहे, जसें केलें होतें तसें फल भोगत आहे ' असें समजून त्याची उपेक्षा करूं नका, त्यांची घृणा करूं नका तसेंच त्यांच्याशीं तुसडेपणानें वागून त्यांना कधीं कष्टी करूं नका. पूर्वींचा तो किती कां पापी असेना, तुमचें काम त्याचें पाप पहाण्याचें नव्हे, तुमचें कर्तव्य शक्त्यनुसार त्याची भलाई करणें व त्याची सेवा करणें एवढेंच आहे; त्याच्याविषयीं इतकीच तुम्हाला भगवंताची आज्ञा आहे. हें तुमच्याकडून होत नसेल तर कमींत कमीं एवढें ध्यानांत ठेवा कीं तुमच्याकडून कोणालाही कसलेंही कष्ट होऊं नयेत किंवा कोणाचें कांहीं अनिष्ट होऊं नये. तुम्ही एकाद्याची घृणा करीत असाल तर तुम्ही पाप करीत अहांत आणि त्याचें कडू फळ तुम्हाला चाखावें लागेल. '

' जर कधीं एखाद्या जीवाला तुमच्याकडून कांहीं तरी त्रास होईल तर त्याची क्षमा मागा; अभिमान सोडून त्याच्यापुढें हात जोडून दया भिक्षा मागा. हजारों मनुष्यांचे समोर देखील आपला अपराध कबूल करताना संकोच करूं नका, परिस्थिति पालटली तरीहि आपली ही गोष्ट बदलूं नका. त्याला सुख देऊन, त्याची सेवा करून, आपल्या विषयीं त्याचें मनांत सहानुभूति व प्रेम उत्पन्न करा. ' माझें कोण काय करूं शकेल ? मी सर्व तऱ्हेनें बलिष्ठ आहे, धन विद्या, पद यानीं मी मोठा आहे. त्या कमजोर, अशक्ताकडून माझें काय बिघडणार ? असे विचार मनांत येऊं देऊं नका. ईश्वराच्या दरबारीं कोणीही लहान मोठानाही; तिथल्या न्यायावर तुमच्या या धन-विद्येचा कांहींही प्रभाव पडणार नाहीं. कमजोर गरी-

याचा दुःख पूर्ण निश्वास तुमचा अभिमान चूर्ण करण्याला समर्थ होईल. तुमच्या-कडून दुसऱ्याचें अनिष्ट होणारी अगदीं क्षुल्लक घटना देखील तुमच्या हृदयांत शूळासारखी बोचली पाहिजे, म्हणजेच तुमचें हृदय शीतल होईल व तुम्हीं पाप-- मुक्त व्हाल.'

## विसरून जा.

'दुसऱ्याकडून तुमचें कधीं कांहीं अनिष्ट झालें तर त्याबद्दल दुःख करूं नका, तें आपल्या प्रथम केलेल्या वाईट कर्माचें फळ समजा. मनांत असा विचार कधीं येऊं देऊं नका कीं 'अमुक मनुष्यानें माझें अनिष्ट केलें आहे,' ईश्वराच्या दरबारीं अन्याय होत नाहीं, असें निश्चयानें समजा -तुमचें जें अनिष्ट झाले आहे किंवा तुमच्यावर जी विपत्ति आली आहे ती अवश्यही तुमच्या पूर्वकृत कर्माचें फळ आहे; वास्तविक विनाकारण तुम्हाला कोणी कदापिहि कष्ट देऊं शकणार नाहीं. किंवा हेंहि संभव नाहीं कीं कार्य प्रथम होऊन जावें आणि कारण मागून उत्पन्न व्हावें! यास्तव तुम्हाला जें कांहीं दुःख मिळत आहे तें अवश्यही तुमच्या स्वतःच्या पूर्व कर्माचें फळ आहे; ईश्वर तर तुम्हांला पापमुक्त करण्यासाठीं दयाळूपणानें न्यायपूर्वक फळाचें विधान करीत आहे. ज्याच्याकडून तुम्हांला दुःख मिळालें आहे त्याला केवळ निमित्त समजा; तो विचारा अज्ञानानें व मोहवश होऊन निमित्त बनला, त्यानें तर आपल्याच हातानें आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली आणि तुम्हाला दुःख देण्यांला निमित्त बनून स्वतः करितां दुःखाला निमंत्रण दिलें आहे. जो स्वतः करितां दुःखाना बोलावितो तो बुद्धिवान् नव्हे, हें खास. तो चुकला आहे अर्थात् दयेला पात्र आहे. त्याच्यावर रागावूं नका, त्याचें वाईट व्हावें अशी इच्छाहि धरूं नका. कधीं त्याच्या अनिष्टाची कामना करूं नका. उलट 'हे भगवंता! या चुकलेल्या जीवालां सन्मार्गाला लाव, याच्या बुद्धीला जागृत कर, भ्रमानें झालेला याचा अपराध क्षमा कर' अशी परमेश्वराची प्रार्थना करा.

'संभव आहे कीं एखाद्या परिस्थितींत सांपडून भ्रमानें त्याच्याकडून असलें काम घडलें आणि त्यामुळें तुम्हांला कष्ट झाले. परंतु आतां तो आपल्या करणीवर पस्तावला असेल, त्याचें हृदय पश्चात्तापाच्या आगीनें जळत असेल आणि तो संकोचांत पडला असेल. अशावेळीं त्याच्याशीं प्रेम करणें व त्याच्याशीं उत्तम व्यवहार ठेवणें हें तुमचें कर्तव्य आहे. त्याला स्पष्टरीतीनें समजाऊन सांगा कीं 'हें पहा, तुम्ही पश्चात्ताप कां करितां? तुमचा यांत दोष तरी काय आहे? मला जे कष्ट मिळाले ते माझ्या पूर्व-कर्माचें फल आहे. मला आपलें कर्मफल भोगविण्यास कारण झाल्यामुळें तुमचे तर माझ्यावर उपकार झाले आहेत. तुम्हीं अगदीं संकोच

करूं नका. तुमच्या खऱ्या हृदयांतल्या या खऱ्या शद्बांनीं त्याच्या हृदयाची आग निवून जाईल, तो सावध होईल व पुढें कोणाचें वाईट करणार नाहीं. यदि वास्तविक कुबुद्धिनें त्यानें जाणून सवरून तुम्हाला कष्ट दिले असतील व त्यामुळें त्याला पश्चात्तापाऐवजीं आनंद होत असला तरीहि तुमच्या चांगल्या वर्तणुकीनें व प्रेमयुक्त व्यवहारानें त्याच्या हृदयाला पश्चात्ताप होईल, तुमच्या मोठेपणापुढें त्याचें शिर आपोआप झुकेल. त्याचें हृदय पवित्र होईल, हें निश्चित. कदाचित् असें नच झाले तरीही कांहीं हरकत नाहीं; तुमचें आपलें मन तरी सुंदर प्रेमाच्या व्यवहारानें शुद्ध आणि शीतल राहीलच!'

'त्याचा कधीं द्वेष करूं नका. द्वेष कराल तर तुमच्या मनांत वैर, हिंसा-आदि अनेक नवे–नवे पापाचे संस्कार पैदा होतील; त्याचेंहि मन शुद्ध राहणार नाहीं, त्याच्या मनांत पूर्वीं वैर नसलें तरी तुमच्या आतांच्या या असद् व्यवहारानें उत्पन्न होईल, द्वेषाग्नीनें दोघांचीं हृदयें जळूं लागतील, वैर—भावना परस्परांना दुःखी करील आणि पाप--पंकांत फेकून देईल.' अतएव ही गोष्ट अगदीं विसरून जा कीं अमुक मनुष्यानें कधीं माझें अनिष्ट केलें होतें.'

## याद राखा.

'दुसऱ्याकडून तुमचें थोडेंसेही चांगलें झालें किंवा उपकार झाला किंवा सुख मिळालें तर त्याचा अंतःकरणपूर्वक उपकार माना, त्याच्या विषयीं कृतज्ञता बाळगा. तें काम माझ्या प्रारब्धानें झालें आहे, यांत त्याचा माझ्यावर काय उपकार आहे, तो केवळ निमित्त मात्र आहे' असें मुळींच समजूं नका. परंतु असेंच समजा कीं त्यानें निमित्त होऊन तुमच्यावर मोठी दया केली आहे. त्याचे उपकार जन्मभर स्मरण करा, स्थितींत बदल होतांच त्या उपकारांना विसरून जाऊं नका आणि सदा सर्वदा त्याची सेवा करण्यास व त्याला सुखी करण्यास तत्पर रहा. प्रसंगीं हजारों लोकांसमोरहि त्याचा उपकार स्वीकारण्याविषयीं संकोच करूं नका; असें करण्यानें परस्पर प्रेम वाढेल, आनंद व शांति यांची वृद्धि होईल, लोकांत दुसऱ्यांना सुख देण्याची प्रवृत्ति आणि इच्छा अधिकाधिक उत्पन्न होईल; सहानुभूति आणि सेवाभाव फैलावेल. याद ठेवा कीं उपकार किंवा सेवा करणाऱ्या विषयीं कृतज्ञ होऊन मनुष्य जगताची एक मोठी सेवा करीत असतो. कारण त्या योगानें उपकाऱ्याच्या चित्ताला सुख वाटतें, त्याचा उत्साह वाढतो आणि त्याच्या मनांत उपकार किंवा सेवा करण्याची भावना द्विगुणित होते. कृतज्ञ पुरुषावर परमात्मा प्रसन्न होतो व कृतघ्नावर त्याचा कोप होतो. म्हणून कृतज्ञ व्हा आणि उपकार करणाऱ्याचा उपकार कधीं विसरूं नका.'

'आम्हाला दुसऱ्यांच्या ठिकाणीं जे दोष दिसूं लागतात याचें मुख्य कारण बहुतकरून आपल्या चित्ताची दूषित वृत्ति हेंच असतें. आपल्या चित्ताला निर्दोष बनवा म्हणजे जगांत दोषी फारच कमी दिसूं लागतील.'

'स्वतःचे दोष पाहण्याची संवय लावून घ्या, मोठ्या सावधानीनें आपल्या मनांतले दोष पहा म्हणजे तुम्हांला याचा पत्ता लागेल कीं तुमचें मन दोषांनीं कसें भरलेंले आहे, मग दुसऱ्यांचे दोष पाहण्याला तुम्हाला फुरसतच मिळणार नाहीं.'

'मनांत उत्पन्न होणाऱ्या प्रत्येक संकल्पाबरोबर रागद्वेष असतात, तदनुरूप मनुष्य सुखाचा किंवा दुःखाचा अनुभव करतो. तसेंच या रागद्वेषामुळेंच दुसऱ्यांत गुण किंवा दोष दिसूं लागतात. ज्यावर राग ( अनुराग ) होतो त्याचे दोष देखील गुण वाटतात आणि ज्याचा द्वेष वाटतो त्याचे गुणहि दोष दिसूं लागतात. राग-द्वेषांचा चष्मा हटविल्या शिवाय कोणाचेंही यथार्थ स्वरूप समजणें शक्य नाहीं.'

'मनांत उठणाऱ्या प्रत्येक तरंगाचें तुम्ही द्रष्टा बना, यानें तरंगाचा नाश शीघ्र होईल, मनाला वश करण्याचा हा सुंदर उपाय आहे. याप्रमाणें रागद्वेषांचे द्रष्टा बनल्यानें त्यांचा नाश करण्याला सहाय्यता मिळेल.'

'जीवन फार थोडें आहे, सर्वांशीं प्रेमपूर्वक मिळून मिसळून वागा, सर्वांशीं चांगलीं वर्तणूक ठेवा, अमृताचा प्रसार करुन जा, विषाचा बिंदू कोठेंही टाकूं नका. तुमचा प्रेमपूर्ण व्यवहार अमृत आहे आणि द्वेषपूर्ण व्यवहार हेंच विष.'

'एकाद्या पुरुषाची व तुमची तासभरच जरी भेट झाली तरी आपल्या प्रेमपूर्ण सरळ व्यवहारानें त्याच्या हृदयांत अमृत भरून द्या; तुमच्यापासून कोणी विष घेऊन जाऊं नये या विषयीं सावध रहा, हृदयांतून सगळें विष काढून टाकून त्यांत अमृत भरा आणि पावलों पावलीं केवळ तेंच अमृत वितरण करीत जा.'

'वर्ण, जाति, विद्या धन किंवा अधिकार यानें मोठें आहांत म्हणून स्वतःला मोठे समजूं नका; याद ठेवा कीं सर्वांत एकच राम रमून राहिला आहे. लहान-मोठा व्यवहार आहे, आत्मा नाहीं.'

'व्यवहारांत सर्व प्रकारची समता असंभव तशीच हानिकारक आहे, यामुळें व्यवहारांत आवश्यकतानुसार विषमता राखूनही मनांत समता ठेवा, आत्मरूपानें सर्वांना एक- सारखे समजा. कोणालाही आपल्याहून हीन समजून त्याची घृणा करुं नका किंवा आपल्यांत मोठेपणाचा अभिमानही घुसूं देऊं नका.'

'जो आपल्याला सर्वांहून लहान समजतो, तोच मोठा आहे, या मंत्राचें नेहमीं स्मरण ठेवा.'

'ईश्वर सदा सर्वदा तुमच्या बरोबर आहे ही गोष्ट कधीं विसरूं नका. ईश्वराला बरोबर समजण्याचा भाव तुम्हाला निर्भय आणि निष्पाप करण्याला मोठी मदत करील. हा भाव नव्हे, खरोखरच ईश्वर सदा सर्वांच्या बरोबर आहे.'

'ईश्वराच्या अस्तित्वावर वाढता विश्वास असावा. ज्या दिवशीं ईश्वराच्या सत्तेचा पूर्ण निश्चय वाटेल त्या दिवशींच तुम्ही पापरहित आणि ईश्वरसन्मुख झाल्याशिवाय राहणार नाहीं.'

'आपणाला सदा बलवान, निरोगी, शक्तिसंपन्न आणि पवित्र बनवा, असें बनविण्यासाठीं हा निश्चय करावा लागेल कीं मी वास्तविक असाच आहे. आणि ही गोष्ट खरीही पण आहे. तुम्ही शरीर नव्हे आत्मा आहांत; आत्मा नेहमींच बलवान्, निरोगी, शक्तिसंपन्न आणि पवित्र आहे. देहाला 'मी' मानण्यानेंच निर्बळता, आजारीपण, अशक्तता आणि अपवित्रता येत असते.'

'देहाला 'मी' समजून आपणाला कधीं बलवान, निरोगी, शक्तिसंपन्न आणि पवित्र समजूं नका, असें समजाल तर खोटा अभिमान वाढेल. कारण देहाच्या ठिकाणीं हे गुण नाहींत.'

'देहाभिमान हेंच पाप आहे आणि हीच सर्वांत मोठी अपवित्रता आहे. एक तर आपणाला ईश्वराचा पवित्र अभिन्न अंश आत्मा माना किंवा त्या प्राणेश्वर प्रभूचा दास माना, आत्मा हा पवित्र आणि बलवान आहेच प्रभूचा दासही मालकाच्या बळावर मालकाच्या समानहि पवित्र आणि बलवान् होऊन जातो.'

'ईश्वराची कधीं सीमा बांधूं नका, तो अनिर्वचनीय आहे, साकारहि आहे आणि निराकारहि आहे तसेंच या दोहोंहून विलक्षणही आहे. भक्त त्याला ज्या भावानें भजतो त्याच भावांत तो प्रत्यक्ष होतो आणि हेंच त्याचें ईश्वरत्व आहे.'

'ईश्वराचें स्वरूप किंवा सृष्टि—रचनेच्या सिद्धान्ताचा निर्णय करण्याच्या बखेड्यांत न पडतां श्रद्धा—भक्तिपूर्वक कोणता तरी एक मार्ग पकडून मार्गक्रमण चालूं ठेवा. जसजसें पुढें जाल तसतसें रहस्य आपोआप उलगडत जाईल. चालूं न लागतां व्यर्थ निर्णयांत पडाल तर कोणत्या ना कोणत्या तरी मताचें आग्रही बनून लढण्या--झगडण्यांत जीवन गमावून बसाल, तत्त्व–प्राप्ति शास्त्रार्थानें होत नाहीं; ती गुरुदेवाची सेवा आणि त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें श्रद्धापूर्वक चालत राहण्यानेंच होते.'

'भोगांविषयीं वैराग्य धरा, वैराग्याला चार गोष्टी आवश्यक आहेत जगतांत वाटणारी रमणीयता, सुख, स्नेह आणि सत्ता यांचा त्याग करणें या त्या चार गोष्टी होत. परमात्म्याचा अनुराग धरा, त्याच्या ठिकाणीं या चार गोष्टी पूर्णपणें

आहेत याचा अनुभव घ्या.'

'कुसंगापासून सदा आपणाला सांभाळले पाहिजे आणि सत्संगाचा आश्रय घेतला पाहिजे. विषयी पुरुषांचा संग तर फारच हानिकर आहे. चेतन—पदार्थांची गोष्ट कशाला ? मनाला भुलविणाऱ्या व इन्द्रियांना आकर्षित करणाऱ्या जड भोग्य वस्तूंचा संग देखील त्याज्य आहे.'

'ईश्वर-विरोधी गोष्टी कधींही चुकून सुद्धां करूं नयेत, ऐकूं नयेत; हा एक सर्वांत मोठा अपराध आहे.'

'मनांतून राग-द्वेष काढून टाकून अनासक्त भावानें इन्द्रियांच्या द्वारां विषयांचा उपभोग घ्यावा राग- द्वेषयुक्त होऊन किंवा विषयांचे गुलाम बनून नव्हे, इंद्रियांना गुलाम करून त्यांच्याकडून काम घ्या. त्याचे गुलाम बनून त्यांच्या हुकुमात वागूं नका.'

'साधकाला सर्वांत मोठा प्रतिबंध म्हणजे कीर्तीची आवड. धन आणि स्त्री सोडणे सोपें आहे परंतु कीर्तीचा लोभ सोडणें फारच मुष्किलीचें आहे.'

'सुख एखाद्या कार्यांत किंवा वस्तूत नसून तें तुमच्या मनांत आहे; चित्त शांत असलें कीं सुख, नाहीं तर दुःखच दुःख. चित्ताच्या शांतीसाठींच सांसारिक कामनांचा त्याग अवश्यक आहे.'

'जें कांहीं कार्य कराल तीच भगवंताची सेवा समजून त्याच्या साठींच करा, दयानिधि प्रभूची आपल्यावर कृपा आहे असें समजा, त्याच्या कृपेवर पूर्ण विश्वास ठेवा आणि तुमच्या कार्याचा जो कांहीं परिणाम होईल तो मंगलमय भगवंताची इच्छा समजून आनंदानें शिरोधार्य करा !'


'आयुष्य जाऊं लागलें आहे. आम्हीं पळा-पळाला मृत्यूकडे चाललों आहोंत, अगदीं लवकरच जीवन समाप्त होणार आहे असें समजून पुढच्या यात्रे-साठीं येथील काम आवरूव कंबर कसून तयार रहा; जगताची आसक्ति अगदीं सोडून परमात्म्याला मिळण्याची तीव्र इच्छा करणें हेंच कंबर बांधून तयार होणें आहे.'

'जगांत नाटकांतल्या पात्राप्रमाणें रहा, आपला पार्ट पुरा करण्याला कधीं चुकूं नका आणि कोणताही पदार्थ आपला समजूं नका. पार्ट खेळण्यांत चुकविणें निमकहरामी आहे आणि एकाद्या पदार्थाला आपला समजणें बेइमानी आहे. समजा नाटकच, परंतु अभिनय करा लोकदृष्टीला सत्य वाटेल असाच.'

अपूर्ण

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें। संसारीं होइजे निराळे।
मोक्ष पाविजे निश्चळें। स्वरूपाकारें॥ ( श्रीदा


जुनें वर्ष २७ ) आश्विन शके १८५४ ( नवें वर्ष १२ वें

मास २ ) आक्टोबर इ. स. १९३२ ( अंक १०

वार्षिक वर्गणीं रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३०३



## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.



मुद्रकः— विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६ लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | ... | १--५ |
| २ नाथांची महाकाली तोफ | ... | ६ |
| ३ रामभाऊ भजनी व मद्रासचे उत्सव | ... | ७--१० |
| ४ बिल्वमंगलाची गोष्ट | ... | ११-१७ |
| ५ आनंदाच्या लहरी | ... | १८--२० |
| ६ उपनिषदांतील वेंचे | ... | २६--२९ |
| ७ महात्माजी व अस्पृश्यता | ... | २४ -२९ |
| ८ अस्पृश्योद्धारमंडळ व पं. मालवीय | ... | ३०--३१ |
| ९ अस्पृश्यांतील अस्पृश्यता | ... | ३२ |
| १० अस्पृश्यतानिवारण व त्यावरील साधुसंतांचे विचार | ... | ३४--४० |


## ग्राहक–वाचकांस

१ ग्राहकांपैकीं प्रत्येकानें आणखी दोन नवे ग्राहक ऑक्टोबरपासून मिळवून द्यावेत ह्मणजे मुमुक्षूचें जीवन सुरक्षित राहील. वर्गणीदारां वरच मुमुक्षु जिवंत राहणें शक्य आहे, तो बंद करण्याची पाळी न यावी अशी आमची फार इच्छा आहे. वर्गणीदार वाढण्याऐवजीं घटत चालल्यास हें अशक्य होईल.

२ 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' – खंड १ ला हा आमचा नवा ग्रंथ येथें आमचे कचेरींतच मागवावा किं रु ४. व्ही पी नें ४।१२

३ मुंबईस हा ग्रंथ 'पागनीस पेटकर आणि मंडळी' प्रार्थना समाजसमोर गिरगावांत मिळेल व पुण्यास लक्ष्मणराव अयाचित, जोगेश्वरीजवळ, पेठ बुधवार, यांजकडे मिळेल.

४ 'अस्पृश्यतानिवारण व त्याविषयीं साधुसंतांचे विचार' हा या अंकांतील शेवटचा लेख पूर्वीं ह्म० १९२९ सालीं येथें श्रीराममंदिर अस्पृश्यांस उघडण्याचा प्रयत्न झाला त्या वेळीं मुमुक्षूनें लिहिलेल्या अग्रलेखाचा उतारा आहे. तोच प्रसंग सांप्रत सर्व भरतखंडावर आल्यामुळें हा उतारा येथें दिला आहे.

पत्ता:—'मुमुक्षु' कचेरी, नाशीक सिटी.

मुमुक्षु मासिक वर्ष १२ वें

# मंगलाचरण

आक्टोबर १९३२ अंक १०



॥ १ ॥

नमो निर्गुण निराकार । मूळ आदिमाया तूं आकार ।
महालक्ष्मी तूं साचार । उघडे दार ठेउनि बैसलीस बया ॥
दार उघड बया । दार उघड ॥ ध्रु० ॥

---

घेउनि दहा अवतार । करिसी दुष्टांचा संहार ।
आकार सारुनि निराकार । काय बैसलीस बया ॥
बैसलीस क्षीरसागरीं । शेषाचे पलंगावरी ।
जयविजय द्वारीं । प्रेमदिवटे तिष्ठती ॥ १ ॥
दार उघडा बया । बया दार उघड ॥

---

त्वां मत्स्यरूप धरून । समुद्रांत बुडी देऊन ।
शंखासुरास वधून । वेद घेऊन आलीस बया ॥
तूं कूर्मरूप धरून । मंदराचळ पृष्ठीं वाहून ।
चौदा रत्नें काढून । इंद्र सुखी केला बया ॥ २ ॥
दार उघड बया । दार उघड ॥

---

वर देतां हिरण्याक्ष माजला । पृथ्वी काखे घेऊन पळाला ।
चंद्र सूर्य घेऊन गेला । अंधकार पडला बया ॥
तेव्हां वराहरूप धरून । दैत्यास क्रोधें वधून ।
पृथ्वी दाढेवरी धरून । चंद्रसूर्य आणिले बया ॥ ३ ॥
दार उघड बया । दार उघड ॥

---

दैत्यकुळीं हिरण्यकशिपु जन्मला । तेणें तुझा भक्त गांजिला

तें न पाहवे तुजला । त्वां उग्ररूप धरिलें बया ॥
तेव्हां क्रोधें स्तंभ फोडून । नारसिंह रूप धरून ।
दैत्यासी वधून । प्रल्हाद दिवटा रक्षिला बया ॥ ४ ॥
दार उघड बया । दार उघड ।

---

तूं वामनरूप धरून । बळीस पाताळीं घालून ।
शुक्राचा एक नयन । फोडिलास बया ॥
परशुरामरूप धरून । सहस्रार्जुनास वधून ।
मातेचें शिर छेदून । क्षत्रियकुळ निवटिलें बया ॥ ५ ॥
दार उघड बया । दार उघड ॥

---

सीतेचेनि कैवारें । रावण मारिला सपरिवारें ।
अठरापद्म वानरें । गोंधळ मांडिला लंकेसी ॥
कौरव पांडव मिळाले । कुरुक्षेत्रीं युद्ध मांडिले ।
अठरा अक्षौहिणी दिवटे भले । नाचती रणकल्लोळीं ॥६॥
दार उघड बया । दार उघड ॥

---

बौद्ध अवतार घेऊन । विटे समचरण ठेवून ।
पुंडलीक दिवटा पाहून । तयाचे द्वारीं गोंधळ मांडिला ।
आणीक दिवटे अपार । निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान खेचर ।
मुक्ताईजनाई विसोबा गोराकुंभार । रोहिदासचोखा
नाचती बया ॥ ७ ॥
दार उघड बया । दार उघड ॥

---

सावता नामा दामा जाण । नारा माहदा कबीर कमाल पूर्ण ।
सेना जनमित्र नरसी ब्राह्मण । दिवटे द्वारीं तिष्ठती ॥
आषाढी कार्तिकी गोंधळ मांडिला । उदो उदो शब्द जाला ।
कामक्रोधादिकां पळ सुटला । उदो उदो ऐकोनी बया ॥८॥
दार उघड बया । दार उघड ।

---

कलीचा प्रथम चरण । दैवतें राहिली लपून ।
तीर्थं सांडिलें महिमान । अठरा वर्ण एक जाले बया ॥

म्लेंच्छें गांजिले देवभक्तां । महिमा उच्छेदिला सर्वथा ।
न चले जपतप तत्वता । एकरूप सर्व जाले बया ॥ ९ ॥
दार उघड बया । दार उघड ॥

---

मत्स्याई बया । दार उघड ॥
कूर्माई बया । दार उघड ॥
वराहाई बया । दार उघड ॥
नरसाई बया । दार उघड
वामनाई बया । दार उघड ॥
परसाई बया । दार उघड ॥
रामाई बया । दार उघड ॥
कृष्णाई बया । दार उघड ॥
बौद्धाई बया । दार उघड ॥
कलंकाई बया । दार उघड ॥
महालक्ष्मी बया दार उडघ ॥
उदो उदो बया दार उघड ॥

काम महिषासुर मातला । तेणें विषयगोंधळ मांडिला ।
अज्ञानपोत पाजळला । आशासंबळ लावुनी बया ॥
क्रोध वेताळ दारुण । मातलासे मदें करून ।
मदमत्सर साह्य होऊन । भक्तिवैराग्य बुडविलें बया ॥१०॥
दार उघड बया । दार उघड ॥

---

दंभ झोटिंग महाबळी । अहंकार मुंजा छळी ।
आशा मनशा तृष्णा गोंधळी । विषयकल्लोळीं नाचती ॥
कल्पना वासना भूतावळी । और कोटिया मिळाली ।
नाचती विषयकल्लोळीं । भोग दिवटा घेऊनी बया ॥११॥
दार उघड बया । दार उघड ॥

---

ऐसें तुज न पाहावे जाण । ह्मणोनि बैसलीस मौन धरून ।
विटेवरी समचरण ठेवून । निवांत बैसलीस बया ॥
एका जनार्दनी शरण । विठ्ठल नामें अंबा जाण ।
पुंडलीक दिवटा अवलोकून । निवांत राहिलिस बया ॥१२॥

दार उघड बया । दार उघड ॥

॥ २ ॥

नमो आदिमाया भगवती । अनादिसिद्ध मूळप्रकृती ।
महालक्ष्मी त्रिजगती । बया दार उघड बया दार उघड ॥
हरिहर तुझें ध्यान करिती । सूर्य चंद्र कानीं तळपती ।
गगनीं तारांगणें रुळती । तेवीं भांगीं भरिले मोतीं ॥
नवखंड पृथ्वी तुझी चोळी । सप्तपाताळीं पाउलें गेलीं ।
एकवीस स्वर्ग मुगुटीं झळाली । बया दार उघड ॥ २ ॥
दार उघड बया । दार उघड ॥

---

अलक्ष्यपूर भवानी । दार उघड बया ॥
माहूर लक्ष्मी । दार उघड बया ॥
कोल्हापूर लक्ष्मी । दार उघड बया ॥
तुळजापूर लक्ष्मी । दार उघड बया ॥
तैलंगण लक्ष्मी । दार उघड बया ॥
कान्हाड लक्ष्मी । दार उघड बया ॥
पाताळ लक्ष्मी । दार उघड बया ॥
अष्टभुजा लक्ष्मी । दार उघड बया ॥
पंढरपूर निवासिनी । दार उघड बया ॥
दार उघड बया । दार उघड बया ॥
दार उघड । दार उघड । दार उघड ॥

---

उदो उदो ऐसा शब्द गाजतो ।
कामक्रोध दैत्यांवर कोरडा कडकडां वाजतो ।
ज्ञान पोत पाजळतो । बोधाची परडी घेतो ।
प्रेमाचा पाउल पुढें टाकतो । अहंशंखासुर दैत्य बळी घेतो ॥
दार उघड बया । दार उघड ॥

---

हनुमंत दिवटा बहावळी । अठरापद्म येउनि रणकल्लोळीं ।
सागर बांधोनियां शिळीं । करी लंकेची होळी ।
रावण कुंभकर्ण घेसी बळी । खेळसी शिरांची चेंडुफळी ॥

## मंगलाचरण

दार उघड बया । दार उघड ॥

शरण आला बिभीषण । तयासी राज्यीं अक्षय्य स्थापून ।
प्रल्हाद उपमन्यु ध्रुवापरी भातुकें देऊन । बुजाविसी कौतुकें ।
दार उघड बया । दार उघड ॥

जयजयाजी मूळपीठेंद्रभवानी । पांडवांची कुळस्वामिनी ।
अर्जुनरथीं स्वार होऊनी । वाग्दोर हातीं धरूनी ।
रथ फिरविसी कवतुकें । बया दार उघड ॥
दार उघड बया । दार उघड ॥

रणवाद्य भम् भम् भम् । दग् दग्दग् कड् कड्कड् ।
तोचि गोंधळ अंबे तुजप्रती । बया दार उघड ॥
दार उघड बया । दार उघड ॥

अर्जुन झडपिला संशयभूतें । महाशक्ति कृष्णाबाई ।
संशयभूत असे कठिण । हरिहरब्रह्मा नाटोपे जाण ।
त्वां बोधखंडा हातीं घेऊन । शिर छेदिलें भूताचें ॥
दार उघड बया । दार उघड ॥

त्वां रणकुंड जबडा पसरिला । आहुती घेसी दोनी दळां ।
रथ घोडे कुंजर तुला । नारळें बया अर्पिलीं ॥
अंबे तुझी न वर्णवे थोरी । खेळ खेळसी वैष्णवांमाझारी ।
पुंडलीक दिवटा महाभारी । ओवाळसी महामाया ॥
दार उघड बया । दार उघड ॥

जगदंबा प्रसन्न झाली । भक्तिकवाडें उघडिलीं ।
शंखचक्रांकित शोभली । कोटि चंद्रसूर्यप्रभावेल्हाळी ।
एका जनार्दनी माउली । करी कृपेची साउली ।
भक्तजयाकारणें संपूर्ण झाली । बया दार उघड ।
दार उघड बया । दार उघड ॥

# नाथांची महाकाली तोफ.

मंगलाचरणाचें हें पद्य फार मोठें आहे, पण तें माझें आवडतें आहे ह्मणून वर दिलें आहे. हें श्रीएकनाथमहाराजांचें पद्य आहे. मी त्याला 'नाथांची महाकाली तोफ' असें नांव दिलें आहे. याच वेळीं तें येथें घेण्याचें कारण आहे. ह्या अश्विन महिन्यांत देवीचें नवरात्र सार्वत्रिक व घरोघरीं असतें तरी सर्वांनीं तें देवीपुढें बसून रोज रात्री ह्मणावें; नाथवाणीनें देवीची प्रार्थना करावी. ह्या पद्यांत आध्यात्मिक रंग पूर्ण भरला आहे. ह्यांत ज्ञान आहे, भक्ति आहे, आणि मला वाटतें देशभक्तिही आहे. वस्तुतः हीं पद्यें दोन आहेत, पण मी दोहींचें कांहीं चरण गाळून एक केलें आहे. नाथांचें लिहिणें प्रशस्त व प्राल्हादिक असतें, तरी त्यांत अत्यद्भुत ओज आहे. नाथांना अठरापगड जातींच्या सर्व लोकांना शिकवायचें होतें. त्यांनीं सर्वांना समजेल, समाजांत भावनेची स्फूर्ति उत्पन्न होईल, अशा तऱ्हेनें आपलें काव्य लिहिलें आहे. प्रस्तुत पद्यांत विलक्षण तेज आहे, स्फूर्तिरूपता आहे एकदम भावनांची खळबळ उडेल अशी लोकोत्तर शक्ति आहे. जाणत्यानेणत्यांत चैतन्य उत्पन्न करणारी ही वाणी आहे. ही अनाथांना नाथ करील, दुर्बळांस शक्तिसंपन्न करील. नाथांचीं पुष्कळ पद्यें असल्या प्रकारचीं आहेत, पण त्यांकडे समाजाचें लक्ष जात नाहीं. सर्व पद्याचा अर्थ उकलून सांगणें सांप्रतच्या काळांत कठिण आहे. प्रत्ये-कानें आपल्या मनांत तें ह्मणतां ह्मणतां संपूर्ण अर्थ आणावा. पारमेश्वरी शक्ति आज दार लावून बसली आहे, तिला कवाडे उघडण्यास येथें मोठ्या तेजस्वी वाणीनें सांगितलें आहे. हें knocking आहे knock and the door will open असें बायबलामध्यें ह्मटलें आहे. 'दार उघड बया दार उघड' असा समष्टिव्यष्टींतल्या इश्वरी शक्तीला' उद्देशून प्रार्थना केलेली आहे. ह्या शक्तीनेंच मत्स्यकूर्मादि दहा अवतार घेतले आहेत. रामरूपानें प्रगट होऊन रावणकुंभकर्णास हिनें मारलें आहे, कृष्णरूपानें कंसशिशुपालादिकांचा हिनेंच फडशा पाडला आहे व बिभीषण, मारुती, अर्जुन इत्यादि भक्तांचें रक्षण हिनेंच केलें आहे. प्रल्हादासाठीं स्तंभातून प्रगटून पूर्ण देहात्मवादी अशा हिरण्यकशिपूचें पोट हिनेंच फाडलें आहे. व्यक्तींत किंवा समाजांत दुर्गुण व दुर्व्यसनें संचरलीं, कामक्रोधदंभादिकांचें प्रारब्ध झालें, ह्मणजे संतसज्जन हिचीच आराधना करितात व ही अव्यक्तांतून व्यक्त होऊन लोकांचें रक्षण करिते अशी ही पारमेश्वरी शक्ति विश्वाचा उद्धार करणारी आहे. नाथांच्या ह्या प्रार्थनेनेंच दचकूनही जागी झाली व समर्थशिवाजी महाराजांच्या रूपानें प्रगट होवून ही लोक संरक्षण करिती झाली. प्रत्येकानें आपल्या ठिकाणीं असलेल्या ह्या शक्तीला जागे करावें, जिवंत व्हावें व हे आपलें आणि राष्ट्राचें मंगल साधावें, हा हें पद्य येथें देण्यांत हेतु आहे.

॥ श्रीराम समर्थ ॥

# श्रीरामभाऊ भजनी व मद्रासचे उत्सव.

( एक महाराष्ट्रीय )

हे प्रेमळ सद्भक्त उत्तर कानड्याचे रहिवासी असून गृहस्थाश्रमी आहेत. यांचा पंथ रामदासी आहे. सुमारे पंचवीस वर्षांमागें रामेश्वर यात्रेसाठीं हे दक्षिणेंत आल्यावेळीं इकडच्या लोकांना यांचा परिचय झाला. पूर्वी हे भजन करीत असून कधीं कधीं भजनामध्यें व्याख्यानें देत असत. अलीकडे कांहीं वर्षांपासून हे कीर्तनें करूं लागले आहेत. यांचीं कीर्तनें व भजनें इतकीं भक्तिप्रेमरस पूर्ण असतात कीं त्यांचें यथार्थ वर्णन माझ्या लेखणींतून उतरणें हें अशक्य आहे. यांचा आवाज मोठा असून अत्यंत कर्णमधुर आहे. कांहीं वर्षांपासून हे गोमांतक व मुंबई इला--ख्यांत कीर्तनें करीत फिरत आहेत, करितां त्या प्रांतातील बऱ्याच लोकांना यांची ओळख असणेचा संभव आहे.

मद्रास प्रांतांत कंजीवरम् ( कांची ) व मद्रास शहर इत्यादि ठिकाणीं यांचे बरेच शिष्य आहेत. कंजीवरम्च्या सा ( सौराष्ट्र ) जातीच्या लोकांमध्यें यांनीं मद्यपाननिषेध करवून त्यांना भक्तिमार्गाला लावलें आहे. आतां ते लोक भजन करीत सन्मार्गानें आपला धंदा ( कपडे विणणें ) करीत आहेत.

यांच्या शिष्यांपैकीं टी. एम्. भाऊस्वामीराव नांवाचे मराठे ( क्षत्रिय ) गृहस्थ गत वीस वर्षांपासून दरवर्षी श्रीसमर्थनवमी—महोत्सव चालवीत आहेत. श्रीरामभाऊ भजनी हे मधून मधून एकादे वर्षी या उत्सवास येत असतात. त्या प्रमाणें यंदाचे वर्षी श्रीसमर्थ नवमी उत्सवांस ते येथें आले जॉर्ज टाउन गोविंदप्प नायकन् गल्लीतल्या एका मोठ्या धर्मशाळेंत श्रीसमर्थनवमीपासून जवळ जवळ एक महिनापर्यंत प्रतिदिनीं भजन, कीर्तन नामांकित गवयांचे जलसे, अन्नसंतर्पण, गोरगरीबांना अन्नदान इत्यादि कार्यें मोठ्या प्रमाणावर अत्यंत उत्तमरीतीनें पार पडलीं.

थोड्याच वर्षांमागें पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर हे मद्रासला आल्यावेळीं इथल्या गुजराथी लोकांनीं श्रीराममंदिर स्थापून दरवर्षी श्रीरामनवमीचा उत्सव सुरू केला. श्रीसमर्थनवमीमहोत्साह संपतांच श्री॰ रा॰ मा॰ भ॰ यांना गुजराथी लोकांनीं श्रीरामनवमीउत्सवास बोलावून नेलें. उत्सवांत दहा दिवसही " रघुपति राघव राजाराम । पतित पावन सीताराम " हा मंत्र अखंड चालू होता. कोटिरामनामाचा जप सामुदायिक रीतीनें करण्यांत आला. रात्रीं नऊ ते अकरा-पर्यंत भजनासह नगर प्रदक्षणा करीत. अखेरच्या दिवशीं श्रीरामचंद्राची तसबीर

( पठ ) चांदीच्या विमानांत ठेऊन अनेक वाद्यघोष व नामघोषानिशी मोठ्या थाटानें त्याची मिरवणूक काढली त्याच प्रमाणें अन्नसंतर्पण व गोरगरीबांना अन्न-दानहि करण्यांत आलें.

नंतर नारायण मुदली गल्ली न० २४ च्या धर्मशाळेंत, इकडचे कित्येक प्रमुख व्यापारी श्रीयुत रंगमन्नार चेट्टी, श्रीयुत कण्णन् चेट्टी ( श्रेष्ठी, ) श्रीयुत वेंकटेश पेरुमाळू चेट्टी वगैरे मिळून ' हरेराम हरेराम रामराम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे' या मंत्राचा सप्ताह सुरु करून ता० १२ जून ३२ पर्यंत केला. त्या बरोबर अन्नसंतर्पण, गरीबांना अन्नदान इत्यादि महत्कार्यें केली. याही वेळीं श्रीरामभाऊ भजनी हे हजर होतें. अखेरच्या दिवशीं प्रभु गौरांगाच्या पठाची मिरवणूक होऊन मोठ्या थाटानें उत्साह पार पडला. श्रीयुत कण्णन् चेट्टी हे आपल्या कांहीं मित्रांसह नवद्वीपची यात्रा करून आल्यापासून गौरांगपंथी झाले आहेत असें दिसतें.

पुन्हः ता० ७ जुलै ३२ पासून ता० ४ सप्टेंबर पर्यंत सात आठवडे, वर निर्देश केलेल्या धर्म शाळेमधें सप्तसप्ताह व शतकोटि रामनाम जप करण्यांत आले. या एकूण पन्नास दिवसांत हजारो स्त्रीपुरुषांनीं भाग घेऊन मंत्रजप व नामस्मरण केलें. देवाला रोज विविध पुष्पांनीं सजविलेला देखावा नयन मनोहर होता. ही जागा तर प्रत्यक्ष वैकुंठाप्रमाणें शोभत होती. रोज रात्रीं नऊ ते अकरा पर्यंत नगर प्रदक्षण चालेलें होतें. अखेरच्या दिवशीं सकाळीं सर्व मंडळी–सुमार दहा हजार लोक–समुद्र किनाऱ्यावर जाऊन क्षीराब्धिशायीं जो श्रीकृष्ण परमात्मा त्याची प्रार्थना करण्यांत आली. सर्व मंडळी समुद्रस्नान केली. हा देखावा अवर्ण-नीयच होता. प्रार्थनेचा मुख्य हेतु देशक्षेमावांचून दुसरा काय असणार !

मागच्या खेपेला श्री० रा० भा० भ० हे मद्रासला आल्यावेळीं, महाराष्ट्र मंडळ, महाराष्ट्र असोसिएशन् व इतर ठिकाणींहीं यांचीं कीर्तनें झाली. असो,

श्री गुरुवर्य रामभाऊ हे गत पंचवीस वर्षांपासून मद्रासचे परिचित असून त्यांच्या पासून बरेच लोक भक्तिपंथाला लागले आहेत, आणि कित्येक नास्तिक सुद्धा आस्तिक बनले आहेत. जिकडे तिकडे भजन व नामजप चालू आहे.

श्रीगुरुवर्य रामभाऊ भजनी यांचीं कांहीं पदें व अभंग उपलब्ध आहेत. त्या पैकीं कांहीं यापुढें दिलीं आहेत.

## ॥ अभंग ॥

गणाधीशा तूज । आधीं मी नमीतों ॥ पाय आठवीतों । भावें सदा ॥ १ ॥
सद्गुरु दातारा । जीवाच्या माहेरा ॥ सद्बुद्धि द्या त्वरा । प्रेमयुक्त ॥ २ ॥

शारदे गे माते । हृदयीं वसोन ॥ करी समाधान । रामनामें ॥ ३ ॥
संत भक्त तुम्ही । करा उपकार ॥ दावा रघुवीर । वत्सासी या ॥ ४ ॥
प्रभो रामराया । पडतों मी पाया ॥ भव हा तराया । तुजसी ध्यातों ॥ ५ ॥
संतचरणरज । रंक रामभाऊ ॥ चरण तुझे पाहूं । प्रार्थितसे ॥ ६ ॥

---

(२) माय बाप बंधु । बहीण सोयरा ॥ सर्वस्वाचा थारा । तूं चि रामा ॥ १ ॥
तुजवीण मज । नाहीं अन्य कोणी ॥ यासाठीं चरणीं । शरण आलों ॥ २ ॥
देहाचा विसर । पाडी मज आतां ॥ पापी या अनाथा सोडूं नको ॥ ३ ॥
पूर्वीं त्वां तारीले । असंख्य भक्तांसी ॥ वाटतें मानसीं । उद्धरीसी ॥ ४ ॥
सगुणरूप तुझें । पहावें नयनीं ॥ हेंचि नित्य मनीं । वाटतसे ॥ ५ ॥
भक्ती तुझी कैसी । करावी नकळे ॥ अंतरीं तळमळे । जीव माझा ॥ ६ ॥
शिकवी तूं आतां । कैसें मी चालावें ॥ मन हे लावावें तुझ्या पायीं ॥ ७ ॥
अनन्य हा दीन । रंक रामभाऊ ॥ तराया उपावू । विचारीतो ॥ ८ ॥

## ॥ पद ॥

शिष्ट पाला । दुष्टकाला ॥ इष्ट दाता । राघवा ॥
कष्टलों मीं विषयडोहीं । भ्रष्टली मति माधवा ॥ १ ॥
दुरितदहना । परमकरुणा । करित स्मरणा श्रीहरी ॥
त्वरित मजला धरुनि हाता । हरि तूं चिंता मुरहरी ॥ २ ॥
कमलनयना कमलवदना । विमलचरणा रघुपते ॥
नमन तुज मी करित भावें । शमवि दुरितें श्रीपते ॥ ३ ॥
नाम मुखिं दे । प्रेम मनिं दे ॥ नेम हाची चालवी ॥
कामना मज अन्य नसावी । श्यामसुंदर जगदीशा ॥ ४ ॥
दीनदासा हीच आशा । देशि ( सि ) मुक्ती आसरा ॥
हीन मी मतिमंद ऐसा । तारी आतां श्रीधरा ॥ ५ ॥

## अभंग

सद्गुरु सारीखा । आणीक सोयरा । विश्रांतीचा थारा नाहीं दुजा ॥ १ ॥
आपुलीयापरी दुजया करीतो ॥ हृदयीं धरितो । प्रेमभरें ॥ २ ॥
ज्ञानामृत पाजूनी । मन निववीतो ॥ पंथ दाखवीतो । सुगमसा ॥ ३ ॥
त्याचि पंथें जातां, मनासी आनंद ॥ आनंदाचा कंद भेटतसे ॥ ४ ॥
ऐसा दाता पाहतां । नाहीं त्रिभुवनीं ॥ मनासी उन्मनी कोण करी ॥ ५ ॥

ह्मणोनी निर्धार धरावे ते पाय ॥ नाहीं हाय हाय कदाकाळीं ॥ ६ ॥
ह्मणे रामचंद्र वरा गुरुनाथा ॥ भवभय त्राता तोचि एक ॥ ७ ॥

॥ पद ॥

श्री व्यंकटरमणा । संकटहरणा, तारि आतां देवा तारि आतां ॥ ध्रु ॥
तनु मन धन हे चरणिं अर्पुनी ॥ शरण आलों मी दीन होउनी ॥
नाम तुझें मम वदनिं देउनी ॥ पाव आतां, देवा ! पाव आतां ॥ १ ॥
नाम तुझें हे पतितपावन । कलियुगीं नाहीं यासमान ॥
न लगे कांहीं जपतपसाधन । मोक्षदाता ॥ देवा तूंचि होसी ॥ २ ॥
आजवरि रक्षिले, बहु भक्तांसी ॥ नासुनि त्यांच्या पापराशी ॥
नेले त्यां त्वां वैकुंठासी ॥ दीन ताता । देवा दीन ताता ॥ ३ ॥
भूस्वर्गासम शेषगिरिवरि । वास तुझा बा श्रीहरी ॥
दीन दास हा आला द्वारीं । तारि आतां, देव तारि आतां ॥ ४ ॥

॥ पद ॥

कधि तारिसि मजला ॥ रामा ॥ तुजविण रक्षिल कोण मजला ॥रामा॥ ध्रु०
नामहि नाहीं, नेमहिं नाहीं ॥ नाहीं ध्यान मला ॥ तुझेरे ॥ ना ॥ १ ॥
धनसुतदारा, हृदयीं चिंतुनी ॥ विसरलों मी तुजला ॥ सदोदित ॥२॥
नाम पुकाचें, कष्टहि नाहीं ॥ त्यांत न इष्ट मला ॥ अभाग्या ॥ ३ ॥
ज्ञानहिं नाहीं । भक्तिहि नाहीं ॥ न दिसे मार्ग खुला । उद्धरण्या ॥ ४ ॥
घडिघडि पळपळ । आयुष्य गेलें ॥ जन्म वृथा गेला ॥ माझा ॥ ५ ॥
अपराधी मी । क्षमा करि प्रभो ॥ जीव व्याकुळ झाला ॥ खचितची ॥
दीन दास हा प्रार्थितसे तुज ॥ दर्शन देई मला । आतां प्रभो ॥ ८ ॥

* * *

वरील उत्सव सर्व इतक्या उत्तम रीतीनें पार पडले कीं एक शतांश सुद्धां त्याचें यथार्थ वर्णन माझ्यासारख्या अल्पमतीच्या लेखणींतून या इकडच्या मोडक्या तुटक्या मराठीभाषेद्वारा करणें साध्यच नाहीं. थोड्याच वर्षामागें गुरुवर्य रामचंद्र कृष्ण कामत हे भेटल्या वेळीं, इकडील धार्मिक कार्यांबद्दल लेख लिहून 'मुमुक्षू'ला पाठविण्याबद्दल आज्ञा केली, आणि ती गुर्वाज्ञा ह्मणून न उल्लंघितां माझ्या अल्पमतीला कळल्याप्रमाणें लिहून काढली आहे. प्रेमळवाचक हो! हंसक्षीरन्यायानें यांतला रस तेवढा घ्या, अशी आपल्यापाशी माझी नम्र विनंति आहे.

---

१०५/२
२५/१०/३३

# बिल्वमंगल

( लेखक-श्रीहनुमानप्रसाद पोद्दार )

दक्षिण देशीं कृष्णा-वेण्येच्या तीरांवरील एका गांवीं रामदास नांवाचे एक भगवद्भक्त ब्राह्मण राहत असत. त्यांच्या पुत्राचें नांव बिल्वमंगल. बिल्वमंगलाला त्याच्या पित्यानें त्यावेळीं शक्य असलेलें शिक्षण दिलें होतें. या शिक्षणाच्या योगानें व रामदासांच्या भक्तिभावाच्या प्रभावानें लहानपणीं तो शांत, सदाचारी व श्रद्धाळु असा निपजला होता. परंतु आईबाप वारून घरची सर्व संपत्ती त्याच्या ताब्यांत येताच त्याला कुसंगत बाधली

यौवनं धनसम्पत्तिः प्रभुत्वं अविवेकता ।
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ॥

" तारुण्य, धन-संपदा, प्रभुत्व आणि अविवेक या पैकीं एकेकटेच अनर्थ-कारक आहे, मग ही चारी ज्या ठिकाणीं एकत्र होतील त्या विषयीं काय सांगावें ? " सर्व नाश हा ठेवलेलाच.

बिल्वमंगलाजवळ धन होतें, घरीं दुसरें कोणी विचारणारे नव्हतें, तारु-ण्याचा मद आणि तशांत कुमार्गी मित्रांच्या संगतीनें अविवेकानेंही येऊन ठाणें दिलें. हळू हळू बिल्वमंगलाचें अंतःकरण अनेक दुर्गुणांचे निवास-स्थान होऊन राहिलें ! गावांत एका दिवशीं चिंतामणि नांवाच्या वेश्येचा नाच होता. हौशी लोकांचे थवेच्या थवे नाच पहाण्याला लोटले होते. त्यांत बिल्वमंगल सुद्धां आपल्या मित्रांबरोबर गेला होता. वेश्येच्या प्रथमदर्शनीच बिल्वमंगलाचें मन तिच्यावर बसलें. त्याची बुद्धि विवेकशून्य झाली, वेश्येच्या लावण्यसरितेंत बिल्व मंगल बुडून गेला; त्यानें त्या हाडमांस भरलेल्या रूपवती पुतळीवरून आपलें सर्वस्व ओवाळून टाकलें-तन, मन, धन, कुल, मर्यादा मान या सर्वांवर पाणी पडलें ! त्या ब्राह्मण कुमाराचें पुरतें पतन झालें !! खातां-पितां, उठतां बसता. सदासर्वदा बिल्वमंगलाच्या चिंतेचा विषय म्हणजे केवळ एक "चिंता". वेश्येच्या एक वेळच्या मुखावलोकनाचा हा परिणाम ! वेश्यांचा नाच करविणाऱ्या हौशी लोकांनो ! थोडा विचार करून पहा, किती तरुणांच्या पतनांचें पाप तुम्हीं आपल्या शिरीं येत आहांत तें !

बिल्वमंगलाच्या घरीं आज त्याच्या पित्याचें श्राद्ध असल्यामुळें नदीपली-कडे असलेल्या चिंतामणीच्या घरीं जाणें त्याला शक्य नव्हतें. श्राद्धाची तयारी होऊन विद्वान् कुलोपाध्याय शास्त्रोक्तपद्धतीनें बिल्वमंगलाकडून श्राद्ध करवूं लागले, परंतु त्याचें मन 'चिंतेच्या' चिंतनांत गर्क होऊन गेलें होतें; त्याचें चित्त

कशांतही लागत नव्हतें, श्राद्ध उरकून ब्राह्मणांची भोजनें आटोपलीं आणि स्वतः कसें तरी चार घास खाऊन तो 'चिंते' कडे जाण्याला तयार झाला. इतके होई–पर्यंत संध्याकाळची वेळ आली होती. श्राद्धाच्या दिवशींतरी वेश्येच्या घरीं न जाण्या-विषयीं पुष्कळांनीं त्याला समजून सांगितलें. परंतु त्यांचे ऐकतो कोण? त्याचे हृदय तर केव्हांच कर्म–धर्म- शून्य होऊन गेलें होतें. बिल्वमंगल तर धांवतच नदीवर जाऊन पोंचला. पण भगवंताची माया अपार आहे, अकस्मात् जोराचें वादळ उठलें त्याबरोबरच मुसळधार पाऊसही सुरु झाला, आकाश अंधःकारानें भरून गेलें, मेघांच्या भयंकर गडगडाटानें व विजेच्या कडकडाटानें सर्व प्राण्यांची भीतीनें गाळण उडाली. अहोरात्र नदींतच राहणाऱ्या कोळी लोकांनींही आपा–पल्या नांवा किनाऱ्यावर नांगरून ते वृक्षांच्या आश्रयाला आले; परंतु या सर्व गडबडीचा बिल्वमंगलावर कांहींच परिणाम झाला नाहीं! त्यानें कोळयांनीं आप–णाला नदीपार पोंचवावें म्हणून विचारिलें. त्यांची विनवणी केली. पुष्कळशी उतराई देण्याचीही लालूच दाखविली पण मृत्यूशीं झगडावयाला कोण तयार होणार? सर्वांनीं इन्कार केला. जसजसा विलम्ब होऊं लागला तसतशी त्याची अधीरता वाढूं लागली. शेवटीं त्याच्यानें धीर धरवला नाहीं, त्यानें पुढचा मागचा कांहीं एक विचार न करितां पोहत जाऊन नदीपार होण्याकरतां पाण्यांत एकदम उडी घेतली! तें भयंकर धाडसाचें काम होतें पण "कामातुराणां न भयं न लज्जा" नदींतून एक मुडदा वाहात आला होता, बिल्वमंगल शुद्धीवर नव्हताच. त्यानें मुडद्याला लाकूड समजून त्याच्या सहाय्यानें तो नदीपार झाला. कपड्याची शुद्धी नाहीं, दिगंबर झालेला, सर्वच गडद अंधार पसरलेला, रानटी जनावरांचे शब्द होत आहेत, कोठेंही मनुष्याचा गंध सुद्धां नाहीं, अशा स्थितींत बिल्वमंगल उन्मत्तासारखा आपल्याच सुरांत चालला होता. थोड्या अंतरावर चिंतामणीचें घर होतें. श्राद्ध असल्यामुळें बिल्व-मंगल कांहीं येणार नाहीं अशी तिची समजूत होती म्हणून घरची सर्व दारें बंद करून ती निश्चितपणें झोपीं गेली होती. बिल्वमंगलानें बाहेरून तिला पुष्कळ हांका मारल्या, परंतु तुफानामुळें तिला त्या ऐकूं आल्या नाहींत. विजेच्या प्रका–शांत वरच्या खिडकींतून खालीं लोंबकळत असलेली दोरी बिल्वमंगलाला दिसली. लगेच तिच्यावरून वर चढून तो गेलाहि आणि त्यानें चिंतेला जागविलें. पाण्यानें गारठलेले त्याचें उघडें शरीर, सर्वांगाला भयंकर दुर्गन्ध येत असलेली असें त्याचें तें ध्यान पहाताच ती आश्चर्यानें स्तंभितच झाली! "तुम्हीं अशा भयंकर रात्रीच्या वेळीं बंद असलेल्या घरांत कसें आलांत?" या तिच्या प्रश्नाला आपण

एका ओंडक्याच्या साहाय्यानें नदीपार करून व दोरीवरून वर आल्याची हकीकत त्यानें तिला सांगितली. या वेळीं पाऊस बंद झाला होता. हातांत दिवा घेउन ती बाहेर आली आणि ते सडकें प्रेत आणि तो खिडकीला धरून लोंबकळत असलेला काळा नाग तिनें पाहिला. तिच्याबरोबर बिल्वमंगळ होताच. त्यानें ही खऱ्या रूपांत ओंडका आणि तो दोर पाहतांच त्याचा थरकाप झाला. त्यावेळीं चिंता त्याची निर्भत्सना करून म्हणाली 'अरे। तूं ब्राह्मण ना? आज तुझ्या बापाचे श्राद्ध होतें पण तूं हाडामांसाच्या पुतळीवर इतका आसक्त होउन गेलास! आपलें सारें धर्म-कर्म सोडून असल्या भयंकर रात्रीं प्रेताच्या आणि सापाच्या सहायानें तूं येथें येउन पोंचलास? तू आज जिला परम सुन्दरी समजून असा वेडा झाला आहेस ती शेवटीं या सडलेल्या मुड्या प्रमाणेंच होणार आहे! धिःकार असो तुझ्या या नीच वृत्तीला! अरे जर तूं याप्रमाणें त्या श्याम सुन्दरावर आसक्त झाला असतास, त्याला मिळण्यासाठीं असा तडफडून धांवला असतास तर या वेळपर्यंत त्याला भेटून तूं अवश्य कृतार्थ होउन गेला असतास!"

वेश्येच्या वाणीनें मोठें काम केलें, बिल्वमंगल चूप राहून मनांत विचारकरूं लागला. त्याची बाळपणाची स्मृति जागृत झाली, वडिलांची भक्ति आणि त्यांची धर्मपरायणता यांचें दृश्य त्याच्या दृष्टीपुढें नाचूं लागलें. बिल्वमंगलाची हृदय-वीणा नव्या सूरानें वाजूं लागली, विवेकाग्नीची ठिणगी पेटली, भगवत्प्रेमाचा समुद्र उचंबळूं लागला आणि त्याच्या नेत्रांतून अजस्र अश्रुधारा वाहूं लागल्या. बिल्वमंगलानें चिंतामणीचे चरण धरले आणि तो म्हणूं लागला" माता! तूं आज मला दिव्य दृष्टि देऊन कृतार्थ केलेस" मनांतल्या मनांत तिला आपला गुरु समजून त्यानें प्रणाम केला आणि त्याचक्षणीं त्या जगचिंतामणीच्या चारु-चिंतेंत निमग्न होउन उन्मत्तासारखा चिंतेच्या घरांतून बाहेर पडला. बिल्वमंगलाच्या जीवन नाटिकेचा अंक बदलला!!

श्यामसुंदराच्या प्रेममय मनोहर मूर्तीचें दर्शन करण्यासाठीं बिल्वमंगल वेड्यासारखा जागोजागीं भटकूं लागला. कांहीं दिवसांनीं एकदां त्याला रस्त्यांत एक परम रूपवती युवती दिसली. त्याचे पूर्वसंस्कार अद्यापपर्यंत नाहींसे झाले नव्हते. युवतीचे सौंदर्य पाहतांच त्याचे नेत्र चंचल झाले, नेत्राबरोबर मनहि ओढलें गेलें — भगवंतानें गीतेंत म्हटलें आहे.

"यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः।
इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः॥ (२-६०)

'प्रयत्नशील बुद्धिवान् पुरुषाच्या मनाला देखील हीं क्षुब्ध करणारीं इन्द्रियें जबरदस्तीनें खेंचीत असतात."

याप्रमाणें बिल्वमंगलाला फिरूनहि मोह झाला. भगवंताला विसरून तो फिरून विषयाग्नीकडे धांवला. बिल्वमंगल त्या युवतीच्या मागून तिच्या घरापर्यंत गेला. तरुणी आपल्या घरांत गेली, बिल्वमंगल उदास होऊन त्या घरच्या दरवाज्यांत बसून राहिला. घरमालकानें बाहेर येऊन पाहिलें तों एक म्लानवदन अतिथि ब्राह्मण बाहेर बसला आहे. त्यानें त्याचें कारण विचारलें. बिल्वमंगलानें निष्कपटभावानें सगळी कथा त्याला सांगितली आणि विनंति केली कीं 'मला पुनः एकदां त्या युवतीला डोळे भरून पाहून घेण्याची इच्छा आहे, "तुम्हीं तिला या ठिकाणीं बोलवून आणा " युवती त्या गृहस्थाची धर्मपत्नि होती, त्यानें मनांत विचार केला कीं काय हरकत आहे? जर तिला पाहून याचें समाधान होत असेल तर फार चांगलें आहे! अतिथिवत्सल गृहस्थ स्त्रीला बोलाविण्याकरिता आंत गेले. इकडे बिल्वमंगलाच्या अंतरीं अनेक प्रकारच्या विचारतरंगांचें काहूर माजलें!

"जो एकवेळ त्या अशरण-शरणाला शरण जातो त्याच्या योगक्षेमाचा सारा भार तो आपल्यावर घेतो". आज बिल्वमंगलाला सांभाळण्याची चिंता त्याला लागून राहिली. दीनवत्सल भगवन्तानें अज्ञानान्ध बिल्वमंगलाला दिव्य-चक्षू दिले; त्याला आपल्या स्थितीचें यथार्थ ज्ञान झालें; त्याचें हृदय शोकानें भरून आलें आणि माहीत नाहीं कोणत्या विचारानें त्यानें शेजारच्या बेलाच्या झाडाचें दोन काटे तोडून घेतले. इतक्यांत त्या गृहस्थाची ती धर्मपत्नि तेथें येऊन दाखल झाली, बिल्वमंगलानें तिला फिरून एकदां न्याहाळून पाहिलें आणि मनांतल्या मनांत स्वतःचा धिक्कार करून तो म्हणूं लागला कीं "अभागी नेत्रांनो! तुम्ही आज नसता तर माझें असें पतन कां झालें असतें?" इतकें म्हणून बिल्वमंगलानें-कदाचित् ही त्याची कमजोरी असेल किंवा आणखी कांहीं असेल त्या चंचल नेत्रांना दण्ड देणेंच त्याला योग्य वाटलें आणि त्यानें तत्काळ ते दोनी काटे दोन्ही डोळ्यांत खुपसले। डोळ्यांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या बिल्वमंगल हंसत नाचत हरिनामाच्या तुमुल गर्जनेनें आकाश भरून टाकूं लागला. त्या गृहस्थाला आणि त्याच्या स्त्रीला फार दुःख वाटलें परंतु त्या बिचाऱ्यांचा निरुपाय होता. बिल्वमंगलाचा बाकी राहिलेला सगळा चित्त-मल आज बिलकूल नष्ट झाला आणि तो त्या अनाथ-नाथाला शीघ्र मिळविण्यासाठीं फारच व्याकूळ होऊन गेला. हा त्याच्या जीवन--नाटकाचा दुसरा अंक समाप्त झाला.

परम प्रियतम श्रीकृष्णाच्या वियोगाच्या दारुण व्यथेनें त्याच्या फुटक्या डोळ्यांनीं चोवीस तास अश्रुमोचन सुरू केलें न भुकेचा पत्ता, न तहानेचा, न

झोपेंचे ज्ञान न जागृतीचे ! " कृष्ण कृष्ण " नामावळीनें दाही दिशांना प्रतिध्वनित करीत बिल्वमंगल रानोमाळ भटकूं लागला. ज्या दीनबंधूसाठीं त्यानें डोळे फोडून घेतले, ज्या प्रियतमाला मिळण्याकरितां सर्व ऐषआरामावर लाथ मारली, त्यानें मिळण्याला इतका विलंब करावा ही गोष्ट त्याला कशी सहन होणार ? जर सध्याच्या काळचा कोणीं एकादा भक्त असता तर भगवंताची खबर घेतल्याशिवाय राहिला नसता, भक्तीला रामराम तर कधींच ठोकून मोकळा झाला असता ! पण " जे सच्चे प्रेमी असनात ते आपल्या प्रेमीच्या विरहानें जीवनभर अश्रू ढाळीत असतात, हजारों आपत्ती सहन करतात. परन्तु आपल्या प्रेमीस्पदान्त कधींच दोषारोपण करीत नाहींत त्यांना आपल्या प्रेमास्पदावर दोष दिसतच नाहींत ! " जर मेघ जलवृष्टि न करतां दगडांचा वर्षाव करून चातकाचें सर्व पंख तोडून टाकील तरी चातक मेघावर कधीं रागावेल कां ?

" जेथें प्रेम हें स्वार्थानें व कामनेनें कलंकित झालेलें असतें तेथेंच प्रेमास्पदांत दोष दिसून येतात; कारण त्या ठिकाणीं देण्याघेण्याचा काटेकोर व्यवहार होत असतो; परंतु ज्या ठिकाणीं निर्मळ प्रेमाचा अगाध समुद्र आहे त्या ठिकाणीं तर एका प्रेमाखेरीज दुसऱ्या दशाचेंहि अस्तित्व उरत नाहीं !' अशा प्रेमीला सोडून प्रेमास्पदालाही कधीं चैन पडत नाहीं. त्याला सर्व सोडून धांवत यावेंच लागतें. आज आंधळा बिल्वमंगल कृष्ण--प्रेमानें मस्त होऊन जिकडे तिकडे भटकत आहे, कोठें खालीं पडत आहे कोठे कशाला तरी धडकत आहे, अन्नपाण्याचा तर कोठें ठावठिकाणाही नाहीं. अशा स्थितींत प्रेममय श्रीकृष्णाला निश्चित कसें राहवेल ? एका छोटाश्या गोपबालकाच्या वेशानें भगवान् बिल्वमंगलाच्या जवळ येउन आपल्या अद्वितीय मधुर वाणीनें म्हणाले " सूरदासजी ! आपणाला फार भूक लागली असेल मी थोडीशी मिठाई घेउन आलों आहे, पाणीहि आणलें आहे, हे ग्रहण करा. बिल्वमंगलाचे प्राण तर त्या बालकाच्या मधुर स्वरानेंच मोहुन गेलें होते, त्याच्या हातचा दुर्लभ प्रसाद घेतल्यावर त्याचें हृदय हर्षतरंगानीं तरंगित झालें. बिल्वमंगलानें बालकाला विचारिलें " तुमचें घर कोठें आहे ? तुमचें नांव काय आहे ? तुम्हीं काय करीत असतां ? "

बालकानें उत्तर केलें " माझें घर जवळच आहे माझें कांहीं विशिष्ट नांव नाहीं, कोणी कोणत्याही नांवानें मला हाक मारो मी त्याच्याशीं मी बोलतो. गाई चारतो, माझ्यावर प्रेम करणाऱ्यावर मीहिं प्रेम करतो. " बालकाच्या वीणा–विनिन्दित वाणीनें बिल्वमंगल मुग्ध होऊन गेला. बालक जातांना सांगून गेला कीं " रोज मीं येऊन आपणाला भोजन करवीन " बिल्वमंगल म्हणाला " फार उत्तम

आहे, तूं रोज येत जा" बालक निघून गेला पण बिल्वमंगलाचें मन बरोबर घेऊन गेला, 'मनचोर' हें तर त्याचें नांवच! असो. अनेक प्रकारचे नैवेद्य समर्पण करुनहि लोक ज्यांच्या कृपेसाठीं उतावळे झालेले असतात तेच कृपासिन्धु आज बिल्वमंगलाला आपल्या हातांनीं भोजन करविण्यास्तव येतात! धन्य आहे! प्रभु आपल्या भक्ताप्रीत्यर्थ काय करणार नाहीं?

बिल्वमंगलाला अजूनपर्यंत या गोष्टीचा पत्ताच नाहीं कीं त्यानें ज्याच्या खातर फकीरी बाणा घेतला, डोळयांत कांटे खुपसले, तो हाच बालक आहे! परंतु त्या गोपबालकानें त्याच्या हृदयावर असा अधिकार स्थापन केला कीं त्याला दुसरी गोष्ट ऐकणें देखील असह्य झालें. एक दिवस बिल्वमंगल विचार करूं लागला "सगळी ब्याद सोडून येथपर्यंत आलो, येथें ही नवीनच ब्याद येऊन लागली. स्त्रीच्या मोहांतून सुटलों पण आतां या बालकाच्या मोहांनें मला घेरलें" असा त्याचा विचार चालू होता इतक्यांत तो मधुर बालक त्याच्याजवळ येऊन बसला आणि मस्त बनविणाऱ्या आपल्या वाणीनें बोलूं लागला "बाबाजी! गुप-चुप कसला विचार चालला आहे? वृन्दावनाला चलता काय?" वृन्दावनाचे नांव ऐकताच बिल्वमंगलाचें हृदय प्रफुल्लित झालें परंतु आपलीं असमर्थता प्रकट करून म्हणाला 'बाबा, मी आंधळा वृन्दावनाला कसचा जाणार?" बालक म्हणाला 'ही घ्या माझी काठी, तिला पकडून मी तुमच्यावरोबर चालतो, बिल्वमंगलाचें मुख खुललें. काठी धरून भगवान् त्याच्या पुढें चालूं लागले. भग-वन्ताची दयालुता तरी पहा, भक्ताची काठी पकडून ते त्याचे मार्गदर्शक बनले आहेत! थोडे दूर गेल्यावर बालक म्हणाला" हें पहा! वृन्दावन आलें, आतां मी जातों" बिल्वमंगलानें बालकाचा हात धरला, हाताचा स्पर्श होताच बिल्व-मंगलाच्या शरीरांत विजेचा संचार झाला, सात्विक प्रकाश साऱ्या द्वारांत भरून गेला, बिल्वमंगलाला दिव्य दृष्टि प्राप्त झाली आणि तिच्या योगानें त्याला हा बालक 'प्रत्यक्ष श्यामसुन्दर'च दिसला. बिल्वमंगलाचें शरीर रोमांचित झाले, नेत्रांतून प्रेमाश्रूंची अनवरत धारा वाहूं लागली, भगवन्ताचा हात त्यानें आणखिन जोरानें पकडून धरला व म्हणूं लागला "आतां तुला ओळखिले, फार दिवसांनीं तुला पकडायला सांपडले. मी नाहीं आतां सोडणार" भगवान् म्हणाले "सोडता कीं नाहीं?"

बिल्वमंगल म्हणाला "नाहीं! कधींच नाहीं!!
त्रिकाळींहि सोडणार नाहीं!!!"

भगवंतानीं जोरानें झटका देऊन हात सोडवून घेतला. ज्याच्या बळावर

बलवान् होऊन मायेनें सर्व जगताला पददलित करून टाकिलें आहे, त्याच्या बळापुढें बिचारा आंधळा काय करणार? परंतु त्यानें एका असल्या रज्जूनें त्यांना बांधून टाकलें होतें की त्या बंधनांतून मुक्त होऊन जाणें फार मुष्किलीचें होतें. हात सोडवून घेतांच बिल्वमंगल म्हणालाः ' जातोस काय? पण लक्ष्यांत ठेव–

" हस्तमुत्क्षिप्य यातो ऽसि बलात्कृष्ण किमद्भुतम् ।

हृदयाद्यदि निर्यासि पौरुषं गणयामि ते ॥

जोरानें हात झटकून जातोस यांत विशेष तें काय? माझ्या हृदयांतून निघून जाशील तेव्हांच मी तुझें सामर्थ्य ओळखीन! "

भगवान् जाऊ शकले नाहींत! जाणार तरी कसे? प्रतिज्ञा करून चुकले आहेत ना? कीं–

" ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् । "

" मला जो जसा भजतो मीहि त्याला तसेंच भजतो "

भगवन्तानीं बिल्वमंगलाच्या डोळयावरून हात फिरविला, त्याचे डोळे उघडले! नेत्रांनीं प्रत्यक्ष भगवंतांचें दर्शन करून-त्यांच्या भुवनविमोहिनी अपरूप रूपछटेचें दर्शन झाल्यावर बिल्वमंगल स्वतःला संभाळूं शकला नाहीं. त्यांच्या चरणावर त्यानें लोटांगण घातलें आणि प्रेमाश्रूंनीं ते पावन चरणकमल तो धुऊं लागला!

भगवंतांनीं उठवून त्याला आपल्या छातीशी कवटाळलें. भक्त आणि भगवंताच्या मधुर आलिंगनानें समस्त विश्वांत मधुरता भरून गेली, देवांनीं पुष्पवृष्टि केली, भक्तमंडळी नाचूं लागली. हरिनामाच्या पवित्र नामध्वनीनें आकाश भरून गेलें! भक्त आणि भगवान् दोघेंही धन्य झाले! वेश्या चिंतामणि, ते सद्गृहस्थ आणि त्यांची पत्नि ही त्या ठिकाणीं उपस्थित झाली, भक्ताच्या प्रभावानें भगवानांनीं त्या सर्वांना आपलें दिव्य दर्शन देऊन कृतार्थ केलें

बिल्वमंगलानें कालान्तरानें कृष्ण-कर्णामृत नामक ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिला, आणि त्यानें जीवनभर भक्तीचा प्रचार करून भगवन्ताचा महिमा वाढविला. ( कांहीं मंडळींचे असें म्हणणें आहे कीं प्रसिद्ध भक्त-कवि सूरदास हे बिल्वमंगलच होत, परंतु याची ठीक माहिती मिळत नाहीं. )

---


# मारुतिउपासना.

प्रथम मारुतिरायांचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपीं स्तोत्रें, अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी

किं ८४ पत्ताः—मुमुक्षु कचेरी, नाशीक सिटी.

# आनंदाच्या लहरी.

लेखकः—हनुमान प्रसाद पोतदार, गोरखपूर.

'गुण- दोष सर्वांत असतात, चूक सर्वांकडून होते, तुम्ही जर एखाद्याचें कांहीं काम दिसतांच त्यांतले दोषच धुंडूं लागाल तर तुमची वृत्ति कालांतरानें फारच दूषित होऊन जाईल. तुम्हांला उत्तमांत--उत्तम अशा कामांत देखील दोषच दिसूं लागेल. स्वतः जळत राहाल आणि दुसऱ्याला जळत ठेवाल. या ऐवजीं जर तुम्ही गुणच पहाल तर तुमची वृत्ति सात्विक होईल, प्रसन्नता वाढेल, शांति मिळेल. सर्वांत गुण पाहण्याची संवय लावून घ्या, पहा किती आनंद मिळतो तें.'

'कोणाची चूक हुडकूं नका, चूक दिसेल तर ती विसरून जा, त्याचे चांगले हेतु, परिश्रम आणि निष्ठा यांची मनापासून कदर करा; त्याच्या कार्यांतील गुणांचा शोध करा. भलाई पहा तुम्ही गुणवान् व भले पुरुष व्हाल.'

'अब्रुदार व्हा खरी अब्रु काय आहे हें प्रथम समजून घ्या. अन्यायानें पैसा मिळवून देखील द्रव्याच्या बळावर मनुष्य या दुनियेंत अब्रुदार म्हणविला जाऊं शकेल, *परंतु परमात्म्याच्या घरीं* अशाची कांहींच पत नसते; येथें दारिद्र्यांत जीवन कंठून जगाच्या नजरेंतून उतरलेला असूनही जर धर्म-पथावरून च्युत झाला नसेल तर तोच सच्चा अब्रुदार आहे.'

'मान—मोठेपणाच्या मोलानें धर्म विकूं नका, त्या मान-मोठेपणाला पायाखालीं तुडवा आणि धर्माला सांभाळा.'

'धन, वाडा, मनुष्य, शरीरबळ यांच्या बळावर फुगून जाऊं नका, हें सारें बळ एका क्षणांत नष्ट होण्यासारखें आहे. ईश्वरी सामर्थ्य खरें बळ आहे म्हणून त्याचें उपार्जन करा.'

'जेथें दवाखाने आणि वैद्य डॉक्टर जास्ती आहेत तेथील मनुष्याचें शारीरिक पतन झालें आहे असें समजा. जेथें वकील जास्ती असतील आणि कचेऱ्यांत गर्दी होत असेल तर तेथील लोकांची इमानदारी नष्टप्राय झाली आहे असें समजा आणि जेथें घाण साहित्य खपत असेल तेथील लोकांचें नैतिक--पतन झालें आहे असें समजा.'

'केवळ औषधांनीं आणि दवाखान्यांनींच रोगांचा समूळ नाश होत नाहीं, रोगाचा समूळ नाश इंद्रियांचे संयमन आणि मनाची शुद्धि झाल्यावर होतो. इंद्रिय--संयम आणि मनशुद्धि हें असें औषध आहे कीं यानें शारीरिक स्वस्थता तर मिळतेच पण पारमार्थिक स्वास्थ्याचाही लाभ होतो, म्हणून इंद्रियांना वश

करण्याचा व मनाला शुद्ध करण्याचा निरंतर प्रयत्न करीत रहा.'

'सत्संगानें मनाची शुद्धि आणि इंद्रिय--संयम हीं होतात. अतः कुसंगतीचा त्याग करून सत्संगतीचें सेवन करा.'

'वकील व कोर्टकचेऱ्यांनींच भांडणांचें मूळ उपटलें जात नाहीं. भांडणाचें मूळ उपटण्यासाठीं सर्वांत अधिक जरुरीची गोष्ट म्हणजे इमानदारी. मनुष्य जर दुसऱ्याचे हक्क मारण्याची इच्छा सोडील तर भांडणें होणारच नाहींत.'

'भगवन्ताचें प्रेम संपादन करणें हाच मनुष्यजीवनाचा मुख्य उद्देश आहे या गोष्टीचें स्मरण ठेविलें पाहिजे भगवत्प्रेमाची प्राप्ति भगवंताच्या कृपेनेंच होते, कोणत्याही साधनानें नव्हे.'

'साधनाचा अहंकार कधीं करूं नका, भगवंताच्या आज्ञेप्रमाणें भगवदर्थ भजन--ध्यान करण्याच्या कामीं--जीवाची पर्वा न करतां—लागा, परंतु आपल्या अंतःकरणांत साधकपणाचा अभिमान उत्पन्न होऊं देऊं नका.'

'भगवंतावर दृढ विश्वास ठेवा, तुमच्या मनांत जेवढा म्हणून परमेश्वराचा विश्वास अधिक असेल तेवढे तुम्हीं भगवंताकडे अधिक ओढले जाल.'

'खऱ्या भक्तांचें एकमात्र बळ म्हणजे भगवंताचा भरवसा हेंच. ते पूर्ण निर्भरतेनें भगवंताचे होऊन केवळ भगवच्चिंतनातच आपले जीवन समाप्त करतात.

'जितका दृढ भरंवसा वाढेल तितकेंच भगवत्कृपेचा अनुभव प्रत्यक्ष मिळूं लागेल.'

'या गोष्टीची याद ठेवा कीं, भगवंतासारखा सुहृद, दयाळू, प्रेमी, सुन्दर ऐश्वर्यवान् दुसरा कोणीही नाहीं व तो तुमचा नित्य साथीदार आहे. तुम्हाला हृदयाशीं धरण्याला तो सदा हात पसरून तयार आहे.'

'संसारांत जें कांहीं पहात आहांत तें सर्व त्याचें नव्हें—तोच सर्व कांहीं, बनला आहे. हें जें कांहीं होत आहे तें सर्व त्याची लीला आहे. तो आपणच आपल्यांत खेळ करीत आहे.'

'सर्व भावानें त्याला शरण गेल्याशिवाय हें रहस्य समजुतींत उतरणार नाहीं. सर्व प्रकारचा अभिमान सोडून त्याला शरण व्हा, त्याच्या कृपेवर दृढ भरंवसा ठेवा, साऱ्या चिंता सोडून सर्व कांहीं त्याच्या चरणीं समर्पण करा.'

'त्याच्या चिंतनांत चित्त गुंतवा. त्याची प्रत्येक देणगी शिरोधार्य करून स्वीकारा, त्याच्या प्रत्येक आज्ञेचें हृदयापासून पालन करा आणि त्याच्यावर अनन्यतेनें निर्भर होऊन आपल्या क्षुल्लक वासनांचा त्याग करा.'

'त्याला मागणें म्हणजेच आपण ठकणें आहे कारण तो परम सुहृद् भग-

वान् आमचें जेवढें हित चिंतील तेवढा विचार करण्याला आमची बुद्धी कधींही समर्थ होणार नाहीं.'

'एक दिवस अवश्य मरून जावयाचें आहे या गोष्टीला विसरूं नका. मृत्यूच्या भयंकर देखाव्याचें स्मरण ठेवा, मरत असलेल्या मनुष्याच्या शरीराच्या घृणित दशेचें स्मरण करा, त्याच्या दुःख भरलेल्या नेत्रांची भयानकता ध्यानांत आणा, एक दिवस तुमचीही पण अशीच दशा होणार आहे.'

'मृत्यूची भीषणता पाहून एकवेळ भय वाटेल, विषाद होईल, जगांत अंधार दिसूं लागेल व निराशा होईल, पण यामुळें घाबरून जाऊं नका; ही निराशाच तुमच्या परम सुखाला कारण होईल. या निराशेच्या ठिकाणींचतुम्हीं परमात्म्याचें दर्शन करूं लागाल. . 'नैराश्यं परमं सुखम्.'

'भगवंतावर कधीं अविश्वास करूं नका, असें करणें सर्वांत मोठें पाप आहे.'

'भगवंताच्या नामावर विश्वास ठेवा याद असूं द्या कीं नामासंबंधीं संतांचें प्रत्येक वचन खरें आहे, नामाला शरण जाऊन याची परीक्षा तर करून पहा.'

-*-

---


# मोरोपंती वेचे.

आवृत्ति दुसरी. किं. १/१२

ग्रंथकारः--ल. रा. पांगारकर. बी. ए.

महाकवि श्रीमोरोपंत यांची पाउणलाख कविता घेऊन वाचण्याची ज्यांना सवड नाहीं त्यांनीं पंतकवितार्णवांतील रमणीय मोत्यें एकत्रित केलेला हा एकच ग्रंथ जवळ करावा. केसरीकारांनीं म्हटलें आहे. "महाराष्ट्रांतील रसिक, धार्मिक-प्रेमळ, भाषाभिमानी, धर्मनीतिव्यवहारज्ञ व लहानथोर अशा सर्व वाचकांनीं संग्रह करण्यासारखा रा. पांगारकरांचा हा ग्रंथ झाला आहे. या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं आहेतः-

१ ईश्वरभक्तिपर २ कवि आणि कविता ३ उपदेशपर ४ वर्णनपर ५ कथा, नकपर ६ चक्रीरामायण ७ विविधविषयपर.

प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत निबंध दिला असून त्यांत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे गुण, काव्याची महती इ० विषयांचे सांगोपांग विवेचन केलें आहे. ग्रंथाला टीपा, संदर्भ सर्व कांहीं दिले आहे व पंताचें संक्षिप्त चरित्र जोडलें आहे.

पत्ताः— मुमुक्षुकचेरी, नाशीक सिटी.

# उपनिषदांतील वेंचे

लेखक-श्रीराम गोसावी संपादक लोकसेवा, नाशिक.

श्वेताश्वतरोपनिषत्

## अध्याय ४ था

य एकोऽवर्णो बहुधा शक्तियोगात्
वर्णाननेकाभिहितार्थो दधाति ।
विचैति चांते विश्वमादौ स देवः
स नो बुध्द्या शुभया संयुनक्तु ॥

अनुवाद— जो स्वतां एक असून अनेक झाला आहे, अवर्ण असून नाना वर्ण ज्यानें धारण केले आहेत, स्वतां अरूप असून हा रूपाचा पसारा ज्यानें पसरला आहे, त्या देवानें आम्हाला शुभ बुद्धि द्यावी. आपल्या शक्तीच्या योगानें ज्यानें हें जगत् निर्माण केलें, पण ज्याला स्वतांला कसलाही अर्थ साधावयाचा नाहीं त्या देवानें आमचें मन पवित्र करावें. ज्यामधून हें सर्व विश्व, हा सर्व चराचराचा पसारा, हे आम्हीं येथें प्रादुर्भुत झालों व अंतीं हें सर्व दृश्यजात ज्याच्यामध्यें विलीन होणार आहे, त्या भगवंतानें आमच्यावर दया करावी, त्याच्या जवळ येण्याचा रस्ता दाखवावा सर्व असत्यापासून, सर्व लांड्यालबाड्यांपासून, सर्व दंभअहंकारकामक्रोधांपासून आम्हांला त्या दयाघनानें रक्षावें; व आमच्या बुद्धीला कल्याणाचा मंगलमय मार्ग दर्शवावा.

तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चंद्रमाः ।
तदेव शुक्रं तद्ब्रम्ह तदापस्तत्प्रजापतिः ॥

अनुवाद्-तो एकच देव हा अग्नि झाला आहे, हा भास्वान् आदित्य तोच परमात्मा आहे; हा विचरणारा वायु त्या सर्वशक्तीचेच एकरूप आहे. तो देवच हा चंद्रमा आहे. तोच शुक्र, तोच ब्रम्ह, तोच उदक आणि तोच प्रजापति झाला आहे. हें सर्व कांहीं तो आहे.

त्वं स्त्री त्वं पुमानसि ।
त्वं कुमार उत वा कुमारी ॥
त्वं जीर्णो दंडेन वंचसि ।
त्वं जातो भवसि विश्वतोमुखः ॥

अनुवाद्-हे परमात्मन्! सुंदर रमणी तूंच झाला आहेस आणि तिच्या मोहांत पडणाऱ्या पुरुषाचें रूप तुझेंच आहे; वात्सल्य उत्पन्न करणारा कुमार तूंच

आहेस आणि उद्या मातृपदावर आरुढ होणारी आजची कुमारी तूंच आहेस. मृत्युच्या दारवंठ्यांत काठी घेऊन पाय टाकणारा म्हातारा तूंच आहेस. आणि जन्मतांच विश्वतोमुख होणारा असा तूंच एकटा आहेस.

हे देवाधिदेवा! या नानात्वांतील हें तुझें एकत्व मला कळूं दे. माझ्या नानात्वबुद्धिमुळेंच संसाराचे हें सर्व द्वैतस्वप्न मला भेडसावीत आहेत; तुझें एकत्व न कळून आल्यामुळेंच कामक्रोध माझे लचके तोडीत आहेत. स्त्रीमध्यें तुझें असलेलें रूप मला दिसत नसल्यामुळें मी तिच्या मांसयंत्राला भुलत आहे. तुझी एकता न समजल्यामुळें हीं मुलेंबाळें मला या संसारांत गोंवीत आहेत.

हें विश्वतोमुखा, हें सर्व तूंच एक आहेस, हे ज्ञान मला दे.

नीलः पतंगो हरितो लोहिताक्षः ।
तडिद्गर्भ ऋतवः समुद्राः ॥
अनादिमत्वं विभुत्वेन वर्तसे ।
यतो जातानि भुवनानि विश्वा ॥

अनुवाद—हे सर्वव्यापिन्, हा निळा, हिरवा आणि तांबड्या डोळ्यांचा पक्षी तूंच आहेस, ज्याच्या उदरांतून विद्युत् विलसत आहे असा हा आकाशांतील मेघ तूंच आहेस. शिशिर आणि हेमंत, शरद् आणि वसंत, ग्रीष्म आणि वर्षा हे कालाचे सर्व विभाग तूंच झाला आहेस. हे विशाल समुद्र तुझीच विशालता घेऊन विस्तारले आहेत. तुझ्यापासूनच हीं सर्व भुवनें निर्माण झालीं आहेत आपल्या अनादिमत्वानें आणि विभुत्वानें तूंच एकटा या सर्व विश्वांत आणि विश्वाच्या बाहेर वर्तत आहेस.

अजामेकां लोहितशुक्लकृष्णां ।
बह्वीः प्रजाः सृजमानां सरूपाः ॥
अजो ह्येको जुषमाणोऽनुशेते ।
जहात्येनां भुक्तभोगामजोऽन्यः ।

अनुवाद- पांढऱ्या तांबड्या व काळ्या रंगाची एक अजा आहे. सत्व-रजतमांतून उत्पन्न होणाऱ्या कामक्रोधादिविकारामुळें हे रंग तिला प्राप्त आहेत. आपल्या सारखी विकारी प्रजा निर्माण करणें हा तिचा धंदा आहे. हा एक अज-तिच्यावर अनुरक्त होऊन तिच्या भोगांत गुंगला आहे. त्या महामायेच्या पाशांत तो अडकला आहे. पण हा दुसरा अज मात्र अनेककांडून भोगल्या जाणाऱ्या ह्या विकारी अजेचा त्याग करून जात आहे.

अनादि अशा या प्रकृतीच्या पाशांत आम्ही अडकलों आहोंत. ती आम-च्याशी अनेकवार कपटी झाली, व्यभिचारी बनली, तरी तिच्या रूपगुणावर

भाळून तिच्या लाथा आम्ही प्रत्यही खात आहोंत, परंतु हे संत महर्षि ह्या कुदशेचा त्याग करून हरिचरणीं रत झाले आहेत.

ऋचो अक्षरे परमे व्योम ।
न्यस्मिन्देवा अधिविश्वे निषेदुः ॥
यस्तं न वेद किमृचा करिष्यति ।
य इत्तद्विदुस्त इमे समासते ॥

**अनुवाद** - त्या अविनाशी व परम आकाशांत (परब्रम्हांत) वेदऋचा आहेत. म्हणून सर्व देव त्यांचे ठिकाणीं स्थित आहेत. पण जो तें परब्रम्ह जाणीत नाहीं, त्याला ऋचा काय होत! लक्ष्याचा वेधच करीत नाहीं, तें बाण काय कामाचे? ज्यानें परमात्मा जाणला जात नाहीं, तें श्रुतिशास्त्राचें अध्ययन काय उपयोगाचे? जे तें परब्रम्ह जाणतात तेच येथें खरें आहेत. ऋचा त्यांनीं जाणल्या. वेद तेच शिकले व तेच येथें कृतार्थ झाले.

मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।
तस्यावयवभूतैस्तु व्याप्तं सर्वमिदं जगत् ॥

**अनुवाद**—माया म्हणजे प्रकृती आणि त्या मायेचा स्वामी महेश्वर जाणावा हें सर्व जगत् त्या महेश्वराच्या अवयवांपासून उत्पन्न झालेल्या जीव मात्रानीं व्यापलें आहे असें समजावें. तोच सर्वांचा विधाता आहे, त्याच्या सत्ते- वांचून कांहीं नाहीं, ही खात्री असू द्यावी. माया काय, प्रकृति काय, हे सर्व दृश्य- जात काय, त्याचेंच आहे, असें पूर्ण समजावें. द्वैतभाव व संशय करूं नये.

यो योनिं योनिमधितिष्ठत्येको ।
यस्मिन्निदं स च विचैति सर्वम् ॥
तमीशानं वरदं देवमीड्यम् ।
निचाय्येमां शांतिमत्यंतमेति ॥

**अनुवाद**—तोच परमात्मा प्रत्येक उत्पत्तीकारणाचें अधिष्ठान आहे. त्याच्या निराळी कशाची उत्पत्ति होऊं शकत नाहीं. म्हणून सर्व भूतजात त्याच्यापासून प्रादुर्भूत झाले आहे; आणि ज्या परमात्म्यामधून हें सर्व उत्पन्न झालें आहे, त्याची स्थिती त्याच्यावेगळीं असू शकणार नाहीं. हें सर्व दृश्यजात ज्याच्यापासून निराळें निघालें आहे त्याच्या ठायींच तें एकत्र होणार आहे, अशा त्या वरद प्रकाशमान व वंद्य परमात्म्याला जाणून अत्यंत शांतीला पावावें. ज्ञाता मनुष्य हेंच जाणून शाश्वतसुखाला प्राप्त होतो.

यो देवानां प्रभवश्चोद्भवश्च ।
विश्वाधिपो रुद्रो महर्षिः ॥

हिरण्यगर्भं पश्यत जायमानम् ।
स नो बुध्द्या शुभया संयुनक्तु ॥

**अनुवाद**—जो देवांचें उत्पत्तिस्थान व स्थिती आहे, या विश्वाचा जो अधीश आहे, जो रूद्र आहे, महर्षी आहे, हिरण्यगर्भाला ज्यानें जन्मतांना पाहिला, त्या देवानें आम्हांस शुभबुद्धि द्यावी आणि आमचें कल्याण करावे.

यो देवानामधिपो ।
यस्मिंल्लोका अधिश्रिताः ॥
य इशे अश्य द्विपदश्चतुष्पदः ।
कस्मै देवाय हविषा विधेम ॥

**अनुवाद**—जो देवांचा अधिपति आहे, हे सर्व लोक ज्यामध्यें अधिश्रित आहेत, सर्व द्विपाद व चतुष्पाद प्राण्यांचा जो ईश्वर आहें, अशा कोणत्या देवाची हवी देऊन आम्ही उपासना करावी?

सूक्ष्मातिसूक्ष्म कलिलस्य मध्ये ।
विश्वस्य स्रष्टारमनेकरुपम् ॥
विश्वस्यैकं परिविष्टितारम् ।
ज्ञात्वा शिवं शांतिमत्यंतमेति ॥

**अनुवाद**—या सर्व गहनांत जो सूक्ष्माहून अतिसूक्ष्म आहे, या विश्वाचा जो स्रष्टा आहे, अनेकरूपें ज्यानें धारण केलीं आहेत, आणि सर्व विश्वाला परिवेष्टण करुन जो एकला स्थित आहे, अशा त्या परममंगलाला जाणून ज्ञानी पूर्ण शांति मिळवितो; शाश्वत समाधानाला तो प्राप्त होतो.

स ए काले भुवनस्य गोप्ता ।
विश्वाधिपः सर्वभूतेषु गूढः ॥
यस्मिन्युक्ता ब्रम्हर्षयो देवताश्च ।
तमेवं ज्ञात्वा मृत्युपाशांच्छिनत्ति ॥

**अनुवाद**—तोच परमात्मा सर्व कालीं या भुवनाचा पालनकर्ता आहे, या विश्वाचा अधिपति तोच एक आहे; सर्व भूतांमध्यें गूढरुपानें तोच बसत आहे. ज्यामध्यें ब्रम्हवेत्ते आणि देवता एकत्रित झाल्या आहेत अशा त्या देवाला जाणून ज्ञाता कालाच्या सर्वपाशांना तोडून अमरण धर्मा होतो. मृत्यूची सत्ता त्यावर चालत नाहीं.

एष देवो विश्वकर्मा महात्मा ।
रूपा जनानां हृदये सनिविष्टः ॥

हृदा मनीषा मनसाऽभिक्लृप्तो ।
य एतद्विदुरमृतास्ते भवंति ॥

**अनुवाद**—विश्व हें ज्याचें कर्म आहे, जो परमात्मा आहे, सर्व जनांच्या हृदयांत जो सदासर्वदा स्थित आहे, त्या देवाला हृदयानें, बुद्धीनें व मनानें जे ध्यातात ते तत्ववेत्ते प्रत्यक्ष अमृताला प्राप्त होतात.

यदाऽतमस्तन्न दिवा न रात्रिः ।
न सन्न चासच्छिव एव केवलः ॥
तदक्षरं तत्सवितुर्वरेण्यम् ।
प्रज्ञा च तस्मात्प्रसृता पुराणी ॥

**अनुवाद**—जेव्हां तम नव्हतें, दिवस नव्हता, रात्र नव्हती; सत् आणि असत् या गोष्टी जेव्हां बोलल्या जात नसत तेव्हां तोच एक केवल शिवस्वरुप असा होता. अक्षर परब्रम्ह म्हणतात तो तेंच, सवित्याचे उत्कृष्ट तेज तो तेंच! हें सर्व सनातन प्राचीन ज्ञान त्याच्यां पासूनच प्रसृत झालें आहे

नैनमूर्ध्वं न तिर्यञ्चन मध्ये ।
न तस्य प्रतिमा अस्ति ।
यस्य नाम महद्यशः ॥

**अनुवाद** - त्या देवाला वर खाली किंवा मध्यें असें कांहीं. त्याचें यश खरोखर मोठें आहे. त्याला या विश्वांत उपमा नाहीं. या साठीं महद्यश म्हणून त्याला म्हणतात.

न संदृशे तिष्ठति रुपमस्य ।
न चक्षुषा पश्यति कश्चनैनम् ॥
हृदा हृदिस्थं मनसा या एनम् ।
एवं विदुस्ते ह्यमृता भवन्ति ॥

**अनुवाद**—याचें रूप कोणाच्या दृष्टींत ठरूं शकत नाही, चर्मचक्षूनें याला कोणी पाहूं शकत नाहीं, पण जे कोणी हृदयांत असणाऱ्या याला मनानें ध्यातात व त्याचे सत्य रूप जाणतात ते अमृतरूप होतात.

मानस्तोकं तनये मा न आयुषि ।
मा नो गोषु मानो अश्वेषु रीरिषः ॥
वीरान्मा नो रुद्र भामितो वधीः ।
हविष्मंतः सदमित्वा हवामहे ॥

**अनुवाद**—हे रुद्रा! आमच्या मुलांना, आमच्या जीवितांना, गाईंना अश्वांना तूं उपद्रव देऊं नकोस. क्रोधाविष्ट होऊन आमच्या वीरांना तूं मारूं नकोस. हवि घेत्साते आम्ही तुला हवी देतों.

# महात्माजी व अस्पृश्यता.

आज २।३ आठवडे हिंदुस्थानभर जर चर्चेचा कोणता एक विषय झाला असेल तर तो महात्मागांधी व अस्पृश्यता हा होय. महात्मागांधी हे लोकोत्तर पुरुष आहेत, त्यांचा स्वार्थत्याग, त्यांची निर्भयता, त्यांचें धैर्य, त्यांची जितेंद्रियता, त्यांचें राष्ट्रहितकारित्व हे सारे गुण आज विश्वमान्य झाले आहेत. अस्पृश्यांचें अस्पृश्यत्व काढून टाकण्याचें त्यांनीं ब्रीद धारण केलें आहे व त्यासाठीं त्यांनीं सात दिवस मरणान्त उपवासही पत्करला होता. सर्व स्पृश्यास्पृश्य पुढाऱ्यांनीं पराकाष्ठेचे परिश्रम करून त्यांना मरूं दिलें नाहीं व लोकांची चिंता दूर केली. पं. मदनमोहन मालवीय, राजगोपाळाचार्य, जयकर, सप्रू इ० स्पृश्यवर्गाचे पुढारी व डॉ० आंबेडकर, राजे इ० अस्पृश्य पुढारी यांनीं पांच दिवस वाटाघाट करून एकदाचा समेट घडून आणला व सरकार जेथें कौन्सीलांतून अस्पृश्यांना ७० जागा देत होते तेथें १५० जागा देण्याचें ठरून एकदाचा वाद मिटला व ब्रिटिश साम्राज्याचे मुख्य प्रधान यांनीं आपली संमति दिल्यावर गांधींनीं उपवास सोडला. ही सारी अद्भुत कथा वर्तमानपत्रांच्या वाचकांना कळून चुकलीच आहे. ती पुन्हा येथें विस्तारानें सांगण्याची अवश्यकता नाहीं.

अस्पृश्यतानिवारणार्थ मुंबईंत व इतरत्र भगीरथ प्रयत्न चालले आहेत, अस्पृश्यांना मंदिरें खुलीं केल्याच्या व त्याचबरोबर सहभोजनाच्या तारावर तारा येऊन धडकत आहेत व सर्वत्र एकच मोठी खळबळ उडून राहिली आहे !

आर्यसमाजी लोक, कांग्रेसवाले व हिंदुसभावाले लोक व बहुतेक ठिकाणचे इंग्रजी विद्येनें सुशिक्षित बनलेले सारे लोक अस्पृश्यांना स्पृश्यांचें मंदिरांतील सारे अधिकार एकदम देण्यास उत्सुक झाले आहेत. हे सारे लोक विद्वान् आहेत, पैसेवाले आहेत, वजनदार आहेत, अधिकारसंपन्न आहेत व इंग्रज लोकांत व मुसलमान लोकांत वर्णाश्रमधर्मव्यवस्था नसल्यामुळें त्यांची यांना प्रत्यक्ष मदत नसली तरी सहानुभूति आहे. यामुळें या सुशिक्षित समाजानें मंदिरप्रवेशाची एकच मोठी हुलड उठविली आहे, व हिंदुधर्मावर व समाजव्यवस्थेवर मोठे आघात होऊं लागले आहेत.

दहा वर्षांपूर्वी महात्माजींनीं कांग्रेसच्या कार्यक्रमांत अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न घुसडून दिल्यापासूनच अशा प्रसंग येणार हें निश्चित दिसत होतें.

स्पृश्यास्पृश्य हिंदु एकवटल्यानें हिंदुसमाजाचें बळ वाढावें अशा सद्धेतूनें ही चळवळ सुरू झाली आहे हें आम्ही जाणतों, पण घिसाडघाईनें असलीं कामें

होत नसतात, उलट परिणाम होऊन समाज अधिक फाटत जातो असा इतिहास आहे.

नाशीक क्षेत्रीं राममंदिरांत अस्पृश्यांचा प्रवेश करविण्याची खटपट जारीनें चालू आहे, पण मौज ही आहे कीं शेकडा पंचाण्णव सनातनी हिंदूंचा समाज त्याला विरुद्ध आहे. अर्धा डझन वकील व अर्धा डझन प्रोफेसर एवढे काय ते या बाजूला कट्टर आहेत, बाकी सारा समाज उलट आहे.

डॉ० आंबेडकरांना मंदिरें नकोत व हिंदूंचे देवही नकोत, पण या ब्राह्मण चळवळ्यांना ( हे कधी देवदर्शनार्थ राममंदिरांत जात नाहींत तरी ) अस्पृश्यांना मंदिरांत घुसवण्याची घाई झाली आहे. अज्ञ अस्पृश्यसमाजही मंदिरांत देवदर्शनार्थ जाण्यास उत्सुक नाहीं. उठावणी केले गेलेले तेवढेच उत्सुक आहेत, पण त्यांनाही देवदर्शनाची उत्सुकता नाहीं.

मंदिरें उघडा, नाहींतर प्रायोपवेशन करून मरून जाऊं अशा निश्चयाचे लोक अस्पृश्यांच्या बाजूनें उठत आहेत. उलट बाजूनेंही हें मरण्याचें खूळ वाढत जाणार असा रंग दिसतो !

मरणान्त उपवास, प्रायोपवेशन, आत्महत्या हें खूळ भयंकर माजत चाललें आहे ! एकी करायला गेलें आणि बेकी गळयांत पडली असा प्रकार होणार आहे.

देवासाठी कोणी मरत नाहीं, काल्पनिक हक्कांसाठी फुकट मरण्याची चढाओढ लागत आहे !

पं० मालवीयांना मंदिरप्रवेश हवा आहे पण सहभोजनें नकोत. महारांपासून ब्राह्मणापर्यंत सर्व लोक एकेठिकाणीं जेवल्यानें समाजाचें ऐक्य होणार आहे ! युरोपांत सहभोजनें रोज होताहेत तरी सर्व राष्ट्रें एकमेकांचे प्राण घेण्यास टपलीं आहेत !

महार, मांग, चांभार, धेड, भंगी हे सारे अस्पृश्य आपापसांत तरी एक होण्यास तयार आहेत काय ?

मंदिरें अस्पृश्यांना उघडलीं कीं स्पृश्य मंदिरांत जाणार नाहींत व अस्पृश्यांना तर देव नकोच आहे. मंदिरांना कुलपें लागण्याचा प्रसंग येणार ! ज्यांना देवच नको त्यांना त्याचें दुःख थोडेंच होणार ?

—काशी येथील टाऊन हॉलमध्यें रविवार ता. २५ रोजीं श्रीअच्युताश्रम यांच्या अध्यक्षतेखाली सनातनी स्पृश्य हिंदूंची सभा भरली होती. सभेस प्रचंड लोकसमुदाय जमला होता. सभेंत पुढील ठराव पास झाले:—

( १ ) अस्पृश्यता ही जन्मावर अवलंबून असल्यानें अस्पृश्यांनीं देवालयांत

प्रवेश करणें हें शास्त्रविरुद्ध आहे असा त्रैवर्णिकांचा दृढ विश्वास आहे व त्यांचा प्रवेश झाल्यानें देवतांचा पवित्रपणा नष्ट होतो अशी पूर्ण समज आहे. ( २ ) महात्माजींनी अस्पृश्यांना मंदिरप्रवेश करतां यावा म्हणून कायदा करणें जरूर आहे असे जे उद्गार काढले त्याचा ही सभा निषेध करते.

संकेश्वर येथील श्रीशंकराचार्यांचा मठ अस्पृश्यांना खुला आहे अशी हूल कित्येक वर्तमानपत्रांनीं उगाच उठविली होती, पण ही बातमी खोटी आहे असें आतां प्रसिद्ध झालें आहे !

श्री ज्ञानेश्वर महाराजांपासून तुकोबारायांपर्यंत सारे महात्मे अस्पृश्यता काढून संकर माजविण्याच्या विरुद्ध आहेत हें १९२९ सालीं एका अंकांत मुमुक्षूनें दाखविलें होतें. ह्या साधुसंतांपेक्षा अलीकडच्या देशभक्तांना भूतदया अधिक आहे असें ह्मणण्याची कोण छाती करील ?

अस्पृश्यांना भूतदयेनें प्रेमानें वागवा, त्यांच्यांत खऱ्या सात्विक शिक्षणाचा प्रसार करा, त्यांची रहाणी अधिक शुद्ध करा, त्यांच्या अन्नपाण्याची व पारमार्थिक कल्याणाची काळजी घ्या, हें सर्व करायचे मार्ग शोधून काढा. याला कोण विरोध करील ? उगाच भलत्या भरीं भरून मोठ्या स्पृश्यसमाजाला दुखविण्यांत पुरुषार्थ कोणता ?

पराक्रम गाजवून मरावें, फुकट आत्महत्या का करावी ? खरे धर्मसुधारक व समाजहितकर्ते कसें वागत आले तें पहा.

हुल्लडीनें समाज सुधारत नाहीं, अराजकता व अव्यवस्था माजते, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं असें होऊन जातें.

हिंदुसमाजानें आत्मकल्याणाचा मार्ग कोणासच बंद केला नाहीं. चोखामेळा, नंद, रोहिदास चांभार, सजन कसाई, वेश्या कान्हूपात्रा हे स्पृश्यांसही वंदनीय झाले आहेत ! गुणांना किंमत आहे.

हिंदुसमाजांत वर्णाश्रमव्यवस्था आहे. तिच्या अभेद्य तटांवर आजवर पुष्कळांनीं आघात केले व मेले गेले, तसे तुह्मी ही जाल ! तुह्मी आपल्या गुणांचा शिस्तीनें सदुपयोग करा. कळकळ, त्यागबुद्धि व परोपकारता हे गुण बीजरूपानें नव्या लोकांत आहेत हें आह्मांस दिसत आहे, पण त्यांचा धिसाडघाई करून नाश करूं नका. आस्ते आस्ते दमानें घ्या. हजारो वर्षांचे संस्कार १०।२० वर्षांत नष्ट व्हायचे नाहींत.

“ अस्पृश्यता समूळ नाहींशी झाल्यावांचून मला समाधान होणार नाहीं म्हणून सर्व सार्वजनिक देवस्थानें, विहिरी, शाळा वगैरे स्पृश्यांइतक्याच हक्कानें

'अस्पृश्यां' ना हि खुल्या असाव्यात असें कायद्यानेंच फर्मावण्यांत यावें असा मी आग्रह धरणार आहे" असें गांधीजीनीं जाहीर केलें आहे!

याचा अर्थ उघडच आहे. जे अस्पृश्यता मानतील त्यांच्या बोडक्यावर कायदा लादून त्यांचा छळ होण्यास सुरवात व्हावयाचें घाटत आहे! मंदिरें खाजगी कोणतीं व सार्वजनिक कोणतीं याच्या निर्णयांतही अनेक पंचायती उत्पन्न होऊन लोकांस त्रास होण्याचा पुरा संभव आहे. श्रीराम करितील तें होईल!

"आत्मयज्ञाचें कुंड एकदां पेटविल्यावर हिंदुधर्मावरील अस्पृश्यतेचा यत्किंचितही काळा डाग धुवून जाईपर्यंत तें विझवितां येणार नाहीं. हा आत्मयज्ञ केवळ माझ्या जीवाचें बलिदान करूनच पुरा न होण्याची ईश्वराची मर्जी असेल, तर हिंदुधर्मावरील हा कालिमा धुवून काढण्याकरितां हजारों लोक जीव घेऊन पुढें येतील असा मला दृढ विश्वास आहे." गांधीजीनीं या प्रकारचे उद्गार काढले आहेत! आम्हांला तरी हें अस्पृश्यतानिवारणाचें बंड उचित दिसत नाहीं. हें अशुभसूचक चिन्ह आहे. लोकांचें मतपरिवर्तन करण्याची खटपट अवश्य करा, पण लोकांचा नाहक छळ होऊं नये असें आमचें म्हणणें आहे. बलात्कारानें कोणतीच सुधारणा होत नाहीं व अटीतटीनें ती घडवून आणली तर ती टिकत नाहीं. अल्पसंख्याकांच्या कैवारानें बहुसंख्याक लोकांवर जुलुमजबरदस्ती करणें ही राजनीति उघडच गैरवाजवी आहे.

---

## प्रेत जिवंत झालें!

ता. १५ सप्टेंबरच्या रात्रीं एक गृहस्थ लाहोरास मरण पावला. ६ तासानंतर त्याचें प्रेत ताटीवर बांधूं लागणार तोंच तो गृहस्थ 'राम' नामाचा जप करीत उठला! 'कांहीं वेळापूर्वीं आपण स्वर्गांत गेलों होतों, पण तुझें येथें काम नाहीं, तूं पृथ्वीतलावर साधु होऊन रहा असें सांगून मला स्वर्गांतून खालीं ढकलण्यांत आलें' असें त्यानें जमलेल्या लोकांस सांगितलें. सदर गृहस्थानें ताबडतोब साधूची दीक्षा घेतली!

# अस्पृश्योद्धारमंडळ व पं० मालवीय.

मुंबईंस ता० ३० सपटेंबर रोजीं अस्पृश्यतानिवारणार्थ पंडित मदनमोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखालीं एक प्रचंड जाहीर सभा भरली होती. त्याप्रसंगीं पंडितजींनीं पुढील आशयाचें भाषण केलें. पंडितजी ह्मणाले:—

"फार दिवसांपासूनचा रिवाज बदलणें फार कठीण असतें. जें कार्य कित्येक वर्षांपासुन करीत असतां पार पडत नव्हतें तें महात्माजींच्या प्रेरणेमुळें यशस्वी होऊं लागलें आहे. सध्यां अस्पृश्यांच्या बाबतींत जनतेचा दृष्टिकोन एकदम कसा बदलला आहे हें आपण पहातच आहांत. आरंभीं उत्साह असतो; तो पुढें कायम रहातोच असें नाहीं. या देशांत सात लाख खेडीं आहेत. त्या खेड्यांतील लोकांचा परंपरागत विचार बदलणें जरूर आहे त्यांचें हृदयपरिवर्तन करणें हें फार कठीण कार्य आहे; आणि तें आपणांस पार पाडावयाचें आहे. जें कांहीं करावयाचें तें प्रेमानें साध्य करावयाचें आहे. अस्पृश्यांसाठीं देवालयें, विहिरी, शाळा वगैरे उघडल्या करावयाच्या आहेत. हें सर्व कार्य समजुतीनें केलें पाहिजे. सर्व परमात्म्याचीं लेकरें आहेत. त्याच्या ठिकाणीं भेदभाव नाहीं; मग आपणच भेदभाव कां बाळगावा? कोणाला त्रास किंवा संताप व्हावा हा आपला हेतु असूं नये. प्रार्थना करून, खरें शास्त्र समजावून, मनें वळवावयाचीं आहेत. जोर जबरदस्तीनें कांहीं वळणार नाहीं. आम्हीं धर्मविरुद्ध या गोष्टी करीत आहोंत असें कांहींना वाटतें; परंतु प्राण गेला तरी धर्मविरुद्ध गोट मी करणार नाहीं (टाळ्या). माझा जन्म शास्त्राचें पठण व निदिध्यास करण्यांत गेला. प्रथम आपण प्रतिमा स्थापन करतों. प्रत्येक प्राणीमात्रांत ईश्वर आहे. 'सर्वांत व्यापून राहिलेल्या प्राणा! तूं प्रतिमेंत एकरूप होऊन जा' अशी प्राणप्रतिष्ठेच्या वेळीं प्रार्थना करीत ज्या भगवानास आपण बोलावतों तो केवळ ब्राह्मणक्षत्रियांत नाहीं तर शूद्रांत आहे व इतर प्राणीमात्रांतहि आहे. तो सर्व घटांतून व्यापलेला आहे. मग त्या शक्तीच्या एका अंशास दूर लोटण्याचा आपणांस अधिकार आहे काय? भागवतासारख्या सनातनीयांचा दुसरा महान् ग्रंथ नाहीं. त्या ग्रंथांतहि अस्पृश्यतेला स्थान नाहीं. देवमंदिरांत जातांना प्रत्येकानें स्वच्छ होऊन जावें हें ठीक आहे. मंदिरांत येणारा प्रत्येक जण पवित्र होऊन जातो मग तो कोणीही असो. कोण येतो, कोण कसा येतो याची आपण चिंता कां करतां? आपण ईश्वरभजनांत गुंग होऊन जा. आपले जे कनिष्ट बंधु देवदर्शनासाठीं तहानेलेले आहेत त्यांची इच्छा कां तृप्त करीत नाहीं? ईश्वर भक्तीचा भुकेला आहे– मग तो ब्राह्मण असो वा चांडाळ असो. ते ५।६ कोटी लोक आपलेच आहेत. त्यांना दूर कां लोटतां? त्यांनाहि ईश्वरनामाचा आनंद

आपल्याप्रमाणें लुटूं द्या त्यांनाहि दर्शनसौख्य घेऊन प्रफुल्लीत होऊं द्या. काळोखी रात्र संपून आतां सूर्योदय होऊं लागला आहे. या कार्यांत आह्मांला पूर्ण सफलता मिळणार याबद्दल मला तरी संशय राहिलेला नाहीं. आपण सर्वांनीं या कार्यास अंतःकरणपूर्वक हातभार लावावा व जगाकडून वाहवा मिळवावी. ''

यानंतर सर पुरुषोत्तमदास ठाकोरदास यांनीं पुढील ठराव सभेपुढें मांडिला:-

'' ही सभा असें ठरवित आहे कीं, ' अखिल भारतीय अस्पृश्योद्धार मंडळ ' या नांवाची अस्पृश्यता दूर करण्यासाठीं एक मध्यवर्ती संस्था स्थापन करून तिची मुख्य कचेरी दिल्लीस असावी. प्रांतोप्रांतीं तिच्या शाखा स्थापन करण्यांत याव्या. प्रथमतः या संस्थेतर्फे सर्व सार्वजनिक विहिरी, धर्मशाळा, रस्ते, शाळा, स्मशान-भूमि, अस्पृश्यांस खुलीं करणें व सर्व सार्वजनिक देवालयें त्यांना खुलीं करण्या-साठीं चळवळ सुरू करण्यांत यावी. त्यासाठीं जुलुम जबरदस्तीचा उपयोग न करतां समजूतपूर्वक मनें वळवूनच हें कार्य करण्यांत यावें ''

या मंडळाचे अध्यक्ष शेट घनश्यामदास बिर्ला व सेक्रेटरी श्री. अमृतलाल ठक्कर यांस नेमण्यांत येत आहे. ''

---

ह्याच आठवड्यांत मुंबईत भरलेल्या दुसऱ्या एका सभेंत पंडित मालवीय ह्मणाले:—

'' हें कार्य पार पाडण्यासाठीं एक लहानशा कमिटी स्थापन करण्यांत यावी व देशभर, अस्पृश्योद्धाराचें कार्य नेटानें करण्यासाठीं पंचवीस लक्ष रुपयांचा एक फंड उभारण्यांत यावा. सतत प्रयत्नांनीं जरूर त्या सुधारणा या पुढील तीन महि-न्यांत घडवून आणण्यांत याव्या. त्यामुळें आपला धर्म धोक्यांत पडणार नसून तो जास्त वैभवशाली होणार आहे. यापुढें विलंब लावून चालणार नाहीं. एखाद्या शतकांत एकटाच महात्मा जन्मास येत असतो— एखाद्याच का अनेक शतकांत म्हटलें तरी चालेल. आपली आत्यंतिक इच्छा पार पाडण्यासाठीं त्यांनीं आपलें आयुष्य त्यासाठीं पुनः पुन्हां कामास लावावें अशी आपली इच्छा आहे काय? आपल्या समाजांतून अस्पृश्यता अजिबात नष्ट व्हावी ही महात्माजींची इच्छा आहेच ती पूर्ण व्हावी म्हणून आपण सर्वांनीं प्रयत्नास लागलें पाहिजे. जी कमिटी नेमण्यांत येत आहे त्या कमिटीद्वारें करारनामा सर्वांस समजावून देण्याचें व अस्पृश्योद्धाराचें कार्य पार पडलें पाहिजे. ''

---

# १ अस्पृश्यांतील अस्पृश्यता

अलिबाग येथें २–४ दिवसांपूर्वी एक मनोरंजक हकीकत घडली. ती डॉ॰ आंबेडकर यांस उद्बोधक होईल असें माझें मत आहे.

अलिबाग येथें ता. १९-९-३२ रोजीं डोंगरे हॉलमध्ये एक सार्वजनिक सत्यनारायण झाला. प्रसादाला ब्राह्मण–ब्राह्मणेतर, स्पृश्य, अस्पृश्य, भंगी, महार, चांभार वगैरे अलिबागेंतील व आसपासच्या गावांतील बरीच मंडळी हजर होती. हजर लोकांत लहान, थोर, सुशिक्षित, अशिक्षित, बायका, मुलें, वकील, डॉक्टर वगैरे लोक होते. सर्व लोक जमल्यावर प्रसाद वांटावयाचा. त्याप्रमाणे प्रसादाचीं तारें भंग्यांनीं वांटण्याकरिता घेतलीं! परंतु अशिक्षित ब्राह्मणेतरांत अस्पृश्यता किती तीव्रतेने गणली जाते याचें द्योतक म्हणजे बरेचसे ब्राह्मणेतर प्रसाद न घेता निघून गेले! याच्या पुढची गोष्ट म्हणजे महार हे भंग्यांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजत असल्यामुळे त्यांनीसुद्धा प्रसाद घेतला नाहीं. तेव्हा डॉ॰ आंबेडकर यांस म्हणावें कीं स्पृश्यांना अस्पृश्यता नाहीशी करावयास सांगण्यापूर्वी अस्पृश्यांनीं आपसां–तील अस्पृश्यता बंद करावी. कारण चांभार व महार हे भंग्यांना शिवावयाला तयार नसतात, तर चांभार हे महारांना व भंग्यांना शिवायला तयार नसतात! वरील प्रसंगी ब्राह्मणांनीं प्रसाद न खातां खिशांत घातला. म्हणून महार म्हणाले कीं ब्राह्मणांनीं प्रसाद खाल्ला कां नाहीं? परंतु त्यांना असें म्हणावें कीं ब्राह्मणांनी प्रसाद खाल्ला नसेल, परंतु त्यांनीं प्रसादाचा अव्हेरहि केला नाहीं. तुम्ही त्यांच्या प्रमाणें प्रसाद हातांत तरी कां घेतला नाहीं? हें प्रकरण एवढ्यावरच थांबलें नाहीं. वरसोलींतील कोळी समाजानें ब्राह्मण हे चांभार वगैरे लोकांची अस्पृश्यता नाहीशी करावयास निघाल्यामुळें सर्व भिक्षुक लोकांवर बहिष्कार घातला आहे!! व इतर लोकहि बहिष्कार घालतील असा बराच संभव आहे. डॉ॰ आंबेडकर ब्राह्मणेतरांच्या या कृत्याला आळा घालूं शकतील काय?

—केसरी

# २ रत्नागिरींतील गणेशोत्सव.

रत्नागिरी येथें स्थापन झालेल्या 'श्रीपतितपावनाच्या' मंदिरांत दरसाल–प्रमाणें श्रीगणेशोत्सव साजरा झाला. बॅ. सावरकरांची स्वारी तेथें असल्यामुळें तेथें दरवर्षी त्या उत्सवांत आचरटपणाचे जे अनेक प्रकार होतात त्यापैकीं दोन प्रकार आम्ही वाचकांकरिता पुढें देत आहोंत. पहिला प्रकार म्हणजे भिन्न भिन्न–जातीय स्त्रियांचें सहभोजन होय! व हें भोजन शाकाहारमय होतें. दुसरा आचर--

टपणाचा प्रकार म्हणजे भंगी मुकदमाला मारून मुटकून कथेकरी करून त्याच्या पायावर लोटांगण घालणें होय! अशा प्रकारानें हिंदुधर्मीयांची एकी होण्याच्या ऐवजीं जातिद्वेषाची तीव्रता मात्र वृद्धिंगत होईल.

—भाला

## ३ पुण्याची पर्वती

— पर्वती संस्थानच्या पांची पंचांनीं एकमतानें असा ठराव केला आहे कीं नवीन बांधलेल्या जिन्यावरून गच्चीवर जाऊन श्री. देवदेवेश्वराचें दर्शन घेण्यास अस्पृश्यांची नवीन सोय केली आहे.

पर्वतीवरील श्रीदेवदेवेश्वराचें देवालय श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं आपल्या हयातींत बांधलें व त्याचवेळीं त्यांनीं श्रीदेवदेवेश्वराच्या चांदीच्या मूर्तीची स्थापना करून पार्वती व गणपतीच्या सोन्याच्या दोन मूर्ती एक डाव्या मांडीवर व दुसरी उजव्या मांडीवर अशा बसविल्या. ह्या तीन मूर्तीपैकीं सोन्याच्या दोन मूर्ती गेल्या गुरुवारीं चोरीस गेल्याचें शुक्रवारीं सकाळीं आढळून आलें, चोर नळानें वर चढून आले किंवा गच्चीस केलेल्या नवीन जिन्यानें गच्ची-वर चढून आंत उतरले हा प्रश्न गौण आहे. चोर कोठून आले हें निश्चित नसलें तरी ते आंत आले हें निर्विवाद आहे. त्यांनीं चार भोकें दरवाजाला पाडलीं असतांही तो आवाज पहारेकऱ्यांना ऐकूं न यावा हीच आश्चर्याची गोष्ट आहे. त्या दोन मूर्तीची किंमत सत्तर ऐंशी हजार रुपये असावी असा अंदाज आहे. सदर देवळाच्या गच्चीवर कां होईना अस्पृश्यांना प्रवेश मिळाला हा भ्रष्टाकार झाला असें कांहीं सनातनी व भोळया लोकांना वाटण्याचा संभव आहे, पण काकतालीय न्यायापेक्षां त्याला आम्ही विशेष महत्व देत नाहीं. एखादें दुसरें देऊळ अस्पृ-श्यांना उघाड केल्यावर जर तशा देवळांतील मूर्ति दोनचार दिवसांत भंगली तर त्याचा दोष देवळाच्या चालकांकडे नाहीं. तें कांहीं असो, पण गेल्या पावणेंदोनशें वर्षांत जी गोष्ट घडून आली नाहीं ती नेमकीच आतां घडून यावी, हा योगा-योगही विचारांत घेण्यासारखा आहे. सारांश दोन्ही बाजूंनीं विचार करतां देवळें अस्पृश्यांना उघडीं करतांना वाजवीपेक्षां फाजील घाई करण्यांत येऊं नये. श्रीदेव-देवेश्वराच्या कृपेनें ही चोरी लवकरच सांपडून सर्व स्पृश्य व अस्पृश्य हिंदूंना सारखाच आनंद होवो.

—भाला

# स्पर्शास्पर्शाचा प्रश्न व साधुसंतांचे विचार

१

सांप्रत महाराष्ट्रांत स्पर्शास्पर्शाचा प्रश्न ज्याचे त्याचे तोंडीं आहे. हा प्रश्न धार्मिक व सामाजिक असल्यानें त्याकडे मुमुक्षूनें कानाडोळा करणें योग्य नाहीं. अस्पृश्य म्ह. महार, मांग, चांभार, धेड, भंगी इ० जाति. त्यांचा सार्वजनिक कारभारांत कोणी फारसा विटाळ मानीत नाहींतच, पण त्यांना विहिरी व मंदिरें स्पृश्यांप्रमाणेंच मोकळीं असावींत असा कांग्रेस व हिंदुधर्मसभा यांचा आग्रह आहे. हिंदुसमाज शेंकडा पंचाण्णव या गोष्टीला विरुद्ध आहे, तर डॉ० अंबेडकरांसारखे अस्पृश्यांचे महार पुढारी सर्व स्पृश्यानीं आमच्याशीं रोटीबेटी व्यवहारहि चालू केला पाहिजे असा आग्रह धरीत आहे.

२

दिवेकरशास्त्र्यांच्या मुलाखतींत डॉ० अंबेडकर ( महारांचे पुढारी ) यांनीं स्पष्ट सांगितलें कीं " अस्पृश्यांच्या चळवळीला स्पृश्यांच्या सहानुभूतीची आम्हांस गरज नाहीं. विटाळ घालवणें एवढेंच कांग्रेस व हिंदुसभा यांना मान्य आहे, पण सहभोजन व सहविवाह झालेच पाहिजेत असें माझें मत आहे व तें मत दडपलें जाणार नाहीं "--ज्ञानप्रकाश २६।११।२९

३

श्रीशारदापीठाचे शंकराचार्य यांनीं आपल्या मुंबईच्या ताज्या मुक्कामांत अंत्यजवर्गास उद्देशून आशीर्वादपूर्वक एक आज्ञापत्र काढलें. त्यात श्रींनीं म्हटलें आहे, " थोड्या दिवसापासून कित्येक धर्मभ्रष्ट लोकानीं स्पर्शास्पर्शमर्यादा म्ह० सृष्टिक्रमानें चालत आलेली प्रणालिका तोडून टाकून सबगोलंकार करण्याकरितां अंत्यजस्पर्श करण्याचा आणि अस्पृश्यांना उच्चवर्णीयांप्रमाणें पवित्र देवमंदिरामध्यें दाखल करून घेण्याचा प्रयत्न चालविला आहे. ह्या आपमतलबी व धर्म भ्रष्ट करणाऱ्या वाऱ्याच्या वावटळीमध्यें तुह्मी अंत्यजांनीं सांपडूं नये. तुह्मी अंत्यज भारतवर्षाचीच प्रजा आहांत, व हिंदु जातीचें एक अंगहि आहांत. भारतवर्षीयांचा मुख्य धर्म वर्णाश्रम आहे. तो भारतवर्षीय प्रजेनें पाळणें हें तिचें आद्यकर्तव्य होय. तुह्मी अंत्यज आपला धर्म पाळून रहाल तर त्यांत तुमचें कल्याण आहे. परमेश्वर तुमचें कल्याण करील व तोच तुह्मांला उच्च वर्णांत जन्म देईल. तुम्हीं भलत्यांच्या नादीं लागाल तर या लोकीं व परलोकींहि तुमचें अकल्याण आहे. उच्च वर्णीय लोकांबरोबर तुमचें मोठें वैर उत्पन्न होईल व त्यामुळें भारतवर्षावर

मोठें संकट येऊन पडेल.... तुमचे हितेच्छु म्हणविणारे हे चळवळे लोक स्वतः देव व मंदिरांना मानींत नाहींत, ते तीर्थांना मान देत नाहींत, मृत मातापित-रादिकांच्या श्राद्धादि क्रिया करीत नाहींत!...या धर्मभ्रष्ट लोकांच्या घरीं चहाचें पाणी, बिस्किटांचे तुकडे, सोडावाटरच्या बाटल्या व फाटक्या तुमानी याशिवाय काय दिसणार व ते तुम्हांला काय देणार? यांनीं आजपर्यंत अंत्यजांस आर्थिक मदत करून विलायतेंत पाठवून कांहीं हुन्नर उद्योग शिकण्यास मदत केली आहे काय? उलट हे धर्मभ्रष्ट उच्चवर्णीय लोक परदेशीं जाऊन चामडे कमविण्याचे व बूट करण्याचे धंदे शिकून आलेले आहेत व तुमचे धंदे बुडवून तुमच्या पोटावर पाय आणीत आहेत!.. प्राचीन कालापासून आपल्या धर्ममर्यादा पाळणारे उच्च वर्णीय लोक तुमचे शत्रू नाहींत. तुम्हीं आपल्या मर्यादेपासून ढळूं नका. तुमच्या जातीच्या सभा भरवून ह्या सुरू असलेल्या वावटळीमध्यें कोणीहि सामील होऊं नये, असें एकमतानें ठराव करा. परमेश्वर तुम्हांस सद्बुद्धि देवो आणि तुम्हांस साह्य करो हा आशीर्वाद."

४

कांहीं सुधारक, आर्यसमाजपंथी, अर्धवट शिकलेले सर्व जातींतील मध्यम दर्जाचे लोक, कांहीं मतलबी लोक, हे वगळले असतां शेंकडा नव्वद लोकांचे विचार करील प्रमाणेंच आहेत, यांत तिळमात्र शंका नाहीं. आमचे सुधारक पुढारी दयानंदीमतासारखेच झाले आहेत, व सुधारकांच्या मनोवृत्तीचा फायदा घेऊन आर्यसमाजी- दयानंदी वळणाचे लोक आपले घोडे पुढे दामटीत चालले असून सनातनी लोकांवर कुरघुडी करीत आहेत, याबद्दल लोकांनीं वेळींच सावध व्हावें हें उचित आहे. सरकारच्या साह्यानें लोकांच्या बोकांडी 'शारदाबिल' बसविणारे हरविलास सारडा हे आर्यसमाजी आहेत व महाराष्ट्रांत अस्पृश्याच्या चळवळीचें पुढारीपण घेऊन धुमाकूळ घालणारे वर्ध्याचे जमनालाल बजाज हेहि आर्यसमाजी आहेत! आर्यसमाजाचे लोक जातिभेद व मूर्तिपूजा मानीत नाहींत हें प्रसिद्ध आहे. तेव्हां अस्पृश्यांना पाठीशीं घालून बजाज हे हिंदु लोकांच्या देवळांची पवित्रता बिघडवूं पाहत आहेत.

५

**श्रीज्ञानेश्वरतुकारामादि** ज्ञानी व भक्तोत्तमहि काय सांगतात तें पहा. 'जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत। हा भक्तियोग निश्चित। जाण माझा' असे सांगणारे साम्यदर्शी ज्ञानेश्वर किंवा 'विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म। भेदा-भेद भ्रम अमंगळ' असें गरजणारे भक्तवर्य तुकोबाराय हेहि वर्णाश्रमधर्मानें

चाला, वर्णसंकर करूं नका, स्पृश्यास्पृश्यविचार सोडून सबगोलंकार करूं नका, असेंच सांगतात. जातिधर्म ज्यांचे त्यांनीं पाळून स्वधर्मानें चालावें, संकर करूं नये, सदाचारानें वागावें व श्रीहरीला भजावें, असाच सर्व संतांचा उपदेश आहे. त्यांच्यापेक्षां हल्लींचे सुधारक किंवा आर्यसमाजी अधिक ज्ञानी किंवा दयावंत आहेत, असें म्हणण्याचें कोणी धाडस करील, असें आम्हांस वाटत नाहीं. संत समाजाची शिस्त न मोडता, वर्णसंकर न करितां, लोकोद्धार करितात. वर्णाश्रम हा हिंदुधर्माचा मजबूत पाया आहे. वर्णावर्णांत किंवा जातिजातींत तंटे लावण्याचें काम तिसराच कोणी करीत असतो, त्यास ओळखावें, त्याचा कावा काय आहे तो जाणून घ्यावा म्हणजे तंटे मोडतील.

६

भूतमात्रीं हरि पहा, सर्वांभूतीं भगवद्भाव ठेवा असा ज्यांचा उपदेश, विष्णुमय जग पाहणारे, अद्वयानंदांचा अनुभव घेणारे संत सत्पुरुष एकंकार करायला सांगत नाहींत. खाण्यापिण्यांत; आहारविहारात, स्पर्शास्पर्शांतसुद्धा वर्णाश्रमधर्मबंधनें कोणी झुगारून देऊं नयेत व समाजघटना विघडवूं नये, असें त्याचें असंदिग्ध सांगणें आहे. यासंबंधानें श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा अभिप्राय काय आहे तो पहा. ज्ञानेश्वरींतील अवतरणें पुढें देत आहे—

(१) येरु आचार जो परावा । तो देखतां कीर बरवा ।
परि आचरतेनि आचरावा । आपुलाचि ॥ २२० ॥
सांगें शूद्रघरीं आघवीं । पक्कान्नें आहाति बरवीं ।
तीं द्विजें केविं सेवावीं । दुर्बळ जरी जाहला ॥ २२१ ॥
हें अनुचित कैसेनि कीजे? । अग्राह्य केविं इच्छिजे ? (अ. ३)

दुसऱ्याचा आचारधर्म चांगला वाटला तरी प्रत्येकानें आपलाच आचार पाळावा यांत त्याचें हित आहे. शूद्रघरचीं पक्कान्नें चांगलीं असलीं तर दुर्वळ अशा द्विजांनेंहि तीं सेवन करूं नयेत. तीं त्याला अग्राह्य आहेत, तीं खाणें अनुचित आहे.

(२) साध्वी शांती नागविली । मग मायामांगी शृंगारिली ।
तिये करवीं विटाळविलीं । साधुवृंदें ॥ ३--२५१ ॥

दृष्टांतमिपानें येथें एवढेंच सुचविलें आहे कीं, मांगिण हिच्या स्पर्शानें विटाळ होतो तो कालवूं नये.

(३) 'अभक्ताचें नाम घेणें । तें वाचे शूद्रान्न होणें' [१३-६७४]
(४) 'काय द्विज अत्यंज घृष्टीं । अंत्यज नोहे?' [ १७-५१ ]

अंत्यजाच्या संसर्गानें काय द्विज अंत्यज होत नाहीं? होतोच असा भाव.— घृष्टि- घर्षण, स्पर्श, संसर्ग.

( ५ ) ' अंत्यज संभाषणीं त्यजिजे ' [ १७ – १०० ] इ० इ०

यावरून अस्पृश्यतानिवारण करून विटाळ कालवावा अशी श्रीज्ञानेश्वरांची शिकवण नाहीं हें उघड आहे.

आतां ह्या संबंधानें श्रीतुकाराममहाराजांच्या शिकवणी काय आहेत त्या पाहूं—

( १ ) ऐका कलीचें हें फळ । पुढें होईल ब्रह्मगोळ ॥ १ ॥
चारी वर्ण अठरा याती । भोजन करिती एके पंक्ती ॥२॥

म्हणजे समसमानी लोकांचीं सहभोजानें तुकोबांस पसंत नव्हती हें यावरून स्पष्ट आहे.

( २ ) गुरुमार्गामुळें भ्रष्ट सर्वकाळ । ह्मणती ज्ञातीकुळ नाहीं ब्रह्मीं ॥१॥
पवित्राला म्हणती नको हा कंटक । मानिति आत्मिक अनामिका ॥
नसता करुनि होम खाती एके ठायीं । .....

ब्रह्म निर्गुण निराकार आहे त्याच्या ठिकाणीं जातगोत कोठलें, असें म्हणून ह्या संकराला विरोध करणाऱ्या आचारशील पुण्यपुरुषाला कंटक मानतात, अस्पृश्यांच्या गळयांत मिठ्या मारतात व--आर्यसमाजी लोकांप्रमाणें—होम करून एक ठिकाणीं सारे भोजन करितात! ब्रह्म अभेद आहे, मग माणसामाणसांत भेद कशाला पाहिजे, असें म्हणून सारे एका पंक्तीला जेवतात या गोष्टीचा तुकोबांनीं निषेधच केला आहे.

( ३ ) ' पापाचिया मुळें ' सत्याचें वाटोळें झालें असून ' मेघ पडों भिनी । पिकें सांडियेलीं क्षिती ' याप्रमाणें सालोसाल अवर्षण व दुष्काळ यांनीं लोक त्रस्त व निर्वीर्य झाले आहेत

( ४ ) ' कलिधर्म मागें सांगितलें संतीं ' त्याप्रमाणें अनुभव येऊं लागले आहेत. ' आचार सांडिती द्विजलोक '— द्विजांनीं स्नानसंध्यादि आचार व पुण्यकर्में सोडलीं आहेत! ' व्रततप करितां लागती सायास । पाळितां पिंडास गोड वाटे '-स्वधर्माचीं व्रततपादि पुण्यकर्में त्यांनीं टाकून दिलीं आहेत व पिंडपोषण एवढेंच त्यांना आवडत आहे। हवें तें, हवें त्याच्या घरीं, हवें त्यावेळीं खाणें एवढेंच त्यांना माहीत आहे. हा दुराचार सांप्रतकाळीं चहाच्या—फराळाच्या दुकानांनीं व हाटेलांनीं फार वाढविला आहे. बाहेरचें अचावाचा खाणें बंद करून लोकांनीं आपल्या घरच्या पवित्र अन्नावरच तृप्त राहायला पाहिजे.

( ५ ) ' मागें संतीं होतें जें जें सांगितलें '-भागवतादि पुराणांतून कलियु--

गाचें वर्णन जें झालें आहे तें अधिकाधिक प्रत्ययास येऊं लागलें आहे. लोक आचारभ्रष्ट झाले आहेत म्हणून 'पुण्य क्षीण व पाप बळी' झाले आहेत व त्याची फळें आजच भोगीत आहेत. मद्यमांससेवन प्रतिष्ठितपणाचें झालें आहे.—

वर्णधर्म कोणी न धरी विटाळ। घालिती गोंधळ एके ठायीं ॥

वर्णधर्म पाळीत नाहींत, सहभोजन—सहविवाह यांचे गोंधळ एकत्र घालीत आहेत. वेदाचा अधिकार ज्यांचा ते ब्राह्मणहि मद्यपान करितात!

(६) 'पहा हो कलीचें महिमान' हा अभंग मोठा आहे आजकालच्या स्थितीचें उत्कृष्ट चित्र ह्यांत दृष्टीस पडतें. 'करिती हेळण संतांचें'–वर्तमानकालीन संतसज्जनांच्या निंदा व कुटाळक्या करूनहि संतोष न वाटूनच कीं काय रामदासस्वामींसारख्या विश्वमान्य संतांच्या निंदाहि होत आहेत! सारा अभंग घेतां विस्तार होईल, म्हणून प्रस्तुत विषयांपुरते उतारे घेतों—

राहिले वर्णाश्रमधर्म। अन्योन्य विचरती कर्म।
ह्मणवितां राम राम। श्रम महा मानिती ॥ ६ ।
धनाढ्य देखोनि अनामिक। तयास मानिती आवश्यक।
अपमानिती वेदपाठक। सात्विक शास्त्रज्ञ संपन्न ॥ ९ ॥
बहुत पाप झाले उचंबळ। उत्तम न ह्मणती चांडाळ।
अभक्ष्य भक्षिती विटाळ। कोणी न धरी कोणाचा ॥ १३ ॥
कैसें झालें नष्ट वर्तमान! एकादशीस खाती अन्न।
विडे घेऊनि ब्राह्मण। अविंधवाणी वदताती ॥ १४ ॥
केवढी ये रांडेची अंगवण। भ्रमविले अवघे जन।
याती अठरा चारीवर्ण।कर्दम करूनि विटाळले ॥ १८ ॥

तुकोबारायांच्या या उद्गारांवरून वर्णसंकर, सहभोजनें, स्पर्शास्पर्शाचा विधिनिषेध न पाळणें, भ्रष्टाकार करणें, विटाळ कालवणें इ॰ सांप्रतच्या सुधारकी चोचल्यांचा तुकोबांनीं केवढा तीव्र निषेध केला आहे हें समजून येईल. 'भलते स्त्रियेसि भलते यातीचा' विवाह करूं नये असें ते स्पष्ट सांगतात.

## ८

आतां श्रीरामदासस्वामींकडे वळूं. परमात्मा सकलांच्या अंतर्यामीं आहे, सर्वभूतीं देव आहे हें खरें, पण सृष्टि भेदरूप आहे त्याला काय करणार? अभेद आहे तेथेंच तो ओळखावा. व्यवहारांत भेद राहणारच. हायकोर्टांत न्यायाधीश बसतात तेथें पहारेकरी जाऊन बसेल तर त्याची हकालपट्टी होईल! अगदीं पूर्ण समतावादी एखादा राजा असला ह्मणून काय त्याच्या पलंगावर त्याचा लाडकाहि नोकर जाऊन निजेल?

रायापासूनि रंकवरी। अवघ्या मनुष्यांच्या हारी।
सगटसमान सरी। कैसी करावी ?॥

हिरा आणि कोळसा एकाच खाणींत पैदा होतात व दोघांतहि सारखाच 'कार्बन' आहे, म्हणून व्यवहारांत काय त्यांची समसमानी होईल? उत्तम योनी, कनिष्ट योनी, पापी आणि सुकृती, साखर आणि माती, हे काय एक होईल? राजा आणि रंक, ब्राह्मण आणि अंत्यज, एक कसे होतील? गरळ — poison--हें पाणीच. हें Liquid म्हणून कोणी पिऊन जाईल तर तात्काळ मरेल! पक्षी पण एक असले तरी राजहंस आणि कोंबडा हा भेद काय नाहीं म्हणतां येईल? तसें—

अंतर एक तों खरें। परी सांगतें घेऊं तये ती माहारें।
पंडित आणि चाट पोरें। एक कैची ?॥
एकांशें जग चाले। परी सामर्थ्य वेगळालें।
एका संगें मुक्त केले। एका संगें रौख॥

— दासबोध द. १२ स. १०

९

मुलें इथून तिथून एकच पण ब्राह्मणांच्या वेदशाळेंत अंत्यजांचीं मुलें वेद-पाठाला कशी बसवितां येतील? जन्मजात आम्ही मानीत नाहीं असें एखादा राजा म्हणेल, ब्राह्मणांबरोबर महारांनांहि वेद शिकवाल तरच आह्मी वेदशाळेची मदत कायम ठेवूं असा आग्रह धरील; पण मग तिकडे राजकुमारांच्या शिक्षणा-साठीं वेगळें 'राजकुमार कॉलेज' कशाला काढावें लागतें? जाति जन्मतःच असतात. आईबापांची जी जात तीच मुलाची जात. जात बदलतां येत नाहीं. शाहाण्णव कुळींचा अभिमान जातिवंत मराठा सोडील काय? सगळे मराठे एक होऊं शकतात काय? अस्सल, कमअस्सल, असा भेद चालतोच ना? धुंभ जळेल पण पीळ जळणार नाहीं म्हणतात. कनिष्ठ जाति वरिष्ठ जातींना खालीं ओढूं पाह-तात पण त्या आपल्यापेक्षां खालच्या जातींशीं एकरूप होऊं इच्छित नाहींत! असो. तात्पर्य एवढेंच कीं, जन्मजातीचा अभिमान किंवा लज्जा दोन्हीहि न बाळ-गतां ज्यानें आपल्या जातिधर्मानें वागावें, इतर जातींचा मत्सरद्वेष करूं नये, सर्व वर्ण व जाति गुणकर्माप्रमाणें नारायणानें निर्माण केल्या आहेत म्हणून त्या विश्व-कर्त्याला शरण असावें. एकंकार करून समाज मोडूं नये. अहल्याबाई धनगर जातींत धनगरच राहिल्या, त्यांनीं कधीं मला ब्राह्मण म्हणा असा आग्रह धरिला नाहीं. त्या आपल्या अंगच्या दिव्य गुणांनीं विश्ववंद्य झाल्या. जातिवंत मनुष्य आपली जात सोडून संकराची इच्छा करीत नाहीं, जेथें देवानें जन्म दिला तेथेंच दिव्य करणी करून तो धन्यत्व मिळवितो.

१०

महार, मांग, चांभार, धेड, भंगी इ० अस्पृश्य लोक आपापसांत वागतां-नाही अस्पृश्यता पाळतात. मग आजच सर्व अस्पृश्यांनीं त्यांना आपल्या मंदिरांतूनहि घ्यावें व अस्पृश्यता पार काढून टाकावी हें म्हणणें अयोग्य नाहीं काय? अस्पृश्यांच्या अनुचित राहणींत सुधारणा होऊं द्या, मेलेल्या जनावरांचें मांस खाण्यापासून त्यांना पराङ्मुख करा, स्नानादि शुद्ध कर्मे त्यांच्या अंगवळणी पडूं द्या, त्यांना शिक्षण द्या, सुविचार द्या, त्यांच्या राहणींत स्वच्छता व शुद्धता येऊन ती मुरत चालली कीं अस्पृश्यतेचा प्रश्न आपाप सुटेल. ब्राह्मणादि वरिष्ट जातींनीं दुष्टपणानें त्यांना दूर ठेवलें असें नाहीं. इंग्रजी राज्यांत किंवा मुसलमानी राज्यांतहि पराक्रमानें त्यांनीं डोकें वर कां काढलें नाहीं? चोखामेळा, बंका यांच्यासारख्या भगवद्भक्तांना साऱ्या स्पृश्य समाजानेंहि आज सहाशें वर्षे मान दिला नाहीं काय? तेव्हां ब्राह्मणादि स्पृश्यवर्गानें अहंकारानें किंवा दुष्टबुद्धीनें त्यांना दूर ठेवलें या म्हणण्यांत अर्थ काय? अस्पृश्यता ही केवळ संस्कारशुद्धीच्या, निर्मळतेच्या दृष्टीनें मूळ उत्पन्न झाली आहे आपल्याच घरांत सारे स्पृश्य सोवळेंओवळें, विटाळशीचा विटाळ, सुतकसोयर वगैरे पाळीत नाहींत काय? चार दिवस रजस्वला स्त्रीस दूर ठेवल्यानें घरांतील मंडळी काय तिचा द्वेष करितात असें होतें? वारकरी संप्रदायांला अस्पृश्यता मान्य नाहीं असा आक्रोश कित्येक सुधारक करीत आहेत, पण हें खोटें आहे. सर्वांभूतीं भगवद्भाव, भूतमात्रीं हरी, विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म, हा शास्त्रसिद्धांत ज्यांच्या ठायीं मुरला ते स्पृश्यास्पृश्यविचारापलीकडे आहेत. पण धर्मांत विचाराची तशी आचाराचीहि बाजू असते. 'आधी पाहिजे आचार। मग पाहिजे विचार। आचारविचारें पैलपार। पाविजेतो' असें समर्थ म्हणतात. स्पृश्याचें व अस्पृश्याचें 'अंतर' एक खरें—'अंतर येक तों खरें। परी सांगातें घेऊं नयेति महारें'—एकंकार, सबगोलंकार नको, 'संकरो नरकायैव' इ० थोरांचीं वचनें काय सुचवितात? श्रीज्ञानेश्वर- तुकारामादि सर्व संत गोलंकार करायला शिकवीत नाहींत महात्मा गांधीपेक्षां यांची भूतदया किंवा साम्यबुद्धि कमी होती असें कोणीहि म्हणावयाचें धाडस करील असें आम्हांस वाटत नाहीं. म० गांधींनीं अस्पृश्यतेवर कोरडे ओढले, व समाजांत स्पृश्यास्पृश्यतेचें विष पेरून समाजाचा विचका केला! महात्माजीविषयीं आमचा अत्यंत आदर आहे, पण ज्ञानेश्वरतुकारामादि अवतारी विभूतीविषयींचा किती तरी पटीनें आदर अधिक आहे. सर्व अस्पृश्यांना ज्ञानदान देऊन त्यांचा उद्धार करा, त्यांना ममतेनें व दयेनें वागवा, आपल्याप्रमाणें त्यांनाहि सुखदुःखें आहेत हें जाणून त्यांच्यांशीं प्रेमानें वागा, याविषयीं मतभेदच नाहीं.

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २७ ) कार्तिक शके १८५४ ( नवें वर्ष १२ वें
मास ३ ) नवंबर इ. स. १९३२ ( अंक ११

वार्षिक वर्गणी रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३०२



## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.



मुद्रकः विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६
लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

| विषय | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | ... | १ |
| २ केतकरबुवा | ... | २ |
| ३ दिनकरकथितरामावताररहस्य | ... | ३ |
| ४ रामाची आरती | ... | ४ |
| ५ संतवाङ्मय व विनोद | ... | ५--१० |
| ६ देवीची प्रार्थना | ... | १० |
| ७ काकभुशुंडीची मधुरकथा | ... | ११--१७ |
| ८ मराठीवाङ्मयाचा इतिहास खंड पहिला | ... | १८--२१ |
| ९ म० वा० इतिहासावरील कांहीं अभिप्राय | ... | २२--२४ |
| १० सार्थसुभाषित रत्नखंडें | ... | २५--३३ |
| ११ ईशस्तवन | ... | ३४ |
| १२ अस्पृश्यता आणि साधुसंत | ... | ३५--३९ |
| १३ विश्वानाथाची आरती | ... | ४० |


## ग्राहक-वाचकांस

१ ग्राहकांपैकीं प्रत्येकानें आणखी दोन नवे ग्राहक ऑक्टोबरपासून मिळवून द्यावेत ह्मणजे मुमुक्षूचें जीवन सुरक्षित राहील. वर्गणीदारावरच मुमुक्षु जिवंत राहणें शक्य आहे, तो बंद कण्याची पाळी न यावी अशी आमची फार इच्छा आहे. वर्गणीदार वाढण्याऐवजीं घटत चालल्यास हें अशक्य होईल.

२ 'मराठी वाङ्मयाचा इतिहास'—खंड १ ला हा आमचा नवा ग्रंथ येथें आमचे कचेरींतच मागवावा किं रु ४. व्ही पी नें ४।१२

३ मुंबईस हा ग्रंथ 'पागनीस पेंटकर आणि मंडळी' प्रार्थना समाजसमोर गिरगावांत मिळेल व पुण्यास लक्ष्मणराव अयाचित, जोगेश्वरीजवळ, पेठ बुधवार, यांजकडे मिळेल.

पत्ताः—'मुमुक्षु' कचेरी, नाशीक सिटी.

मुमुक्षु मासिक
वर्ष १२ वें

# मंगलाचरण

नोव्हेंबर १९३२
अंक ११



## अभंग

१

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनीयां १
चालों वाटे आह्मी तुझाचि आधार । चालविसी भार सवें माझा २
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ३
अवघे जन मज जाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ४
तुका ह्मणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाहीं ५

२

अभयदान मज देईं गा उदारा । कृपेच्या सागरा पांडुरंगा १
देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं । आणिक मी कांहीं नेणे दुजें २
सेवाभक्ति भाव नेणे मी पतित । आतां माझें हित तुझ्या पायीं ३
अवघा निरोपिला तुज देहभाव । आतां मज पाव पांडुरंगा ४
तुका ह्मणे तुझें नाम दीनानाथ । तें मज उचित करीं आतां ५

३

तुज मागणें तें देवा । आह्मां तुझी चरण सेवा १
आम नेघों—देसी तरी । रिद्धि सिद्धि मुक्ति चारी २
संत संगती सर्वकाळ । थोर प्रेमाचा सुकाळ ३
तुका ह्मणे नाम । तेणें पुरे माझें काम ४

४

मीं तों दीनाहूनि दीन । माझा तुज अभिमान १
मीं तों आलों शरणागत । माझें करावें स्वहित २
दीनानाथा कृपाळुवा । सांभाळावें आपुल्या नांवा ३
तुका ह्मणे आतां । भलें नव्हे मोकलितां ४

# केतकर बुवा

श्रीगणेशोत्सवाच्या आठवड्यांत येवला, मनमाड, इगतपुरी, कल्याण व मुंबई येथील प्रवचनें आटोपून रा. पांगारकर नाशीक क्षेत्रीं परत आले त्यावेळीं मालाडचे केतकरबुवा नाशकास सरकारी कामानिमित्त आले होते. हे सरकारी नौकर आहेत तथापि आपला उर्वरित काळ सर्व उपासनेंत व प्रवचनांत घालवून लोकांना नामाची गोडी लावण्यांत घालवीत असतात.

मालाड हें बी. बी. सी. आय्. रेल्वेवर एक स्टेशन असून तेथें हे राहतात. यांचे वडील वृद्ध पेन्शनर आहेत. ते व त्यांचे हे चिरंजीव श्रीगोंदवलेकर महाराजांचे संगतींत बरींच वर्षें होते, व सत्संगतींत मनुष्य परमार्थैकनिष्ठ कसा होतो हें श्री. तात्याराव केतकर यांचें उदाहरणावरून कळून येतें. श्रीगोंदवलेकर महाराज उर्फ ब्रह्मचैतन्य हे अलीकडच्या काळांत एक मोठे रामभक्त व नामप्रेमी सत्पुरुष होऊन गेले. त्यांनीं हजारो लोकांस रामभक्तीच्या मार्गास लावले व लाखो लोकांत नामप्रेम उत्पन्न केले. त्यांचा संचार सर्व भरतखंडभर पण विशेषतः महाराष्ट्र व कर्नाटक या भागांत फार असे. सातार जिल्ह्यांत गोंदवले गांवी हे राहत, तेथेंच यांची समाधि आहे व यांच्या पुण्यतिथीचा उत्सव मार्गशीर्ष महिन्यांत मोठ्या थाटाचा होत असतो. गोंदवलेकर महाराजांची जी उपदेशाची पद्धत असे तीच केतकरबुवांची आहे. हे साधे, नम्र व अत्यंत सात्विक वृत्तीचे आहेत.

श्रीगोंदवलेकर महाराजांचा एक मोठा सुंदर फोटो समोर ठेवून त्याला प्लँचेट सारखी एक फळी जोडलेली असते व तीवर कांहीं अक्षरें लिहिलेली असून त्यावर दोनतीन पैसे असतात त्यापैकी एका पैशावर बोट ठेवून तो सारखा फिरवीत असतांनाच हे बोलतात व गोंदवलेकर ( महाराजांचा यांच्यांत संचार होऊन तेच ) यांच्या मुखानें बोलतात अशी यांच्या मंडळीची श्रद्धा आहे. हें गूढ काय आहे हें पाहण्या साठीं कांहीं लोक एकदोन वेळ येऊन जात असतात येथें केतकरबुवांचा मुक्काम दीडमहिना होता तेव्हां रोज त्यांचे बिऱ्हाडीं रात्रीं ८॥ ते १०॥ पर्यंत प्रत्यहीं रा. पांगारकर व केतकरबोवा या उभयतांचीं लागोपाठ प्रवचनें होत असत. परमार्थ प्रेमी श्रोत्यांची खूप गर्दी होत असे व कित्येकांस रस्त्यावर उभे राहावे लागे. हे रामोपासक व रामदाससांप्रदायिक असून सांप्रदायिक आग्रहाचा त्यांत कांहींच प्रकार नसे. साधे व्यावहारिक दृष्टांत व संसारांतल्या साध्या गोष्टी सांगून भक्तिमार्गाचा व विशेषत: नामप्रेमाचा उपदेश श्रीगोंदवलेकर महाराजांच्या धाटणीवर करण्याचा यांचा प्रघात आहे. दीड महिना श्रोत्यावक्त्यांचा काळ किती आनंदांत व परमार्थसुखांत गेला हे अशा संतमेळयांत जे प्रेमानें मिसळून जाऊं शकतात त्यांनाच ठाऊक आहे. मुंबईच्या लोकांनीं एकवार मालाडला अवश्य जावें.

# दिनकरकथित रामावताररहस्य.

३

१ राम = आत्माराम (जीव.)
२ पिता = वेद.
३ सूर्यवंश = नरदेह.
४ अवतरला = जन्मास आला.
५ राज्य त्याग = प्रपंचत्याग.
६ वनवास = एकांत
७ मखरक्षण = धर्माचरण.
८ ऋषिसंग = सत्संग.
९ रावण वधिला = अहंकार निर्दळिला.
१० सीता = स्वानुभूति.
११ सुग्रीव = भाव.
१२ वाली = अभाव.
१३ अस्त्रें = इंद्रियें.
१४ मारुति = विवेक.
१५ विभीषण = सत्वगुण.
१६ रावणवधाच्या खुणा = साधनमार्ग.
१७ सहस्रनाम = गुरुभजन.
१८ पाशुपतास्त्र = अभेदज्ञान
१९ युद्ध = श्रवणमननीं दृढमति.
२० चित्रकूट = देहत्रय.
२१ वानर = मनोवृत्ति.
२२ समुद्रतरण = मोहनिवारण.
२३ लक्ष्मण व इंद्रजित् = वैराग्य व काम.
२४ कुंभकर्ण व त्याचे पुत्र कुंभनिकुंभ = तमोगुण व आलस्य प्रमाद.
२५ अयोध्या = अभयपद.
२६ पुष्पकविमान = अपरोक्षानुभूति.
२७ निजधाम = विदेह कैवल्य.

# रामाची आरती.

उत्कट साधुनि शिळा—सेतू बांधोनी।
लिंगदेह—लंकापुर विध्वंसूनी।
कामक्रोधादीक राक्षस निवटूनी।
देह—अहंभाव रावण निवटूनी ॥ १ ॥
जय देव जयदेव जय निजबोधा रामा।
परमार्थें आरती सद्भावें आरती परिपूर्ण कामा ॥ जय० ॥ध्रु०।
प्रथम सीताशुद्धी हनुमंत गेला।
लंकादहन करुनी अखया मारिला।
मारीला जंबूमाळी भुवनिं त्राहाटीला।
आनंदाची गुढी घेउनियां आला ॥ जय० २ ॥
निजबळें निजशक्ती सोडविली सीता।
ह्मणुनी येणें झालें अयोध्ये रघुनाथा।
आनंदें वोसंडे वैराग्य भरता।
आरति घेउनि आली कौसल्या माता ॥ जय० ॥ ३ ॥
अनुहतध्वनी गर्जति अपार।
अठरापद्मे वानर करिती भुभुःकार।
अयोध्येसी आले दशरथ कुमार।
नगरीं होत आहे आनंद थोर ॥ जय० ॥ ४ ॥
सहज सिंहासनीं राजा रघुवीर।
सोहंभावें तया पूजा उपचार।
सहजाची आरती वाद्यांचा गजर।
माधवदासा स्वामी आठवना विसर ॥ जय० ॥ ४

---

यन्मायावशवर्ति विश्वमखिलं ब्रह्मादिदेवासुराः
यत्सत्त्वादमृषेव भाति सकलं रज्जौ यथाहेर्भ्रमः
यत्पादप्लव एकएव हि भावाम्भोधेस्तितीर्षावतां
वंदेऽहं तमशेषकारणपरं रामाख्यमीशं हरिम् ॥ १ ॥

—तुलसीदास.

# संतवाङ्मय व विनोद.

संतवाङ्मय हें प्रौढ व गंभीर आहे तसेंच त्यांत प्रसंगोपात्त मौजेचा हास्य-विनोदही भरपूर आहे. एरवीं कंटाळवाणा व रुक्ष वाटणारा वेदांत त्यांनीं मनोरंजक करून सोडला आहे. संतांचे सहज उद्गार हे त्यांच्या स्वानंदसुखसमुद्रावरचे तरंग आहेत, ते पोट भरल्यावरचे ढेकर आहेत. त्यांत कृत्रिमपणाचा लवलेश नाहीं. अध्यात्मांतील गूढ प्रमेयें त्यांनीं सुलभ करून आबालवृद्धांना हंसत खेळत शिकविलीं आहेत. गुरुकृपेनें परब्रह्म आह्मांघरीं खेळणें होऊन बसलें आहे असें नाथांनीं ह्मटलें आहे 'तुका ह्मणे मुक्ति परिणिली नोवरी। आतां दिवस चारी खेळीमेळी'—तुकोबा ह्मणतात 'कीं आह्मी मुक्तीशीं लग्न लावलें असून आतां चार दिवस (उरलेले आयुष्याचे दिवस) खेळीमेळीनें गमतीनें घालवायचे आहेत. संताच्या लीलाविनोदाचा आनंद आपणही कांहीं काळ भोगुं':—

(१) 'भेद नाहीं सर्वात्मना। नारायणा तुज मज'—जीव आणि ब्रह्म यांचें ऐक्य प्रतीतीला आल्यावर, परमात्मा हा आपला खेळगडी आहे हें जाणल्यावर, जीव परमात्मा या दोघांना हृदयभुवनीं एकासनीं बसविल्यावर संतांनीं परमात्म्याला हवातसा खेळवला आहे, अभेदभावांतला सुखविलास भोगला आहे. कधी देवाला पुरुष कल्पून आपण स्त्री व्हावें, कधी त्याला स्त्री कल्पून आपण प्राणनाथ व्हावें व आपुल्कमापुकांचा अंतरंग भोगावा. परमात्मा वस्तुतः 'ना पुरुष ना स्त्री ना नपुंसक'! स्वसुखभोगार्थ त्याच्याच वाटेल त्या कल्पना कराव्या. तुकोबांनीं विराण्याच्या ३२ अभंगांत आपल्यावर स्त्रीचें रूप घेतलें असून मी आपला पहिला नवरा जो 'संसार' त्याच्याशी विन्मुख झाले व 'परपुरुषाशी व्यभिचार' केला असें गमतीनें सांगितलें आहे; तर उलट देवनाथांनीं 'आषक आह्मी पिसे झालों ग तुजवरते' ह्या पदांत परमात्म्याला स्त्री बनवून आपण तीवर कसे आसक्त झालों व तिला धुंडून तिच्याशीं कसे रमलों हें मजेनें वर्णिलें आहे! अद्वैतानुभवाचा हा विनोदानंद द्वैतांतच निरंतर डुबणाऱ्या भेदवाल्याला समजायचा नाहीं व त्याचा त्याला सुखानुभव घेतां यायचा नाहीं!

'नारायणा आह्मां नाहीं वेगळिक' असें अनुभवाला आल्यावर तुकोबा सांगतातः—

हाचि नेम आतां न फिरे माघारी। बैसले शेजारीं गोविंदाचे १
घररिघी झाले पट्टराणी बळें। वरिलें सांवळें परब्रह्म २
बळियाचा अंगसंग जाला आतां। नाहीं भय चिंता तुका ह्मणे ३

× × ×

सांडिला लौकिक लाज भय चिंता । रातले अनंता चित्त माझें १
मज आतां कोणी आळवाल म्हणीं । तुका म्हणे कानीं बहिरी झाले २

× × ×

दुजा ऐसा कोण बळी आहे आतां । हरी या अनंतापासोनीया १
बळियाच्या आह्मी झालों बळिवंता । करूं सर्व सत्ता जगावरी २

× × ×

क्षणभरी आह्मी सोसिले वाईट । साधिलें अवीट निजसुख १
तुका म्हणे येणें जागें नाहीं आतां । राहिलों अनंताचिये पायीं २

× × ×

सांवळें परब्रह्म मी वरिलें, त्याच्या घरांत घुसुन त्याची पट्टराणी झाले ! व अशा अत्यंत बलिष्ठाचा–पुरुषोत्तमाचा अंगसंग झाल्यामुळें मी निर्भय व निश्चिंत झाले ! लाजभयाचिंता सोडून माझें चित्त अनंताचे ठायीं आतां रमलें आहे. आतां परत माघारें फिरून प्रपंचाकडे पहा ह्मणून कोणी माझें मन वळवायला याल तर मी कानानें बहिरी झाले ह्म० प्रपंचाच्या कथावार्ता मला ऐकूंच येत नाहींत. अत्यंत बलिष्ठ व सर्वसत्ताधारी असा हा माझा स्वामी असल्यामुळें त्याच्या बळावर मी आतां सर्व जगावर सत्ता चालवीन. मी माझ्या स्वामीशीं समसत्ताक झाले (देवासारखीच भक्ताची सत्ता जगावर चालते हें आपण पाहतच आहोंत)! लोकछल क्षणभर सोसला, विषयाच्या ऊर्मींचें दमन केलें, पण आतां अवीट निजसुखाचा आनंद अखंड भोगीत आहोंत ! अनंताच्या पायीं माझी मिठी पडल्यामुळें जन्म–मरणाच्या येरझारांतून मी मुक्त झाले आहे ! मायापाश तोडल्यामुळें सर्व सुखाचे आह्मी धणी झालों आहोंत. परपुरुषाचा भोग झाल्यामुळें कोणाला शंका येईल तर ‘ तुका ह्मणे आता गर्भ नये धरूं । औषध जें करूं फळ नव्हे ’– वासनेचा गर्भ पाडून टाकूं व त्यासाठीं नामामृताचें दिव्य औषध घेऊं ! जन्ममरणांत पाडणारी वासनाच हरिरूप झाल्यामुळें आह्मी जन्मापासून मुक्त झालों आहो. परपुरुषाशी मी व्यवहार केला व प्रपंचाचा त्याग केला, ही गोष्ट आतां जगजाहीर झाली आहे! माझा निर्धार आहे कीं ‘ वाळो जीव मज ह्मणोत शिंदळी । परि हा वनमाळी न विसंबो. ’ लौकिक व जीवित्वाची आसभय सांडिले, आतां आनंदी आनंद !

हासों रुसो आतां वाढवूं आवडी । अंतरीची गोडी अवीट ते १
सेवासुखें आह्मी विनोदवचन । करूं नारायण एकाएकीं २

हें माझें ऐश्वर्य पाहून कोणी माझ्यासारखे नाचूं ह्मणाल तरः—

मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासिनी बाइयांनो १

× × ×

सांगतों तें तुह्मी आइकाने कानीं । आमचें नाचणीं नाचूं नका १
जोंवरी या तुह्मां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका २
तुका ह्मणे काय वायांवीण धिंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ३

आह्मी निःशंक, निर्भय झालेलों आणि तुम्ही भयभीत नारी, तुमची आमची बरोबरी कोठून होणार ?

परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनी करी घ्यावे शीस १
संवसारा आगी आपुलेनि हातें । लावूनी मागुतें पाहूं नये २
तुका ह्मणे व्हावे तयापरी धीर । पतंग हा नीट दीपासोई ३

जीवावर उदार व्हावे, संसारावर आपल्या हातानें निखारे ठेवावेत, दीपावर पतंग झडप घालतो त्याप्रमाणें परमात्मपद गांठण्याचा निर्धार करावा तेव्हांच परमात्मसुखभोग होतो.

'आषक आह्मी पिसे झालों ग तुजवरते । नको होऊं नयनाच्या परतें ॥ ध्रु ॥' हें देवनाथांच्या पदाचें पालुपद आहे. वेदशास्त्रांनीं तुझ्या अपरिमित लावण्याचें वर्णन केले तें कानावर पडून तुझ्या दर्शनासाठीं मी वेडा झालों:—

बैसला हृदयीं श्रुतिवचनबाणफटका ।
लागला मनीं तुझा चटका ।
सार वाटेना संसार समूळ लटका ।
निघालों तोडुनियां तटका ।
अग सखे ! उदासीन वृत्तीं ।
अग सखे ! विरह जाळित चित्तीं ।
अग सखे ! प्राण रिघों पाहती ।
कांहीं सुचेना तें । गूज सांगावें कवणातें ॥ आ०॥ २ ॥

प्रेमवेड्या विरही पुरुषाचें हें यथातथ्य वर्णन आहे ! यानंतर तुझ्या शोधार्थ फार अटाटी केल्या पण तुझा शोध लागत नसल्यामुळें हिंपुटी ह्म० कष्टी झालों. तुला कुठें कुठें शोधले ! '**करुनि पांचांची एकंदर मिठी । शोधिलीं तत्वें तुजसाठी**'— पंचभूतांत तुला शोधले, तत्वविवेचना केली. ज्या तत्वांची पंचभूतात्मक सृष्टी झाली त्या सर्व तत्वांत तुला शोधलें, पण तत्वें नाशवंत आणि तूं अविनाशी. तत्वांत तुझा शोध लागला नाही.

[ 'भूतें पिंडब्रह्मांड हें ऐक्य आहे । परी सर्वेही स्वस्वरूपीं न साहे' 'नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्वज्ञानें । समाधान कांहीं नव्हे तानमानें' 'महावाक्य तत्वादिकें पंचिकर्णें । खुणें पाविजे संतसंगें विवर्णें', बहुतापरी कूसरी तत्वझाडा-। परी

अंतरीं पाहिजे तो निवाडा । मना सार साचार तें वेगळें रे । समस्तांमध्यें एक तें आगळें रें ' मनोबोध ] पिंडज्ञान ह्म० शरीरशास्त्र ( Anatomy ), तत्वज्ञान ( तत्वांचें गाठोडें, तत्वसंख्याज्ञान ), गायनादि कला, ज्ञान, योगयाग, भोगत्याग, महावाक्योपदेश, पंचीकरण, नानातऱ्हेचें कलाकौशल्य, चातुर्य इत्यादिकांच्या योगें स्वरूपानुभव होत नाहीं, आत्मसमाधान प्राप्त होत नाहीं.

अग सखे ! भूमि सप्तही । अग सखे ! शोधिल्या त्याही ।
अग सखे ! पडसिना ठायीं । लावण्य सुगुणभरिते ! बुडालों तुझ्या विरहगर्तें ॥ ३ ॥

**सप्तभूमि** — १ शुभेच्छा २ विचारणा ३ तनुमानसा ४ सत्वापत्ति ५ असंसक्ति ६ पदार्थाभाविनी व ७ तूर्या. ह्या सप्तभूमि शोधल्या तरी शोध लागला नाहीं. मग ' चतुर्थस्थानीं गुरु भेटे '—ज्ञानभक्तींत गुरु भेटले ? त्यांनीं मस्तकीं वरद कर ठेवून खूण दाविली.

पाहुनि रूप तुझें हर्ष अंतरंगा । निववि देवोनि अंगसंगा ।
उशीर न लावि तूं चिदानंदगंगा । तुझ्या स्वरूपें देई जागा ॥
निर्जी निजशयनीं भोगुं भोग साचा । सोहळा सुखसायुज्याचा ।
अग सखे ! तुला जनीं विजनीं । अग सखे ! पाहू निजनयनीं ।
अग सखे ! समाधि व्युत्थानीं ।
नाहीं तुजपरतें । हृदयिं धरिलें देवनाथें ॥ ६ ॥

केवळ बहिर्मुखांना वरील कवनांत शृंगाराची झाक दिसेल, पण भाषा शृंगाराची असली तरी अंतरंगांत सारें अध्यात्म आहे. देवनाथांच्या पदांत परमात्म्याला उद्देशून 'अग सखे ! अग सखे ! असें ह्मटलें आहे त्यांत परमात्मा जीवाचा सखा आहे, जीव परमात्म्यांचें अनादिसख्य आहे हा मुख्य भाव आहे. ' द्वा सुपर्णा सयुजा सखाया ' असें श्वेताश्वतरांत ह्मटलें असून भागवतांतील ' सुपर्णावेतो सयुजौ सखायौ ' हा त्याचाच अनुवाद आहे व भगवंतांनींही गीतेंत ' सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति असें स्वमुखानें सांगितलें आहे. नाथ साहेब याचा अर्थ सांगतातः—

दोघेही चिद्रूप सारिखे । कधी नोहे अनारिखे ।
अनादि दोघे सखे । अतिनेटके जिवलग ॥
प्रभा दीप निवडिना वेगळा । दीप प्रभेसी नव्हे निराळा ।
तेवीं जीवशिवांचा मेळा । एकत्र खलीला नांदती ॥

( २ ) परमात्मरूपीं जीवभाव विराला हें सांगतांना ' मी श्रीरंगीं डोलत

गेले ' तेव्हां त्यानें ' चैतन्य चोरिले माझें । चैतन्य चोरिलें ' अशी हाकाटी ज्ञानेश्वरांनीं केली आहे. मिराबाईंनीं ' अहो धांवा धांवा ! ह्या कान्ह्यानें मला लुटलें ' अशी एका गौळणीच्या मिषानें गमतीची ओरड केली आहे !

कोइ दवरो दवरो दवरो । कान्हानें मोही लूटी ॥ १ ॥
मोही लूटी मोही लूटी मोहे लुटी ॥ ध्रु० ॥
कोइ दवरो दवरो दवरो । कान्हानें मोही लूटी ॥ २ ॥
जल भरनेकु मै जाती जमुना । शिरकी मटकी फूटी ॥ मोही० ॥३॥
मिरा कहे प्रभु गिरिधर नागर । करमकी रेखा तूटी ॥ मोही० ॥४॥

(३) अमर तूं खरा । नव्हे कैसा मी दातारा १
तुज नामरूप नाहीं । तरि माझें दाव काई २
खेळसी तूं लीला । तेथें काय मी वेगळा ३
साच तूं लटिका । तैसा मी ही ह्मणे तुका ४

(४) लहान मुलींना माहेर अत्यंत प्रिय. माहेर हें खेळण्याबागडण्याचें स्थान, विश्रांतीची जागा ! माहेर ह्म० मातृगृह, जन्माचें स्थळ, उगम. संतांनीं निजरूपाला ( हरिस्वरूपाला ) माहेर ह्मणून प्रपंचाला सासर ह्मटलें आहेः—

उबगले सासऱ्या आतां माहेरासि न्या हो ।
तोंडा एवढा जाच पडत्ये तुमच्या पाया हो ॥ ध्रु० ॥

त्रिविध ताप सासरा, काम दादला, क्रोध दीर, कल्पना ही सासू, अविद्या ही नणंद, आशा ममता जावा,–या सगळयांचा ' कुठवर सोसूं जाच आतां कदापि साहीना ' अशी सासरबद्दलची कुरकुर मुकुंदराजांनीं केली असून ' जो मज माहेर दावील त्याची सेवा मी करीन '—माहेर दाखवणारे संतसद्गुरु यांना मी शरण आहे असें ह्मटलें आहे !

भक्तिबळें कंठिते सासऱ्या लवकर न्याजी मला ।
सद्गुरुराज माहेराला ॥ ध्रु० ॥
दश इंद्रियें दहा शेजारी गांजिति परोपरी ।
सासू माझि अविद्या खरी ॥
वैरि दादला प्रपंच मोठा खोटा हा अंतरीं ॥
भाऊ ( भाव ) घोडे दोघे जण मूळ पाठवा मला ॥ सद्गुरु० ॥१॥

अशी प्रार्थना केशवस्वामींनीं केली आहे. ' पिता माझा आत्मबोध हा माय निवृत्तिबाई । त्यांच्या स्वाधिन कांहींच नाहीं. ' शांति विरक्ति या बहिणी पण या माहेरी आल्यावरच भेटायच्या ! कल्पनेला सासू कां ह्मटलें आहे याचें नाथांनीं

एके ठिकाणीं कारण दिलें आहे. "येथें कल्पना हे सासू सदा सासुरवासू । घेऊं नेदी उमसू आठवण' अहंकार सासरा व कल्पना ही सासू, इच्छा आणि निंदा या जावा, ममता ही नणंद-नंदुली, अविवेक किंवा काम हा दादला. आत्मबुद्धि चिच्छक्तीस विनविते:-( रोडगा-देहात्मभाव. )

सत्वर पावग मला । भवानि आई रोडगा वाहिन तुला ॥ ध्रु० ॥
सासरा माझा गावीं गेला । तिकडेच खपवी त्याला ॥भवानि० ॥१॥
सासू माझी जाच करीते । मरिआई येउ दे तिला ॥ भ० ॥ २ ॥
जाऊ माझी फडफड बोलती । रंडकी कर ग तिला ॥ ३ ॥
नणंदेचें पोर किरकिर करते । खरुज येऊं दे त्याला ॥ ४ ॥
दादला मारुनि आहुति देइन । मोकळी कर ग मला ॥ ५ ॥
एका जनार्दनिं सगळेचि जाउं दे । एकटिच राहुं दे मला ॥६॥ भ०॥

---

# देवीची प्रार्थना.

## आर्या

त्वां जरि बहुविधचिंता—संकट— दुःखेंहि दाविलीस मज ।
तरि मी शरण कुणाला नाहीं जाणार माउली ! समज ॥ १ ॥
सोडुनि कल्पलता ही आतां कोठें मि जाउं दैवारे ।
म्हणताति संत येथें सद्भाग्याचें सदा उदयवारें ॥ २ ॥
पाय तुझे पाहूं दे जोंवरि आहेत प्राण देहांत ।
बुडतों भवसागरिं या काढ तुला माझि आण, दे हात ३ ॥
चंद्रापरी क्षमेची शोभवि तप लक्षुमी क्षमाशीला ।
यास्तव अवक्षमेच्या वारावे तूं अभक्ष माशीला ॥ ४ ॥
मोठी उदार अंबा-बाई श्रुति जी वदे स्वउदरांत ।
ती तूं कृपणचि झालिस, काय तुझ्या जीव देउं दारांत ॥ ५ ॥
माते ! कळेल तिकडे जातों परि पाय एकदां दावी ।
कांय करूं गे पडला बाप विधाता सदा कदा दावी ॥ ६ ॥
परि मायलेंकराचा लागुं नये वाद अन्य कानातें ।
तूं दिन जननि मी दिन आहे अर्थात न्यून कां नातें ॥ ७ ॥
शरणांगतासि अंबे ! दे तव सन्मान कायदा साचा ।
विष्णूदास म्हणे या धरसि न अभिमान काय दासाचा ? ॥ ८ ॥

—विष्णु कवि

# काकभुशुंडीची मधुर कथा

तुलसी रामायणाच्या उत्तरकांडांत काकभुशुंडीचें एक सुंदर आख्यान आहे. त्यांत सगुणभक्तीचें प्रेमसुख उत्कृष्ट वर्णिलें आहे. रामाच्या सामर्थ्याविषयीं व ईश्वरत्वाविषयीं साशंक झालेल्या गरुडानें नारद, ब्रह्मदेव व शंकर यांजकडे जाऊन शंकानिवृत्यर्थ विनंति केली. शंकरानीं त्याला सांगितलें कीं सत्संगांत रामयश ऐकल्याशिवाय संशयछेद होत नाहीं:-

(चौ० ) तबहि होइ सब संसयभंगा । जब बहुकाल करिय सतसंगा ।

ह्मणून जेथें नित्य हरिकथा होत असतें तेथें गरुडाला पाठविण्याचें शंकरांनीं ठरविलें.

( दो० ) बिनु संतसंग न हरिकथा तेहिबिनु मोह न भाग ।
मोह गयेबिनु रामपद होइ न दृढ अनुराग ॥

सत्संगावांचून हरिकथा नाहीं, हरिकथेवांचून मोहनाश नाहीं व मोह गेल्यावांचून रामपदीं दृढ भक्तिप्रेम उत्पन्न होत नाहीं. योग, जप, ज्ञान, विराग असूनही भक्तीवांचून राम नाहीं! ह्मणून शंकरांनीं उत्तरेकडे नील पर्वतावर असलेल्या काकभुशुंडीकडे गरुडास पाठविलें. गरुड अहंकारानें व मोहानें भरलेला, तथापि काकभुशुंडीच्या निवासांत येतांच तेथील राममय पवित्र वातावरणानेंच शुद्ध झाला. त्याचें मन प्रसन्न झालें व त्याची ' माया मोह सोच ( शोक ) सब गयउ ' मोहशोकमाया पार गेले! गरुडानें तडागांतील जलाचें स्नानपान केलें व इतर पक्ष्यांस तो काक रामकथा सांगत असतांनाच तो तेथें प्राप्त झाला. काकानें त्याचा सत्कार केला व गरुड त्याच्या दर्शनानेंच कृतार्थ झाला. तो ह्मणालाः-

( चौ० ) देखि परमपावन तब आस्रम । गयउ मोहसंसय नानाभ्रम ।
अब श्रीराम कथा अतिपावनि । सदा सुखद दुखपुंजनसावनि ।
सादर तात सुनावहु मोही । बारबार बिनबउ प्रभु तोही ।

भुशुंडीनें यावर रामगुणगाथा प्रेमानें गायिली. ती ऐकून गरुड निःसंदेह झाला व मोकळेपणानें ह्मणालाः " रामरावणयुद्धांत इंद्रजितानें प्रभूस नागपाशांनीं बांधलें तेव्हां नारदांच्या सांगण्यावरून मी जाऊन ते नागपाश तोडले. ' बंधनांत सांपड- णारा तो प्रभु कसला व तो इतरांस बंधमुक्त कसा करणार; राम तर मनुष्यच आहे व मनुष्यांप्रमाणें वागतो; तो ईश्वर कसा असेल?' अशा संशयानें माझें मन ग्रस्त झालें होतें. असो. मोहपटल माझ्या मनावर आलें नसतें तर आपलें दर्शन कसें झालें असतें? राम ज्याकडे कृपादृष्टीनें पाहतात, त्यांनाच संतांचें पवित्र दर्शन होतें ह्मणून रामकृपेनेंच आपलें झालें व आपल्या प्रसादानेंच माझे सर्व

संशय नष्ट झाले." हें गरुडाचें भाषण ऐकून भुशुंडी झणाले. "हे खगराज!

तुह्म हि न संसय मोहन माया। मोपर नाथकी तुह्म दाया।

'तूं रामकृपापात्र आहेस. तुला संशय व मोह कुठला? तूं मजवर दर्शन देऊन दया केलीस. मोहाच्या मिषानें रामानें तुला मजकडे पाठविलें. तूं आपला मोह मला सांगितलास पण यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कोणा आत्मनिष्ठाला मोह अंध करीत नाहीं? मदन कोणाला नाचवीत नाहीं? तृष्णा कोणाला बावरें करीत नाहीं? क्रोधाला कोण वश होत नाहीं? मोठा तपस्वी, ज्ञानी, शूर, पंडित-पण लोभ कोणाची विटंबना करीत नाहीं? प्रभुत्वानें कोण बधिर होत नाहीं? मृगनयनेच्या कटाक्षबाणांनीं कोण विद्ध होत नाहीं! मदमानांतून कोण सुटला आहे? यौवनज्वर कोणाच्या अंगीं भरत नाहीं? शोकवायूनें कोण कंपित झाला नाहीं? जगांत असा कोण आहे कीं ज्याला मायेनें व्यापलें नाहीं? पुत्रेषणा, वित्तेषणा व लोकेषणा यांनीं कोणाची बुद्धि पोखरली नाहीं? मायेचा हा परिवार अत्यंत प्रबळ आहे. माया दुर्निवार आहे, पण ती रामाची दासी आहे. रामाच्या कृपेवांचून ती नष्ट होणार नाहीं.

जी सर्व जगाला नाचवीत असून जिचे खेळ कोणालाही समजत नाहींत ती माया प्रभूच्या केवल कृपाकटाक्षानें त्याच्या पायाशीं लोळण घेते. तो प्रभु रामराय:—

(चौ०) सोइ सच्चिदानंदघन रामा। अज विज्ञानरूप बलधामा।
व्यापक व्याप्य अखंड अनंता। अखिल अमोघसक्ति भगवंता।
अगुन अदभ्र गिरा-गो-तीता। सबदरसी अनवद्य अजीता।
निर्मल निराकार निर्मोहा। नित्य निरंजन सुखसंदोहा।

तोच परमात्मा:—

(दोहा) भगतहेतु भगवान प्रभु राम धरेउ तनु रूप।
किये चरित पावन परम प्राकृत--नर--अनुरूप ॥ १०१ ॥
निर्गुनरूप सुलभ अति सगुण न जानहि कोइ।
सुगम अगम नानाचरित सुनि मुनिमन भ्रम होइ ॥ १०४ ॥

प्रभूचीं चरित्रें यथार्थ न कळल्यामुळें मुनींच्याही मनाला भ्रम होतो. विषयी व मलिनमति पुरुषाला प्रभूच्या लीलांचें आकलन न झाल्यामुळें त्या विपरीत दिसतात. पहा बरें! कावीळ झालेल्याला चंद्र पिवळा दिसतो, नौकेंतून जाणाऱ्याला पृथ्वी फिरते व आपण स्थिर आहोंत असें वाटतें! रामावर आरोप करणारे असेच अज्ञानी असतात, पण राम आपल्या भक्तांच्या ठिकाणचा अभिमान टिकूं देत नाहींत:—

(चौ॰) सुनहु राम कर सहज सुभाऊ। जन अभिमान न राखहि काऊ।
संसृतिमूल सूलप्रदनाना। सकल सोकदायक अभिमाना ॥

भुशुंडीनें यानंतर आपलें चरित्र सांगितलें. 'इष्टदेव मम बालक रामा'—रामाच्या बालरूपाचें व बाललीलांचें त्यानें गोड वर्णन केलें. 'ज्ञान अखंड एक सीतावर.'

मायाबस्य जीव अभिमानी। ईशबस्य माया गुनखानी।
परबस जीव स्वबस भगवंता। जीव अनेक एक श्रीकंता।
मुधाभेद जद्यपि कृतमाया। बिनुहरि जाइ न कोटि उपाया।

जीव मायावश व अनेक व ईश स्वतंत्र व एक. दोघांतला भेद सत्य नसून मायाकृत आहे व तो हरीवांचून कोण्यवधि साधनांनींही जात नाहीं.

(दोहा) रामचंद्रके भजनबिनु जो चह पद निर्बान।
ज्ञानवंत अपि सो नर पशु बिनुपुच्छबिखान।

रामभजनावांचून जीवेश्वरभेद जात नाहीं. ज्ञानी असून भक्तिरहित असलेला नर 'पुच्छविषाणहीन' पशुच समजावा! हरिभक्ताला क्लेश नाहींत, मोहदुःख नाहीं. रामाची मजवर पूर्ण दया आहे, प्रभु माझ्या पाठीशीं आहेत. रामाची प्रभुता व भक्तवत्सलता आठवून माझें हृदय निरंतर प्रेममय असते. एकदा राम मजवर प्रसन्न होऊन मला वर माग म्हणाले. 'ज्ञान, विवेक, वैराग्य, विज्ञान व इतर सुर—दुर्लभ अनेक गुण मागून घे' असे म्हणाले. मी विचार केला कीं हे सारे गुण भक्तीवांचून आळणी होत, म्हणून मी आपली भक्तीच मागून घेतली! रामानें मला सर्वसुखसार अशी भक्ति दिली. राम म्हणाले. "एका पित्याला पुष्कळ मुलगे असले म्हणजे त्यांत कोणी पंडित, कोणी शूर, कोणी ज्ञानी कोणी उदार, कोणी धनवंत, कोणी धार्मिक असतात, पण त्यांत जो निस्सीम पितृभक्त व पितृ-सेवारत असतो तोच बापाला आवडतो. माझेंही असेंच आहे. जो कायावाचा-मनानें मजवर निष्कपट प्रेम करितो व माझ्या भजनसुखांत सुखी असतो तो भक्तच मला सर्वांत अधिक आवडतो!"

भुशुंडी गरुडाला सांगतातः—

(दोहा) बिनु बिस्वास भगति नहि तेहिबिनु द्रवहि न राम।
रामकृपाबिनु सपनेहु जीव न लह बिश्राम ॥ १३० ॥

भगवान् भाववश, करुणानिधान, सुखस्वरूप आहेत हें जाणून त्याला प्रेमभक्तीनें अखंड भजावें म्हणजे मायेचा प्रभाव चालत नाहीं. गरुडानें यावरः—

(चौ॰) तुम्ह सर्बज्ञ तम्य तमपारा। सुमति सुसील सरल आचारा।
ज्ञान--बिरत--बिज्ञान निवासा। रघुनायकके तुम्ह प्रिय दासा।

अशा प्रकारें भुशुंडीची स्तुति केली व त्याला 'तुम्हांला हा काकदेह कां प्राप्त

झाली तें सांगा ' असें विचारिलें--काकभुशुंडीनें उत्तर केलें:—

( चौ० ) जप तप मत मख सम दम दाना । बिरति बिवेक जोग बिज्ञाना ।

सबकर फल रघुपतिपदप्रेमा । तेहि बिनु कोउ न पावइ षेमा ॥

जपतपादि सर्वांचें फळ हेंच आहे कीं चित्तांत रामचरणप्रेम उत्पन्न व्हावें, त्यावांचून क्षेमाची प्राप्तिच नाहीं. असें निष्काम प्रेम ह्या देहांत मला लाभलें म्हणून हाच देह मला प्रिय आहे व हा सोडायची मला इच्छाही नाहीं ! रामप्रेम जोडणें हाच जीवाचा श्रेष्ठ स्वार्थ आहे व देहावांचून भक्ति घडत नाहीं म्हणून हाच देह बरा असें मला वाटतें. भुशुंडींनीं येथें कलियुगाचें वर्णन करून कलीचें दोष व गुण सांगितले व म्हणाले.

( दोहा ) कलिजुगसम जुग आन नहि जो नर कर बिस्वास ।

गाइ रामगुनगन बिमल भव तर बिनहि प्रयास ॥ १५० ॥

त्यांनीं आपल्या जन्मांच्या कथा सांगितल्या. शेवटीं सुरदुर्लभ अशा एका पवित्र ब्राह्मणकुळांत त्यास जन्म मिळाला. शिकण्याकडे लक्ष नसावें, ' मम ते सकल वासना त्यागी । केवल रामचरण लय लागी ' याप्रमाणें रामचरित्राकडे मन वळलें, सर्व ईषणा गळल्या व रामचरणदर्शनाचें मनाला वेड लागलें. गुणानुवाद ऐकण्याविषयीं मी उत्सुक झालों. जो तो ईश्वर सर्वभूतात्मक आहे, निर्गुण आहे असें सांगे. माझ्या मनांत तर सगुणब्रह्माचीच आवड होती. मी लोमशऋषींना भेटलों व ' सगुण ब्रह्माची उपासना मला सांगा ' असें त्यांस विनविलें.

( दोहा ) तब मै कहा कृपानिधि तुम्ह सर्बज्ञ सुजान ।

सगुन ब्रह्म आराधना मोहि कहहु भगवान् ॥ १७० ॥

ते मला ब्रह्मोपदेश करूं लागले: ' अज, अद्वैत, अगुन, अनाम, अरूप, अनुभवगम्य, अखंड, अनीह, मनगोतीत, निर्विकार, निरवधि, ' असें ब्रह्म आहे व तें तूंच आहेस; जल व तरंग अभिन्न तसा तूं ब्रह्माहून वेगळा नाहींस ' असें ते म्हणाले; पण ' अद्वैत माझ्या मनाला रुचत नाहीं, नयनांनीं मला प्रत्यक्ष रामदर्शन होईल असी सगुणोपासना मला सांगा ' असे मी म्हणालों. मुनी पुन्हा सगुणखंडण करून निर्गुणकथा सांगूं लागले. उत्तर-प्रत्युत्तर होतांच मुनि जरासे क्रुद्ध झाले. मी मनांत म्हणालों: 'द्वैतभावनेशिवाय अशा ज्ञात्यालाही क्रोध कां यावा? ज्याच्याजवळ परीस आहे तो दरिद्री राहणार नाहीं. ' क्रोधानें त्यांनीं मला तूं चांडालपक्षी हो असा शाप दिला व मी लगेच कावळा झालों, पण मुनींच्या चरणांवर मस्तक ठेवून मी रामस्मरण करीत आनंदानें भराऱ्या मारीत निघालों ! कृपानिधान रामरायांनीं त्या मतीस भुरळ पाडून माझी प्रेमपरीक्षा केली असें मी

समजकों. माझी सहनशीलता व रामप्रीति पाहून मुनींनीं मला फिरून बोलावले, मला बालकरूप रामाचें ध्यान सांगितलें व प्रेमानें जवळ बसवून रामचरित्र सर्व ऐकविलें व ह्मणाले 'रामचरित जिन्हके उर नाहीं' त्याला तें सांगूं नये. तुझ्या हृदयांत अखंड रामभक्ति राहील, असा प्रसन्नतेनें त्यांनीं मला आशीर्वाद दिला. काकभुशुंडीच्या मुखानें भक्तिप्रभाव ऐकून गरुड ह्मणालाः—

तव प्रसाद प्रभु! मम उरमाही। संसयसोकमोहभ्रम नाहीं।

पण एक विचारतों कीं ज्ञानांत व भक्तींत अंतर काय?

कहहि संत मुनि वेद पुराना। नहि कछु दुर्लभ ज्ञानसमाना।
ज्ञानहि भगतिहि अंतर केता?। सकल कहहु प्रभु कृपानिकेता।

भुशुंडींनी उत्तर केलें:—

भगतिहि ज्ञानहि नहि कछु भेदा। उभय हरहि भवसंभव खेदा।

दोन्हीही भवदुःखनिवारक आहेत, पण त्यांत थोडा भेद आहे. विरक्त व ज्ञानी पुरुषही क्वचित् हरिणाक्षीचें चंद्रवदन पाहून विव्हळ होतात, मायावश होतात, पण रामभक्तावर मायेचा प्रभाव पडत नाहीं. हें पहा! एकीकडे माया व दुसरीकडे भक्ति. माया व भक्ति दोन्ही स्त्रिया आहेत; स्त्री स्त्रीच्याच रूपाला भुलत नाहीं, ती पुरुषालाच भुलते; ह्मणून माया व भक्ति ह्या दोघी पुरुषोत्तमावर राजी आहेत! पण दोघींचें परस्पर रहस्य जमत नाहीं. मायेच्या अर्थात् विषयवासनेच्या आवारांत भक्ति जात नाहीं व भक्तिच्या उपवनांत मायेचा प्रवेश होत नाहीं परमात्म्याला भक्ति प्रिय आहे, माया त्याच्यापुढें आपले रंगढंग खेळ करून त्याला भुलवायला पाहते पण तो तिच्याकडे पाहत नाहीं. ती विचारी नर्तकी -कोल्हाटीण

पुनि रघुबीरहि भगति पियारी। माया खलु नर्तकी बिचारी।
भगतिहि सानुकूल रघुराया। ता ते तेहि डरपति अति माया।

राम भक्तीला अनुकूल ह्मणून माया भक्तीला वचकून असते! भक्ति ही निरुपम व निरुपाधि असते ह्मणून ती ज्याच्या अंतरांत आहे त्याला पाहून मायेला संकोच वाटतो व ती त्याच्यावर आपली सत्ता गाजवीत नाहीं! असा विचार करून विज्ञानी पुरुष सकलसुखखनि अशा भक्तीचाच आदर करितात. भक्ति व ज्ञान यांत आणखी एक भेद आहे. जीव ईश्वरांश आहे पण तो मायावश असल्यामुळे पोपट व मर्कट या प्रमाणें बद्ध आहे.

ईस्वरअंस जीव अबिनासी। चेतन अमल सहज सुखरासी।
सो मायाबस भयउ गोसाई। बंधेउ कीर मरकट की नाई।

जड--चैतन्याची ग्रंथि उकलणें अत्यंत कठिण आहे. ती गांठ सुटत नाहीं म्हणून जीव संसारी व दुःखी बनला. देव योग आणील तरच ती उकलायची ! हरिकृपेनें हृदयांत सात्विक श्रद्धा उत्पन्न झाली व जपतपादि श्रुतिधर्मसाधनांनीं पोसली तरच वैराग्य उत्पन्न व्हायचें व पवित्र वैराग्यानेंच ज्ञानविज्ञान व्हायचें ! इंद्रिय--देवता मध्यें विघ्नें करितात व ऋद्धिसिद्धि आड येतात. हरिमाया अतिदुस्तर आहे. हा ज्ञानपंथ तरवारीची धार आहे. कैवल्यरूप परमपद दुर्लभ आहे, पण रामभजनानें तोच मोक्ष, इच्छा केली नसूनही, प्राप्त होतो. स्थळावांचून पाणी राहत नाहीं त्या प्रमाणें मोक्षसुखही हरिभजनावांचून राहत नाहीं म्हणून भक्त मुक्तीचा अव्हेर करून भक्तीच करतात.

तथा मोच्छसुख सुनु खगराई! । रहि न सकइ हरिभगति बिहाई सोडून)।
अस बिचार हरिभगत सयाने । मुक्ति निरादर भगति लोभानें ।
भगति करत बिनु जनत प्रयासा । संसृतिमूल अविद्या नासा ।
असि हरिभगति सुगम सुखदाई । को अस मूढ न जाति सुहाई (सुंदर) ।
(दोहा०) सेवकसेव्यभावबिनु भव न तरिय उरगारि ! ।
भजहु रामपदपंकज अस सिद्धांत बिचारि ॥ १८७ ॥

रामभक्तीचा हा चिंतामणि ज्याला सांपडला त्याला अहोरात्र प्रकाशरूप आहेत. भक्ताच्या 'मोहदरिद्र निकट नाहि आवा'—मोहदारिद्य्र वाऱ्याला उभें राहत नाहीं, 'अचल अबिद्यातम मिटिजाइ'—अविद्यारूप गाढांधकार नाहींसा होतो, व

खल कामादि निकट नहि जाही । बसइ भगति जाके उरमाही ।
गरल सुधासम अरि हित होई । तेहि बिनु सुख पावन कोई ।

ज्याच्या हृदयांत भक्ति वास करिते त्याच्याजवळ कामादि खल जात नाहींत, त्याला विष तें अमृत होतें व शत्रु मित्र होतात. भक्तीवांचून कोणालाही सुख होत नाहीं. सर्वसुखाचें आगर असा हा भक्तिरूप चिंतामणि भावबळानेंच हातीं येतो. मला वाटतें कीं रामापेक्षां रामाचे असे दासच थोर होत-'राम ते अधिक रामकर दासा' राम समुद्र तर भक्त मेघ, राम चंदनवृक्ष तर भक्त त्याचा सुगंध वाहून नेणारे समीर होत !

राम सिंधु घन सजन धीरा । चंदनतरु हरि संत समीरा ।
सबकर फल हरिभगति सुहाई । सो बिनुसंत न काहू पाई ।
अस बिचारि जोइ कर सतसंगा । रामभगति तेहि सुलभ बिहंगा ।

सर्व साधनांचें सार हरिभक्ति आहे व ती सत्संगावांचून प्राप्त होत नाहीं. पर—

मात्मा क्षीरसागर आहे, ज्ञानरूपी मंदरपर्वतानें संतरूपी देव त्याचें मंथन करून कथारूपी अमृत काढतात, व त्या अमृताचें माधुर्य ह्मणजेच भक्ति होय! तात्पर्यः —

सिव अज सुक सनकादिक नारद। जे मुनि ब्रह्मबिचारबिसारद।
सब कर मत खगनायक एहा। करिय रामपदपंकज नेहा।
स्तुतिपुरान सब ग्रंथ कहाही। रघुपतिभगतिबिना सुख नाहीं।

ही काकभुशुंडी व गरुड यांची संवादात्मक कथा सांगून तुलसीदास हे ह्या कथेचा व रामायणाचाही उपसंहार करितांना ह्मणतातः —

एहि कलिकाल न साधन दूजा। जोग जज्ञ जप तप व्रत पूजा।
रामहि सुमिरिय गाइय रामहि। संतत सुनिय रामगुनग्रामहि।

इंद्र ह्मणाला कीं "श्रुतींनीं अव्यक्त ह्मणून वर्णन केलेल्या निर्गुणब्रह्माचें कोणी ध्यान करितात, पण मला तर कोसलभूप श्रीरामचंद्राचें सगुणस्वरूपच आवडतें. जानकी लक्ष्मणासह रामचंद्रच माझ्या हृदयांत निवास करोत." शंकर ह्मणतातः—

सगुनोपासक मोच्छ न लेही। तिन्ह कहँ राम भगति निज देही।

ह्मणजे सगुणोपासक हे मोक्ष दिला तरी घेत नाहींत, तेव्हां त्यांना राम आपली भक्ति देतात. राम हे 'सगुन अगुन गुनमंदिर सुंदर। भ्रमतमप्रबलप्रताप दिवा-कर' आहेत. ते 'मुनिरंजन महिमंडलमंडन, आहेत. येथील अनुप्रास सहजरम्य आहे. शंकर पार्वतीला सांगतातः—

(दोहा) उमा! जोग जप दान तप नाना व्रतमख नेम।
रामकृपा नहि करहि तसि जसि निष्केवल प्रेम॥ (लंकाकांड १४१)

निष्काम प्रेमाला वश असून राम जशी कृपा करितात तशी ते जपतपादिकें करणाऱ्यां-वर करीत नाहींत.

---


# आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट काव्य प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्रसंत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृत्तांत आहे. 'उपकृतिस्मरण' हें ७६ श्लोकांचें आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा, ग्रंथांचा, व साधुसंतांचा सहवास झाला यांचेही उपकार स्मरले आहेत. किं. ॥१२

पत्ताः— मुमुक्षुकचेरी, नाशीक सिटी.

# मराठी वाङ्मयाचा इतिहास—खंड पहिला

## पृ० सं० ८३२ ] ज्ञानेश्वरनामदेवांचा काल. [ किंमत रुपये चार ]

ग्रंथकारः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, नाशीक सिटी.


प्रास्ताविकः—वेदधर्मीयांची एकरूपता पृ. १ परंपरेच्या ज्ञानाची अवश्यकता ३

१ वेदविद्याः—विषयप्रवेश पृ. ९ ऋग्वेद ११ वैदिकदेवतांच्या प्रार्थना १३ ऋग्वेदांतील अध्यात्मविद्या १९ यजुर्वेद २६ सामवेद २८ अथर्ववेद २९ वेदांगें ३३ वेदोपांगें ३५ उपवेद ३८ सांख्यशास्त्र ३९ पातंजलयोग ४४

२ उपनिषदांतील ब्रह्मविद्याः-दशोपनिषदें पृ. ४७ आत्मविद्या व आत्मविद् ४८ शांडिल्य ५६ आरुणि ५७ दध्यङ् आथर्वण ५९ याज्ञवल्क्य ६१ कठोपनिषद्-नचिकेत व यम यांचा संवाद ६४ सृष्टयुत्पत्तीची काहणी ७४ नीतीचा व साधनमार्गांचा उपदेश ७७ ब्रह्मविद्येचा आनंद ८० उपनिषदांतील कांहीं सूत्रें ८४

३ भगवद्गीताः-स्वधर्मकर्म ८७ मोहनिरास हा गीताशास्त्राचा हेतु ८८ ज्ञानोत्तरभक्ति हें गीतेचें रहस्य ९१ गीता आणि उपनिषदें १०५ गीताभागवतांतील नवविधाभक्ति १०८

४ श्रीमद्भागवतः-गीता आणि भागवत १११ भागवतपुराण ११२ भागवताचा काल ११३ अभेदाची बैठक ११६ भागवतांतील मुख्यविषय ११८ श्रीकृष्णाचा संसार १२१ भक्तीचें स्वरूप १३१ उत्तम भक्त १३५ भगवंताच्या रूपाचें ध्यान १३६ गुणानुवाद व नामसंकीर्तन १४१ संत व सत्संगाची महती १४६ भागवतधर्माचीं मुख्य तत्वें १४९ गोपींचें भक्तिप्रेम १५५

५ भक्तिमार्गाचें अनादित्व व शिवविष्णुसंप्रदायः-भक्तिमार्गाचें औदार्य १६५ भक्तिमार्ग वेदांत आहे १६६ पंचरात्रमत व भागवतधर्म १६९ शिवविष्णु ह्या देवता वैदिक आहेत १७१ शिवविष्णूची एकात्मता १७७

६ मधल्या काळाचा थोडा इतिहासः— ब्राह्मण व क्षत्रिय १८१ अवनतीस आरंभ १८४ गौतमबुद्ध व महावीर १८५ वैदिक धर्मांचे सिद्धांत १८७ बौद्ध व जैन पंथ १९० मौर्य चंद्रगुप्त १९१ अशोक १९३ अशोकाचे आदेश १९५ पुष्पमित्र व विक्रमादित्य १९९ समुद्रगुप्त, चंद्रगुप्त व गुप्तसाम्राज्य २०१ हूणांच्या टोळधाडी २०५ सम्राट् हर्षवर्धन २०६ सातव्या शतकांतल्या हिंदुसमाजाची स्थिति २०९ काश्मीर, कनोज, धार इ० हिंदु राज्यें २१५ टोळधाडी व त्यांचा प्रतीकार २२० बुद्धपंथाचें परदेशीं प्रयाण २२३

७ तामीळांचें साम्राज्य, तामीळ संत व तामीळ आचार्यः- तामीळांची श्रेष्ठ कामगिरी २२७ करिकेल चोळ २२९ चोल राजे २३० चोलांची राज्यव्यवस्था २३४ पांड्य, चेर व पल्लव २३६ तामीळांचीं अजस्र शिल्पकामें २३८ तामीळ वाङ्मय २३९ बारा अळवार उर्फ वैष्णव २४२ नम्माळवार २४६ तिरुज्ञानसंबंदर २५० अप्पर २५४ संबंदर व अप्पर २५६ सुंदरमूर्ति २५८ माणिक्कवासहर २५९ तिरुमुलर २६४ प्रेममूर्ति नंद २६५ कुमारीलभट्ट २७४ शंकराचार्य २७६ शंकराचार्यांची कामगिरी २७९ आचार्यांची ग्रंथसंपत्ति २८२ रामानुजपंथाचे आचार्य २८६ शंकराचार्य व रामानुजाचार्य यांचीं मतें २९१ मध्वाचार्य २९५ तीनही आचार्यांचें मतैक्य २९८

## उत्तरार्ध

८ महाराष्ट्रदेश व मराठेलोकः-दण्डकारण्य ३०१ महाराष्ट्राच्या चतुःसीमा ३०५ राष्ट्रकूट व शालिवाहन ३०८ पुलकेशी चालुक्य ३१४ पुन्हा राष्ट्रकूट ३१६ उत्तर चालुक्य ३१९ ठाण्याचे शिलाहार उर्फ शेलार ३२१ छोटीं मराठीं संस्थानें ३२३ देवगिरीचे यादव ३२५ भिल्लम व सिंघण ३२६ विद्या व कला यांना प्रोत्साहन ३२७ कृष्णदेव, महादेव व रामदेवराव ३२९ हेमाद्री व बोपदेव ३३१ पंढरपूरचा कृष्णभक्तिसंप्रदाय ३३५ ज्ञानेश्वरांनीं केलेले रामदेवरावांचें गौरव ३३७ स्वराज्याचें सुख ३३८

९ महाराष्ट्री उर्फ मराठी भाषाः-देशी भाषांचा उगम ३४३ वररुचीचें व्याकरण ३४६ हालाची सप्तशती ३४८ कर्पूरमंजरी ३५२ मराठी भाषा बनत होती, ३५४ मुकुंदराज व मराठी भाषा ३६० महानुभाव व मराठी भाषा ३६३ ज्ञानेश्वरांची मऱ्हाठी--साहित्य आणि शांति ३६७ संस्कृतच्या बरोबरीची मऱ्हाठी ३७० मऱ्हाठी शांतरसाचें घर ३७२ मऱ्हाठी वाङ्मय हें आनंदाचें आवार आहे ३७५ ग्रंथरचनेचा हेतु व सविनय समाधान ३७७ जुन्या काव्यांच्या प्रती ३८०

१० आदिकवि मुकुंदराजः—कालगणना ३८९ गुरुपरंपरा ३९२ ग्रंथरचना ३९५ विवेकसिंधु ३९६ परमामृत ४०१ वेदांत व राजयोग ४०६ सगुणोपासना ४९

११ महानुभावपंथाचें मराठी वाङ्मयः--पंथाचे संस्थापक व प्रचारक ४१२ महानुभावपंथाचे आचारविचार ४१६ पंथाविषयीं लोकांत अप्रियत कां? ४२४ सात प्रमुख ग्रंथ ४२६ कवीश्वर भास्कराचा 'शिशुपालवध' ४२७ भास्कराचा एकादशस्कंध ४४० भास्करकवीचें कृष्णचरित्रपर गद्यपद्यादि ग्रंथ ४४३ महदंबेचे धवळे ४४६ चक्रधराची दिनचर्या ४५२ केशवराज सूरि ४५५ दामोदर-

पंडिताचें 'वत्सहरण' ४५६ नरेंद्राचें रुक्मिणीस्वयंवर ४६६ ज्ञानप्रबोध ४६५ ऋद्धिपूरवर्णन ४७१ महानुभावपंथ व वारकरीपंथ ४७४

१२ नाथपरंपरा — नाथपरंपरा ४८१ गोरक्षनाथ ४८२ नाथपंथाचीं मतें ४८४ नाथपंथाचा महाराष्ट्राशीं संबंध ४८५ गोरक्षनाथांचें कवित्व ४८८ गहिनीनाथांचा बोध ४९१ निवृत्तिनाथांचा गुरुपरंपरेचा अभंग ४९३ गुरुपरंपरेविषयीं ज्ञानेश्वरांच्या ओव्या ४९४

१३ श्रीज्ञानेश्वरदर्शन:— कालानुक्रम ४९७ ज्ञानेश्वरांचीं दोन जुनीं चरित्रें ४९९ नामदेवांनीं वर्णिलेलें चरित्र ५०१ सत्यमलनाथलिखित ज्ञानेश्वर-चरित्र ५०६ ज्ञानेश्वरांचें आत्मचरित्र ५११ पूर्वील ग्रंथांचे संस्कार ५१७ श्रीगुरु-निवृत्तिनाथ ५२३ ज्ञानेश्वरांची गुरुभक्ति ५२९ कृष्णार्जुनप्रेमप्रसंग ५३६ समकालीन संतांची ज्ञानेश्वरनिष्ठा ५४२ भक्तीचा जिव्हाळा व हृदयाची प्रेमलता ५४५

१४ भक्त नामदेव ( पूर्वार्ध ) :- नामदेवांच्या अभंगांची गाथा ५५३ नामदेव ५५५ पंढरीक्षेत्र व विठ्ठलभक्ति ५५८ प्रेमाचा रुसवा ५६५ भक्तीचें प्रेम-सुख ५६७ खऱ्याखोट्याची निवड ५६९ नामदेवांच्या वाणीची गोडी ५७२ पहिला शिष्य परिसाभागवत ५७३ ज्ञानेश्वरनामदेवांच्या तीर्थयात्रा ५७७ गोरा कुंभार ५८२ कच्चा घट ५८४ गुरु विसोबाखेचर ५८५ नामदेवांच्या घरची मंडळी ५८९

१५ संतमेळा व त्याचें अभंगवाङ्मय:— प्रास्तविक ५९५ ओवी व अभंग ५९६ ज्ञानेश्वरीकारांचेच अभंग आहेत. ५९७ 'बाप रखुमादेवीवर' ६०१ ज्ञानेश्वरांची अभंगवाणी ६०२ 'गोपाळेंविण नुद्धरिजे' ६०८ 'आवडे तें करिसी देवा' ६१२ आंधळा, घोंगडी, काऊ ६१३ हरिपाठाचे अभंग ६१७ मुक्ताबाई ६१० ताटीचे अभंग ६१२ मुक्ताबाई व चांगदेव ६२३ जनाबाई ६२६ जनाबाईची प्रेमळवाणी ६३१ मुक्ताबाई व जनाबाई ६३४ सोपानदेव ६३७ सच्चिदानंद बाबा ६३८ कान्हू पाटक ६३९ सेना न्हावी ६४० नरहरि सोनार ६४३ सावता माळी ६४५ जगमित्र नागा ६४६ जोगा परमानंद ६४८ चोखामेळा ६५१ वैष्णवांचा मेळा ६५७ दहीकाल्याचा प्रसाद ६३८

१६ ज्ञानेश्वरीचें अंतरंग:--साहित्याची शोभा ६६१ उपमारूपकादि अलंकारांची गर्दी ६६२ गीतेची थोरवी ६७२ अठरा अध्यायांतील विषय ६७४ ज्ञानेश्वरींत मुख्य पातंजलयोग नाहीं, अध्यात्मयोग आहे ६७६ जितेंद्रियता ६८० कर्मयोग ६८३ ज्ञानयोग ६८७ ज्ञानाची किंवा दैवीसंपत्तीचीं लक्षणें ६९१ अज्ञा-नाचीं किंवा आसुरीसंपत्तीचीं लक्षणें ६९५ धर्मनष्टांचे आचारविचार ६९७ भक्ति-योग ६९९ अद्वैतभक्तीचें स्वरूप ७०६ परमात्म्याची व्यापकता ७०७ पुरुषोत्तमाची

भक्ति ७१० कर्माची हातवटी ७११ ज्ञानभक्तीची पराकाष्ठा ७१४ खरी शरणागति ७१७ परमरहस्य ७१९ अमृतानुभव ७२४

१७ ज्ञानेश्वरी सृष्टीः— आध्यात्मिक दृष्टि व आधिभौतिक सृष्टि ७३९ राजकीय परिस्थिति ७४० व्यापार व उद्योगधंदे—मोतीचौक ७४३ व्यापार व उद्योगधंदे—बाजारपेठा ७४६ शेती व बागाईत ७५० रोग, रोगनिवारण व वैद्य ७५३ नानाप्रकारचे लोक ७५५ लौकिक समजुती ७५८ शास्त्रीय कल्पना ७५९ प्रपंच ब्रह्मरूप आहे. ७६१ पतिपत्नींची एकरूपता ७६२ लग्न व पाहुणे ७६६ भोजनाचे पदार्थ ७६८ पतिव्रता स्त्री ७६९ अपत्यप्रेम ७७० गुरुभक्ति ७७४ तरुणांचे खेळ ७७५ वृक्षवेली ७७६ पशुपक्षी व कृमिकीटक ७७८ सिंह आणि गाय ७८१ शिकार, पारधी व पोपट ७८५ चकोर आणि चातक ७८७ भ्रमर, चक्रवाक, कासवी व बक ७९० इतर कांहीं प्राणी ७९२

१८ भक्त नामदेव (उत्तरार्ध):--कीर्तनाचा सुखसोहळा ७९७ पंजाबांतील कामगिरी ७९८ ग्रंथसाहेबांतलीं नामदेवांचीं पद्यें ८०० मेलेली गाय उठवली याबद्दल नामदेवांचें पद्य ८०५ नामदेव व नरसी मेहता ८०९

मिळण्याचा पत्ताः--मुमुक्षु कचेरी, नाशीक सिटी.

---

# श्रीएकनाथचरित्र [आवृत्ति चवथी]

१ नाथांचे पणजे भानुदास यांचें चरित्र. २ नाथांचा जन्म व बाळपण ३ नाथांचे गुरु जनार्दनस्वामी. ४ श्रीदत्तकृपा व अनुष्ठान ५ तीर्थयात्रा. ६ नाथांचा गृहस्थाश्रम. ७ गुरुभक्ति. ८ साधुत्वाच्या गोष्टी. ९ नाथ व श्रीखंड्या १० नाथांचे ग्रंथ. ११ अखेर. इतक्या प्रकरणांत नाथांचे पूर्ण चरित्र साधार वर्णिलें असून ‘स्तुतिसुमनांजलि’ नंतर त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उत्कृष्ट अवतरणें दिलीं आहेत. पृ. सं. २८८ किं. ८११.

केसरी—“महाराष्ट्रीय साधुकवींच्या चरित्रांचें व ग्रंथांचें परिशीलन करून त्यांचें हृद्गत साध्या सोप्या पण वाचकांचे मनावर विलक्षण छाप बसविणाऱ्या भाषेंत प्रगट करण्यास ज्या प्रेमळतेची, श्रद्धेची, सहृदतेची व भाषाप्रभुत्वाची जरूरी आहे ते गुण रा. पांगारकर यांचेमध्यें पुष्कळ अंशानें वास करीत असल्यामुळें त्यांची साधुचरित्रमाला महाराष्ट्रांत लोकप्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं.”

पत्ताः— मुमुक्षुकचेरी, नाशीक सिटी.

# मराठी वाङ्मयाचा इतिहास–खंड १ ला

## ( १ ) पुणें – ज्ञानप्रकाश ता० ( २।९।३२ )

"मराठी वाङ्मयाचा इतिहास या पुस्तकमालेच्या नांवावरूनच त्याची व्यापकता दिसून येणारी आहे. पुस्तकाला व्यापक नांव देणें कठिण नाहीं पण त्याप्रमाणें करणी करून दाखविणें हेंच काम खरोखर बिकट आहे. त्यास नुस्ता उत्साह असून चालत नाहीं. त्या उत्साहाचें रम्य चीज होण्यास दीर्घ व्यासंग व प्रशंसनीय विद्वत्ता यांची अवश्य जोड लागते व हे सर्व गुण रा. पांगारकर यांच्या अंगीं पूर्णतेनें वसत आहेत याबद्दल समंजस माणसांत मतैक्यच होईल असा आह्मांस भरवसा वाटतो रा. पांगारकर यांचा मराठी भाषेचा व्यासंग अनेक वर्षांचा आहे किंबहुना त्यांनीं तें आपलें जीवितकार्यच केलें आहे असें म्हटलें असतांही चालेल. आजपर्यंत त्यांनीं मराठी वाङ्मयास व पर्यायानें त्याच्या इतिहासास साहाय्यक किंवा उपकारक होणारीं अशीं अनेक वाचनीय पुस्तकें लिहिलीं आहेत, पण त्यांचा प्रस्तुतचा प्रयत्न हा त्या सर्वांच्या शिरोभागी बसविण्यासारखा आहे. यांत मराठी भाषेची उत्पत्ति व विकास यांचा केवळ जंत्रीवजा वृत्तांत दिला नसून प्रत्यक्ष पुस्तक पाहिल्यावर कर्त्याची इतिहासदृष्टि फार व्यापक व पल्लेदार असल्याचें दिसून येईल. आपण केलेल्या दीर्घव्यासंगाचा जनतेस खरोखरीच योग्य उपयोग व्हावा अशी श्रेयस्कर दृष्टि बाळगूनच त्यांनीं हें पुस्तक अत्यंत परिश्रमशीलतेनें व वाचकांस बहुश्रुत करण्याच्या सदिच्छेनें लिहिलें असल्याचा प्रत्यय येतो ........शेवटच्या प्रकरणांतून ज्ञानेश्वरीचें अंतरंग आविष्कृत केलें आहे. ज्ञानेश्वरीची सर्वतोमुखी स्तुति होत असते, पण प्रत्यक्ष वाचणारे थोडे. ज्ञानेश्वरी ह्म० काय चीज आहे हें यांतील प्रकरणांवरून उत्कृष्ट दिसून येणारें आहे. ज्ञानेश्वरींतील प्रतिपाद्य विषय हृद्य व मनोरम रीतीनें ह्या ग्रंथांत वर्णन केले आहेत. ग्रंथकर्त्यांचा ज्ञानेश्वरीचा व्यासंग जसा उत्कृष्ट दृष्टोपत्तीस येतो त्याप्रमाणेंच रम्य स्थळें निवडून काढण्यासंबंधांतील त्यांची रसिकताही निदर्शनास येते...... ज्ञानेश्वरीची दृष्टि आध्यात्मिक असली तरी त्या दृष्टींत आधिभौतिक सृष्टिही कशी सामावली आहे हें १७ व्या प्रकरणांत सविस्तर दाखविलें आहे. त्यावरून तत्कालीन परीस्थितीवर जसा उत्कृष्ट प्रकाश पडतो त्याप्रमाणेंच ज्ञानेश्वर महाराजांची सर्वव्यापी किंवा सर्वंकष निरीक्षणशक्ति दृग्गोचर होते......तात्पर्य हा ग्रंथ ऐतिहासिक दृष्टीनें सर्वस्वी वाचनीय असा झाला आहे. एवढ्या काळाचा सुसंगत असा इतिहास लिहिण्याचा रा. पांगारकर यांनीं संकल्प करून त्यांतला पहिला खंड —

पुढील खंडही उत्कृष्ट निवतील अशी ग्वाही देणाऱ्या स्वरूपांत --काढला याबद्दल त्यांचें कोणीही प्रशंसापूर्वक अभिनंदनच करील. त्या काळचा श्रद्धापूर्वक कोणास अभ्यास करावयाचा असल्यास हा ग्रंथ जसा उपकारक ठरणार आहे, तसाच त्याचा चिकित्साबुद्धीनें अभ्यास करणारांसही तो अनेक रीतींनीं साहाय्यक होणार आहे, किंबहुना अशा व्यापक व सर्वोपयोगी विषयास ग. पांगारकर यांच्यासारखा परिश्रमशील, पर्युत्सुक व पारंगत असा ग्रंथकार लाभला हें मराठी वाङ्मयाचें सुदैवच समजलें पाहिजे. पुढील खंड लवकर प्रकाशित होवोत असी प्रस्तुत खंडाची शोभन मांडणी पाहून कोणीही सदिच्छा करील.'

## ( २ ) नागपूर—महाराष्ट्र ( ता. ३१।७।३२ )

" विद्वत्तेच्या, भाषाप्रभुत्वाच्या आणि ग्रंथकर्तृत्वाच्या दृष्टीनें ज्यांना मराठी वाङ्मयाच्या निरनिराळ्या शाखांचे आचार्य म्हणतां येईल अशा श्रेष्ठ लेखकांत श्री. पांगारकर यांची गणना होते. मराठी प्राचीन काव्यांचें त्यांच्याइतकें व्यापक आणि नैष्ठिक अध्ययन केलेला पंडित आज महाराष्ट्रांत प्रायः एकही सांपडणार नाहीं. प्राचीन कवींचा व्यासंग, त्यांच्या ग्रंथांच्या आणि विचारांच्या भूमिकेशीं समरस होऊन, केलेला बहुश्रुत ग्रंथकार आज महाराष्ट्रांत पांगारकराशिवाय एकही नाहीं .... त्यांच्या परिशीलनाची व्याप्ती आणि ग्रंथलेखनही इतर ग्रंथकारांपेक्षा क्वचित अधिक विस्तृत आहे......भावे यांच्या 'महाराष्ट्रसारस्वतापेक्षा' हा ग्रंथ सर्वच दृष्टीनीं अधिक भरदार आहे... पाश्चात्य वाङ्मयाच्या इतिहासांतून त्या त्या काळच्या घडामोडी व त्यांचे वाङ्मयावरील परिणाम यांचें ज्याप्रकारचें विवरण आपण वाचतों त्या प्रकारच्या विवेचनाचा अल्पांशही भावे यांच्या ग्रंथांत दृष्टीस पडत नाहीं; श्री. पांगारकर यांचा ग्रंथ त्या मानानें किती तरी अधिक समावेशक असून, त्यांत प्राचीन मराठी वाङ्मयाची भूमिका विशद करण्यासाठीं त्यांनीं अतिशय परिश्रम घेतले आहेत...श्री. पांगारकर यांनीं ग्रंथाच्या पूर्वार्धांत वैदिक उपनिषद्वाङ्मय आणि दुसऱ्या बाजूनें तामील वाङ्मय यांचा विस्तारानें केलेला प्रपंच समर्थनीयच वाटतो. ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी यांच्याविषयीं २५० पृष्ठांत जें विवेचन केलें आहे त्यांत श्री. पांगारकर यांच्या अध्ययनाचा परिपाक सांठविला आहे......मराठी भाषा आणि प्राचीन मराठी वाङ्मय यांची भूमिका परिश्रमपूर्वक व मार्मिकतेनें विशद केलेली असून मुकुंदराज, ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या काव्यांचें विवेचन अत्यंत सरस केलें आहे. मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना प्रस्तुत ग्रंथ म्हणजे एक वरदानच वाटेल."

## नवाकाळ—मुंबई ( ता० १५।९।३२ )

"श्री. पांगारकर यांच्या वाङ्मयसेवेचा परिचय नव्यानें करून देण्याची आवश्यकता नाहीं. संतवाङ्मयाचा व संतचरित्राचा अभ्यास या कार्याला त्यांनीं स्वतःला गेलीं ३०।३५ वर्षें वाहून घेतलें आहे व त्या कार्यांत त्यांनीं मोठा अधिकार संपादन केला आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, यांचीं चरित्रें त्यांनीं लिहिलीं असून तीं सर्वमान्य झालीं आहेत...... ह्या खंडाच्या पूर्वार्धानें ३०० पानें व्यापलीं असून त्यांत भागवतधर्माचा स्वतंत्र इतिहास गोंवला आहे. मराठी वाङ्मयाच्या विकासाचें कारण जो भागवतधर्म त्याची इत्थंभूत माहिती वेदकाळापासून तों अर्वाचीन परंतु ऐतिहासिक आचार्यादिकांपर्यंत पूर्वार्धांत दाखल केली आहे...उत्तरार्धाच्या ५०० पानांत महाराष्ट्रभाषेच्या इतिहासाला प्रारंभ होऊन ज्ञानेश्वरनामदेवादिकांच्या कालाअखेर आणून सोडला आहे. नामदेव आणि इतर तत्कालीन साधुसंत यांच्याहून स्वाभाविकपणें ज्ञानेश्वरसंबंधी विवेचनानें उत्तरार्धाची मोठी जागा घेतली आहे. रा. पांगारकरांचा ज्ञानेश्वरविषयक अभ्यास दीर्घकालीन असून त्याचा परिपाक ह्या ग्रंथांत अनेक प्रकारें उतरलेला आहे....ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाचा अभ्यास करणारांना श्री. पांगारकरांच्या ग्रंथांत विविध विषयांच्या विवेचनाची रेलचेल आढळेल, त्यांतल्या त्यांत 'ज्ञानेश्वरीचें अंतरंग' व 'ज्ञानेश्वरी सृष्टि' हीं दोन प्रकरणें सरस साधलीं असून वाचकांनीं श्रीयुत पांगारकरांच्या ग्रंथांतून वेदांत विषयाच्या मनोहर निरूपणांत झांकलेली ज्ञानेश्वरकाळांतील समाजदृष्टि निराळी दाखविली आहे. हें प्रकरण ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांना अभिनव वाटेल. भागवतधर्माच्या बैठकीचा विसर पडून व परंपरेला दृष्टीआड टेवून इतर कांहीं साहित्याचे इतिहास उपलब्ध आहेत, पण तीं न्यूनें भरून काढण्याचा प्रयत्न श्री. पांगारकरांनीं केला आहे व त्यामुळें त्यांचा हा इतिहास पुष्कळसा सुसंगत वाटतो. श्री. पांगारकरांच्या भाषाशैलीबद्दल निराळें लिहिण्याची गरज नाहीं. मधुर व प्रेमळ भाषाशैलीबद्दल त्यांची ख्याति आहे. छपाई स्वच्छ व बाइंडिंग मजबूत. किंमत रुपये चार अत्यंत माफक म्हणावी लागते. पुढील संकल्पित भाग लवकर बाहेर पडतील असा भरंवसा आहे."

---

## मारुतीउपासना.

प्रथम मारुतिरायांचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपी स्तोत्रें अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी

किं ८४ पत्ताः—मुमुक्षु कचेरी, नाशीक सिटी.

# सार्थ सुभाषित रत्नखंडें.

भाषांतरकार—श्रीराम गोसावी, नाशीक.

१८१ धिगाशा सर्वदोषभूः

सर्व दोषांना उत्पन्न करणारी जणूं जमीनच, अशा या आशेला धिक्कार असो.

१८२ धिगिमां देहभृतामसारताम्

आपण देहवान् जीवांच्या असारतेकडे पाहिले म्हणजे तिला धिक्कार असो, असें वाटतें.

१८३ धिग्जीवितं चोद्यमवर्जितस्य

उद्योगधंदा नसलेल्या बेकार जीविताचा धिःकार असो.

१८४ धिग्जीवितं शास्त्रकलोज्झितस्य;

शास्त्र नाहीं, एकादी सुंदर कला नाहीं, अशा आयुष्याला धिक्कार असो

१८५ न कामसदृशो रिपु:

कामदेवासारखा दुसरा शत्रु नाहीं.

१८६ न कूप खननं युक्तं प्रदीप्ते वन्हिना गृहे.

घर अगीनें भडकल्यावर आड खणायला लागणें शहाणपणाचें नाहीं.

१८७ न च व्याधिसमो रिपुः

रोगासारखा शत्रु नाहीं.

१८८ न दरिद्रस्तथा दुःखी लब्धक्षीणधनो यथा.

असलेले पैसे घालवून दरिद्री झालेला जितका दुःखी असतो तितका सततचा दरिद्री नसतो.

१८९ न नश्यति तमो नाम कृतया दीपवार्तया.

दिव्याच्या गोष्टी केल्या म्हणजे अंधार जात नाहीं.

१९० न शरीरं पुनः पुनः

पुनः पुनः कांहीं हें शरीर मिळत नाहीं.

१९१ न धर्मवृद्धेषु वयः समीक्ष्यते.

धर्मानें जे वृद्ध आहेत. त्यांचे वय पाहिलें जात नाहीं.

१९२ ननु वक्तृविशेषनिस्पृहा गुणगृह्या वचने विपश्चितः

वक्त्याच्या व्यक्तिविषयक गोष्टीकडे दुर्लक्ष करून त्यांच्या शब्दांतील गुण तेवढेच शहाणे लोक घेतात.

१९३ न प्राणान्ते प्रकृतिविकृतिर्जायते चोत्तमानाम्
जे उत्तम लोक असतात, त्यांच्या चांगल्या स्वभावात प्राण गेला तरी वाइटपणा येत नाहीं.

१९४ न भयं चास्ति जाग्रतः
जो जागा आहे, त्याला भय नाहीं.

१९५ न भवति पुनरुक्तं भाषितं सज्जनानाम्
सज्जन लोक बोललेलीच गोष्ट पुनः पुनः बोलत नाहींत.

१९६ नये च शौर्ये च वसंति संपदः
जेथें नीती आणि शौर्य आहे तेथें संपत्ति राहाते.

१९७ न रत्नमन्विष्यति मृग्यते हि तत्
रत्न हें कोणाचा शोध करीत नाहीं तर लोक त्याचा पाठलाग करतात.

१९८ न वैराग्यात्परं भाग्यम्
वैराग्यासारखें भाग्य नाहीं.

१९९ न शान्तेः परमं सुखम्
शान्तीपेक्षा मोठें सुख नाहीं.

२०० नहि सर्वविदः सर्वे
सर्वज्ञ असे कोणी नाहींत.

२०१ न सुवर्णे ध्वनिस्तादृग्यादृक्कांस्ये प्रजायते.
कासे हलकें म्हणून त्याचा आवाज मोठा, तसा आवाज सोन्यालाही नाहीं.

२०२ न सा सभा यत्र न संति वृद्धाः
जेथें अनुभवी वृद्धजन नाहींत ती सभा कसली ?

२०३ न स्पृशति पल्वलांभः पंजरशेषोऽपि कुंजरः क्वापि.
केवळ अस्थिपंजर झाला म्हणून हत्ति कधीं डबक्यांच्या पाण्याला शिवणार नाहीं.

२०४ न स्वेच्छं व्यवहर्तव्यमात्मनो भूतिमिच्छता
आपलें कल्याण व्हावें, असें इच्छिणाऱ्या मनुष्यानें स्वेच्छाचारी बनू नये.

२०५ नहि कृतमुपकारं साधवो विस्मरंति
केलेला उपकार चांगले लोक विसरत नाहीं.

२०६ निर्धनस्य कुतः सुखम्

दरिद्र्याला सुख कोठलें ?

२०७ नानृतात्पातकं परम्

खोटेपणासारखें मोठें पाप नाहीं

२०८ नहि नार्यो विनेर्ष्यया

मत्सराशिवाय स्त्री नाहीं.

२०९ निर्विमर्शा हि भीरवः

अविचारी लोकच भ्याड असतात.

२१० नहि विचलति मैत्री दूरतोऽपि स्थितानाम्

दूर राहण्याची पाळी आली म्हणून खरी मैत्री कांहीं कमी होत नाहीं.

२११ नहि सुप्तस्य सिंहस्य प्रविशंति मुखे मृगाः

सिंह मोठा, पण ताणून झोंपत राहिला, तर त्याच्या तोंडांत कांहीं हरणें जाऊन पडत नाहींत.

२१२ नासमीक्ष्य परं स्थानं पूर्वमायतनं त्यजेत्

दुसरी जागा नीट पाहून ठेवल्याशिवाय पहिले घर सोडू नये,

२१३ नास्ति धात्मसमं बलम्

धैर्यासारखें दुसरें बल नाहीं.

२१४ निःसारस्य पदार्थस्य प्रायेणाडम्बरो महान्

सर्व साधारण फोल पदार्थांचेंच अवडंबर फार माजतें.

२१५ निर्वाणदीपे किमु तैल दानम्

दिवा विझून गेल्यावर तेल घालण्यांत काय अर्थ आहे?

२१६ निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु सतामेतद्धि गोत्रव्रतम्

२१७ निवसंति पराक्रमाश्रया न विषादेन समं समृद्धयः

भरभराट ही पराक्रमाच्या आश्रयानें राहात असतें रडण्याच्या नव्हे.

२१८ निवृत्तरागस्य गृहं तपोवनम्

एकादां आसक्ति गेली म्हणजे घर सुद्धा तपोवनासारखेंच आहे.

२१९ निसर्गः स हि धीराणां यदापत्यधिकं दृढम्

खऱ्या धीरांचा स्वभावच हा कीं जों जों आपत्ति अधिक तों तों यांचे धैर्यही अधिक आणि जोरदार !

२२० निसर्गतो ऽन्तर्मलिना ह्यसाधवः

वाईट लोकांचीं अंतः करणेंच मुळांत खराब असतात.

२२१ नीचाश्रयो हि महतामपमानहेतुः

हलकट माणसाचा आश्रय हा मोठ्यांच्या अपमानाला कारण होतो.

२२१ नीचो वदति न कुरुते वदति न साधुः करोत्येव

हलका माणूस नुसता बडबडतो, करीत कांहीं नाहीं तोच चांगला मनुष्य बोलत नाहीं पण करून दाखवितो.

२२३ नैकत्र सर्वो गुणसंनिपातः

सगळे गुण कांहीं एकत्र सांपडत नाहीं.

२२४ न्याय्यात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः

धीर माणसे न्याय्यमार्गावर एकदा ठेवलेलें पाऊल कधीं सरकवीत नाहींत.

२२५ पंको हि नभसि क्षिप्तः क्षेप्तुः पतति मूर्धनि

आकाशावर चिखल उडविला तर उडविणाराच्याच टाळक्यावर तो पडायचा !

२२६ पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनम्

सापांना दुध पाजणें म्हणजे विषाची पैदास करणें होय.

२२७ परदुःखेनापि दुःखिता विरलाः

दुसऱ्याच्या दुःखानें खरे दुःखी होणारे फार थोडे. (सोंग करणारे पुष्कळ)

२१८ परबुद्धिर्विनाशायः

आपल्या कामांत दुसऱ्याची बुद्धि स्वीकारल्यास नाशाला कारण होते.

२२९ परलोकजुषां स्वकर्मभिर्गतयो भिन्नपथाहि देहिनाम्

परलोकाचा आश्रय करणाऱ्या आत्म्यांच्या अपापल्या कर्मानुरुप निरनिराळ्या गति होतात.

२३० परसदननिविष्टः को लघुत्वं न याति

परक्याच्या घरांत अडकून पडलें म्हणजे कोणाचा कमीपणा होत नाहीं.

२३१ परहित निरतानामादरो नात्मकार्ये

लोकांच्या कल्याणांत गर्क झालेल्या माहात्म्यांना आपल्या स्वतःच्या गोष्टी विषयीं आदर राहात नाहीं.

२३२ परोपकाराय सतां विभूतयः

सज्जनाच्या शक्ति संपत्ति या परोपकारासाठीं असतात.

२३३ परोपकारार्थमिदं शरीरम्

हें शरीर परोपकारासाठीं आहे.

२३४ परोपदेशवेलायां शिष्टाः सर्वे भवंति हि.
दुसऱ्याला उपदेश करण्याची वेळ आली, म्हणजे सारेजण शिष्ट बनतात.

२३५ पाणौ पयसा दग्धे तक्रं फूत्कृत्य पामरः पिबति
क्षुद्र माणूस दुधानें हात भाजले म्हणून ताक सुद्धां फुंकून पितो.

२३६ पिंडे पिंडे मतिर्भिन्ना.
व्यक्ति तितक्या मति.

२३७ पीत्वा मोहमयीं प्रमादमदिरामुन्मत्तभूतं जगत्.
मोहानें भरलेली प्रमादरूप दारु पिऊन हें सारें जग बेफाम झालें आहे.

२३८ पात्रानुसारं फलं
जशी पात्रता तसें फळ.

२३९ पुण्यैरेव हि लभ्यते सुकृतिभिः सत्संगतिर्दुर्लभा.
पुण्यवान सज्जनांना दुर्लभ अशी सत्संगति प्राप्त होते.

२४० पुत्रादपि भयं यत्र तत्र सौख्यं हि कीदृशम्
प्रत्यक्ष पोटच्या पोरापासून जेथें भीति तेथें सूख कसलें !

२४१ पुनर्दरिद्री पुनरेव पापी
पापामुळें दरिद्री आणि दरिद्री म्हणून पुनः पापी

२४२ पुष्पं पर्युषितं त्यजंति मधुपाः
फूल सुकलें कीं भृंग त्याचा त्याग करितात.

२४३ शुष्कं सरः सारसाः ( त्यजंति )
तळें कोरडें पडलें म्हणजे सारसपक्षी तेथून उडून जातात.

२४४ निर्द्रव्यं पुरुषं त्यजंति गणिकाः
निर्धन झालेल्या पुरुषाला वेश्या टाकून देतात.

२४५ भ्रष्टं नृपं मंत्रिणः ( त्यजंति )
राजा पदच्युत झाला कीं मंत्री त्याला सोडतात.

२४६ सर्वः कार्यवशाज्जनोभिरमते तत्कस्य को वल्लभः
माणूस आपापल्या कार्यानुरूप कोठें तरी रमत असतो कोणी कोणाचा खरा प्रिय आहे ?

२४७ पूर्वपुण्यतया विद्या.
विद्या ही पूर्वपुण्याईनेंच मिळते.

२४८ प्रज्ञानामबलं ह्येवं निष्प्रज्ञस्य बलेन किम्

शहाणपण हेंच खरें सामर्थ्य आणि ते शहाणपण नाहीं तर इतर साम-र्थ्यांचा काय उपयोग ?

२४९ प्रज्ञाबलं च सर्वेषु मुख्य कार्येषु साधनम्
सर्व कार्यांत यशाकडे नेणारें शहाणपणाचें बल हेंच मुख्य साधन आहे.

२५० प्रतिक्षणं यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः
हरक्षणी जें नवीनच वाटते तेंच खरे रमणीयतेचें स्वरूप आहे.

२५१ प्रतिपन्नः सुहृत्कार्यनिर्वाहः धीरसत्वता.
मित्राचे घेतलेलें कार्य तडीस नेणें हा धीरांचा स्वभाव असतो.

२५२ प्रतिपन्नार्थ निर्वाहः सहजं हि सतां व्रतम्
स्वीकृतध्येय सिद्धीस नेणें हें सज्जनांचें सहज व्रत असतें.

२५३ प्रसूतान्तं च यौवनम्
स्त्रीयांचें तारुण्य हें त्या बाळंत होई पर्यंत.

२५४ प्राणिनां हि निकृष्टापि जन्मभूमिः परा प्रिया
निकृष्ठ असली तरी लोकांना आपली जन्मभूमि फार प्रिय असते.

२५५ प्राणेभ्योऽपि हि वीराणां प्रियः शत्रुप्रतिकारः
शत्रूचा प्रतिकार करणें हें शूरांना प्राणापेक्षां सुद्धा गोड वाटतें.

२५६ प्राप्तोऽप्यर्थः क्षणादेव हार्यते मंदबुद्धिना.
मंद बुद्धीचा माणूस मिळालेली वस्तु क्षणात् घालवितो.

२५७ प्रायः श्वश्रूस्नुषयोर्न दृश्यते सौहृदं लोके.
सर्व साधारण या जगांत सासुसुनांत सख्य दिसत नाहीं.

२५८ प्रायः समासन्नविपत्तिकाले धियोऽपि पुंसां मलिनी भवंति
संकटकाल प्राप्त झाला म्हणजे लोकांच्या बुध्या मळीण होतात.

२५९ प्रायेण भूमिपतयः प्रमदा लताश्च्य पार्श्वतो भवति तं परिवेष्टयंति.
साधरणतः राजे, स्त्रिया, आणि वेली या जो कोणी त्याच्या पाठीशी उभा राहील त्याला वेढतात.

२६० प्रायेणाधममध्यमोत्तमगुणः संसर्गतो जायते.
साधारणतः कोणत्याही बाबतीत हलका, मध्यम वा उत्तम गुण येणें हा त्या गोष्टींत ज्याच्याशी आपण संगती ठेवतो त्यावर अवलंबून असते.

२६१ प्रायो गच्छति यत्र भाग्यरहितः तत्रापदां भाजनम्
साधारणतः दुर्दैवी माणूस जेथें जाईल तेथें संकटाचेच घर बनतो.

२६२ प्रायोऽशुभस्य कार्यस्य कालहारः प्रतिक्रिया.

सर्व साधारण अमंगळ गोष्टीचा प्रतिकार तिची वेळ टाळण्यानेच होतो.

२६३ प्रारभ्य चोत्तम जना न परित्यजंति
चांगली माणसें एकादी गोष्ट सुरू केल्यावर तिचा त्याग मध्येंच करीत नाहीं.

२६४ प्रासादशिखरस्थोऽपि काकः किं गरुडायते.
राजवाड्याच्या शिखरावर उंच बसला म्हणून कावळा गरुड थोडाच होतो ?

२६५ प्रियानाशे कृत्स्नं किल जगदरण्यं हि भवति
आपली प्रिया गेली, म्हणजे हें जगत् अरण्यासारखें खरोखर वाटूं लागतें.

२६६ प्रिये सीमाल्हादः
आपला प्रियकर माणूस जवळ असला म्हणजे सुखाला पारावार नसतो; सुखाची सीमा म्हणजे प्रियाची संगति.

२६७ फलं भाग्यानुसारतः
आपल्या दैवाप्रमाणें या जगांत आपणास फळ मिळत असतें. जसें दैव तसें फळ.

२६८ बधिरान्मंदकर्णः श्रेयात्
अगदींच बहिरटापेक्षां थोडें ऐकू येणारा बरा.

२६९ बलवति सति दैवे बंधुभिः किं विधेयम्
दैवानेच बळकट उलट खाल्ली तेथें स्वजन काय करणार ?

२७० बली बलं वेत्ति न वेत्ति निर्बलः
खऱ्या सामाथ्र्याची कल्पना समर्थालाच, अशक्ताला ती कोठून असणार?

२७१ बलीयसी केवलमीश्वरेच्छा
भगवंताची इच्छा हीच खरी बलवान् आहे.

२७२ बहुरत्ना वसुंधरा
ही पृथिवी पुष्कळ रत्नांनीं भरलेली आहे.

२७३ शैले शैले न माणिक्यं
प्रत्येक पर्वतांत कांहीं माणिक सांपडत नाहीं.

२७४ मौक्तिकं न गजे गजे
प्रत्येक हत्तीच्या गंडस्थलांत मोती कांहीं सांपडत नाहीं.

२७५ साधवो नहि सर्वत्र

चांगलीं माणसें सर्व ठिकाणीं मिळत नाहींत.

२७६ चंदनं न वने वने
प्रत्येक वनावनांतून चंदनाचें झाड आढळत नाहीं.

२७७ बहुवचनमल्पसारं यः कथयति विप्रलापी सः
बडबड फार आणि सार थोडें, तो वाचाटच.

२७८ बव्हाश्चर्या हि मेदिनी
ही पृथ्वी हेंच मोठें एक आश्चर्य आहे.

२७९ बुद्धयः कुब्जगामिन्यो भवंति महतामपि.
मोठ्या मोठ्यांच्या बुध्या सुद्धा वाकड्यामार्गाला जातात.

२८० बुद्धिः कर्मानुसारिणी
जसें कर्म करावें तशी बुद्धी होतें.

२८१ बुद्धेः फलमनाग्रहः
आग्रह सुटणें हे बुद्धीचें फल आहे.

२८२ बुभुक्षितः किं न करोति पापम्
भुकेड माणूस काय पाप करणार नाहीं?

२८३ बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते
भूक लागली म्हणजे व्याकरण वाङ्मय, वेदांत हीं कांहीं खातां येत नाहींत.

२८४ ब्रुवते हि फलेन साधवो न तु कंठेन निजोपयोगिताम्
स्वतांचा उपयोगी पडण्याचा गुण चांगले लोक तोंडानें बोलून दाखवीत नाहींत, तर प्रत्यक्ष उपयोगी पडण्यानें सांगतात.

२८५ भक्त्या हि तुष्यंति महानुभावाः
महात्मे हे भक्तीनें संतोष पावतात.

२८६ भजंति वेतसीं वृत्तिं राजानः कालवेदिनः
काल जाणून वागणारे राजे नम्रतेचा अंगीकार करतात.

२८७ भये सीमा मृत्युः
भयाची पराकाष्ठा म्हणजे मरण.

२८८ भवन्त्युदय काले हि सत्कल्याणपरंपराः
उदयकाल प्राप्त झाला म्हणजे कल्याणमय गोष्टींची परंपराच लागून राहते.

२८९ भवितव्यता बलवती
दैव हें बलवान् आहे.

२९० भवितव्यं भवत्येव कर्मणामीदृशी गतिः
जें व्हावयाचें तेंच होते, कर्माची गति ही अशी आहे.
२९१ भवितव्यानां द्वाराणि भवंति सर्वत्र.
होणाऱ्या गोष्टींना सर्व बाजूनें येण्याचीं दारें असतात.
२९२ भवेन्न यस्य यत्कर्म स तत्कुर्वन्विनश्यति
ज्याचें जें काम नाहीं त्यानें तें केल्यास त्याचा त्यांत नाश होतो. जेनो काम तेने थाय बीजा करे सो गोता खाय
२९३ भिक्षुको भिक्षुकं दृष्ट्वा श्वानवद्गुर्गुरायते
एका भिकाऱ्याला पाहून दुसरा भिकारी कुत्र्यासारखा गुर्गुरु लागतो.
२९४ भीता इव हि धीराणां यांति दूरे विपत्तयः
धीर माणसांपासून संकटें हीं भ्यालेल्यासारखीं पळून जातात.
२९५ भोगो भूषयते धनम्
उपभोगानें धनाला शोभा येते.
२९६ मतिरेव बलाद्गरीयसी
नुसत्या बलापेक्षा मती हीच मोठी आहे.
२९७ मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः
बंध किंवा मोक्ष याला कारण माणसांचें मनच होय.
२९८ मनस्येकं वचस्येकं कर्मण्येकं महात्मनाम्
मोठ्या लोकांच्या जे मनांत, तेंच वाणींत आणि तेंच कृतीत.
२९९ मनस्यन्यद्वचस्यन्यत्कार्ये चान्यदुरात्मनाम्
दुष्टलोकांच्या मनांत एक तर वाणींत दुसरेंच आणि कृती पुनः भलतीच!


## कविवर्य मुक्तेश्वर ( चरित्र आणि काव्यविवेचन )

ह्या ग्रंथांत श्रीएकनाथमहाराजांचे नातू मुक्तेश्वर यांचें चरित्र, त्यांची कविता, त्यांचें महाभारत, मुक्तेश्वरी भारतांतील विशेष गुणः — सुंदर आख्यानें, भक्तिरस, वीररस, शृंगाररस इ. कांचीं उदाहरणें, सृष्टिवर्णनें, स्वभावचित्रें, कुस्त्यांचीं वर्णनें, त्यांच्या वेळची पाकसिध्दी, मुक्तेश्वरांच्या काव्यांत इतस्ततः विखुरलेलीं नीतितत्त्वें, महाभारताचे अन्य मराठी अवतार इ० विशिष्ट गोष्टी विपुल अवतरणांसह दिलेल्या आहेत. मुक्तेश्वरांची पूर्ण ओळख वाचकांस या एका ग्रंथावरून होईल व सुंदर काव्य व उज्ज्वल नीतिबोध यांचा एकदम लाभ होईल. 'मुक्तेश्वरनीति-रत्नमाला' ही शेवटी जोडली आहे पृ. सं १४४ किं. रु. १

पत्ताः— मुमुक्षुकचेरी, नाशीक सिटी.

# ईश—स्तवन

( वृत्त—ओव्या )

ॐ नमोजी भगवंता । तुझी चराचरी सत्ता ।
म्हणौनिचरणीं माथा । सद्भावें ठेविला ॥ १ ॥
तूंचि गणांचा नायक । नाम पावला गणनायक ।
सारस्वत व्यापक जगदुद्धार ॥ २ ॥
तूंचिसद्गुरु नाथ माउली । कृपेची करो साउली ।
धेनुवत्सा ओळखी जैशी तैशीच ॥ ३ ॥
तव महिमा वर्णिता । शेष पडे पालथा ।
ब्रह्माही शिणे सर्वथा जिव्हा चिरल्या ॥ ४ ॥
वेद होती मुके । शास्त्रें बोलूं न शके ।
एक मेका पारखे । जाहले जगीं ॥ ५ ॥
त्रीनयनीं सदाशिव । तोही जाहला निगर्व ।
तव गती अपूर्व । गुरुराव ॥ ६ ॥
मी तव अज्ञान । मंद मतिहीन ।
हीन पामर जाण । काय करूं ॥ ७ ॥
सारस्वत मंदिरी । ज्ञान-दीप्ती विखुरली ।
तेच दीप्ती भली । लाभो मज ॥ ८ ॥

चिं० रा० जगताप.

# अस्पृश्यता आणि साधुसंत.

( ले.—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, नाशिक. )

ता. ११ च्या केसरींत 'महात्माजी व अस्पृश्यता' हा माझा लेख प्रसिद्ध झाल्यापासून केसरीच्या कांहीं वाचकांची मजकडे संमतीचीं पत्रें आलीं आहेत. वर्तमान कालावर भिस्त देऊन समाजधुरीणांनी अस्पृश्यता-निवारणाचे दांडगे प्रयत्न चालविले आहेत व गांधी जींच्या उपवासापासून ह्या प्रयत्नांस ऊत आला आहे. तोहि कालानें थंडावत चालला आहे! ह्या झगड्यांतून कांहीं तरी चांगली गोष्ट निष्पन्न होऊन समाज मध्यबिंदूवर आलाच पाहिजे. ४० वर्षांपूर्वीं पुण्याच्या हिराबागेंत कै. न्या. रानडे यांचें The Spitit of the Times or Corrent of Public Opinion all over the World. असल्या विषयावर एक व्याख्यान झालें होतें व त्या वेळीं क्षितिजावर नुकत्याच उदय पावणाऱ्या लो. टिळकांनी रानड्यांच्या नवीन मतप्रवर्तनावर सणसणीत टीका केली होती. टिळकांच्या व्याख्यानाचा सारांश असा होता कीं, "जगभर विचारांचे कांहींहि वारे वाहत असले तरी आपल्या राष्ट्राची पूर्वपरंपरा ध्यानांत ठेवून आपलें विशिष्टत्व नष्ट होणार नाहीं अशा रीतीने त्या नवविचारांच्या ओघास प्रतिरोध करणें ( 'To stem the Tide' ) हें आपलें कर्तव्य आहे व ओघाबरोबर वाहत जाण्यापेक्षा अशा अनिष्ट ओघास थोपवून धरणें यांतच अधिक पुरुषार्थ आहे." प्रत्येक चळवळींत जो कांहीं ग्राह्यांश असेल तो अवश्य घेतला पाहिजे. पण निजरूप अगदीं पालटून जाईल व पूर्वरूपाची ओळखहि राहणार नाहीं इतकें त्यांत रूपांतर होणें म्हणजे तें मरणच होय.

## हिंदुधर्म वर्णाश्रमधर्मनिष्ठ आहे.

हिंदु-धर्मांत अनेक शतकांपासून अनेक जाति आहेत व त्या परस्परांशीं सलोख्यानें व प्रमाने वागत आल्या आहेत. रोटी-बेटी व्यवहार एकत्र होत नसला तरी सर्व जाति गुण्यागोविंदानें व आनंदाने नांदत आल्या आहेत. ह्युएन-त्संग ह्या चिनी प्रवाशाने इ. स. ६३० ते ६४५ पर्यंत हिंदुस्थानचा प्रवास करून आपलें प्रवासवृत्त लिहून ठेवलें आहे. त्यांत तो म्हणतो, "ह्या देशांत आनुवंशिक संस्काराचे चार वर्ण आहेत. ते ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे होत. त्यांत ब्राह्मण हे अति शुद्ध व सर्वांनाच पूज्य आहेत. क्षात्रियांचा वर्ग दुसरा असून त्यांत राजेरजवाडे यांचा अंतर्भाव होतो. क्षत्रियांचीं राज्यें येथें पिढ्यानुपिढ्या चाललीं

असून भूतदया आणि परोपकार हीं त्यांच्या राज्यव्यवस्थेचीं मुख्य तत्त्वें आहेत. ब्राम्हण व क्षत्रिय यांची वागणूक अगदी निष्कलंक व साधी आहे. वैश्य हे देशो-देशीं व्यापार करून द्रव्यसंचय करतात व शूद्र हे शेतीभातीचा व्यवसाय करतात. चारी वर्ण मिळून पुष्कळ जाति झाल्या आहेत व त्या सर्व समाधान-वृत्तीने व परस्परांशीं सख्यत्वाने वागतात. सपिंड स्त्री-पुरुषांचा विवाहसंबंध होत नाहीं. वरील चार वर्णांशिवाय आणखी एक वर्ण आहे. खाटीक, मासे धरणारे, कत्तल करणारे, मांग वगैरे लोक इ० विशिष्ट जातींच्या वसतिस्थानांवर कांहीं विशिष्ट निशाणी असते. व त्यांना गांवाबाहेर राहावें लागतें. गांवांच्या रस्त्यांतून समोर न जातां त्या जातीचे लोक आपल्या डावीकडून हकूच व जपून चालतात."

## संकराचें फल

अस्पृश्य जाति ७ व्या शतकांत होत्या याबद्दल परदेशी प्रवाश्यांचा हा स्पष्ट पुरावा आहे. भगवद्गीतेंत 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्' असें भगवंतांनीच म्हटलें आहे. "भारतीय युद्धांत हजारों वीर रणांगणावर पडतील, पण मग वर्ण-संकर होईल, कुलधर्म उत्पन्न होतील, मोठमोठ्या नामांकित, क्षत्रिय कुलांचा संहार झाल्यावर 'सनातन कुलधर्म' नष्ट होतील, अधर्म माजेल, कुलस्त्रिया दूषित होऊन वर्णसंकर होईल, 'उत्तम अधर्मी संचरती। ऐसे वर्णावर्ण मिसळती। तेथे समूळ उपडती, जातिधर्म' (ज्ञाने)" अशी अर्जुनास भीति पडल्याचें गीतावाचकांस माहीत आहेच. 'संकरो नरकायैव' अशी अर्जुनाप्रमाणें हजारों वर्षेपर्यंत हिंदु समाजाची पूर्ण निष्ठा आहे. वर्णसंकर किंवा जातिसंकर होऊं न देण्याविषयीं सर्व जातींचे कुलवंत पुरुष नित्य जपत असतात. सर्व जाति आपा-पल्या जातिधर्माप्रमाणे चालणाऱ्या शुद्धच आहेत परधर्मी व परदेशी राज्यक-र्त्यांच्या संसर्गामुळे 'सुशिक्षित' म्हटल्या गेलेल्या लोकांचीं मनें मूळ सोडून भलतीकडे वाहत चाललीं आहेत, व 'तोडा आणि फोडा' ह्या कुटिल राजनीतीमुळें ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्य-अस्पृश्य इत्यादिकांत भेदनीतीचें विष पसरत असून शेंकडो शतकें एकजूट असलेला समाज सर्व बाजूंनी फुटत व तुटत चालला आहे. जातिभेद असले कीं जातिद्वेष असतोच असें नाहीं. अनेक जाति गुण्यागोविंदाने हजारों वर्षें जातिविशिष्टत्व संभाळून नांदत आहेत, पण द्वेषाचें विष बाहेरून कांहीं मतलबी लोकांकडून पेरिलें जात आहे. पाश्चात्य राष्ट्रांत रोटीबेटीव्यवहार सर्रास एकत्र होत असूनहि तीं राष्ट्रं एकमेकांचे प्राण घेण्यास टपलीं आहेत हें कोणास माहीत नाहीं? यावरून संकर हा राष्ट्रैक्यास कारण होतो असें म्हणवत नाहीं. वर्णाश्रमधर्म हें हिंदुसंस्कृतीचें एक प्रमुख अंग आहे. त्यावर आजवर अनेक आघात झाले व ते सारे हिंदुसमाजानें परतविले आहेत.

## संतांचीं वचनें

हिंदुस्थानांत लोकपूज्य झालेले साधुसंत वर्णाश्रम मानणारे व संकराचा तिटकारा करणारे असेच झाले आहेत. हे संत सर्व जातींत व सर्व प्रांतांत झाले आहेत. भूतमात्रीं हरि पाहा, सर्वांभूतीं भगवद्भाव ठेवा, विष्णुमय जग । वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम । अमंगळ ॥ अशा प्रकारचा जनतेस उपदेश करणारे व अद्वयानंदाचा अनुभव घेणारे संतमहात्मेहि एकंकार करावयास सांगत नाहींत. खाण्यापिण्यांत, आहार स्पर्शास्पर्शांतसुद्धा वर्णधर्मबंधनें पाळलीं पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष आहे. स्वेच्छाचाराने वागून समाजघटना बिघडवूं नये असें त्यांचें सांगणें असंदिग्ध आहे. 'बंधनाच्या पलीकडे' एक मुक्त असतात किंवा पशु असतात. (मुक्तांना बंधनें बांधूं शकत नाहींत, बद्धांना धर्मविहित बंधनांची किंमत कळत नाहीं.) मनुष्यमात्राला धर्माच्या, समाजाच्या कायद्याच्या, बंधनांत म्हणजे मर्यादेंत राहणेंच भाग आहे.

ब्राह्मणांच्या वेदशाळेंत किंवा मंदिराच्या अंतर्गृहांत अस्पृश्यांना घुसविण्याचा प्रयत्न करणारे बडे देशभक्त, राजपुत्रासाठी वेगळीं बांधलेलीं राजकुमार कॉलेजें सर्वांसाठीं खुलीं झालीं पाहिजेत असा आग्रह धरून असल्या कॉलेजांच्या दारांवर सत्याग्रह कां करीत नाहींत? जाति जन्मतःच मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ब्राह्मण आईबापांच्या पोटीं जन्मलेल्यांना ब्राह्मण जर मानायचें नाहीं, तर कोणत्या क्षात्रगुणोत्कर्षामुळे आजचे राजे राज्य करूं शकतात? आजच्या ब्राह्मणांत रामदास नाहींत असें कोणी म्हणेल तर आजच्या राजांत शिवाजी तरी कोण आहे? सर्वच परमात्म्याला विसरून स्वधर्मच्युत झाले आहेत. अशा वेळीं कोणी कोणाला निंदण्यांत अर्थ नाहीं. जातींतले पुरुष आज कालगतीनें भ्रष्ट झाले असले तरी ब्राह्मणक्षत्रियादि जातींत जीं बीजें व बीजसंस्कार परंपरेने येत असतात त्यांचा एकाएकीं नाश होत नाहीं व चारदोन पिढ्यांनीं तरी ते संस्कार उदय पावून कुल समुन्नत होतें.

## शास्त्राचा दाखला

देवगिरीच्या जाधव राजांच्या कुळांत ते कुळ राज्यभ्रष्ट झाल्यावर तीनशें वर्षांनी जिजाबाईचा जन्म झाला व त्यांच्या पोटीं क्षत्रिय कुलावतंस श्रीशिवाजी महाराज जन्मास आले. संस्कारशुद्धि व रक्तशुद्धि संभाळण्याचा कटाक्ष आपल्या धर्मशास्त्रांनी ठेवला आहे तो याचसाठी. महाराष्ट्रांत क्षत्रियांच्या ९६ कुळी व ९६ उपकुळी प्रसिद्ध आहेत त्यांच्यातील पीळ गेला नाहीं व संकरदोष त्यांनी होऊं दिला नाहीं, तोंवरच त्यांच्यातल्या शुद्धसंस्कारयुक्त एकाद्या कुळांत पुनः शिवाजी-

सारखे वीर पुरुष उत्पन्न होण्याची शक्यता आहे. Heredity ऊर्फ वंशचरित झाला शास्त्रदृष्टीनेहि मान दिलाच पाहिजे. संस्कारशुद्धीसाठी धर्मशास्त्र आहे व त्यासाठीच सनातनी लोक धडपडत आहेत. रक्तांत, संस्कारांत आचारपरंपरेंत भेसळ होऊं देतां उपयोगी नाहीं. पाश्चात्यांत जातिभेद नसले तरी तिकडे कोण--तीच समाजस्थिति अजून चिरकाल टिकण्यासारखी उत्पन्न झाली नाही. व म्हणून तिकडे नित्य खून, मारामाऱ्या, व्यभिचार, मद्यमांसादिकांचा सुकाळ, क्रांत्या इत्यादि हरहमेष घडत असून समाजस्वास्थ्याचें नांव नाहीसें झालें आहे त्यांच्या संस्कृतीच्या नादानें आपली हजारों वर्षांची वर्णाश्रमव्यवस्था मोडून समाजवेवंद-शाही माजवूं नका अशी नवीनांस सनातनी लोकांची विनंति आहे. आमचा समाज प्राचीन काळापासून वर्णव्यवस्थेमुळे अत्यंत सुसंघटित व सुखसंपन्न झालेला आहे. एकेका घराण्यानें शंभर शंभर पिढ्या राज्य केलें आहे व त्यांत एकापेक्षां एक धुरंधर पुरुष उत्पन्न झाले आहेत. एका अयोध्यावासी रामचंद्राच्या पूर्वजांत इक्ष्वाकु, पृथु, ध्रुव, मांधाता, शिबी, हरिश्चंद्र, रुक्मांगद, अंबरीष, सगर, भगी-रथ, दिलीप, रघु, दशरथ असले लोकविख्यात श्रेष्ठ पुरुष निर्माण झाले आहेत. वर्णव्यवस्थेमुळे स्थायीभाव पावलेल्या भारतखंडांतच असे दिव्य इतिहास पाह--ण्यास सांपडतात.

## भेद असो पण द्वेष नको

जातिवंत मनुष्य आपली जात सोडून संकराची इच्छा करीत नाहीं, देवाने जेथें जन्म दिला तेथेंच दिव्य करणी करून तो धन्यता मिळवितो. महारवंशांत जन्मून चोखोबा धन्य झाले. स्पृश्यापैकींच धनगर जातींत जन्म पावून आहल्या देवी विश्वमान्य झाली त्यांनी आपल्या जातीची लाज बाळगली नाहीं व हिंदु समाजानेहि त्यांच्या गुणांचें यथोचित गौरव केलें. वरिष्ठ जातींत जन्माला एवढ्या साठीं आचारीपाणक्यांचे कोणी पुतळे उभारले नाहींत किंवा कनिष्ठ जातींत जन्मला म्हणून कुणी गौरवाशिवाय राहिलो नाहीं. हिंदु समाजांत जातिभेद असला तरी द्वेष, मत्सर पूर्वपार नसल्यामुळे गुणी व कर्तृत्ववान् मनुष्याचें योग्य कौतुक झाल्याशिवाय राहिलें नाहीं. चोखा मेळयाचे अभंग रामभट नामक ब्राह्म--णाने लिहून टेवले, त्याच्या अस्थि मंगळवेढ्याहून समारंभाने पंढरपुरास आणून नामदेवांनी त्यावर त्यांची समाधि बांधली व देवदर्शनास जाणारे ब्राह्मणादि सर्व स्पृश्य लोक त्याच्या समाधीला प्रथम वंदन करतात. Depressed and suppressed किंवा दलित वर्ग इ० भाषा अलीकडे अभिमानाला डिवचून द्वेष वाढविणारांनी काढली आहे ! कुल-जाति--वर्णांचा अभिमान आणि लज्जा दोनहि

व्यर्थ आहेत. वैष्णव सर्व जातींत झाले आहेत व ते सर्व समाजांनी पूज्य मानले आहेत. वैष्णवधर्मांत परमेश्वराचा भक्त—मग तो ब्राह्मण असो वा चांडाल असो—सर्वपूज्य मानला जातो. पण याचा अर्थ त्याच्यांत एकंकाराला मुभा आहे असें नाहीं. ज्यानें त्याने आपल्या जातिधर्माने चालावें व देवाला भजावें हेंच मुख्य आहे. ' या लागी कर्म अपुलें जें जातिस्वभावें असें आलें, ते करी तेणें चिंतिलें कर्मबंधातें ॥ ज्ञाने. १८-९३३

अस्पृश्यता ही केवळ संस्कारशुद्धीच्या व निर्मळतेच्या दृष्टीने उत्पन्न झाली आहे. आपल्याच घरांत आपण सोवळे ओवळे, सोयर सूतक पाळीत नाहीं का? चार दिवस रजस्वला स्त्रीस दूर ठेवल्याने घरांतील मंडळी तिचा द्वेष करितात असें नाहीं. असो. अस्पृश्यांची उन्नति करण्यास सर्वांनी मनःपूर्वक साहाय्य करावें हें समुचित आहे. त्यांना वर काढा पण तुम्ही खाली जाऊं नका. भक्तीने सर्वांचा आत्मिक उद्धार करावा, हें वैष्णवधर्मांचें सार आहे.

---


# मोरोपंती वेचे.

आवृत्ति दुसरी. किं. १॥१२

ग्रंथकारः--ल. रा. पांगारकर. बी. ए.

महाकवि श्रीमोरोपंत यांची पाउणलाख कविता घेऊन वाचण्याची ज्यांना सवड नाहीं त्यांनीं पंतकवितार्णवांतील रमणीय मोत्यें एकत्रित केलेला हा एकच ग्रंथ जवळ करावा. केसरीकारांनीं म्हटलें आहे. " महाराष्ट्रांतील रसिक, मार्मिक-प्रेमळ, भाषाभिमानी, धर्मनीतिव्यवहारज्ञ व लहानथोर अशा सर्व वाचकांनीं संग्रह करण्यासारखा रा. पांगारकरांचा हा ग्रंथ झाला आहे. या ग्रंथाचीं सात प्रकरणें केलीं आहेतः -

१ ईश्वरभक्तिपर २ कवि आणि कविता ३ उपदेशपर ४ वर्णनपर ५ कथा, नकपर ६ चक्रीरामायण ७ विविधविषयपर.

प्रथम कविताशास्त्रावर विस्तृत निबंध दिला असून त्यांत कवितेचें लक्षण, काव्याचे वर्णनीय विषय, काव्याचे हेतु, कवीचे गुण, काव्याची महती इ० विषयांचे सांगोपांग विवेचन केलें आहे. ग्रंथाला टीपा, संदर्भ सर्व कांहीं दिले आहे व पंतांचें संक्षिप्त चरित्र जोडलें आहे.

पत्ताः—मुमुक्षु कचेरी नाशीक सिटी,

# विश्वनाथाची आरती.

वाराणशी पुरपते जय विश्वनाथा ॥
माझा प्रणाम तुझिया चरणासी आतां ॥
मी मागतो सहज पावन एकभिक्षा ॥
द्यावी मला त्वरीत शांभवी वेददीक्षा ॥ १ ॥
श्रीबिंदुमाधव तुला स्मरतोस्वभावें ॥
संसारसिंधु भंग बिंदु तवप्रभावे ॥
माझी कृपा निधि कधी न करी उपेक्षा ॥
ठेवी मला निज पदांबुजी हे अपेक्षा ॥ २ ॥
श्री धुंडिराज गजनाथ गजाननारे ॥
संसार पिप्पल तरूसि विनाश नारे ॥
तूं देव सुंदर धुरंधर विघ्नहर्ता ॥
वाराणशीस मज येथुनि ने समर्था ॥ ३ ॥
मी पार्थना करितसे तुज दंड पाणी ॥
माझे उदंड अपराध मना न आणि ॥
श्री भैरवा चुकवि रौरव यातनारे ॥
वाराणशीस मज ने करुणाकरारे ॥ ४ ॥
वाराणशी त्रिभुवनेश्वर राजधानी ।
भागीरथी तटी जगद्गुरू संनिधानी ॥
जी प्राणियासि गति दे निधानी
ती धन्य धन्य अविमुक्त पदाभिमानी ॥ ५ ॥

——×——

श्रीरुक्मिणीपांडुरंगाभ्यां नमः ।

# मुमुक्षु



याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ (श्रीरामदास)


जुनें वर्ष २७ ) मार्गशीर्ष शके १८५४ ( नवें वर्ष १२ वें

मास ४ ) डिसेंबर इ. स. १९३२ ( अंक १२

वार्षिक वर्गणी रु. ३ ) संपादक व प्रकाशक, ( व्ही. पी. नें रु. ३॥३



## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी, ए.

मुमुक्षु कचेरी, नाशिक सिटी.



मुद्रकः—विष्णु गणेश केळकर यांनीं नाशिक येथें घ. नं. ९२६ लोकसत्ता छापखान्यांत छापिलें.

मुमुक्षु मासिक ] विषयानुक्रमणिका [ वर्ष १२ अंक १२


| विषय | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ मंगलाचरण | ... | १ |
| २ श्रीगुलाबरावमहाराजांचे समग्रग्रंथ | ... | २--३ |
| ३ गीतेचें औदार्य | ... | ४ |
| ४ तुलशी रामायण—बालकांड | ... | ५--१२ |
| ५ विनवणी ( कविता ) | ... | १२ |
| ६ मराठी वाङ्मयाचाइतिहास हा ग्रंथ व त्यावर विद्वानांचे अभिप्राय | ... | १३--१८ |
| ७ वैराग्य | ... | १९--३० |
| ८ धांव पांडुरंगा ( कविता ) | ... | ३१ |
| ९ अस्पृश्यता विषयक वार्ता | ... | ३२--३५ |
| १० व्यवस्थित आहार | ... | ३५--३६ |
| ११ तुलसीदास सूक्ति | ... | ३७--३८ |
| १२ सतरावें महाराष्ट्र--साहित्य--संमेलन | ... | ३९ |
| १३ श्रीसमर्थमंदिरांत श्रीसांप्रदायिक चर्चा | ... | ४० |


## ग्राहक-वाचकांस

**सूचना** - जानेवारी पासून मुमुक्षु मासिकास तेरावें वर्ष लागतें. ज्यांचें वर्ष जानेवारीला सुरू होते ह्म० ज्याच्या नांवामागें एका हजारा पासूनचे आंकडे आहेत त्यांनीं कृपाकरून हा अंक पावतांच १९३३ सालचे वर्गणीचे तीन रुपये मनीऑर्डरनें पाठवावें. व्ही० पी० केल्यानें त्यांस पांच आणे वृथा खर्च येईल. तरी म० ऑ० ता० ५ जानेवारीचे आंत आमचे हातीं पडेल अशा बेतानें पाठवावी. प्रत्येकानें दोन वर्गणीदार नवीन मिळवून द्यावेत.

**मराठी वाङ्मयाचा इतिहास**--खंड १ ला-ज्ञानेश्वर नामदेवांचा काल. पृ० सं० ८३२ किं० रु. ४. व्ही. पीनें रु० ४।१२.

कोल्हापूरास वरील ग्रंथ रा. वासुदेवराव तोफखाने, विद्यापीठाचे चालक, यांजकडे व बडोद्यास रा. विनायकराव वाकसकर, महाराज थिएटर, यांजकडे तूर्त मिळेल. पुण्यास लक्ष्मणराव अयाचित जोगेश्वरीजवळ यांजकडे व मुंबईस पागनीस पेटकर आणि मं. प्रार्थनासमाजसमोर यांजकडे मिळेल.

पत्ताः—' मुमुक्षु ' कचेरी, नाशीक सिटी.

13/12
6/1/33

मुमुक्षु मासिक वर्ष १२ वें ] मंगलाचरण [ डिसेंबर १९३२ अंक १६



## पदें

( प्रसिद्ध भक्त प्रल्हादबोवा बडवे यांचे नातु अनंत बडवे यांची हीं पदें आहेत. )

१

विठोबो ! आमुचें निजधन तूं । निशिदिनिं आह्मी चिंतूं ॥ ध्रु० ॥
पुंडरीक यजमान आह्मांप्रति । भाग्योदय हेतू ॥ वि० ॥ १
संत लुटारी लुटति तथापी । मनिं न धरूं किंतू ॥ वि० २
याचि बळें गृहवासी असतां । कळिकाळा जिंतूं । वि० ॥ ३
ज्या निधिलाभें प्रल्हादाचा । परम सुखी नातू ॥ वि० ॥ ४

२

विठाई ! मौन कसें धरिलें । मज मोकलिलें ॥ ध्रु० ॥
देहीं अभिनव पीडा रचिली । दर्शन अंतरलें ॥ वि० ॥ १
औषधमंत्रजपादिक साधन । सर्व वृथा गेलें ॥ वि० ॥ २
प्रल्हादाचा वंश ह्मणुनि तरि । सांभाळीं वहिलें ॥ वि० ॥ ३

३

पहा हो ! विश्वराज भजकजनांची वारी सारी लाज ॥ध्रु० ।
परम सुखाची खाणी । विग्रह गोजीरवाणी ।
अनघर्य किरीट माथा तेजःपुंज ॥ १ ॥
सकळ मंगळ धाम पुरवी दासाचें काम ।
असुरसुरांचें पुंज ॥ २ ॥
प्रत्यंगीं लावण्यगुणें । भूषणें भूषिली जेणें ।
सिद्धिबुद्धि वीजिति अंग ॥ ३ ॥
चतुर्भुज गजतुंड । कवळिलें रददंड ।
अनंतासी ज्याचें ध्येय पादांबुज ॥ ४ ॥

# श्रीगुलाबराव महाराजांचे समग्र ग्रंथ.

महाराज,

वऱ्हाडांतील परम भगवद्भक्त व सुप्रसिद्ध सत्पुरुष श्रीगुलाबराव महाराज यांचा परिचय आपणासारख्या सज्जनांना नव्यानें करून देण्याचें कारण नाहीं. श्री. महाराजांनीं शके १८०३ मध्यें अवतार धारण करून लीला केली व अवघें ३४ वर्षांचें वय उपभोगून शके १८३७ मध्यें देहत्याग केला. पण एवढ्या अल्प-वयींतही त्यांनीं आपल्या दैवी गुणांचा परिचय सर्व महाराष्ट्रास करून दिला आणि अर्वाचीन साधुपुरुषमालिकेंत आपलें नांव अजरामर करून ठेवलें..

श्री. गुलाबराव महाराज हे स्वतः जन्मांध असतां त्यांच्या ठिकाणीं सर्व-शास्त्रपारंगतता, वेदांत नैपुण्य, अलौकिक बुद्धि चातुर्य, पूर्ण ज्ञाननिष्ठा व भक्ति-निष्ठा इत्यादि अनेक अलौकिक गुण वसत होते, याची साक्ष ज्यांनीं स्वतः त्यांना पाहिलेलें आहे, अशा लोकांना पटलेली आहेच, यापैकीं सर्व महाराष्ट्रास परि-चित असलेले श्री. लक्ष्मणराव पांगारकर व बाबासाहेब गर्दे यांचा उल्लेख प्रामु-ख्यानें करतां येईल.

श्री गुलाबराव महाराज हयात असतां व त्यांची निवासभूमि वऱ्हाडप्रांत असतांही त्यांनीं पुणें व मुंबई या सारख्या महाराष्ट्रांतील प्रमुख स्थानीं हिंडून-आपल्या अलौकिक ज्ञानाचा व भगवद्भक्तीचा सर्वांस परिचय करून दिला आणि अनेक ग्रंथही लिहून ठेवले. आपल्या ठिकाणीं असलेल्या अनेक ईश्वरदत्त गुणांचा उपयोग पारमार्थिक कल्याण इच्छिणाऱ्या सर्व सामान्य जनांना व्हावा, या सदि-च्छेनें त्यांनीं आपल्या हयातींतच 'सूक्तिरत्नावली' नांवाची ग्रंथ मालिका तयार करून ती प्रसिद्धही केली. तेव्हांपासून आतांपर्यंत हजारों लोकांनीं त्यांतील परमार्थबोधाचा अस्वाद घेतलेला आहे, व पुढेंही हा क्रम असाच चालू राहील. त्या करितां महाराजांच्या समग्र ग्रंथाची एक अधिकृत आवृत्ति काढण्याचें योजिलें आहे.

श्री गुलाबराव महाराज ह्यांनीं आपल्या ग्रंथांतून वेदांतांतील निरनिराळ्या विरोधांचीं एकवाक्यता मोठ्या सुंदरतेनें व सयुक्तिक रीतीनें केली असून त्याच्या ग्रंथांचा मुख्य विषय म्हटला म्हणजे श्रीज्ञानेश्वर, तुकाराम व नाथ महाराज, इत्यादि साधुसंतांनीं प्रगट केलेल्या अद्वैतभक्तीचें शास्त्रीय दृष्टीनें व शांकरवेदांतास अनु-सरून मंडण करणें हा आहे व तोच त्यांनीं आपल्या निरनिराळ्या ग्रंथांत निरनि-राळ्या पद्धतीनें प्रस्थापित केला आहे. ह्यामुळें महाराजांचें ग्रंथभांडार हें ब्रह्मबोध नसलेल्या शाब्दिकवेदान्त्यांकडून भक्तिमार्गविघातक असे जे आक्षेप घेण्यांत

येतात, त्यांना खरमरीत व बिनतोड उत्तर असून भगवंताच्या सगुणस्वरूपाचें ठिकाणीं आपलें चित्त स्थिर करूं पाहणाऱ्या मुमुक्षुजनांना शांति व समाधान देणारें आहे. याकरितां सर्वांनीं त्याचा संग्रह अगत्यानें करावा, अशीच त्याची योग्यता आहे. या ग्रंथांचा उपयोग आर्यसंस्कृति व शास्त्रें यांच्याशीं अनभिज्ञ असलेल्या नवशिक्षित लोकांनाही होण्यासारखा आहे. कारण, श्री गुलाबराव महाराजांनीं नवशिक्षितांच्या भल्याबुऱ्या वा खऱ्याखोट्या अशा अनेक शंकांचें पूर्ण निरसन होईल असें विवेचन सर्व ग्रंथांतून—विशेषेकरून गद्यग्रंथांतून केलें असलेमुळें त्यांनाही हे ग्रंथ संग्राह्य अतएव अभ्यसनीय वाटतील.

सोयीकरितां एक सुंदर आवृत्ति (पुनर्मुद्रण) काढण्याचें आम्ही ठरविलें आहे.

उत्कृष्ट कागद, मोहक छपाई, टिकाऊ व सुंदर बांधणी असें बाह्यांग करण्याकडे पूर्ण लक्ष देण्यांत येणार आहे, व अंतरंग टीपा देऊन सुलभ करण्याचें योजिलें आहे. तात्पर्य ही आवृत्ति अंतरंग व बाह्यांग या दोन्ही दृष्टींनीं ग्रंथप्रेमी सज्जनांना संतोष देईल अशीच निवेल. अर्थात् हें कार्य बरेंच मोठें व खर्चाचें आहे. तरी पण महाराष्ट्रांतील संतवाङ्मयाचे भोक्ते वाचक व श्रीगुलाबरावमहाराजांचे भक्तजन यांच्या साह्यानें ही अडचण दूर होईल व समग्र ग्रंथ प्रकाशनाचें कार्य सुलभ होईल अशी आम्हांस आशा आहे. हें कार्य शक्य तों लौकर व्हावें म्हणून खालील योजना केली आहे.

## ग्राहकांचे दोन वर्ग.

सहाय्यक—या समग्र ग्रंथ प्रकाशनार्थ शंभर रु. किंवा त्याहून जास्त साह्य देणारे ते सहाय्यक.

ग्राहक—सारे ग्रंथ घेण्याचें अभिवचन देऊन आगाऊ कमींत कमी ५ रु. देणारे ते ग्राहक.

सहाय्यक वर्गांतील सज्जनांना १०० रु. देणारास ग्रंथाचा १ गट व १५० रु. किंवा अधिक देणारांस २ गट भेट म्हणून घरपोंतच देण्यांत येतील.

ग्राहक—वर्गांतील लोकांना समग्र गट पाऊण पट किंमतीला मिळेल. ट. ख. निराळा.

तरी श्री. गुलाबराव महाराजांच्या सर्व चहात्यांनीं भक्तांनीं व शिष्यसेवकांनीं यथाशक्ति साह्य पाठवावें आणि मुमुक्षुजनांना ही ज्ञानानंदाची पाणपोई उघडून द्यावी. खालीं दिलेल्या पत्यावर वर्गणी भरावी व नांवें नोंदवावीं.

श्री. ना. पै. पंडित, चालक ज्ञानेश्वरसंस्थान पाताळेश्वररोड नागपूर.

# गीतेचें औदार्य.

दीनांच्या करुणेनें उदारांचें औदार्य प्रगट होत असतें. गीताशास्त्र 'हें सर्वाधिकारैकपवित्र' (अ० १८-१४२६) आहे ह्मणजे गीतेच्या पठणपाठणाचा, श्रवणमननाचा, आत्मज्ञानलाभानें उद्धरून जाण्याचा सर्वांस अधिकार असल्यामुळें गीतेचें पवित्रपण विश्ववंद्य आहे. भगवंताचें औदार्य त्याच्या चरित्रांत व गीतोपदेशपद्धतींतही व्यक्त आहे. अर्जुनानें देवाला विश्वरूपदर्शनाची प्रार्थना केली तेव्हां भगवल्लीलांतून व्यक्त झालेल्या त्यांच्या औदार्याचें त्याला स्मरण दिलें. 'तुझें औदार्य जाणों स्वतंत्र। देतां न ह्मणसी पात्रापात्र। पै कैवल्य ऐसें पवित्र। वैरियाही दिधलें.' ॥ ९८ ॥ मोक्ष दुराराध्य कीर होय। परी तोही आराधी तुझे पाय। ह्मणोनि धाडिसी तेथ जाय पाइक जैसा ॥ ९९ ॥' वैऱ्यांना सुद्धा तूं कैवल्य देतोस. दुर्लभ मोक्ष तुझ्या पायासी असून तूं त्याला धाडशील तिकडे तो सेवकासारखा धांवत जातो. तूं सनकादिकांना जो सायुज्यसोहळा दिलास तो विषस्तन्य पाजणाऱ्या पूतनेलाही दिलास! राजसूययज्ञप्रसंगीं दुर्वचनांनीं शतधा तुला निस्तेज करणाऱ्या शिशुपालालाही सद्गति दिलीच! भृगूनें पोटरा मारल्या असून त्याचा चरण उरीं मिरवतोस! शंखासुराचें कलेवर हातीं घेतोस. मग ध्रुव, गणिका, वल्मी अशी आणखी किती उदाहरणें देऊं. तूं पात्रीं उदार आहेस यांत नवल काय पण 'अपात्रींही उदार' आहेस (ज्ञाने० अ० ११ ओवी ९८ ते १०६.) हेंच औदार्य श्रीकृष्णानें गीतेंतही दाखविलें आहे ४ थ्या अध्यायांत ज्ञानयज्ञाचें महत्त्व सांगत असतांना द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ, वाग्यज्ञ, इ० यज्ञांचाही, गौरव करून हें विविध प्रकारें यज्ञ करणारे लोक 'सर्वेप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः—, यज्ञाच्या योगानें निष्पाप होऊन गतीला जातात असें ह्मटलें आहे. सर्व यज्ञांत ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे हें सत्य सांगितलेंच आहे पण इतरांनाही संभाळून घेतलें आहे. तसेंच ७ व्या अध्यायांत चतुर्विध भक्तांचें वर्णन करीत असतांना ज्ञानीभक्त तर माझा आत्माच आहे हें सत्य स्पष्ट सांगितलें असून आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी यांनाही 'सुकृती' ह्मणून 'उदाराः सर्व एवैते' या प्रमाणें भक्तांच्या वर्गांतच सामावून घेतलें आहे. ही संग्राहकबुद्धि श्रीकृष्णाचें औदार्यच दर्शित करिते. चारी वर्णांचे लोक अपापल्या कर्मे भगवदर्पणबुद्धीनें करतील तर सारेच मोक्षाचे अधिकारी आहेत असें १८ व्या अध्यायांत सांगतांनाही हीच उदारबुद्धि ठेवली आहे. ९ व्या अध्यायांतील ३२ व्या श्लोकानें तर 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रस्तेऽपियान्ति परांगतिं' याप्रमाणें स्त्रीशूद्रांनाही भक्तीच्या योगानें सद्गति मिळते इतकेंच काय पण पापयोनीही तरून जातात असें सांगून मनुष्यमात्राच्या उद्धाराचा मार्ग मोकळा करून दिला आहे. गीतेच्या लोकप्रियतेचें बीज ह्या भगवंताच्या औदार्यांत आहे. गीता हा प्राणिमात्राचा धर्मग्रंथ आहे. व देवाचें औदार्य ह्मणजेच गीतेचें औदार्य.

# तुलसी रामायण–बालकांड

## रावणराज्य

रावणानें शिवाची आराधना करून त्याजपासून वर मागून घेतला. त्याला सर्व कांहीं अनुकूल होतें. ' सुख संपति सुत सेन सहाई । जय प्रताप बल बुद्धि बढाई' हें सर्व त्याजपाशीं होतें. तो रजोगुणी, महत्वाकांक्षी, लोभी होता. देवाब्राह्मणांशीं त्यानें वैर मांडलें. यज्ञयाग, होम, श्राद्धपक्षादि कर्ममार्ग त्यानें बुडवला. त्याच्या छलामुळें देवांनीं गिरिशिखरांचा व गुहांचा आश्रय केला. देवता, सिद्ध, मुनिमानव यांचा त्यानें छल केला. देव, धेनु, द्विज, गुरु यांना त्यानें ' त्राहि भगवान् ' करून सोडले. ' नहि हरिभगति यज्ञ जप दाना । सपनेहु सुनिय न वेद पुराना!' यज्ञ, जप, तप, दान,ज्ञान, वैराग्य सर्व प्रभावानें लुप्त झाले. जगभर भ्रष्टाकार माजला. आचारधर्म लुप्त झाले. त्याची ' हिंसापर प्रीति ' असल्यामुळे अहिंसादि सद्धर्म लोपले.

बाढे खल बहु चोर जुआरा । जे लंपट परधन परदारा ।
मानहिं मातु पिता नहि देवा । साधुन्ह सन करवावहि सेवा ।
जिन्हके यह आचरन भवानी! । ते जानहु निसिचर सब प्रानी ।

अशा वेळीं देव, मुनि व मानव यांनीं ब्रह्मदेवाला पुढें करून महाविष्णूची आराधना केली. ' हरि व्यापक सर्वत्र समान ' आहे तथापि तो काष्ठांतील अग्नीप्रमाणें प्रेमभक्तीनें प्रगट होतो. तो परमात्मा अयोध्यावासी दशरथराजाच्या पोटीं आला व त्यानें रावणाचा नि:पात करून धर्मराज्य उभारलें.

## रामाचा जन्म व बालपण.

( दोहा ) बिप्रधेनुसुरसंतहित लीन्ह मनुज–अवतार ।
निज इच्छानिर्मिततनु माया- गुन--गो--पार ॥ बाल० १९७॥

चैत्र शुद्ध ९ ला माध्यान्हकालीं अभिजित् योगावर रामाचा अवतार झाला. नांदीश्राद्ध, जातकर्म, नगरशृंगार, देणग्या, गायन सर्व कांहीं होऊन आनंदीआनंद झाला. कौसल्येच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न हेही जन्मास आले. नामकरण झालें.

( दोहा ) व्यापक ब्रह्म निरंजन निर्गुन बिगतबिनोद ।
सो अज भक्तिप्रेमबस कौसल्याके गोद ॥ २०३ ॥

गोद--अंक, मांडी. रामरूपाचें वर्णन प्रस्तुत ग्रंथांत ठिकठिकाणीं आले असून तें

फार मनोहर आहे. तुलसीदासांचें ध्यान रामाच्या बालरूपाचें होतें. रामाचें बालरूप हीच त्यांची उपासना होती. सुरदासादि सर्व कृष्णभक्तांचें उपास्य जसें कृष्णाचें बालरूप होतें तसें तुलसीदासांचें उपास्य रामाचें बालरूप होतें. बालरूप स्वभावतःच मनोहर व निर्विकार असतें व बालाच्या लीलाही सहजमधुर व चित्ताकर्षक असतात. भक्तांच्या ग्रंथांतून वत्सलरसालाच दिव्यभक्तीचें उदात्त स्वरूप प्राप्त होतें. ' रामाच्या पदतलावरील ध्वजवज्रांकुशचिन्हित रेषा, नूपुरांचा मंजुल ध्वनि, सांद्रमेघाप्रमाणें तो शरीर वर्ण, ती चरणकमलांची नखप्रभा, त्या कटि-किंकिणी, तें विशाल वक्षस्थल, ते विशाल बाहु –

कंबुकंठ अति चिबुक सुहाई । आनन अमितमदनछबि छाई ।
दुइ दुइ दसन अधर अरुनारे । नासा तिलकको बरनइ पारे ।

शंखासारखा तो कंठ, ती सुरम्य हनुवटी, कोटिमदनांना मागें सारणारे तें सुंदर मुखकमल, दोन दोन दांत, आरक्त ओष्ठ, सुरम्य नासिका व तिलक यांचें अवर्णनीय सौंदर्य,

सुंदर स्रवन सुचारु कपोला । अतिप्रिय मधुर तोतरे बोला ।
चिक्कन कच कुंचित गभुआरे । बहु प्रकार रचि मातु सवारे ।
पीत झगुलिया तनु पहिराई । जानुपानिबिचरनि मोहि भाई ।

सुंदर कान, गोंडस गाल, अतिप्रिय व मधुर बोबडे बोल, आईनें विंचरून नीटनेटके केलेले ते स्निग्ध कुरळे केस (काळेभोर जावळ,) अंगांत पिवळा झगा घातलेले व गुडघ्यांवर व हातावर रांगणारें तें प्रिय बाळरूप - अशा त्या प्रभूला 'कबहु पालने घालि झुलावई ' पाळण्यांत घालून झोके देतांना कौसल्या प्रेममग्न होई व रामाच्या बालक्रीडेचीं गाणीं गात आपल्याशीच रमून जाई. धुळीनें धूसर झालेल्या अंगानें रामानें दुडदुड धांवत यावें व दशरथानें प्रेमानें त्याला मांडीवर घ्यावें; जेवतांना कौसल्येची नजर चुकवून दहीभातानें लपटलेल्या तोंडानें धूम ठोकीत पळून जावें ! कुमारपणांत विद्याविनयसंपन्न व गुणशील असे राम हातांत चिमुकल्या धनुष्यबाणांनीं फार शोभत व चराचराला मोहित करीत. प्रातःकालीं उठून सर्व बंधु व मातापिता व गुरु यांस वंदन करीत व वेदपुराणें लक्ष्यपूर्वक ऐकत. जरा मोठे झाल्यावर राम दशरथाला राजकार्यांत साह्य करीत व त्यांच्या प्रेमळ वर्तनामुळें ते दरबारी लोकांना तसेच साऱ्या प्रजेला अत्यंत प्रिय झाले.

तुलसीदासांच्या रामायणांत विश्वामित्र कोपिष्ठ दिसत नसून विश्वामित्र व वसिष्ठ हे दोघेही सारखेच शांत, प्रेमळ, परस्परांशीं प्रेमानें वागणारे थोर पुरुष होते असें वर्णन केलेलें आहे. सीतास्वयंवरानंतर राम व परशुराम यांचें वाग्युद्ध

झालें आहे तेथें ही परशुराम अविचारी व रागीट दाखविले नसून लक्ष्मणाच्या थोड्याशा उतावेळपणाच्या कुचाळयाही त्यांनीं प्रेमानें सहन केल्या असेंच वर्णन आहे. यावरून विश्वामित्र-परशुरामादि विभूतींविषयींही वाचकांचा आदर-भाव कायम रहावा असेंच धोरण कवीनें ठेवलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. ह्या बालकांडांत शिवपार्वतीविवाह, रामाच्या बाललीला व सीतास्वयंवर ह्या तीनच गोष्टी मुख्यत्वेंकरून वर्णिल्या आहेत व त्या अत्यंत रसभरित अशा उतरल्या आहेत.

## सीतास्वयंवर

सीतास्वयंवरप्रसंगीं मखमंडपांत लक्ष्मणासह राम आले तेव्हां ते प्रत्ये-कास त्याच्या त्याच्या भावनेप्रमाणें दिसले. रणधीरांना राम मूर्तिमंत वीररस, वाटला, कुटिल नृपांना राम भयानकरसाची मूर्ति दिसली, असुरांना कालसम, नारींना प्रत्यक्ष मदनावतार, पंडितांना 'सहस्रशीर्ष. पुरुषः' असा विराट् पुरुष, जनकराजाच्या कुटुंबीयांना आप्तस्वकीय, योग्यांना 'शांत शुद्धसम, सहजप्रकाश' असें परमतत्व, भक्तांना सबसुखदाता असा भगवान् 'जिन्हके रहे भावना जैसी। प्रभुमूरति तिन्ह* देखी तैसी'—जनकाला व त्याच्या राणीला तर रामाविषयीं वात्सल्य प्रेम वाटूं लागलें. भाव तसा देव, दृष्टि तशी सृष्टि, असा न्यायच आहे. रामरूपाचें वर्णन फार सुंदर आहें. त्याचे नेत्र, त्याची दृष्टि

कलकपोल सुतिकुंडल लोला। चिबुक अधर सुंदर मृदु बोला।
कुमुदबंधु—कर-निंदक हासा। भ्रुकुटी बिकट मनोहर नासा।

---

* मराठी कवि आनंदतनय यांनीं असेंच ह्मटलें आहेः—

सीतेला स्मरसा, धनूसि हरसा, राजां दिसे वीरसां
मूढाला नरसा, जनां नृवरसा, भक्तांस माहेरसा।
देवां ईश्वरसा, रिपूंसि भगरसा, ज्ञात्यांसि हृत्सारसा,
ऐसा सर्वरसांसि हेतु परिसा—जो सूर्य हृत्सारसा॥

मूळ भागवतांत श्रीकृष्णाचें अशाच प्रकारचें वर्णन केलेलें आहेः—

मल्लानामशनिर्नृणां नरवरः स्त्रीणां स्मरो मूर्तिमान्
गोपानां स्वजनोऽसतां क्षितिभुजां शास्ता स्वपित्रोः शिशुः।
मृत्युर्भोजपतेर्विराडविदुषां तत्वं परं योगिनाम्
वृष्णीनां परदेवतेति विदितो रंगं गतः साग्रजः॥स्कंध १०-४३-१८॥

बोली चतुरसखी मृदुबानी। तेजवंत लघु गनिय न रानी।

भाल बिसाल तिलक झलकाही। कच बिलोकि अलि--अवलि लजाहीं।
सीतेच्या रूपाचें वर्णन कवीनें जाणूनबुजून केलें नाहीं. सर्व उपमा प्राकृत स्त्रियांच्या वर्णनाशीं संलग्न असल्यामुळें त्या देऊन मी 'कुकवि' ह्मणवून कां घेऊं:

सिय शोभा नहि जाइ बखानी। जगदंबिका रूपगुनखानी।

एवढेंच कवीनें ह्मटलें आहे. सीतेच्या नवल तनूवरील ती सुंदर साडी, सखींनीं अंगावर चढवलेले नीटनेटके अलंकार, तिचें तें अतुलित सौंदर्य, ती करकमलांतली जयमाला हें पाहून सारे नारीनर मोहवश झाले. सीतेनें राजमंडळाकडे सहज नजर फेकली व तिच्या लोचनांचा निधि राम सांपडताच ती लुब्ध झाली, पण गुरुजनलाज व बडा समाज पाहून संकोच पावली व रामरूप मनांत सांठवून ती सख्यांकडे पाहूं लागली. कांहीं मत्सरी राजे सोडून सर्व सभाजनांच्या मतानें राम हाच सीतेच्या योग्य पति आहे असें सहज ठरविलें. कोणालाही न उचलणारें तें शिवधनुष्य उचलण्यासाठीं गुर्वाज्ञेनें राम उठले व गुरुचरणीं मस्तक ठेवून व त्यांचा आशीर्वाद घेऊन चालूं लागले. नृपमंडळ निष्प्रभ झालें व नगरवासी स्त्रीपुरुष हर्षित झाले. सीतेची माया स्नेहाकुल झाली व ह्या बाल मरालाकडून हा मंदराचल कसा उचलला जाईल अशी तिला शंका वाटली आणि राजाचा पणाबद्दलचा हट्ट पाहून ती रागावली सुद्धा!

तेव्हां राणीची चतुर सखी मृदु वाणीनें ह्मणाली 'राणी साहेब! तेजस्वी नराची पोरांत गणना करूं नये?' 'कहकुंभज कह सिंधु अपारा'–कोठें अगस्ती व कोठें अगाध सागर पण त्या अगस्तींनें समुद्र शोषून टाकलाच कीं नाहीं? सूर्यबिंब चिमुकलेंच असतें पण तें उगवतांच त्रिभुवनांतील अंधार नाहींसा करितें! मंत्र छोटाच पण हरिहरब्रह्मादिकांना वश करितो! मदोन्मत्त गजाला वठणीवर आणणारा अंकुश लहानच असतो! कामदेवाचा बाण पुष्पाचा असतो, पण तो सकल भुवनाला जिंकतो! यावरून समजा कीं राम धनुष्य तोडणारच" हें दृष्टांतात्मक सखीचें भाषण ऐकून राणीचा विषाद गेला व ती हंसली. सीतेची स्थिति करुणास्पद झाली. धनुष्य भार कमी करण्याबद्दल तिनें मनांत साऱ्या देवांची प्रार्थना केली—'होउ प्रसन्न महेस भवानी,' 'गननायक वरदायक देवा'--ती आपल्या मनाला पुष्कळ धीर देई पण 'भरे बिलोचन प्रेमजल पुलकावली सरीर'—तिनें एकदा रामाकडे पहावें व एकदा जमीनीकडे पहावें-- तिचे नेत्र ह्या चंद्रमंडळामध्यें झोकें घेणारे कामदेवाचे जणुं दोन मत्स्यच! ती मनाशी ह्मणाली:—

कह धनु कुलिसहु चाहि कठोरा। कह श्यामल मृदुगात किसोरा।

विधि ! केहि भांति धरउ उर धीरा । सिरिससुमन कन बेधिय हीरा ।

वज्राहून कठोर असें हें धनुष्य कोठें व ही सावळी सुकुमार मूर्ति कोठें ! देवा! मी आतां मनांत धीर तरी कसा धरावा ? शिरीषपुष्पाच्या कळीनें हिऱ्याचा वेध कसा होईल बरें !

अहह ! तात दारुन हठ ठानी । समुझत नहिं कछु लाभ न हानी ।

सचिव सभय सिख देइ न कोई । बुधसमाज बड अनुचित होई ।

बाबानीं हा केवढा दारुण पण मांडला आहे ! लाभ होणार—कां हानी होणार कांहींच समजत नाहीं ! हे मंत्री भ्याड आहेत, बाबांना कोणी योग्य सल्ला देत नाहीं. ह्या जाणत्यांच्या सभेंत मोठाच अन्याय होत आहे. बा शंभुचापा ! तूं आपलें जडत्व ह्या सभेवर टाक. तूंच माझा आधार आहेस. बाकी मला वाटतें कीं ज्याचें ज्यावर खरें प्रेम असतें त्याची त्याला प्राप्ती होतेंच !

जेहिके जेहिपर सत्य सनेहू । सो तेहि मिलइ न कछु संदेहू ।

असो. रामानें तें धनुष्य उचललें, चढविलें व लीलेनें त्याचा भंग केला. सर्वत्र जयध्वनि उठला चातकीला स्वातीजल मिळावें त्याप्रमाणें सीतेच्या मनाला सुख झालें. सीतेनें जयमाला रामाच्या गळ्यांत घातली तेव्हां:—

तन सकोच मन परमउछाहू । गूढप्रेम लखि परइ न काहू ।

जाइ समीप रामछबि देखी । रहि जनु कुअरि चित्र अवरेखी ।

देहावर संकोच, मनांत उल्हास—तिचे गूढ प्रेम कोणासच कळलें नाहीं. रामा-जवळ जाऊन रामरूप तिनें न्याहाळले तेव्हां ती चित्रलिखित कुमारीसारखी दिसूं लागली ! असो.

जहतह बिप्र बेदधुनि करही । बंदी बिरुदावलि उच्चरही ।

महि पाताल नाक जसु ब्यापा । राम बरी सिय भंजेउ चापा ।

दशरथाला जनकाकडून विवाहाची आमंत्रणपत्रिका आली. ती त्यानें गुरु वसिष्ठास दाखविली:-

सुनि बोले गुरु अति सुख पाई । पुन्य पुरुष कह महि सुख छाई ।

जिमि सरिता सागर महु जाही । जद्यपि ताहि कामना नाहीं ।

तिमि संपति सुख बिनहि बोलाये । धरमसील पहि जाहि सुभाये ।

तुम्ह गुरुबिप्रधेनुसुर सेवी । तसि पुनीत कौसल्या देवी ।

सुकृती तुम्हसमान जगमाही । भयउ न है कोउ होनउ नाहीं ।

बीर बिनीत धरमव्रतधारी । गुन सागर बर बालक चारी ॥

जनकाच्या दरबारीं घडलेल्या सर्व गोष्टींची वार्ता ऐकून वसिष्ठ अत्यंत हर्षित

होऊन म्हणाले: " पुण्य पुरुषांसाठी ही पृथ्वी सुखानें भरलेलीच असते. सागराला इच्छा नसून जशा नद्या त्यास जाऊन मिळतात, त्याप्रमाणें पुण्यपुरुषाकडे सुख व संपत्ति न बोलावतां जातात हें अगदी स्वाभाविक आहे. दशरथा! तूं गुरु, ब्राह्मण, धेनु व देवता यांचा सेवक आहेस तशीच कौसल्या राणीही पवित्र आहे, तुमच्यासारखे पुण्यवान् सांप्रत जगांत कोणी विद्यमान नाहींत, मागे झाले नाहींत व पुढे होणार नाहींत. वीर, विनीत, धार्मिक व गुणसागर जसे तुझे चार पुत्रही तुझ्या भाग्यानेंच मिळाले आहेत. " हें गुरुगौरव ऐकून दशरथानें गुरुचरणीं शिर नमविलें. निघण्याची सर्व तयारी करून दशरथ सकल ऐश्वर्यासमवेत विदेहनगरीस आले. जनकानें तितक्याच थाटानें त्याचा प्रेमपूर्वक सत्कार केला. सीमांत पूजा मानसत्कार करून त्याला जानवशाचे ठिकाणीं नेलें. जनकाच्या सुकृताची मूर्ति सीता व दशरथाच्या सुकृताची मूर्ति राम–असे ज्याही, अशीं वधूवरें–

इन्हसम कोउ न भयउ जगमाही । है नहीं कतहू होनेउ नाहीं ।

तुलसीदासांनीं विवाहाचें सविस्तर वर्णन प्रेमळवाणीनें केलें आहे. ' करि बैदिक लौकिक सब रीती '—वैदिक व लौकिक सर्व प्रकार यथासांग झाले. ईशसम भाव ठेवून जनकानें दशरथाची पूजा केली व सर्व वऱ्हाडी मंडळींचा दानानें, मानानें, विनयानें व मृदु वाणीनें गौरव केला. सर्व कुलधर्म कुलाचार उभयपक्षीं सादर पाळले गेले.

गान निसान कोलाहलु भारी । प्रेमप्रमोदमगन नरनारी ।

मधुपर्क, वरात, सप्तपदी, जेवणावळी, हास्यविलास, इ० सर्व प्रकारांचें यथास्थित वर्णन आहे.

सीतेच्या मातांनीं तिला सासऱ्या जाण्यापूर्वी बोध केला तो असा:–

होयेहु संतत पियहि पियारी । चिर अहिवात असीस हमारी ।
सासुससुर गुरुसेवा करेहू । पतिरुख लखि आयसु अनुसरेहु ॥

तूं, आपल्या पतीची लाडकी हो, अखंड सौभाग्यवती हो, सासूसासरे न गुरुजन यांची सेवा करीत व पतीचें मनोगत ( रुख–रोख ) जाणून त्याच्या आज्ञेप्रमाणें राग" हाच बोध सर्व कुलीन माता आपल्या नवपरिणत कन्येचा करोत असतात.

राम व सीता यांना निरोप देतांना जनक व त्याची राणी यांना वियोगदुःख अपार झालें. तें वाचीत असतांना शाकुंतलनाटकाच्या चौथ्या अंकाचें स्मरण होतें, तथापि तुलसीदासांचें वर्णन अत्यंत कोमलभावनाप्रचुर आहे. येथें करुणरस मूर्त आहे. प्रेमवश सासूनें ' सीता आमची सवांची किती लाडकी आहे हें जाणून व इच्या सुशीलतेकडे व प्रेमाकडे लक्ष देऊन हिला आपली दासी मानून

घ्यावी ' अशी रामाची विनंति केली. हें माहेरचें प्रेम व ' वधू लरिकिनी परघर आई। राखेहु नयनपलक की नाई- ' ह्या सुना मुलीच असून परक्या घरीं येत आहेत तरी नेत्रांना जशा पापण्या जपतात त्याप्रमाणें ह्यांचें प्रेमानें रक्षण करा'-अशी दशरथानें कौसल्यादि राण्यांना बजावल्या वेळचें सासरकडचें प्रेम ह्या उभयपक्षीय प्रेमाचा वर्षाव सीतेवर होत होता. पुढें अयोध्याकांडांत कौसल्येनें सीतेला किती प्रेमानें व प्राणापलीकडचें प्रेम करून वागविलें याचें गोड वर्णन आहे. सीतावियोगप्रसंगानें जनक एवढा विदेही पण तोही विव्हळ झाला.

सीय बिलोकि धीरता भागी। रहे कहावत परमबिरागी।
लीन्हि राय उर लाइ जानकी। मिटी महामरजाद ज्ञान कीं॥

' सीतेला पाहून जनकाचें धैर्य गळालें! ' परमबिरागी ' हे शब्द मात्र राहिले (त्याचें वैराग्य केव्हाच लोपून त्याच्याऐवजीं अत्यंत प्रेमानें त्याचें हृदय भरून आलें!) जनकानें सीतेस पोटासी धरले. त्याचें ज्ञान अत्यंत अमर्याद होतें, पण यावेळीं तें संपुष्टांत आलें!

ज्ञानवैराग्यावर प्रेमानें मात केली, प्रेमाचें सामर्थ्य अधिक ठरलें! ज्ञानवैराग्यावरही प्रेमाचा पगडा बसला! तर मग वैराग्य श्रेष्ठ कीं प्रेम श्रेष्ठ? ज्ञानावर प्रेमाची केली कडी आहे!

जनकानें रामभरतांची प्रेमपूर्वक पाठवणी केली आहे. परत आल्यावर अयोध्येतही आनंदीआनंद झाला. 'मागध सूत बंदि नट नागर' हे सारें विश्व भरून उरलेलें रामयश गाऊं लागले. अयोध्येंतील रत्नतोरणें पाहून हीं इंद्रधनुष्यें पसरलीं आहेत असें वाटलें, चंचल व उज्ज्वल विद्युलतांप्रमाणें चमकणाऱ्या नारी आपल्या माड्यांत क्षणांत प्रगट होत व क्षणांत दूर होत.

मंजुल मनिमय बंदनवारे। मनहु पाकरिपुचाप सवारे।
प्रगटहि दुरहि अटन पर भामिनि। चारु चपटल जनु दमकहि दामिनि।

अयोध्येंत पुण्याहवाचनादि सर्व वेदविधि झाले. सारी नगरी आनंदानें फुलून रामाची व सर्व राजघराण्याची लोकप्रियता निदर्शनास आली, ' प्रेम प्रमोद बिनोद बढाई। समउ समाज मनोहरताई '-प्रेम, आनंदोत्कर्ष, विनोद, गांभीर्य, मनोहरता यांनीं नगरी गजबजून गेली. रुचिर सेजेवर राम निजले. राममाता भोंवती जमून रामाला विचारीत " बाळा! तुझें हें श्यामसुंदर शरीर--तूं घोर ताटिका कशी रे मारली? ' ते मेले घोर दुष्ट बलाढ्य मारीचसुबाहु भयंकर राक्षस कसें रे मारलेस! पदरजानें मुनिपत्नीचा तूं उद्धार केलास! वज्रतुल्य कठोर शिवचापाचा भंग केलास! विश्वविजय अशी ही जानकी मिळविलीस आणि

आपल्या भावंडांचींही लग्नें करून तूं घरीं सुखरूप आलास ! ह्या तुझ्या अमानुष लीला सारें जग गात आहे. आमचें जन्म धन्य केलेस ! 'अजि सुफल जग जनम हमारा '–आमचे जीव तुझ्यावरून खचित ओवाळून टाकावेत ! " रोज रोज ह्याच गोड गोष्टी चालत–पुनरुक्तीनें अधिक रंग भरे ! नित्य सकाळीं वसिष्ठ धर्म व इतिहास रामादिकांस ऐकवीत. वसिष्ठांनीं विश्वामित्राचें फार फार गौरव केलें. असा अयोध्येंत नित्य नवा आनंद भरून राहिला.

—×—

# विनवणि

## ( के० भि० थापट )

अजि धांव धांव सदया । तव पाय दावि सदया ॥
तुजवीण फार शिणलों । बहु दुःख भार त्यालों ।
तरि कां नयेची करुणा । तुज दीनबंधु कृष्णा ॥ १ ॥
मी थोर पापराशी । म्हणुनीच वीट घेशी ।
तरि काय हें मुकुंदा । तव योग्य होय बिरुदा ॥ २ ॥
विजनांत पाप करुनी । स्वजनांत फार सजुनी ।
स्व--परांस वंचिलें रे । अजि कोण सोडवी रे ॥ ३ ॥
मन चिंति कामिनीला । मुखिं नाम तें कशाला ।
परि हें न चित्तिं राहे । मधुकैटभांतका हे ॥ ४ ।
जरि लोभ कांचनाचा । तरि आत्मलाभ कैचा ।
हरि ही सदुक्ति साची । चित्तांत राहिनाची ॥ ५ ॥
बहु शब्दजाल पढलों । अडकोनि त्यांत पडलों ।
नच संशयास अंत । परि होय मी महंत ॥ ६ ॥
जंव लौकिकासि जपतो । तंव व्यर्थ नाम--जप तो ।
हृदयांत हेंच ठसवीं । तव मूर्ति मनिंहि वसवीं । ७ ॥
अनिवार मोह-माया । मज दुस्तरा तराया ।
तरि तूंच देवराया । इजलागिं ये वराया ॥ ८ ॥
चित्तास शांति देईं । वाचेसि मौन देईं ।
निज बोधिं बुद्धि राही । मग मी असो कसाही ॥ ९ ॥
धिःक्कार दुष्कृताचा । आधार सज्जनाचा ।
करण्यास बुद्धि देईं । मनिं आस राघवा ही ॥ १० ॥

# मराठी वाङ्मयाचा इतिहास–खंड पहिला

## पृ० सं० ८३२ ] ज्ञानेश्वरनामदेवांचा काल. [ किंमत रुपये चार

ग्रंथकारः–लक्ष्मण रामचंद्र पांगारकर,

## ग्रंथांतील मुख्यमुख्य विषय

पूर्वार्ध ----वेदधर्मीयांची एकरूपता व परंपरेच्या ज्ञानाची अवश्यकता पृ० १ ते १२. ऋग्वेद, वैदिक देवतांच्या प्रार्थना व ऋग्वेदांतील अध्यात्मविद्या ११ ते २६ ; इतर वेद, वेदांगें, उपवेद व वेदोपांगें २७ ते ३९. सांख्यशास्त्र व पातंजलयोग ४० ते ४७; उपनिषदें व आत्मविद्या, शांडिल्यादि द्रष्टे, याज्ञ-वल्क्य, नचिकेत् व यम, ब्रह्मविद्येचा आनंद व उपनिषदांतील सूत्रें ४७ ते ८७; भगवद्गीता, मोहनिरास हा गीताशास्त्राचा हेतु व ज्ञानोत्तरभक्ति ही गीतेचें रहस्य, गीता, उपनिषदें व भागवत ८७ ते १११; श्रीमद्भागवत, अभेदाची बैठक, भाग-वतांतील मुख्य विषय, श्रीकृष्णाचा संसार, भक्ति, भक्त, देव, गुणानुवाद व नाम-संकीर्तन, सत्संग, भागवतधर्माचीं मुख्यतत्त्वें, व गोपींचें भक्तिप्रेम ११२ ते १६५ भक्तिमार्गाचें अनादित्व व शिवविष्णुसंप्रदाय, पंचरात्र व भागवत, शिवविष्णु ह्या देवतांचें वैदिकत्व, शिवविष्णूंची एकात्मता १६६ ते १८०.

ब्राह्मण व क्षत्रिय--अवनतीस आरंभ १८१ ते १८४; गौतमबुद्ध व महावीर १८५ ते १८७; वैदिकधर्माचे सिद्धांत १८७ ते १९०; बौद्ध व जैनपंथ १९१, चंद्रगुप्त, अशोक, व अशोकाचे आदेश १९१ ते १९९; पुष्पमित्र, विक्रमादित्य, समुद्रगुप्त, हर्षवर्धन, १९९ ते २०५; सातव्या शतकांतल्या हिंदुसमाजाची स्थिति २०९ ते २२०; बुद्धपंथाचें परदेशीं प्रयाण २२३ ते २२६.

बौद्ध व जैन यांशीं झगडून वैदिकधर्माचें पुनरुज्जीवन करणाऱ्यांत अग्रेसर जे तामीळ त्यांचें साम्राज्यवैभव, त्यांच्यांतील वैष्णव व शैव संतवीर व त्यांच्यांतच झालेले आचार्य, याविषयीं सातवें प्रकरण महत्वाचें आहे. ही माहिती महाराष्ट्री-यांस नवीनच आहे. तामीळांची श्रेष्ठ कामगिरी २२७ ते २२९, चोल, पांड्य, चेर व पल्लव राजे २२९ ते २३६; तामीळांची अजस्र शिल्पकामें २३८; नम्माळ-वारादि बारा अळवार उर्फ वैष्णव; संबंदर, अप्पर, माणिक्कवासहर, नंद इ० शैव व त्यांचीं प्रेमळ कवनें २४२ ते २७४; कुमारील भट्ट २७८ शंकराचार्य, त्यांची कामगिरी व त्यांचे ग्रंथ २७६ ते २८६; रामानुजाचार्य व मध्वाचार्य; या तीनही आचार्यांचीं मतें व त्यांचें मतैक्य २८६ ते ३०१.

उत्तरार्धः—महाराष्ट्र देश व मराठे लोक आणि महाराष्ट्री उर्फ मराठी भाषा ह्या ८० पृष्ठांच्या दोन प्रकरणांत महाराष्ट्राच्या चतुर्सीमा; राष्ट्रकूट, शालि-वाहन, चालुक्य व जाधव ह्या चार प्राचीन राजघराण्यांचा इतिहास; रामदेवराव जाधव व ज्ञानेश्वर, हेमाद्रि व बोपदेव, पंढरपूरचा वारकरी संप्रदाय, देशी भाषांचा उगम; वररुचीचें व्याकरण व हालाची सप्तशती; मुकुंदराज, महानुभाव कवि, व विशेषतः ज्ञानेश्वर यांनीं मराठी वाङ्मयाचे ठरविलेलें शांतरसात्मक धोरण; इ० विषयांचें सांगोपांग विवेचन केलेलें आहे. आदि कवि मुकुंदराज यांची परंपरा, त्यांचे विवेकसिंधु व परमामृत हे ग्रंथ व त्यांतील विषय यांचें विवरण पृ० ३८९ ते ४१२. नाथपरंपरा व तिचा महाराष्ट्राशी संबंध, गोरक्षनाथ व त्यांचें मराठी कवित्व, गहिनीनाथ व निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा ४८१ ते ४९७.

११ वें प्रकरण महानुभाव पंथ व त्याचें गद्यपद्यात्मक प्राचीन मराठी वाङ्मय याला दिलें असून त्यांत पंथाचे संस्थापक, पंथाचे आचारविचार, पंथीयांची कृष्णभक्ति, वारकरीपंथाशी त्याचें साम्य व वैषम्य, महानुभावीय मराठी ग्रंथकार, व त्यांचे गद्यपद्यग्रंथ इ मुद्यांचें विवरण केलें आहे. पुढें 'श्री ज्ञानेश्वरदर्शन' आहे. ज्ञानेश्वरांचीं दोन जुनी (एक अप्रकाशित) चरित्रें, त्यांच्या ग्रंथांतून प्रगट झालेलें त्यांचें आत्मचरित्र, ज्ञानेश्वरीवर पूर्वील ग्रंथांचे संस्कार, निवृत्तिनाथ, कृष्णार्जुनप्रेमप्रसंग, संतांची ज्ञानेश्वरभक्ति, ज्ञानेश्वरांच्या हृदयीचा जिव्हाळा इ० (प्र० १३) नामदेव, विठ्ठलभक्ति, त्यांच्या अभंगांची गोडी, गुरु विसोबाखेचर, व शिष्य परिसाभागवत, (प्र० १४) ओवी व अभंग, अभंग ज्ञानेश्वरीकारांचेच, ज्ञानेश्वरांची अभंगवाणी, चांगदेव, मुक्ताबाई व जनाबाई गोरा कुंभार, सेना न्हावी, नरहरि सोनार, सावतामाळी, जोगापरमानंद चोखामेळा इ० भक्त व त्यांची कविता, वैष्णवांचा मेळा व दहीकाल्याचा प्रसाद (प्र० १५) ज्ञानेश्वरींतील उपमारूपकादि-कांची गर्दी, गीतेची थोरवी, अठराअध्यायांतील विषयः- उर्फ ज्ञानभक्तियोग, कर्म, ज्ञान, भक्ति, ज्ञानाज्ञानांचीं लक्षणें, अद्वैतभक्तीची पराकाष्ठा, परमरहस्य, अमृता—नुभव (प्र० १६) आध्यात्मिक दृष्टि व आधिभौतिक सृष्टि, ज्ञानेश्वरींत प्रतिबिंबि-लेली लोकस्थिति उद्योग व व्यापारधंदे, शेती व बागाईत, रोग व रोगनिवारण, लौकिक समजुती व शास्त्रीय कल्पना, प्रपंचाची ब्रह्मरूपता, पतिपत्नी, भोजनाचे पदार्थ, लग्न व पाहुणे, अपत्यप्रेम, वृक्षवेली, पशुपक्षी व कृमिकीटक, सिंह आणि गाय, पारधी व पोपट, चकोर व चातक, भ्रमर, चक्रवाक, कासवी, राजहंस, बक इ० इ० (प्र० १७) कीर्तनाचा सुख-सोहळा, नामदेवांची पंजाबांतील कामगिरी शीखांच्या ग्रंथसाहेबांतील नामदेवांची (अर्थासह,) पद्यें (प्र० १८).

# प्रस्तुत ग्रंथावरील विद्वानांचे अभिप्राय.

## ( १ ) पुणें, ज्ञानप्रकाश ( ता. २।९।३२ )

" मराठी वाङ्‌मयाचा इतिहास या पुस्तकमालेच्या नांवावरूनच त्याची व्यापकता दिसून येणारी आहे. पुस्तकाला व्यापक नांव देणें कठिण नाहीं पण त्याप्रमाणें करणी करून दाखविणें हेंच काम खरोखर बिकट आहे. त्यास नुस्ता उत्साह असून चालत नाहीं. त्या उत्साहाचें योग्य चीज होण्यास दीर्घ व्यासंग व प्रशंसनीय विद्वत्ता यांची अवश्य जोड लागते व हे सर्व गुण रा. पांगारकर यांच्या अंगीं पूर्णतेनें वसत आहेत याबद्दल समंजस माणसांत मतैक्यच होईल असा आह्मांस भरवसा वाटतो. रा. पांगारकर त्यांनीं मराठी वाङ्‌मयास व पर्यायानें त्याच्या इतिहासास साहाय्यक किंवा उपकारक होणारीं अशीं अनेक वाचनीय पुस्तकें लिहिलीं आहेत, पण त्यांचा प्रस्तुतचा प्रयत्न हा त्या सर्वांच्या शिरोभागीं बसविण्यासारखा आहे. यांत मराठी भाषेची उत्पत्ति व विकास यांचा केवळ जंत्रीवजा वृत्तांत दिला नसून प्रत्यक्ष पुस्तक पाहिल्यावर कर्त्यांची इतिहासदृष्टिच फार व्यापक व पल्लेदार असल्याचें दिसून येईल. आपण केलेल्या दीर्घव्यासंगाचा जनतेस खरोखरीच योग्य उपयोग व्हावा अशी श्रेयस्कर दृष्टि बाळगूनच त्यांनीं हें पुस्तक अत्यंत परिश्रमशीलतेनें व वाचकांस बहुश्रुत करण्याच्या सदिच्छेनें लिहिलें असल्याचा प्रत्यय येतो......शेवटच्या पांच प्रकरणांतून ज्ञानेश्वरीचें अंतरंग आविष्कृत केलें आहे. ज्ञानेश्वरी हा काय चीज आहे हें यांतील प्रकरणांवरून उत्कृष्ट दिसून येणारें आहे. ज्ञानेश्वरींतील प्रतिपाद्य विषय हृद्य व मनोरम रीतीनें ह्या ग्रंथांत वर्णन केले आहेत. ग्रंथकर्त्यांचा ज्ञानेश्वरीचा व्यासंग जसा उत्कृष्ट दृष्टोपत्तीस येतो त्याप्रमाणेंच रम्य स्थळें निवडून काढण्यासंबंधांतील त्यांची रसिकताही निदर्शनास येते......ज्ञानेश्वरीची दृष्टि आध्यात्मिक असली तरी त्या दृष्टींत आधिभौतिकसृष्टिही कशी सामावली आहे हें १७ व्या प्रकरणांत सविस्तर दाखविलें आहे. त्यावरून तत्कालीन परिस्थितीवर जसा उत्कृष्ट प्रकाश पडतो त्याप्रमाणेंच ज्ञानेश्वर महाराजांची सर्वव्यापी किंवा सर्वंकष निरीक्षणशक्ति दृग्गोचर होते...... तात्पर्य हा ग्रंथ ऐतिहासिक दृष्टीनें सर्वस्वी वाचनीय असा झाला आहे. एवढ्या काळाचा सुसंगत असा इतिहास लिहिण्याचा रा. पांगारकर यांनीं संकल्प करून त्यांतला पहिला खंड—पुढील खंडही उत्कृष्ट निघतील अशी ग्वाही देणाऱ्या स्वरूपांत- काढला याबद्दल त्यांचें कोणीही प्रशंसापूर्वक अभिनंदनच करील. त्या

काळचा श्रद्धापूर्वक कोणास अभ्यास करावयाचा असल्यास हा ग्रंथ जसा उपकारक ठरणार आहे, तसाच त्याचा चिकित्साबुद्धीनें अभ्यास करणारांसही तो अनेक रीतीनीं साहाय्यक होणार आहे; किंबहुना अशा व्यापक व सर्वोपयोगी विषयास रा. पांगारकर यांच्यासारखा परिश्रमशील, पर्युत्सुक व पारंगत असा ग्रंथकार लाभला हें मराठी वाङ्मयाचें सुदैवच समजलें पाहिजे. पुढील खंड लवकर प्रकाशित होवोत अशी प्रस्तुत खंडाची शोभन मांडणी पाहून कोणीही सदिच्छा करील."

## (२) नागपूर, महाराष्ट्र (ता० ३१।७।३२).

"विद्वत्तेच्या, भाषाप्रभुत्वाच्या आणि ग्रंथकर्तृत्वाच्या दृष्टीनें ज्यांना मराठी वाङ्मयाच्या निरनिराळ्या शाखांचे आचार्य ह्मणतां येईल अशा श्रेष्ठ लेखकांत श्री. पांगारकर यांची गणना होते. मराठी प्राचीन काव्याचें त्यांच्याइतकें व्यापक आणि नैष्ठिक अध्ययन केलेला पंडित आज महाराष्ट्रांत प्रायः एकही सांपडणार नाहीं. प्राचीन कवींचा व्यासंग, त्यांच्या ग्रंथांच्या आणि विचारांच्या भूमिकेशीं समरस होऊन, केलेला बहुश्रुत ग्रंथकार आज महाराष्ट्रांत पांगारकरांशिवाय एकही नाहीं......त्यांच्या परिशीलनाची व्याप्ती आणि ग्रंथलेखनही इतर ग्रंथकारांपेक्षा खचित अधिक विस्तृत आहे ... भावे यांच्या 'महाराष्ट्रसारस्वतापेक्षां' हा ग्रंथ सर्वच दृष्टीनीं अधिक भरदार आहे. पाश्चात्य वाङ्मयाच्या इतिहासांतून त्या त्या काळच्या घडामोडी व त्यांचे वाङ्मयावरील परिणाम यांचें ज्याप्रकारचें विवरण आपण वाचतों त्या प्रकारच्या विवेचनाचा अल्पांशही भावे यांच्या ग्रंथांत दृष्टीस पडत नाहीं; श्री. पांगारकर यांचा ग्रंथ त्या मानानें किती तरी अधिक समावेशक असून, त्यांत प्राचीन मराठी वाङ्मयाची भूमिका विशद करण्यासाठीं त्यांनीं अतिशय परिश्रम घेतले आहेत...श्री. पांगारकर यांनीं ग्रंथाच्या पूर्वार्धांत वैदिक उपनिषद्वाङ्मय आणि दुसऱ्या बाजूनें तामील वाङ्मय यांचा विस्तारानें केलेला प्रपंच समर्थनीयच वाटतो. ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी यांच्या विषयी २१० पृष्ठांत जें विवेचन केलें आहे त्यांत श्री. पांगारकर यांच्या अध्ययनाचा परिपाक सांठविला आहे......मराठी भाषा आणि प्राचीन मराठी वाङ्मय यांची भूमिका परिश्रमपूर्वक व मार्मिकतेनें विशद केलेली असून मुकुंदराज, ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या काव्याचें विवेचन अत्यंत सरस केलें आहे. मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना प्रस्तुत ग्रंथ ह्मणजे एक वरदानच वाटेल."

## ( ३ ) नवाकाळ–मुंबई [ ता० १५।९।३२ ]

“ श्री. पांगारकर यांच्या वाङ्मयसेवेचा परिचय नव्यानें करून देण्याची आवश्यकता नाहीं. संतवाङ्मयाचा व संतचरित्राचा अभ्यास या कार्याला त्यांनीं स्वतःला गेलीं ३०।३५ वर्षें वाहून घेतलें आहे व त्या कार्यांत त्यांनीं मोठा अधिकार संपादन केला आहे. मोरोपंत, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम यांचीं चरित्रें त्यांनीं लिहिलीं असून तीं सर्वमान्य झालीं आहेत.... ह्या खंडाच्या पूर्वार्धानें ३०० पानें व्यापलीं असून त्यांत भागवतधर्माचा स्वतंत्र इतिहास गोंवला आहे. मराठी वाङ्मयाच्या विकासाचें कारण जो भागवतधर्म त्याची इत्थंभूत माहिती वेदकाळापासून तों अर्वाचीन परंतु ऐतिहासिक आचार्यांदिकांपर्यंत पूर्वार्धांत दाखल केली आहे. या भागाच्या आवश्यकतेबद्दल दुमत होणार नाहीं. उत्तरार्धाच्या ५०० पानांत महाराष्ट्रभाषेच्या इतिहासाला प्रारंभ होऊन तो ज्ञानेश्वर नामदेवादिकांच्या कालाअखेर आणून सोडला आहे. नामदेव व इतर तत्कालीन साधुसंत यांच्याहून स्वाभाविकपणेंच ज्ञानेश्वरसंबंधी विवेचनानें उत्तरार्धाची मोठी जागा घेतली आहे. रा. पांगारकरांचा ज्ञानेश्वरविषयक अभ्यास दीर्घकालीन असून त्याचा परिपाक ह्या ग्रंथांत अनेक प्रकारें उतरला आहे. ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाचा अभ्यास करणारांना श्री. पांगारकरांच्या ग्रंथांत तत्संबंधी विविध विषयांच्या विवेचनाची रेलचेल आढळेल, त्यांतल्या त्यांत ‘ ज्ञानेश्वरीचें अंतरंग ’ व ‘ ज्ञानेश्वरी सृष्टि ’ हीं दोन प्रकरणें सरस साधलीं असून वाचकांनीं श्री० पांगारकरांच्या व्यासंगाची कल्पना येण्यासाठीं तीं अवश्य पहावींत ..त्यांनीं वेदांतविषयाच्या मनोहर निरोपणांत झांकलेली ज्ञानेश्वरकाळांतील समाजसृष्टि निराळी दाखविली आहे. ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांना हें प्रकरण अभिनव वाटेल. भागवतधर्माच्या बैठकीचा विसर पडून व परंपरेला दृष्टिआड ठेवून लिहिलेले कांहीं साहित्याचे इतिहास उपलब्ध आहेत, पण तीं न्यूनें भरून काढण्याचा प्रयत्न श्री० पांगारकरांनीं केला आहे व त्यामुळें त्यांचा हा इतिहास पुष्कळसा सुसंबद्ध वाटतो. ग्रंथकाराच्या भाषाशैलीबद्दल निराळें लिहिण्याची गरज नाहीं. मधुर व प्रेमळ भाषाशैलीबद्दल रा. पांगारकरांची ख्याति आहे. छपाई स्वच्छ व बाइंडिंग मजबूत आहे. किंमत रुपये चार अत्यंत माफक ह्मणावी लागते. पुढील संकल्पित भाग लवकर बाहेर पडतील असा भरंवसा आहे. ”


## मारुतीउपासना.

प्रथम मारुतिरायांचें समग्र सुंदर चरित्र दिलें असून पुढें भीमरूपी स्तोत्रें अभंग, पदें, श्लोक, आरत्या वगैरे सर्व दिल्या आहेत. सुधारलेली आवृत्ति चौथी

किं ८४ पत्ताः—मुमुक्षु कचेरी नाशीक सिटी.

## [ ४ ] पुणें-केसरी ( ता० १'५।११।३२ )

"रा. पांगारकर यांनीं संतांचीं चरित्रें गाइलीं आहेत व त्यांच्या ग्रंथांचें विवेचन भक्तिपूर्वक केलें आहे. रा. लक्ष्मणरावजी पांगारकर यांनीं २५ वर्षांपूर्वी मोरोपंतांचें चरित्र लिहून त्यावर सत्कीर्ति संपादिली नंतर अनेक लहानमोठ्या चरित्रांची व इतर पुस्तकांची रचना त्यांजकडून झाली. प्रस्तुतसारख्या इतिहास-ग्रंथाचें महत्व स्वयंसिद्ध आहे. या विषयावरील त्यांचें गाढ प्रेम व दीर्घ व्यासंग लक्ष्यांत आणतां प्रस्तुत ग्रंथास रा. पांगारकरांच्या सर्व ग्रंथांत अग्रस्थान द्यावयास पाहिजे......मराठी वाङ्मयाचा संपूर्ण इतिहास लिहिण्याचा संकल्प बी. ए. होण्यापूर्वीं म० ३४ वर्षांपूर्वीं त्यांनीं केला होता. या दीर्घकाळांत त्यांच्या बुद्धीस, विचारशक्तीस, विवेचकपणास व व्यासंगास परिपक्कदशा प्राप्त झाली असल्यामुळें त्यांचा श्रेष्ठपणा आपोआपच सिद्ध होत आहे......प्रस्तुत खंडाचे दोन भाग केले आहेत मराठी वाङ्मयाच्या पितृस्थानीं वेद, उपनिषदें, गीता व भागवत हे ग्रंथ असून त्यांतील तत्वांचा व ज्ञानाचा प्रसार मराठी संतमंडळीनीं बहुजनसमाजांत केला या दृष्टीनें प्रस्तुत खंडाच्या पूर्वार्धाची जरूर असली तरी या कामीं जीं ३०० पृष्ठें खर्च झालीं ती ज्यास्त होत असें वाटतें......महानुभावीय वाङ्मया-बद्दल पूर्वीं चांदोरेकर व भावे यांनीं कांहीं संशोधन केलें असलें तरी तें वाङ्मय व त्यांतील पंथ या संबंधाचें सुसंगत व विस्तृत विवेचन पांगारकरांच्या प्रकृत इतिहासांतच प्रथम वाचावयास सांपडतें. पंढरपूरच्या संप्रदायाला महानुभावपंथ जितका जवळ आहे तितका दुसरा कोणताही पंथ नाहीं हें पांगारकरांचें विधान यथार्थ होय. ज्ञानेश्वर व नामदेव या दोन प्रमुख संतकवींवरून सदर काळास त्यांचें नांव मिळालें तरी उभयतांच्या नांवाखालीं किती तरी नांवें झाकलीं गेलीं आहेत.... त्या काळांत हल्लींच्या लक्षांशही पुस्तकी शिक्षण फैलावलें नसता स्त्रीपुरुष व मुलेंबाळें भक्तिमार्गांत इतकीं दंग झालीं यावरून सांप्रत आमच्या देशांत उद्भवलेल्या राजकीय स्फूर्तीपेक्षाही तत्कालीन धार्मिक स्फूर्ति अधिक जिवंत, अधिक प्रबळ, व अधिक उत्साहवर्धक होती असें कबूल करणें भाग पडतें (हेंच चार प्रकरणांत १३ ते १६ विशद करून दाखविलें आहे.) .....त्यावेळचें वाङ्मय इतकें प्रेमळ, रसाळ, गोड व उदात्त आहे कीं तें वाचून कोणासही आनंद झाल्यावाचून राहणार नाहीं. ज्ञानेश्वरी हा त्या रत्नशाळेंतील कोहिनूर हिरा होय. त्याचें 'अंतरंग' पांगारकरांनीं आपल्याकडून शक्य तितकें उकलून मांडलें आहे. त्या एकाच प्रकरणास त्यांनीं ७५ पानें खर्च केलीं आहेत ज्ञानेश्वरीची शिकवण व योग्यता कळण्याच्या दृष्टीनें हें प्रकरण अत्यंत महत्त्वाचें समजलें पाहिजे ..... एकंदर ग्रंथाची रचना फार परिश्रमपूर्वक झाली असून त्या दृष्टीनें मराठी भाषेंत हा ग्रंथ पहिलाच ठरत असल्यानें महाराष्ट्रवाङ्मयाच्या या सेवेबद्दल लक्ष्मणरावजींचे जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे."

# वैराग्य

( लेखक - जयदयालजी गोयन्दका )

## १ वैराग्याचें महत्त्व

कल्याणकामी पुरुषाला वैराग्यसाधनाची परम आवश्यकता आहे. वैराग्य झाल्याशिवाय आत्म्याचा उद्धार कधींही होत नाहीं. खऱ्या वैराग्यानें सांसारिक भोगपदार्थांच्या ठिकाणीं उपरामता उत्पन्न होते. उपरामतेनें परमेश्वराच्या स्वरूपाचें यथार्थ ध्यान होत असतें. ध्यानानें परमात्म्याच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान होतें आणि ज्ञानानें उद्धार होतो. जे लोक ज्ञानसम्पादनपूर्वक मुक्तिलाभ करून घेण्याच्या कामीं वैराग्याची व उपरामतेची कांहीं आवश्यकता समजत नाहींत. त्यांची मुक्ति ही वास्तविक मुक्ति नसून तो केवल भ्रम होय! वैराग्यउपरामतारहित ज्ञान हें वास्तविक ज्ञान नसून तें केवळ वाचिक आणि शास्त्रीय ज्ञान आहे; त्याचें फल मुक्ति नव्हे तर अधिकच दृढ बंधन हें आहे. म्हणून श्रुति म्हणते—

अन्धतमः प्रविशन्ति ये ऽविद्यामुपासते ।
ततो भूय इव ते तमो य उ विद्यायां रताः ॥ ( ईश० मं० ९ )

'जे अविद्येची उपासना करतात ते अंधःकारांत प्रवेश करतात आणि जे विद्येच्या ठिकाणीं रत आहेत ते त्याहून गाढ अंधःकारात प्रवेश करतात.' असला वाचिक ज्ञानी निर्भय होऊन विषयभोगांत प्रवृत्त होतो त्याच्या विचारानें पाप देखील पाप रहात नाहीं यामुळें तो विषयरूपी दलदलींत फसून पतित होतो— अशाच लोकांविषयीं ही उक्ति प्रसिद्ध आहे—

ब्रह्मज्ञान जान्यो नहिं, कर्म दिये छिटकाय ।
तुलसी ऐसी आतमा, सहज नरकमहं जाय ॥

'ब्रह्मज्ञानाचा कांहीं पत्ता नाहीं पण कर्म मात्र सोडून मोकळा झाला. तुलसीदास म्हणतात. असला आत्मा ( जीव ) सहज नरकांत जाऊन पडतो.'

वास्तविक पाहिलें तर असें करणें हें ज्ञानाच्या नांवावर महा अज्ञानाचें ग्रहण करणें आहे. अतएव यथार्थ कल्याणाची इच्छा असल्यास साधकानें खऱ्या दृढ वैराग्याचें उपार्जन केलें पाहिजे. एकादें सोंग रचण्याचें नाम वैराग्य नव्हे. कांहीं कारणानें किंवा मूर्खपणानें स्त्रीपुत्रपरिवार व धनादींचा त्याग करणें, कपडे रंगविणें, मुंडण करणें; जटा वाढविणें अथवा दुसरी कांहीं बाहेरचीं चिन्हें धारण करणें याचें नांव वैराग्य नाहीं. मनांतून विषयांत रममाण व्हावयाचें आणि वरून मात्र वैराग्याचें सोंग सजवावयाचें हा मिथ्याचार- दंभ आहे. भगवान् म्हणतातः -

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इन्द्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥
(गीता ३-६)

'जो मूढबुद्धि पुरुष कर्मेन्द्रियांना हट्टानें रोकून इंद्रिय-भोगांचें मनांतून चिंतन करितो तो मिथ्याचारी अर्थात् दंभी म्हटला जातो '

सांप्रत दंभाचा फारच फैलाव होऊं लागला आहे. कोणी लोकांना ठकविण्यासाठीं दिखाऊ मौन धारण करतो, कोणी आसन लाऊन बसतो, कोणी विभूती फासतो, कोणी केस वाढवितो, तर कोणी धुनी पेटवून बसतो! उदरनिमित्त बहुकृतवेशम् '

हें कांहीं वैराग्य नव्हे. माझ्या या म्हणण्याचा अभिप्राय हा नव्हे कीं मी स्त्रीपुत्रधन शिखासूत्रादि तसेंच कर्मांचा स्वरूपतः त्याग करणें ही गोष्ट वाईट समजतों. मौन धारण करणें, आसन लावून बसणें, विभूती-लावणें, जटा वाढविण किंवा मुंडण करणें आदि कार्य अशास्त्रीय किंवा निंदनीय आहे असेंहि समजता कामा नये. माझें असेंही म्हणणें नाहीं कीं घरादारांचा त्याग करून हीं चिन्हें धारण करणारे सर्वच लोक पाखंडी आहेत. वरील कथन कोणाची निंदा किंवा घृणा करण्यासाठीं आहे असें बिलकुल समजूं नये. जे लोक वैराग्याच्या नांवावर आपली पूजा करवून आणि लोकांवर अनधिकार वजन टाकून त्यांना फसविण्यासाठीं नाना प्रकारचीं सोंगे रचतात अशाच लोकांसंबंधीं या ठिकाणीं माझा हा अभिप्राय आहे. जे साधक संयमास्तव, अंतःकरणाच्या शुद्धीसाठीं व साधना वाढविण्यासाठीं असें करीत असतील त्याची ही निंदा नाहीं. बाहेरून संयमाचें सोंग करून मनांतल्या मनांत मात्र विषयांचें मनन करीत रहावयाचें अशाच लोकांना भगवंतांनीं मिथ्याचार किंवा ढोंगी म्हटलें आहे.

जे पुरुष चित्त-वृत्तींना भगवच्चिंतनांत नियुक्त करून खऱ्या वैराग्यवृत्तीनें बाह्याभ्यन्तर त्याग करून राहतात त्यांची सर्व शास्त्रांनीं प्रशंसा केली आहे.

वैराग्य हा फारच रहस्याचा विषय आहे, याचें वास्तविक तत्त्व विरक्त महानुभावच जाणतात. वैराग्याची पराकाष्ठा अशाच पुरुषांत पहावयास मिळते कीं जे जीवन्मुक्त आहेत--ज्यांनीं परमात्मरसांत बुडून जाऊन विषयरसापासून आपणाला सर्वथा मुक्त करून घेतले आहे!

भगवान् म्हणतात—

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।
रसवर्जं-रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा विवर्तते ॥
(गीता २--५९)

" इंद्रियद्वारां विषयांचें ग्रहण न करणाऱ्या पुरुषाचे केवल विषय निवृत्त होऊन जातात, रस ( राग ) निवृत्त होत नाहीं; परंतु जीवन्मुक्त पुरुषांची विषयांची आवड देखील परमात्म्याच्या साक्षात्कारानें निवृत्त होऊन जाते. "

आतां आम्हाला वैराग्याचें स्वरूप, त्याच्या प्राप्तीचे उपाय, वैराग्यप्राप्त पुरुषांचें लक्षण आणि त्याचें फल याविषयीं थोडासा विचार केला पाहिजे. साधनकालांत वैराग्याच्या दोन श्रेणी मानल्या आहेत. त्यांना गीतेंत वैराग्य आणि दृढ वैराग्य, योगदर्शनांत वैराग्य आणि परवैराग्य आणि वेदान्तांत वैराग्य आणि उपरति या नांवानीं संबोधिलें आहे.

जरी वरील तिन्हीं प्रकारांतही परस्पर शद्वांत आणि ध्येयांत थोडा थोडा भेद आहे तरी बऱ्हंशी ते मिळते जुळते असेच शद्व आहेत. येथें त्यांचा उल्लेख लक्ष्य करण्यासाठींच केला आहे.

## २ वैराग्याचें स्वरूप

योगदर्शनांत यतमान, व्यतिरेक, एकेंद्रिय आणि वशीकार भेदानें वैराग्याच्या चार संज्ञा सांगितल्या आहेत. टीकाकारांनीं याच्या विस्तृत व्याख्या केल्या आहेत. त्या व्याख्या सर्वथा युक्तियुक्त आणि मननीय आहेत. तथापि येथें संक्षेपानें आपल्या साधारण बुद्धीनुरूप वैराग्याचें कांहींसें स्वरूप दाखविण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

( रा ) **भयामुळें उत्पन्न होणारें वैराग्य** - संसारांतील भोगांचा उपभोग घेतला म्हणजे नरकाची प्राप्ति होईल; कारण उपभोगासाठीं संग्रह करण्याची आवश्यकता आहे, संग्रहाकरिता आरम्भ आवश्यक आहे आणि आरंभांत पाप आहे. पापाचें फळ नरक किंवा दुःख हें आहे. याप्रमाणें भोगाच्या साधनांत पाप आणि पापाचा परिणाम दुःख समजून या भयानें विषयांपासून अलग होणें हें भयामुळें उत्पन्न होणारें वैराग्य आहे.

( म ) **विचारानें होणारें वैराग्य**—ज्या पदार्थांना भोग्य समजून त्यांच्या संगानें आनंदाची भावना केली जाते, ज्यांची प्राप्ति झाली असतां सुखाची प्रचीती मिळते असें वाटतें, ते वास्तविक भोग नव्हेत. सुखाचें साधनही नव्हे, किंवा त्याच्यांत सुखही नाहीं. दुःखपूर्ण पदार्थांत- दुःखांतच अविचारानें सुखाची कल्पना करून घेतली गेली आहे, म्हणून ते सुखरूप भासतात, वास्तविक ते तर दुःख किंवा दुःखाचें कारणच होत—भगवंतांनीं म्हटलें आहे —

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ।
आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः ॥ ( गीता ५-२२ )

हे जे इंद्रियें आणि विषय यांच्या संयोगानें उत्पन्न होणारे भोग आहेत ते विषयी पुरुषांना सुखरूप भासत असले तरीही ते निःसन्देह दुःखाचेच हेतु आहेत आणि आदि अंत असणारे अर्थात् अनित्य आहेत, म्हणून हे अर्जुना! बुद्धिमान् विवेकी पुरुष त्यांच्या ठिकाणीं रमत नाहीं. ते विषय अनित्य प्रतीत होत नसतील तर त्यांना क्षणभंगुर समजून सहन करावे भगवान् म्हणतात —

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः ।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥ ( गीता २–१४ )

उष्णता व थंडी आणि सुखदुःख देणारे हे विषयेंद्रियाचे संयोग क्षणभंगुर आणि अनित्य आहेत यासाठीं हे भारत! त्यांना तूं सहन कर. पुढील श्लोकांत या सहनशीलतेचें फल असें सांगितलें आहे—

यंहि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ ।
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ ( गीता २·१५ )

दुःखसुखांना समान समजणाऱ्या ज्या धीर पुरुषाला हे इन्द्रियांचे विषय व्याकुळ करीत नाहींत तो मोक्षाला योग्य होतो. पुढें भगवंतांनीं असें स्पष्ट सांगितलें आहे कीं जो पदार्थ विचारानें असत् ठरतो तो वास्तविक नाहीं असें समजावें, हाच तत्त्वदर्शी पुरुषांनीं निर्णय करून ठरविलेला सिद्धान्त आहे.

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥

" हे अर्जुना! असत् वस्तूचें अस्तित्व नाहीं आणि सत् वस्तूचा अभाव होत नाहीं याप्रमाणें या दोन्हींचें हें तत्त्व ज्ञानीपुरुषाकडून पाहिलें गेलें आहे. "

असें हें ' विवेकद्वारां उत्पन्न होणारे वैराग्य ' आहे.

( घं ) **साधनानें उत्पन्न होणारे वैराग्य**—साधन करीत असतां जेव्हां मनुष्य प्रेमविव्हल होऊन भगवतत्त्वांचा अनुभव करूं लागतो तेव्हां त्याच्या मनांत भोगांविषयीं आपोआप वैराग्य उत्पन्न होऊं लागतें, त्या वेळीं संसारांतील सर्व भोग-पदार्थ त्याला प्रत्यक्ष दुःखरूप प्रतीत होऊं लागतात, सर्व विषय भगवत्प्राप्तीच्या कामीं बाधक असलेले स्पष्टपणें त्याला दिसतें.

जे स्त्री पुत्र अज्ञान्याच्या दृष्टीला रमणीय व सुखप्रद वाटतात तेच त्याच्या दृष्टीला घृणित व दुःखप्रद दिसूं लागतात. यावरून कोणी असें समजूं नये कीं स्त्रीपुत्रादिकांशीं व्यवहारांत घृणा करावी. गृहस्थ साधकाला सर्वांशीं यथायोग्य प्रेमाचें वर्तन ठेवून मनांत वैराग्याची भावना जागृत ठेविली पाहिजे! घर धन-द्रव्य रूप--यौवन, गाडीघोडा- मोटार, पद–गौरव, छानछोकी, विलासिता, इ०

सर्वांच्या ठिकाणीं त्याची विषवत् बुद्धि होते आणि अशांचा संग त्याला प्रत्यक्ष करणाराहूनही अधिक बन्धनकारक, दुःखदायी व घृणास्पद वाटूं लागतो. मान—मोठेपणा, पूजा—प्रतिष्ठा, सत्कार—सम्मान यांना तो इतका भितो कीं जितका साधारण मनुष्य सिंहव्याघ्र, भूतप्रेत आणि यमराजाला भितो. त्याला ज्या ठिकाणीं सत्कार, पूजा किंवा सन्मान मिळण्याचा यत्किंचित् संभव दिसतो तेथें जाण्याला त्याला भय वाटूं लागतें, म्हणून अशा स्थानाला तो दुरूनच नमस्कार करतो! जी प्रशंसा–प्रतिष्ठा, मान—सम्मान मिळालीं असतां साधारण मनुष्य अगदीं फुलून जातो, त्यांच्या प्राप्तींत याला लज्जा, संकोच आणि दुःख होतें, तो त्यांत आपलें अधःपतन समजूं लागतो. आम्हां लोकांना ज्याप्रमाणें घृणित पदार्थ पाहण्याला किळस वाटते त्याप्रमाणें तो मान--बढाईची घृणा करतो, त्याला कोणी प्रसन्न केलें तरी किंवा कोणाच्या दबावानें तो मान--बढाईचा स्वीकार करीत नाहीं. त्याला ते प्रत्यक्ष नरकतुल्य प्रतीत होत असतात जे लोक त्याला मान—बढाई देतात त्यांच्यासंबंधीं तो असेंच समजतो कीं हे माझे भोळे बांधव माझ्या हितकामाच्या इच्छेनें विपरीत आचरण करीत आहेत! 'भोले साजन शत्रु-बराबर' अर्थात् भोळे प्रियजन शत्रूसारखे होत--ही म्हण खरी करीत आहेत म्हणून तो त्यांच्या क्षणिक प्रसन्नतेखातर त्यांच्या आग्रहाचाही स्वीकार करीत नाहीं. यांत त्यांचा कांहीं लाभ नसून आपलें मात्र पतन आहे हें तो जाणतो. उलटपक्षीं त्यांचा आग्रह स्वीकारण्यांत न दोष आहे न हिंसा आहे आणि या कार्या-साठीं या लोकांच्या या आग्रहानें बाध्य होणें धर्म--सम्मतही नाहीं. जो इहलोकीं व परलोकीं कल्याणकारी असेल तोच धर्म--जें लोक–परलोक दोन्हीं ठिकाणीं अहित करीत असेल तें कल्याण नव्हे तर अकल्याणच आहे, तो पुरस्कार नसून महान् विपत्ति आहे. मातापिता मोहवश बालकाच्या क्षणिक सुखासाठीं त्याला कुपथ्याचें सेवन करवितात आणि अखेरीला बालकाबरोबर आपणही दुःखी होतात त्याप्रमाणें हे भोळे भाईही तत्त्व न समजल्यामुळें मला या पाप--पंथांत ढकलूं पहात आहेत. समजदार बालक मातापित्यांचे असत्य आग्रह मानत नाहीं म्हणून तो कांहीं दोषी होत नाहीं. परिणामावर दृष्टि देऊन व विचार करून मातापिताही त्या बालकावर रागावत नाहींत. त्याप्रमाणें विचार केल्यानंतर हे बांधवही रागावणार नाहींत असें समजून तो कोणाकडूनही मिळणाऱ्या मान-बढाईचा स्वीकार करीत नाहीं. तो असें समजतो कीं त्यांचा स्वीकार केल्यानें मी मधल्यामधेंच अनाथाप्रमाणें मारला जाईन. माझ्याजवळ इतका त्याग नाहीं कीं दुसऱ्याच्या थोड्याशा खुशीकरितां मीं आपला सर्वनाश करून घ्यावा. अशा

कामीं त्याग- बुद्धि असली तरी विवेक, असल्या त्यागाला बुद्धिमत्ता समजत नाहीं किंवा उत्तमही म्हणत नाहीं. जे सरळ स्वभावाचे बांधव अज्ञानानें साधकांना याप्रमाणें मानबढाईचा स्वीकार करण्याला बाध्य करून त्यांना महांधकारांत आणि दुःखाच्या गाळ्यांत ढकलून देतात त्यांना परमात्मा सद्बुद्धि देवो कीं जिच्या योगानें ते साधकांना अशा तऱ्हेनें साधकांना विपत्तीच्या भोंवऱ्यांत टाकण्याला तयार न होवोत!

साधनद्वारां अशाप्रकारें विवेकयुक्त भावनांनीं भोगाविषयीं जें वैराग्य उत्पन्न होते तें साधनद्वारां होणारें वैराग्य आहे. अशा तऱ्हेच्या वैरागी पुरुषाला संसारांतील स्त्री, पुत्रि, मान, बढाई, धन ऐश्वर्यादि, प्रकाशमय सूर्य देवाचा उदय झाल्यावर तारे जसे दिसूं लागतात त्या प्रमाणें कान्तिहीन व नीरस प्रतीत होतात.

**( द ) परमात्मतत्त्वाच्या ज्ञानानें होणारें वैराग्य**– साधकाला जेव्हां परमात्मतत्त्व थोडोसें उपलब्ध होऊं लागतें तेव्हां त्याला संसाराचे संपूर्ण पदार्थ स्वतःच रसहीन आणि मायामात्र प्रतीत होऊं लागतात. त्याला भगवत्तत्त्वाच्या व्यतिरिक्त कशांतही दुसरें कांहीं सार प्रतीत होत नाहीं. ज्याप्रमाणें मृगजलाची माया समजून आल्यानंतर त्यांत जल दिसून येत नाहीं, झोपेंतून उठल्यावर स्वप्न-ज्ञान झाल्यानंतर, स्वप्न– संसाराचें चिंतन करूनही त्याची सत्ता भासत नाहीं त्याप्रमाणें तत्त्वज्ञानी पुरुषाला जगताच्या पदार्थांत सार किंवा सत्ता प्रतीत होत नाहीं. चतुर जादुगारानें तयार केलेल्या रम्य उद्यानांत इतर सर्वजण मोहित होऊन जातात परंतु त्याचें तत्त्व जाणणारा मर्मज्ञ साथीदार त्या उद्यानाला मायामय आणि निःसार समजून मोहित होत नाहीं, ( पण आपल्या मायापति मालकाची लीला पाहून अवश्य आल्हादित होत असतो ) तसें या श्रेणीचा वैरागी पुरुषही विषयभोगांत मोहित होत नाहीं.

अशा प्रकारच्या वैराग्यशाली पुरुषाची संसाराच्या कोणत्याही भोग पदार्थांत आस्था होत नाहीं. मग त्यांचे ठिकाणीं त्यांना रमणीयता किंवा सुखाची भ्रान्ति तरी कशी होऊं शकेल? असाच पुरुष परमात्म्याच्या परमपदास अधिकारी होत असतो! याला परवैराग्य किंवा दृढ वैराग्य म्हणतात.

## ३ वैराग्यप्राप्तीचे उपाय

उपर्युक्त विवेचनाचा विचार करून साधकानें प्रारंभीं सांसारिक विषयांना परिणामीं हानिकर समजून भयानें व दुःखरूप समजून घृणापूर्वक त्यांचा त्याग करावा. असें करतांना आपणाला मात्र दंभापासून अवश्य सांभाळले पाहिजे.

वारंवार वैराग्याची भावना केल्यानें, त्यागाच्या महत्त्वाचें मनन केल्यानें, जगाच्या यथार्थस्थितीचा विचार केल्यानें, मृत पुरुष, शून्य महाल, मोडकी घरें आणि खंडित वाडे पाहून व ऐकून, प्राचीन नरपतींची अंतिम गति ध्यानांत आणली असतां आणि विरक्त व विचारी पुरुषांचा संग केल्यानें हृदयांत असे विचार आपोआप उत्पन्न होऊं लागतात कीं त्यांच्या योगानें विषयांसंबंधीं विराग उत्पन्न होतो. पुत्र परिवार, धन, गृह, मानसन्मान, कीर्ति - कान्ति आदि समस्त पदार्थांच्या ठिकाणीं निरंतर दुःख आणि दोष वरचेवर पाहून त्यांपासून मनाला हटविलें पाहिजे. भगवंतानीं म्हटलें आहे—

> इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च।
> जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ॥
> असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु।
>
> (गीता १३-८।९)

इह-परलोकिक सम्पूर्ण भोगांच्या ठिकाणीं आसक्तीचा अभाव आणि अहंकाराचाही अभाव; एवं जन्म, मृत्यु, जरा व रोगादींच्या ठिकाणीं दुःखदोषांचा वारंवार विचार करणें तसेंच पुत्र, स्त्री, घर आणि वनादिमध्यें आसक्ति आणि ममता यांचा अभाव केला पाहिजे.

विचार केला असतां आणखी पुष्कळशीं प्रमाणें मिळतील कीं ज्यांच्या योगानें संसाराचे समस्त पदार्थ दुःखरूप प्रतीत होऊं लागतील.

योगदर्शनाचें सूत्र आहे—

> परिणामतापसंस्कारदुःखैर्गुणवृत्ति—
> विरोधाच्च दुःखमेव सर्वं विवेकिनः।
>
> (साधनपाद १५)

सर्व विषय हे परिणामदुःख, तापदुःख आणि संसारदुःख यांनीं मिश्रित आणि गुण--वृत्ति--विरोध असल्यानें, विवेकी पुरुषांच्या दृष्टीनें ते सुख--दुःखरूपच आहेत. येथें याचा थोडासा खुलासा दिला जात आहे—

(रा) परिणामदुःखता—जे सुख आरंभीं सुखरूप प्रतीत होऊन देखील परिणामीं महान् दुःखरूप असेल तें सुख परिणामदुःखता म्हटलें जातें. जसें रोग्याला प्रथम जिव्हेला स्वादिष्ट लागणारें कुपथ्य. वैद्यानें मनाई केली असतांना देखील इन्द्रियासक्त रोगी आपात—सुखकर पदार्थ स्वादाच्या आशेनें खाऊन अंतीं दुःख भोगतो, रडतो ओरडतो; त्याप्रमाणें विषयसुखें प्रारंभीं रमणीय आणि सुखरूप प्रतीत झालीं तरी परिणामीं महादुःखदायी आहेत. भगवान् म्हणतात—

विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रे ऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥

(गीता १८।३८)

जें सुख विषय व इंद्रियें यांच्या संयोगानें होतें तें भोग-कालीं जरी अमृतासारखे लागतें तरी तें परिणामीं (बल, वीर्य, बुद्धि, धन, उत्साह आणि परलोक यांचें नाशक असल्यानें) विषासारखें आहे म्हणून तें सुख राजस म्हटलें आहे.

गजकर्णाचा कंडू खाजवितेवेळीं फारच सुखद वाटतो, परंतु परिणामीं आग होऊं लागली म्हणजे तोच दुःखद होतो. हाच विषयसुखाचा परिणाम आहे. इहपारलौकिक सर्व विषयसुख परिणामदुःखतेनें भरलेले आहेत. मोठ्या पुण्यसंचयानें लोकांना स्वर्गाची प्राप्ति होते परंतु 'ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति।' ते त्या विशाल स्वर्गलोकाचा उपभोग घेऊन पुण्याचा क्षय झाल्यावर पुनः मृत्युलोकीं येतात. यासाठीं गोस्वामी तुलसीदासांनीं म्हटलें आहे—

एहि तनुका फल विषय न भाई ।
स्वर्गउ स्वल्प अन्त दुखदाई ॥

'हे भाई! या तनूचें फळ विषय नाहीं, स्वर्ग (देखील) अल्प असून अतीं दुःखदा आहेयी' या शरीराचे फळ विषयभोग नव्हे, स्वर्गातील विषयभोग देखील अल्प असून ते दुःखद आहेत असें त्यांचें म्हणणें आहे.

(म) तापदुःखता— पुत्र, स्त्री, स्वामी, धन, घरादि सर्व पदार्थ प्रत्येक वेळीं ताप देऊन जाळीत असतात. कोणताही विषय असा नाहीं कीं जो विचार केला असतां ताप देणारा दिसून येणार नाहीं! या खेरीज जेव्हां मनुष्य आपल्याहून दुसऱ्याला कोणत्याही विषयांत अधिक असलेला पहातो तेव्हां आपल्या अल्प सुखाला पाहून त्याच्या हृदयांत मोठी जळण पैदा होते! विषयांची प्राप्ति त्यांचें संरक्षण आणि त्यांचा नाश या सर्वांत जळण ही नेहमी असावयाचीच! म्हटलें आहे—

अर्थानामर्जने दुःखं तथैव परिपालने ।
नाशे दुःखं व्यये दुःखं धिगर्थं क्लेशकारिणम् ॥

धन मिळविण्यांत किती प्रकारचा सन्ताप, उपार्जन झाल्यानंतर त्याचें रक्षणांत संताप, एखाद्या वेळीं त्याचा नाश होऊं नये या चिंतालयांत सदा जळावें लागते; त्याचा नाश झाला तरी जळण, खर्च झाला तरी जळण, सोडून मरण्यांत

जळण; सारांश आरंभापासून शेवटपर्यंत दुःख हीच गोष्ट पुत्र मान बढाई यांची आहे. सर्वांत तें मिळण्याच्या इच्छेपासून वियोगा पर्यंत संताप लागून राहिलेला आहे. असें कोणतेही विषय-सुख नाहीं कीं जे तापदायक नसेल.

( क ) **संस्कारदुःखता**— पति--पत्नि, पुत्र--परिवार, धन--मानादि जे विषय आज प्राप्त आहेत त्यांचे संस्कार हृदयांत बसले आहेत. या कारणानें ते समाप्त झाल्यानंतर पूर्व संस्कारामुळें त्या वस्तुंचा अभाव मोठा दुःखदायक होतो. मी कसा होतो, माझा मुलगा सुंदर सुडौल आणि आज्ञाधारक होता, माझी स्त्री किती सुशील होती, मला पतीकडून किती सुख मिळत होतें, माजी कीर्ति सर्व जगांत पसरली होती, परंतु आज मी कसा झालों? आज मी सर्व तऱ्हेनें हीन दीन झालों आहे. जरी या मनुष्याप्रमाणें लाखो माणसे आरम्भापासूनच या विषयांहून रहित आहेत तरी त्यांना अभावाचा अनुभव नसल्यानें ते याच्या सारखे दुःखी नाहींत. विषय-भोगांची विपुलता असली म्हणजे त्या सुखाचे संस्कार दृढ होत असतात, असे संस्कार दृढ झालेल्यालाच सुखाभाव जाणवत असतो. अभावाची जाणीव ही दुःखानें भरलेली असते. हीच 'संस्कारदुःखता' आहे.

या शिवाय हीहि गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं संसारांतील सर्व विषय सर्व अवस्थांत दुःखमिश्रितच असतात.

( ण ) **गुण-वृत्तींचे विरोधनजन्य दुःख**— किंवा एखाद्या मनुष्याला थोडेसे खोटे बोलून, छल— कपट करून, विश्वासघात करून दहा हजार रुपये मिळ-ण्याची संभवना प्रतीत होत असेल तर त्याची सात्विक वृत्ति म्हणूं लागते 'पाप करून मिळत असलेले रुपये आपणाला नकोत, त्या पेक्षा भिक्षा मागणें किंवा मरून जाणें चांगलें परंतु पाप करणें उचित नव्हे.' एकीकडे लोभमूलक राजसी वृत्ति म्हणते 'काय हरकत आहे? एक वेळ थोडेंसे खोटें बोलण्यांत कसली आपत्ति? जरासे छल--कपट किंवा विश्वासघात केला म्हणून काय झालें? एक वेळ असे रुपये मिळवून दारिद्र्य दूर करून घेऊं, पुढें मात्र कधीं असें करूं नये म्हणजे झालें.'

असें सात्विक आणि राजस वृत्तींत महायुद्ध सुरू होते. या झगड्यांत चित्त अगदीं व्याकूळ व किंकर्तव्यमूढ होऊन जाते. विषाद व उद्विग्नता यांचा पार उरत नाहीं.

अशा प्रकारेंच राजसी व तामसी वृत्तींचा खटका उडत असतो. एक मनुष्य बुद्धिबल किंवा पत्ते खेळत बसला आहे. तिकडे वेळेवर घरीं न गेल्यामुळें घरां-

तील आवश्यक कामाचा विघाड होऊं लागतो. कर्मांत प्रवृत्त करणारी राजसी वृत्ति म्हणते ‘ ऊठ, काम खोळंबून पडलें आहे, घरचें काम पहा ’ इकडे प्रमाद-रूप तामसी वृत्ति त्याला वारंवार खेळाकडे खेंचत असते; अशा ओढाताणींत सांपडून तो बिचारा महादुःखी होऊन जातो.

उदाहरणाकरितां दोन दृष्टान्त पुरे आहेत.

याप्रमाणें विचार केला असतां असें स्पष्ट दिसून येतें कीं संसारांतील सर्व सुख दुःखरूप आहे. याकरितां असल्या सुखापासून मनाला परावृत्त करण्याचा कसून प्रयत्न केला पाहिजे.

उपर्युक्त भय आणि विचार यापासून होणारे दोन्ही प्रकारांचें वैराग्य प्राप्त करण्याचा हाच उपाय आहे. हे उपाय पूर्वीपेक्षां उत्तम श्रेणीचें वैराग्य संपादन करण्यांतही अवश्य सहायक होत असतात. परंतु याहून पुढील दोन्ही प्रकारच्या वैराग्याची प्राप्ति होण्याचे कामीं निम्नलिखित साधनें विशेष सहायक होतात.

परमात्म्याचा नामजप आणि त्यांच्या स्वरूपाचें निरंतर स्मरण करीत राहि-ल्यानें हृदयांतील मल जसजसा दूर होत जाईल तसतसें तें उज्ज्वल होत जातें. अशा उज्ज्वल आणि शुद्ध अंतःकरणांत वैराग्याच्या लहरी उत्पन्न होतात आणि त्यांच्यायोगानें विषयानुराग मनांतून आपोआपच नाहींसा होतो. या अवस्थेंत विशेष विचार करण्याची आवश्यकता रहात नाहीं. जसें, मळकट आरसा कपड्यानें पुसूं लागलें असतां जसजसा मळ दूर होत जातो तसतसा तो चमकूं लागतो आणि त्यांत मुखाचें प्रतिबिंब स्पष्ट दिसूं लागतें, त्याचप्रमाणें परमात्म्याचें भजन ध्यानरूपी घासणीनें अंतःकरणरूपी आरसा मळ नाहींसा झाल्यावर चमकूं लागतो आणि त्यांत सुखस्वरूप आत्म्याचें प्रतिबिंब दिसूं लागतें. अशा स्थितींत थोडासाही शिल्लक उरलेला विषय-मळाचा डाग साधकाच्या हृदयांत कुसळासारखा खुपूं लागतो. म्हणून तो उत्तरोत्तर अधिक उत्साहानें त्या डागाला धुवून काढण्यासाठीं भजनध्यानानें जसजसा अंतःकरणरूपी आरसा स्वच्छ होऊं लागतो तसतशी साधकाची आशा आणि त्याचा उत्साह वाढूं लागतो भजनज्ञानरूपी तत्त्व न जाणणाऱ्या मनुष्यालाच भाररूप वाटूं लागतें. ज्याला हें तत्त्व-ज्ञान प्राप्त होऊं लागतें त्याला वाढता आनंद मिळून, पूर्णानंद प्राप्त करून देणारें त्याचें भजन-ध्यानही चढत्या प्रमाणांत सुरूं होतें. त्याच्या दृष्टीला विषयांच्या ठिकाणीं दिसून येणारे विषय-सुखाची कांहींच सत्ता वाटत नाहीं. या योगानें त्याला फार लवकर दृढवैराग्याची प्राप्ति होते. भगवंतानें या दृढवैराग्यरूपी शस्त्रद्वाराही अहंता, ममता आणि वास-नारूप अतिदृढमुळांचा संसाररूप अश्वत्थवृक्षाचें छेदन करण्यास सांगितलें आहे.

अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा ॥ ( गीता १५।३ )

संसारचित्राचें पूर्णपणें विस्मरण होणें हेंच या अश्वत्थवृक्षाचें छेदन करणें आहे. दृढ वैराग्यानें हें काम सहजच होऊं शकतें.

भगवान् म्हणतात—

ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः ।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ (गी० १५।४)

त्यानंतर त्या परमपदरूप परमेश्वराचा चांगल्या प्रकारें शोध घेतला पाहिजे ( त्या परमात्म्याचें विज्ञान आनन्दघन 'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म' याचें वारंवार चिंतन करणें हाच त्याचा शोध घेणें आहे. ) ज्या ठिकाणीं गेलेले पुरुष पुनः संसारांत परत येत नाहींत आणि ज्या परमेश्वरापासून ह्या पुरातन संसारवृक्षाची प्रवृत्ति विस्तारली त्या आदिपुरुष नारायणाला मी शरण आहे. त्या परमपद स्वरूपाला पकडणें— स्थांत स्थित होऊन राहाणें हेंच त्याला शरण होणें आहे. असा दृढ निश्चय केल्यानंतर—

निर्मानमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।
द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ॥

( गी० १५·५ )

ज्यांचा मानमोह नष्ट झाला, ज्यांनीं आसक्तिरूप दोष जिंकला आणि ज्यांची परमात्मस्वरूपीं निरंतर स्थिति झाली तसेंच ज्यांची कामना बिलकूल नष्ट झाली असे सुखादुःखनामक द्वन्द्वापासून विमुक्त झालेले ज्ञानीजन त्या अविनाशी परमपदास प्राप्त होतात.

## ३ वैराग्याचें फल

बस, याप्रमाणें एका परमात्म्याचेंच ज्ञान ( नेहमीं ) रहाणें हीच निश्चल समाधि किंवा जीवन्मुक्तावस्था होय. तिचेंच हें लक्षण आहे. त्यानंतर असलें जीवन्मुक्त पुरुष संसारांत कशाप्रकारें वागतात, त्यांची कशीं स्थिति असते याचें विवेचन गीतेच्या १२ व्या अध्यायांतील १३ ते १९ श्लोकापर्यंत खालीलप्रमाणें केलेलें आहे, भगवान् त्यांचीं लक्षणें सांगतांना म्हणतात—

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एवच ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ १३ ॥
संतुष्ट सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १४ ॥
यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ १५ ॥

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।
सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १६ ॥
यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥ १७ ॥
समः शत्रौच मित्रेच तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ॥ १८ ॥
तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी सन्तुष्टो येन केन चित् ।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ १९ ॥

"या प्रमाणें शान्तिप्राप्त पुरुष सर्व भूतांच्या ठिकाणीं द्वेपभावरहित व स्वार्थरहित सर्वांचा प्रेमी आणि हेतुरहित दयाळू असा असतो. तसेंच ममता रहित एवं अहंकाररहित, सुखदुःखप्राप्तींत सम आणि क्षमाशील असतो, अर्थात् आपला अपराध करणाऱ्यालाहि अभय देणारा असतो. तो ध्यानयोगयुक्त असून लाभहानीमध्यें नेहमीं सन्तुष्ट असतो. मन आणि इन्द्रियें यांच्यासह शरीराला वश केलेला, माझ्या ठिकाणीं दृढनिश्चय असलेला व (आपली) मनबुद्धि मला अर्पण केलेला असा माझा भक्त मला प्रिय आहे. ज्याच्यापासून कोणीही जीव उद्वेगाला प्राप्त होत नाहीं आणि जो स्वतः आपणही कोणाकडूनही उद्वेगादिरहित आहे तो मला प्रिय आहे. जो पुरुष आकांक्षारहित, आंत बाहेर शुद्ध व चतुर आहे अर्थात् ज्या कामाकरितां आला होता ते पूर्ण करून चुकला आहे तसेंच पक्षपातरहित आणि सर्वदुःखापासून मुक्त झालेला आहे असा तो सर्व आरम्भांचा त्यागी अर्थात् मन, वाणी, शरीरद्वारा प्रारब्धानुसार होणाऱ्या स्वाभाविक संपूर्ण कर्मांच्या कर्तेपणाचा अभिमान नसलेला माझा भक्त मला प्रिय आहे. जो कधीं हर्षित होत नाहीं, द्वेष करीत नाहीं, शोक करीत नाहीं, कामना करीत नाहीं, तसेंच जो शुभ व अशुभ अशा संपूर्णकर्मांच्या फलाचा त्यागी आहे–तो भक्तियुक्त पुरुष मला प्रिय आहे. जो पुरुष शत्रु, मित्र, मान, अपमान, थंडी, उष्णता आणि सुखदुःखादि द्वन्द्वांत सम रहातो आणि संसारांत जो आसक्तिहीन आहे तसेंच जो निंदा—स्तुति समान जाणतो, जो मनन करणारा आहे, अर्थात् ईश्वराच्या स्वरूपाचें निरंतर मनन करणारा आहे, एवं ज्या कोणत्या रीतीनें शरीर-निर्वाह होईल त्यांत सदा संतुष्ट आणि रहाण्याचें स्थानांत ज्याची ममता गुंतून राहिली नाहीं तो स्थिरबुद्धीचा भक्तिमान् पुरुष मला प्रिय आहे."

अतएव या असार संसारांतून मनाला काढून इहलौकिक व पारलौकिक सर्व भोगांविषयीं वैराग्य धारण करून सर्वांनीं परमात्मप्राप्तीस्तव प्रयत्न केला पाहिजे. (अनुवादित)

। ॐ तत्सत् ।

# "धांव ! पांडुरंगा !"

( अभंग. )

धांव पांडुरंगा । पतिताची हाक । सावधान ऐक । ऐक देवा ॥ ध्रु० ॥
नलगे मोक्ष-भुक्ती । विठो ! तुझी भक्ती । नको विषयासक्ती । पांडुरंगा ॥१॥
संसाराचा संग । करी प्रेमभंग । भजनीं श्रीरंग । दिसे डोळां ॥ २ ॥
तुझें नामामृत । पीत सदोदित । म्हणवीन भक्त । विठ्ठलाचा ॥ ३ ॥
उध्दराुवा दास । विनवी पदास । पुरवावी आस । दीनानाथा ॥ ४ ॥
तुरली अहंता । कोठिल ममता! । अमलीया चित्ता । सांभाळावा ॥ ५ ॥
तुजसी पाहीन । तुजला वाहीन । तुज आळवीन । भक्तिभावा ॥ ६ ॥

× × ×

नको हा संसार । पापाचा बाजार । झालोसे बेजार । ठाव द्यावा ॥ १ ॥
नको हो संबंध । मायेचा विषाद । दाखवी आनंद ।ब्रम्हानंदा ॥ २ ॥
संतांचें चरण । मानीन प्रमाण । तुज बा शरण । आलों देवा ॥ ३ ॥
विठ्ठल बरवा । पाहीन केधवा । उत्कंठेचा धावा । ऐक बापा ॥ ४ ॥
तूंचि विश्वमाता । विश्वाची साउली । म्हणुनी तळमळी । अंतरीला ॥ ५ ॥
प्रेमळ कां ! कोण ? । सांग तुझ्याविण । आत्माराम दीन । पांडुरंगा ॥ ६ ॥

× × ×

कासया उशीर ? । पामर अधीर । देई कृपाकर । मायदेवा ॥ १ ॥
काय दयाघन ? । भीषण पाषाण । पदीं घे लोळण । तारामारा ॥ २ ॥
पांडुरंग काम । पांडुरंग प्रेम । पांडुरंग राम । पांडुरंगा ॥ ३ ॥
पांडुरंग नांव । पांडुरंग भाव । पांडुरंग राव । रंक त्याचा ॥ ४ ॥
पांडुरंग अंग । पांडुरंग रंग । पांडुरंग संग । जाहलीया ॥ ५ ॥
पांडुरंग सेवा । पांडुरंग ठेवा । पांडुरंग धावा । पांडुरंगा ॥ ६ ॥

× × ×

संतमेळीं दंग । राहिला अभंग । एक पांडुरंग । सर्व काला ॥ १ ॥
भावना मंगल । राजस कोमल । उधळी परिमल । आनंदाचा ॥ २ ॥
मंगल पाहणें । मंगल हांसणें । मंगलाचें लेणें । विश्वारुपा ॥ ३ ॥
नादब्रम्हचाळा । विठो ! मोहनाला । विश्वव्यापकाला । विश्वलीला ॥ ४ ॥
मूर्त प्रेम झोला । घेतसे आंदोला । बागडे सांवळा । विश्वरुपा ॥ ५ ॥
काळ करि चढाई । कां अशी ढिलाई ? । धांव माझे आई । पांडुरंगा ॥ ६ ॥

"राम"

# अस्पृश्यताविषयक वार्ता.

## १ गांधीजी धर्मापेक्षां श्रेष्ठ नाहींत.

" श्री. गांधीजी हे हिंदु धर्मापेक्षां केव्हाही श्रेष्ठ नाहींत, धर्म हा लोकांची तात्कालिक सोय पाहण्याकरितां केलेला नाहीं. जर कोणी एकाद्यानें स्वत.ला उपोषणानें मारून घेण्याचा निश्चय केला तर त्याला खुशाल मरूं द्यावे, पण त्याला वांचविण्याकरितां कोणत्याही धर्माभिमान्यानें आपला परंपरागत धर्म केव्हांही सोडून देऊं नये. गांधीजीप्रमाणें हिंदुधर्मासाठीं आपलें प्राण सोडण्यास एकच काय पण शेंकडो व हजारों सनातनी एका पायावर तयार आहेत. अहो महात्माजी ! वरील उद्गार वाचून किंवा ऐकून जर तुमच्या अंतःकरणांत खऱ्या परिस्थितीचा प्रकाश पडला नाहीं तर तुमच्यासारखे मतिमंद तुम्हीच होत. धर्मकारण म्हणजे राजकारण नाहीं. राजकारणांत निजलेले लोक धर्मावर संकट येतांच खडबडून जागे होतात याचा अनुभव तुम्हांस पाहावयाचा असेल तर मंदिरप्रवेशाचा प्रश्न तुम्ही नेटास लावा म्हणजे तो अनुभव तुह्मांस जरूर येईल." असें स्पष्टोद्गार संकेश्वरमठाचे श्रीमत् शंकराचार्य यांनीं एका बातमीदारास भेट दिली त्या वेळेस काढले.

## २ श्रुतीचा आधार

कुकुरमुंडे येथील श्रीखंडोजी महाराजांच्या उत्सवप्रसंगीं चार हजारावर समाज जमला होता. तेथें पंडित राजेश्वरशास्त्री यांनीं वेद, शास्त्र वगैरे ठिकठि-काणचीं अनेक प्रमाणें श्रोत्यांच्या पुढें मांडून अस्पृश्यतानिवारण हें धर्मदृष्ट्या कसें असंमत आहे, हें जनतेस फारच उत्तम रीतीनें समजावून दिलें. त्यांपैकीं कांहीं प्रमाणें खालीं दिलीं आहेतः—

" तद्य इह रमणीयचरणा अभ्याशो ह यत्ते रमणीयां योनिमापद्येरन्ब्राह्मण-योनिं वा क्षत्रिययोनिं वा वैश्ययोनिं वाऽथ य इह कपूयचरणा अभ्याशो ह यत्ते कपूयां योनिमापद्येरञ्श्वयोनिं वा सूकरयोनिं वा चण्डालयोनिं वा

छान्दोग्य अ० ५. खंड १०७.

या श्रुतीमध्यें चण्डालाला कपूययोनि म्हणजे पापयोनि, निंद्ययोनि असें म्हटलें आहे.

" तस्मान्न जनमियान्नान्तमियान्नेत्पाप्मानं मृत्युमन्ववायानीति "

(बृ० उ. १. ३०. १०.)

या श्रुतीवरील शांकरभाष्य असें आहे:—

“ तस्मात्तमन्त्यं जनं नेयान्न गच्छेत्संभाषणदर्शनादिभिर्न संसृजेत । तत्संसर्गे पाप्मना संसर्गःकृतः स्यात्पाप्माश्रयो हि सः ।

तज्जननिवासं चान्तं दिगन्तशब्दवाच्यं नेयाज्जनशून्यमपि जनमपि तद्देशवियुक्तमित्यभिप्रायः । नेदिति परिभयार्थे निपातः । इत्थंजनसंसर्गे पाप्मानं मृत्युमन्ववायानीति.........अनुगच्छेयमित्येवं भीतः ।

ही श्रुति प्रत्यंत देशनिवासी लोकांसंबंधानें आहे. अन्त्यशब्द अथवा अंत्यज शब्द त्या लोकांना ह्या श्रुतीवरून लागू होत. चंडालयोनि ही पापयोनि असल्याचें श्रुतीवरूनेहि सिद्ध आहे. आणि पाप्माश्रय असलेल्या अंत्यपुरुषाशीं संसर्ग केल्यापासून अकालीं मृत्यु येण्याची भीति आहे, असें बृहदारण्यक श्रुतिच सांगत आहे.

## ३ उपवासाला उपवासानें उत्तर.

महात्माजींचा एक भक्त व ‘ भारतसेवक समाजा ’चे माजी सभासद मि० एस्० एम्० मायकेल यांनीं गांधींच्या उपवास-बलात्काराविरुद्ध निषेध प्रदर्शित करण्याकरितां स्वतः उपोषण करण्याचें ठरविलें आहे. यासंबंधीं महात्मागांधी व मि० मायकेल यांमध्यें बराच पत्रव्यवहार आतांपर्यंत झाला असून, महात्माजींना लिहिलेल्या एका पत्रांत ते म्हणतात कीं अस्पृश्यता ही गोष्ट वाईट; परंतु नैतिक जबरदस्ती ही त्याच्यापेक्षांहि वाईट. धार्मिक दृष्ट्या अमुक एक गोष्ट करणें वाईट असें समजणाऱ्या सनातनी लोकांस तीच गोष्ट करण्यास भाग पाडणारा उपवास जर गांधींनीं सुरू केला तर सदसद्विवेक बुद्धीला स्मरून कोणतीहि गोष्ट करणाऱ्या सनातन्यांच्या हक्काचें रक्षण करण्यासाठीं उपवास आपणांसहि सुरू करावा लागेल.

## ४ क्रिया तशी प्रतिक्रिया

‘ जशी क्रिया तशी प्रतिक्रिया ’ या न्यायानें म० गांधींनीं सुरू ठेवलेल्या अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीविरुद्ध ठिकठिकाणचे सनातनी जोरानें हालचाल करूं लागले आहेत. मद्रास व संयुक्त वगैरे प्रांतांतून सनातनी लोकांच्या स्थानिक व प्रांतिक सभा भरत आहेत. जवळ जवळ सर्वमान्य १०० पंडितांच्या सह्यांनीं अस्पृश्यतेचा सशास्त्र निर्णय प्रसिद्ध होऊन त्याचें खंडणार्थ विरुद्ध पक्षाला जाहीर आव्हान दिलें गेलें आहे. अ. भा. वर्णाश्रम स्वराज्यसंघाच्या कार्यकारिणी समितीनें सर्व हिंदुस्थानभर दौरे निघण्याची योजना ठरविली असून ह्या कार्याला शीघ्र सुरुवात होत आहे. या कामीं ज. श्रीमच्छंकराचार्य श्रीशेरोळकर स्वामिमहाराज, ज. उत्तरतोताद्री मठाधीश, ज. श्रीगोकुळनाथ महाराज वगैरे पीठस्थ सहायक असून स्वतः प्रचारकार्य करणार आहेत. पं. राजेश्वरशास्त्री द्रविड, पं. देवनाय-

काचार्य, पं. रमापतिमिश्र, पं नागेशशर्मा, पं. नंदकिशोर हे पंडित पंचायतन ज. भारती कृष्णमहाराजांचे नेतृत्वाखालीं दौऱ्यावर निघणार आहे.

## ५ भारतसमाचारांतील उतारा.

या नांवाचें एक सनातनधर्मीय सुंदर साप्ताहिक मुंबईस निघालें असून त्याचे सात अंक बाहेर पडले आहेत. यांतील लेख प्रौढ, व्यवस्थित, धर्माच्या कळकळीनें व राष्ट्रहितदृष्टीनें लिहिलेले असतात. महाराष्ट्रांत धार्मिक व चालु चळवळींवर धर्महित दृष्टीनें चाललेलें हें एकच साप्ताहिक आहे. आमच्या वाचकांनीं ते अवश्य घ्यावें अशी आमची हार्दिक शिफारस आहे.

" बृहदारण्यक ४--४--२२ छांदोग्य ५--६--७--८--२४--१ मनु, याज्ञवल्क्य, पराशरमाधव, अंगिरा, यम, अत्रि, संवर्त, शातातप, वृद्धशातातप, बौधायन, पराशर, हारित, व गीता ५-१८ इत्यादि श्रुतिस्मृतींत, अस्पृश्यतेचा, तद्वाचकशब्दांचा, स्पष्ट उल्लेख आहे. असें असून " शास्त्रांत अस्पृश्यता " नाहीं असें म्हणणें ही निवळ फसवणूक आहे. या चळवळीचे आजचे अध्वर्यु गीता हाच ग्रंथ आहे. असें समजून, त्या विषयीं म्हणतात कीं गीतेंतील मुख्य गोष्टीशीं, विसंगत असें कांहीं आढळून आल्यास तें मी हिंदुबाह्य समजतों. " परंतु गीतेंत मुख्य गोष्टी कोणत्या ? " स्वे स्वे कर्मण्यभिरतः " " स्वकर्मणातमभ्यर्च्य " " स्वधर्मे निधनं श्रेयः " " संकरोनरकायैव " " यःशास्त्रविधिमुत्सृज्य " या सर्व गोष्टी गीतेंत गौण आहेत कीं, मुख्य ? याचा विचार, स्पष्ट प्रदर्शित न करीतां नुसता वरील उल्लेख करणें हें तज्ञतेचें, समबुद्धीचें द्योतक खास नाहीं. अस्पृश्यता ही शास्त्रीय आहे, ती धर्म्य आहे, आणि म्हणूनच ती स्वार्थी प्रवृत्तीनें कोणाच्या माथी लादलेली नाहीं. अस्पृश्यतेचा मूळ हेतू स्व प्रौढी नसून पावित्र्य, शुद्धता हा आहे. "

—पुरुषोत्तमशास्त्री काशीकर.—

## ६ सनातन वैदिकधर्म परिषद

सनातन धर्मानुयायी लोकांची वैदिक धर्म परिषद पुणें येथे रविवार ता० ४ डिसेंबर रोजीं महामहोपाध्याय पं० वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. परिषदेस जमलेल्या मंडळीमध्ये खालील गृहस्थ प्रामुख्याने दिसत होतें. श्री. विष्णु वासुदेव ऐनापुरे वकील मुंबई, श्री. दत्तात्रय बळवंत गंढाळे, पं. भगवानशास्त्री धारूरकर, श्री. येरेशास्त्री, श्री. वृंदावनाचार्य, पं. उंबरकरशास्त्री पंढरपूर, ह. भ. प. केशवदत्तबुवा जुन्नर, श्री. महाजन बेळगांव, श्री. राजोपाध्ये, श्री. केशवबुवा सोनगीरकर खानदेश, श्री. हरि मारुति देशपांडे सातारा, श्री. नारायण विठ्ठल वाकणकर हैद्राबाद ( दक्षिण ) रा. ब. श्रीनिवास

कुपस्वामी मुदलीयार, श्री. अण्णासाहेब वर्तक (रि. ए. इंजीनियर,) श्री. बळवंतराव गांधी वकील, श्रीसदाशिवराव वैद्य, श्री. गोपाळ मोरेश्वर पटवर्धन, श्री. बाबासाहेब पटवर्धन, श्री. रघुनाथशास्त्री पटवर्धन, श्री. शंकरशास्त्री मारूलकर, नागाचार्य नरसिंगपूरकर, गणेशशास्त्री गोडबोले, प्रो. अण्णुभाऊ दीक्षित, प्रो. नारके, श्री. भाऊसाहेब लवाटे, वैद्यपंचानन कृष्णशास्त्री कवडे, श्री. मुकुंदशास्त्री मिरजकर, श्री. बाळशास्त्री उपासनी, ह. भ. प. केशवराव देशमुख (ज्ञानेश्वरी-विवरणकर्ते,) रा. वा. कृ. भावे इ० मंडळी हजर होती. परिषदेस हजर राहणाऱ्या इसमांनी 'आजपर्यंतच्या धार्मिक परंपरागत चातुर्वर्ण्यातील स्पृश्य हिंदूंच्या कोणत्याहि देवालयांत आणि धार्मिक जागेंत अंत्यजादि अस्पृश्य मानलेल्या जातींच्या लोकांनी प्रवेश करूं नये असें आमचें मत आहे.' या प्रतिज्ञापत्रकावर सह्या केल्या होत्या.

परिषदेचा मुख्य उद्देश अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाविषयीं महात्मा गांधी प्रभृति लोकांकडून जी अनिष्ट व कलहवर्धक चळवळ समाजांत सुरू झाली आहे तिचा निषेध करणें, सनातन धर्मानुयायांचीं मतें स्पष्टपणें ठरावरूपानें मांडून तीं सरकारास कळविणें व सनातन धर्माच्या आजपर्यंत शिष्टसंमत असलेल्या आचारपरंपरेविरुद्ध हल्लीं ज्या अनिष्ट गोष्टी घडून येत आहेत त्यांचा निषेध करणें हा होता. अध्यक्षांचें भाषण विद्वत्ताप्रचुर झालें.

## व्यवस्थित आहार.

ऐहिक माणसांचीं, साधुसंतांचीं, समाजसेवकांचीं, राष्ट्रधुरीणांचीं रणवीरांचीं उद्योगवीरांचीं, धर्मवीरांची, भाषावीरांचीं, कारखानदारांचीं चरित्रें जितकीं राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीला उपयोगीं पडतात, तितकींच या आरोग्यवीरांचीं व शक्तिवीरांचीं चरित्रेंही उपयोगी पडतात. किंबहुना, या वीरांचीं चरित्रें सर्वांत जास्त महत्त्वाचीं; कारण एकंदर पुरुषार्थांच्या मुळाशीं त्यांचा संबंध असतो. याकरितां अशा वीरांच्या चरित्राची माहिती जिकडून मिळेल, तिकडून ती मिळवून तरुण पिढीपुढें ठेविली पाहिजे, एरवीं त्यांना आरोग्य व बळ याच्या उपासनेची स्फूर्ति कोठून कशी मिळणार ?"

"आम्ही आपली थडगीं आपल्या दांतांनीं उकरतों,' या अर्थाची इंग्रजी भाषेंत एक म्हण आहे. 'आम्ही आपली सरणें आपल्या जिभांनीं रचतों,' असें तिचें आपल्या रिवाजाला शोभणारें भाषांतर करितां येईल. पण, 'अती खाणें नी मसणांत जाणें,' अशी त्याच अर्थाची मराठींत म्हण आहेच. या इंग्रजी किंवा मराठी म्हणींत असें तत्त्व भरलेलें आहे; कीं, आम्ही (सुधार-

लेलीं माणसें ) जहरीपेक्षां नेहमीं जास्त खातों व त्यामुळें लौकर मृत्यूच्या मुखांत आपोआप जाऊन पडतों. नाना प्रकारच्या खमंग, खुसखुशीत, मधुर, झणझणीत खाद्यपेयांच्या रुचीनें भ्रष्ट झालेल्या जिभेच्या नादाला लागल्यानें आम्हांला आपल्या आरोग्याला व शेवटीं आयुष्याला मुकावें लागतें. म्हणून, ‘ जीभ आवरावी आणि आयुष्य लांबवावें. ’ ज्याला आपल्याला दीर्घायुष्य लाभावें, असें वाटत असेल, त्यानें पहिल्यानें जीभ आपल्या कह्यांत ठेविली पाहिजे. या अनुभवानें पावन झालेल्या म्हणींत असा बोध भरलेला आहे.

मनाची प्रसन्नता, हितमितपथ्य असा आहार, ब्रह्मचर्य, व्यायाम, शुद्ध व स्वच्छ असें पाणी, मोकळी हवा, सूर्याचा प्रकाश व ऊन या सगळ्या बाबी आरोग्य व दीर्घायुष्य याच्या लाभाला कारण होणाऱ्या आहेत. ज्यांना हा लाभ व्हावा, असें वाटत असेल, त्यांनीं या सगळ्या बाबी संभाळल्या पाहिजेत. त्यापैकीं कोणत्याही बाबीची उपेक्षा झाल्यास प्रायश्चित्त हें भोगावें लागणारच. पण प्रायश्चित्ताची तीव्रता व प्रायश्चित्ताचे परिणाम शरिरावर दिसून येण्याला लागणारा कमीजास्ती अवधि यांवरून त्या बाबींत तारतम्य करितां येतें. तेव्हां परिणामावरून पाहतां त्यांतल्या कांहीं बाबींकडे विशेष प्रमुखत्व येतें. आणि वरील परिच्छेदांत जीं वचनें दिलीं आहेत. त्यांवरून पाहतां आहाराची बाबही प्रमुखांतली प्रमुख ठरते. तेव्हां आरोग्य व दीर्घायुष्य यांचा लाभ आपल्याला व्हावा, असें ज्यांना वाटत असेल, त्यांनीं खाण्यापिण्यांत अत्यंत दक्षता बाळगली पाहिजे. अग्रपूजेचा मान आहाराला. या आहाराचे बाबतींत अनेक पोटप्रश्न आहेत. दिवसांत किती वेळा खावें ? केव्हां खावें ? कसें खावें ? किती खावें ? काय खावें ? हे सगळे प्रश्न विचारांत घेतले पाहिजेत. या प्रश्न—पंचकांतसुद्धां पहिला प्रश्न महत्त्वानें पहिलाच आहे. दिवसांत, “ एकदां खातो तो जोगी ( योगी ) दोनदां खातो तो भोगी, तीनदां खातो तो रोगी. ” अशी आपल्यांत म्हण आहे. “ एकदां खातो तो देवदूत, दोनदां खातो तो मनुष्य, तीनदां खातो तो पशु, ” असें इंग्रजी भाषेंतही प्राचीन वचन आहे. दोन्ही वचनें अगदीं समानार्थी आहेत. या वचनांमुळें पहिल्या प्रश्नाची थोरवी मनांत तेव्हांच भरते. दिवसांत किती वेळा खावें ? या प्रश्नालाच प्राधान्य देऊन निष्ठेनें त्याप्रमाणें वागणूक ठेविली असता दीर्घायुष्य लाभतें. सकाळीं उठल्यापासून रात्रीं निजेपर्यंत ज्या वेळीं जिथे, जें सापडेल, त्या वेळीं, तिथे, तें खाण्याची, किंवा पिण्याची अलीकडे जी पद्धत वाढली आहे किंवा वाढत आहे व जीमुळें तरूणपणींच्या आरोग्याची राखरांगोळी होत आहे ती अत्यंत दुष्ट व हानिप्रद आहे. ”

—कृष्णाजी गोविंद किनरे ( चित्रमय जगत् )

# तुळसीदाससूक्ति

तुळसीदास रामायणांतील कांहीं सूत्ररूपवचनें ह्म० सुभाषितें पुढें देतों.

१ पराधीन सपनेहु सुख नाहीं ।

२ नारिधरम पति देव न दूजा ।

३ पियवियोगसम दुख जग नाहीं ।

४ धरम न दूसर सत्यसमाना ।

५ कालकरमगति अघटित जानी ।

६ सत हरिभजन — जगत सब सपना ।

७ बेद पुरान जासु जस गावा । रामबिमुख काहु न सुख पावा ।

८ मुद—मंगलमय संतसमाजु ।

९ बिनु संतसंग बिबेक न होई । रामकृपाबिनु सुलभ न सोई ।

१० सतसंगति मुद—मंगलमूला ।

११ मधुकरसरिस संत गुनग्राही ।

१२ न हि कलि करम न भगति बिबेकू । रामनाम अवलंबन एकू ।

१३ स्रुति कह परमधरम उपकारा ।

१४ जिन्ह हरिकथा सुनीनहि काना । स्रवनरंध्र अहिभवनसमाना ।

१५ ते सिर कटुतुंबरीसम तूला । जे न नमत हरिगुरुपदमूला ।

१६ जो नहि करइ रामगुनगाना । जीह सो दादुरजीहसमाना ।

१७ सगुनहि अगुनहि नहि कछु भेदा । गावहि मुनि पुरान बुध बेदा ।

१८ हरष विषाद ज्ञान अज्ञाना ।

१९ सगुनउपासक परहितनिरत । निरत—नीतिदृढनेम ।
ते नर प्रानसमान मम जिन्हके द्विजपदप्रेम ॥

२० नहि दरिद्रसम दुख जगमाही । संपतमिलनसम सुख जग नाहीं ।

२१ परमधरम स्रुतिबिदित अहिंसा परनिंदासम अघ न गिरीसा ।

२२ स्तुतिपुरान सबग्रंथ कहाही । रघुपति भगतिबिना सुख नाहीं ।

२३ बिनुबिस्वास भगति नहि तेहिबिनु द्रवहिन राम ।
रामकृपाबिनु सपनेहु जीव न लह बिस्राम ॥

२४ कलिजुगसम जुग आन नही जो नर कर बिस्वास ।
गाइ रामगुनगन बिमल भव तर बिनहिप्रयास ॥

२५ मिलहि न रघुपति बिनु अनुरागा । किये जोग जप ज्ञान बिरागा ।

२६ संसृतिमूल सूलप्रद नाना। सकल सोकदायक अभिमाना।

२७ रामचंद्रके भजनबिनु जो चह पद निर्बान।
ज्ञानवंत अपि सो नर पशु बिनुपुच्छबिखान॥

२८ दीपसिखासम युवतिजन मन जन होसि पतंग।
भजहि राम तजि काम मद करहि सदा सतसंग॥

२९ बिनु हरिकृपा मिलहि नहि संता।

३० कामक्रोध मदलोभ सब नाथ! नरकके पंथ।
सब परिहरि रघुबीरहि भजहु भजहि जेहि संत।

३१ सेवक सठ, नृप कृपिन, कुनारी। कपटी मित्र-सूलसम चारी।

३२ सोइ गुनज्ञ सोइ बडभागी। जो रघुवीरचरन-अनुरागी।

३३ परहितसरिस धर्म नहि भाई। परपीडासम नहि अधमाई।

३४ प्रेमभगति जल बिनु रघुराई। अभि अंतरमल कबहु न जाई।

३५ काहु न कोउ सुखदुखकर दाता। निजकृतकरमभोग सब भ्राता।

३६ मानहि मातु पिता नहि देवा। साधुन्ह सन करवावहि सेवा।
जिन्हके यह आचरन भवानी। तेजानहु निसिचर सब प्रानी।

३७ राकारजनी भगति तव, रामनाम सोइ सोम।
अपरनाम उडुगन, बिमल बसहु भगत-उर-व्योम॥

३८ कह रघु 'सुनु भामिनि! बाता। मानउ एक भगति कर नाता।
जाति पांति कुलधर्म बढाई। धन बल परिजन गुन चतुराई।
भगतिहीन नर सोहइ कैसा। बिनु जल बारिद देखिय जैसा'।

३९ परहित बस जिन्हके मनमाही। तिन्ह कह जग दुर्लभ कछु नाहीं।

४० भगति तात अनुपम सुखमूला। मिलइ जो संत होहि अनुकूला।
प्रथमहि बिप्रचरन अतिप्रीती। निजनिजधरमनिरत श्रुतीरीती।
स्रवनादिक नव भगति दृढाही। मम लीलारति अति मनमोही।
संतचरनपंकज-अतिप्रेमा। मनक्रमबचन भजन दृढनेमा।
गुरु पितु मातु बंधु पति देवा। सब मोहि कहजानइ दृढ सेवा।
मम गुन गावत पुलक सरीरा। गदगद गिरा नयन बह नीरा।

# सतरावें महाराष्ट्र-साहित्य-संमेलन

नगरवाचनमंदिर, कोल्हापूर या संस्थेतर्फे महाराष्ट्र-साहित्य संमेलनाचें १७ वें अधिवेशन येत्या नाताळांत होणेचें निश्चित झालें आहे. सुप्रसिद्ध साहित्य-प्रेमी **वडोदाधिपति श्रीमंत सर सयाजीराव गायकवाड महाराज.** सेनाखासखेल, यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्यास अनुमति दिली आहे. या समेलनांत ग्रंथकार, कवि, ग्रंथप्रकाशक यांचींही उपसमेलनें अनुक्रमें विख्यात रियासतकार श्री. **गो. स. सरदेसाई** (बडोदे) कविवर्य **श्री. भा. रा. तांबे** (ग्वाल्हेर) व नामांकित **ग्रंथप्रकाशक श्री. दा. सा. यंदे** (मुंबई) यांचे अध्यक्षतेखालीं भरणेचीं ठरलीं आहेत. तसेंच संमेलनास जोडून ग्रंथ, नियतकालिकें व हस्तलिखित यांचें प्रदर्शनही भरणार असून त्याचा उद्‌घाटन—समारंभ मध्यप्रांताचे दिवाण **नामदार बॅ० पंजाबराव देशमुख** यांचे हस्तें होणार आहे. सदर अधिवेशनांत महाराष्ट्र-साहित्याच्या अभिवृद्धीसाठीं, महाराष्ट्र—विद्यापीठाची स्थापना, ठिकठिकाणीं कवींचे, लेखकांचे व प्रकाशकांचे जे संघ आहेत त्यांचें दृढीकरण व संयोगीकरण व यासारख्या प्रश्नांचा विचार होणार आहे. तरी सदरहू संमेलनप्रसंगीं हजर राहणेची कृपा करून संमेलन यशस्वी करणेस मनोभावानें साहाय्य करावें अशी सविनय विनंती आहे.

| | |
|---|---|
| कोल्हापूर<br>जनरल लायब्ररी | आपला<br>**दत्ताजीराव माधवराव भोसले,**<br>**अध्यक्ष, स्वागत मंडळ.**<br>**१७ वें महाराष्ट्र साहित्य-संमेलन**<br>**कोल्हापूर.** |

# आनंदलहरी.

यांत रा. पांगारकरांनीं २५ वर्षांत वेळोवेळीं रचलेल्या ४० स्फुट काव्य प्रकरणांचा समावेश केला आहे. १८ प्रकरणें स्तोत्रें वगैरे परमार्थावर आहेत. ८ प्रकरणें महाराष्ट्रसंत व सद्ग्रंथ या सदराखालीं आहेत. ८ प्रकरणें उपदेशपर असून बाकीचीं ६ प्रासंगिक आहेत. कविता विविधवृतांत आहे. 'उपकृतिस्मरण' हें [illegible] श्लोकांचें आत्मचरित्रपर प्रकरण घातलें असून त्यांत ज्या विद्वानांचा, ग्रंथांचा, व साधुसंतांचा सहवास झाला त्यांचेही उपकार स्मरले आहेत. किं.१।१२

# श्रीसमर्थमंदिरांत ... चर्चा

( मार्गशीर्ष शुद्ध ११ हा गीताजयं ... दर वर्षी त्या दिवसापासून, तो दिवस धरून, पुढें अकरा दि ... श्रीसमर्थमंदिरांत श्रीसांप्रदायिक चर्चा व्हावी, असें ठरलें ... चर्चा मुख्यतः ग्रंथराज दासबोधावर व्हावयाची आहे. दासबोध आहे ... दासबोधाचें रचनास्थल, दासबोधाच्या हास्तलिखित प्रती, त्याचें स्वरूप ... पद्धता, त्यांतील तत्त्वज्ञान, व्यावहारिक शिकवण, श्रीसमर्थांनि ... अनेक व्याख्या, त्यांना शिष्यांनीं विचारलेले प्रश्न, त्यांचीं त्यांनीं दि... , त्यांनीं केलेल्या प्रतिज्ञा, ब्रह्मांडाची उभारणी आणि संहारणी, पंचीकरण ... त, इत्यादि अनेक दृष्टींनीं ही चर्चा झाली पाहिजे ) या चर्चेसाठीं श्री. ... राज, श्रीसमर्थदास महाराज, नारायण महाराज, वगैरे अधिकारी मं ... शिष्यपरिवारासमवेत येणार आहेत. अनंतदास आलेच पाहिजेत आणि येतील. श्रीमंत वामन नाईकसाहेबहि येणार आहेत. पुष्कळ मंडळी येतील प्रत्यहीं सकाळीं प्रत्येकानें एकएकटे कोठें तरी एकांतांत बसून आपल्याशीं दोन दोन दशक मननपूर्वक वाचावयाचे व तिसरा प्रहरीं ३ ते ५ सर्वांनीं श्रीसमर्थमंदिरांत एकत्र जमून त्या दोन दशकांवर श्रीसमर्थांपुढें चर्चा करावयाची, असा कार्यक्रम ठरला आहे. अकराव्या दिवशीं सर्वसामान्य चर्चा होईल. प्रत्यहीं रात्रीं ८॥ ते ९॥ निरनिराळया मंडळींचीं अनेक विषयांवर प्रवचनें होतील इतर वेळांत इतर वाचन, भजन, पूजन, जप, इत्यादि कार्यक्रम अनुसरण्यास प्रत्येक जण मोकळा आहे. ही जी सर्व चर्चा व्हावयाची ती सप्रमाण, साधार झाली पाहिजे, इतकी कीं, ती सारी चर्चा कोणी लिहून काढल्यास ग्रन्थराज दासबोधाचा अभ्यास म्हणून एक स्वतंत्र ग्रंथच आपोआप सिद्ध व्हावा. तरी अशा चर्चेसाठीं शक्य असेल त्या सर्वांनीं अगत्य यावें, अशी विनंति आहे. प्रत्येकानें आपआपले प्रमाणग्रंथ व ग्रंथराजाची पारायणाची प्रत बरोबर आणावी. जांबेसहि ग्रंथराजाच्या प्रती विकत मिळू शकतील.

( याच अकरा दिवसांत तेथें कांहीं महत्त्वाच्या वस्तूंचें प्रदर्शन होईल. सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहीं असलेल्या दासबोधाच्या कांहीं अपूर्व प्रती, कांहीं महत्त्वाचीं बाडें, महत्त्वाचीं ऐतिहासिक पत्रें, भगवद्गीतेचीं अप्रतिम सचित्र पोथी, इत्यादि कौतुकास्पद वस्तूंचें अनायासें दर्शन घडेल, श्रीसमर्थ, श्रीशिवराय, श्रीकल्याणस्वामी, इत्यादिकांचीं हस्ताक्षरें पहावयास सांपडतील, या सर्व वस्तु अशा अमोलिक आहेत कीं, त्या सहसा अन्यत्र कोठें पहावयास मिळावयाच्या नाहींत. )

परतुड कोठें आहे हें आतां सर्वांस ठाऊक झालें आहे. मनमाडपासून हैद्राबादकडे जाणाऱ्या आगगाडीच्या फांट्यावर जालन्याच्या पुढें चवथें स्टेशन परतुड, तेथून जांब दक्षिणेस सहा कोस. शक्य त्यांनीं अगत्य यावें.

शंकर श्रीकृष्ण देव